सभापतीस्थानी - माननीय उपसभापती

पृ.शी. : महाराष्ट्र राज्यात सामील झाल्यानंतर आजपर्यंत विदर्भाच्या विकासाकडे राज्य सरकारचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष.

मु.शी. : महाराष्ट्र राज्यात सामील झाल्यानंतर आजपर्यंत विदर्भाच्या विकासाकडे राज्य सरकारचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष या विषयावर सर्वश्री पांडुरंग फुंडकर, दिवाकर रावते, नितीन गडकरी, प्रा. बी.टी.देशमुख, सर्वश्री अरविंद सावंत, विनोद तावडे, डॉ.दीपक सावंत, श्री.केशवराव मानकर, डॉ.नीलम गोऱ्हे, सर्वश्री सय्यद पाशा पटेल, परशुराम उपरकर, किरण पावसकर, वि.प.स. यांचा प्रस्ताव.

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 260 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो. ..

" विदर्भ महाराष्ट्रात राज्यात सामील झाल्यानंतर विदर्भाच्या विकासाकडे शासनाचे आजतागायत अक्षम्य दुर्लक्ष होणे, संत्रा प्रकल्प, आरोग्य विद्यापीठ, टाटा स्टील, रेल्वे डब्बे निर्मिती आदी प्रकल्प विदर्भाबाहेर जाणे तर मिहान, बांबू विद्यापीठ, रिंग रेल्वे, आंतरराष्ट्रीय प्राणी संग्रहालय तसेच सिंचन व विद्युत निर्मितीचे शेकडो प्रकल्प व प्रकल्पग्रस्तांचे पुनरर्वसन प्रलंबित असणे, प्रकल्प प्रलंबित राहण्यास कारणीभूत असलेल्या वनजमिनी, झुडपी जंगले, प्रशासकीय मान्यता, अपुरा निधी, केंद्राची परवानगी आदी समस्या सोडविण्यात शासनास अपयश येणे, कृषी पंप, रस्ते, विंधन विहिरी, शाळा, महाविद्यालये, रूग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे, आश्रमशाळा, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अभियांत्रिकी महाविद्यालये यांचा अनुशेष वाढणे, सिंचनाच्या व कृषी पंपाच्या वाढत्या अनुशेषामुळे कृषी क्षेत्राची वाताहात होणे, विविध पॅकेजेस दिल्यानंतरही शेतकऱ्यांच्या आत्महत्या प्रमाणात सतत वाढ होणे, पॅकेजेस मधील निधीचा मोठ्या प्रमाणात अपहार होणे, शेतकऱ्यांना शेतीसाठी देण्यात येणारी खते व बियाणांच्या पुरवठ्यात शेतकऱ्यांची फसवणूक होणे, कर्जमाफी योजनेचा लाभ शेतकऱ्यांऐवजी गैरव्यवहारांमुळे बुडित निघालेल्या बँकांना अधिक मिळणे, धान, सोयाबीन, कापूस उत्पादक शेतकऱ्यांना उत्पादन खर्चावर आधारित भाव न मिळाल्यामुळे ते आत्म्हत्येस प्रवृत्त होणे आणि उपरोक्त सर्व परिस्थितीमुळे विदर्भवासियांमध्ये सापत्नभावाची निर्माण झालेली भावना व राज्यातील हा विभागीय असमतोल दूर करण्यासाठी करावयाची प्रभावी उपाययोजना विचारात घेण्यात यावी. "

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(यानंतर श्री. सरफरे ....बी 1 ...

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर....

सभापती महोदय, महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेचे सुवर्ण जयंती वर्ष आपण साजरे करीत आहोत. महाराष्ट्र राज्याची निर्मिती होऊन जवळपास 50 वर्षे पूर्ण झाली आहेत. ही 50 वर्षे पूर्ण झाल्यानंतरही आज या सभागृहामध्ये विदर्भाच्या मागासलेपणासंबंधी चर्चा करण्याची दुर्दैवी पाळी आमच्यावर आली आहे. सभापती महोदय, विदर्भ ज्यावेळी सी.पी. अँड बेरारमध्ये होता त्यावेळी संयुक्त महाराष्ट्र राज्य, मराठी भाषिकांचे राज्य झाले पाहिजे याकरिता चळवळ झाली. त्यानंतर हे मराठी भाषिकांचे राज्य झाले. या विदर्भाला पूर्वी महाविदर्भ म्हटले जात होते. तो महाराष्ट्रामध्ये विलीन करण्यासंबंधी चर्चा झाली. तो विलीन करण्याकरिता विदर्भातील काही प्रमुख नेत्यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या काही पदाधिकाऱ्यांबरोबर चर्चा केली. त्यामधून एक नागपूर करार समोर आला. आणि दि.28.9.1953 रोजी त्यावर सह्या झाल्या. त्यावेळी आर.के.पाटील, पी.के. देशमुख, भाऊसाहेब हिरे, देवकीनंदन, यशवंतराव चव्हाण, लक्ष्मणराव भटकर, पंढरीनाथ पाटील, रामराव देशमुख, गोपाळराव खेडकर, शेषराव वानखेडे, नाना कुंटे इत्यादी प्रभूतींच्या करारावर सहया झाल्या. त्या करारामध्ये कोणती कलमे अंतर्भूत करण्यात आली? त्यामध्ये चौथे कलम हे नागपूरचे कलम होते. त्यामध्ये म्हटले की, "एक स्वतंत्र शासन म्हणून त्यांच्या ज्या गरजा असतील त्यांना बाधा न येता, निरनिराळया घटकांवर करावयाच्या खर्चासाठी पैशाचे नियत वाटप त्या त्या भागातील लोकसंख्येच्या प्रमाणात करण्यात यावे. परंतु, मराठवाडयाची अविकसित स्थिती लक्षात घेऊन, त्या प्रदेशाच्या सर्वांगीण विकासाकरिता मराठवाडयाकडे खास लक्ष पुरविण्यात यावे आणि दरवर्षी राज्य विधानसभेसमोर त्यासंबंधीचा अहवाल ठेवण्यात यावा." त्यानंतर कलम 5 मध्ये असे म्हटले आहे की, "सरकार बनवतांना या घटकांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधीत्व मिळावे" कलम 6 मध्ये "व्यावसायिक प्रशिक्षण आणि वैज्ञानिक किंवा अन्य विशेषीकृत पेशासंबंधीचे प्रशिक्षण मिळण्याच्या सुविधा जेथे आहेत अशा सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश मिळण्यासाठी या घटकांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात चांगल्या व पुरेशा सोयी उपलब्ध होतील अशी खात्रीलायक तजवीज करण्यात यावी" अशाप्रकारे महाविदर्भ या राज्यामध्ये विलीन होत असतांना अशाप्रकारचा करार झाला. त्यावेळी या करारामध्ये महाविदर्भच्या लोकांनी त्यांच्या राज्याची राजधानी म्हणून नागपूर शहराशी फार जुन्या काळापासून घनिष्ठ संबंध आहे. आणि त्यांना त्या अनुषंगाने विविध फायदे मिळतात याची आम्हाला जाणीव आहे. एकसंघ राज्याचे प्रशासन परिणामकारक रितीने चालण्याच्या दृष्टीने आवश्यक ते निर्बंध घालूनही त्यांचे हे फायदे शक्य त्या मर्यादेपर्यंत टिकविण्याची आम्हाला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ KTG/

श्री. पांडुरंग फुंडकर....

इच्छा आहे." अशापध्दतीची कलमे त्यामध्ये घातली. अशाप्रकारे नागपूर करार झाल्यानंतर 50 वर्षे हे राज्य चालले. मला वाटते की, माझी माहिती चुकीची नसेल तर जवळपास नागपूरच्या उप राजधानीमध्ये त्यावेळी असे ठरले होते की, एक अधिवेशन हे विदर्भाच्या उप राजधानीमध्ये, नागपूरमध्ये व्हावे. त्याप्रमाणे आतापर्यंत जवळपास 45 अधिवेशने या नागपूरला झाली. महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यापासून 45 अधिवेशने याठिकाणी झाली. संकेत असा होता की, हे अधिवेशन किमान एक महिना तरी चालले पाहिजे. परंतु एक महिना सोडा, फक्त 10 अधिवेशने किमान 20 दिवस चालली, त्यानंतर अधिवेशनाचे दिवस वाढले नाहीत. आणि आज सुध्दा तीच स्थिती आहे. कधी कधी असे वाटते की, नागपूरला हे अधिवेशन कशासाठी होते?

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी-तालिका सभापती श्री.अरविंद सावंत)

श्री.पांडुरंग फुंडकर . . . .

याठिकाणी मंत्रिमंडळ येते. माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री येतात. विदर्भातील थंडीमध्ये 8-10 दिवस पिकनीक सारखे येथे रहातात. विदर्भाला संत्रा नगरी असेही म्हटले जाते. विदर्भामध्ये होणाऱ्या 8-10 दिवसाच्या अधिवेशनामध्ये गडबड, गोंधळ, एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करणे यामध्येच विधानसभेचे अधिवेशन संपते. खरे म्हणजे अधिवेशनाच्या कालावधीमध्ये विदर्भाच्या विकास करण्याच्या बाबतीत, येथील प्रश्न मार्गी लागण्याच्या बाबतीत प्रयत्न करणे अशी येथील अधिवेशनाची संकल्पना होती. पण प्रत्यक्षात या अधिवेशनामधून काही निष्पन्न होत नाही. मार्च 2006 मध्ये राज्यसभेमध्ये स्वतंत्र विदर्भाच्या स्थापनेबाबतच्या खाजगी प्रस्तावावरील चर्चेच्या दरम्यान तत्कालीन माननीय पंतप्रधानांनी हस्तक्षेप केला होता आणि त्यांनी स्वत: या भागातील गंभीर प्रश्नांच्या संदर्भात योजना आयोगाच्या विशेष समितीची नियुक्ती केली होती. या समितीच्या विशेष अभ्यास गटाने विदर्भातील वेगवेगळया भागांना भेटी देऊन नागरिक, विविध कार्यकर्ते, राजकीय नेते, मंत्री, विविध शासकीय अधिकारी यांच्याशी चर्चा केली. मग या समितीने महालेखा नियंत्रक आणि परिक्षकांच्या सहकार्याने जवळपास 225 पानांचा एक अहवाल तयार केला. 2006-2007 मध्ये महालेखाकारांनी सादर केलेल्या अहवालात विदर्भाच्या मागासलेपणाचे अधिकृत वास्तव दाखविण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यांनी स्पष्टपणे म्हटलेले आहे की, हे वास्तव चित्र आहे. विदर्भातील विविध प्रकल्पांच्या अंमलबजावणीत वीज निर्मिती व वितरणातील प्रचंड भेदभाव याकडे लक्ष वेधून विदर्भाच्या विकासासाठी महाराष्ट्र सरकारकडे राजयकीय इच्छा शक्तीचा अभाव असल्याचा गंभीर आरोप केला आहे. तसेच महाराष्ट्रामध्ये विदर्भाचा विकास अशक्यप्राय असल्याची बाबही स्पष्टपणे नमूद करण्यात आली आहे. या समितीने निष्कर्ष काढला की, महाराष्ट्रातील नेत्यांमध्ये राजकीय इच्छाशक्तीचा अभाव आहे. विदर्भाचा मागासलेपणा दूर करण्याची त्यांची इच्छा नाही. म्हणून माननीय राज्यपाल महोदयांनी 2002 ते 2005 च्या दरम्यान जो निधी मंजूर केला होता, त्यातील 2500 कोटी रुपये विदर्भाला कमी देण्यात आले. परंतु त्याचवेळी पश्चिम महाराष्ट्राला मंजूर झालेल्या निधीपेक्षा 1600 कोटी रुपये अधिक देण्यात आले आणि माननीय गृहमंत्री माहदेय, मी सांगू इच्छितो की, हा आमचा आरोप नाही तर माननीय पंतप्रधान यांनी नेमलेल्या योजना आयोगाने आरोप केलेला आहे. गेल्या 50 वर्षात विदर्भाचा किती विकास झाला ?याचा जर आढावा घेतला तर अजूनही विदर्भ विकासा....

. . . .सी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर . . . .

पासून खूपच उपेक्षित असल्याचे दिसून येते. या प्रस्तावावर सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देखमुख बोलणार आहेत, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते बोलणार आहेत. त्यामुळे मी सर्व विषयांना स्पर्श करणार नाही. परंतु विदर्भ किती उपेक्षित आहे ? याबाबत सांगावयाचे तर विदर्भामध्ये विकासाचा अनुशेष कमी न होता, तो दिवसेंदिवस वाढत आहे. सर्व संपत्तीने विपूल असलेल्या विदर्भामध्ये मात्र विकासाची गती मंद आहे. कालच आम्ही सदनामध्ये नियम 93 अन्वये सूचना देण्यात आली होती. विदर्भातील गोंदिया,चंद्रपूर,भंडारा आणि गडचिरोली जिल्ह्यांमध्ये, विदर्भामध्ये काय कमी आहे ? विदर्भामध्ये खनिज संपत्ती आहे, कोळशाच्या खाणी आहेत, बॉक्साईड, मँगनीज् आहे आणि जंगल संपत्ती, वन संपत्ती मोठया प्रमाणात आहे. खरे म्हणजे महाराष्ट्रातील अन्य कोणत्याही भागामध्ये एवढी प्रचंड संपत्ती नाही. याठिकाणी खनिज संपत्ती आहे, त्याचबरोबर वैनगंगा, पैनगंगा सारख्या बारमाही वाहणाऱ्या नद्या आहेत. त्यांचे पाणी कधीही आटत नाही. परंतु एवढी साधन-संपत्ती असताना सुध्दा विदर्भ मागासलेला का राहिला आहे ? हा प्रश्न आहे. मघाशी मी नागपूर करार वाचून दाखविला. परंतु त्या करारानुसार सरकार वागलेले नाही.

यानंतर कु.थोरात . . ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर....

नागपूर कराराप्रमाणे सरकार वागले नाही. नागपूर कराराप्रमाणे लोकसंख्येच्या प्रमाणात निधीचे वाटप झाले नाही त्यामुळे विदर्भाच्या वाटयाला कमी पैसा आला. विदर्भात केवळ खनिजसंपत्तीच नाही तर विदर्भाच्या भूमीबद्दल असे म्हटले गेले आहे की, "वऱ्हाड आणि सोन्याची कुऱ्हाड" महाराष्ट्राच्या कुठल्याही भागामध्ये नाही, इतकी काळी कसदार आणि उपजाऊ जमीन विदर्भात आहे. या जमिनीमध्ये कडधान्याचे उत्पादन होते. या जमिनीमध्ये कपूस हे पांढरे सोने पिकते. अशा या विदर्भाची ही अवस्था आज झालेली आहे. विदर्भात मुबलकप्रमाणात धान्याचे उत्पादन होऊ शकते.विदर्भातील शेतकऱ्यांना नीट पाणी दिले, वीज दिली आणि खऱ्या अर्थाने शेती उत्पादनासाठी आवश्यक असणाऱ्या सोयी पुरविल्या तर एकटा विदर्भ या राज्याची संपूर्ण धान्याची गरज पूर्ण करु शकेल एवढी या विदर्भामध्ये ताकद आहे. या विदर्भातील निसर्गदत्त संपत्तीचा सुनियोजितपणे व समन्वयाने वापर केला तर विदर्भात काहीही कमी नाही. सभापती माहेदय, विदर्भाचे दुर्दैव आहे की, विदर्भातील खनिजसंपत्तीचा आणि विजेचा वापर विदर्भासाठी करण्यात येत नाही. विदर्भात राज्याच्या 60 टक्के इतके विजेचे उत्पादन होत असताना विदर्भाच्या वाटयाला फक्त 11 टक्के वीज येते. विदर्भात वीज प्रकल्प आहेत. पण विदर्भातील शेतकऱ्यांना वीज मिळत नाही. विदर्भात चार वीज निर्मिती प्रकल्प आहेत. 60 टक्के वीज विदर्भात निर्माण होत असताना विदर्भातील शेतकऱ्यांना फक्त 11 टक्के वीज मिळत असेल तर विदर्भातील शेतकरी कसा जीवंत राहणार आहे? सभापती महोदय, विदर्भाचे दुर्दैव असे आहे की, विदर्भातील नेते तयार झाले त्यामुळे विदर्भाला मंत्रिमंडळात स्थान मिळाले. या नेत्यांनी विदर्भाचा विकास केला नाही. पण विदर्भात जे जे नेते होऊन गेले त्यांनी स्वत:चा विकास केला. त्यांनी महाविद्यालये, मेडिकल कॉलेज्स, इंजिनियरिंग कॉलेज्स, बी.एड. कॉलेज्स आणि डी.एड. कॉलेज्स उघडली आणि स्वत:चा प्रचंड प्रमाणात विकास करुन घेतला पण विदर्भातील जनतेकडे त्यांनी दुर्लक्ष केले. विदर्भातील मागासलेपणाच्या मुद्यावर जनतेला मुर्ख बनवायचे, फुड रंगवायचे, निवडून यायचे, मुंबई दिल्ली गाठून स्वत:च्या संपत्तीचा अनुशेष दूर करायचा एवढाच एककलमी कार्यक्रम या राज्यामध्ये झाला.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ SBT/ KTG/

श्री. पांडुरंग फुंडकर.....

सभापती महोदय, सिचंनाच्यासंदर्भातील थोडक्यात चित्र मी याठिकाणी सांगणार आहे. कोटयावधी रुपये खर्च करुन विदर्भातील एकही सिंचन प्रकल्प आजच्या घडीला पूर्ण क्षमतेने सुरु नाही. एकूण सिंचन क्षमतेच्या 20 ते 25 टक्के सिंचन होत असल्याची धक्कादायक माहिती माहितीच्या अधिकाराखाली आम्हाला मिळालेली आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या अनुषंगाने सिंचनावर भर देण्याच्या वारंवार घोषणा केल्या जातात. पॅकेज्स दिले जातात परंतु असलेले प्रकल्प पूर्णत्वास नेण्याच्या दृष्टीने कार्यवाही होत नाही. प्रकल्पाच्या भिंती उभ्या आहेत. सभापती महोदय, मी पार्लमेंटमध्ये असताना यवतमाळ जिल्हयातील अडाण प्रकल्पाचे एक निवेदन मला मिळाले होते. तो अडाण प्रकल्प पूर्ण झाला होता. पण एक कालवा पूर्ण झाला नाही म्हणून अडान प्रकल्पाचे पाणी शेतकऱ्याकडे पहात होते आणि शेतकरी त्या पाण्याकडे पहात होता.

यानंतर श्री. बरवड...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

पंधरा वर्षे तो कालवा पूर्ण होऊ शकला नाही. अनेक प्रकल्पांची आज अशीच स्थिती आहे. कोट्यवधी रुपये खर्च करुन 40 वर्षे काम सुरु असलेल्या प्रकल्पाची आजची सिंचन क्षमता जेमतेम 10 टक्के आहे. विदर्भामध्ये नागपूर विभागात 10 मोठे, 30 मध्यम आणि 41 लघु असे एकूण 81 प्रकल्प आहेत. अमरावती विभागामध्ये 12 मोठे, 14 मध्यम आणि 134 लघु असे एकूण 160 प्रकल्प आहेत. विदर्भामध्ये एकूण 241 प्रकल्प आहेत. यापैकी एकही प्रकल्प निर्धारित क्षमतेने सुरु झालेला नाही. एकूण सिंचन क्षमतेच्या फक्त 20 ते 25 टक्केच सिंचन होत आहे. काही धरणांमध्ये पाणीसाठा आहे परंतु शेतीपर्यंत पाणी जाण्यासाठी कालवे, वितरिका, चाऱ्या लागतात त्यांची कामे पूर्ण झालेली नाहीत. त्यातील काही प्रकल्पांची खूप बोलकी आणि असंतोषदायक आकडेवारी आहे. वर्धा आणि अमरावती जिल्ह्याला वरदान ठरणारा उर्ध्व वर्धा प्रकल्प 1965 मध्ये मंजूर झाला. जवळपास 44 वर्षानंतरही हा प्रकल्प अपूर्ण असल्याचे अधिकारी सांगतात. सुरुवातीला या प्रकल्पाची किंमत 3 कोटी 78 लाख रुपये होती आणि सिंचन क्षमता 80 हजार 250 हेक्टरची होती. मात्र आतापर्यंत या प्रकल्पावर 963 कोटी रुपये खर्च होऊनही 80 हजार हेक्टरपैकी फक्त 17 हजार हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झालेली आहे. वर्धा जिल्ह्यातील कोथळानाला प्रकल्प 1977 मध्ये मंजूर झाला. त्या प्रकल्पाची मूळ किंमत 2 कोटी रुपये होती. आज 31 वर्षानंतर त्या प्रकल्पाची किंमत 2 कोटी रुपयांवरुन 60 कोटी रुपयांवर पोहोचलेली असताना अपेक्षित 11,632 हेक्टर सिंचनाऐवजी केवळ 3 हजार हेक्टर सिंचन क्षमता या प्रकल्पामध्ये निर्माण झालेली आहे.

सभापती महोदय, यानंतर मी यवतमाळ जिल्ह्याचे उदाहरण देतो. मी प्रत्येक जिल्ह्यातील एक एक उदाहरण देणार आहे. यवतमाळ जिल्ह्यातील बेंबळा प्रकल्प 1992 साली मंजूर झाला. या प्रकल्पाची अंदाजित किंमत 190 कोटी रुपये होती. ती किंमत 1050 कोटी रुपयांवर गेली तरी 47 हजार हेक्टर शेतीला पाणी देण्याची क्षमता असलेल्या या प्रकल्पामध्ये फक्त 150 हेक्टर सिंचन क्षमतेचाच टप्पा गाठला. राष्ट्रमाता जिजाऊ माँ साहेबांचे जन्मस्थान असलेल्या आमच्या बुलढाणा जिल्ह्यामध्ये पाण्याची समस्या आमच्या पाचवीला पूजलेली आहे. शेतीप्रमाणेच पिण्याच्या पाण्यासाठी सुध्दा आमचा जिल्हा दीर्घकाळ तहानलेलाच आहे. पिण्याच्या पाण्याची टंचाई ही या जिल्ह्यातील

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

मोठी समस्या आहे. जवळपास 935 गावे पाणी टंचाईचा सामना करीत आहेत. बहुतांश गावात आठवड्यातून एकदा पाणी मिळते. जिल्ह्यात दरवर्षी पाणी टंचाई कृती आराखड्यावर 5 कोटी रुपयांचा खर्च दाखविला जातो. टँकरव्दारे पाणीपुरवठा करण्यावर जवळपास दीड कोटी रुपयांचा खर्च होतो. या पैशातून खडकपूर्णा ते पेनटाकळी या भागात जलवाहिनी टाकली तर संपूर्ण भागात पाणीपुरवठा होऊ शकतो. त्या ठिकाणी खडकपूर्णा आणि पेनटाकळी हे दोन प्रकल्प आहेत. जिगाव या महत्वाकांक्षी प्रकल्पाला युतीच्या काळात प्रशासकीय मान्यता मिळाली. जिल्ह्याच्या सिंचनाच्या वाढीत भर टाकणाऱ्या या प्रकल्पामुळे मलकापूर, नांदुरा, शेगाव या तालुक्यातील शेतकऱ्यांच्या जमिनी सिंचनाखाली येणार आहेत. परंतु ज्या शेतकऱ्यांची जमीन या प्रकल्पामध्ये गेली त्यांना अद्यापपर्यंत मोबदला दिला गेलेला नाही. आधी धरण आणि मग पुनर्वसन या ऐवजी आता आधी पुनर्वसन आणि मग धरण हे तत्व आपण मान्य केलेले आहे. परंतु अजूनही जवळपास 35 गावे अशी आहेत की ज्यांच्या पुनर्वसनाच्या कामाला सरकारने अजून हात लावलेला नाही. बुलढाणा जिल्ह्यातील पेनटाकळी प्रकल्प 1989 मध्ये मंजूर झाला. या प्रकल्पाचा सुरुवातीचा खर्च 16 कोटी रुपये होता तो आज 179 कोटीवर गेलेला आहे. तरी देखील काम अपूर्ण आहे. निर्धारित 14,332 हेक्टर सिंचनापैकी फक्त 6330 हेक्टरला पाणी मिळते. खडकपूर्णा प्रकल्प 79 कोटी रुपयांवरुन 525 कोटी रुपयांवर गेला तरी 15 हजार हेक्टर सिंचनापैकी एकही हेक्टरला पाणी मिळू शकत नाही. आश्चर्य हे आहे की, विदर्भामध्ये सध्या अस्तित्वात असलेल्या प्रकल्पांची ही स्थिती असताना नवीन कामांचे प्रस्ताव मंजूर होत आहेत. हे प्रकल्प अपूर्ण असताना नवीन कामांचे प्रस्ताव आता मंजूर होत आहेत. 5 हजार कोटी रुपयांच्या गोसीखूर्द प्रकल्पाचे काम टप्प्याटप्प्याने करण्याचे प्रस्तावित होते. जल व नियोजन आयोगाने 2008-09 मध्ये पाच वर्षाच्या कामांना मंजुरी दिली आणि त्यातून दरवर्षी 1 हजार कोटी रुपये खर्च करावयाचे होते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री. खंदारे.....

श्री.पांडुरंग फुंडकर....

मात्र या मंजुरीला फाटा देऊन विदर्भ पाटबंधारे सिंचन मंडळाने 2013 मध्ये सुरु होणाऱ्या असोलामेंडा हा गोसीखूर्द प्रकल्पाचा भाग असलेल्या प्रकल्पाची निविदा काढली. 2013 मध्ये काम सुरु होणार आहे, परंतु त्या कामाची निविदा आताच काढून ठेवली आहे. पुढील 5 वर्षानंतर सुरु होणाऱ्या कामांच्या निविदा आताच काढून ठेवल्या आहेत. शासकीय दराला न जुमानता चढया दराची निविदाची रक्कम त्यात अंतर्भूत आहे. त्यात शासकीय दर बाजूला ठेवले आहेत. चढया दराने निविदा ठरविण्यात आल्या आहेत. राज्यातील अन्न पाटबंधारे मंडळाशी तुलना केली तर ही रक्कम अर्धी असल्याचे दिसून येते. निविदेतील प्रत्येक बाब ही 50 टक्के चढया दराने दाखविण्यात आली आहे. कालव्यांना सध्या तरी काँक्रीटचे आवरण घालण्याची आवश्यकता नसताना त्याचेही प्रस्ताव त्यात घुसविण्यात आले आहेत. जल आयोगाच्या शिफारशीनुसार कालव्याचे बांधकाम झाल्यानंतर 2-3 वर्षात आवरणाचे काम करता येते. परंतु विदर्भ पाटबंधारे मंडळाने त्यासाठी घाईघाईने निविदा मागवून ते काम पूर्ण केले आहे. त्यामुळे कालव्याच्या गुणवत्ता व मजबुतीकरणावर परिणाम झाला आणि काँक्रीटीकरणाच्या आवरणाला आता भेगा पडल्या आहेत. या भेगांच्या दुरुस्तीसाठी पुन्हा निविदा मागविण्यात आल्या. आवश्यकता नसताना एका कामावर दुप्पट खर्च झाला आहे. एका क्यूबिक मीटरसाठी 4 हजार रुपये दर असताना येथील कंत्राटदारांना 5600 रुपये देऊन कंत्राटदाराचे खिसे भरण्यात आले आहेत. सभापती महोदय, विदर्भात झालेल्या प्रकल्पांचे शासनाने 3 हजार कोटी रुपये देणे बाकी आहे. पुनर्वसन व भूसंपादनाचे कोट्यवधी रुपये शासनाकडे थकित आहेत. असे असताना शासनाने 2009 मध्ये 1400 कोटी रुपये व ऑगस्ट, 2009 1770 कोटी रुपये कामांच्या निविदा काढल्या आहेत. ऐन निवडणुकीच्या तोंडावर विदर्भाच्या तोंडाला पाने पुसण्याचा आतबट्टयाचा व्यवहार येथे सुरु झाला, त्याची उच्चस्तरीय चौकशी होणार आहे की नाही ? याची चौकशी होण्याची आवश्यकता आहे. पाटबंधारे खात्याच्या पाटामधून पाण्याऐवजी आता विदर्भात पैसा वाहत आहे. सन्माननीय मंत्री महोदय श्री.बाळासाहेब थोरात यांच्या भागात गेल्यावर पाटातून पाहणी वाहत असल्याचे आम्हाला दिसते, परंतु आमच्या भागात तुम्ही आलात मात्र पाटात पाण्याऐवजी पैसा वाहताना दिसेल. एवढा अवाजवी खर्च या

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ SBT/

श्री.पांडुरंग फुंडकर....

प्रकल्पांवर केला जात आहे.

सभापती महोदय, राज्यामध्ये आतापर्यंत हुंडाबळी झाले, नरबळी झाले, विषारी दारुमुळे बळी झाले, भूकबळी झाले अशाप्रकारचे बळी महाराष्ट्रातील व विदर्भातील लोकांना माहीत आहेत. परंतु राज्यातील आघाडी सरकारच्या 10 वर्षाच्या काळात आता एका नव्या बळीच्या प्रकाराची भर पडली आहे. कर्जबळी या नव्या प्रकाराची सुरुवात झाली आहे. कर्जामुळे विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढत आहेत. त्याची आकडेवारी आम्ही देत नाही, कारण शासनाचे असे मत आहे की विरोधक शेतक-यांच्या आत्महत्येचा अव्वाच्यासव्वा आकडा देतात. परंतु आघाडी पक्षाचे खासदार माननीय श्री.दत्ता मेघे यांनी लोकसभेमध्ये मागील अधिवेशनामध्ये राज्यात 10 वर्षात झालेल्या बळींची संख्या 7 हजाराच्या वर गेली आहे असे सांगितले आहे. आघाडी सरकारच्या काळात बळींची लोकसंख्या 7 हजारापेक्षा जास्त झाली आहे असे त्यांनी कृषी खात्याच्या चर्चेच्या वेळी सांगितले आहे. राज्यात मात्र शेतकरी हा व्यसनामुळे आत्महत्या करतो असे सांगितले जाते. आता मंत्रिमंडळातील काही मंत्र्यांची मजल येथपर्यंत गेली आहे की ते असे म्हणतात की, शेतकरी दारु पिऊन आत्महत्या करतो. शेतक-यांना भीक नको, पण आपले कुत्रे आवरा. शेतक-यांना बदनाम करु नका. शेतक-यांच्या आत्महत्यांची आकडेवारी समोर आली आहे त्या आकडेवारीला खोटे ठरविण्याचा प्रयत्न झाला. आत्महत्यांची कारणे शोधली गेली नाहीत, परंतु शेतकरी कशामुळे आत्महत्या करतो तर त्याला व्यसन आहे असे सांगितले गेले. तो दारु पितो. पण आत्महत्येच्या मुळाशी कोणी गेले नाही. या विदर्भामध्ये मी सुरुवातीला सांगितल्याप्रमाणे काळी कसदार जमीन आहे. मोठया प्रमाणात खनिज संपत्ती आहे. वऱ्हाड आणि सोन्याची कऱ्हाड आहे. या विदर्भातील शेतक-याला शासनाने पाणी दिले असते, वीज दिली असती, त्याच्या कच्च्या मालावर प्रक्रिया करणारी कारखानदारी विदर्भात उभी केली असती आणि त्याच्या मालाला उत्पादनावर आधारित भाव दिला असता तर सभागृहात आत्महत्यावर चर्चा करण्याची वेळ आली नसती.

यानंतर श्री.शिगम

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखनासाठी नाही

(श्री. पांडुरंग फुंडकर....)

देशाला स्वातंत्र्य मिळाले. आपला देश हा कृषिप्रधान देश आहे. या कृषिप्रधान देशामध्ये 70 टक्के लोक शेती करतात. शेतकरी हा जगाचा पोशिंदा आहे. शेतामध्ये अन्नधान्य निर्माण करुन सर्व जगाला तो पोसतो. अशा या शेतक-याच्या शेतीला प्रमुख उद्योगाचा दर्जा दिला गेला नाही. मी माननीय मंत्री महोदय श्री. राजेंद्र दर्डा यांना सांगू इच्छितो की, विदर्भातील शेतक-यांच्या शेतीला प्रमुख उद्योगाचा दर्जा दिला गेला नाही. उद्योजक ज्या प्रमाणे आपल्या कारखान्यामध्ये तयार होणा-या मालाची किंमत ठरवितो त्याप्रमाणे शेतामध्ये उत्पादन केलेल्या मालाची किंमत ठरविण्याचे अधिकार शेतक-याला दिले गेले नाहीत. जर शेतक-याला त्याने उत्पादन केलेल्या मालाची किंमत ठरविण्याचे अधिकार दिले असते तर कदाचित त्याच्यावर आत्महत्या करण्याची पाळी आली नसती. सभापती महोदय, शेतक-याचा उत्पादन खर्च वाढत गेला, महागाई वाढत गेली, बी-बियाण्यांचे भाव वाढत गेले. परवा एका कृषी केन्द्रामधील माणसाने सांगितले की, फवारणीसाठी लागणारे एण्ड्रिन 12 हजार रुपये लिटर झाले. अशा या महागाईमध्ये शेतकरी जगणार आहे काय ? या सभागृहामध्ये महागाईवर चर्चा झाली. महागाईचा निर्देशांक, आलेख सारखा वाढतच आहे. त्या तुलनेत शेतक-याने उत्पादन केलेल्या मालाचे भाव चार टक्क्याने देखील वाढले नाहीत. शेतक-याच्या कापसाला 3 हजार रुपये भाव दिला असे शासन मोठ्या अभिमानाने सांगते. परंतु कापसाचा उत्पादन खर्च वाढलेला आहे याचा विचार शासन करीत नाही. खतांचे भाव वाढले, बियाणांचे भाव वाढले, एण्ड्रिल भरमसाठ महाग झाले. या वाढलेल्या किंमतीचा कोणी विचारच करीत नाही. परवा मी या ठिकाणी बोललो तर त्याबद्दल कुणाला तरी वाईट वाटले. शेतकरी आत्महत्या करण्यासाठी देखील एण्ड्रिल विकत घेऊ शकत नाही इतके ते महाग झालेले आहे आणि त्यामुळे तो आता गळफास लावून आत्महत्या करीत आहे. शेतकरी शेतामध्ये ज्वारी पिकवितो, बाजरी पिकवितो, कापूस पिकवितो. परंतु शेतक-याने पिकविलेल्या मालाचा लिलाव बाजारामध्ये दलाल करतात. कापूस शेतकरी पिकवितो आणि कापसाचे भाव व्यापारी ठरवितात. आता मधले हे दलाल गब्बर होत चालले आहेत आणि शेतक-याच्या अंगावर सुरकुत्या वाढत चालल्या आहेत, त्याचा चेहरा प्रफुल्लित होण्याऐवजी कोमेजू लागलेला आहे आणि जीवन जगण्याऐवजी तो आत्महत्या करायला लागला आहे. सभापती महोदय, ही स्थिती कोणामुळे निर्माण झाली. तर सरकारच्या शेतक-याविषयीच्या उदासीन वृत्तीमुळे निर्माण झाली.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. पांडुरंग फुंडकर....)

सभापती महोदय, या राज्यामध्ये यशवंतराव मोहिते हा एक दूरदृष्टी असलेला नेता होऊन गेला. मराठवाडा, विदर्भ, खानदेश या ठिकाणचा शेतकरी कापूस पिकवितो. परंतु मधले दलाल हे कापूस उत्पादक शेतक-याची लूट करतात. म्हणून यशवंतराव मोहिते यांनी एक स्वप्न पाहिले आणि 1972मध्ये कापूस उत्पादक शेतक-यांची दलालाकडून होणारी लूट थांबविण्यासाठी कापूस एकाधिकर योजना राज्यात सुरु केली. कापसापासून कापडापर्यन्तच्या प्रक्रियेचा मालक हा शेतकरी झाला पाहिजे, शेवटचा नफा हा शेतक-याच्या खिशात गेला पाहिजे, हे यशवंतराव मोहिते यांचे स्वप्न होते. परंतु त्यांचे स्वप्न हे स्वप्नच राहिले. कापसापासून सूत आणि कापसाच्या गाठीपर्यन्तच्या प्रक्रियेचा मालक शेतकरी होऊ शकला नाही. सहकारी जिनिंग आणि प्रेसिंग उद्योग उभे राहिले. कापसाचे जिनिंग आणि प्रेसिंग झाले आणि पुढची प्रक्रिया थांबली. त्यानंतर पुढच्या काळामध्ये यशवंतराव मोहित्यांनी सुरु केलेली योजना राज्य सरकारने बंद पाडली आणि कापूस उत्पादक शेतक-याला वा-यावर सोडले. आता पणन महासंघाकडून कापसाची खरेदी केली जात नाही. नाफेड या एजण्टामार्फत कापसाची खरेदी केली जाते. कापसाची खरेदी नाफेड आणि केन्द्राच्या सीसीआय मार्फत केली जाते. तसेच या कापसाच्या खरेदीमध्ये व्यापारीदेखील उतरलेला आहे. मागच्या वेळी शासनाने कापसाला 2700 भाव कबूल करुनही तो दिला नाही.

....श्री. पांडुरंग खर्चे...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

बाजारात कापसाचा भाव वाढला तरी देखील शासनाने हमी भाव फक्त 2800 रुपये एवढाच दिला. शासनाने कापूस खरेदी करण्यास सुरुवात केली. माननीय मंत्री महोदयांनी उत्तरात सांगावे की सरकारी कापूस संकलन केंद्रावर आतापर्यंत किती कापसाची खरेदी झाली ? ओस पडली आहेत सरकारची खरेदी केंद्रे. कोणीही तेथे कापूस देत नाही. शासनाच्या केंद्राचे उद्घाटन करण्यासाठी सुध्दा कापूस बाहेरुन आणावा लागतो, शेतकऱ्यांनी कापूसच आणला नाही. त्यांच्याच अधिकाऱ्यांनी 25-25 किलो कापूस गोळा करुन कोणत्या तरी पुढाऱ्याच्या हातून कापूस खरेदी केंद्राचे उद्घाटन करण्यात आले, अशी आज या केंद्रांची अवस्था आहे. आम्ही मागणी केली होती खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांचा कणवाळूपणा सरकारच्या मनात असेल, ज्या शेतकऱ्याच्या नावाने हे सरकार कुंकू लावून बसले आहे त्या शेतकऱ्यासाठी मार्केटमध्ये स्पर्धेत उतरुन व्यापाऱ्यांच्या बरोबरीने बोली बोलावी, त्यात शेतकऱ्याचाच फायदा होईल, परंतु या सरकारला ते नको आहे. शासनाने कापसाचा भाव ठरवून टाकला परंतु शासनाच्या केंद्रांवर कोणीच कापूस देत नाही तर सर्व कापूस गुजरात आणि मध्य प्रदेशात चालला. शासनाने कापसाचे भाव बांधून दिल्यामुळे व्यापारी शेतकऱ्यांकडून कमी भावाने कापसाची खरेदी करतात आणि मध्य प्रदेश व गुजरातमध्ये जास्त भावाने मिळतो. आज गुजरातमध्ये 3500 रुपये क्विंटलचा भाव आहे. तसेच वाय-1 नावाची कापसाची जी जात आहे त्या कापसाला तर 3800 रुपये प्रति क्विंटल असा भाव आहे. हा भाव आपल्या शासनाने मात्र 2800 रुपये ठरवून दिलेला आहे, यातून शेतकऱ्याला कसा न्याय मिळणार आहे हा महत्वाचा प्रश्न आहे. शेतकऱ्याच्या मागचे हे दुष्टचक्र ज्याच्या भोवती तो फिरत आहे ते कधी बंद होणार असाही प्रश्न पडतो. एका बाजूला कापसाला भाव नाही आणि दुसऱ्या बाजूला महागाई वाढत चालली म्हणून उत्पन्न आणि खर्च यांचा मेळ त्यामुळे बसत नाही म्हणून शेतकरी कर्जात गेला, हे कर्ज दिवसेदिवस वाढत चालले आणि उत्पन्न मात्र कमी झाले. अशा परिस्थिती स्वत:च्या संसाराचा गाडा चालविण्यासाठी शेतकरी कर्ज काढत गेला आणि ते फिटत नाही म्हणून त्याच्यावर आत्महत्त्येशिवाय पर्याय नाही म्हणून तो आत्महत्त्या करायला लागला, इतकी वाईट अवस्था आज शेतकऱ्याची आहे. विदर्भात वर्धा जिल्ह्यातील दोन महिन्यापूर्वीची एक घटना अतिशय हृदयद्रावक अशी आहे. वर्धा जिल्ह्यात एका गावातील शेतकऱ्याच्या मुलीला दहावीच्या परीक्षेला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

बसण्यासाठी 300 रुपये हवे होते. तिने वडिलांकडे पैसे मागितले. वडील म्हणाले माझ्याकडे पैसे नाहीत म्हणून आईकडे मागितले असता तिने देखील पैसे नाही म्हणून सांगितले. अशा परिस्थितीत पैसे नसल्यामुळे आपल्याला दहावीची परीक्षा देता येणार नाही असे त्या मुलीला वाटले म्हणून त्या चिमुरड्या मुलीने विहिरीत उडी घेऊन जीव दिला. तरीही हे शासन आपली पाठ थोपटून घेत आहे. शरम वाटली पाहिजे या सरकारला. ज्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 14 वर्षावरील मुला-मुलींना मोफत शिक्षण देण्याची तरतूद घटनेत करुन ठेवली आहे, त्याचेही भान हे सरकार ठेवत नाही. उलट 300 रुपये मिळत नाहीत म्हणून एका छोट्या मुलीवर आत्महत्त्या करण्याची वेळ येते म्हणून या सरकारला राज्य चालविण्याचाच अधिकार नाही असे मला म्हणावयाचे आहे. निवडणुका झाल्यानंतर देखील राज्यातील आत्महत्त्यांचा आकडा का फुगत चालला आहे याचे संशोधन कधी या सरकारने केले काय ? आज राज्यात जी परिस्थिती निर्माण झाली आहे त्याला कोण जबाबदार आहे ? म्हणून उत्पादन खर्चावर आधारित भाव शेतकऱ्याला मिळालाच पाहिजे. कच्च्या मालावर प्रक्रिया करणारी कारखानदारी तालुक्या-तालुक्यात यापूर्वीच उभी केली असती तर स्व. यशवंतराव मोहित्यांचे स्वप्न साकार झाल्याचे दिसले असते. अशी प्रक्रिया करणारी कारखानदारी विदर्भ आणि मराठवाड्यात उभी राहिली असती तर शासनाला विकास मंडळे निर्माण करण्याची गरजही पडली नसती पण ते प्रयत्न झाले नाहीत. म्हणून हा प्रस्ताव आणण्यामागील मुळ उद्देश हाच आहे की, प्रत्येक क्षेत्रात आम्ही मागासलेलो आहोत. प्रत्येक क्षेत्रात विदर्भात मोठा बॅकलॉग आहे. 2.30 लाखाच्या वर विजेच्या पंपांचा बॅकलॉग आहे. सिंचनाच्या अनुशेषाची माहिती सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख हे सांगतीलच. परंतु शाळा, आरोग्याच्या सुविधांचा बॅकलॉग पाहिला तर विदर्भातील दवाखान्यात जाऊन पहावे, विदर्भातील शाळांची अवस्था पहावी. आज जितके वर्ग तितक्या खोल्या हे जरी मानय असले तरी अजुनही शासन ते पूर्ण करु शकले नाही.....

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर

माननीय थोरात साहेब, आता आपल्याकडे प्रभारी शिक्षण खाते देण्यात आलेले आहे. तुम्ही माझ्या बरोबर विदर्भातील ग्रामीण भागाता आलात तर शिक्षणाची काय अवस्था आहे हे तुम्हाला दिसून येईल. माझे सहकारी शिक्षक मित्र या ठिकाणी बसलेले आहेत त्यांना विदर्भात कशा प्रकारचे शिक्षण मिळते याची पूर्ण कल्पना आहे. या निवडणूकीच्या काळात मी एका गावात गेलो होतो त्यावेळी तेथील नागरीकांनी सांगितले की, साहेब आमच्या शाळेला तुम्ही एकदा भेट देऊन बघा. ज्यावेळी मी शाळेत गेलो त्यावेळी शाळेत जाण्यासाठी जो व-हांडा असतो त्या व-हांडयाला दोर बांधल्याचे मला आढळून आले. मी त्या शिक्षकाला म्हणालो की, "हा दोर कशासाठी बांधून ठेवला आहे"? त्यावेळी शिक्षकाने सांगितले की, "साहेब व-हांडयाचे खांब सडलेले आहेत व व-हांडा पडू नये यासाठी व-हांडयाला दोर बांधलेला आहे". सभापती महोदय, अशी विदर्भातील शाळांची अवस्था आहे. मी ज्यावेळेस वर्गात गेलो त्यावेळेस शिक्षकाला विचारले की, "या शाळेत कितवी पर्यंतच्या मुलांना शिकवले जाते"? तेव्हा तो शिक्षक मला म्हणाला की, "साहेब या शाळेत चौथी पर्यंतच्या वर्गाला शिकवले जाते, शिक्षण दिले जाते". मी शाळेत गेल्यानंतर त्याला विचारले की, "या ठिकणी एकच खोली असतांना तुम्ही चार वर्गाला कसे काय शिकवता"? त्यावेळी शिक्षक म्हणाला, "साहेब तुम्ही आत या". मी जेव्हा वर्गात गेलो तेव्हा त्याने मला सांगितले की, साहेब या ठिकाणी एकूण चार चटया टाकलेल्या असून पहिल्या चटईवर पहिलीचे विद्यार्थी बसतात, दुसरी चटईवर दुसरीचे विद्यार्थी बसतात, तिस-या चटईवर तिसरीचे विद्यार्थी बसतात आणि चवथ्या चटईवर चवथीचे विद्यार्थी बसतात". हे बघून मी तर थक्कच झालो. मी त्या शिक्षकाला विचारले "एका खोलीत जर चार वर्ग भरतात तर तुम्ही चार वर्गाला कसे काय शिकवता" ? त्यावेळी तो शिक्षक म्हणाला, "साहेब पहिला तासात पहिलीच्या वर्गाला शिकवले जाते, पहिलीच्या वर्गाला शिकवतांना बाकी वर्गाच्या विद्यार्थ्यांनी शांत बसायचे असते, दुस-या तासाला दुसरीच्या वर्गाला शिकवले जाते, तिस-या तासाला तिसरीच्या वर्गाला शिकवले जाते आणि चवथ्या तासाला चवर्थीच्या विद्यार्थ्यांना शिकवले जाते". एकाच वर्गात चार-चार वर्गाच्या मुलांना शिकवले जात असतील तर विदर्भातील मुलांना कशा प्रकारचे शिक्षण मिळत असेल त्याचा आपणच विचार करा. सभापती महोदय, मी शिक्षकाला

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर.....

विचारले "जर या शाळेत एक खोली असतांना चार वर्गाला शिकविले जात असेल तर तर या शाळेत एकूण शिक्षकांची संख्या किती आहे" ? त्यावेळी तो बिलंदर शिक्षक म्हणाला, "साहेब, या शाळेत एकूण दोन शिक्षक असून जेव्हा मी वर्गात असतो तेव्हा दुसरा शिक्षक शाळेत येत नाही आणि दुसरा शिक्षक शाळेत असेल तेव्हा मी शाळेत येत नाही. सभापती महोदय, अशा प्रकारे आमच्या विद्यार्थ्यांना शिक्षण मिळत आहे. त्यामुळे विदर्भातील मुले तुमच्या मुलांबरोबर कशी काय बरोबरी करु शकणार आहेत? शिक्षणाच्या संदर्भात विदर्भाला अजूनही बरोबरीने वागविले जात नाही. नागपूर करारामध्ये लोकसंख्येच्या मानाने बरोबरीने वागणूक दिली जाईल असे सांगितले गेले होते परंतु आम्हाला अजूनही बरोबरीने वागविले जात नाही. लोकसंख्येच्या प्रमाणात पैसे देऊ असे सांगितले होते परंतु विदर्भाचा अनुशेष अजुनही किती तरी करोडो रुपयाचा शिल्लक आहे. विदर्भातील गरिबी दिवसेंदिवस वाढतच चालली आहे. आज विदर्भातील शेतक-याला वीज, पाणी मिळत नाही. आज सुध्दा विदर्भातील सिंचनाचे 241 प्रकल्प अपूर्ण अवस्थेत आहेत. विदर्भ महाराष्ट्रात सामील होऊन 50 वर्षे झालेली आहेत, 50 वर्षे होऊन सुध्दा आम्हाला आमच्या व्यथा तुमच्या समोर मांडाव्या लागत आहेत याचे आम्हाला वाईट वाटते.

सभापती महोदय, विदर्भातील दवाखान्याची अवस्था तर अतिशय शोचनीय झालेली आहे. आमच्याकडील दवाखान्यामध्ये कोणत्याही प्रकारचे औषधे मिळत नाही. औषधे न मिळाल्यामुळे विदर्भातील माणूस दिवसेंदिवस मरत चालला आहे. विदर्भातील माणसाला कोणत्याही आजाराचे इंजक्शन न मिळाल्यामुळे त्याचे आता थडगे व्हायला लागले आहे. सरकारी दवाखान्यात गेलो तर त्या ठिकाणी डॉक्टर नसतात, नर्स नसते, क्लार्क नसतो फक्त कंपाऊंडर असतो अशी विदर्भातील सरकारी दवाखान्यांची अवस्था आहे. मी मध्यंतरी लाखांदूर गावातील हॉस्पीटलला भेट देण्यासाठी गेलो होतो. ज्यावेळेस मी माझ्या गाडीतून खाली उतरलो तेव्हा दवाखान्यातून एका व्यक्ती बाहेर आली. लाल दिव्याच्या गाडीमुळे त्याला वाटले की, एखादा मंत्रीच आला असेल. मी त्याला म्हणालो "तु कोण आहेस"? त्यावेळी त्याने सांगितले की, "साहेब मी कंपाऊंडर आहे". मी त्याला विचारले डॉक्टर, नर्स, क्लार्क नाही काय ? त्यावेळी त्या कंपाऊंडरने सांगितले की, "साहेब

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर

डॉक्टर, नर्स तसेच कंपाऊंडर आलेले नाहीत. त्या कंपाऊंडरने मला दवाखान्यात येण्यास सांगितल्यानंतर मी दवाखान्यात गेलो. दवाखान्यात गेल्यावर कंपाऊडरला विचारले जर एखादा रुग्ण आता दवाखान्यात आला तर त्याच्यावर कोणते उपचार केले जातील त्यावेळेस तो कंपाऊंडर म्हणाला साहेब, " पेशंट आला तर मीच त्या पेंशटला औषध देण्याचे काम करतो. तु औषध कसे काय देतो त्यावेळेस कंपाऊंडरने सांगितले की, "साहेब डॉक्टरांनी मला लाल, पिवळया,हिरव्या आणि निळया रंगाची औषधे दिलेली आहेत. जर तापाचा पेशंट आला तर त्याला मी लाल रंग असलेले औषध देतो.

यानंतर श्री. गायकवाड...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर ....

एखाद्या व्यक्तिला जर संडास लागली तर त्याला हिरव्या रंगाचे औषध देतो. कोणत्या पेशटला कोणते औषध द्यावयाचे याबाबतीत मला डॉक्टरांनी सांगितले आहे असे त्याने मला सांगितले होते. अशा प्रकारे विदर्भातील आरोग्याच्या संदर्भातील स्थिती अत्यंत वाईट आहे.

सभापती महोदय, आम्ही शासनाकडे फार काही मागत नाही. दरवर्षी नागपूरला अधिवेशन घेण्यात येते त्या निमित्ताने पंधरा दिवस शासन येथे थांबते आणि येथून जातांना विदर्भातील जनतेच्या तोंडाला पाने पुसले जाते. त्यातून वेगळया विदर्भाची मागणी जर विदर्भातील लोकांनी केली तर ते चूक होणार नाही. संपूर्ण राज्याला तो पोसू शकेल एवढी क्षमता विदर्भामध्ये आहे. परंतु आम्ही पुढे जाऊ नये यासाठी आम्हाला जाणिवपूर्वक सापत्नभावाची वागणूक दिली जाते. त्यामुळे विदर्भात नवीन उद्योग आलेले नाहीत, नवीन प्रकल्प आलेले नाहीत. जे काही कारखाने आले होते ते सुध्दा लाटून नेले. विदर्भात निर्माण होणारी वीजसुध्दा लाटण्यात आली इतकेच नव्हे तर आमचे पैसेसुध्दा पळविण्यात आलेले आहेत . त्यामुळे नियम 260 अन्वये प्रस्ताव देण्याची वेळ आमच्यावर आली आहे . तेव्हा या अधिवेशनामध्ये शासनाने या बाबतीत विचार करण्याची गरज आहे.असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे. आता वेगळया राज्याची चळवळ सुरु झालेले आहे आणि तेलंगणा राज्य जाहीर झालेले आहे. अशा परिस्थितीमध्ये विदर्भातील माणसे जास्त दिवस हा प्रकार सहन करणार नाही याची शासनाने जाण ठेवावी आणि जातांना निश्चितपणे विदर्भातील माणसांना असे समाधान वाटले पाहिजे की सरकार या ठिकाणी आले , सरकार काही दिवस थांबले आणि विदर्भासाठी काही तरी देऊन गेले आहे. अशा प्रकारची भावना विदर्भातील माणसाच्या मनात निर्माण होईल अशा प्रकारचे निर्णय दोन दिवसात शासनाने घ्यावे अशी मी विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो. जयहिंद, जय विदर्भ .

प्रस्ताव प्रस्तुत झाला

तालिका सभापती (श्री अरविंद सावंत) :आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये सकाळी 10.30 ते 11.40 पर्यंत नियम 260 च्या प्रस्तावावर चर्चा दाखविण्यात आलेली आहे. आता 10 वाजून 48 मिनिटे झालेली आहेत. तेव्हा सर्व सन्माननीय सदस्यांनी यासंबंधीचा विचार करुन थोडक्यात विचार मांडावेत. यानंतर सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख बोलतील.

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख (अमरावती विभाग पदवीधर) : सभापती महोदय,सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी नियम 260 अन्वये जो प्रस्ताव मांडला आहे त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय,या प्रस्तावाच्या शेवटच्या ओळीत असे म्हटलेले आहे की, " उपरोक्त सर्व परिस्थितीमुळे विदर्भवासियांमध्ये सापत्नभावाची निर्माण झालेली भावना व राज्यातील हा विभागीय असमतोल दूर करण्यासाठी करावयाची प्रभावी उपाययोजना विचारात घेण्यात यावी " सभापती महोदय, 2009 सालातील शेवटचा महिना आता सुरु आहे. या प्रस्तावावरील शेवटच्या ओळीत प्रभावी उपाययोजनेसंबंधी उल्लेख करण्यात आला असून त्या मुद्यापासून मी माझ्या भाषणाला सुरुवात करणार आहे. प्रभावी उपाययोजनेमधील जो सर्वात महत्वाचा उपाय आहे त्याकडे दुर्लक्ष होता कामा नये. मी जी उपाययोजना सांगणार आहे ती बिन पैशाची आहे. एखाद्या उपाययोजनेसाठी पैसे लागणार असतील तर त्याकरिता अर्थ आणि नियोजन विभागाची मान्यता घ्यावी लागते त्याकरता त्यांच्याकडे जावे लागते तसेच पैशाची तरतूद करावी लागते. परंतु या ठिकाणी मी आपल्याला बिन पैशाची उपाययोजना सांगणार आहे.

सभापती महोदय, हे राज्य निर्माण होत असतांना तीनही भागातील लोकांचा एकमेकावर विश्वास नव्हता .....

नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

आणि म्हटले तर होता. हे एक राज्य निर्माण झाले पाहिजे अशी भावना तिन्ही विभागाच्या नेत्यांमध्ये होती. परंतु एकमेकांविषयी गैरविश्वास होता त्यातूनच नागपूर कराराची निर्मिती झाली. सभापती महोदय, आपण आम्हाला ज्या माहितीची बुकलेटस् दिलेली आहेत त्यात हा नागपूर करार छापलेला आहे. म्हणजे त्याचे महत्त्व किती आहे हे आपण देखील मान्य केले आहे त्याबद्दल मी जरूर आपले आभार मानतो. 1953 मध्ये हा करारकेला गेला. सभापती महोदय, कितीही महनीय व्यक्ती असल्या तरी हा खाजगी व्यक्तींनी केलेला करार आहे परंतु त्यांच्या दूरदृष्टीला जरूर वंदन केले पाहिजे. हा नागपूर करार केल्यानंतर गोविंद वल्लभ पंत ज्या संयुक्त समितीचे अध्यक्ष होते त्यांच्याकडे हे करार करणारे नेते गेले आणि त्यांनी त्यांना म्हणजे संयुक्त समितीला सांगितले की, हे एक राज्य व्हावे अशी आम्हा सर्वांचीच इच्छा आहे म्हणून आम्ही नागपूर करार केलेला आहे. आता आमची तुम्हाला विनंती आहे की, ज्या मर्यादेपर्यंत शक्य होईल त्या मर्यादेपर्यंत आपण या कराराला भारताच्या घटनेमध्ये स्थान द्यावे. ते सारेच थोर नेते आहेत, त्या सर्वांची नावे मी आता येथे वाचून दाखवित नाही, ती या पुस्तिकेमध्ये आपण दिलेलीच आहेत. सभापती महोदय, राज्य पुनर्रचनेसंबंधात जी संयुक्त समिती नेमली गेली होती त्या समितीने जो अहवाल दिलेला आहे त्या अहवालात म्हटले आहे की," All the Representatives from Vidarbha requested us to give the Nagpur Pact a Constitutional status, to the extent, it is practicable." आणि म्हणून मी अशी उपाय योजना सुचवित आहे की, या देशाच्या घटनेमध्ये 371(2) हे कलम नव्याने टाकण्यात यावे आणि त्याद्वारा या तिन्ही विभागांना संरक्षण द्यावे. सभापती महोदय, भारतीय घटनेमध्ये 371(2) हे कलम नंतर टाकण्यात आले. त्यात अशी तरतूद आहे की, भारताच्या राष्ट्रपतींना असे वाटले की, या तिन्ही विभागांचा समतोल विकास होत नाही तर ते आपल्या विशेष अधिकारामध्ये राज्यांच्या राज्यपालांवर विशेष जबाबदारी टाकू शकतील. अशा प्रकारे घटनेमध्ये ही तरतूद 1956 मध्ये झाली आणि त्यानंतर 1960 साल गेले, 1970 गेले, 1980 गेले. त्या वीस वर्षामध्ये प्रादेशिक असमतोलाचे जे चित्र पुढे येणे सुरू झाले त्यावर या सदनामध्ये चर्चा सुरू झाली. त्यावेळी राज्याचे मुख्यमंत्री श्री.वसंतदादा पाटील हे होते. त्यांनी म्हटले की, या विषयावर अशा प्रकारे चर्चा होणे बरोबर नाही. मी यावर विचार करण्यासाठी एक समिती नेमतो. असे सांगून त्यांनी वि.म.दांडेकर समिती नेमली. त्या समितीने एक वर्षात आपला अहवाल दिला. प्रादेशिक असमतोल हा फार मोठ्या प्रमाणात वाढला असून विदर्भ, मराठवाडा ..... के

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. देशमुख .....

आणि उर्वरित महाराष्ट्र यामध्ये मोठ्या प्रमाणात असमतोल वाढला आहे असे त्यांनी सांगितले. म्हणजे राज्यामध्ये प्रादेशिक असमतोल मोठ्या प्रमाणात वाढला असल्याचे पहिल्यांदा दर्शन त्यांनी करून दिले. तरीही त्या संदर्भात फॅक्टस् फाईंडींग कमिटी नेमली गेली. त्या समितीचा अहवाल आल्यानंतर राज्याच्या विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहांनी एकमताने 27 जुलै 1984 रोजी ठराव पास केला. त्या ठरावात म्हटले होते की, आम्ही एकमताने भारताच्या राष्ट्रपतींना विनंती करीत आहोत की, घटनेतील कलम 371(2) आता आपण अमलात आणावे आणि त्यानुसार राज्याच्या राज्यपालांना विशेष अधिकार द्यावेत. सभापती महोदय, 27 जुलै 1984 ला हा ठराव पारित केला असला तरी प्रत्यक्षात त्या आधारे आदेश हा 9 मार्च 1994 ला निघाला. 1984 ते 1994 या 10 वर्षांच्या विलंबाने 9 मार्च 1994 राजी तत्कालीन राष्ट्रपती श्री.शंकर दयाळ शर्मा यांनी महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्यावर मी ही जबाबदारी सोपवित आहे असा आदेश काढला. त्यावर काय झाले ? ...

(यानंतर श्री. सरफरे .... एल 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख....

त्यावर माननीय राज्यपालांनी अशी भूमिका घेतली की, मला आता ही अपडेट पोझिशन काय आहे? हे पाहिले पाहिजे. दांडेकर होऊन गेले याला दहा वर्षे झाली. जर माझ्यावर ही जबाबबदारी सोपविली आहे तर खरोखर परिस्थिती काय आहे? हे मला पाहिले पाहिजे. त्यांनी अनुशेष व निर्देशांक नावाची एक समिती नेमली., त्या समितीने एक वर्षामध्ये अहवाल सादर केला. परंतु हा अहवाल पाच वर्षे प्रकाशात येऊ शकला नाही. जून 1994 च्या स्तरावरील अनुशेष व निर्देशांक समिती हा या राज्यातील प्रादेशिक असमतोलाचा दुसरा आरसा आहे. त्यामध्ये आपले विद्रुप तोंड महाराष्ट्राला सहजपणे पहाता येते. हा अधिकृत आरसा आहे, हा जून 1982 च्या स्तरावरील पहिला आरसा आहे. जून 1994 च्या भौतिक प्रगतीवर आधारीत अनुशेषाचे विद्रुप चित्रण या अनुशेष व निर्देशांक समितीच्या अहवालामध्ये करण्यात आले आहे. दुर्दैवाने त्यावर पुढे काही कारवाई झाली नाही. तो अहवाल खूप उशिरा म्हणजे जवळ जवळ सन 2000 मध्ये सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला.

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, अहवाल सादर करण्यात आला परंतु त्यावर कारवाई झालेली नाही असा कालखंड कोणता? त्याची माहिती माननीय सदस्य प्रा.बी.टी. देशमुख सरांनी द्यावी अशी माझी विनंती आहे.

प्रा. बी. टी. देशमुख : 1994 मध्ये अनुशेष व निर्देशांक समिती नेमण्यात आली. आणि 1997 मध्ये अहवाल सादर करण्यात आला. मी मंत्रिमहोदयांना कालखंड सांगतो. शेवटी महाराष्ट्राचा इतिहास रेकॉर्डेड आहे. सभापती महोदय, ज्या गोष्टी मंत्रिमहोदयांनी सांगावयाच्या आहेत त्या गोष्टी मी सांगण्यामध्ये शोभा नाही. मी या सभागृहामध्ये इतक्या वेळेला बोललो आहे, त्याही वेळेला बोललो होतो आणि आजही बोलत आहे. मी आपल्याला कालखंड सांगत आहे. आपल्याला कालखंड बदलविता येत नाही ही इतिहासाची गंमत आहे. 9 मार्च 1994 ला भारताच्या राष्ट्रपतींनी आदेश काढला. महाराष्ट्राच्या राज्यपालांनी समिती नेमली. 1997 मध्ये त्या समितीने अहवाल प्रसिध्द केला. अहवाल प्रसिध्द होत नव्हता म्हणून हुलेमाले नावाचे अमरावतीचे सदस्य होते. त्यांना दुर्धर आजारांनी ग्रासले होते. ते तो अहवाल माझ्याकडे घेऊन आले, आणि म्हणाले की, बी.टी. मी काही पाच-सहा महिन्यांवर जगेन असे वाटत नाही. हा अहवाल तुम्ही घ्या. हा अहवाल शासन प्रसिध्द करीत नाही. कारण महाराष्ट्राचा चेहरा विद्रुप झालेला आहे. 1998 साली मी अर्थमंत्र्यांचा निषेध करुन व सभात्याग करुन बाहेर पडलो. अहवाल जाहीर झालेला नसतांना मी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/ SBT/

प्रा.बी.टी.देशमुख....

"महाराष्ट्रातील जलसिंचन अनुशेष-क्षकिरण परिक्षा" या नावाचे एक पुस्तक सन 1998 मध्ये प्रसिध्द केले. यामध्ये हे सारे चित्र मांडले आहे. सन 1998-99 व 1999-2000 मध्ये या सभागृहाच्या दोन्ही बाजूकडील आम्ही माननीय सदस्य प्रयत्न करीत होतो. सन 2000 मध्ये आपण हा अहवाल प्रसिध्द केला. मी आपल्याला हा कालखंड सांगितला. आपल्याला बाकीचे काही सांगण्यासारखे असेल तर सांगा. सभापती महोदय, चर्चेची दिशा चुकीच्या बाजूला वळविण्यामुळे कुणाचेही हित होणार नाही. सन 2000 मध्ये हा अहवाल आल्यानंतर आम्ही दोन्ही बाजूकडील सदस्य माननीय राज्यपालांकडे गेलो. त्यामध्ये दोन्ही बाजूकडील सर्व पक्षांचे सदस्य होते. त्यावेळी माननीय राज्यपालांना सांगितले की,सन 1984 मध्ये ठराव झाल्यानंतर 1994 मध्ये आदेश निघाला. आणि आता निदेश काढण्यासाठी सन 2004 ची वाट पहाता काय? माननीय श्री. अलेक्झांडर यांच्यासारखे एक अभ्यासू राज्यपाल त्यावेळी होते. त्यांनी 15 डिसेंबर 2001 ला निदेश निर्गमित केले. हे निदेश निर्गमित केल्यानंतर दर अधिवेशनामध्ये माननीय राज्यपालांनी काय वाटणी केली? यासाठी याठिकाणी मुख्य भांडण आणि संघर्ष झाला. आज याठिकाणी उत्तर देण्यासाठी दोन कॅबिनेट मंत्री बसले आहेत.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख . . . .

मी आशा करतो की, सर्व विभागांचे मुद्दे ते लिहून घेत आहेत आणि माननीय मंत्री महोदय सर्व विभागांच्या बाबतीत उत्तरे देतील. त्यावेळी माननीय मंत्री श्री.राजेंद्र दर्डासाहेब हे अर्थमंत्री होते. त्या अगोदर तीन तास सभागृह बंद पडले. पण वाटप ठरविण्यात आले नाही. माननीय मंत्री श्री.राजेंद्रबाबू दर्डा हे माननीय मंत्री महोदय असताना सभागृह अर्धा तास बंद पडल्यानंतर ही माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली. मग याबाबतीत हळूहळू प्रगती झाली आणि पुढे त्याबाबतीत न विचारता ते सभागृहाच्या पटलावर येऊ लागले. आता ती माहिती सभागृहाच्या पटलावर यावी म्हणून गोंधळ करावा लागत नाही, तर आपोआप सभागृहाच्या पटलावर माहिती येते. 2001 मध्ये निदेश झाले, त्यानंतर 2001,2002, 2003, 2004 व 2005 मध्ये निदेश झाले.परंतु त्याचा भंग करण्यात आला. पण आम्ही निदेशाचा भंग करीत आहोत असे कोणी म्हटलेले नाही. पण भंग केला. सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांना सांगू इच्छितो की, या सभागृहाने एकमताने विधानसभेला शिफारस केली. त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनीही पाठिंबा दिला होता. ही रेकॉर्डेड फॅक्ट आहे. "History is History". सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावतेसाहेबांनीही पाठिंबा दिला. सभागृहाने एक मताने शिफारस केली की, माननीय राज्यपालांच्या निदेशातील रकमेचा विचार करा. आम्हाला दुरुस्ती करण्याचे अधिकार नव्हते. शिफारस करण्याचे सभागृहाला अधिकार होते.त्याप्रमाणे शिफारस केल्यानंतर, विधानसभेने देखील ती शिफारस एकमताने मान्य केली.

एक सन्माननीय सदस्य (खाली बसून) : स्वतंत्र अधिवेशन बोलाविले.

प्रा.बी.टी.देशमुख : स्वतंत्र अधिवेशन बोलावून,फक्त वाटप केले नाही. शिफारस मान्य केली. मग आम्ही कोर्टामध्ये गेलो. या प्रकरणामध्ये मी स्वत: पिटीशनर आहे. तसेच सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावतेसाहेब सेकंड पिटीशनर आहेत, सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरीसाहेब हे तिसरे पिटीशनर आहेत. कोर्टाने पाच वर्षांनी निकाल दिला की, तुम्हाला माननीय राज्यपालांच्या डायरेक्शनच्या विरोधात काम करता येणार नाही. It is binding on you. मी यासंबंधातील तारीख, कलमे सांगू शकतो पण वेळ कमी आहे किंवा नागपूरला या कामासाठी कमी असू नये असे मला वाटते. हाय कोर्टाने रुलींग दिले की, "Directives issued under Article 371 (2) are binding on the Government". माननीय मंत्री महोदय श्री.बाळासाहेब थोरात

. . . .एम-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यांना सांगू इच्छितो की, याबाबतीत दुसरे महत्वाचे फाईंडींग असे आहे की, "You cannot issue any order frustrating Directives of the Governor" माननीय राज्यपालांचे निदेश विफल होतील असा कोणताही हुकूम, कोणताही आदेश किंवा कोणतीही कृती तुम्हाला करता येणार नाही. त्या दोन-तीन वर्षामध्ये बरोबर निधी येऊ लागला. मग एकदम स्वप्न पडल्यासारखे सरकारच्या असे मनामध्ये आले की, विदर्भातील अनुशेष भरुन निघालेला आहे. मी मुद्दाम ते वाक्य जसेच्या तसे वाचून दाखवितो. हे वाक्य असे आहे की, "त्याच प्रमाणे सिंचन क्षेत्राचा संपूर्ण अनुशेष संपुष्टात आल्याचे जाहीर करण्यास मला आनंद होत आहे." मी अंदाजपत्रकाच्या पुस्तकातील वाक्य जसेच्यातसे वाचून दाखविले आहे. पण या वाक्याच्या खाली व वर "आर्थिक" असा शब्द आहे. दि.4 जून 2009 रोजी अर्थसंकल्प सादर करताना माननीय अर्थमंत्र्यांनी जे भाषण केले, त्या पुस्तकातील भाग-1 मधील पान क्र.3 वरील वाक्य मी येथे उद्धृत केले आहे. I again quote for the information of this House. "त्याच प्रमाणे सिंचन क्षेत्राचा संपूर्ण अनुशेष संपुष्टात आल्याचे जाहीर करण्यात मला आनंद होत आहे." या वाक्यामध्ये "आर्थिक" हा शब्द नसला तरी खाली आणि वर "आर्थिक" हा शब्द आहे आणि तो अत्यंत चुकीचा आहे. त्याबाबतीत मी पुढे सांगणार आहे.

सभापती महोदय, मी खरे म्हणजे माननीय मंत्री महोदयांचे आभार मानतो. कारण त्यांनी मघाशी खाली बसल्या-बसल्या का होईना पण मला "आर्थिक" या शब्दाच्या संबंधात पहिल्यांदा विचार मांडण्याची संधी दिली.

श्री.राजेंद्र दर्डा (खाली बसून) : माझे एवढेच म्हणणे आहे की, "भौतिक" च्या बाबत . . ..

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी या शब्दाची मला आठवण करुन दिली. माझ्या भाषणामध्ये तो मुद्दा उशिरा आला असता, पण आता लवकर घेतो. माननीय मंत्री महोदयांनी या शब्दाची मला आठवण करुन दिली हे मी चांगल्या अर्थाने म्हणत आहे.

(सन्माननीय मंत्री श्री.राजेंद्र दर्डा खाली बसून बोलतात.)

Panel Chairman (Shri Arvind Savant): No interruptions. माननीय मंत्री महोदयांना काही सांगावयाचे असेल तर मला विचारल्याशिवाय उभे रहावयाचे नाही.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी मला आठवण करुन दिली.

. . . .एम-3

APR/ KTG/ SBT/ 11:00

प्रा.बी.टी.देशमुख . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

"आर्थिक" शब्द वेगळया अर्थाने म्हटलेले आहे. हा "आर्थिक" आणि "भौतिक" अनुशेष काय आहे ? दांडेकर यांनी व्याख्या केली की, हा अनुशेष कसा काढावा. अनूशेष आणि निर्देशांक समितीने ती व्याख्या जशीच्या तशी वापरली आणि आज ती व्याख्या कायद्याचा भाग झालेली आहे. जल संपत्ती प्राधिकरण अधिनियम 2005 या कायद्याच्या सेक्शन 20 मध्ये ही व्याख्या जशीच्या तशी आहे आणि त्या प्रमाणे दरवर्षीचा अनुशेष काढण्याची जबाबदारी त्या प्राधिकरणावर सोपविलेली आहे. तसेच ते प्राधिकरण माननीय राज्यपालांनी नेमलेले आहे आणि या राज्याच्या विधीमंडळाने हा कायदा केलेला आहे.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ 11:05

प्रा.बी.टी.देशमुख..

त्यांच्यावर ही जबाबदारी आहे.दर वर्षी ते रिपोर्ट आपल्यासमोर ठेवतात त्या रिपोर्टमध्ये हे अपडेटिंग दिलेले असते. अनुशेष काढण्याची जी व्याख्या लिगल झालेली आहे, जी दांडेकरानी केली होती, ती अशी आहे की, जिल्हयामध्ये वहितीखालील व ओलिताखाली असलेल्या जमिनीची टक्केवारी काढण्यात यावी आणि त्यावरुन राज्याची सरासरी काढण्यात यावी. दांडेकरांनी राज्याची सरासरी काढली त्यावेळी या राज्याची ओलिताखालील सरासरी 22.25 अशी होती.100 एकरपैकी 22 एकर जमीन ओलिताखाली होती. मग ओलिताखालील सर्वात जास्त क्षेत्र कोठे आणि सर्वात कमी क्षेत्र कोठे आहे? तर सर्वात वर पहिल्या क्रमांकावर कोल्हापूर जिल्हा होता त्या ठिकाणी 60 टक्के क्षेत्र ओलिताखाली होते आणि सर्वात खालच्या नंबरवर अमरावती जिल्हा होता. त्याठिकाणी 3.95 टक्के इतके क्षेत्र ओलिताखाली होते.त्यामुळे यांनी असे सांगितले होते की, राज्य सरासरीवर या जिल्यांना आणा म्हणजे यांचा अनुशेष दूर होईल, ही त्यांची व्याख्या झाली. जलसिंचन या क्षेत्रातील अनुशेष दूर करण्याची व्याख्या काय आहे? राज्य सरासरीच्या खाली असलेल्या प्रत्येक जिल्हयाला राज्य सरासरीवर आणणे म्हणजे त्यांचा अनुशेष दूर करणे ही व्याख्या दांडेकरांनी ठरवून दिली. ती अनुशेष आणि निर्देशांक समितीने मान्य केली, ती व्याख्या आज सेक्शन 20 मध्ये कायद्याचा भाग झालेली आहे. दांडेकर असे म्हणाले की, इतक्या हेक्टरने हा जिल्हा मागे आहे मग दहा हजार रुपये पर हेक्टर ही किंमत त्यांनी त्यावेळी धरली. आणि सांगितले की, सर्वात मागे असलेल्या अमरावती जिल्हयाचे उदाहरण मी देतो. 134 हजार हेक्टरची सिंचनक्षमता एका दिवसात उपलब्ध करुन दिली तर अमरावती जिल्हा राज्य सरासरीवर येतो. एका दिवसात एवढी सिंचन क्षमता उपलब्ध करुन देता येत नसते. पर हेक्टर किंमत दहा हजार रुपये धरण्यात आल्यामुळे त्यासाठी 134 कोटी रुपये लागणार होते. सभापती महोदय, दांडेकरांनी सांगितलेली उपाययोजना शासनाने मान्य केलेली नाही. दांडेकरांनी उपाययोजना अशी सांगितली होती की, दर वर्षी जलसिंचनावर एकूण जो निधी खर्च करण्यात येतो त्यातील पंधरा टक्के रक्कम ऑन गोईंग वर्कसाठी विकसित जिल्हयांना देण्यात यावेत आणि 85 टक्के रक्कम ही महाराष्ट्रातील अनुशेषग्रस्त जिल्हयांना देण्यात यावी. शासनाने ही शिफारस दांडेकरांच्या मृत्यूपर्यंत देखील मान्य केलेली नाही. त्याचा परिणाम असा झाला की, हा अनुशेष सतत वाढत गेला.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/

प्रा. बी. टी. देशमुख...

आर्थिक दृष्टीने विचार केला तर अमरावती जिल्हयाचा अनुशेष दस पटीने भरुन निघाला आहे. 1982 सालातील 134 कोटी रुपयांचा अनुशेष दहा वेळा भरुन निघाला असे म्हणता येईल कारण त्या पुढच्या चार-पाच वर्षात एक हजार काटी रुपये खर्च झालेले आहेत. म्हणजे आर्थिक अनुशेष भरुन काढण्याची कल्पना ही अनुशेष भरुन काढण्याची अत्यंत पोकळ आणि पोरकट कल्पना आहे. ती त्यावेळच्या किंमतीवर आधारित आहे आणि त्यावेळी जास्त अनुशेष दिसू नये म्हणून कमी किंमत धरलेली आहे. त्यावेळचीच किंमत धरावयाची असल्यामुळे धरणाऱ्यांनी ती आपल्या पध्दतीने धरली आहे. म्हणजे मी म्हणेन की, ती दहा हजार नाही तर एक कोटी रुपये किंमत होती आणि सरकार असे म्हणेन की, पाच हजार कोटी रुपये होती. पण त्यावेळी ज्या किंमती धरण्यात आलेल्या आहेत त्याबद्दलच मी बोलतो. त्यामुळे खरा अनुशेष दूर होत नाही. 1994 पर्यंत आर्थिक आणि भोतिक अनुशेष मोठया प्रमाणात वाढत गेला. हेक्टरमधील जे अंतर आहे तो भोतिक अनुशेष आहे आणि त्याची रुपयामधील जी किंमत आहे तो आर्थिक अनुशेष आहे. हा दोन्ही पातळीवरचा अनुशेष वाढत गेला आहे. मराठवाडयाचा आर्थिक पातळीवरचा अनुशेष नऊ पटीने वाढला आणि विदर्भाचा आठ पटीने वाढला आहे. आर्थिक अनुशेषाचा विचार मांडतांना लक्षात घेतले पाहिजे की, विदर्भाचा भौतिक अनुशेष दुप्पटीच्या वर वाढला आणि मराठवाडयाचा जवळ जवळ दुप्पट झालेला आहे. सभापती महोदय, विदर्भामध्ये अधिवेशन सुरु आहे. महाराष्ट्राचे सुवर्णमहोत्सवी वर्ष साजरे करीत आहोत. विदर्भातील ज्या पिढीने संयुक्त महाराष्ट्रासाठी घाम गाळला त्यांना आम्ही त्या चळवळीत होतो हे सांगण्याची लाज वाटण्याची वेळ ज्यावेळी आलेली आहे त्यावेळी यासंदर्भात सांगण्यासाठी मला थोडासा वेळ द्यावा, अशी माझी या सभागृहाला आणि आपल्याला विनंती आहे.

तालिका सभापती (श्री. अरविंद सावंत) : आपल्याला आणखी किती वेळ लागणार आहे?(अडथळा) सकाळच्या सत्राची वेळ 11.30 पर्यंत आहे. हे सर्व महत्वाचे आहे याची मला कल्पना आहे. चर्चेच्या संदर्भात मी याठिकाणी अधिकारवाणीने सांगणार नाही पण ही चर्चा अत्यंत महत्वाची, जिव्हाळयाची आणि कळकळीची आहे.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, मी फक्त चार मुद्यावर बोलून माझे भाषण संपविणार आहे.

यानतर श्री. बरवड...

अशुद्धीत मत/प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती (श्री. अरविंद सावंत) : आपल्याला साधारणत: अजून किती वेळ लागणार आहे ? नंतर ही चर्चा लेगवर राहील.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, मी आपल्याला हा विचार सांगत होतो की, कलम 371(2) ची उपाययोजना सुरु झाल्यानंतर तिची हत्या करण्यामध्ये महाराष्ट्राच्या राज्यकर्त्यांचा जेवढा वेळ गेला त्यामुळे त्याची परिणामकारक अंमलबजावणी होऊ शकली नाही. दरवर्षीच्या अंदाजपत्रकीय अधिवेशनामध्ये तासन तास या सभागृहाचे कामकाज बंद पडले. लोकांनी पाच वर्षे कोर्टकचेरी केली. दोन तीन वर्षे बरा निधी दिला गेला आणि एकदम बटन दाबावे तसे निधीचे माप बंद करण्यात आले पहिली उपाययोजना मी सांगू इच्छितो आणि ही उपाययोजना विनापैशाची आहे. जी प्रेसिडेंशियल ऑर्डर आहे ती या 30 एप्रिलला एक्स्पायर होत आहे. कारण 9 मार्च, 1994 च्या ऑर्डरमध्ये असे म्हटले आहे की, ही ऑर्डर पाच वर्षे अंमलात राहील. म्हणजे त्या आदेशाची मुदत आणखी वाढविली तर ती वाढेल नाही तर पाच वर्षे मुदत राहील असे त्या मूळ ऑर्डरमध्ये म्हटले आहे. त्या आदेशाची मुदत एकदा वाढली त्यानंतर दुसऱ्यांदा वाढली. आता त्या आदेशाची मुदत एक्स्पायर होत आहे. 30 एप्रिलला ही मुदत संपुष्टात येईल आणि मग महाराष्ट्रातील मागास भागाची कशी पिळवणूक करावयाचे स्वातंत्र्य महाराष्ट्राला मिळेल. थोडेसे जे बंधन आहे तेही निघून जाईल. माझी शासनाला विनंती आहे की, हे अधिवेशन संपण्याच्या आत आपण सर्वोच्च पातळीवर याचा विचार करावा. आपल्याला अधिकार असेल तर आपण जाहीर करा पण हे ठामपणे या ठिकाणी जाहीर करा की, आमच्या नियतीमध्ये खोट नाही आणि म्हणून भारताच्या माननीय राष्ट्रपतींना आम्ही विनंती करु. यामध्ये त्यांना विनंतीच करावयाची आहे. त्यामुळे पहिली जी महत्वपूर्ण उपाययोजना आहे त्याविषयी आपण ठामपणे या सभागृहामध्ये काही तरी सांगाल अशी मी अपेक्षा करतो. खरे म्हणजे राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी ही गोष्ट या ठिकाणी येऊन सांगावयास पाहिजे परंतु मी ही जबाबदारी पहिल्या बाकावर बसलेल्या तीनही कॅबिनेट मंत्र्यांवर सोपवतो.

सभापती महोदय, मी आपल्यासमोर असा विचार मांडत होतो की, अनुशेष संपुष्टात आला असे जे म्हणतात ते भ्रामक आहे. ते भ्रामक का आहे हे मी आपल्याला सांगू इच्छितो. ते मी आर्थिकमध्ये सांगतो आणि भौतिकमध्ये सुध्दा सांगतो. (अडथळा) उपाययोजना हा विषय यामध्ये

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी. टी. देशमुख ....

आहे. भारताच्या माननीय राष्ट्रपतींना या शासनाने अशी विनंती करावी की, 9 मार्च, 1994 ला जे आदेश काढलेले आहेत त्या आदेशाची मुदत त्यांनी आणखी एकदा पाच किंवा दहा वर्षांसाठी वाढवावी. अशा प्रकारची विनंती राज्य शासनाने केंद्र सरकारला करावी. ही माझी उपाययोजनेच्या संदर्भातील पहिली आणि महत्वाची मागणी आहे.

सभापती महोदय, मी एक गोष्ट आपल्याला सांगू इच्छितो की, जी राज्य सरासरी आहे ती सातत्याने वाढत गेलेली आहे. ती सरासरी 22 वरुन 37 वर गेली आणि 37 वरुन 2007 मध्ये 50 वर गेली. आर्थिक अंतर वाढले आणि भौतिक अनुशेषही वाढला. मी प्रत्येक जिल्ह्याच्या बाबतीत सांगून आपला वेळ घेणार नाही. परंतु विदर्भाचा भौतिक अनुशेष 1982 च्या राज्य सरासरीवर 527 हजार हेक्टरचा होता तो 1994 च्या राज्य सरासरीवर 853 हजार हेक्टरचा झाला आणि जून, 2007 च्या राज्य सरासरीवर तो अनुशेष 1065 हजार हेक्टरचा झाला. भौतिक अनुशेष हा दुप्पटीच्या वर वाढला. मराठवाड्याचा जलसिंचन या विकास क्षेत्राचा अनुशेष जून 1982 मध्ये 260 हजार हेक्टरचा होता तो 1994 मध्ये 401 हजार हेक्टरचा झाला आणि 2007 च्या सरासरीवर 493 हजार हेक्टरचा झाला. म्हणजे जवळजवळ दुप्पट झाला. भौतिक अनुशेषाच्या बाबतीत आपल्याला असे दिसून येईल की, महत्तम अनुशेष असलेल्या मेरीटमध्ये नंबर एकवर असलेल्या अमरावती महसूल विभागाचा 1982 च्या सरासरीवर अनुशेष 427 हजार हेक्टरचा होता.

यानंतर श्री. खंदारे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख...

तो जून 1994 मध्ये 726 हेक्टर होता तो जून, 2007 मध्ये 8028 हेक्टर झाला. भौतिक अनुशेष दुपटीच्या वर गेल्याचे दिसून येते. आर्थिक अनुशेषाची परिस्थिती कशी आहे ? आर्थिक अनुशेषाची परिस्थिती त्याच्या पेक्षाही वाईट आहे. प्रकल्पाच्या किंमती वाढत असल्यामुळे आर्थिक अनुशेषाची परिस्थिती वाईट झाली आहे. 1982 मध्ये 10 हजार रुपयांची किंमत 1994 मध्ये 50 हजार रुपये इतकी झाली, 2007 मध्ये ती 80 हजार रुपये इतकी झाली आहे. किंमतींचा विचार केला तर मराठवाडयात 1982 मध्ये जलसिंचनाचा अनुशेष 260 कोटींचा होता, 1994 मध्ये 2770 कोटी होता आणि 2007 मध्ये 3951 कोटी रुपये इतका झाला आहे. विदर्भात 1982 मध्ये जलसिंचनाचा अनुशेष 5,277 कोटी रुपये इतका होता, 1994 मध्ये 5,204 कोटी झाला आणि 2007 मध्ये 8,524 कोटी झाला. महसुली विभागात महत्तम अनुशेष असलेल्या अमरावती जिल्हयाचा 1982 मध्ये जलसिंचनाचा अनुशेष 417 कोटी रुपये इतका होता, 1994 मध्ये 3,630 कोटी झाला व 2000 मध्ये 7,111 कोटी रुपये इतका झाला. म्हणजे भौतिकमध्ये वाढला आणि रुपयामध्येही वाढला आहे. शासनाने यावर उपाययोजना बरोबर न केल्यामुळे ही परिस्थिती निर्माण झाली. सभापती महोदय, मी मघाशी अंदाजपत्रकातील वाक्य वाचून दाखविले आहे. परंतु शासनाने त्यानंतर आमच्यावर आणखी घाव केले. मराठवाडा व विदर्भात झालेल्या रक्तपाताचे मी पुरावे देतो. त्यानंतर जूनमध्ये शासनाने मुक्ताफळे उधळली ती आमच्या जीवाला इतकी भिडली की, ती आयुष्यभर लक्षात राहणार आहेत. "अमरावती जिल्हयाचा अनुशेष पूर्णपणे संपुष्टात आल्यामुळे आता यापुढे...." म्हणजे यापुढे हे काम करु नका, ते काम करु नका अशाप्रकारच्या जखमा करणारी लहानसहान परिपत्रके काढण्यात आली आहेत. मराठवाडयातील व विदर्भातील सर्व जिल्हयांना ती लागू आहेत. नमुना म्हणून मी यवतमाळ व अमरावती जिल्हयावर केलेल्या घावाची माहिती दिली. त्या परिपत्रकात काय म्हटले आहे ? त्यात असे म्हटले होते की, "मान्यता देण्याचे अधिकार कृष्णा खोरे महामंडळाप्रमाणे विदर्भ पाटबंधारे मंडळाला दिले होते." स्वातंत्र्य केव्हा मिळाले तर अंदाजपत्रक सादर झाल्यानंतर मिळाले आहे. अंदाजपत्रकातील अनुशेष दूर झाल्यानंतर दिनांक 20.8.2009 रोजी एक परिपत्रक काढले आहे. त्यात असे नमूद केले आहे

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

प्रा.बी.टी.देशमुख...

की, "अमरावती व यवतमाळ या दोन जिल्हयामध्ये आता प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार परत घेण्यात येत आहेत" असे अत्यंत घातकपणाचे परिपत्रक काढले आहे. मंत्रिमहोदयांनी या अधिवेशनामध्ये ते परिपत्रक मागे घ्यावे. पाटबंधारे विभागाच्या अधिका-यांनी ते परिपत्रक काढले असेल, नशापाणी करुन तर ते परिपत्रक काढले नव्हते. महसुली विभागात महत्तम अनुशेष असलेला अमरावती जिल्हा आहे तेथे आजही एक टक्काही अनुशेष भरुन निघालेला नाही. त्या जिल्हयासाठी अशाप्रकारचे परिपत्रक काढले जाते. सभापती महोदय, त्यानंतर पाटबंधारे विभागाने पाणी उपलब्धता प्रमाणपत्राच्या अनुषंगाने दुसरे एक परिपत्रक काढले. त्यावेळी आम्ही सन्माननीय जलसंपदा मंत्री श्री.अजितदादा पवार यांना असे म्हटले होते की, कृष्णा खोऱ्यासंबंधी जसे केले तसे येथे करावे. पाणी उपलब्ध आहे काय ते पहावे. असे सांगितल्यानंतरही ते दिनांक 5.10.2009 रोजी परिपत्रक काढले आहे. म्हणजे स्वातंत्र्य जून महिन्याच्या अंदाजपत्रकात मिळाले. "अमरावती व यवतमाळ जिल्हयामध्ये आता हे लागू राहणार नाही." असे त्यात म्हटले आहे. यामध्ये मराठवाडयातील व विदर्भातीलही जिल्हे आहेत. पाणी उपलब्धता प्रमाणपत्राची बाब पुन्हा आमच्या बोकांडी बसविली आहे. त्यामुळे शासनाने दिनांक 5.10.2009 चे परिपत्रक ताबडतोब मागे घ्यावे ही विनापैशाची आमची मागणी आहे. महाराष्ट्रात एका बाजूला भूसंपादनाची कामे खाजगी वाटाघाटीने केली जात आहेत.

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

यानंतर श्री.शिगम

अशुद्धीत प्रत / अशुद्धीसाठी नाही

विदर्भामध्येसुध्दा ते आता एक-दीड वर्षापूर्वी लागू झाले. अप्पर वर्धा प्रकल्पाचे गृहस्थ हे आजही न्यायापासून तडफडत आहेत. निम्नपेढी प्रकल्पाच्या बाबतीत खाजगी वाटाघाटीने भूसंपादनाची प्रक्रिया महाराष्ट्रातील शासन निर्णयाप्रमणे विदर्भामध्ये पहिल्यांदा लागू झाली. लोकांनी आनंदाने या कामासाठी आपल्या जमिनी दिल्या. पण हा आनंद पहावेना.आता 15.10.2009ला परिपत्रक काढले. माननीय मंत्री महोदय श्री. बाळासाहेब थोरात यांनी हे परिपत्रक ध्यानात घ्यावे. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर हे परिपत्रक काढले. आता हे स्वातंत्र्य केव्हा मिळाले ? तर जेव्हा अंदाजपत्रक सादर झाले तेव्हा ते मिळाले. अनुशेष दूर झाला, आता यांची गच्ची पुन्हा धरा, असे सरकारला वाटले. "तूर्त खाजगी वाटाघाटी, भूसंपादनाची कारवाई करु नये, असे निदेश देण्यात येत आहेत" अशा आशयाचे परिपत्रक काढले. म्हणजे मरा. महाराष्ट्राच्या एका भागाचा वर्षानुवर्षे विकास ज्या मार्गाने झाला तो मार्ग एक वर्ष विदर्भामध्ये एक-दोन प्रकल्पाच्या बाबतीत लागू झाला, मराठवाड्यात एक-दोन प्रकल्पाच्या बाबतीत तो लागू झाला.... सभापती महोदय, मी पाच मिनिटामध्ये माझे भाषण संपवितो.

सभापती महोदय, ही तीन परिपत्रके मी तारखेनिशी आपल्याला सांगितलेली आहेत. ही परिपत्रके ताबडतोब मागे घ्यावीत अशी बिनपैशाची माझी मागणी आहे. ॲरोगन्स, उद्धटपणा खिशात ठेवण्याची माझी मागणी आहे. हा उद्धटपणा आपण खिशात ठेवा आणि मराठवाडा आणि विदर्भातील मागास भागाला पाणी उपलब्ध करुन द्या. पाणीपत्राची मागणी करु नका. प्रकल्पस्थळी पाणी आहे की नाही एवढे बघा. प्रकल्पस्थळी पाणी असेल तर प्रकल्प बांधण्याचा अधिकार आहे. उपाययोजनांच्या बाबतीत सांगत असताना पहिली उपाययोजना मी अशी सांगितली की, 30 एप्रिल 2010ची मुदत वाढविण्याची विनंती करावी, आर्थिक अनुशेषाचे सोंग बंद करावे आणि यावर्षीपासून भौतिक अनुशेष, फिझिकल बॅकलॉग दूर करावा अशी माझी बिनपैशाची मागणी आहे. भौतिक अनुशेषामध्ये यापुढे अपडेटिंग केले जाईल अशा प्रकारची स्पष्ट घोषणा करावी, ही दुसरी उपाययोजना आणि तिसरी आणि महत्वाची उपाययोजना अशी आहे की, दरवर्षीच्या भौतिक अनुशेषाचे अपडेटिंग झाले पाहिजे. याचे कारण माननीय मंत्री महोदयांनी लक्षात घ्यावे. 1982 नंतर 1994 पर्यन्त महाराष्ट्र हे जिवंत माणसांचे राज्य होते आणि ते जिवंत माणसांचे राज्य असल्यामुळे

..2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(प्रा. बी.टी.देशमुख....

अनुशेषग्रस्त जिल्ह्यात 10 हजार हेक्टर सिंचन क्षमता उपलब्ध झाली असेल तर विकसित जिल्ह्यामध्ये ती 110 हजार हेक्टर इतकी झाली. अनुशेष जिल्ह्यामध्ये जेव्हा थोडीशी सिंचन क्षमता मिळते त्यावेळी सरासरी थोडीशी वाढते हे जरी खरे असले तरी बिगर अनुशेष जिल्हयात जेव्हा मोठया प्रमाणात सिंचन क्षमता पदरात पडते त्यावेळी मोठया प्रमाणात सरासरी वाढते. सरासरी वाढत रहाते. 1994मध्ये 22ची सरासरी 37 झाली, जून 2007मध्ये 37ची सरासरी 50 झाली आणि जून 2008मध्ये 50ची सरासरी 54 झाली. सरासरी ही सातत्याने वाढत राहिली. सरासरीच्या प्रमाणात नाही तर वाढणा-या सरासरीच्या पुढे वेग असेल तर अनुशेषग्रस्त भागातील अनुशेष कमी होईल आणि त्यापेक्षा तो कमी असेल तर तो अनुशेष दूर सुध्दा होणार नाही. महाराष्ट्रातील महत्तम अनुशेष असलेल्या विदर्भ आणि मराठवाडयातील 7 जिल्ह्यांचा अनुशेष एका हेक्टरने दूर झाला नाही. 1982मध्ये जेवढा अनुशेष होता त्यापेक्षा तो वाढला. याची माननीय मंत्री महोदयांनी नोंद घ्यावी आणि अपडेटिंग करावे. अपडेटिंग करावे असे मी का म्हणतो ? तर जून 2007मध्ये 50.52 सरासरी होती. आता जून 2008 मध्ये ती 54.42 इतकी झालेली आहे. याचा परिणाम काय झाला ? तर राज्याचा जलसिंचनाचा अनुशेष 1870 हजार हेक्टरचा होता तो 1878 हजार हेक्टर झाला. विदर्भाचा सिंचनाचा अनुशेष 1065 हजार हेक्टरचा होता तो 1076 हजार हेक्टर झाला. मराठवाड्याचा सिंचनाचा अनुशेष 493 हजार हेक्टर होता तो 500 हजार हेक्टर झाला. अमरावती विभागाचा सिंचनाचा अनुशेष 888 हजार हेक्टरचा होता तो 897 हजार हेक्टर झाला.नागपूर विभागाचा सिंचनाचा अनुशेष 176 हजार हेक्टर होता तो 179 हजार हेक्टरचा झाला. दरवर्षीच्या सरासरीवर भौतिक अनुशेषाचे अपडेटिंग करुन ज्या दिवशी एका हेक्टरने तो अनुशेष कमी होईल त्या दिवशी तो अनुशेष कमी झाला असे आम्हाला म्हणता येईल.

...नंतर श्री. पांडुरंग खर्चे...

अशुधारित प्रत / शोधनीसाठी नाही

प्रा. बी.टी.देशमुख .....

सभापती महोदय, यवतमाळ आणि अमरावती जिल्ह्यांमध्ये शासनाने परिपत्रक काढून जी नरडी दाबलेली आहे, जी तीन परिपत्रके काढलेली आहेत ती मी वाचून दाखविली ते एक क्रुरपणाचे लक्षण आहे. क्रौर्य याशिवाय दुसरा कोणताही शब्द तेथे लागू होणार नाही. मी अनेक वेळा सभागृहात हा विषय मांडलेला आहे की, कोसा प्रकल्पातील पाणी वीज निर्मितीसाठी खाजगी भांडवलदारांनी वापरण्यासाठी देताना या अनुशेष जिल्ह्यांना अगोदर बाजूला करावे. माननीय मुख्यमंत्र्यांनी सभागृहात येऊन सांगितले होते की, हे तीन प्रकल्प आजच्या आज आम्ही रद्द करतो चौथाप्रकल्प रद्द करण्याबाबत मला सांगू नका कारण आम्ही त्याला मान्यता दिलेली नाही आम्ही त्याचा पुनर्विचार करतो, दुसऱ्या ठिकाणी पाणी देऊ. असे सभागृहात सांगितल्यानंतर परवा माननीय मुख्यमंत्र्यांच्या दालनात एक बैठक झाली दुर्दैवाने त्यासंबंधीची माहिती मला फक्त अर्धा तासच अगोदर मिळाली मी त्या बैठकीसाठी गेलो. त्यावेळेस मी सांगितले की, त्या जिल्ह्यातील इतर लोकांना सुध्दा बोलवायला पाहिजे होते. या भांडवलदारांचे हात किती मजबूत असतात. ते मला तेथे कळले. त्या ठिकाणी मी एक टिप्पणी पाहिली, अतिशय निंदनीय अशी ती टिप्पणी होती. ती टिप्पणी लिहिणाऱ्या अधिकाऱ्याला एक तर राष्ट्रपती पारितोषिक तरी द्या अन्यथा त्याला सुळावर तरी चढवायला पाहिजे. त्या अधिकाऱ्याने टिप्पणीत फक्त तीनच प्रकल्प रद्द करण्यासंबंधीचा उल्लेख केलेला आहे, चौथ्या प्रकल्पाचा उल्लेखही केलेला नाही किंवा त्याचा पुनर्विचार करु असेही मुख्यमंत्र्यांसमोर ठेवले नाही. कदाचित ती टिप्पणी माननीय मंत्री महोदय श्री. बाळासाहेब थोरात यांच्याकडे सुध्दा असेल. मी माननीय मुख्यमंत्र्यांना सांगितले की, हे एक प्रकारे क्रौर्यच आहे. मला माननीय मुख्यमंत्र्यांना ते सांगावे लागले, कारण त्यांनाही ते माहीत होते. माननीय श्री. बाळासाहेब आपणही त्या बैठकीमध्ये होता, सर्व अधिकारी तयारीने आले होते, कारण भांडवलदारांचे हात मोठे असतात. मी म्हणालो की, हे क्रौर्य आहे. एक हेक्टरचा तो अनुशेष जो 134 हेक्टरचा होता तो 219 हेक्टरवर गेला आणि आता 219 हेक्टरवरुन 232 हेक्टर इतका झाला. या ठिकाणी माननीय मुख्यमंत्र्यांचे शब्द मी जसेच्या तसे सांगतो. ह्युमॅनिटीरीयन पॉइंट ऑफ व्हयू हे ब्रिटीश लोकांचे म्हणणे मला योग्य वाटते. आपण ह्युमॅनिटीरीयन पॉइंटने सांगतात, मी अत्यंत आभारी आहे. "What about Constitutional and Legal point?" हायकोर्ट

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख .....

तुम्हाला सांगते "You cannot pass any order frustrating the Directives of the Governor." गव्हर्नरने अनुशेष दूर करा म्हणून तुम्हाला सांगितले. "You cannot frustrate Directives of the Governor." मी माननीय मुख्यमंत्र्यांना धन्यवाद देईन. मी अशा एकाही प्रकल्पाच्या बाबतीत पर्यावरणाचा मुद्दा कधी धरुन बसलो नाही. शेवटी वीज पाहिजे असेल तर कोठे ना कोठे तरी प्रयत्न करावेच लागतील. परंतु गुरुकुंज आश्रम हा या प्रकल्पापासून फक्त 5 किलोमीटरवरच आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची जन्मशताब्दी सध्या सुरु आहे. या सोफिया प्रकल्पातील कोळशाच्या राखीने त्या आश्रमाला झाकून टाकू नका. मी माननीय मुख्यमंत्र्यांना याच प्रकल्पाचा आग्रह धरला असता ते म्हणाले होते की, या प्रकल्पाचा आम्ही पुनर्विचार करु त्याचाही विचार करावा. अन्यथा फार मोठा रक्तपात झाल्यावर शहाणे होणे हे शहाणे होणे नसते. महत्तम अनुशेष असलेले जे जिल्हे आहेत त्यांच्या बाबतीत अशा प्रकारचे क्रौर्य दाखवू नका. माननीय मंत्री महोदय आपण त्या बैठकीत अर्ध्यातून उठून त्या गोष्टींचा आपण निषेध व्यक्त केला. म्हणून आजचा हा चौथा सोफिया नावाचा प्रकल्प जो आश्रमाच्या जवळच आहे तो रद्द केल्याची घोषणा करा. महाराजांना कोळशाचे स्नान घालण्याचे पाप हे सरकार करणार नाही असा मला विश्वास आहे. शेवटी एक एक वाक्यात मी अगोदर सांगितलेल्या पाच उपाययोजना पुन्हा सांगतो. त्यात पहिली उपाययोजना म्हणजे माननीय राष्ट्रपतीच्या आदेशाची पुन्हा एक्स्टेंशन ऑर्डर काढण्यासंबंधीची विनंती शासनाने करावी. दुसरे म्हणजे केव्हाच्या तरी दर सूचीवर आधारलेला भौतिक अनुशेष हा पूर्णपणे बंद करण्यात येईल अशी घोषणा करावी. तिसरे म्हणजे भौतिक स्वरुपाय अनुशेष काढला जाईल. चौथी उपाययोजना अशी आहे की भौतिक अनुशेषाचे अपडेटिंग केलेले नाही ते दरवर्षी करावे. मागील वर्षी तर एका जिल्ह्यातील अनुशेष 100 हजार हेक्टर असेल .....

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी.टी.देशमुख .....

तर त्या एका वर्षामध्ये उपलब्ध झालेली सिंचन क्षमता आणि वाढलेली सरासरी लक्षात घेता जर सिंचन क्षमतेचा अनुशेष 99 झाला तर अनुशेष कमी झाला आणि 101 अनुशेष झाला तर तो वाढला असा त्याचा अर्थ होतो. "युवर इम्पिलिमेंटेशन इज फेल्ड" असा त्याचा अर्थ होतो. सर्वात महत्वाची मागणी अशी आहे की, अनुशेषग्रस्त जिल्हयांच्या बोकांडी कोळशावाले आणि खाजगी भांडवलदार घेऊन तुम्ही बसू नका. "सोफीया पॉवर कंपनीचा प्रकल्प हा रद्द केलेला असून त्याची व्यवस्था दुसऱ्या ठिकाणी करु" अशा प्रकारची स्पष्ट घोषणा या ठिकाणी शासनाने करावी. महाराजांच्या जन्मशताब्दी वर्षामध्ये अशा प्रकारचे पाप आपल्या हातून होणार नाही अशी ठाम घोषणा शासनाने करावी अशी आपणास विनंती करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : आता या प्रस्तावावरील चर्चा 11.45 पर्यंत होईल तसेच ज्यांना या प्रस्तावावर विचार मांडावयाचे आहेत त्यांनी, कालच्या कामकाज पत्रिकेत दाखविलेला शिक्षणाच्या संदर्भातील नियम 260 अन्वयेचा जो प्रस्ताव होता त्या प्रस्तावाच्या उत्तरानंतर पुन्हा या प्रस्तावावरील चर्चा सुरु होईल, तेव्हा आपले विचार मांडावेत.

श्री. जैनुद्दिन जव्हेरी (वधा-चंद्रपूर-गडचिरोली स्थानिक प्राधिकारी संस्था) :सभापती महोदय, चर्चेला सुरुवात करण्याअगोदर किंवा कोणालाही बोलण्याच्या अगोदर जसे,"जय श्रीराम, श्री गणेश, बिसमिल्ल्हा" म्हणतो त्या प्रमाणे मी "जय विदर्भ" म्हणून या प्रस्तावाला सुरुवात करतो.

विदर्भराज्याच्या संदर्भात माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी नियम 260 अन्वये प्रस्ताव मांडला आहे त्या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, विदर्भ महाराष्ट्रात सामील होऊन 50 वर्षे पूर्ण झालेली आहेत. असे असतांनाही विदर्भाचे अनेक प्रश्न अजूनही तसेच प्रलंबित राहिलेले आहेत. विदर्भ आज सुध्दा मागासलेला असल्यामुळे विदर्भातील जनतेमध्ये, विद्यार्थ्यांमध्ये तसेच नेतेमंडळींमध्ये अशी मागणी होत आहे की, "मागील 50 वर्षात विदर्भाचे अनेक प्रश्न सुटलेले नाहीत. मग ते सिंचनाच्या संदर्भातील असोत, उद्योगाच्या संदर्भातील असोत, कास्तकारांच्या संदर्भातील असोत, शिक्षण क्षेत्राच्या संदर्भातील असोत अशा सर्व प्रश्नांमध्ये विदर्भाच्या मागासलेपणाचा कोणताही प्रश्न आतापर्यंत शासन दरबारी सुटलेला नाही. या राज्यात आघाडीचे शासन आहे याबद्दल काही वाद नाही. परंतु मधील काळात भारतीय जनता पार्टी तसेच शिवसेनेचे शासन होते. शिवसेनेचे आदरणीय नेते श्री. ठाकरे साहेबांनी त्यावेळी असे आश्वासन दिले होते की, विदर्भाचा अनुशेष आणि विदर्भाचा मागासलेपणा तीन वर्षात आम्ही सोडवू शकलो नाही तर विदर्भाला वेगळे राज्य देण्याच्या मागणीचा विचार करु या मागणीला मी स्वत: समर्थन देईन. या ठिकाणी माझ्या पेक्षा ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर तसेच ज्येष्ठ सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी.देशमुख साहेबांनी विदर्भाच्या अनुशेषाच्या संदर्भात विचार मांडलेले आहेत. मी आपल्याला सांगू इच्छितो की, विदर्भातील सिचंनाच्या अनुशेषाच्या संदर्भात तज्ज्ञ लोकांनी माहिती दिलेली आहे. त्यामुळे तज्ज्ञ लोकांची मागणी शासनाने लक्षात घेतली पाहिजे. पूर्वी विदर्भाच्या सिंचनाचा अनुशेष 80 टक्के होता. तो 1994 मध्ये 55.4 टक्के झाला, मराठवाडयाचा 32.37 होता आणि उर्वरित महाराष्ट्राचा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जैनुद्दिन जव्हेरी...

सिंचनाचा अनुशेष 12.59 टक्के होता. अनुशेषाच्या संदर्भात सन 2008 मध्ये संपूर्ण माहिती दिलेली आहे. विदर्भाच्या सिंचनाचा अनुशेष 80.39 टक्के, मराठवाडयाचा अनुशेष अगोदर 55 होता तो आता कमी झालेला आहे. उर्वरित महाराष्ट्राच्या सिंचनाचा अनुशेष अगोदर 12.59 टक्के होता तो आता 00 टक्के झालेला आहे. अगोदर विदर्भात सी.पी.अँड बेरार राज्य होते व या राज्याची राजधानी नागपूर होती. आता काही नेते मंडळी वेगळया विदर्भाची मागणी करीत आहेत, खरे म्हणजे आम्ही वेगळया विदर्भ राज्याची मागणी करीत नाही.

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जैनुद्दिन जव्हेरी .....

सभापती महोदय, या प्रस्तावावरील चर्चेत भाग घेत असतांना मी आपणास सांगू इच्छितो की, वेगळया राज्याची आमची मागणी नाही. विदर्भ पूर्वी ज्या राज्यात होते त्या भागातील शासकीय कार्यालये, विधान सभा, विधान परिषद इत्यादी महाराष्ट्रात सामील झाले होते . ज्यावेळी नागपूर करार झाला होता त्यावेळी आम्हाला असे सांगण्यात आले होते की,आपण सर्वजण मराठी माणसे आहोत, महाराष्ट्र राज्य हे मोठे आहे तेव्हा तुम्हीसुध्दा महाराष्ट्रात सामील व्हावे.सभापती महोदय, मी जेव्हा लहान होतो तेव्हा माझ्या पेक्षा ज्येष्ठ असलेल्या एका व्यक्तीबरोबर माझी चर्चा झाली होती. ते माझे चांगले मित्र होते. ते माझ्या पेक्षा वयाने मोठे होते तसेच ते विव्दानही होते.त्यांनी मला जवळ बोलावले आणि मला असे सांगितले की जे आपल्या बरोबरीचे असतात त्यांच्याशीच मित्रता व नातेसंबंध करावयाचे असतात. तसे करण्यात आले तरच ती मित्रता आणि नातेसंबंध आपण निभावू शकतो. आपण जर श्रीमंत माणसांबरोबर मैत्री केली तर आपल्याला नमून रहावे लागते आणि गरीब माणसाबरोबर मैत्री केली तर तो आपल्यासमोर नमून राहतो त्याचबरोबर टाटा बिर्ला सारख्या श्रीमंत व्यक्तीबरोबर जर आपण नातेसंबंध जुळवला तर त्याच्यासाठी आपल्याला खर्च करावा लागतो. आपण त्यांना कितीही दिले तरी लोकांना असे वाटते की श्रीमंत व्यक्तीनेच हा खर्च केलेला आहे. त्यामुळे आपल्याला सुध्दा नमून रहावे लागते. गरीब माणसाबरोबर जर आपण नातेसबंध जुळवला वा मित्रता केली तर तो आपल्यापासून नमून राहतो व मोठया माणसाबरोबर मित्रता केली तर आपण त्याच्यासाठी कितीही पैसे खर्च केले तरी असे वाटते की दुसरा माणूस श्रीमंत आहे त्यानेच हा खर्च केलेला असेल. नेमकी अशीच स्थिती विदर्भाची झालेली आहे. विदर्भ आणि नागपूरचा भाग महाराष्ट्राला जोडण्यात आल्यामुळे मुंबई ही राज्याची राजधानी झाली .मुंबई ही अत्यंत श्रीमंत आहे असेच भारतात आणि संपूर्ण जगात मानले जाते. मुंबईमध्ये जेवढे इनकम टॅक्स आणि इतर टॅक्सेस गोळा होतात तेवढे टॅक्सेस इतर कोणत्याही ठिकाणाहून गोळा केले जात नाहीत. त्यामुळे विदर्भाने मुंबईबरोबर मित्रता केली होती आणि आम्ही महाराष्ट्रात सामील झालों विदर्भामध्ये खनिजे आहेत, नद्या आहेत आणि इतर अनेक गोष्टी आहेत परंतु जनतेच्या आणि नेते मंडळीच्या मनात असे आहे की,मुंबई आहे म्हणून तुम्ही जगत आहात व तुम्हाला सर्व सोयी सुविधा उपलब्ध होत आहेत.विदर्भातील सिंचनाच्या सोयी उपलब्ध करुन देण्यासाठी

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जैनुद्दित जव्हेरी ..

त्याचबरोबर विदर्भातील कास्तकारांचे प्रश्न सोडविण्यासाठी लागणारे फंडस मुंबईहून आपल्याला मिळत आहेत. विदर्भ जर वेगळा झाला तर काय होईल या सबंधी मी अनेक नेत्याबरोबर तसेच मंत्र्यांबरोबर बोललो होतो. तेव्हा त्यांनी मला असे सांगितले की, मुंबईला करोडो रुपयांचा टॅक्स मिळत असतो परंतु विदर्भामध्ये काय आहे ? मी आपल्याला सांगतो की विदर्भामध्ये खनिज आहे , बारमाही वाहणा-या नद्या आहेत तसेच काम करणारी माणसे आहेत, त्याग करणारी अनेक माणसे आहेत. आमच्याकडील अनेक नेत्यांनी त्याग केलेला आहे.आमच्याकडील लोकांचे मन किती मोठे आहे हे आपण लक्षात घ्यावे. आमचे आजोबा आणि वडील किती मोठया मनाचे होते हे आपण पहावे .सरदार वल्लभभाई पटेल आणि पंडित जवाहरलाल नेहरु यांनी सांगितले की , "सी पी ॲन्ड बेरार मधील नागपूर आणि विदर्भाचा भाग महाराष्ट्राला देण्यात यावा " तेव्हा आम्ही कोणताही विरोध केलेला नव्हता . तहसीलदाराचे कार्यालय , पोलीस चौकी वा अन्य कोणतेही कार्यालय जर बंद करण्यात आले तर ,हजारो लोक आंदोलने करतात परंतु त्यावेळी आम्ही कोणत्याही प्रकारचे आंदोलन केलेले नव्हते आणि आम्ही स्वत:हून आमचा भाग आपल्याला देऊन टाकला होता आणि मुंबई ही राज्याची राजधानी करावी असे सांगितले होते. अशा प्रकारे एवढा त्याग केल्याचे एक तरी उदाहरण जगात वा भारतात घडले नसेल.. त्यामुळे आमच्यामध्ये समज नाही असे कोणीही समजता कामा नये. .आमच्यावर अनेक आरोप केले जातात. विदर्भातील कास्तकार आत्महत्या करीत आहेत वर्तमानपत्रात तज्ज्ञांचा एक रिपोर्ट छापून आला होता व त्यात असे म्हटले होते की, दारु पिऊन हे लोक मरतात. या बाबतीत अनेक रिपोर्ट आलेले आहेत त्यातील एक रिपोर्ट अशा प्रकारचा देखील आलेला आहे. दारुचे लायसेन्स तर शासनाने दिलेले आहे.

श्री.दिवाकर रावते : असे म्हणणे बरोबर नाही.

श्री.जैनुद्दिन जव्हेरी : तसा रिपोर्ट आहे व त्यासंबंधी वर्तमानपत्रात छापून आलेले आहे.

श्री. दिवाकर रावते : दारु पिऊन शेतकरी मरतात असा रिपोर्ट कोणत्या तज्ज्ञांनी दिलेला आहे हे सन्माननीय सदस्यांनी सांगावे अन्यथा हे विधान त्यांनी मागे घ्यावे.

श्री.जैनुदिन जव्हेरी : यासंबंधीचे जे अनेक रिपोर्ट आहे त्यात एक रिपोर्ट असासुध्दा आहे याबाबतीत माझे असे म्हणणे आहे की, आमच्यावर अनेकदा आरोप करण्यात येत असतात ...

नंतर श्री.सुंबरे

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. जव्हेरी ...

तेव्हा विदर्भातील कास्तकार आत्महत्या करीत आहेत त्याबद्दलचा हा मुद्दा बरोबर नाही. तो दारू का पितो, त्याची चौकशी करण्यासाठी आपण आयोग बसवा. सभापती महोदय, विदर्भातील कास्तकार दारू का पितो, तर तो गरीब कास्तकार त्याची 2-5-10 एकर शेती असते पण त्यात सिंचनाचा काहीही उपयोग नाही. विहीर आहे पण त्यात पाणी नाही. कारण मोठमोठे डोंगर येथे आहेत आणि ते सारे मायनिंगवाले 400 फूट खाली गेले तरी पाणी लागत नाही. सभापती महोदय, माझी स्वत:ची 400 एकर शेती होती पण मी ती त्यातून काही फायदा होत नाही म्हणून विकून टाकली. विदर्भात पाण्याची सोय नाही, सिंचनाची सोय नाही, विहीर घेतली तर तिला पाणी लागत नाही. 200 फूट बोअर टाकली तरी पाणी लागत नाही. थोडक्यात सांगावयाचे तर विदर्भाच्या कास्तकारावर ईश्वराची देखील कृपादृष्टी नाही, त्यामुळे पाऊस देखील चांगला होत नाही. मग त्याच्या मागे दलाल लागतो. आताच या ठिकाणी माननीय विरोधी पक्षनेता श्री.फुंडकर साहेबांनी सांगितले ते खरे आहे, दलाल अशा शेतकऱ्याला गाठून सांगतो की,तुझ्याकडे पैसा नाही तर माझ्याकडे ये. मी तुला पैसा देतो. साहजिकच गरीब कास्तकार त्याच्याकडे जाऊन पैसे घेतो. मग त्याच्या डोक्यावर त्या कर्जाचा बोजा दोन तीन वर्षातच मोठ्ठा होतो, तो बोजा त्याला पेलवत नाही आणि टाकूनही देता येत नाही. अशा प्रकारे सावकार त्याची शेती घ्यायला लागतो आणि ती शेती सावकाराने घेऊ नये म्हणून मग तो आत्महत्या करतो. कास्तकाराने आत्महत्या केली की, त्याच्याकडील कर्जाची वसुली करण्यास सावकार पुढे येत नाही. त्याला भीती वाटते. तेव्हा विदर्भातील कास्तकारांच्या आत्महत्यांची जी प्रकरणे आहेत त्यामध्ये त्याच्या शेतीला पाणी मिळत नाही. सिंचनाचा लाभ त्याला मिळत नाही आणि शिवाय त्याच्या डोक्यावर कर्जाचा वाढता बोजा असणे ही कारणे आहेत. त्याला नोकरीही मिळत नाही. पश्चिम महाराष्ट्र, कोकण भागातील कास्तकार आहेत त्यांच्या उत्पादनाला जास्त भाव आहे, त्यांचा एक मुलगा मुंबईला, पुण्याला नोकरीला असतो. आमच्याकडे काय आहे ? सभापती महोदय, आपण पूर्ण महाराष्ट्राचे चित्र पहा. आता तर एक नवीन चित्र निर्माणझालेले आहे. गडचिरोली, चंद्रपूर, भंडारा, गोंदिया नागपूरचा माणूस असेल, त्याला वसन विभागाची, महसूल खात्याची, पोलिसाची नोकरी असेल तर त्यासाठी त्याला आता इंटरनेटवर नाव द्यावे लागते मग त्यावर मुलाखत घेतली जाते. सभापती महोदय, मुंबई पुण्यामध्ये हजारो शिकलेली मुले आहेत, ती पेपर बरोबर सोडवितात. त्यामुळे त्यांना पटकन

..... यू 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नोकरी मिळते. पण या नोकऱ्यांमध्ये विदर्भाची किती मुले असतात याचा आपण विचार केला आहे का ? 500 उमेदवारांना नोकरी मिळाली असेल तर त्यात विदर्भाचे पाच देखील उमेदवार नसतात. अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीचे उमेदवार तेथे मिळाले नाहीत तर विदर्भातील लोक घेतले जातात. त्यामुळे विदर्भातील कास्तकाराला हे माहीत झाले आहे की, माझ्याकडे काहीही नाही, पैसा नाही, नोकरी मला लागू शकत नाही. मग एकच उपाय आहे आणि तो उपाय म्हणून त्याला आत्महत्येचा मार्ग स्वीकारावा लागतो. तर अशी अनेक कारणे या आत्महत्यांमागे आहेत. सभापती महोदय, विदर्भात एमआयडीसी किती आहेत ? अगोदरच विदर्भात गडचिरोली जिल्हा होण्यामध्ये 25-27 वर्षे गेली. प्रत्येक जिल्हाला एमआयडीसी असली पाहिजे. पण आमच्या विदर्भात त्याबाबत काय परिस्थिती आहे ? आमच्या तालुक्याच्या रेस्ट हाऊसमध्ये तर ढोरे बसलेली असतात. त्यांना दरवाजे-खिडक्याच नाहीत. अशी परिस्थिती असेल तर तेथे कारखाने कोण उघडणार ? तुम्ही जमीन द्या, ती खनिजाची असेल तर त्या एक एकरामध्ये 20 ते 200 कोटीचा माल निघतो आणि मग त्या जमिनीचा भाव 50 हजार ते 2 लाख रूपये होते. उद्योगपती लोक खनिजासाठी येथे येतात. येथील खाणीतून माल काढतात की निघाले मुंबईला. मुंबईला गेल्यावर त्यांना विदर्भ आठवतच नाही. तेव्हा तुम्ही आता नागपूरलाच बाजारपेठ बनवा. नाही तरी नागपूर हे भौगोलिकदृष्ट्या साऱ्या भारताच्या केंद्रस्थानी आहे. आपल्या विधान भवनापासूनच जवळच 'झिरो पॉईंट' स्तंभ आहे. तेव्हा पूर्ण भारतात संरक्षणाच्या दृष्टीने नागपूर हे ठिकाण अतिशय सुरक्षित आहे. येथे आपण बाजारपेठ वसविली पाहिजे. पूर्वी जेव्हा आंदोलन झाले त्यात अनेक येथील व्यापारी आणि उद्योगपती पुढे होते. त्यामध्ये ब्रिजलाल बियाणी वगैरे अनेक व्यापारी बंधू होते. ..

(यानंतर श्री. सरफरे .... व्ही 1 ..

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपी नाही

श्री. जैनुद्दीन जव्हेरी...

आणि त्यांचा संपूर्ण व्यापार येथून मुंबईला होत होता. आज हा विदर्भ पैशासाठी वेगळा होऊ इच्छित नाही. आम्हाला आपणाकडून काहीही नको. या नागपूरमध्ये मंत्र्यांसाठी अनेक बंगले बांधले आहेत,विधानसभा आणि विधानपरिषदेची सभागृहे आहेत, सर्व शासकीय कार्यालये आहेत, पोलीस अधिक्षक, आणि पोलीस महानिरीक्षक यांच्यासाठी 10 एकरामध्ये बंगले बांधले आहेत, दोन ते तीन हजार एकर मोकळी जमीन आहे. त्यामुळे वेगळा विदर्भ झाल्यानंतर आपण आम्हाला हजारो कोटी रुपये देण्याची सुध्दा गरज नाही. म्हणून माझी शासनाला विनंती आहे की, आपण माननीय राष्ट्रपती व माननीय राज्यपालांना विनंती करावी. वेगळा विदर्भ करण्यासाठी माननीय राष्ट्रपतींनी अध्यादेश काढला तर बरे होईल. विदर्भाचा जो अनुशेष आहे तो दूर करण्यासाठी माननीय विरोधी पक्षनेते श्री. भाऊसाहेब फुंडकर यांनी याठिक्राणी प्रस्ताव आणला आहे. त्यांच्या भारतीय जनता पार्टीच्या वतीने सुध्दा स्वतंत्र विदर्भासाठी मोहीम राबविण्यात आली पाहिजे. त्यासाठी आम्ही कॉग्रेंसच्या नेतेमंडळींना सुध्दा सांगू. पंडित जवाहरलाल नेहरु, वल्लभभाई पटेल यांनी लहान लहान राज्ये निर्माण झाली पाहिजेत असे त्यावेळी म्हटले होते. न्यायमूर्ती फजल आयोग निर्माण करण्यात आला. त्यांनी सुध्दा लहान राज्ये निर्माण करण्यावर भर दिला होता. त्यामुळे आज तशी वेळ आली आहे. त्याकरिता सर्व पक्षामधील नेतेमंडळींनी पुढे येऊन लहान राज्य निर्माण होण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. आज तेलंगणाचे आंदोलन सुरु झाले आहे. आम्ही वैदर्भीय मंडळी शांतताप्रिय आहोत. स्वतंत्र विदर्भाच्या मागणीसाठी आम्ही कॉलेजमध्ये जाऊन तेथील तरुण मंडळींना आंदोलन करण्यासाठी सांगू. याठिकाणी नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावामध्ये मांडण्यात आलेल्या प्रश्नांची सोडवणूक शासन करणार आहे. म्हणून मी भारतीय जनता पार्टीच्या माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, त्यांनी वेगळया विदर्भाच्या मागणीकरिता वेगळा प्रस्ताव सभागृहामध्ये आणावा. आणि या सभागृहामध्ये तो एकमताने मंजूर करावा अशी विनंती करतो व माझे भाषण संपवितो.

जय हिंद, जय विदर्भ

उपसभापती : सभागृहाची विशेष बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी ठीक 12.00 वाजता भरेल.

(11.47 ते 12.00 पर्यंत बैठक स्थगित)

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापतीस्थानी - मा.सभापती

नियम 289 अन्वये देण्यात आलेल्या प्रस्तावाबाबत

सभापती : आज सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत, श्री.अरविंद सावंत आणि श्री.दिवाकर रावते यांनी माझ्याकडे नियम 289 अन्वये दोन प्रस्ताव दिलेले आहेत.

"कोपनहेगन येथे झालेली ग्लोबल वॉर्मिंगच्या आंतरराष्ट्रीय परिषदेत फलनिष्पती झाली नाही. भारतावर वाढता अमेरिकेचा दबाव त्यामुळे कार्बन उर्त्सजनावरीलही दबाव वाढण्याची चिन्हे दिसत असताना समुद्र किनाऱ्यांवरील शहरांविषयी करावयाच्या उपाययोजना बाबतचा अहवाल गुप्त असणे" या संदर्भात प्रस्ताव दिलेला आहे. याबाबतीत सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी थोडक्यात आपले म्हणणे मांडावे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मुंबई येथील सभागृहामध्ये दीड वर्षापूर्वी ग्लोबल वॉर्मिंगवर चर्चा झाली होती. कोपनहेगनच्या आंतरराष्ट्रीय ग्लोबल वॉर्मिंग परिषदेने पुन्हा एकदा हा प्रश्न सरफेसवर आणलेला आहे.भारतावर अमेरिकेचा वाढता दबाव आहे आणि त्यामुळे कार्बन उर्त्सजनाबाबत आपल्यावर जी बंदी घालण्यात आलेली आहे, तो आपल्या सर्वांच्या दृष्टीने एक महत्वाचा प्रश्न आहे. आपल्याकडे अनेक वीज प्रकल्प होणार आहेत. या वीज प्रकल्पामुळे मोठया प्रमाणात कार्बनचे उत्सर्जन होणार आहे. त्यामुळे याठिकाणी हे प्रकल्प येणार की नाही ही सुध्दा शंका आहे. महाराष्ट्राला सर्वात मोठा सागरी किनारा लाभलेला आहे आणि मुंबई हे आर्थिक राजधानीचे शहर हे समुद्र किनाऱ्यावर आहे. मध्यंतरी कोकण विभागाला फयान वादळाचा फटका बसलेला आहे. आपले अधिवेशन सुरु असताना फयान वादळ आले आणि मग आपण शाळा, कॉलेज सोडून दिली. पण आपण याबाबतीत फार सिरिअस नाही असे माझे स्पष्ट मत आहे. आज अवेळी पडणाऱ्या पावसामुळे शेतकरी देखील चिंतेत आहे. पिकांचा दर्जा घसरत आहे. सोयाबीनच्या पिकाचे डॉर्फीजन व्हावयास लागले आहे, त्याचे बोनसाय व्हावयास लागले आहे. अनेक पिकांचा, धान्याचा कस कमी होऊ लागलेला आहे. गव्हाचा कस कमी होऊ लागला आहे. ज्वारी देखील काळी पडत आहे. त्यामुळे हा केवळ शहरापुरताच प्रश्न नाही तर ग्रामीण भागाचा देखील प्रश्न आहे. दुर्दैवाने शासनाने यावर कोणत्याही प्रकारचा अभ्यास गट नेमलेला नाही. या संदर्भात कोणत्याही प्रकारचे काम सुरु नाही. वास्तविक मुंबईच्या नगररचनेमध्ये बदल करणे अपेक्षित आहे आणि कोपनहेगन येथील परिषदेमध्ये सागरी किनाऱ्यावरील शहरे कशी असावीत याचा अहवाल प्रसिध्द झालेला आहे

. . . .डब्ल्यू-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत . . . .

पण तो देखील गुप्त ठेवण्यात आलेला आहे. त्यामुळे माझे असे मत आहे की, या सभागृहासमोरील कामकाज तहकूब करावे आणि ग्रामीण व शहरी भागाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाच्या अशा विषयावर आणि नगररचनेच्या बाबतीत चर्चा होणे अत्यंत आवश्यक आहे.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत...

यामध्ये शहरी माणूस सामील आहे. शेतकरी सामील आहे. संपूर्ण राज्याची आर्थिक स्थिती सामील आहे. मुंबईची पाणी टंचाई यामध्ये सामील आहे. याबाबतीत शासनाकडून कोणत्याच प्रकारची ॲक्शन घेतली जात नाही. सभागृह चालू असल्यामुळे यावर चर्चा होणे अत्यंत आवश्यक आहे. माझी आपल्याला हातजोडून विनंती आहे की, आपण प्रश्नोत्तराचा तास तहकूब करुन यावर चर्चा घ्यावी. धन्यवाद.

श्री. अरविंद सावंत :सभापती महोदय, ग्लोबल वार्मिंग हा शब्द नुसता वॉर्मिंगसाठी राहिला नाही तर तो वॉर्निंग झालेला आहे. ही ग्लोबल वॉर्निंग आहे. कोपेनहेगन येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेत फलनिष्पती झाली नाही.या चर्चमध्ये अनेक गोंधळ झालेले आहेत. कन्क्ल्यूजनपर्यंत ते आलेले नाहीत. परंतु वस्तुस्थितला आपण सामोरे जात आहोत. मिठी नदीसारखा मुंबईतील प्रकारही आपण पाहिलेला आहे. कालपरवाच फयान वादळाचा फटका आपण अनुभवलेला आहे. आपण निसर्गावर जे अतिक्रमण करीत आहोत त्यामुळे वनातील प्राण्यांवरसुध्दा त्याचा परिणाम होत आहे. कालपरवा बिबळया घुसला. हा बिबळया येथपर्यंत का आला? या सगळया गोष्टींचे एक प्रकारचे सर्कल आहे. वनांची तोड होत असल्यामुळे कार्बनचे उत्सर्जन होत आहे. झाडे म्हणजे कार्बन शोषित करणारी व्यवस्था आहे, ती संबंध निघून जात आहे. म्हणून या ग्लोबल वॉर्मिंगचा विचार करीत असताना मुंबई शहराच्या रचनेचा विचार केला तर याठिकाणी करण्यात येणाऱ्या दैनदिन पाणीपुरवठयामध्ये कपात करण्यात येत आहे. पिण्याच्या पाण्यावरुन या ठिकाणी युध्द होतील, अशी परिस्थिती आहे. ग्लोबल वॉर्मिागची चर्चा या सभागृहात झाली होती. मला वाटते सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनीच हा विषय या ठिकाणी मांडला होता. यातील सर्वात महत्वाची गोष्ट अशी की, शासन या बाबतीत अजिबात गंभीर नाही. याबाबतीत गंभीर चर्चा होण्याची आवश्यकयता आहे. सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यानी या ठिकाणी नियम 289 अनव्ये जो प्रस्ताव मांडलेला आहे त्यावर या सभागृहाचे कामकाज तहकूब करुन चर्चा घ्यावी अशी मी आपल्याला विनंती करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सन्माननीय आमदार डॉ. दीपक सावंत आणि श्री. अरविंत सावंत यांनी ग्लोबल वॉमिग संबंधिचा मुद्दा उपस्थित केलेला आहे. या बाबतीत मी सांगू इच्छितो की, या विषयावर चर्चा करण्याची या शासनाची तयारी आहे. सभापती महोदय, प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर आपण या चर्चेसाठी वेळ दिला तर या विषयावर चर्चा करण्याची शासनाची तयारी आहे.

सभापती : आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये असणाऱ्या बाबीमध्ये याठिकाणी नियम 289 अन्वये नमूद करण्यात आलेली बाब जरी नसली तरी मी आजच्या कामकाजात नाही पण उद्याच्या कामकाजामध्ये अतिरिक्त कामकाज घेता येईल काय? हे बघून या चर्चेकरिता एक तासाची वेळ जरुर देण्यात येईल.

याठिकाणी नियम 289 अन्वये उपस्थित करण्यात आलेल्या दोन्ही बाबी मी नाकारित आहे.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KTG/ SBT/

पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे

दादर (मुंबई) येथील गोदरेज तुपाच्या पाकीटात अळ्या आढळल्याप्रकरणी करावयाची कार्यवाही

(१) * ३५० श्री. संजय दत्त , श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्री. चरणसिंग सप्रा : सन्माननीय **अन्न व औषधे प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील दादर येथे छेडा डाल मिलमधील गोदरेज तुपाच्या सिलबंध पॅकमध्ये अळ्या सापडल्याची घटना माहे सप्टेंबर, २००९ मध्ये वा त्या दरम्यान घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्राहकांच्या जीवाशी खेळणाऱ्या तुप उत्पादकांवर व संबंधित व्यापाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याबाबत तसेच पुढे असे प्रकार घडू नयेत म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. रमेश बागवे श्री.मनोहर नाईक यांच्या करिता : (१) हे खरे नाही.

(२) दि.३१/८/२००९ रोजी वनस्पती (गोदरेज) मध्ये अळ्या असल्याची तक्रार प्राप्त होताच मे.छेडा डाल मिल या पेढीस भेट देऊन तपासणी केली असता तक्रारीत नमूद समूह क्रमांक आढळून आला नाही. परंतु पेढीत उपलब्ध समूह क्र.जी.डब्ल्यू १२१८९ चा वनस्पती गोदरेजचा साठा आढळल्याने त्याचा नमुना तपासणीसाठी पाठविण्यात आला असून अहवाल अद्यापही प्रलंबित आहे.

वनस्पती (गोदरेज) चे उत्पादक मे.गोदरेज इंडस्ट्रीज लिमि. वडाळा (पू.), मुंबई येथे चौकशी केली असता तक्रारदारांने नमूद केलेल्या समुह क्रमांकाचा साठा आढळून आला नाही. तेथील उपलब्ध साठ्यातील नमूना तपासणीसाठी घेण्यात आला असून तपासणी अहवाल अद्यापही प्रलंबित आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, उत्तरात म्हटल्याप्रमाणे तक्रारदाराने नमूद केलेल्या समूह क्रमांकाचा साठा आढळून आला नाही. म्हणजे ते वितरित झालेले आहे. माझा प्रश्न असा आहे की, समूह क्रमांकाचा साठा ज्या ज्या ठिकाणी वितरित करण्यात आला होता तेथून तो जप्त का करण्यात आला नाही? हा पहिला प्रश्न आणि दुसरा प्रश्न असा की, त्या साठयाची तपासणी न करता वेगळयाच क्रमांकाच्या साठयाच्या तपासणीसाठी पाठविण्यात आले. त्याचा अहवालसुध्दा अद्याप आलेला नाही. त्याबाबतीत दिरंगाईचे कारण काय?त्याला कोण जबाबदार आहे आणि त्याबाबतीत सरकार काय कारवाई करणार आहे?

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KTG/ SBT/

ता.प्र.क्र.350...

श्री. रमेश बागवे : सभापती महोदय, दि.31-8-2009 ला शिवसेना ग्राहक कक्षाकडून मे. छेडा डाल मिल, जे.पी.रोड, अंधेरी या दुकानातून वनस्पतीमध्ये किडे आढळल्याची तक्रार आलेली आहे. परंतु मी याठिकाणी सांगू इच्छितो की, ज्या ठिकाणी ही तक्रार केली त्या ठिकाणी हा साठा आढळून आला नाही ही गोष्ट खरी आहे. कारण त्यांनी सुटयास्वरुपातील तूप आणलेले होते. ज्या बॅच नंबरबद्दल तक्रार करण्यात आली होती तो बॅचनंबर त्या ठिकाणी आढळून आलेला नाही.

यानंतर श्री. बरवड...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 350 ... श्री. रमेश बागवे ...

परंतु त्या ठिकाणचे सर्व पॅकेट्स घेऊन संबंधित गोदरेज कंपनीमध्ये वडाळा येथे त्याची तपासणी केली. 1 सप्टेंबर रोजी ते लेबॉरटरीमध्ये तपासण्यासाठी पाठविले आणि 5 तारखेला त्याचा अहवाल आला. तो अहवाल प्रमाणित आल्यामुळे त्यांच्यावर कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पुणे येथे साध्या फ्ल्यूची लस ही स्वाईन फ्ल्यूची लस असल्याचे भासवून तीची विक्री करणारे डॉक्टर व औषध प्रतिनिधी यांच्यावर करावयाची कारवाई

(२) * ९३६ श्री. चंद्रकांत पाटील , श्री. रामनाथ मोते , श्री. भगवान साळुंखे , श्री. विनोद तावडे : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथे साध्या फ्ल्यूची लस ही स्वाईन फ्ल्यूची लस असल्याचे भासवून तीची विक्री करणाऱ्या डॉक्टर आणि औषध कंपनीच्या औषध प्रतिनिधींचे रॅकेट असल्याचे आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन पुढील काय कार्यवाही केली आहे,

(३) तसेच अशाप्रकारचे गैरप्रकार आगामी काळात घडू नयेत, यासाठी काय उपाययोजना करण्यात आली आहे ?

श्री.सुरेश शेट्टी : (१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, आपल्या समाजामध्ये कितीही मोठे आक्रमण झाले तरी स्वत:साठी त्याचा फायदा करुन घेण्याची प्रवृत्ती वाढत चाललेली आहे. साध्या फ्ल्यूसाठी जी लस बाजारात आहे ती स्वाईन फ्ल्यूसाठी असल्याचे भासवून मोठ्या प्रमाणात लस वितरित केली जात आहे. यासंबंधीचा प्रश्न विचारल्यानंतर असा प्रसंग घडलेला नाही असे उत्तर दिलेले आहे. माझा प्रश्न असा आहे की, अन्न व औषध प्रशासनाने या लस उत्पादक कंपनीच्या औषध प्रतिनिधीला नोटीस पाठवून जबाबासाठी बोलविले होते, हे खरे आहे काय ? साध्या फ्ल्यूची लस ही स्वाईन फ्ल्यूची असल्याचे भासवून त्याची विक्री करणारे सातारा येथील गांधी हॉस्पिटलचे डॉ. राजेश गांधी आणि केबल चालक यांच्यावर अन्न व औषध प्रशासनाने नुकतीच कारवाई केली, हे खरे आहे काय ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, या ठिकाणी पुणे जिल्ह्यासंबंधी प्रश्न विचारलेला आहे आणि आता सन्माननीय सदस्यांनी सातारा जिल्ह्यासंबंधी प्रश्न विचारत आहेत. या ठिकाणी पुणे जिल्ह्यासंबंधीचे उत्तर छापलेले आहे. परंतु ही बाब खरी आहे की, सातारा येथील डॉ. राजेश गांधी यांनी केबल टी.व्ही.वर जाहिरात केली की त्यांच्याकडे एच1एन1 ची लस उपलब्ध आहे. ती

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

जाहिरात आल्यानंतर तसेच वर्तमानपत्रांमध्ये बातम्या आल्यानंतर अन्न व औषध प्रशासनाने त्या ठिकाणी धाड घालून त्या लसी सील केल्या. त्यांच्यावर कारवाई चालू आहे. त्यांना कारणे दाखवा नोटीस पाठविलेली आहे आणि ज्या लसी त्या ठिकाणी सापडल्या त्या तपासणीसाठी लेबॉरटरीकडे पाठविलेल्या आहेत.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माझा आपल्यामार्फत माननीय मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे की, नजिकच्या भविष्य काळात स्वाईन फ्ल्यूची लस उपलब्ध होणार आहे काय ? या विषयाची माहिती शासनाकडे आहे काय ? दुसरा प्रश्न असा की, आयुर्वेदिक असो, होमियोपॅथिक असो किंवा अलोपॅथिक असो, अशा अनेक लोकांनी दावा केला आहे की, आमच्याकडे स्वाईन फ्ल्यू बरा करण्यासाठी औषधाची उपाययोजना आहे. अनेक लोक मिसगाईड होऊन अशा प्रकारच्या उपाययोजनेकडे वळत आहेत. यासंबंधी शासन काही प्रतिबंधात्मक उपायोजना करणार काय ? अशा प्रकाररची औषधे असल्याचा कोणी दावा करीत असतील तर अन्न व औषध प्रशासनाला सांगून ती औषधे उपयुक्त नसतील तर त्यावर बंदी आणणार काय ? कारण ते लोकांना मिसगाईड करीत आहेत. उपयुक्त असतील तर काही म्हणणे नाही.

श्री. सुरेश शेट्टी : आतापर्यंत भारतात एच1एन1ची लस उपलब्ध आहे असे मला माहीत नाही. परंतु त्या लसीच्या बाबतीत रिसर्च चालू आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, आयुर्वेदिकवाले असतील, होमियोपॅथीवाले असतील, ते दावा करतात. आयुर्वेदिकवाले आणि होमियोपॅथीवाले असाही दावा करतात की, आमच्याकडे एड्सवर ट्रिटमेंट आहे. परंतु कोठेही आमच्या नजरेस आले तर अन्न व औषध प्रशासनाच्या संबंधित कायद्यामध्ये या बाबीचा समावेश आहे आणि त्या कायद्याच्या अंतर्गत त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

श्री. अरुण गुजराथी : सभापती महोदय, प्रिव्हेंशन इज बेटर दॅन क्युअर हे लक्षात घेऊन शासनाला ही लस या ठिकाणी तयार करता येत नसेल तर आणि जगामध्ये कोठेही उपलब्ध असेल तर ती या ठिकाणी आणता येईल काय ? कारण अजूनही प्रत्येक गावामध्ये कमी जास्त प्रमाणात स्वाईन फ्ल्यूचे रुग्ण आढळून येतात. यासंबंधात शासन नेमकी आणि निश्चित काय कार्यवाही करणार आहे ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 936 ....

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, जगामध्ये कोठेही ही लस तयार झाली की, ती भारतामध्ये आयात करु याची खात्री मी सभागृहाला देऊ शकतो.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी जो प्रश्न विचारला होता त्यासंदर्भात आम्हाला पुरेसे उत्तर मिळालेले नाही. स्वाईन फ्ल्यूची लस कोठेही तयार झाली तर ती या ठिकाणी कशा पध्दतीने वितरित करणार हा एक भाग झाला. परंतु स्वाईन फ्ल्यू अमुक अमुक गोष्टीने बरा होतो अशा प्रकारची वर्तमानपत्रात येणारी अर्धा-अर्धा पान, एक एक पान जाहिरात पाहिली तर असा क्लेम करणारे जे असतात...

यानंतर श्री. खंदारे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.936... डॉ.नीलम गोऱ्हे...

त्यासंदर्भात आयुर्वेदिक आणि होमिओपॅथीचा उल्लेख केलेला आहे. आयुर्वेदिक किंवा होमिओपॅथीमुळे हा आजार बरा होतो काय आणि होत नसेल ही वस्तुस्थिती असेल तर या जाहिरातींवर शासन ताबडतोब बंदी आणणार काय, जेणे करुन ग्राहकांची दिशाभूल होणार नाही.

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, मी अगोदरच सांगितल्याप्रमाणे अशी बाब सरकारच्या निदर्शनास आली तर ड्रग ॲण्ड मॅजिक रेमेडीज ऑब्जेक्शनेबल ॲडर्व्हटाईजमेंट ॲक्ट, 1954 अंतर्गत त्यांच्यावर कारवाई केली जाईल.

श्री.अरविंद सावंत : आयुर्वेदिक किंवा होमिओपॅथी या दोन पॅथी शासन मान्य करते की नाही ? त्यांच्याकडे उपलब्ध असलेली औषधे शासनाने तपासून पाहिली पाहिजेत. शासन ती तपासून पाहणार आहे किंवा नाही आणि त्याचा अहवाल सभागृहाला केव्हा दिला जाईल ?

श्री.सुरेश शेट्टी : आतापर्यंत आयुर्वेदिक व होमिओपॅथीवाले क्लेम करतात की, त्यांच्याकडे लाईन ऑफ ट्रिटमेंट आहे. परंतु ते क्लिनीकली प्रूव्ह झालेले नाही. म्हणून ते जे औषधोपचार करतात ते ठीक आहेत किंवा नाही हे क्लिनीकली प्रूव्ह झाले तरच मी त्याबाबत सांगू शकेन.

ॲड.अनिल परब : ड्रग ॲण्ड मॅजिक रेमेडीज ऑब्जेक्शनेबल ॲडर्व्हटाईजमेंट ॲक्ट, 1954 अंतर्गत अशा लोकांवर शासन कारवाई करु शकते असे आताच मंत्रिमहोदयांनी उत्तर दिले आहे. त्यानुसार बोगस जाहिराती देणाऱ्या किती लोकांवर सरकारने आतापर्यंत कारवाई केली आहे ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, अन्न व औषधे प्रशासन हा विषय माझ्याकडे नाही. परंतु मी संबंधित विभागाकडून माहिती घेऊन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ KTG/

अल्पसूचना प्रश्न क्रमांक 2540

सभापती : माझ्याकडून अनावधाने अल्पसूचना प्रश्न पुकारण्याचे राहून गेले आहे. आता मी अल्पसूचना प्रश्न क्रमांक 2540 चर्चेला घेतो.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, अल्पसूचना प्रश्न क्रमांक 2540.

(सभागृहात कोणीही मंत्री महोदय उत्तर देण्यासाठी उभे रहात नाहीत.)

सभापती : मी हा अल्पसूचना प्रश्न राखून ठेवत आहे.

3....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ KTG/

गेवराई तालुक्यात (जि.बीड) वीज भारनियमनामुळे नागरिक त्रस्त असल्याप्रकरणी करावयाची उपाययोजना

(3) * 416 श्रीमती उषाताई दराडे : सन्माननीय **ऊर्जा (अपारंपारिक ऊर्जा वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) गेवराई तालुक्यात (जि.बीड) माहे ऑक्टोबर, 2009 च्या तिसऱ्या आठवड्यात विजेचा भारनियमन कालावधी वाढविल्यामुळे नागरीक त्रस्त झाले असून शेतीला भारनियमनामुळे पाणी न दिल्यामुळे शेतातील पिकांचे नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उक्त प्रकरणी सदर तालुक्यातील ग्रामस्थांनी आंदोलन करण्याचा इशारा दिनांक 31 ऑक्टोबर, 2009 रोजी दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(4) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार वीज पुरवठा नियमित सुरु करणेबाबत कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(5) अद्याप कोणतीच उपाययोजना केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अजित पवार : (1) हे खरे नाही. मौ.गंगावाडी, ता.गेवराई येथील 100 केव्हिए रोहित्र दि.26/10/09 रोजी नादुरुस्त झाल्यामुळे दि.26 ते 30 ऑक्टोबर, 2009 दरम्यान मौ.गंगावाडी ता.गेवराई येथील विद्युत पुरवठा खंडीत झालेला होता.

(2) हे अंशत: खरे आहे, ग्रामस्थांनी दि.30.10.09 रोजीच्या निवेदनाद्वारे आंदोलनाचा इशारा दिला होता.

(3) महावितरण कंपनी तर्फे चौकशी करण्यात आली आहे.

(4) मौ.गंगावाडी येथील नादुरुस्त झालेल्या रोहित्राच्या जागी नविन रोहित्र दि.30.10.09 रोजी बसविण्यात आले, परंतु उच्च दाब वाहिनीमध्येही बिघाड झाल्याचे निदर्शनास आल्यानंतर आवश्यक दुरुस्ती करुन त्याच दिवशी विद्युत पुरवठा सुरळीत करण्यात आला.

(5) प्रश्न उद्भवत नाही.

ॲड.उषा दराडे : सभापती महोदय, शासनाच्या लेखी उत्तरामुळे माझे समाधान झाले आहे.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, हा प्रश्न शेतकऱ्यांच्यादृष्टीने अतिशय महत्वाचा आहे. सध्या राज्यात सर्वत्र लोडशेडिंग सुरु आहे. पण शेतक-यांची किमान अपेक्षा असते की, लोडशेडिंगचा कालावधी वगळून ज्या वेळेत वीज देण्याचे ठरविलेले असते त्या वेळेत तरी भरपूर प्रमाणात वीज मिळाली पाहिजे. सध्या शेती पंपाला वीज मिळते पण विजेच्या कनेक्शन्सची संख्या जास्त वाढल्यामुळे आवश्यक तेवढी वीज मिळत नाही. प्रत्येक गावातील विद्युत पंपाच्या संख्येनुसार त्याला लागणारी वीज आणि त्यामुळे निर्माण होणारे लोडशेडिंग या सर्वाचा आढावा घेऊन आवश्यक तेवढया डी.पीं.ची संख्या वाढविण्याची आवश्यकता आहे. जेणे करुन शेतक-यांना 4-5 तास वीज मिळते ती तरी योग्य प्रमाणात मिळेल. यासाठी शासन बृहत आराखडा तयार करणार आहे काय ?

यानंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तसेच आवश्यक असणा-या डी.पी.उभ्या करणार आहात काय ? राज्य भारनियमनमुक्त कधी होणार आहे ? माझा शेवटचा प्रश्न असा आहे की, सरकाने यापूर्वी काही शहरे भारनियमनमुक्त केलेली आहेत. अशा पध्दतीने आणखी किती शहरे भारनियमनमुक्त करण्याचे शासनाने ठरविलेले आहे ?

श्री. विजय वडेट्टीवार : सन्माननीय सदस्यांनी वेगळा प्रश्न विचारलेला आहे. तरीही मी सांगू इच्छितो की, 2012मध्ये राज्य भारनियमनमुक्त करण्याचे धोरण ठरलेले आहे आणि त्यादृष्टीने आमची तयारी आहे. कृषिवापरासाठी जेथे जेथे ट्रान्सफॉर्मरची आवश्यकता असेल तेथे तेथे ते उपलब्ध करुन देण्यात येतील. जेथे भारनियमन आहे आणि जेथे ट्रान्सफॉर्मरची मागणी आहे त्यासंबंधीचा बृहतआराखडा लवकरच तयार करण्यात येत आहे. महानगरपालिकांमध्ये भारनियमन नाही. टप्प्याटप्प्याने शहरे भारनियमनमुक्त करण्याचे ठरविलेले आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

औरंगाबाद येथील शासकीय वैद्यकीय रुग्णालयातील
कर्करोग रुग्णांना द्यावयाचे अनुदान

(४) * २१९८ श्री. किसनचंद तनवाणी : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाकडून जीवनदायी योजनेच्या माध्यमातुन दारिद्ररेषेखालील कर्करोग रुग्णांना औषधे घेण्यासाठी अनुदान देण्याची योजना राबविली जात असताना औरंगाबाद येथील शासकीय वैद्यकीय रुग्णालय (घाटी) येथे उपचार घेणारे हजारो रुग्ण गेल्या अनेक महिन्यांपासून अनुदानापासुन वंचित असल्याचे दिनांक ७ नोव्हेंबर, २००९ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकारणाची शासनाकडून दखल घेण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाकडून काय कार्यवाही करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत?

श्री.सुरेश शेट्टी : (१), (२), (३) व (४) अंशत: खरे आहे.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, घाटी, औरंगाबाद येथे एप्रिल, २००९ ते ऑक्टोबर, २००९ या कालावधी जिवनदायी योजने अंतर्गत ३६५ कर्करोग रुग्णाचे प्रस्ताव मंजुर केले असून ३४९ शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत. १६ शस्त्रक्रिया अद्याप व्हायच्या असून त्यासुध्दा करण्यात येणार आहेत.

श्री. किसनचंद तनवाणी : दारिद्र्य रेषेखालील गरीब कर्करोग रुग्णांवर औषधोपचार आणि शस्त्रक्रिया करण्याच्या संदर्भात जीवनदायी योजना राबविली जाते. संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयाला मागील एक वर्षापासून या योजनेचे 5 कोटी 10 लाख रुपये अनुदान देण्यात आलेले नाही. त्यामुळे औषध पुरवठादाराने औषधे पुरविण्याचे बंद केलेले आहे. तेव्हा हे थकलेले अनुदान लवकरात लवकर केव्हा देण्यात येईल ?

श्री. सुरेश शेट्टी : औरंगाबाद येथील घाटी रुग्णालयाला द्यावयाची रक्कम थकीत होती. ही रक्कम आता रिलिज करण्यात आलेली आहे. पैसे रिलिज न झाल्याने औषध पुरवठा आणि शस्त्रक्रिया बंद केलेल्या नव्हत्या.

डॉ. दीपक सावंत : सन्माननीय सदस्य श्री. किचनचंद तनवाणी यांनी सांगितल्याप्रमाणे घाटी रुग्णालयाचे 5 कोटी 10 लाख रुपये थकीत आहेत, हे खरे आहे काय ? तसेच टेम्पररी स्टॉपगॅप ॲरेंजमेण्ट म्हणून औषधे खरेदी केली जात होती हेही खरे आहे काय ?

श्री. सुरेश शेट्टी : जीवनदायी योजनेमध्ये यावर्षी अपेक्षेपेक्ष खूप जास्त रुग्णांवर उपचार करण्यात आले. प्रत्येक शाळांतील विद्यार्थ्यांच्या तपासणीची मोहीम होती घेऊन हृदय विकार,

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

किडनी विकार असे गंभीर आजार असलेल्या विद्यार्थ्यांवर शस्त्रक्रिया करण्यात आल्या. या शस्त्रक्रियावर या वर्षी खूप जास्त खर्च झाला. अर्थसंकल्पीय तरतूद नसल्यामुळे काही ठिकाणची बिले प्रलंबित राहिली. या प्रश्नासंबंधी विधानसभेमध्ये देखील चर्चा झालेली असून या योजनेसंदर्भात चर्चा करण्यासाठी त्या त्या विभागातील विधानसभा आणि विधानपरिषदेच्या सन्माननीय सदस्यांबरोबर चर्चा करण्याचे मी ठरविलेले आहे. 13 जानेवारी 2010 रोजी दुपारी 1.00 वाजता कोकण विभागातील आमदारांसमवेत आणि दुपारी 2.00 वाजता नाशिक विभागातील आमदारांसमवेत बैठक आयोजित केलेली आहे. तसेच दिनांक 14 जानेवारी 2010 रोजी दुपारी 1.00 वाजता औरंगाबाद विभागातील आमदरांसमवेत आणि दुपारी 2.00 वाजता पुणे विभागातील आमदरांसमवेत बैठक आयोजित केलेली आहे. त्याचप्रमाणे 15 जानेवारी 2010 रोजी दुपारी 1.00 वाजता नागपूर विभागातील आमदारांसमवेत आणि दुपारी 2.00 वाजता अमरावती विभागातील आमदरांसमवेत बैठक आयोजित करण्यात आलेली आहे. सर्व आमदारांसमवेत या योजनेसंबंधी चर्चा करुन एक नवीन योजना महाराष्ट्रातील लोकांसमोर आपण आणणार आहोत.

ॲड. अनिल परब : अर्थसंकल्पीय तरतूद नसल्यामुळे काही बिले प्रलंबित राहिली म्हणून रुग्णालयातून औषधोपचार आणि शस्त्रक्रिया थांबलेल्या नव्हत्या असे मंत्री महोदयांनी सांगितले. परंतु औषधोपचार आणि शस्त्रक्रिया करण्याचे ज्या ज्या रुग्णालयांनी नाकारलेले आहे त्यांची यादी मी मंत्री महोदयांना दिली तर त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल काय ?

श्री. सुरेश शेट्टी : होय.

...नंतर श्री.पां. खर्चे..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.2198.....

श्री. अरविंद सावंत : महोदय, संभाजीनगरमध्ये कॅन्सरसाठी एक स्पेशल हॉस्पिटल शासनाने तयार केले आहे काय ? असल्यास त्या हॉस्पिटलचे उद्घाटन केव्हा होणार ? तसेच या हॉस्पिटलसाठी आजपर्यंत डॉक्टर्स, नर्स वगैरे दिलेच नाहीत हेही खरे आहे काय ?

श्री. सुरेश शेट्टी : महोदय, औरगाबादमध्ये अशा प्रकारच्या हॉस्पिटलचे काम चालू आहे. एक वर्षापूर्वी त्याचे भूमी पुजन झाले. इमारत तयार झाल्यानंतर डॉक्टर्स, नर्स आणि औषधे देण्याची व्यवस्था करण्यात येईल.

श्री. अरविंद सावत : महोदय, माननीय मंत्री महोदय सभागृहाला असत्य माहिती देत आहेत. कारण या हॉस्पिटलचे उद्घाटन सुध्दा झालेले आहे.

सभापती : मला वाटते माननीय मंत्री महोदयांनी सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत आणि श्री. अरविंद सावंत यांच्याशी दालनात चर्चा करावी व त्यांची शंका दूर करावी.

श्री. दिवाकर रावते : महोदय, अशा प्रकारे उद्घाटन झाले असेल तर माननीय मंत्री महोदयांना ती माहिती पाहिजे. त्यांनी जी माहिती येथे दिली ती रेकॉर्डवर असेलच. अशा प्रकारे जर असत्य माहिती दिली असे दिसून आले तर आम्हाला माननीय मंत्री महोदयांच्या विरुध्द हक्कभंग आणण्याची परवानगी आपण द्यावी, अशी आमची विनंती आहे.

सभापती : सन्माननीय सदस्य आणि मंत्री महोदयांनी आपसात चर्चा करावी आणि त्याची माहिती मंत्री महोदयांनी सभागृहाच्या पटलावर ठेवावी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पुरंदर (जि.पुणे) तालुक्यात कांदा पिकावर पिळ्या रोगाचा झालेला प्रादुर्भाव

(5) *2184 श्री.मोहन जोशी, श्री. संजय दत्त, श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील, श्री. चरणसिंग सप्रा, श्री.राजन तेली, श्री.जैनुद्दीन जव्हेरी : सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) पुरंदर (जि.पुणे) तालुक्यात सुमारे 300 हेक्टर क्षेत्रात लावण्यात आलेल्या कांदा पिकावर पिळ्या रोगाचा प्रादुर्भाव झाल्यामुळे अनेक शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले असल्याचे माहे ऑक्टोबर, 2009 मध्ये वा त्या दरम्यान आढळून आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(3) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रणजित कांबळे.....डॉ.विजयकुमार गावित यांच्याकरिता : (1) होय.

(2) शासनाचे स्थायी आदेश 1983 प्रमाणे पिकावरील किड व रोगाचा प्रादुर्भाव ही बाब नैसर्गिक आपत्तीमध्ये येत नाही. यामुळे नुकसान भरपाई देय होत नाही. तथापि किड व रोग संरक्षणासाठी बुरशी नाशकाचा व किटक नाशकाचा 50 टक्के अनुदानावर बाधित शेतकऱ्यांना जिल्हापरिषद, मार्फत पुरवठा करण्यात आलेला आहे.

(3) वेळीच कार्यवाही झालेली असल्याने विलंबाचा प्रश्नच उद्भवत नाही.

श्री. मोहन जोशी : सभापती महोदय, 300 हेक्टरच्या वर कांद्याच्या पिकाची नासाडी झालेली आहे. तसेच पिकावर कीडीचा प्रादुर्भाव झाल्याने नुकसान झालेले आहे. हे जाणीवपूर्वक कोणी केले नसल्याने नैसर्गिक आपत्ती म्हणून या किची जी नुकसानी झाली त्याची नुकसान भरपाई शेतकऱ्यांना देण्याची अत्यंत गरज आहे. ती भरपाई शासन कधी देणार आहे ? तसेच उत्तरामध्ये सांगितले की, बुरशी नाशकाचा व कीटक नाशकाचा 50 टक्के अनुदानावर बाधित शेतकऱ्यांना जिल्हा परिषदेमार्फत पुरवठा करण्यात आलेला आहे. हा पुरवठा आजपर्यंत किती शेतकऱ्यांना करण्यात आला व तो कधी करण्यात आला आहे ?

श्री. रणजित कांबळे : महोदय, कीडीमुळे जे नुकसान झाले ते नैसर्गिक आपत्तीखाली येत नसल्याने त्याला अनुदान देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. तसेच दुसऱ्या प्रश्नाबाबत मी सांगू इच्छितो की, ज्या 5 ग्रामपंचायतीतील 1307 शेतकऱ्यांचे नुकसान झाले होते त्या संपूर्ण कास्तकारांना पेस्टीसाईड्स दिलेले होते. त्याचबरोबर सविस्तर सांगायचे झाल्यास एम-45, कार्बनडाईन 150 किलो, 200 हेक्टरसाठी, एन्डोसल्फान आणि पॅरोथाईट 10 किलो अशा प्रकारे वेगवेगळी किटकनाशके दिली होती. हा रोग ऑक्टोबरअखेर आला होता आणि औषधांचे वाटप सुध्दा ऑक्टोबरच्या दरम्यानच करण्यात आलेले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.2184.....

डॉ. वसंत पवार : महोदय, माननीय मंत्री महोदयांनी कांदा हे पीक फळ पीक की कंद यापैकी कोणत्या वर्गात मोडते याची माहिती सभागृहाला द्यावी.

डॉ. विजयकुमार गावित : महोदय, कांदा हे पीक कंद या प्रकारात मोडते.

यानंतर श्री जुन्नरे ....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नागपूर येथे इतर जिल्ह्यातुन येणाऱ्या दुधात होत असलेली भेसळ

(६) * २१३६ श्री.राजन तेली , श्रीमती अलका देसाई , प्रा.सुरेश नवले , श्री.जैनुद्दीन जव्हेरी : सन्माननीय **अन्न व औषधे प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यातील सीमावर्ती भागातील अनुक्रमे नागपूर, गोंदिया, चंद्रपूर, भंडारा, अमरावती, वर्धा इत्यादी भागातून येणाऱ्या दुधात नागपूर इतवारा रेल्वे स्टेशनसमोरील शिवमंदिराच्या परिसरात मोठ्या प्रमाणात दुधाच्या किटल्यांमध्ये सुलभ शौचालयाचे पाणी घेऊन पांढरी भुकटी भेसळयुक्त दुधाची पाकिटे तयार करीत असल्याचे दिनांक २२ जुलै, २००९ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे साथीच्या रोगामध्ये वाढ होऊन सार्वजनिक आरोग्य धोक्यात आल्याचे अनुमान काढण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दुधात भेसळ करणाऱ्या व्यक्तींवर प्रतिबंधात्मक कारवाई होण्यासाठी शासनाने कोणती ठोस उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच अशा प्रकारच्या घटना पुन्हा घडू नये म्हणून आणि दुधात भेसळ करणाऱ्यांमध्ये वाढ होऊ नये यासाठी कोणती प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रमेश बागवे,श्री.मनोहर नाईक यांचे करिता : (१) नाही.

(२) नाही.

(३) दि.२२ जुलै, २००९ रोजी दैनिक वृत्तपत्र लोकमतमध्ये प्रसिध्द झालेल्या बातमीच्या अनुषंगे तात्काळ, महानगरपालिका, नागपूर यांची मदत घेऊन दूध विक्रेत्याविरुध्द धाड टाकण्यात आली व गाईच्या दूधाचा व म्हशीच्या दूधाचे असे दोन नमुने घेण्यात आले. सदर दोन्ही नमुने अप्रमाणित दर्जाचे घोषित झालेले आहेत गाईचे दूध मानदापेक्षा कमी फरकाने नापास आढळून आल्याने दूध विक्रेत्यावर प्रशासकीय कारवाई घेण्यात येत आहे व म्हशीचे दूध बऱ्याच फरकाने नापास झाल्याने संबंधिताविरुध्द खटला दाखल करण्यात येत आहे.

(४) दुधाचे नमुने घेण्याची मोहिम राबविण्यात येते व सर्व स्तरावर नियमितपणे दुधाचे नमुने घेण्यात येतात व अन्न भेसळ प्रतिबंधक कायद्यानुसार योग्य ती कार्यवाही घेण्यात येतात.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. राजन तेली : सभापती महोदय, महाराष्ट्रात मोठया प्रमाणात दुधात भेसळ होत असते. या सभागृहात काल सुध्दा दुधाच्या भेसळीच्या संदर्भातील चर्चा झालेली आहे. या संदर्भात माझा प्रश्न असा आहे की, नागपूर जिल्हयामध्ये नागपूर, गोंदिया, चंद्रपूर, भंडारा, अमरावती तसेच वर्धा भागातून मोठया प्रमाणात दूध येत असते. या ठिकाणी येणा-या दुध्ात नागपूर इतवारा रेल्वे स्टेशनासमोरील शिवमंदिराच्या परिसरात मोठ्या प्रमाणात दुधाच्या किटल्यांमध्ये सुलभ शौचालयाचे पाणी घालून त्यात पांढरी भुकटी वापरुन भेसळयुक्त दुधाची पाकिटे तयार करीत असल्याचे दिनांक

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली...

22 जुलै, 2009 वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे का, असा प्रश्न विचारण्यात आला होता परंतु या प्रश्नाला माननीय मंत्रीमहोदयांनी "नाही" असे उत्तर दिलेले आहे. तसेच तिस-या प्रश्नाच्या संदर्भात कोणती कारवाई करण्यात आलेली आहे, असा प्रश्न विचारण्यात आलेला आहे परंतु या प्रश्नाच्या संदर्भात माननीय मंत्रीमहोदयांनी सांगितले की, गाईचे दूध मानदापेक्षा कमी फरकाने नापास झाल्याचे आढळून आल्याने दूध विक्रत्यांवर प्रशासकीय कारवाई करण्यात येत आहे व म्हशीचे दूध ब-याच फरकाने नापास झाल्याने संबंधितांविरुध्द खटला दाखल करण्यात येत आहे, अशी माहिती दिलेली आहे. त्यामुळे दूध भेसळीच्या प्रकरणात आपण प्रशासकीय कारवाई नेमकी काय केलेली आहे ? तसेच म्हशीच्या दुधात फरक जाणवल्याने आपण संबंधितांविरुध्द कोणते गुन्हे दाखल केले आहेत तसेच जे दोषी आहेत त्यांच्या विरुध्द कोणत्या कलमान्वये कारवाई करण्यात आलेली आहे ?

श्री. रमेश बागवे : सभापती महोदय, दोन दूध विक्रेत्यांवर कारवाई करण्यात आलेली असून ज्यांच्या गाईच्या दुधात भेसळ आढळून आलेली आहे त्यांचे परवाने रद्द करण्याची कारवाई करण्यात येत आहे. तसेच सन्माननीय सदस्यांच्या दुस-या प्रश्नाच्या संदर्भात मी असे सांगू इच्छितो की, संबंधिताविरुध्द खटले दाखल करुन अन्न व भेसळ प्रतिबंधात्मक 1954 च्या कायद्यानुसार कारवाई करण्यात येत आहे.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, जुलै महिन्यापासून किती नमुने तपासण्यात आलेले आहेत व तपासलेल्या नमुन्यात किती नमुन्यांमध्ये भेसळ आढळून आली व ज्यांच्या दुधात भेसळ आढळून आली अशा किती लोकांवर कारवाई करण्यात आलेली आहे याची माहिती माननीय मंत्रीमहोदय देऊ शकतील काय ?

श्री. रमेश बागवे : सभापती महोदय, नागपूर जिल्हयामध्ये 79दुधाचे नमुने तपासण्यात आले असून त्यापैकी 57 नमुने प्रमाणित आढळून आले, 20 नमुने अप्रमाणित आढळून आले असून दोन प्रकरणाचा अहवाल प्रलंबित असून 10 प्रकरणे न्यायालयात प्रलंबित आहे, 8 प्रकरणात प्रशासकीय कारवाई सुरु आहे आणि दोन प्रकरणात कारवाई प्रलंबित आहे.

श्री. सुरेश नवले : सभापती महोदय, गायीच्या आणि म्हशीच्या दुधाचे मानद काय आहे ?

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश बागवे : सभापती महोदय, गाईच्या दुधामध्ये कमीतकमी 3.5 टक्के फॅट असणे आवश्यक आहे व एसएनएफ 8.5 टक्के असणे आवश्यक आहे. गाईच्या दुधाच्या तपासणीत फॅटचे प्रमाण 4.4 टक्के आढळून आले तर एस.एन.एफ.चे प्रमाण 7.72 टक्के आढळून आलेले आहे.

डॉ.एन.पी.हिरानी : सभापती महोदय, प्रश्नोत्तराच्या यादीतील प्रश्न क्रमांक तीनच्या उत्तरात म्हटले आहे की, "दैनिक वृत्तपत्र लोकमत मध्ये प्रसिध्द झालेल्या बातमीच्या अनुषंगाने कारवाई करण्यात आलेली आहे." याचा अर्थ वर्तमानपत्रात बातमी आल्यानंतर कारवाई झालेली आहे. परंतु दुधाची रेग्युलर तपासणी करुन कारवाई किंवा छापे विभागामार्फत मारले जातात काय ? ज्या भागात दुधात भेसळ झाली आहे, अशी बातमी आली, त्या ठिकाणच्या परिसरात कशा प्रकारे दूध मिळते याची माहिती विभागाला नव्हती काय? तसेच ज्या ठिकाणचा उल्लेख वर्तमान पत्रात करण्यात आला होता त्या ठिकाणी छापे मारुन दुधात भेसळ करणा-यांना का पकडण्यात आले नाही ?

यानंतर श्री. गायकवाड...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र 2136..

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय,खात्या मार्फत वेळोवेळी छापे टाकण्यात येत असतात एखाद्या ठिकाणी दुधामध्ये भेसळ होत आहे अशा प्रकारची माहिती मिळाल्यानंतर राज्यामध्ये अनेक ठिकाणी धाडी टाकण्यात येतात. 2005-2006 साली एकूण 374 दुधाचे नमुने घेण्यात आले होते होते त्यापैकी 246 प्रमाणित होते आणि 128 अप्रमाणित होते. 61 व्यक्तीविरुध्द खटले दाखल करण्यात आले होते, 67 व्यक्तीविरुध्द प्रशासकीय कारवाई करण्यात आली होती. 2006-2007 आणि 2007-2008मध्ये एकूण 730 नमुने गोळा करण्यात आले होते त्यापैकी 571 नमुने प्रमाणित होते आणि 159 अप्रमाणित होते ,90 व्यक्तीविरुध्द खटले दाखल करण्यात आले,69 व्यक्तीविरुध्द प्रशासकीय कारवाई करण्यात आली होती अशा प्रकारे संपूर्ण राज्यात एकूण 2 हजार 476 नमूने घेतले होते त्यापैकी 1 हजार 856 नमुने प्रमाणित होते आणि 620 अप्रमाणित होते,369 व्यक्तिविरुध्द कारवाई करण्यात आली होती, 291 व्यक्तीविरुध्द प्रशासकीय कारवाई करण्यात आली होती अशा प्रकारे खात्यामार्फत नेहमीच कारवाई करण्यात येत असते

श्री अरुण गुजराथी : सभापती महोदय ,दुधाच्या भेसळीसंबंधी सभागृहात नियम 260 अन्वये प्रस्ताव मांडण्यात आला होता व त्यावर चर्चा झाली होती दुधातील भेसळ थांबविण्याच्या बाबतीत शासनाला अजूनही यश आलेले नाही ही वस्तुस्थिती आहे. माननीय मंत्री महोदयांनी आकडेवारी दिली आहे परंतु सध्या जो कायदा अस्तित्वात आहे त्यामुळे दुधातील भेसळ थांबत नाही.तेव्हा शासन हा कायदा बदलून कठोर कायदा करणार आहे काय , ? दुधाच्या भेसळीसंबंधीच्या केसेस च्या त्वरित निर्णय लागावा या दृष्टीने वेगळे न्यायालय स्थापन करण्याच्या दृष्टीने शासन कोणती कार्यवाही करणार आहे ?

श्री.रमेश बागवे : दुधासारख्या अत्यावश्यक पदार्थामध्ये भेसळ केल्यामुळे लहान मुले आणि अनेक नागरिकांच्या जीविताला धोका निर्माण होत असल्यामुळे शासान यासबंधी अत्यंत गंभीर आहे म्हणून सध्याचा कायदा बदलून एमपीडीए किंवा मोक्का सारखा कायदा करता येतो काय यासबंधी तपासणी करण्याचा शासन जरुर विचार करणार आहे.

श्री.मुझफफर हुसेन : माननीय मंत्रिमहोदयांनी असे सागितले की ,दुधात भेसळ करणा-याविरुध्द प्रशासकीय कारवाई करण्यात आलेली आहे. ज्यांनी दुधात भेसळ केली आहे त्यांच्याविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल केला आहे काय आणि त्यांच्या विरुध्द कोणती कलमे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लावण्यात आलेली आहेत ? ब-याचदा भेसळ करणा-यांना पकडले जाते परंतु त्याच दिवशी त्याना जामीन दिला जातो.

श्री.रमेश बागवे : अन्न भेसळ प्रतिबंधक कायद्यानुसार कारवाई केली तर संबंधितावर जरब बसत नाही म्हणून या कायद्यातील कलम 20 मध्ये सुधारणा करण्यात आली आहे. ज्यांनी दुधात भेसळ केलेली आहे त्याच्या विरुध्द अदखलपात्र आणि अजामीनपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे

डॉ.नीलम गोऱ्हे : दुधात भेसळ केली म्हणून आतापर्यंत एखाद्या व्यक्तीला तरी शिक्षा झाली आहे काय ?

श्री.रमेश बागवे : मी आकडेवारी सांगितली आहे. प्रचलित कायद्यानुसार संबंधिताविरुध्द कारवाई केली जाते परंतु जरब बसविण्यासाठी कायद्यात बदल करावा लागेल.. याबाबतीत सरकारने गंभीर दखल घेतली असून दुधात भेसळ करणा-याला बिना वॉरंट अटक करण्याचे अधिकार पोलीस निरीक्षकाला दिलेले आहेत.गुन्हेगाराविरुध्द कडक निर्बंध घालण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे.

सभापती : दुधात भेसळ करण्यात येत असून ही बाब अत्यंत गंभीर स्वरुपाची आहे त्या दृष्टीने शासन प्रयत्न करीत आहे परंतु कडक कायदा केल्याशिवाय हे प्रकार थांबणार नाहीत.

श्री.अजित पवार :सभापती महोदय, येत्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये यासंबधीचे विधेयक आणले जाईल.

नंतर श्री.सुंबरे

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, ज्यावेळेस या विभागाचे सन्माननीय श्री.बाबा सिद्दीकी हे राज्यमंत्री होते तेव्हा चार वर्षापूर्वी मी या विषयावर अशासकीय विधेयक आणले होते...

सभापती : मी सन्माननीय सभासदांना सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण हे या सदनात 31 डिसेंबर पर्यंत आहेत आणि आपले हे अधिवेशन उद्या संपत आहे. त्यामुळे आज त्यांना येथे मी प्रश्न विचारण्याची संधी दिली आहे.

श्री. मुधकर चव्हाण : सभापती महोदय, त्यावेळेस राज्यमंत्र्यांनी दिलेले उत्तर आपल्या सभागृहाच्या मिनिटस्मध्ये आहे. त्यावेळी त्यांनी सांगितले होते की, दूध भेसळ करणाऱ्याला कठोर शिक्षा करणारा कायदा केल्यास तो राष्ट्रपतींच्या मान्यतेसाठी पाठवावा लागेल आणि त्या दृष्टीने त्वरित पुढील अधिवेशनातच आम्ही असा कायदा आणून. दुधातील भेसळीमध्ये कोणाचा मृत्यू इ ाल्यास अशा गुन्ह्यामध्ये आरोपीला मृत्यूदंड देणारा कायदा देखील आपल्याला करता येईल. तेव्हा आता तरी पुढील अधिवेशनामध्ये या गंभीर विषयावर कायदा सरकारकडून आणला जाईल का ?

श्री.अजित पवार : सभापती महोदय, आता येथे सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे तोही तेवढाच वस्तुस्थितीला धरून आहे. माझी आपणा सर्वांना विनंती राहील की, जरूर अशा विधेयकावर माननीय राष्ट्रपतींची मान्यतेची सही असावी लागते. परंतु एकंदरीत राज्यात दुधासंबंधात ज्या तक्रारी येत आहेत आणि एकंदर घडलेल्या घटना पाहता आम्ही ताबडतोब आता कामाला लागू आणि मुंबईच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये या सगळ्या गोष्टींचा विचार करून त्यादृष्टीने विधेयक आणले जाईल. शक्य झाल्यास यासाठी अध्यादेश काढू आणि नंतर त्याचे विधेयकात रूपांतर करू.

***

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नवी मुंबईतील घणसोली खाडीत दूषित पाण्यामुळे हजारो मासे मृत झाल्याची घटना प्रकरणी करावयाची कारवाई

(7) * 842 श्री. मधुकर चव्हाण, श्री. विनोद तावडे, श्री. संजय केळकर : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) नवी मुंबई येथील घणसोली खाडीत दूषित सांडपाण्यामुळे हजारो मासे मृत झाले, तसेच लाकडी फर्निचरसाठी वापरण्यांत येणाऱ्या टाकाऊ रसायनांचा ट्रकभर साठा माहे ऑगस्ट, 2009 च्या पहिल्या आठवड्यात खारफुटीत आढळून आला, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(3) असल्यास, चौकशीनुसार रसायनांचा साठा खाडीत फेकणाऱ्या कंपन्यांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,
(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सचिन अहिर, श्री.सुरेश शेट्टी यांच्याकरिता : (1) दि.23.07.2009 रोजी मासे मृत झाले असल्याचे आढळून आले. लाकडी फर्निचरसाठी वापरण्यात येणाऱ्या ऍडजीव रंगाचे वापरलेले डबे, सनमायका शिट्सचे तुकडे व लाकडाचे तुकडे ऑगस्ट, 2009 च्या पहिल्या आठवड्यात खाडी परिसरात टाकलेले आढळून आले.
(2) होय, मृत मत्स्यांचे नमुने घेऊन न्यायवैद्यक प्रयोगशाळेकडे तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. प्रयोगशाळेच्या अहवालावरुन मास्यांचा मृत्यू कोणत्याही विषबाधेमुळे झालेला नसल्याचे स्पष्ट झाले आहे.
(3) खाडीमध्ये केमिकल मिश्रित पाणी सोडले जात नसल्यामुळे कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(4) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, या लेखी उत्तरात माननीय मंत्री महोदयांना काही बदल करावयाचा आहे काय ?

श्री. सचिव अहिर : नाही.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, या ठिकाणी पहिल्या प्रश्नाला उत्तर देताना माननीय मंत्री महोदयांनी म्हटले आहे की, लाकडी फर्निचरसाठी वापरण्यात येणाऱ्या ऍडजीव रंगाचे वापरलेले डबे वगैरे खाडी परिसरात टाकलेले आढळून आले आहे. आणि 3ऱ्या प्रश्नाला उत्तर देताना म्हटले आहे की, खाडीमध्ये केमिकल मिश्रित पाणी सोडले जात नसल्याने कारवाईचा प्रश्न उद्भवत नाही. सभापती महोदय, हे उत्तर पहिल्या प्रश्नाशी एकदम विसंगत असे आहे. त्याबद्दल आपला खुलासा काय आहे ?

..... इइ 3 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 842 ....

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, पहिल्या प्रश्नाच्या उत्तरात मी सांगितले आहे की, खाडी परिसरात लाकडी फर्निचरसाठी वापरण्यात येणाऱ्या रंगाचे वापरलेले डबे, सनमायका शिटस्चे तुकडे व लाकडाचे तुकडे टाकल्याचे आढळून आले आहे. आणि सन्माननीय सदस्यांच्या तिसऱ्या प्रश्नाला उत्तर देताना मी सांगितले आहे की, खाडीमध्ये केमिकलमिश्रित पाणी सोडले जात नसल्याने कारवाईचा प्रश्न येत नाही. याचा अर्थ खाडीमध्ये कोठल्याही कंपनीकडून केमिकल मिश्रित पाणी सोडले जात नाही.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, पाट्या कशा टाकायच्या याचे हे उत्तर म्हणजे एक उत्तम नमुना आहे. एका बाजूला आपण मान्य करता आहात की, खाडीमध्ये रंगाचे डबे आढळून आले. आता रंगाचे डबे म्हणजे त्यात रसायने आली हे सांगायला नको. आता रंगाचे डबे टाकले गेले म्हणजेच त्याद्वारा पाण्यात केमिकल गेले आहे आणि त्यामुळे मासे मेले आहेत. तेव्हा आपण त्या पाण्याचे नमुने घेतले आहेत का ? तेथील पाणी दूषित झाले होते की नाही ? ते दूषित झाले असेल तर ते पाणी दूषित करणाऱ्यांवर आपण आतापर्यंत काय कारवाई केली आहे ?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, या खाडीतील जे मासे मेले आहेत ते आपण फोरान्सिक लॅबमध्ये तपासणीसाठी पाठविले आहेत. बायो-एस्सेमध्ये 96 तास ही टेस्ट चालते तीही टेस्ट आपण केली आहे. त्यातून हे मासे विषबाधेमुळे मेले नाहीत असे सिद्ध झाले आहे. तेथे एकंदरीत हवपामानामध्ये किंवा जे डंपिंग केले जाते त्यामुळे त्या माशांना ऑक्सिजन मिळाला नसल्याने ते मासे मेले असण्याची एक शक्यता आहे. तसेच ही खाडी असल्याने हे पाणी दूषित आहे की नाही हा प्रश्न येत नाही. त्या ठिकाणी कोठल्याही कंपनीकडून केमिकलयुक्त पाणी सोडले जात नाही.

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, या ठिकाणी शासनाकडून चुकीचे उत्तर दिले गेले आहे. या खाडीतील मासे मेले आहेत आणि ते कशामुळे मेले तर केमिकल्समुळे मेले आहेत. प्रत्येक अधिवेशनामध्ये या घणसोली खाडीबाबत आम्ही प्रश्न मांडतो की, तेथील मासे अशा अशा प्रकारे मरताहेत. ...

(यानंतर श्री. सरफरे .... एफएफ 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 842...

श्रीमती मंदा म्हात्रे...

सभापती महोदय, 23.7.2009 रोजी मासे मृत झाले त्या दिवशी मोठया प्रमाणावर पाऊस पडत होता. तेथील केमिकल कंपन्या त्या खाडीमध्ये रासायनिक द्रव्ये सोडत असल्यामुळे हे मासे मृत्युमुखी पडतात. त्याकरिता मंत्रिमहोदयांनी प्रत्यक्ष दौरा करुन पहाणी करावी. केवळ फेव्हिकॉल किंवा लाकडाचे तुकडे टाकले जात नाहीत तर त्याठिकाणी इंजेक्शनच्या सुया देखील मोठया प्रमाणात टाकल्या जातात. मच्छिमारी करणाऱ्या लोकांच्या पायाला त्या सुया लागतात. तेथील किनारा ज्यावेळी स्वच्छ करण्यात आला त्यावेळी हे दृश्य पहावयास मिळाले. तेव्हा ज्या केमिकल कंपन्या खाडीमध्ये केमिकल सोडतात त्यांच्यावर आपण काय कारवाई करणार आहात?

श्री. सचिन अहिर : ज्या ज्यावेळी अशाप्रकारच्या तक्रारी करण्यात येतात त्यावेळी एमपीसीबी च्या माध्यमातून योग्य ती कारवाई केली जाते. माननीय सदस्यांनी विचारल्याप्रमाणे ही गोष्ट शासनाच्या नजरेमध्ये आली आहे. त्या खाडीमध्ये बायोवेस्ट टाकले जाऊ नये याकरिता महानगरपालिकेच्या माध्यमातून 160 मेडिकल एस्टॅब्लिशमेंटना नोटीस देण्याचे काम करण्यात आले आहे. तसेच, कॉमन मिनिमम प्रोग्रामच्या व्हिजिलन्समध्ये स्थानिक लोकांचा सहभाग घेऊन शासनाच्या माध्यमातून कारवाई सुरु आहे. त्यामुळे संबंधित कंपनीविरुध्द तक्रारी आढळून आल्या तर योग्य ती कारवाई केली जाईल.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, अनेक रासायनिक कंपन्यामधून नवी मुंबईमधील खाडी व नद्यांमध्ये मोठया प्रमाणावर केमिकल सोडून तेथील पाणी प्रदूषित केले जाते. त्या कंपन्यांना पाठीशी घालण्याचे काम हे प्रदूषण मंडळ करते. त्यामुळे त्या कंपन्यांना नोटीस देण्यापलिकडे काहीही कारवाई होत नाही. म्हणून माझा स्पेसिफिक प्रश्न असा की, एखाद्या कंपनीवर आपण कारवाई केल्यानंतर तिला स्थगिती आणली जाते. त्याठिकाणी केवळ पाण्याचे नाही तर हवेचे सुध्दा मोठया प्रमाणात प्रदूषण होत असते. त्यामध्ये माणसे सुध्दा मरतात. तेव्हा प्रश्न असा आहे की, याबाबत आपण किती कंपन्यांवर व अधिकाऱ्यांवर कारवाई केली आहे ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, माननीय सदस्यांचा प्रश्न सर्वसाधारण असून तो या प्रश्नाशी निगडीत नाही. परंतु याबाबतीत कारवाई करण्याचे प्रमाण मोठया प्रमाणात आहे. हे करीत असतांना अनेक कंपन्या बंद करण्याचे आदेश एमपीसीबीच्या माध्यमातून देण्यात आले आहेत. माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे अनेक वेळा नोटीस दिली जाते व पुन्हा ती विथड्रॉ केली जाते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/ SBT/

श्री.सचिन अहिर....

आणि म्हणून या अत्यावश्यक बाबीकडे अधिक लक्ष देण्यासाठी इंटरनेटवर नोटीस देण्याचा आपला मानस आहे. त्यामुळे एकदा इंटरनेटवर आपण नोटीस दिल्यानंतर ती विथड्रॉ कां केली? हे आपल्याला समजेल. त्याकरिता इंटरनेटवर नोटीस देण्याचा आपला निर्धार आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मघाशी पर्यावरण मंत्र्यांनी उत्तर देतांना सांगितले की, ती खाडी आहे. त्यामुळे ते पाणी दूषित असणारच. खाडी म्हणजे बॅकवॉटर आहे. केरळ राज्य हे केवळ बॅकवॉटर टूरिझमवर चालते. त्यामुळे खाडी दूषित आहे असे उत्तर ते कसे काय देऊ शकतात? आम्हाला माहीत आहे की, ते वरळीला रहातात. त्यामुळे ते खाडीचे पाणी असले तरी समुद्राचे बॅकवॉटर आहे ते कशामुळे दूषित झाले याची कारणे त्यांनी दिली पाहिजेत?

श्री. सचिन अहिर : सजेशन फॉर ॲक्शन.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/ SBT/

राज्यात आरोग्य विभागामार्फत सरकारी व पालिका रुग्णालयात राबविण्यात येणारी मातृत्व अनुदान योजना शहरी भागातही राबविण्याबाबतची कार्यवाही

(८) * २४७२ श्री. संजय पाटील , श्रीमती उषाताई दराडे , श्री.अरुण गुजराथी : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आरोग्य विभागामार्फत सरकारी व पालिका रुग्णालयात मातृत्व अनुदान योजना माहे जुलै, २००९ मध्ये जाहीर करुनही अलीकडेच माहे ऑक्टोबर, २००९ मध्ये सदर योजना एकाएकी बंद करण्यात आल्याची बाब दिनांक १२ ऑक्टोबर, २००९ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजना केवळ शहरी भागात नसून ग्रामीण भागात कार्यान्वित करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर योजनेअंतर्गत आजवर जिल्हा व तालुका निहाय तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांवर किती जणांना मातृत्व अनुदान योजनेचा लाभ देण्यात आला वा येत आहे,
(४) नसल्यास, सदर योजनेत पुन:निरीक्षण करण्याच्या दृष्टिने कोणता निर्णय घेण्याचे प्रस्तावित आहे ?

श्री.सुरेश शेट्टी : (१) अंशत: खरे आहे.
दिनांक १४ ऑक्टोबर, २००९ रोजी सदर योजना तूर्तास केवळ ग्रामीण भागात राबविण्यात यावी, अशा सूचना दिलेल्या आहेत.
(२) होय.
(३) महानगरपालिका कार्यक्षेत्रातील १६,२३७ लाभार्थी, तसेच ग्रामीण, नगर परिषद कार्यक्षेत्रातील १५,०५१ लाभार्थी अशा एकूण ३१,२८८ लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ देण्यात आलेला आहे.
(४) सदर योजनेचा आढावा घेऊन त्या आधारे पुढील निर्णय घेण्याचे प्रस्तावित आहे.

ॲड. उषा दराडे : सभापती महोदय, शासनाने उत्तरामध्ये महानगरपालिका रुग्णालये व शासकीय दवाखान्यांमध्ये जुलै व ऑगस्ट या दोन महिन्यांमध्ये मातृत्व अनुदान ही योजना राबवण्यात आली. महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रामध्ये 16,237 व ग्रामीण, नगर परिषद कार्यक्षेत्रामध्ये 15,051 महिलांनी योजनेचा लाभ घेतला. या योजनेमध्ये महिलांना 400 रुपये प्रसूती अनुदान देण्यात येते. इतकी चांगली योजना आपण दोन महिन्यात कां गुंडाळली? ती पूर्ववत सुरु करण्यात येईल काय? आणि त्यासाठी किती आर्थिक तरतूद करण्यात येईल?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, ही योजना सन 2008 मध्ये सुरु करण्यात आली. त्यामध्ये गर्भवती महिलांना इंस्टिटयुशनल डिलेव्हरी अवेरनेस क्रिएट करण्यासाठी आणि प्रमोट करण्यासाठी ही योजना राज्यामध्ये लागू केली आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.2472 . . . .

श्री.सुरेश शेट्टी . . . .

तेव्हा आपण ग्रामीण भागात आणि शहरी भागात ही योजना राबविण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर आपण सर्व्हे केला, तेव्हा असे लक्षात आले की, शहरी भागामध्ये 87.3 टक्के महिला इन्स्टीट्युशनल डिलीव्हरी योजनेचा लाभ घेतात आणि ग्रामीण भागामध्ये फक्त 54.1 टक्के महिला या योजनेचा लाभ घेत आहेत. म्हणून आम्हाला असे वाटले की, याबाबतीत ग्रामीण भागाकडे जास्त लक्ष देण्याची गरज आहे. त्यामुळे यासाठी अर्थसंकल्पामध्ये जी तरतूद करण्यात आली होती, ती ग्रामीण भागाकडे वळवून तेथील आदिवासी भाग असेल किंवा इतर भाग असेल, ज्याठिकाणी याची गरज आहे, तेथे हा कार्यक्रम राबविण्याचा प्रयत्न करावयाचा. यासाठी शहरी भागातील योजना बंद करुन ग्रामीण भागाकडे लक्ष देण्याच्या बाबतीत निर्णय घेण्यात आला आहे.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, माझा माननीय मंत्री महोदयांना असा प्रश्न आहे की, शहरी भागामध्ये गरीबी नाही काय ? शहरी भागातील झोपडपट्टी एरियातील महिलांना या योजनेचा फायदा व्हावयास नको काय ? या योजने अंतर्गत आपण या महिला 400 रुपये रोख आणि काही औषधे देतो. तसेच शहरी भागाबाबत सांगावयाचे तर मुंबईतील सामान्य महिला मुंबई महानगर पालिकेच्या किंवा सरकारी दवाखान्यामध्ये डिलीव्हरीसाठी जात असतात. त्यामुळे माझा प्रश्न असा आहे की, शहरी भागासाठी ही योजना पुन्हा केव्हा सुरु करण्यात येणार आहे ? तसेच यासाठी बजेटमध्ये वेगळी तरतूद करणार आहात काय ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, या सदनामध्ये सर्व सन्माननीय महिला सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन आपण पुढील बजेटमध्ये या योजनेसाठी ॲडिशनल तरतूद करुन, शहरी भागामध्ये देखील पुन्हा ही योजना सुरु करु असे मी येथे सांगू इच्छितो.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मातृत्व योजनेचा प्रश्न हा धोरणात्मक आहे. माझा प्रश्न असा आहे की, ग्रामीण भागामध्ये ही योजना सुरु आहे. ग्रामीण भागामध्ये मातृत्व योजनेचे इन्सेन्टीव्ह घेण्यासाठी प्रोत्साहनपर भत्ता देतो. त्यासाठी केंद्र शासनाच्या एन.आर.एच.एम.तर्फे नेमलेल्या आशा आहेत आणि तेथे काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांचे रिप्रेझेन्टेटीव्ह आहेत. परंतु या बाबतीत आपण धोरण स्पष्ट केले पाहिजे की, हे अनुदान नेमके कोणाला देणार आहात ? हे अनुदान "आशा" ला देणार आहात काय ? त्यांना पगार देत नाही तर इन्सेन्टीव्ह दिला जातो ....

. . . .2 जी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आणि मग त्यावर क्लेम केला जातो. तसेच एन.जी.ओ.च्या रिप्रेझेंन्टेटीव्हच्या बाबतीत काय करणार आहात ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, आपण या योजनेमध्ये "आशा" चे जे वर्कर आहेत, त्यांना आपण इन्सेन्टीव्ह देतो. एन.जी.ओ.च्या रिप्रेझेन्टेटीव्हजनां देत नाही.

. . . .2 जी-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ठाणे व सिंधुदुर्ग जिल्ह्यात स्थानिक विकास निधी अंतर्गत झालेली अनियमितता

(9) *697 श्री. संजय केळकर,श्री.मधुकर चव्हाण , श्री. रामनाथ मोते : सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) स्थानिक विकास निधी अंतर्गत सन 2005-06 व 2006-07 मधील मंजूर विकास कामे पूर्ण होऊनही त्यांची देयके ठेकेदारांना अदा न केल्याने बराचसा निधी अखर्चित राहिल्याची बाब जिल्हा नियोजन समिती ठाणे व सिंधुदुर्ग यांनी शासनाच्या निदर्शनास आणली आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,

(3) असल्यास, याप्रकरणी अखर्चित निधी खर्च करण्यासाठी शासनाने कोणते निकष जारी केलेले आहेत अथवा करण्यात येत आहेत,

(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.विजय वडेट्टीवार, श्री.सुनील तटकरे यांच्याकरिता : (1), (2) व (3) सन 2005-06 चा निधी खर्च करण्यास दिनांक 30/6/2007 पर्यंत व सन 2006-07 चा निधी दिनांक 31/3/2008 पर्यंत खर्च करण्यास सर्वच जिल्हांना मुदतवाढ देण्यात आली होती.

यानंतरही अखर्चित राहीलेला निधी खर्च करण्यास मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांनी सप्टेंबर, 2009 मध्ये शासनास सादर केलेला आहे. वरीलप्रमाणे मुदतवाढ देवूनही निधी खर्च न झाल्याने त्याबाबतची अधिक माहिती व कामांच्या सद्यस्थितीबाबतची माहिती जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांचेकडून मागविण्यात आली आहे. मात्र ठाणे जिल्ह्याकडून असा प्रस्ताव प्राप्त झालेल्या नाही.

(4) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, याठिकाणी स्थानिक विकास निधीच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केलेला आहे. याठिकाणी उत्तरामध्ये म्हटलेले आहे की, "सन 2005-2006 चा निधी खर्च करण्यास दिनांक 30-6-2007 पर्यंत व सन 2006-2007 चा निधी दिनांक 31-3-2008 पर्यंत खर्च करण्यास सर्वच जिल्ह्यांना मुदतवाढ देण्यात आली होती." सन्माननीय सदस्यांना जो विकास निधी दिला जातो, त्याचा उपयोग जनतेच्या हितासाठी वापरण्यात येतो. तो शासनाचा निधी आहे. याबाबतीत पत्र दिल्यानंतर, त्याला प्रशासकीय मंजूरी दिल्यानंतर प्रत्यक्ष कामास सुरुवात होते आणि त्यानंतर निधीचे वितरण करण्यात येते.

सभापती : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, परंतु यामध्ये दिरंगाई होते आणि काम पूर्ण झाल्या नंतर देखील निधी दिला जात नाही. मग अमुक-अमुक सन्माननीय सदस्यांच्या खात्यामध्ये पैसे शिल्लक राहिलेला आहे अशी चर्चा होते. परंतु याबाबतीत जाणीवपूर्वक दिरंगाई केली जाते.

. . . .2 जी-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, मी या प्रश्नामध्ये ठाणे आणि सिंधुदूर्ग जिल्ह्यांच्या बाबतीत उदाहरण दिलेले आहे. निधी उपलब्ध करुन देण्याच्या बाबतीत दोन-दोन वर्षाची दिरंगाई केली जाते. ती कशा पध्दतीने टाळता येईल यासाठी काही उपाययोजना करण्यात येणार आहे काय? कारण दोन-दोन वर्षे दिरंगाई होते . . ..

सभापती : सन्माननीय सदस्यांना प्रश्न विचारावयाचा नाही काय ? विषयाचे स्पष्टीकरण किती द्यावयाचे ?

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, याबाबतीत जी दिरंगाई होते, त्यासंदर्भात योजना करणार आहात काय ? ही दिरंगाई कोणाकडून केली जाते ? माझे म्हणणे आहे की, ही दिरंगाई जाणीवपूर्वक केली जाते. त्याबाबतीत संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करणार आहात काय ? यासंदर्भात माझ्याकडे काही स्पेसिफिक उदाहरणे देखील आहेत.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. केळकर साहेब आणि इतर सदस्यांनी याठिकाणी हा प्रश्न उपस्थित केलेला आहे. खरे म्हणजे सिंधुदुर्ग जिल्हयातील स्थानिक विकास निधीच्या खर्चासंबंधीचा हा प्रश्न होता. सन 2005-2006 मध्ये एकूण दोन कामे करावयाची होती. या कामांची जी अखर्चिक रक्कम होती ती खर्च करण्यासाठी परवानगी मागितली होती. या कामांना विलंब होण्याचे कारण असे की, त्या ठिकाणी जमिनी उपलब्ध नाहीत. सन्माननीय आमदार ज्यावेळी अशी कामे सुचवितात त्यावेळी त्याबाबतीतील ठराव घेण्याच्या बाबतीत ग्रामपंचायतीकडून कधी दिरंगाई होते तर कधी जागेची उपलब्धता नसते, अशा अनेक विविध कारणामुळे ती कामे जरा विलंबाने सुरु होतात. त्या वार्षिक वित्तीय वर्षात ती कामे उशिरा घेण्यात आली किंवा देयके उशिरा सादर झाली तर तो निधी सरेंडर होतो. त्यामुळे परत त्या निधीची मागणी करावी लागते. जवळपास 21 लाख 41 हजार रुपयांच्या निधीची आवश्यकता होती त्या संपूर्ण निधीला दिनांक 19/12/2009 ला मंजुरी दिलेली आहे. या संपूर्ण निधीला पुन्हा खर्चासाठी शासनाने मंजुरी प्राप्त करुन दिलेली आहे.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, सन 2006-2007 या आर्थिक वर्षात 15 कामांसाठी निधी वितरित करण्यासाठी मंजुरी मागण्यासाठी सिंधुदुर्ग येथील नियोजन विभागाकडून दिनांक 15-9-2209 ला आणि दिनांक 14-12-2009 ला अशी दोन पत्रे पाठविण्यात आलेली आहेत ती मंजुरी तातडीने देण्यात येईल काय?

श्री.विजय वडेट्टीवार :सभापती महोदय, पहिल्यांदा ज्यावेळी मागणी करण्यात आली होती त्यावेळी दि.31/3/2008 पर्यंत सर्व जिल्हयांना परवानगी देण्यात आली होती. महाराष्ट्रात जेवढया सगळयांची मागणी होती त्यांना परवानगी देण्यात आली होती. दुसऱ्यांदा दि.19/12/2009 च्या आदेशान्वये दिनांक 31 मार्च, 2010 पर्यंत सगळी कामे पूर्ण करण्यासाठी मंजुरी प्राप्त करुन दिली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/

राज्यात विविध प्रकारच्या साथीच्या आजारांना आळा घालण्यासाठी करावयाची उपाययोजना

(10) * 190 श्री. जयंत प्र.पाटील, श्री.कपिल पाटील : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यात विविध प्रकारच्या आजारांनी विशेषत: मुंबई, औरंगाबाद, जळगाव येथे मलेरियाच्या साथीने सुमारे 200 जणांचा बळी घेतला तसेच सांगली, कोल्हापूर मध्य चिकुनगुनिया, डेंग्यु, ताप या आजाराचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव झाल्याचे दिनांक 6 नोव्हेंबर, 2009 रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उक्त साथीच्या रोगांचा मुकाबला करण्यासाठी व प्रार्दुभाव रोखण्याकरिता शासनामार्फत कोणती ठोस उपाययोजना आखण्यात आली आहे वा येत आहे,

(3) तसेच उक्त साथींमुळे मृत पावलेल्या व्यक्तींच्या कुटुंबियांना शासनाने कोणत्या स्वरुपाची मदत जाहीर केली आहे वा करण्यात येत आहे,

(4) नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुरेश शेट्टी : (1) हे अंशत: खरे आहे.

राज्यात एप्रिल ते ऑक्टोबर, 2009 मध्ये 95 हिवताप मृत्यू झाले आहेत. सांगली व कोल्हापूरमध्ये डेंगी व चिकुनगुनीयाचे काही रुग्ण आढळले असले तरी, एकही मृत्यू झालेला नाही.

(2) साथीच्या रोगांचा मुकाबला करण्यासाठी व प्रादुर्भाव रोखण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना नियमीतपणे राबविण्यात आल्या आहेत व येत आहेत :-

1) जलद ताप सर्वेक्षणांतर्गत ताप रुग्णांचे रक्तनमुने घेऊन वयोगटानुसार योग्य तो गृहतोपचार.
2) रक्तनमुन्यांची त्वरीत तपासणी व आढळून आलेल्या हिवताप रुग्णांना जंतूच्या प्रकारानुसार समुळ उपचार.
3) डेंग्यु/चिकुनगुनीया संशयित ताप रुग्णांचे रक्तजल नमुने एन.आय.व्ही., पुणे व सेन्टीनल सेन्टर येथे विषाणू परीक्षणासाठी पाठविणे.
4) आरोग्य कर्मचाऱ्यांमार्फत किटकशास्त्रीय सर्वेक्षणांतर्गत पाणीसाठ्याची तपासणी करणे व डास आळ्या आढळून आलेले पाणी साठे रिकामी करणे व रिकामी न करता येणाऱ्या पाणी साठ्यात टेमीफॉस अळीनाशकाचा वापर.
5) शहरी भागात डासोत्पती स्थानावंर दर आठवड्यास नियमीत अळीनाशक फवारणी.
6) जीवशास्त्रीय उपाययोजनेंतर्गत गप्पीमासे पैदास केंद्रांची निर्मिती करुन योग्य अशा डासोत्पत्ती स्थानात डासअळी नाशक गप्पीमासे सोडणे.
7) हिवताप उद्रेकग्रस्त भागात तातडीने किटकनाशक फवारणी व डेंग्यु उद्रेकग्रस्त भागात धुरफवारणी व डेंग्यु उद्रेकग्रस्त भागात धुरफवारणी.
8) सर्व शासकीय आरोग्य संस्थांना आवश्यक तो औषधी साठा तसेच फवारणीसाठी किटकनाशके, अळीनाशके व साहित्य सामुग्रीचा पुरवठा.
9) जनतेस विविध माध्यमाद्वारे आरोग्य शिक्षण
10) उद्रेकग्रस्त भागात राबविण्यात येणाऱ्या प्रतिबंधात्मक उपाययोजनांच्या मार्गदर्शनासाठी राज्य, विभागीय व जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांच्या भेटी व सभा.

..3

..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र.क्र.190...
श्री. सुरेश शेट्टी. . . .
(3) साथीमध्ये मृत्यू पावलेल्याच्या कुटुंबियांना कोणत्याही स्वरुपाची मदत करण्याचे शासनाचे धोरण नसल्याने मदत देण्यात आलेली नाही.
(4) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, या प्रश्नाची जबाबदारी खरे तर नगरविकास विभागाची आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाचे मी खरेच कौतुक करतो. मी स्वत: स्वाईन फ्लूने आजारी होतो पण महानगरपालिकेच्या दवाखान्याने मला खडखडीत बरे केले. मुंबईतील गोरेगावच्या सिध्दार्थ हॉस्पिटलने मला बरे केले आहे. यातील मुख्य भाग असा आहे की, अनेक इस्पितळे, दवाखाने आणि आरोग्य केंद्रातील पदे रिक्त आहेत. त्यामुळे ती किती पदे रिक्त आहेत आणि ही पदे भरण्यासाठी शासन ताबडतोबिने काही कार्यक्रम आखणार आहे काय?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, प्रश्न मलेरियाच्या संबंधात विचारण्यात आलेला आहे.आणि या ठिकाणी उप प्रश्न पदांच्या संदर्भात विचारण्यात आलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी या संदर्भात वेगळा प्रश्न विचारावा.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, मी साथीच्या रोगासंबंधीच प्रश्न विचारलेला आहे.

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, हे खरे आहे की, आरोग्य खात्यात रिक्त पदे आहेत आणि ती भरण्यासंबंधी शासन पुढच्या सहा महिन्यात प्रयत्न करणार आहे.

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, कोल्हापूर जिल्हयामध्ये डेंग्युने 9 जण मृत्युमुखी पडलेले आहेत असे असताना डेंग्युमुळे एकाही रुग्णाचा मृत्यू झालेला नाही असे उत्तरात म्हटले आहे ते चुकीचे आहे. सगळयात महत्वाचे म्हणजे अन्य कोणत्याही नैसर्गिक आपत्तीमध्ये कोणाचा मृत्यू झाला किंवा अपघातात मृत्यू झाला तरी संबंधितांच्या नातेवाईकांना नुकसानभरपाई देण्यात येते. त्याठिकाणच्या प्रशासनाच्या एका अर्थाने गैर कारभारामुळे आणि त्याने योग्य सुविधा न दिल्यामुळे जर एखाद्या रुग्णाचा मृत्यू झाला तर त्या रुग्णाच्या कुटुंबियांना नुकसान भरपाई देणार काय?

श्री. सुरेश शेट्टी : सभपती महोदय, माझ्याकडे जी माहिती प्राप्त झालेली आहे त्यात कोल्हापूर जिल्हयामध्ये एकही डेंग्युमुळे मृत्यू झालेला नाही. एकूण 22 केसेस सापडल्या होत्या त्यांच्या सर्व तपासण्या करण्यात आलेल्या आहेत. काही केसेस पॉझिटिव्ह असल्याचे निदर्शनास आले पण कोल्हापूरमध्ये डेंग्युमुळे एकही मृत्यू झालेला नाही.

यानंतर श्री. बरवड..

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपी नोंद

अल्पसूचना प्रश्न क्रमांक 2540

सभापती : अल्पसूचना प्रश्न क्रमांक 2540 बाबत माननीय राज्यमंत्री या ठिकाणी उत्तर देण्यास तयार आहेत.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांच्या सोयीप्रमाणे आणि सवलतीप्रमाणे या सभागृहाचे कामकाज चालणार आहे काय ? हा प्रश्न उद्या घेण्यात येईल असे आपण मघाशी जाहीर केले आहे.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांना सांगू इच्छितो की, मघाशी मंत्रिमहोदयांकडून ते उत्तर मिळाले. त्यांनी मला अशी चिठ्ठी पाठवली की, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांची तयारी असेल तर मी उत्तर देण्यास तयार आहे. यामध्ये काही गैर नाही. आपण हा प्रश्न आता उपस्थित करु इच्छिता काय ?

श्री. दिवाकर रावते : मी प्रश्न मांडत नाही. हा आपल्या विभागाशी संबंधित प्रश्न आहे हे सुध्दा माननीय मंत्रिमहोदयांना माहीत नव्हते.

सभापती : ते या सभागृहात नवीन आहेत.

श्री. दिवाकर रावते : हा प्रश्न उद्या घेऊ असे आपण मघाशी सांगितले. त्याबाबत मी काही म्हटले नाही. त्यांच्या सोयीप्रमाणे आम्ही उभे राहावयाचे काय ? त्यांच्या सोयीप्रमाणे आम्ही नाचावयाचे काय ?

सभापती : त्यांच्या सोयीसाठी नाही. अनावधानाने एखादी गोष्ट झाली तर आपण समजून घ्यावी.

श्री. दिवाकर रावते : आपण हा प्रश्न उद्या घेऊ असे सांगितले आहे.

सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ KGS/ SBT/ MMP

पृ.शी.: लेखी उत्तरे

मु.शी.: अतारांकित प्रश्नोत्तरांची सतरावी यादी सभागृहासमोर ठेवणे

सचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अतारांकित प्रश्नोत्तरांची सतरावी यादी सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अतारांकित प्रश्नोत्तरांची सतरावी यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे सोबत जोडलेली यादी छापावी)

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: लेखी उत्तरे

मु.शी.: तारांकित प्रश्नासंबंधी अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे

श्री. सचिन अहिर (गृहनिर्माण राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "पावसाळ्यापूर्वी म्हाडाने मुंबईतील धोकादायक इमारतींची पाहणी करुन धोकादायक इमारतींच्या यादीतून वगळलेल्या इमारती कोसळल्याबाबत" या विषयावरील सर्वश्री गुरुमुख जगवानी, जगदीश गुप्ता, विनोद तावडे, वि. प. स. व सर्वश्री प्रतावराव सोनवणे, सागर मेघे, माजी वि. प. स. यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक 40868 ला दिनांक 26 मार्च, 2008 रोजी सभागृहात प्रश्नोत्तरांच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे सोबत जोडलेली अधिक माहिती छापावी)

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: लेखी उत्तरे

मु.शी.: तारांकित प्रश्नासंबंधी अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे

श्री. विजय वडेट्टीवार (जलसंपदा राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "कोयना धरणातून वाया जाणाऱ्या पाण्याचा वापर करण्याबाबत" या विषयावरील श्री. संजय दत्त, प्रा. सुरेश नवले, सर्वश्री प्रतापसिंह मोहिते-पाटील, राजन तेली, सुरेशदादा देशमुख, नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, संजय पाटील, केशवराव मानकर, वि. प. स. व सर्वश्री जितेंद्र आव्हाड, गोविंदराव आदिक, माजी वि. प. स. यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक 45872 ला दिनांक 26 डिसेंबर, 2008 रोजी अनुपूरक प्रश्नोत्तरांच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे सोबत जोडलेली अधिक माहिती छापावी)

...5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: शोक प्रस्ताव

मु.शी.: श्री. विठ्ठलराव गणपतराव हांडे, माजी वि.प.स. व माजी विरोधी पक्ष नेता यांच्या निधनाबद्दल शोक प्रस्ताव

श्री. छगन भुजबळ (उपमुख्यमंत्री) : सभापती महोदय, श्री. विठ्ठलराव गणपतराव हांडे, माजी वि.प.स. व माजी विरोधी पक्ष नेता यांच्या निधनाबद्दल मी खालील शोक प्रस्ताव मांडतो.

"श्री. विठ्ठलराव गणपतराव हांडे, माजी वि.प.स. व माजी विरोधी पक्ष नेता यांच्या दु:खद निधनाबद्दल हे सभागृह अतीव दु:ख व्यक्त करते."

सभापती महोदय, कै. विठ्ठलराव गणपतराव हांडे यांचा जन्म 1 ऑक्टोबर, 1922 रोजी नाशिक जिल्ह्यात अदगाव येथे झाला. त्यांचे शिक्षण एलएल.बी. पर्यंत झाले होते.

कै. हांडे यांनी 1942 च्या स्वातंत्र्य लढ्यात भाग घेतला होता. तसेच संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनातही त्यांचा सक्रीय सहभाग होता. त्यात त्यांना कारावासही झाला होता.

कै. हांडे यांनी इगतपुरी येथील शेतकरी चळवळीचे तसेच उपासमार विरोधी कृती समितीच्या आंदोलनाचे नेतृत्व केले होते. ते शेतकरी कामगार पक्षाच्या स्थापनेपासूनचे निष्ठावंत कार्यकर्ते होते. पक्षाच्या अनेक आंदोलनात त्यांचा सक्रीय सहभाग होता.

कै. हांडे यांनी नाशिक जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज या संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य, सचिव तसेच श्री. छत्रपती शिवाजी स्मारक मंडळाचे अनेक वर्षे विश्वस्त म्हणूनही त्यांनी कार्य केले होते. त्यांचा अनेक शैक्षणिक व सामाजिक संस्थांशी निकटचा संबंध होता.

यानंतर श्री. खंदारे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.छगन भुजबळ....

कै.हांडे हे 1957 मध्ये नाशिक मतदार संघातून महाराष्ट्र विधानसभेवर तर 1968 व 1986 असे दोन वेळा महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारे विधानपरिषदेवर निर्वाचित झाले होते. सन 1988 ते 1990 पर्यंत महाराष्ट्र विधानपरिषदेचे विरोधी पक्ष नेते पदही त्यांनी भूषविले होते. तसेच सन 1977 मध्ये नाशिक मतदार संघातून लोकसभेवरही निर्वाचित झाले होते.

अशा या ज्येष्ठ समाजसेवकाचे बुधवार, दिनांक 16 डिसेंबर, 2009 रोजी दु:खद निधन झाले.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्ष नेता) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते व सन्माननीय उपमुख्यमंत्री श्री.छगन भुजबळ यांनी कै.विठ्ठलराव गणपतराव हांडे यांच्या दु:खद निधनाबद्दल शोक प्रस्ताव मांडला आहे त्याला समर्थन देण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, कै.विठ्ठलराव हांडे या सदनाचे ज्येष्ठ कार्यकर्ते होते. ते दोन वेळा महाराष्ट्र विधानसभाद्वारा विधानपरिषदेवर निवडून आले होते. दिनांक 23 डिसेंबर,1988 रोजी विधानपरिषदेवर विरोधी पक्ष नेतेपदी निवड झाली होती. विरोधी पक्ष नेता होण्यापूर्वी त्यांनी 2 वर्षे परिषदेमध्ये काम केले होते. सुरुवातीपासून कै.विठ्ठलराव हांडे शेतकरी चळवळीमध्ये काम करीत होते. शेतकरी कामगार पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते राहिले होते. शेतकरी कामगार पक्षाने वेळोवेळी केलेल्या आंदोलनांमध्ये त्यांनी भाग घेतला होता. 1957 मध्ये नाशिक मतदार संघातून महाराष्ट्र विधानसभेवर आणि 1977 मध्ये लोकसभेवरही निवडून गेलेले होते. त्यामुळे त्यांचा संसदीय कामकाजाचा दांडगा अनुभव होता. त्या अनुभवाच्या जोरावर त्यांनी विरोधी पक्ष नेतेपद समर्थपण सांभाळले होते. त्यांचा जन्म नाशिकमधील असला तरी विदर्भाच्या प्रश्नावर त्यांनी याच सभागृहात अभ्यासपूर्ण भाषणे केलेली आहेत. दिनांक 13 डिसेंबर, 1988 रोजी जमीन अधिग्रहण सुधारणा विधेयकावर त्यांनी केलेले भाषण खूपच प्रभावी ठरले होते. सभागृहात हल्ली कोणत्याही महामंडळाच्या अहवालावर चर्चा केली जात नाही. परंतु त्यावेळी महामंडळांचे अहवाल चर्चेला घेतले जात असत.

सभापती महोदय, विदर्भातील कापसाच्या प्रश्नावर व कापूस एकाधिकार खरेदी योजनेच्या नफा-तोटा पत्रकावर दिनांक 7.12.1988 रोजी सभागृहात चर्चा झाली त्यावेळी त्यांनी अत्यंत प्रभावीपणे आपले विचार मांडले होते. कापूस उत्पादक शेतक-यांना जगवावयाचे असेल तर परदेशातून आयात होणाऱ्या कृत्रिम कापसावर बंदी घालावी व आपला कापूस बाहेर जात असेल तर चेक पोस्ट निर्माण करावेत व 200 रुपये अग्रिम शेतक-यांना दिला जावा अशा मागण्या त्यावेळी त्यांनी केल्या होत्या. कै.हांडे यांचा प्रत्येक विषयावर गाढा अभ्यास होता. त्यामुळे ते सभागृहात प्रभावीपणे बोलत असत. शेतकरी चळवळीचा नेता आणि संसदीय परंपरेमध्ये चांगल्या पध्दतीने काम करणारा एक नेता आपल्यातून निघून गेलेला आहे. त्यांच्या निधनाबद्दल जो शोक प्रस्ताव मांडला आहे त्यामध्ये सहभागी होऊन मी त्यांना आदरांजली अर्पण करतो आणि येथेच थांबतो.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ KGS/

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते सन्माननीय उपमुख्यमंत्री श्री.छगन भुजबळ यांनी कै.विठ्ठलराव गणपतराव हांडे यांच्या दु:खद निधनाबद्दल जो शोक प्रस्ताव मांडला आहे त्या प्रस्तावाला अनुमोदन देण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, कै.हांडे यांचे व्यक्तिमत्व परिचित नसले तरी शेतकरी चळवळीतील त्यांचे योगदान आणि आताच सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी त्यांनी कापसाच्या प्रश्नावर प्रभावीपणे भाषण केल्याचे सांगितले आहे. परंतु योगायोग असा आहे की, आज सकाळीच विदर्भातील कापसाच्या प्रश्नावर सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी भाषण केले आहे. आपला कापूस परदेशात कसा जात आहे, कापूस उत्पादक शेतक-यांची कशी पिळवणूक केली जात आहे, त्यांची लुबाडणूक कशी केली जात आहे त्यावर त्यांनी प्रकाश टाकला आहे. नेमके आजच्या दिवशी कै.हांडे यांना आपण आदरांजली वाहत आहोत. त्यांनी त्यांच्या काळात शेतकरी कामगार पक्षाच्या माध्यमातून आंदोलन निर्माण केले होते.

यानंतर श्री.शिगम

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MMP/ KGS/ पूर्वी श्री. खंदारे 13:10

(श्री. दिवाकर रावते....)

आपल्या शेतक-यांचा कापूस परराज्यामध्ये जाऊ नये म्हणून आंदोलन निर्माण केले. हा वेगळा योगायोग या सदनामध्ये आम्हाला अनुभवायला मिळतोय. ते या विधानपरिषदेचे दोन वेळा सदस्य होते. तसेच ते विरोधी पक्षनेतेही होते. खासदार म्हणून लोकसभेमध्येही ते गेले होते. शेतकरीनिष्ठ असे हे व्यक्तिमत्व आज आपल्यातून गेलेले आहे. मी या प्रस्तावाला अनुमोदन देतो आणि त्यांच्या स्मृतीस आदरांजली अर्पण करतो.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सत्यशोधकीय विचारांचा वारसा आणि जेधे जवळकरांची परंपरा जोपासत या राज्यातील शेतकरी कामगार पक्ष ज्यांनी वाढवला अशा काही प्रमुख अग्रणींपैकी विठ्ठलरावजी हांडे होते. शेती आणि शेतक-यांच्या प्रश्नाबद्दल त्यांना प्रचंड तळमळ होती आणि त्यांचा व्यासंगही तितकाच मोठा होता. या विषयावरची सभागृहातील त्यांची अनेक भाषणे गाजली होती. शेतकरी कामगार चळवळीतील ज्या माणसांनी आयुष्यभर आपल्या निष्ठा कधी बदलल्या नाहीत आणि जी वैचारिक निष्ठा स्वीकारली तिच्याशी प्रामाणिक राहात त्यांनी अखेरपर्यन्त जे काम केले त्यापैकी एक विठ्ठलराव हांडे होते. त्यांच्या जाण्याने शेतकरी कामगार चळवळीचेच नाही तर एकूणच डाव्या चळवळीचे मोठे नुकसान झालेले आहे. मी त्यांना विनम्र श्रध्दांजली व्यक्त करतो.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी (नामनियुक्त) : सभागृहाचे नेते माननीय श्री. छगन भुजबळ साहेब यांनी या सदनाचे माजी सदस्य विठ्ठलराव गणपतराव हांडे यांच्या निधनाबद्दल मांडलेल्या शोकप्रस्तावाला समर्थन देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, आपल्या कतृत्वाने आणि आपल्या कामामुळे जी माणसे मोठी होतात त्यापैकी विठ्ठलराव हांडे हे एक होते.श्रमजीवी आणि शेतक-यांसाठी सतत लढणारे असे विठ्ठलराव हांडे होते. आज ते आपल्यामध्ये नाहीत. मी त्यांना विनम्र श्रध्दांजली अर्पण करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. वसंत पवार (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, माननीय उपमुख्यमंत्री श्री. छगन भुजबळ यांनी मांडलेल्या शोकप्रस्तावाला समर्थन देण्यासाठी मी उभा आहे.

भाई विठ्ठलराव हांडे हे शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ नेते होते. तसेच ते जुन्या काळातील डाव्या चळवळीतील आणि संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील अग्रणी होते. पक्षनिष्ठा कशी असावी, कार्यकर्ता कसा असावा याचे विठ्ठलराव हांडे हे मूर्तीमंत उदाहरण होय. शेतक-याच्या भाताला योग्य भाव मिळावा यासाठी आमदार पद्मश्री काकासाहेब वाघ यांच्या समवेत त्यांनी इगतपुरी येथे मोठा लढा दिला. निफाड सहकारी साखर कारखान्याच्या उभारणीमध्ये त्यांचा सिंहाचा वाटा होता. आमच्या मराठा विद्याप्रसारक समाज या संस्थेच्यो कार्यकारीणीमध्ये सभापती या नात्याने त्यांनी अनेक वर्षे काम केलेले आहे. सिम्बॉयसिस या संस्थेचे ते काही वर्षे ट्रस्टी होते. एक शिक्षण तज्ज्ञ म्हणून शिक्षकांचे प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी अनेक आंदोलने केली, अनेक धरणे धरली.

...नंतर श्री. पां.खर्चे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. वसंत पवार .....

विना अनुदानित शाळांचे प्रश्न सोडविण्याचे त्यांनी चांगल्या प्रकारे प्रयत्न केले. नाशिकचा आमदार म्हणून तसेच संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे अग्रणी तसेच आणिबाणीनंतरच्या काळात लोकसभेचे खास म्हणून निवडून गेल्यानंतर त्यांनी अत्यंत उत्कृश्ट काम केले तसेच विधानपरिषदेचे विरोधी पखनेते म्हणून देखील त्यांनी चांगले काम केले आहे. त्यांनी आपल्या कामाचा चांगला ठसा सभागृहात तसेच राज्यातही उमटविला आहे. मी त्यांच्यासोबत जवळपास दोन तपे एकत्र शिक्षण संस्थेत काम केले असून त्यांचे चांगल्या प्रकारचे मार्गदर्शन सुध्दा आम्हाला लाभले आहे. त्यांनी विधानपरिषद, विधानसभा तसेच लोकसभेत जी उत्कृष्ट भाषणे केली आहेत त्यांचे संकलन करुन सस्थेच्या वतीने लवकरच पुस्तक रुपाने ते छापण्याचा आमचा मनोदय आहे. अशा थोर नेत्याच्या पवित्र स्मृतिला अभिवादन करतो आणि त्यांना श्रध्दांजली अर्पण करुन माझे दोन शब्द पूर्ण करतो.

यानंतर श्री जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री जयप्रकाश छाजेड (विधानसभेने निवडलेले) : महोदय, विठ्ठलराव हांडे यांना श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी सभागृहाचे नेते माननीय श्री. छगन भुजबळ यांनी जो प्रस्ताव आणलेला आहे त्यावर माझे विचार मी व्यक्त करणार आहे.

महोदय, नाशिक जिल्ह्यातील रहिवासी तसेच या सभागृहाचे माजी सदस्य श्री. विठ्ठलराव हांडे यांना आम्ही विद्यार्थी दशेपासूनच बघितले आहे नाशिक शहरात उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ व्हावे म्हणून विद्यार्थी दशेत आमच्या पाठीशी राहून आम्हाला सहकार्य करण्याचे काम त्यांनी केले आहे. शेतकरी कामगार पक्षाचे नेते म्हणून अनेक वेळा प्रतिकूल परिस्थितीमध्ये राजकारण करीत असताना निष्ठा आणि विश्वास न सोडता या जिल्ह्यामध्ये शेतकऱ्यांच्या प्रश्नांच्या बाबतीत अग्रक्रमाने भाग घेऊन त्यांनी यशस्वी असा लढा दिला आहे. स्वातंत्र्य चळवळीत स्वातंत्र्य सेनानी, शिक्षण क्षेत्र असो अथवा सहकार क्षेत्र असे अशा सर्वच ठिकाणी त्यांचा अनुभव आणि त्यांनी केलेले काम हे राज्याच्या सदैव स्मृतित राहील. अशा थोर नेत्याचे दु:खद निधन झालेले आहे. मी त्यांना श्रध्दांजली अर्पण करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, स्व. वि.ग.हांडे यांना श्रध्दांजली समर्पित करण्यासाठी जो प्रस्ताव सभागृहात आलेला आहे त्यावर मी बोलणार आहे.

महोदय, खरे म्हणजे मी कुठल्याही पक्षाच्या वतीने माझे विचार व्यक्त करीत नाही परंतु ज्या जिल्ह्यात तसेच ज्या तालुक्यात स्व. वि.ग.हांडे यांचे गाव होते त्याच निफाड तालुक्यातील मी सुध्दा रहिवासी आहे. विद्यार्थी दशेपासून मी त्यांचे काम पाहिले आणि ऐकलेही आहे. त्यांनी शिक्षण क्षेत्रातील काम तसेच सामाजिक कार्य सुध्दा सर्वश्रुत असेच आहे. आजही सर्वच त्यांच्या कार्याचा आदर करीत आहेत. अशा थोर नेत्याला श्रध्दांजली अपर्ण करुन मी माझे भाषण संपवितो.

.....4.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी. टी. देशमुख (अमरावती विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सभागृहाचे माजी सदस्य आणि राज्यातील डाव्या चळवळीचे ज्येष्ठ नेते श्री. वि.ग.हांडे यांच्या निधनाबद्दल जो शोक प्रस्ताव माननीय उप मुख्यमंत्र्यांनी मांडला आहे त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, संयुक्त महाराष्ट्र चळवळीसह सर्वच डाव्या चळवळींमध्ये ज्या ज्येष्ठ नेत्यांनी सहभाग घेतला होता त्यात श्री. हांडे यांचे स्थान सर्वात वरचे आहे. या सभागृहात सुध्दा सदस्य म्हणून अत्यंत चांगली कामगिरी त्यांनी केली आहे. त्यापेक्षा सर्वात महत्वाचे म्हणजे आपल्या विचारांवर अतिशय ठाम श्रध्दा असलेला हा माणूस होता. पूर्वी या सभागृहाची बैठक पहिल्या मजल्यावरील एका छोट्याशा रुममध्ये भरत होती. सन 1982-83 ची एक घटना मला आठवते. ती म्हणजे महात्मा जोतिबा फुले यांच्याबद्दल अत्यंत वाईट टीका करणारा लेख त्यावेळेस वर्तमानपत्रातून छापून आला होता....

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी.टी.देशमुख ....

त्याबाबत नियम 93 ची सूचना मांडतांना वर्षानुवर्षे काम करणारा माणूस, निधडया छातीचा माणूस अचानक ओक्साबोक्सी रडायला लागला होता. त्यावेळी सभागृह तहकूब करण्यात आले व त्या विषयीची 93 ची सूचना ॲडमिट झाली. परंतु त्यावेळचा तो प्रसंग मी कधीही विसरु शकत नाही. विचाराने ठाम असणा-या माणसांच्या श्रध्दास्थानावर जेव्हा हल्ले होतात त्यावेळी ते किती प्रखरपणे विरोध करतात याचे एक ज्वलंत उदाहरण मी स्वत: पाहिलेले आहे. सभागृहातील त्यांच्या कामाबद्दल मी फार काही बोलले पाहिजे अशातला काही भाग नाही. आयुष्यभर ठामपणाने डाव्या विचारांचा झेंडा हातात घेऊन प्रवास करणा-या या सभागृहाच्या माजी विरोधी पक्ष नेत्याला आदरांजली अर्पण करतो व माझे दोन शब्द पूर्ण करतो.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : या सदनाचे नेते माननीय उपमुख्यमंत्री श्री. छगनराव भुजबळ यांनी या सदनाचे माजी विरोधी पक्ष नेते स्व.विठ्ठलराव गणपतराव हांडे यांच्या दु:खद निधनाबद्दल दुखवटयाचा प्रस्ताव मांडलेला आहे, त्या प्रस्तावाला माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर तसेच या सदनाच्या दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी आपल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. स्व. विठ्ठलराव गणपतराव हांडे हे 1942 च्या स्वातंत्र्य लढयातील अत्यंत तरुण, तडफदार आणि डाव्या विचारसरणीचे नेते आणि कार्यकर्ते होते. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात त्यांनी नाशिक जिल्हयामध्ये सक्रीय भाग घेतला होता व त्यांना याकरता कारावासही भोगावा लागला होता. स्व. विठ्ठलराव गणपतराव हांडे यांनी इगतपुरी येथील शेतक-यांच्या उपासमार विरोधी कृती समितीचे जे आंदोलन होते त्यामध्ये भाग घेतला होता. त्यावेळच्या काळात ते नाशिक विभागात फार मोठया प्रमाणात गाजले होते. ख-या अर्थाने ते शेतक-यांचे नेते होते. जबरदस्त जिद्दीने, सातत्याने तसेच शेतक-यांच्या सर्वंकष विकासाकरिता झटणारा, शेतक-यांचे प्रश्न मांडणारा असा त्यांचा सभागृहात लौकिक होता, नाशिक जिल्हयात तसेच संपूर्ण महाराष्ट्रातही लौकिक होता. सुदैवाने त्यांना जवळून बघण्याचा योग मलाही आलेला आहे. 1988 ते 90 या काळात ते जेव्हा विरोधी पक्ष नेते होते त्यावेळी मी मंत्री होतो. त्यांच्या अनेक प्रश्नाच्या निमित्ताने माझा त्यांच्याशी संपर्क असल्यामुळे मला त्यांची तडफही बघावयास मिळालेली आहे. शेतक-यांचा विचार, शेतक-यांच्या चळवळीच्या संदर्भात त्यांची जी पोटतिडीक होती ती पोटतिडीक मला बघावयास मिळालेली आहे. स्व. हांडे साहेब हे 1957 मध्ये नाशिक मतदार संघातून विधानसभेवर निवडून आले होते. 1968 तसेच 1986 अशा दोन वेळेस ते महाराष्ट्र विधान परिषदेचे सन्माननीय सदस्यही होते. त्यानंतरच्या काळात म्हणजे 1977 मध्ये लोकसभेतही त्यांनी नाशिक जिल्हयाचे प्रतिनिधीत्व केले होते. आयुष्यभर डाव्या विचारसरणीची चळवळ वाढविणारे, आपल्या विचारावर खंबीर असणारे, अत्यंत परखड आणि प्रखर अशा नेतृत्वाचे दुर्दैवाने 16 डिसेंबर, 2009 रोजी निधन झाले आहे. त्यांच्या दु:खद निधनाबद्दल मी माझ्या दु:खद भावना व्यक्त करतो आणि त्यांना श्रध्दांजली अर्पण करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती ....

सन्माननीय सभासदांनी दोन मिनिटे उभे राहून शोक प्रस्ताव संमत करावा, अशी माझी त्यांना विनंती आहे.

(सदस्य उभे राहतात.)

सदस्यांनी खाली बसावे.

शोक प्रस्ताव संमत करण्यात आला आहे. प्रस्तावाची एक प्रत शोकाकूल कुटुंबियांकडे पाठविण्यात येईल.

सभागृहाची बैठक मी आता 15 मिनिटांसाठी स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक मध्यांतरासाठी स्थगित होऊन दुपारी 1.40.वाजता पुन: भरेल)

(सभागृहाची बैठक 1.24 ते ते 1.40 पर्यंत स्थगित झाली.)

यानंर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

- स्थगिती नंतर -

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

पृ.शी. : टीव्ही- 9 या वृत्तवाहिनीने बदनामीकारक वृत्त प्रसारित करणे

मु.शी. : टीव्ही - 9 या वृत्तवाहिनीने बदनामीकारक वृत्त प्रसारित करणे यासबंधी डॉ.पतंगराव कदम ,वने मंत्री यांचे वैयक्तिक स्पष्टीकरण

डॉ.पतंगराव कदम (वने मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील वैयक्तिक स्पष्टीकरण देत आहे.

सभापती महोदय, दिनांक 15 व 16 डिसेंबर 2009 रोजी टीव्ही 9 या वृत्तवाहिनीवर माझ्या विषयी खोटयानाटया व बदनामीकारक बातम्या पसरवून माझी बदनामी करण्याचा पध्दतशीरपणे प्रयत्न काही लोकांनी केलेला आहे. मी नम्रपणें आपल्या निदर्शनास आणू इच्छितो की, मी माननीय नामदार श्री. अशोक चव्हाण, मुख्यमंत्री , माननीय नामदार श्री.शरद पवार, केंद्रीय कृषी मंत्री व माननीय नामदार श्री. नारायण राणे, महसूल मंत्री यांच्या सदर्भात कुठल्याही प्रकारची आक्षेपार्ह व्यक्तव्ये केलेली नाहीत.

सभापती महोदय, माझ्या गेल्या 25 - 30 वर्षाच्या राजकीय कारकिर्दीत मी लोकप्रतिनिधी व मंत्री म्हणून अत्यंत जबाबदारीने माझी संविधानिक कर्तव्ये व जबाबदा-या पार पाडल्या असून कुठल्याही राजकीय व्यक्तिची अथवा माझ्या सहका-यांची बदनामी होईल अथवा मानहानी होईल अशा प्रकारची कुठलीही वक्तव्ये अथवा कृती केलेली नाही.

सभापती महोदय, आजच्या विज्ञान युगात कुठल्याही प्रकारची व्हीडीओ सीडी प्रगत संगणक तंत्रज्ञानाचा गैरवापर करुन फॅब्रिकेट व मार्फिंग करुन वस्तुस्थितीचा विपर्यास करणारे वृत्त दाखविणे सहज शक्य आहे. सदरहू तथाकथित वृत्तांत दाखविलेल्या घटनेतील वक्तव्ये कोणत्या संदर्भात करण्यात आली, त्यात सत्याचा किती अंश आहे हे फॉरोन्सिक लॅबरोटरीकडून तपासणे आवश्यक वाटते.

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.पतंगराव कदम ...

सभापती महोदय, सदरची सीडी काही महिन्यांपूर्वीची आहे असे दाखविणा-या या वृत्तवाहिनीने विधिमंडळाचे अधिवेशन चालू असतांना माझी नाहक बदनामी करण्या साठी जाणीवपूर्वक घडविलेल्या या प्रकरणाचा मी तीव्र शब्दात निषेध करतो. मला हेतूपुरस्सरपणे अडचणीत आणण्यासाठी माझ्या विरोधकांनी या वाहिनीच्या मदतीने संदर्भहीन वक्तव्ये दाखवून माझ्या विषयी लोकमानसात तसेच माझ्या सहका-यांच्या मनामध्ये शंका निर्माण होईल अशा प्रकारच्या बातम्या पध्दतशीरपणे पसरविलेल्या आहेत. या सर्व बातम्या चुकीच्या असून लोकांची दिशाभूल करणा-या आहेत. त्यामुळे टीव्ही 9 या दूरदर्शन वृत्तवाहिनीवर मी माझ्या वकीलामार्फत कायदेशीर नोटीस बजावली आहे.

सभापती महोदय, मी माझ्या सार्वजनिक जीवनात सर्व पक्षातील लोकांशी अत्यंत आपुलकीचे व जिव्हाळयाचे संबंध ठेवलेले आहेत. माननीय नामदार श्री. शरद पवार, केंद्रीय कृषी मंत्री हे महाराष्ट्राचे द्रष्टे नेते असून त्यांच्याविषयी मला अत्यंत आदर आहे. त्यांची मानहानी होईल असे कोणतेही वक्तव्य मी केलेले नाही. माननीय नामदार श्री.अशोक चव्हाण,मुख्यमंत्री यांच्या विषयी मला आदर आहे. त्यांच्याबद्दल मी कुठलेही अपमानास्पद उद्गार काढलेले नाहीत. तसेच माननीय नामदार श्री नारायण राणे हे मंत्रिमंडळातील माझे सहकारी मित्र आहेत. मी आतापर्यंत नेहमीच सर्वाशी शालीनतेने वागलेलो असून माझ्या राजकीय जीवनात मी माझ्या राजकीय विरोधकांबद्दलही असे अनुद्गार काढलेले नाहीत. त्यामुळे माझ्या विषयी गैरसमज पसरविणा-या टीव्ही 9 या दूरदर्शन वृत्तवाहिनीवर दाखविण्यात आलेल्या बातम्यांबद्दल मी तीव्र निषेध व्यक्त करतो व या खोडसाळ प्रक्षेपणास जबाबदार असलेल्या सबंधितावर कडक कारवाई करावी तसेच या प्रकरणाचा बोलविता धनी कोण आहे याची सखोल चौकशी करावी अशी मागणी मी या सभागृहात माननीय सभापती महोदयांच्या मार्फत करीत आहे.

नंतर श्री.सुंबरे

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

श्री. सचिन अहिर (उद्योग, खनिकर्म राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळा मर्यादित, नागपूर यांचा सन 2006-07 आणि 2007-08 चा अनुक्रमे तेहतिसावा व चौतिसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

--

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने मँगनीज ओर (इंडिया) लिमिटेड यांचासनर 2008-09 चा सत्तेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

--

श्री. भास्कर जाधव (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) वृक्ष संरक्षण आणि संवर्धन नियम, 2009 टीपीबी-4306/2433/प्र.क्र.193/2006/नवि-11, दिनांकित 14 डिसेंबर 2009 ही अधिसूचना सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अधिसूचना सभगृहासमोर ठेवण्यात आली.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, माझी आपणास एक विनंती आहे. या पुढील कार्यक्रमानुसार लक्षवेधी सूचनेमध्ये माझ्या विभागाची लक्षवेधी सूचना पहिली आहे. परंतु त्यावेळी माझ या विभागाचा प्रश्न असल्याने मला विधान सभागृहात उपस्थित राहावे लागणार आहे. तरी माझ्या विभागाची क्र.1 वरील लक्षवेधी सूचना आपण नंतर घेतल्यास बरे होईल.

सभापती : ठीक आहे.

--

श्री. सचिन अहिर (सामाजिक न्याय राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांचा सन 1995-96 चा 13वा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

.... ओओ 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्यादित यांचा सनर 2005-06 चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

--

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांचा सन 1996-97 व 1997-98 चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

--

श्री. विजय वडेट्टीवार (जलसंपदा राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांच्या लेख्यावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचा सन 2003-04 ते 2006-07 चा अलग लेखापरीक्षा अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : लेखापरीक्षा अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

--

श्री. सचिन अहिर (गृहनिर्माण राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांचा सन 2005-06 व 2006-07 चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

***

अशुधारित मत / प्रसिद्धीसाठी नाही

विधान परिषद आश्वासन समितीचा अहवाल सादर करणे.

श्री. संजय दत्त (समिती प्रमुख) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधान परिषद आश्वासन समितीचा एकशे छपन्नावा, एकशे सत्तावन्नवा, एकशे अठ्ठावन्नावा आणि एकशे एकोणसाठावा अहवाल सभागृहास सादर करीत आहे.

सभापती : विधान परिषद आश्वासन समितीचा एकशे छपन्नावा, एकशे सत्तावन्नवा, एकशे अठ्ठावन्नावा आणि एकशे एकोणसाठावा अहवाल सभागृहास सादर झाला आहे.

विधान परिषद विशेष हक्क समितीचा अहवाल सादर करणे.

श्री. गुरूनाथ कुलकर्णी (समिती प्रमुख) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधान परिषद विशेष हक्क समितीचा "मुंबईतील लीलावती, हिंदुजा व जसलोक इत्यादी धर्मादाय रूग्णालयांच्या तपासणी संदर्भात महाराष्ट्र विधान परिषद सदस्यांच्या तदर्थ समितीने दिनांक 16 जानेवारी 2008 रोजी जसलोक हॉस्पिटलला भेट देऊन रूग्णांचे रेकॉर्ड मागितले असता श्री.मनेश मसंद, मुख्य कार्यकारी अधिकारी, जसलोक रूग्णालय, मुंबई यांनी समितीस रेकॉर्ड देण्यास नकार दिल्यामुळे तसेच समिती सदस्यांशी दुरूत्तरे व गैरवर्तन केल्यामुळे उद्‌भवलेल्या समितीच्या, सन्माननीय सदस्यांच्या व महाराष्ट्र विधानपरिषदेच्या विशेष हक्कभंगाच्या प्रकरणावरील" अहवाल सभागृहाला सादर करतो.

सभापती : मुंबईतील लीलावती, हिंदुजा व जसलोक इत्यादी धर्मादाय रूग्णालयांच्या तपासणी संदर्भात महाराष्ट्र विधान परिषद सदस्यांच्या तदर्थ समितीने दिनांक 16 जानेवारी 2008 रोजी जसलोक हॉस्पिटलला भेट देऊन रूग्णांचे रेकॉर्ड मागितले असता श्री.मनेश मसंद, मुख्य कार्यकारी अधिकारी, जसलोक रूग्णालय, मुंबई यांनी समितीस रेकॉर्ड देण्यास नकार दिल्यामुळे तसेच समिती सदस्यांशी दुरूत्तरे व गैरवर्तन केल्यामुळे उद्‌भवलेल्या समितीच्या, सन्माननीय सदस्यांच्या व महाराष्ट्र विधानपरिषदेच्या विशेष हक्कभंगाच्या प्रकरणावरील विधान परिषद विशेष हक्क समितीचा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

..... ओओ 4 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय दत्त (समिती प्रमुख, आश्वासन समिती) : सभापती महोदय, माझी आपणास विनंती आहें की, मघाशी मी आश्वासन समितीचा प्रमुख म्हणून विधान परिषद आश्वासन समितीचा अहवाल सभागृहाला सादर केला त्यावेळी मला त्यावर बोलावयाचे होते. परंतु आपण पुढील विषय पुकारल्याने मी खाली बसलो. तरी मला माझ्या समितीच्या अहवालासंबंधात आपण नंतर बोलण्याची संधी द्यावी.

सभापती : आता आपण त्यापासून पुढे गेलो आहोत. त्यामुळे आपणास तशी संधी देता येणार नाही.

यानंतर विधान परिषद विशेष हक्क समितीचा अहवाल सादर होईल. ..

(यानंतर श्री. सरफरे .... पीपी 1 ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: विशेष हक्क समितीचा पुनर्विलोकित अहवाल सादर करणे

श्री. गुरुनाथ कुलकर्णी (समिती प्रमुख) : सभापती महोदय, विशेष हक्क समितीचा ("यवतमाळ येथे चोरीच्या संशयावरुन अटक केलेल्या दोन आरोपींचा पोलीस अधीक्षक कार्यालयात झालेला मृत्यू" या विषयावर सन्माननीय सदस्यांनी दिलेल्या लक्षवेधी सूचनेसंबंधात तत्कालीन माननीय गृह राज्यमंत्री (ग्रामीण) यांनी केलेल्या लेखी निवेदनात जाणीवपूर्वक असत्य व सभागृहाची दिशाभूल करणारी माहिती दिल्याचे आरोपीत करुन त्यांचेविरुध्द उपस्थित केलेल्या महाराष्ट्र विधानपरिषद व सन्माननीय सदस्यांच्या विशेष हक्कभंगाच्या आणि अवमानाच्या प्रकरणावरील) पुनर्विलोकित अहवाल सादर करतो.

सभापती महोदय, हा अहवाल सभागृहाला सादर करीत असतांना मी सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो की, या विषयासंदर्भातील अहवाल विशेष हक्क समितीने तयार केला व तो या सभागृहामध्ये मांडण्यात आला होता. तो अहवाल समितीच्या सर्व माननीय सदस्यांनी एकमताने तयार केला होता. परंतु त्या अनुषंगाने समितीमध्ये चर्चा झाल्यानंतर समितीच्या काही सन्माननीय सदस्यांनी त्याबाबतीत अधिक माहिती मिळाली पाहिजे. तसेच, समितीच्या बैठकीला आपल्याला निमंत्रित करण्यात आले नाही अशाप्रकारच्या सूचना केल्या होत्या. त्यामुळे सन्माननीय उप सभापतींनी विशेष हक्क समितीला संपूर्ण अहवाल पुनर्विलोकित करण्यासंबंधी निदेश दिले होते. समितीने त्यासंबंधी अधिक तपासणी करुन हा पुनर्विलोकित अहवाल तयार केला. तो मी सभागृहाला सादर करीत आहे.

सभापती : विशेष हक्क समितीचा पुनर्विलोकित अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: नियम 93 अन्वये सूचना.

सभापती : सन्माननीय सदस्य सर्वश्री. जगदीश गुप्ता, पांडुरंग फुंडकर यांनी "मा.उच्च न्यायालयाने जाहिरातीबाबत निदेश देऊनही त्याकडे दुर्लक्ष करुन नागपूर मनपाने सन 2009-2010 या वर्षाची जाहिरात कार्टेल कंपनीकडे कोट्यावधी रुपये थकित असूनही सदर कंपनीस जाहिरात देणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री.दिलीपराव सोनवणे, व्ही.यू.डायगव्हाणे, वसंतराव खोटरे यांनी "जळगाव व धुळे जिल्ह्यात दि.17 डिसेंबर 2009 रोजी जोरदार वादळासह गारपिटीमुळे शेतकऱ्यांचे फलोत्पादन, कांदा, कापूस इत्यादी पिकांचे कोट्यावधी रुपयांचे नुकसान होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी "सिंधुदूर्ग जिल्ह्यातील कणकवली तालुक्यातील ओसरगाव येथे वन जमीन असून त्यात वन कायद्याचे उल्लंघन करुन दोन क्रशर लावण्याची परवानगी देणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी "महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ नागपूर येथील पद भरतीत गुणवत्ता डावलून भरती केल्याने पात्र उमेदवारांवर अन्याय होणेबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, संजय केळकर यांनी "मोहने, जि.ठाणे येथील एनआरसी कंपनीत सुमारे 5 हजार कामगार काम करीत असून सदर कामगार कंपनीच्या आवारात गेल्या अनेक वर्षापासून रहात असून त्यांना कंपनीने राहत्या जागा रिकाम्या करण्याचे आदेश देणे." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

. . . .2 क्यु- 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती . . . .

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, संजय केळकर यांनी "मुंबईतील दादर पश्चिम येथे झोपडपट्टीच्या पुनर्वसन योजनेच्या विकासकाने झोपडट्टीधारकांची बनावट संमती पत्रे बनवून फसवणूक केल्याबाबत पोलिसांकडे तक्रार दाखल करुनही त्यावर कारवाई न होणे." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री केशवराव मानकर, नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर यांनी "आमगाव जि.गोंदिया परिसरातील 48 गावातील नळ योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणा व्दारा सुरु होणे, सदर योजनेसाठी जिल्हापरिषद गोंदिया खर्च करीत नसल्याने दि.1 ऑक्टोबर 2009 पासून पूर्णत: बंद होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर,विनोद तावडे, रामनाथ मोते, मधुकर चव्हाण, अशोक मानकर यांनी "राज्यातील ग्रामपंचायतीच्या उत्पन्नाचे स्त्रोत असलेले जकात शासनाने बंद करुन त्याऐवजी अनुदान देणे सुरु करणे, तथापि गेल्या दहा महिन्यांपासून ग्रामपंचायतींना जकार कर अनुदान न दिल्याने कर्मचाऱ्यांवर आलेली उपासमारीची पाळी." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री.नितीन गडकरी, संजय केळकर, चंद्रकांत पाटील यांनी "अकोला जिल्ह्यातील मूर्तीजापूर शहरातील नियमित पाणीपुरवठा करण्यात यावा, घरकुल योजनेचा सर्व्हे करुन दारिद्र्यरेषेखालील व अन्य बेघर निराधार लोकांना घरकुल योजनेचा लाभ देणेबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री.विनोद तावडे, चंद्रकांत पाटील, संजय केळकर, रामनाथ मोते यांनी "भारताच्या प्रशासनात मराठी मुलांचा टक्का वाढविणारी आणि भविष्यातील प्रशासकीय अधिकारी निर्माण करणारी राज्य प्रशासकीय व्यवसाय प्रशिक्षण संस्थेच्या गैरकारभाराबाबत" या ....

. . . .2 क्यु-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी "दिनांक 10 ऑगस्ट 2009 रोजी धुळे जिल्ह्यात कोळी समाजाच्या विविध मागण्यांसाठी लोकशाही मार्गाने निघालेल्या मोर्चावर पोलिसांनी केलेला अमानुष लाठीहल्ला व गोळीबार" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी "मानखूर्द,मुंबई परिसरातील सरकारी जमिनी बळकावून तेथे अनधिकृत झोपडया बांधून विकण्याचा धंदा गेल्या कित्येक वर्षापासून सर्रास सुरु असून ठक्कर या बिल्डरने खोटी कागदपत्रे दाखवून नागरिकांची फसवणूक करणेबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, धन्यवाद.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांनी "मौजे चुळणे जि.ठाणे येथील जमीन, श्री.सुभाष मानकर यांनी श्री.बाळकृष्ण पाटील व इतरांकडून साठे करारावर मुखत्यार पत्राव्दारे विकत घेऊन त्यांची केलेली फसवणूक" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री.व्ही.यू.डायगव्हाणे, जयंत प्र.पाटील यांनी"नोबल एक्सप्लोकेम, वर्धा या कंपनीतील कामगारांनी त्यांच्या विविध मागण्यांसाठी दि.21-12-2009 रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करुन चार कामगारांनी विषारी औषध घेऊन त्यातील एकाची परिस्थिती गंभीर असणेबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

इतर सूचनांना मी अनुमती नाकारली आहे.

. . . .2 क्यु-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>नियम 93 च्या निवेदनाबाबत</u>

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, मी पूर्वी नियम 93 अन्वये सूचना दिली होती. प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन होत नाही म्हणून त्यांनी विष प्राशन करण्याचे आंदोलन केले.

यानंतर कु.थोरात . . .

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत ..

सभापती महोदय, आपण त्यावेळी तातडीने यावर निवेदन करावे असा अभिप्राय दिलेला आहे. आज तागायत त्याबाबतचे निवेदन आलेले नाही.

सभापती : उद्या येईल.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मी दिनांक 8 आणि 9 डिसेंबर, 2009 रोजी नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. मी यासंबंधात पाठपुरावा केला असता आपले सचिवालय याबाबतचा पाठपुरावा करीत आहे, या कार्यालयाकडून पत्र पाठविले जात आहेत, फोन केले जात आहेत पण संबंधित विभाग प्रतिसाद देत नाहीत. उद्या यासंबंधीची सर्व निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येतील. तेव्हा याबाबतीत संबंधित विभागाच्या मंत्र्यांना समज देण्यात यावी.

सभापती :माननीय उद्योगमंत्री सभागृहात उपस्थित आहेत तेव्हा नियम 93 ची सूचना ॲडमिट झाल्यानंतर त्यावरील निवेदन या सभागृहात लवकरात लवकर यावयास पाहिजेत अशी सन्माननीय सदस्यांची अपेक्षा असणार, त्यात काही गैर नाही. यादृष्टीने विधिमंडळामार्फत त्या त्या शासकीय विभागाला सतत तगादा लावण्यात येतो पण दुर्दैवाने ती निवेदने येत नाहीत ही परिस्थिती बरोबर नाही. उद्या या अधिवेशनाचा शेवटचा दिवस आहे तेव्हा राहिलेली सगळी निवेदने उद्या सभागृहासमोर येणे आवश्यक आहे, त्या दृष्टीने माननीय उद्योग मंत्र्यांनी सर्व विभागांना तसे कळविण्याचा प्रयत्न करावा.

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, होय.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. :रत्नागिरी गॅस प्रकल्पाच्या वीज दरात झालेली वाढ.

मु. शी.:रत्नागिरी गॅस प्रकल्पाच्या वीज दरात झालेली वाढ याबाबत ॲड.अनिल परब वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.विजय वडेट्टीवार (ऊर्जा राज्यमंत्री) : सभापती महोदय, ॲड. अनिल परब यांनी "रत्नागिरी गॅस प्रकल्पाच्या वीज दरात झालेली वाढ" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती :: निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

... 3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनिल परब : सभापती महोदय, महाराष्ट्रात विजेची टाचाई आहे आणि यासंदर्भामध्ये रत्नागिरी गॅस ॲन्ड पॉवर या प्रा. लिमिटेड कंपनीतून 930 मे.वॅ. वीज उपलब्ध होते. वेगवेगळया कंपनीशी करार केलेले आहेत. या ठिकाणी 930 मे.वॅ. वीज तयार होत असून पुढच्या वर्षी यामध्ये वाढ करण्याचा प्रयत्न आहे असे म्हटले आहे. परंतु खरोखर तेवढी वीज मिळत आहे काय? गॅसमुळे हा प्रकल्प किती वेळा बंद असतो. या सगळया वेगवेगळया गोष्टी असल्या तरी देखील जी एस्टिमेटेड कॉस्ट देण्यात येते. त्या एस्टिमेटेड कॉस्टला एम.आी.आर.सी. किंवा त्यांच्या वरची ॲपिलेटेड ॲथॉरिटी मजुरी देते. ही मंजुरी दिल्यानंतर ज्यावेळी पुन्हा ते तुमच्याकडे रिकव्हरीसाठी येते त्यावेळी तुमचा रिकव्हरी कंपनीशी असलेला करार किंवा त्या लोकांकडून वसुलीची जी पध्दत आहे, यामध्ये प्रोसेसमुळे जों कमी कालावधी होतो. या कमी कालावधीमुळे लोकांना जे पर युनिट पैसे भरावे लागतात ते पर युनिट दहा पैशाचे पस्तीस पैसे होतात. जर वेळेवर पूर्ण बारा महिन्यात रिकव्हरी केली तर त्याचे पर युनिट दहा पैसे पडू शकतात. पण प्रोसिजरल विलंबामुळे हा दर 35 पैसे युनिट इतका होतो. अगोदरच विजेच्या दरामुळे लोकांचे कंबरडे मोडले आहे. एस्टिमेटेड कॉस्ट देताना बाकीच्या गोष्टींची रचना करण्यात येत नाही. सभापती महोदय, असा जो फरक येतो व जो लोकांकडून जास्त दराने वसूल केला जातो, यासाठी शासन फरकाच्या वसुलीचा स्पॅन वाढविणार आहे काय? किंवा इलेक्ट्रिक कायद्याखाली असलेल्या सवलतीमध्ये शासन ही वसुली बंद करुन किंवा या वसुलीला स्थगिती देऊन याच्या बाबतीत सबसिडी देऊन लोकांना विजेच्या जास्त दरापासून दिलासा देणार काय?

श्री. विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, सजेशन फॉर ॲक्शन.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : जिल्हा रायगड येथील नळ पाणी पुरवठा योजना बंद असणे.

मु. शी. : जिल्हा रायगड येथील नळ पाणी पुरवठा योजना बंद असणे याबाबत श्री संजय केळकर वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. रणजित कांबळे (पाणीपुरवठा आणि स्वच्छता राज्यमंत्री) : सभापती महोदय, श्री. संजय केळकर यांनी जिल्हा रायगड येथील नळ पाणी पुरवठा योजना बंद असणे या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...5 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KTG/ MMP/ SBT/ KGS/

श्री संजय केळकर : सभापती महोदय, रायगड जिल्हयातील मौजे परखंदे या गावातील कोयना प्रकल्पग्रस्तांचा अत्यंत महत्वाचा विषय आहे.

या गावात पाणीपुरवठयाची योजना झालेली आहे. पण या गावाच्या जवळ जी वस्ती आहे त्या ठिकाणच्या लोकांना गेल्या कित्येक महिन्यापासून पाणी मिळत नाही. निवेदनामध्ये "मुख्य वस्तीपासून अंदाजे 250 मीटर अंतरावर" असे म्हटलेले आहे. ते 250 मीटर नसून 230 फूट आहे. सभापती महोदय, मला याठिकाणी दोनच प्रश्न उपस्थित करावयाचे आहेत. या वस्तीतील लोक कोयनाप्रकल्पग्रस्त आहेत त्यांना पाणी मिळाले नाही तर कसे चालेल? त्यामुळे यांच्यासाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था शासन करणार आहे काय? ती कधी करण्यात येणार आहे? त्यासाठी किती कालावधी लागणार आहे?

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, या परखंदे गावामध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची जुनी योजना होती. जे कोयना प्रकल्पग्रस्त होते त्यांच्यासाठी 2008 मध्ये 35 परिवारांसाठी वेगळी योजना मंजूर झालेली आहे. सन्माननीय सदस्यांनी जो स्पेसिफिक प्रश्न विचारलेला आहे त्याबाबत सांगू इच्छितो की, त्या ठिकाणी 4 घरे अशी आहेत की, ती आमच्या म्हणण्याप्रमाणे 250 मीटरवर आहेत. सन्माननीय सदस्य 230 फूट अंतर असल्याचे सांगत आहेत. तरी सुध्दा या दोन्ही वसाहतीपासून ही चार घरे वेगळी आहेत. त्या ठिकाणी जुन्या योजनेवर या 4 घरापर्यंत स्टँडपोस्ट आहे तसेच त्या ठिकाणी हबशी सुध्दा आहे. जी जुनी योजना आहे ती महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने 2001 मध्ये बांधली. ती योजना मध्ये बंद पडली होती परंतु आता ती योजना सुरु झाली आहे. त्याच योजनेच्या माध्यमातून आज सुध्दा या चार घरांना पाणी पुरवठा होत आहे.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, त्या ठिकाणी योजना चालू असल्याचे माननीय मंत्रिमहोदय जे म्हणत आहेत ती बाब असत्य आहे. आज सुध्दा मला तेथील प्रकल्पग्रस्तांचे फोन आले. त्यांनी सांगितले की, त्या ठिकाणी अधिकारी आले आणि त्यांनी योजना चालू केल्याचे नाटक केले. त्या वस्तीतील लोकांना एक थेंब सुध्दा पाणी मिळत नाही. ती योजना किती दिवसात सुरु करणार आणि त्यांच्या घरापर्यंत किती दिवसात पाणी पोहोचविणार ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य जो मुद्दा उपस्थित करीत आहेत तो फक्त 4 घरांच्या संदर्भात आहे.

श्री. संजय केळकर : त्या वस्तीमध्ये 50 लोक राहतात.

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ज्या वस्तीबाबत बोलत आहेत त्याबाबत सांगू इच्छितो की, कोयना धरणाचे जे धरणग्रस्त आहेत त्यांच्यासाठी वेगळी योजना आहे आणि ही जी 4 घरे आहेत त्यांच्यासंबंधी सन्माननीय सदस्य उल्लेख करीत आहेत. त्यांच्यासाठी जुन्या योजनेवर स्टँडपोस्ट आहे. जुनी योजना बंद होती म्हणून या लोकांना पाणी मिळत नव्हते. त्यांची अशी विनंती होती की, धरणग्रस्तांसाठी जी योजना बांधलेली आहे त्यातून कनेक्शन द्यावे. या दोन्ही योजना हस्तांतरित झालेल्या आहेत. कोणत्या योजनेतून कोणत्या भागाला पाणी द्यावयाचे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ SBT/

श्री. रणजित कांबळे ....

ही बाब स्थानिक स्वराज्य संस्थेच्या अधिकारामध्ये आहे. एकदा योजना बांधल्यानंतर आणि स्थानिक स्वराज्य संस्थेला हस्तांतरित केल्यानंतर ती योजना कशी चालविली पाहिजे, त्याची देखभाल व दुरुस्ती कशी केली पाहिजे तसेच ज्या भागामध्ये पाणी पोहोचत नाही त्या भागात पाणी उपलब्ध करुन देण्याची पूर्ण जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थेची आहे. नवीन योजनेच्या माध्यमातून पाणी मिळत आहे की जुन्या योजनेतून पाणी मिळत आहे हा त्यांचा प्रश्न आहे. मधल्या काळामध्ये जुनी योजना बंद झाली होती. परंतु आता मी या सभागृहामध्ये सांगू इच्छितो की, आज सकाळी ती योजना चालू होती आणि आहे. त्या ठिकाणी चार घरांचा प्रश्न आहे. ही बाब मी स्वत: तपासून घेतो आणि त्या 4 घरांच्या ठिकाणी पाणी पोहोचविण्याची व्यवस्था कशी करता येईल यादृष्टीने व्यवस्था करतो.

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : हजारो मागासवर्गीय शिक्षण सेवकांना नियमबाह्य पध्दतीने वेतनश्रेणीपासून वंचित ठेवण्यात येणे

मु. शी. : हजारो मागासवर्गीय शिक्षण सेवकांना नियमबाह्य पध्दतीने वेतनश्रेणीपासून वंचित ठेवण्यात येणे याबाबत सर्वश्री रामनाथ मोते, संजय केळकर, चंद्रकांत पाटील, भगवान साळुंखे, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

प्रा. फौजीया खान (शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री रामनाथ मोते, संजय केळकर, चंद्रकांत पाटील, भगवान साळुंखे, वि. प. स. यांनी "हजारो मागासवर्गीय शिक्षण सेवकांना नियमबाह्य पध्दतीने वेतनश्रेणीपासून वंचित ठेवण्यात येणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवते.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...4 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, हा प्रश्न मी प्रत्येक अधिवेशनामध्ये उपस्थित करीत आहे आणि शासनाकडून तेच ते उत्तर मिळत आहे. मला असे वाटले होते की, सन्माननीय सदस्या मंत्री झाल्यानंतर यामध्ये काही बदल होईल. कारण या प्रश्नासाठी त्या सुध्दा आमच्या बरोबर लढत होत्या आणि आता त्यांना या प्रश्नाच्या संदर्भात उत्तर द्यावयाचे असल्यामुळे उत्तरात बदल होईल अशी अपेक्षा होती. परंतु उत्तरामध्ये काहीही बदल झालेला नाही. राज्यातील मागासवर्गीय शिक्षण सेवकांचा हा प्रश्न आहे. यासंदर्भात मी लक्षवेधी सूचना दिली होती ती स्वीकृत झाली पण चर्चेला आली नाही त्यामुळे मला आता एक दोन जास्त प्रश्न विचारण्याची संधी द्यावी अशी मी विनंती करतो. राज्यातील मागासवर्गीय शिक्षकांचा हा प्रश्न आहे. जे शिक्षक अनुसूचित जमातीचे आहेत, विमुक्त जाती आणि भटक्या जमातीचे आहेत, विशेष मागास प्रवर्गातील आहेत त्यांच्या आरक्षणाची टक्केवारी पूर्ण करण्यासाठी त्यांच्या नेमणुका करण्यात आल्या आहेत. आता ते शिक्षक अप्रशिक्षित असले तरी तीन वर्षे होऊनही त्यांना शासनाने प्रशिक्षणाची संधी दिलेली नाही. त्यामुळे तीन वर्षे पूर्ण झाल्यानंतर त्यांना फक्त 1500 रुपये मानधन देणे योग्य नाही. ते नियमबाह्य आणि अन्यायकारक आहे. माझा स्पेसिफिक प्रश्न आहे. त्यांनी प्रशिक्षण घेणे आणि त्यांना मिळणाऱ्या वेतनश्रेणीचा काही संबंध नाही.

यानंतर श्री. खंदारे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते....

आता आपल्या कायद्याप्रमाणे अप्रशिक्षित शिक्षकांना वेतनश्रेणी दिलेली आहे. ज्या शिक्षण सेवकांची सेवा 3 वर्षे समाधानकारकपणे पूर्ण झाली आहे अशा शिक्षण सेवकांना शासन अप्रशिक्षित शिक्षकांची वेतनश्रेणी तातडीने लागू करणार आहे काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, सन 2000 सालापासून राज्यात शिक्षण सेवक योजना कार्यान्वित झाली आहे. त्यानंतर फेब्रुवारी, 2003 मध्ये सुधारित योजना लागू झाली. अनुसूचित जाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गातील अप्रशिक्षित शिक्षकांनी 3 वर्षात प्रशिक्षण पूर्ण केले पाहिजे अशी त्यात अट होती. आता दिनांक 29.1.2008 च्या नवीन जी.आर.नुसार त्यांची सेवा प्रोटेक्ट करण्यात आलेली आहे. परंतु नियमित शिक्षक होण्यासाठी त्यांचे प्रशिक्षित होणे आवश्यक आहे. प्रशिक्षित झाल्यानंतरच त्यांना नियमित वेतनश्रेणी मिळेल, याशिवाय ते शक्य नाही असे मला सांगावयाचे आहे.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, शिक्षण सेवकांच्या कायद्यात 3 वर्षांची अट आहे. 3 वर्षे झाल्यानंतर त्यांना मानधनावर ठेवणे हे नियमबाह्य आहे. याबाबत कायद्यात तरतूद आहे. न्यायालयाने निर्णय दिलेला आहे की, 3 वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी त्या कर्मचाऱ्यांना शिक्षण सेवक म्हणून ठेवता येणार नाही, त्यांना अप्रशिक्षित शिक्षकांची वेतनश्रेणी देण्यात यावी.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, नियमानुसार त्या शिक्षकांनी प्रशिक्षित होणे गरजेचे आहे. शासनाने त्यांच्या सेवा प्रोटेक्ट करुन एक चांगले पाऊल उचलले आहे. पण त्यांचे प्रशिक्षण पूर्ण झाल्याशिवाय त्यांना नियमित करता येत नाही.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी स्पष्ट प्रश्न विचारला होता. जे उमेदवार मागासवर्गीय प्रवर्गातील आहेत, विशेष करुन आदिवासी उमेदवार आहेत, ज्या भागात शिक्षक जाण्यास तयार होत नाहीत. त्या भागात हे शिक्षक सेवक काम करीत असल्यामुळे त्यांना अप्रशिक्षित शिक्षकांची वेतनश्रेणी देणार काय ? त्याच्याशी शिक्षण सेवकांचा संबंध जोडणे म्हणजे बादरायण संबंध जोडण्यासारखे होत आहे. शासनाच्या धोरणानुसार अप्रशिक्षित वेतनश्रेणी त्यांना दिली जाईल काय ? आम्ही नियमित वेतनश्रेणी मागत नाही, आम्ही अप्रशिक्षित शिक्षकांची वेतनश्रेणी मागत आहोत.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, हजारो मागासवर्गीय शिक्षकांसाठी शासनाने सकारात्मक भूमिका घेतली आहे. तरीही त्या शिक्षकांनी प्रशिक्षित होणे गरजेचे आहे. जोपर्यंत ते ही अट पूर्ण करीत नाही तोपर्यंत त्यांना....

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांचा प्रश्न असा आहे की, शिक्षण विभागामध्ये मागासवर्गीय शिक्षकांच्या संदर्भात अप्रशिक्षित शिक्षकांसाठी सुध्दा काही वेतनश्रेणी आहे. ती वेतनश्रेणी शिक्षण सेवकांनी 3 वर्षे पूर्ण केल्यानंतर दिली जाईल का ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, ही तरतूद नियमित शिक्षकांसाठी आहे. शिक्षण सेवकांसाठी नाही.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : अपंग एकात्मक शिक्षण योजनेतील शिक्षकांचे वेतन बंद केल्याने त्यांची होत असलेली उपासमार

मु. शी. :अपंग एकात्मक शिक्षण योजनेतील शिक्षकांचे वेतन बंद केल्याने त्यांची होत असलेली उपासमार याबाबत सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, रामनाथ मोते, मधुकर चव्हाण, अशोक मानकर वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

प्रा.फौजिया खान (शालेय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, रामनाथ मोते, मधुकर चव्हाण, अशोक मानकर यांनी "अपंग एकात्मक शिक्षण योजनेतील शिक्षकांचे वेतन बंद केल्याने त्यांची होत असलेली उपासमार" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवते.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

... 4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, राज्यामध्ये अपंग एकात्म शिक्षण योजना गेल्या 30 वर्षापासून राबविली जात आहे. शालेय शिक्षण विभागाच्या अंतर्गत ही योजना असून अपंग मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्र शासनाने 1978 सालापासून सुरु केली आहे. असे असताना या योजनेनुसार जवळपास 600 पेक्षा अधिक युनिट्स राज्यात काम करतात आणि 700 शिक्षक याच्याशी संबंधित आहेत. या शिक्षकांना फेब्रुवारी, 2009 पासून शासनाने वेतन देणे बंद केले आहे. या निवेदनामध्ये असे म्हटलेले आहे की," सध्या कार्यरत 595 विशेष शिक्षकांचे वेतन अदा करणे शक्य झालेले नाही, तथापि, या योजनेंतर्गत कार्यरत शिक्षक वेतनापासून वंचित राहू नयेत म्हणून संबंधित 595 विशेष शिक्षकांचे वेतन मंजूर करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे."

यानंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. पांडुरंग फुंडकर..

नेमकी कोणती कारवाई सुरु आहे ? फेब्रुवारी पासून या शिक्षकांना वेतन मिळालेले नाही. आता हे वर्ष संपत आलेले आहे. जवळ जवळ वर्षभर ते विनावेतन काम करीत आहेत. तेव्हा या शिक्षकांना लवकरात लवकर केव्हा वेतन देण्यात येईल ? तसेच या शिक्षकांचे वेतन रोखले असेल तर ते का रोखले गेले ?

प्रा. फौजिया खान : या शिक्षकांना एप्रिल 2009 पासून वेतन देण्यात आलेले नाही, हे खरे आहे. याचे कारण असे की, प्राथमिक शाळांसाठी ही केन्द्र पुरस्कृत योजना आहे. आता ही योजना केन्द्र सरकारने माध्यमिक शाळांसाठी अमलात आणलेली असून प्राथमिक शाळेची जबाबदारी राज्य शासनावर टाकलेली आहे. केन्द्र शासनाचे म्हणणे असे आहे की, या शिक्षकांना सर्वशिक्षा अभियानाच्या माध्यमातून वेतन देण्यात यावे. सर्वशिक्षा अभियानामध्ये कॉंट्रॅक्ट पध्दतीवर शिक्षक नेमलेले आहेत आणि प्रश्नाधीन शिक्षक हे नियमित शिक्षक आहेत. यामध्ये थोडीशी कायदेशीर बाब निर्माण झाल्यामुळे वित्तविभागाकडे प्रकरण पाठविले होते. वित्त विभागाने काही क्वेरीज काढल्यानंतर त्या क्वेरीजची पूर्तता करुन पुनश्च फाईल वित्त विभागाला पाठविलेली आहे. वित्त विभागाकडून ती फाईल आल्यानंतर या शिक्षकांना वेतन देण्यात येईल. याबाबतीत शासनाने असा सकारात्मक विचार केलेला आहे की या सर्व शिक्षकांचे मंजूर पदावर समायोजन करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीर असून मंत्रिमंडळापुढे तो सादर करण्यात येणार आहे. मंजूर पदांवर त्यांचे समायोजन झाले तर त्यांचा प्रश्न कायमचा मिटेल.

श्री. पांडुरंग फुंडकर : केन्द्र सरकारने प्राथमिक स्तरावरील योजना आता माध्यमिक स्तरावर सुरु केलेली आहे आणि राज्य सरकारवर प्राथमिक स्तराची जबाबदारी टाकलेली आहे. यासंबंधीचे परिपत्रक केन्द्र सरकारने केव्हा काढले ? या 600 शिक्षकांच्या वेतनाची राज्य सरकारने एक वर्षापासून तरतूद करण्यला पाहिजे होती. हे शिक्षक वर्षभर विनावेतन काम करीत आहेत. मंजूर पदावर या शिक्षकांचे समायोजन केले तर त्यांचा प्रश्न कायमचा सुटेल असे माननीय मंत्री महोदयांनी सांगितले. त्यांनी असेही सांगितले की, या संबंधीची फाईल वित्त विभागाकडे पाठविण्यात आलेली आहे. सभापती महोदय, खात्यामध्ये सहा-सहा महिने फाईल अडकून राहिली तर या शिक्षकांचे भरणपोषण कसे होणार ? तेव्हा या शिक्षकांना लवकरात लवकर वेतन देण्यासाठी माननीय मंत्री महोदय या प्रकरणी स्वत: लक्ष घालतील काय ?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान : या शिक्षकांना लवकरात लवकर पगार मिळावा हीच माझी भूमिका आहे. दिनांक 13 एप्रिल 2009 रोजी केन्द्र शासनाकडून राज्य शासनाला परिपत्रक प्राप्त झाले. हा प्रश्न सुटावा यासाठी मी व्यक्तिश: लक्ष घालीन.

<u>नियम 93च्या निवेदन क्रमांक 5 संबंधी</u>

सभापती : नियम 93चे निवेदन क्रमांक 5 पुढे ढकलण्यात येत असून ते उद्या घेण्यात येईल.

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: औचित्याचा मुद्दा

सभापती : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या सभागृहाचे संकेत आणि प्रथा-परंपरा यासंबंधीचा माझा औचित्याचा मुद्दा आहे. मला व्यक्तिगत कुणावर दोषारोप करावयाचे नाहीत. परंतु या लोकशाहीच्या मंदिरामध्ये लोकशाहीच्या परंपरा सांभाळल्या जाव्यात यासाठी मी हा मुद्दा उपस्थित करीत आहे. काल या सदनामध्ये जे काही घडले ते आपल्या प्रथा आणि परंपरेला न शोभणारे होते.

...नंतर श्री. पां. खर्चे...

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

एक म्हणजे कामकाज पत्रिकेवर आमचा प्रस्ताव दाखविलेला होता आणि आपण आपल्या दालनात चर्चा केल्यानुसार सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांचा एक तासाचा प्रस्ताव अगोदर घ्यावा अशी विनंती केल्यानंतसार सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांच्या प्रस्तावावर सभागृहात चर्चा सुरु झाली. हा प्रस्ताव सुरु असतानाच मध्येच सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी साहेब, प्रधान समितीचा अहवाल सभागृहात मांडणार म्हणून हजर झाले असता त्यांची राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून निवड झाल्याच्या निमित्ताने त्यांच्या अभिनंदनाचा प्रस्ताव सुरु झाला. खरे म्हणजे हा प्रस्ताव शासनाकडून अगोदर मांडायला हवा होता. तसा तो प्रस्ताव शासनाकडून आला असता तर त्यावर आवरत्या स्वरुपात बोलणे शक्य झाले असते. त्यावेळेस तो सन्मानित असा प्रस्ताव झाला असता. परंतु तसे न होता कोणीही उठतो आणि बोलतो असे चित्र त्यावेळेस सभागृहात दिसत होते. ज्याच्या मनात आले तो उठून बोलू लागला, यामध्ये सभागृहाची कोणतीही परंपरा नव्हती किंवा संकेतही दिसून येत नव्हते. त्यात आमच्याकडून मर्यादित सदस्य बोलले. पण प्रत्येक वेळेस उठून बोलू लागले त्यामुळे मलाही भरुन आले. एखाद्या व्यक्तिचे अभिनंदन एवढे सुसंस्कृतपणे चालू आहे असेच वाटायला लागले. अर्थात सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांचा सन्मान व्हायला नको अशा मताचा मी नाही. परंतु जेवढी उत्स्फुर्तता या अभिनंदनाच्या प्रस्तावावर भाषण करताना दिसून येत होती तेवढी उत्स्फुर्तता कालच जागतिक दर्जाचा खेळाडू सचिन तेंडुलकर याच्या विश्वविक्रमाच्या निमित्ताने अभिनंदन करणारा प्रस्ताव सभागृहात आल्यानंतर आढळून आली नाही. कारण हा प्रस्ताव माननीय मंत्री महोदयांनी मांडल्यानंतर त्यांनी वाचला, नंतर विरोधी पक्षाकडून वाचण्यात आला आणि आपण तो संपवून टाकला. अशा प्रकारे कामकाज व प्रथा परंपरांचे पालन न करता सभागृहाचे कामकाज चालू राहिले तर ते सुदृढ लोकशाहीच्या दृष्टीने योग्य होणार नाही. हे करीत असताना शिक्षणाचा जो प्रस्ताव होता तो कुठे वाहून गेला ते कळलेच नाही. हे सुरु असताना माननीय मंत्री महोदय उभे राहिले आणि डॉ. दीपक सावंत आपण लेगवर आहात असे ते म्हणाले. ते मला समजले नाही. तसेच माननीय उपसभापती आल्यानंतर त्यांनी आम्हाला सांगितले तेव्हा सभागृहात बिलावर चर्चा झाली. जर अशा प्रकारे बिलावर चर्चा होणे आवश्यक असताना, चर्चा झाली म्हणून सांगून विधेयक पास करण्यात आले हा

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

एक वेगळा विषय आहे. परंतु सभागृहात असत्य सांगून एका मागून एक असे चार विधेयके पास करुन घेण्यात आली. त्यानंतर आपण बोलाविले व पुन्हा विधेयक घेण्यास भाग पाडले. परंतु पुढे गेलेले कामकाज पुन्हा मागे आणणे ही प्रथा सुरु झाली. त्यानंतर या विधेयकाच्या बाबतीत वाद निर्माण झाला. सभागृहात अनेक ज्येष्ठ सन्माननीय सदस्य आहेत त्यांची प्रतिष्ठा राखली गेली पाहिजे. विधेयक पुकारल्यानंतर सुध्दा त्या खात्याचे मंत्री उपस्थित नसतात म्हणून शेवटी संसदीय कामकाज मंत्र्यांनी ते विधेयक मांडले हे अप्रस्तुत असेच आहे. हे आपण थांबविले पाहिजे. या सर्व घटनाक्रमामध्ये शिक्षणासारखा महत्वाचा जो प्रस्ताव आहे त्याचा कुठेच पत्ता नाही. मी काल तेच सांगण्याचा प्रयत्न केला की अशा प्रकारे ज्या पध्दतीने कामकाज चालू आहे असे कामकाज पुन्हा होता कामा नये अशी विनंती करतो. कारण या सभागृहात विरोधी पक्षाचा सदस्य असला तरी त्याला सरकारला वेठीस धरण्याचा अधिकार आहे, अशी तरतूद आहे. म्हणून सर्व सन्माननीय सदस्यांना जे अधिकार प्राप्त झालेले आहेत त्या अधिकाराचे पालन होऊन ते अधिकार त्यांना मिळावेत अशी सूचना करतो आणि अशी विसंगती पुन्हा निर्माण होऊ नये अशी सूचना करतो.

अशुध्दीत प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, सभागृहात नियम 260 अन्वये सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी प्रस्ताव आणला होता. त्यावर चर्चा सुरु असताना सनमाननीय सदस्य श्री. नितीन गडकरी साहेब सभागृहात आले आणि त्यांचे अभिनंदन करणाऱ्या प्रस्तावावर चर्चेला सुरुवात श्री. कपिल पाटील यांनीच करुन दिली. नंतर माननीय मंत्री महोदयांनी तो प्रस्ताव सभागृहात मांडला एवढेच मला आपल्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : आदरणीय सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी औचित्त्याचा मुद्दा उपस्थित केलेला आहे. हे वरिष्ठ सभागृह आहे. या सभागृहाच्या काही प्रथा, परंपरा आहेत. हे सभागृह कशा पध्दतीने चालले पाहिजे यासंबंधी काही विशेष नियम सुध्दा तयार करण्यात आलेले आहेत. सभागृहाचे कामकाज कशाप्रकारे चालावे यासाठी नियमांचे पुस्तक सुध्दा आहे. त्यामुळे नियमांप्रमाणे सभागृहाचे कामकाज चालले पाहिजे. लोकशाही परंपरेमध्ये विधीमंडळाचे कामकाज हे घालून दिलेल्या नियमानुसार व्हावयास पाहिजे. सभागृहात नियमानुसार कामकाज होत नसेल तर आपण न्यायाच्या खुर्चीत बसलेला आहातच. मी गेल्या 5-6 वर्षापासून या सभागृहाचा सदस्य म्हणून बसतो आहे. परंतु हल्ली हळू हळू जस जसा काळ जातो आहे तस तसे नियम आणि संकेत कुठे तरी बाजूला करुन, वेगळया पध्दतीची सिस्टम वाढू पहात आहे. या विषयाच्या संदर्भात मी आपल्याला विनंती करतो की, हे वरिष्ठ सभागृह आहे. या सभागृहात परंपरा, संकेत पाळूनच या सभागृहाचे कामकाज झाले पाहिजे. सरकारपुढे काही अडचणी असतील तर आपल्या दालनात गटनेत्यांना बोलावून त्यावर तोडगा काढून कामकाज झाले पाहिजे, विधेयके घेतली पाहिजेत यात काहीही वाद नाही. काल सुध्दा आम्ही चार बिले मंजूर करण्यास सहमती दर्शवली होती. बिले थांबलेली आहेत म्हणून गोंधळात बिले मंजूर करुन घेणे हे योग्य नाही. राज्याच्या जनतेच्या दृष्टीने विधेयके फार महत्वाचे असतात. कारण त्याचे दुरगामी परिणाम राज्याच्या जनतेच्या जीवनमरणावर होत असतो. सभागृहात जेव्हा बिल येते तेव्हा त्या बिलावर बोलण्याचा सभागृहाच्या सर्व सन्माननीय सदस्यांना अधिकार असतो. जनतेच्या कल्याणासाठी बिलांवर अधिकाधिक चर्चा झाली पाहिजे. जर बिलांच्या अनुषंगाने राज्यातील जनतेवर त्याचे विपरित परिणाम होणार असतील तर ती बाब विरोधी पक्ष म्हणून सरकारच्या वा मंत्र्यांच्या निदर्शनास आणून देत असतात. घाईगडबडीत बिल मंजूर झाले तर मग ते अडचणीचे होऊन बसते. विधीमंडळ हे कायदेमंडळ आहे. कायदे तयार होतांना त्यावर अंकुश राहिला पाहिजे आणि त्या सर्वांवर आपला अंकुश असतोच. हल्लीच्या कालखंडात किमान या वरिष्ठ सभागृहात तरी संकेत पाळून कामकाज झाले पाहिजे. या सभागृहाच्या परंपरा पाळून सभागृहाचे काम झाले पाहिजे, लोकशाही मुल्यांची जोपासना करुन सभागृहाचे कामकाज चालले पाहिजे अशा प्रकारची विनंती मी औचित्त्याच्या मुद्याच्या माध्यमातून करतो.

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सभागृहाचे ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी या ठिकाणी औचित्त्याचा मुद्दा मांडला असून त्यावर सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. फुंडकर साहेबांनी देखील आपले विचार व्यक्त केलेले आहेत. या सभागृहाच्या अनेक उच्च परंपरा आहेत. या परंपरा जपण्याचा प्रयत्न आपण नेहमीच करीत असतो. या सभागृहाच्या काही प्रथा आहेत, परंपरा आहेत, तसेच काही संकेत आहेत. तसेच नियम समितीच्या माध्यमातून काही नियम सुध्दा करण्यात आलेले आहेत. या सर्व बाबी सातत्याने आपल्या डोळयासमोर ठेवून या सदनाचे कामकाज योग्य आणि अचूक व्हावे अशाच या सदनातील दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांच्या सातत्याने भावना असतात. सदस्यांच्या भावना जपण्याचे काम पीठासीन अधिकारी या नात्याने माझ्याकडे, उपसभापतींकडें तसेच तालिका सभापतींकडे येत असते. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी दोन मुद्दे या ठिकाणी उपस्थित केलेले आहेत ते गंभीर आहेत. मला वाटते यासंदर्भात नियम समितीची एक बैठक घेणे,

यानंतर श्री. गायकवाड.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

माननीय सभापती .....

त्याचबरोबर गट नेत्यांची व विरोधी पक्ष नेत्यांची, सभागृहाच्या नेत्यांची आणि संसदीय कार्य मंत्र्यांची बैठक घेणे अशा दोन बाबी मी अत्यंत महत्वाच्या समजतो.सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी पहिला मुद्दा असा मांडला होता की, सन्माननीय सदस्य श्री नितीन गडकरी हे गेल्या 20 वर्षापासून या सभागृहाचे सदस्य आहेत. त्यांना त्यांच्या पक्षाच्या माध्यमातून राष्ट्रीय पातळीवरील एवढा मोठा बहुमान मिळालेला आहे. यापूर्वीसुध्दा असे प्रसंग आलेले आहेत आणि या नंतरसुध्दा असे प्रसंग येतील. परंतु प्रथा आणि परंपरा तसेच नियमांच्या दृष्टीने कोणतीही बाब सदनासमोर आणत असतांना एखादा अभिनंदाचा प्रस्ताव सदनासमोर येत असतांना सदनाचे नेते आणि विरोधी पक्ष नेते यांनी त्याचबरोबर वेगवेगळे गट नेते या सर्वांनी मिळून ठरविलेला एखादा प्रस्ताव जर सभापतीसमोर आला तरच ख-या अर्थाने त्यावर योग्य पध्दतीने विचार होतो. याबाबातीत या पेक्षा अधिक बोलणे योग्य नाही असे मला वाटते. खरे म्हणजे आपण सातत्याने इमोशनल व्हावयास लागलो आहोत.एक दिवस सन्माननीय सदस्य श्री कपिल पाटील यांनी एखादी सूचना केली, दुस-या दिवशी आणखी एका सन्माननीय सदस्यांनी सूचना केली वा आणखी एखाद्या महिला सन्माननीय सदस्यांनी सूचना केली तर अशी प्रथा राहता कामा नये.या संदर्भात आणखी जास्त न बोलता मी याबाबतीत नियम समितीची बैठक बोलावतो. गट नेत्यांची आणि विरोधी पक्षाचे नेते तसेच सभागृहाचे नेते यांनाही मी एकत्रितपणे बोलावतो आणि यासंबंधीची चर्चा करतो. आपले सभागृह हे कायदे मंडळ आहे. राज्यातील सर्वसामान्यांच्या हितासाठी सर्वागीण विकासासाठी अनेक पध्दतीचे कायदे तयार केले जातात हे कायदे तयार करीत असताना ते अत्यंत अचूक झाले पाहिजेत व योग्य झाले पाहिजेत. त्या संदर्भात या ठिकाणी सखोल आणि सविस्तर चर्चा झाली पाहिजे, कायदे मंडळात सर्वात जास्त चर्चा शासकीय विधेयकावर झाली पाहिजे. परंतु हा कार्यक्रम ठरवत असतांनाच प्रत्येक सन्माननीय सदस्यांच्या मतदारसंघातील अनेक प्रश्न असतात. तारांकित प्रश्नाच्या माध्यमातून तसेच इतर संसदीय आयुधाव्दारे ते प्रश्न सभागृहासमोर येत असतात. अशा प्रकारे कितीही प्रश्न आले तरी नियम समितीने ठरविल्याप्रमाणे एक तासात ते संपले पाहिजेत .लक्षवेधी सूचना आणि अन्य आयुधे आहेत त्याबाबतीत या पूर्वी माझी आणि सन्माननीय

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

माननीय सभापती .....

विरोधी पक्ष नेते व अन्य गट नेत्यांबरोबर चर्चा झाली होती . त्यादृष्टीने सुध्दा आपण वेळेचे काही बंधन घातले पाहिजे. एका तासामध्ये पाच लक्षवेधी सूचना होऊ शकतील किंवा एका तासात सहासुध्दा लक्षवेधी सूचना होतील किंवा सातही लक्षवेधी सूचना होऊ शकतील. दररोज जास्तीत जास्त लक्षवेधी सूचना याव्यात असे माझे मत आहे.चॅरिटेबल हॉस्पिटलच्या बाबतीत वा अन्य काही प्रश्नाच्या बाबतीत मी असे पाहिले आहे की लक्षवेधी सूचना आणि अर्धा तासाची चर्चा ही दोन आयुधे मोठी परिणामकारक झालेली आहेत. परंतु लक्षवेधी सूचनेसाठी दोन अडीच तास खर्च केले वा नियम 93 च्या निवेदनावरील प्रश्नोत्तरामध्ये आणखी एक दीड तास खर्च केले तरी सन्माननीय सदस्य श्री दिवाकर रावते , त्याचप्रमाणे सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर वा दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांचीसुध्दा हीच इच्छा आहे की , कोणतेही शासकीय विधेयक हे परिपूर्ण झाले पाहिजे. शासकीय विधेयकाला आज वेळ कमी पडत आहे.अशी माझी भावना आहे. या निमित्ताने नियम समिती, त्याचबरोबर गट नेते आणि विरोधी पक्ष नेते आणि सभागृहाचे नेते यांच्याबरोबर चर्चा करीत असतांना सभागृहातील निम्म्यापेक्षा जास्त वेळ शासकीय विधेयकांना देण्याचा आपण ठामपणे निर्णय घेऊ या ...

नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती ....

आणि राहिलेले जे काम आहे तेही महत्त्वाचे आहे. त्यासाठी 50 टक्के, 40 टक्के वेळ दिला तर ते योग्य होईल आणि अशा पद्धतीने वेळेचे वाटप करण्याची गरज आहे. म्हणून या दृष्टीने काही निर्णय आपण घेतले तर आपल्या मनातील ज्या भावना आहेत, त्या दोन्ही बाजूच्या सदस्यांच्याही आहेत. अर्थात आपल्या भावना आपण येथे पोटतिडकीने मांडल्या आहेत. तेव्हा अशा प्रकारे विधायक निर्णय आपण घेऊ या की जेणे करून शासकीय विधेयकांना जास्तीत जास्त वेळ आपल्याला येथे देता येईल. कालदेखील येथे माननीय संसदीय कार्य मंत्री, कामगार मंत्री तसेच अन्य मंत्रीही उपस्थित होते. शासनाला मी या निमित्ताने सूचना देईन की, काल ज्यावेळेस या ठिकाणी चार शासकीय विधेयके चर्चेसाठी आणि मंजुरीसाठी आली त्यावेळी माननीय उपसभापती यांनी ती पुकारली. पण ही चारही विधेयके मांडण्यासाठी संबंधित मंत्री सभागृहात उपस्थित नव्हते. अशा प्रकारे प्रत्यक्ष कामाच्या वेळी कोणी मंत्री सभागृहात उपस्थित नसतील तर ते बरोबर नाही. किंबहुना आपले राज्यमंत्री, जे संसदीय कामकाज पाहतात किंवा आपले पक्ष-प्रतोद आहेत त्यांची ही जबाबदारी आहे, त्यांचे हे काम आहे की, कामकाज पत्रिकेवरील 'अ' काम संपत आले आहे, त्यापुढील 'ब' काम आता घेतले जाणार आहे तर संबंधित मंत्र्यांना त्यासाठी सभागृहात उपस्थित राहण्याच्या दृष्टीने त्यांनी व्यवस्था केली पाहिजे. अर्थात ही आपली अंतर्गत व्यवस्था आपण केली पाहिजे. परंतु तसे झाले नाही आणि सभागृहात जेव्हा चार विधेयके चर्चेला आली त्यावेळी शासनाच्या वतीने संबंधित मंत्री महोदय उपस्थित नसावेत ही गोष्ट बरोबर नाही. तेव्हा याबाबतीत आपण भविष्यात काळजी घ्यावी आणि या पुढील काळात असे पुन्हा होता कामा नये. नंतरच्या काळात मी माननीय विरोधी पक्षनेता आणि अन्य पक्षीय गटनेते यांना बोलावून सांगितले की, आपण 2-3 शासकीय विधेयके घेऊ व त्यांनीही ते कबूल केले. त्यानंतर सभागृहात 2-3 विधेयके पारित झाली. त्यावेळी सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत आणि अन्य सदस्य त्यापैकी दोन विधेयकांवर बोलले. तिसऱ्या विधेयकाच्या वेळी मात्र विरोधी पक्ष सदस्यांनी सभात्याग केला होता. त्या दरम्यानच्या काळात पुढील विधेयके वाचली गेली आणि ती पूर्ण केली गेली. मला वाटते सदनातील कोणतीही गोष्ट, अगदी छोट्यातील छोटी गोष्ट चुकली वा अन्य कोणताही प्रमाद झाला तर त्याबद्दल या सभागृहाचा सभापती म्हणून, या सभागृहाचा विश्वस्त म्हणून मी दिलगिरी व्यक्त करतो, I am sorry. शेवटी महाराष्ट्राच्या प्रथा, परंपरा टिकविणारे हे सभागृह आहे, सार्वभौम

.... वायवाय 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती ...

सभागृह आहे. अशा ठिकाणी अशा वेळी शासकीय विधेयके आणि अन्य पद्धतीचे कामांना जास्तीत जास्त वेळ देण्याच्या दृष्टीने आपल्या काही विधायक सूचना असतील तर त्या समजून घेणे गरजेचे आहे. काल देखील येथे तीन विधेयके घेण्याचे ठरले असताना त्यातील एका विधेयकावर विरोधी पक्ष सदस्यांनी सभात्याग केल्यानंतर पुढील विधेयके वाचली गेली आणि ते काम पूर्ण केले गेले. अनावधानाने ते झाले असेल ... त्याबद्दल म्हणूनच मी दिलगिरी व्यक्त केली आहे ... कारण शेवटी एखादी चांगली गोष्ट घडली तर सभापतींच्या अचूक व चांगल्या मार्गदर्शनाने तसे झाले असे म्हटले जाते त्याचप्रमाणे एखादी गोष्ट अनावधानाने राहिली तर त्याबद्दल मला 'सॉरी' म्हटलेच पाहिजे. ..

डॉ. दीपक सावंत आणि अन्य काही सदस्य (एकदम उठून) : सभापती महोदय, आपण याबद्दल जी दिलगिरी व्यक्त केली ते बरोबर झाले नाही. आपले ते शब्द रेकॉर्डवर राहता कामा नयेत, आपणास आमची आग्रहाची विनंती आहे की, आपण ते शब्द मागे घ्यावेत आणि रेकॉर्डवरूनही काढून टाकावेत.

श्री. हर्षवर्धन पाटील (संसदीय कार्य मंत्री) : सभापती महोदय, आपण या सदनामध्ये ज्या भावना व्यक्त केल्या आहेत त्याबद्दल माझी आपणास विनंती आहे की, काल या ठिकाणी विधेयकांच्या बाबतीत जो काही प्रकार घडला आहे आणि त्याबद्दल आपण सभापती म्हणून जी दिलगिरी व्यक्त केली आहे ती रेकॉर्डवर राहू नये. आपण ती मागे घ्यावी आणि रेकॉर्डवरूनही काढून टाकावी. कारण शेवटी आपण या सदनातील सर्वोच्च पदावर काम करीत आहात. खरे तर काल जो काही प्रकार या सभागृहात घडला त्याबद्दल शासनाच्या वतीने संसदीय कार्य मंत्री म्हणून मी दिलगिरी व्यक्त करण्यास तयार आहे, नव्हे मी तशी दिलगिरी व्यक्त करतो. ...

(यानंतर श्री. सरफरे ... झेडझेड 1 ..

अशुद्धीत पत्र / शुद्धीपत्र नाही

श्री. हर्षवर्धन पाटील...

परंतु आपण याठिकाणी सर्वोच्च पदावर काम करीत असल्यामुळे आपण अशाप्रकारे दिलगिरी व्यक्त करणे बरोबर नाही, ते आपल्या पदाला व सभागृहाच्या परंपरेला शोभेसे नाही.ते शब्द सभागृहाच्या कामकाजातून काढून टाकावेत अशी मी सर्व सन्माननीय सदस्यांच्या वतीने आपणास विनंती करीत आहे.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, आपण ते शब्द कामकाजामधून काढून टाकावेत अशी माझी आपणास विनंती आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, खरे म्हणजे आपण पीठासीन अधिकारी आहात. त्या आसनावरुन आपण सभागृहाच्या दोन्ही बाजूकडील माननीय सदस्यांवर नियंत्रण करीत आहात. ज्यावेळी हा प्रकार झाला त्यावेळी आपण "डायस"वर नव्हता. त्यामुळे आपण याठिकाणी दिलगिरी व्यक्त करण्याचा प्रश्न उपस्थित होत नाही. त्यामुळे ते शब्द कामकाजातून काढून टाकले पाहिजेत. त्याशिवाय आपण पुढील कामकाज पुकारु नये अशी माझी आपणास नम्र विनंती आहे.

श्री.उल्हास पवार : सभापती महोदय, या सदनाच्या वतीने मी आपली दिलगिरी व्यक्त करतो. आजचे आपले निवेदन आणि सभागृहाला आपण केलेले मार्गदर्शन हे संसदीय लोकशाही, या सभागृहाचा लौकिक, परंपरा, नियम, प्रथा या सर्वांच्या बाबतीत आमच्या डोळयामध्ये अंजन घालणारे आहे. म्हणून या सभागृहाच्या वतीने मी आपले शतश: ऋण व्यक्त करतो.

सभापती : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 3.10 वाजता पुन: भरेल.

(2.41 ते 3.10 मध्यंतर)

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. मोहन जोशी)

तालिका सभापती : सभागृहाचे कामाकाज आणखी दहा मिनिटे तहकूब करण्यात येत आहे. 3 वाजून 20 मिनिटांनी सभागृहाचे कामकाज पुन्हा सुरु होईल.

(यानंतर सभागृहाची बैठक 3 वाजून 10 मिनिटांनी 10 मिनिटांसाठी तहकूब झाली)

(3.10 ते 3.20 बैठक स्थगित झाली)

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(मध्यंतरानंतर)

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

औचित्याच्या मुद्यासंबंधी

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांनी या ठिकाणी सभागृहाच्या कामकाजासंबंधी औचित्याचा मुद्दा उपस्थित केला होता. काल या सभागृहात घडलेल्या घटनेसंबंधीचा तो मुद्दा असल्यामुळे या ठिकाणी त्याबाबत चर्चा झाली आणि त्यावेळी माननीय सभापतींनी आपले विचार व्यक्त केले. त्यांनी अतिशय चांगले मार्गदर्शन केले आणि शेवटी त्यांनी "मी दिलगिरी व्यक्त करतो" असे वाक्य उच्चारले. पीठासीन अधिकाऱ्यांकडून असे वक्तव्य होणे हे या वरिष्ठ सभागृहाला न शोभणारे आहे. माननीय सभापती महोदयांनी दिलगिरी व्यक्त करावी हे कोणालाही अपेक्षित नाही. ते सर्वांसाठी आदरणीय आहेत. त्यांचे मार्गदर्शन या सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांना सतत लाभत आहे. म्हणून त्यांनी जी दिलगिरी व्यक्त केली ती पुढच्या दृष्टीने या सभागृहाच्या कामकाजामध्ये असणे योग्य नाही. म्हणून तेवढे त्यांचे शब्द कामकाजातून काढून टाकावेत आणि पुढचे कामकाज सुरु करावे अशी मी आपल्याला विनंती करतो.

श्री. उल्हास पवार : सभापती महोदय, आताच माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी जी विनंती केलेली आहे त्याला मी अनुमोदन देतो. त्यांच्या भावनांशी मी सहमत आहे. या सभागृहाचा डेकोरम, शिष्टाचार यादृष्टीने आपल्या भावना माननीय सभापती महोदयांनी या ठिकाणी मांडलेल्या आहेत पण ते मांडत असताना त्यांनी जी दिलगिरी व्यक्त केलेली आहे ती आमच्या सारख्यांना वेदना देणारी आहे. ते शब्द आणि त्यांचे ते वाक्य आपल्या कामकाजातून काढावेत अशी मी आपल्याला विनंती करतो.

उपसभापती : या ठिकाणी माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर आणि सन्माननीय सदस्य श्री. उल्हास पवार यांनी आदरणीय सभापती महोदयांनी या सभागृहामध्ये जी दिलगिरी व्यक्त केली ती कामकाजाच्या नोंदीतून काढून टाकावी अशी विनंती केलेली आहे. ज्या परिस्थितीमध्ये त्यांना ही दिलगिरी व्यक्त करावी लागली त्याला तसे पहावयास गेलो तर आपण सर्वजण जबाबदार आहोत असे मी म्हणेन.

यानंतर श्री. खंदारे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती.....

त्यामुळे अशाप्रकारचा प्रसंग पीठासीन अधिकाऱ्यांवर यापुढे येऊ नये अशाप्रकारची दक्षता आपल्यापैकी प्रत्येक सदस्यांनी बाळगणे आवश्यक आहे. मी याच्यावर अधिक भाष्य करणार नाही. परंतु प्रत्येक बिलाच्या वेळी सभागृहात संबंधित मंत्री महोदयांनी हजर राहणे अत्यावश्यक आहे हे त्यांनी सांगितले आणि आता मी देखील याठिकाणी तेच सांगतो. कारण या सगळयाचे उत्तरदायित्व याठिकाणी बसणारे माननीय सभापती असोत, उपसभापती असोत किंवा तालिका सभापती असोत यांच्यावर येते. सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी आणि सन्माननीय सदस्य श्री.उल्हास पवार यांनी यासंबंधी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. या सभागृहाचे आदरणीय सभापती यांनी ज्या परिस्थितीमध्ये दिलगिरी व्यक्त केली त्यासंबंधीची नोंद कामकाजातून काढून टाकावी अशाप्रकारची सूचना मी देतो आणि आता पुढील कामकाजाला सुरुवात करतो.

आज सभागृहासमोर भरपूर कामकाज आहे. आजच्या कामकाजपत्रिकेवर 9 लक्षवेधी सूचना आहेत. एकेका लक्षवेधी सूचनेसाठी किती वेळ द्यावयाचा हे देखील ठरविले पाहिजे. प्रत्येक लक्षवेधी सूचनेसाठी 5 मिनिटे याप्रमाणे 45 मिनिटात लक्षवेधी सूचना सदस्यांना स्वत:ला शिस्त घालावी लागेल.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ KGS/

पृ. शी. : वागळे इस्टेट येथील तारांगण कॉम्प्लेक्समध्ये लागलेल्या भीषण आगीमुळे उद्वाहन बंद पडल्याने अग्निशमन दलातील 6 जवान गुदमरुन मृत्यूमुखी पडणे

मु. शी. : वागळे इस्टेट येथील तारांगण कॉम्प्लेक्समध्ये लागलेल्या भीषण आगीमुळे उद्वाहन बंद पडल्याने अग्निशमन दलातील 6 जवान गुदमरुन मृत्यूमुखी पडणे यासंबंधी सर्वश्री संजय दत्त, चरणसिंग सप्रा, गुरुनाथ कुलकर्णी, हेमंत टकले, विक्रम काळे, ॲड. उषा दराडे, सर्वश्री अरुण गुजराथी, मुझफ्फर हुसेन सय्यद, श्रीमती मंदा म्हात्रे, श्रीमती अलका देसाई ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"ठाणे जिल्ह्यातील वागळे इस्टेट येथील तारांगण कॉम्प्लेक्समध्ये दिनांक 19 नोव्हेंबर, 2009 रोजी भीषण आग लागून या दुर्घटनेत अग्निशमन दलातील 6 जवानांचा 14 व्या मजल्यावरील उद्वाहन बंद पडून गुदमरुन मृत्यू झाल्याची घडलेली घटना, सदर दुर्घटनाग्रस्त उद्वाहनाची तपासणी केली असता फायरमोड सुरु केले नसल्याचे तपासणीत आढळून येणे, या घटनेनंतर ठाणे, मुंबईतील गगनचुंबी इमारतीमध्ये अग्निशामन दलाच्या कंपन्याकडून इमारतीच्या सुरक्षिततेची घ्यावयाची काळजी याबाबत निर्माण झालेला प्रश्न, तारांगण कॉम्प्लेक्समध्ये झालेल्या भीषण दुर्घटनेनंतर ठाणे महापालिका क्षेत्रातील 20 लाख ठाणेकरांची सुरक्षा अवघ्या पाच फायर स्टेशनवरील 180 अग्निशमन जवानांच्या हाती असल्याचे वास्तव उजेडात येणे, ठाणे शहर, मुंब्रा, कळवा, दिवा, घोडबंदर रोड, पोखरण रोड, अशा अवाढव्य परिसरातील फायर स्टेशनची

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय दत्त....

वाढ करुन अग्निशमन यंत्रणेत वाढ करण्याची आवश्यकता, ठाण्यातील वर्तकनगर येथील पुनर्वसु इमारतीला लागलेल्या आगीची उच्चस्तरीय न्यायालयीन चौकशी करण्याची होत असलेली मागणी, पुनर्वसु इमारतीला परवानगी देणारे, लिफ्ट त्रुटीस जबाबदार असलेले पालिका अधिकारी, अग्निशमन दलाच्या जवानांना योग्य प्रशिक्षण न देणारे अधिकारी, राज्य सरकारचे अधिकारी, इमारतीचे बिल्डर कल्पतरु बिल्डर्स वर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची होत असलेली मागणी, गत दोन वर्षात अग्निशमन दलातील कर्मचाऱ्यांना गणवेश मिळालेले नसणे, शहरातील गगनचुंबी इमारतींना तीन कंपन्या आग प्रतिबंधक साहित्य पुरवितात सदर कंपनीची चौकशी करण्याची होत असलेली मागणी, राज्य शासनाने सदर घटनेची उच्चस्तरीय चौकशी करुन दोषी व्यक्तींविरुध्द करावयाची कडक कारवाई, तसेच मृत्यूमुखी पडलेल्या सदर जवानांच्या कुटुंबियांना शासनामार्फत आर्थिक मदत देण्याची आवश्यकता व ठाण्यातील दुर्घटनेचा बोध घेऊन राज्य शासनाने सर्व इमारतींच्या उद्वाहनांना अर्ध जाळीचे दरवाजे बंधनकारक करणे आवश्यक असणे, याबाबत करावयाची कार्यवाही व राज्य शासनाची प्रतिक्रिया."

श्री.भास्कर जाधव (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, हा अत्यंत गंभीर प्रश्न आहे. नागरीकरणामध्ये वाढ होत असताना दुसऱ्या बाजूला असे गंभीर प्रश्न उभे रहात आहेत. ठाणे जिल्हयामध्ये ही दुर्दैवी घटना घडली त्यामुळे बरेच प्रश्न उपस्थित झाले आहेत. असा प्रसंग घडल्यावर ब-याचदा खेद व्यक्त केला जातो. परंतु त्यावर कायम स्वरुपी ठोस उपाययोजना केली करणे आवश्यक आहे. मी यासंबंधी दोन प्रश्न विचारतो. या घटनेशी संबंधित आणि दुसरे म्हणजे मॅक्रो स्तरावर सरकार यासंबंधी काम करणार आहे काय ? या निवेदनात असे नमूद केले आहे की, "सदर इमारतीस आग प्रतिबंधक उपाययोजना केल्याचे प्रमाणपत्र दिलेले असून सदर आग फटाक्यामुळे लागली असल्याचा प्राथमिक अंदाज आहे." हे प्रमाणपत्र कोणत्या निष्कर्षाच्या आधावर दिले गेले होते आणि आग प्रतिबंधक उपाययोजना उपलब्ध होत्या तरी देखील आग लागल्यावर अग्निशमन दलातील जवानांनी आग विझविली होती, परंतु पुन्हा त्याच ठिकाणी आग लागली आहे. पुन्हा त्याच इमारतीमध्ये आग लागण्याचे कारण काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी पुन्हा त्याच ठिकाणी आग लागण्याचे कारण काय असा प्रश्न विचारला आहे. यासंबंधी शासनाकडे प्राथमिक माहिती आलेली आहे. ही आग शॉर्ट सर्कीटमुळे व फटाक्यामुळे लागली अशी माहिती मिळाली आहे. या प्रकरणाची सर्वंकष चौकशी सुरु आहे.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, एकदा त्या इमारतीमध्ये लागलेली आग त्या जवानांनी विझविल्यावर पुन्हा त्याच ठिकाणी आग कशी काय लागली ?

श्री.भास्कर जाधव : दिनांक 17 ऑक्टोबर, 2009 रोजी आग लागली. ती विझवून अग्निशमन दलातील जवान गेले होते. परंतु पुन्हा दिनांक 18 तारखेच्या पहाटे आग लागल्याचा अग्निशमन केंद्रात संदेश आल्यामुळे ते जवान आग विझविण्यासाठी गेले होते. त्यावेळी ही दुर्घटना घडली ही वस्तुस्थिती आहे. यासंबंधी चौकशी सुरु आहे. चौकशीचा अहवाल आल्यानंतर त्याच ठिकाणी पुन्हा आग कशी लागली त्याची माहिती समोर येईल.

अशुद्धीत प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री.शिगम

श्री. संजय केळकर : ठाण्यामध्ये अगदी ऐन दिवाळीच्या तोंडावर ही घटना घडली. वाढत्या नागरीकरणामुळे ठाणे शहरामध्ये मोठमोठया गगनचुंबी इमारती उभ्या रहात असून त्या इमारतीमध्ये मोठया प्रमाणावर लिफ्टचा वापर होत असतो. इमारतीमधील लिफ्ट संबंधीचे सर्टिफिकेट राज्य शासनाच्या इलेक्ट्रिक डिपार्टमेंट मार्फत देण्यात येते. तेव्हा ही दुर्घटना ज्या इमारतीमध्ये घडली त्या इमारतीतील लिफ्टच्या संदर्भात कोणी सर्टिफिकेट दिले होत ? त्या इलेक्ट्रिक डिपार्टमेंण्टमध्ये फक्त तीन अधिकारी आहेत. ते पाहणी न करता सह्याकरुन मोकळे होतात. तेव्हा याबाबतीत जर इलेक्ट्रिक डिपार्टमेंट दोषी असेल तर त्याबाबतीत शासन कोणती कारवाई करणार आहे ? तसेच दुर्घटनाग्रस्त इमारतीमधील लिफ्टची कोणत्या निरीक्षकाने तपासणी करुन सर्टिफिकेट दिले होते यासंबंधी चौकशी शासनाने केलेली आहे काय ?

श्री. भास्कर जाधव : ही घटना समजून घेतली पाहिजे. एक म्हणजे इमारतीमध्ये अशा प्रकारे आग लागल्यानंतर लिफ्टचा वापर करावयाचा नसतो, असा नियम आहे. परंतु दुर्दैवाने लिफ्टचा वापर अग्निशमन जवानांकडून केला गेले. हा वापर करत असताना फायर मोड ऑन करायला पाहिजे होता, तो देखील त्यांनी केलेला नव्हता. फायर मोड म्हणजे खाली तळमजल्यावर एका काचेच्या पेटीमध्ये बटन असते. अशा प्रसंगी लिफ्टचा वापर करण्यापूर्वी काच फोडून बटन ऑन करायचे असते. या बटनामुळे कदाचित इमारतीमधील लाईट गेली आणि लिफ्ट मध्येच बंद पडली तर ती मॅन्युअली ऑपरेट करता येते. परंतु त्यावेळी अग्निशमन जवानांनी फायर मोड ऑन केला नव्हता. ती लिफ्ट 14व्या मजल्यापर्यन्त पोहोचली. परंतु दुर्दैवाने दरवाजे न उघडल्यामुळे त्यांचा दुर्दैवी अंत झाला. ही गोष्ट खरी आहे की, इलेक्ट्रिक डिपार्टमेंटचे इन्स्पेक्टर सर्टिफिकेट देतात. या घटनेमध्ये अग्निशमन जवानांनी फायर मोड ऑन केलेला नव्हता ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे या घटनेला कोण जबाबदार आहे हे सांगणे अवघड आहे.

श्री. मुझफ्फर हुसेन : माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, अग्निशमन जवानांनी फायर मोड ऑन केलेला नव्हता. याचा अर्थ ठाणे महानगरपालिकेने अग्निशमन जवानांना योग्य प्रकारचे ट्रेनिंग दिलेले नव्हते, हे खरे आहे काय ? असल्यास, याबाबतीत कोण जबाबदार आहे आणि त्यांच्यावर शासन कोणती कारवाई करणार आहे ? ठाणे शहराची दिवसेंदिवस वाढ होत असून तेथे गगनचुंबी इमारती उभ्या राहात आहेत. ठाणे शहराची लोकसंख्या 25 लाखापेक्षा जास्त असून

..2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. मुझफ्फर हुसेन....

अशा मोठ्या शहरामध्ये फक्त 5 अग्निशमन केंन्द्रे आणि 180 कर्मचारी आहेत. तेव्हा अशा प्रकारच्या घटना पुन्हा धडू नयेत यासाठी ठाणे महानगरपालिकेच्या क्षेत्रामध्ये अधिक अग्निशमन केन्द्रे उभारण्यासाठी आणि कर्मचारी भरण्यासाठी शासन महानगरपालिकेला सूचना करील काय ?

श्री. भास्कर जाधव : अग्निशमन जवानांना प्रशिक्षण दिले होते की नाही असा सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला. अग्निशमन जवानांना वर्षातून दोन वेळा प्रशिक्षण दिले जाते. या घटनेची चौकशी डायरेक्टर ऑफ फायर सर्व्हिसेस श्री. मिलिंद देशमुख यांच्या अध्यक्षतेखालील समिती करीत आहे. ठाण्यातील अग्निशमन विभागात आजही 253 कर्मचारी हजर आहेत.

...नंतर श्री. पां.फ. खर्चे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव .....

त्यानंतरच्या काळात पुन्हा 22 पदे भरण्यात आली आणि उव्ररित 43 पदे भरण्याचे काम चालू आहे. तसेच सन्माननीय सदस्यांनी अग्निशमन केंद्रांच्या बाबतीत जो प्रश्न विचारला त्या अनुषंगाने मला सांगावयाचे आहे की, सध्याच्या परिस्थितीत ठाणे कार्पोरेशनकडे 5 अग्निशमन केंद्रे अस्तित्वात आहेत. दुसरी अग्निशमन केंद्रे लवकरच सुरु होतील. त्यात घोडबंदर आणि वर्तकनगर या ठिकाणी दोन अग्निशमन केंद्रे प्रस्तावित आहेत.

श्रीमती मंदा म्हात्रे : महोदय, ठाणे शहराच्या लोकसंख्येचा विचार करता या इमारतीला आग लागल्यानंतर अग्निशमन पथकाकडे मोठी शिउी सुध्दा उपलब्ध नव्हती. माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, हे जवान या इमारतीत लिफ्टने गेल्यामुळे त्यांचा मृत्यू झालेला आहे. परंतु अशा अनेक घटना घडतात आणि अशा वेळेस हे जवान प्राणाची बाजी लावून लोकांच्या जिविताचे रखण करतात. शासन नक्षलवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्यांना ज्याप्रमाणे नुकसान भरपाई देते त्याच धर्तीवर या जवानांनाही नुकसान भरपाई शासन देणार काय ?

श्री. भास्कर जाधव : महोदय, यामध्ये दोन गोष्टी आहेत. या जवानांनी लिफ्टने जायला हवे होते असे जरी म्हटले तरी आज मुंबई व ठाण्यात मोठमोठ्या 30-40 मजल्याच्या इमारती बांधल्या जातात. अशा मोठ्या इमारतीमध्ये जिन्याने जाणे कसे शक्य होणार याचे उत्तर आपल्यालाच शोधावे लागणार आहे. दुसरा प्रश्न मदतीच्या संदर्भात त्यांनी विचारलेला आहे. त्याबाबत मी सांगू इच्छितो की, या जवानांच्या कुटुंबियांना शासनाकडून तसेच इतर स्थानिक स्वराज्य संस्थांकडून देखील भरीव अशी मदत करण्यात आली आहे. त्यात प्रत्येक मृत व्यक्तिच्या कुटुबियाला शासनाच्या वतीने 2 लाख रुपये, ठाणे महापालिकेकडून 5 लाख रुपये, अपघात विमा कंपनीकडून 3.50 लाख रुपये, मुंबई महापालिकेकडून 1 लाख रुपये, माननीय मंत्री महोदय श्री. गणेश नाईक यांच्याकडून 1 लाख रुपये, नाशिक अग्निशमन केंद्राकडून 50 हजार रुपये, पिंपरी चिंचवड महापालिकेच्या अग्निशमन दलाकडून 50 हजार रुपये, वाशी येथील अग्निशमन दलाकडून 50 हजार रुपये आणि कल्याण अग्निशमन दलाच्या वतीने 50 हजार रुपये अशा प्रकारे प्रत्येकी 14.50 लाख रुपयाची मदत मिळाली आहे. प्रत्येक कुटुंबातील एका व्यक्तिला ठाणे महापालिकेच्या सेवेत सामावून घेतले आणि शासनाच्या 5 टक्के कोट्यातून एक सदनिका प्रत्येकी अशी मदत दिलेली आहे.

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय दत्त : महोदय, यासंबंधी ठाणे महापालिकेचे शहर अभियंता श्री. लाला यांच्या अध्यक्षतेखाली एक चौकशी समिती नेण्यात आली होती व त्या समितीने अहवाल सादर केल्याचे उत्तरात नमूद केले आहे. या समितीने आपल्या अहवालात कोणत्या शिफारशी केल्या आणि त्यांची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती पावले उचलली ?

श्री. भास्कर जाध्व : महोदय, नगर अभियंता श्री. लाला यांच्या समितीने जी चौकशी केली त्यानंतर या प्रकरणाची न्यायालयीन चौकशी व्हावी अशा प्रकारचा प्रस्ताव पुढे आला परंतु तो विचारात घेतला नाही. कारण ही तांत्रिक बाब असल्यामुळे त्याची चौकशी तांत्रिक अधिकाऱ्याकडूनच होणे योग्य होते म्हणून फायर संचालक श्री. मिलींद देशमुख यांच्याकडून ही चौकशी करण्यात आली.

श्री. संजय दत्त : महोदय, एवढ्या महत्वाच्या प्रश्नाला तांत्रिक स्वरुप देणे योग्य नाही.

श्री. भास्कर जाधव : सन्माननीय सदस्यांनी कृपया गैरसमज करुन घेऊ नये. कारण ही बाब तांत्रिक स्वरुपाची असल्याने तांत्रिक अधिकाऱ्याकडून अशा बाबीची चौकशी करणे श्रेयस्कर असते.

श्री. दिवाकर रावते : महोदय, सन्माननीय मंत्री महोदय, श्री. राजेश टोपे हे सभागृहात हजर आहेत. त्यांना कल्पना आहे की, फायरसंबंधीचा कायदा अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी या सभागृहात घाईघाईने पास करुन घेण्यात आला. या गोष्टीला दोन वर्षे झाली. या कायद्याची अंमलबजावणी कशी झाली, तो कायदा आता फोर्समध्ये आला आहे काय हे समजत नाही. परंतु मी हा कायदा दिल्लीहून आणण्यासाठी त्याचा पाठपुरावा केला होता त्यानंतरच या सभागृहात तो मंजुरीसाठी आला होता.

यानंतर श्री. जुन्नरे ....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखी नोंदी

श्री. दिवाकर रावते ...

अग्नीशमनचा कायदा यावा त्यासाठी मी स्वत: आग्रही होतो. त्यावेळेस या सभागृहात माननीय टोपे साहेबांनी 80 पानांचा फायर ॲक्ट सादर केला होता. त्यामुळे तो फायर ॲक्ट अस्तित्वात आलेला आहे काय ? त्या कायद्यावर माननीय राष्ट्रपतींची आणि माननीय राज्यपाल महोदयांची सही झाली आहे काय? हा कायदा अस्तित्वात आला असेल तर या कायद्याची अंमलबजावणी कशी केली जाणार आहे ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रावते साहेबांनी थोडासा वेगळा प्रश्न उपस्थित केला असला तरी फायरच्या संदर्भात त्यांनी प्रश्न उपस्थित केलेला आहे. फायर ॲक्टची माहिती आज तरी माझ्याकडे नाही परंतु आमचे आदरणीय टोपे साहेब सांगत आहेत की, फायर ॲक्ट झालेला आहे, त्यामुळे फायर ॲक्ट झालेला आहे असे मी आपणास सांगतो.

श्री. मुजफ्फर हुसेन : या ठिकाणी माननीय मंत्रीमहोदयांनी म्हटले आहे की, ठाण्यामध्ये 5 फायर स्टेशन कार्यन्वीत आहेत, 2 फायर स्टेशनचे काम सुरु असून बाकीच्या फायर स्टेशनचे काम प्रस्तावित आहेत. मी आपल्या माध्यमातून माननीय मंत्रीमहोदयांना सांगू इच्छितो की, ठाणे जिल्हयात शहरीकरण खूप मोठया प्रमाणात झालेले आहे. त्यामुळे नवी मुंबई, ठाणे, कल्याण, मिरा भाईंदर या सर्व ठिकाणच्या महानगरपालिका तसेच नगरपालिकांना लेखी सूचना द्याव्यात की, ज्या ज्या ठिकाणी फायर स्टेशन प्रस्तावित केलेले आहेत त्यांचे काम लवकरात लवकर पूर्ण करुन ती फायर स्टेशन कार्यान्वित करण्यासाठी पाऊले उचलावित.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, सजेशन फॉर ॲक्शन.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : वर्धा-हिंगणघाट मार्गावरील शासकीय जमीन घेऊन बुडविलेला महसूल

मु. शी. : वर्धा-हिंगणघाट मार्गावरील शासकीय जमीन घेऊन बुडविलेला महसूल यासंबंधी श्री दिवाकर रावते, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : अध्यक्ष महाराज, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मौजे बरबडी (ता.जि.वर्धा) या वर्धा- हिंगणघाट मार्गावरील गावामध्ये उत्तम गॅलवा मेटॅलिक्स लिमिटेड कंपनीने सरकारमान्य लेआऊट मधील सर्व्हे नं.६० ते ८२ या परिसरातील जागा मे.मेघ रियालिटीज या नावाने वृक्षरोपणाकरिता भूखंड मालकांकडून अतिशय स्वस्त दराने खरेदी करणे, यासाठी उक्त कंपनीच्या लोकांनी स्थानिक दलालांशी हातमिळवणी करणे, लॉयडस् स्टीलचे कर्मचारी श्री. प्रशांत जवदंड यांच्या नावे भूखंड खरेदी करण्यात येणे, लेआऊटस्चे रस्ते, शासकीय मोकळ्या जागा ताब्यात घेऊन या जागेवर ८ ते १० फूट खोदकाम करुन प्रकल्पांचे काम युध्द पातळीवर सुरु करणे, सदर सर्व्हे क्रमांक ६० ते ८२ मधील १,२४९ भूखंडापैकी उक्त कंपनीने ९९८ भूखंड खरेदी करणे, उर्वरित २५१ भूखंडावरील अंदाजे ३,५०,००० चौ.फू. जागेवर अवैधरित्या संबंधित भूखंड मालकांची कोणतीही परवानगी न घेता निर्माण कार्य केलेले असणे, या प्रकरणी कंपनीने मोठ्या प्रमाणावर शासनाचा महसूल बुडविणे, तसेच उक्त कंपनीने केलेल्या बेकायदेशीर कामाबाबत कोणतीही माहिती जनतेला देण्यात न येणे, या प्रकरणी स्थानिक भूखंड मालकांनी सेवाग्राम पोलीस स्टेशनमध्ये कंपनीविरुध्द तक्रार करुनही पोलीसांनी कोणतीही कार्यवाही न करणे, तसेच जिल्हाधिकारी, वर्धा यांना अनेक वेळा निवेदन देऊनही अद्याप कंपनीविरुध्द कोणतीही कार्यवाही न होणे, परिणामी स्थानिक जनतेच्या मनात भूखंड मालक, शासन तसेच प्रशासकीय अधिकाऱ्यांविरुध्द निर्माण झालेला तीव्र असंतोष व संतापाची भावना सबब याप्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही वा उपाययोजना व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

===३===

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश सोळंके (महसूल राज्यमंत्री) : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

....4...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्रीमहोदयांना लक्षवेधी सूचनेच्या उत्तरामध्ये काही सुधारणा करावयाच्या आहेत काय ?

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेच्या उत्तरामध्ये "कोणतीही सुधारणा नाही."

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भातील एक लक्षवेधी सूचना गेल्या अधिवेशनात आली होती परंतु ती लक्षवेधी सूचना चर्चेला येऊ शकली नाही. त्या लक्षवेधी सूचनेच्या उत्तरामध्ये आणि आताच्या लक्षवेधी सूचनेच्या उत्तरामध्ये प्रचंड तफावत आहे. मूळ लक्षवेधीच्या उत्तरात असे म्हटले आहे की, "सदर कंपनी सदर जागेवर उभारण्याच्या प्रयोजनासाठी भारत सरकारच्या वाणिज्य व उद्योग मंत्रालयाकडून तशी परवानगी प्राप्त करुन घेतलेली आहे." म्हणजे लायसन्स डू दि बिझनेस. फॅक्टरी उभारण्याकरिता परवानगी नाही परंतु आपण त्यावेळेला तशा परवानगी दिली. या लक्षवेधी सूचनेमध्ये असे म्हटले आहे की, "प्रत्यक्ष जागेवर केलेल्या पाहणीनुसार प्रश्नाधीन ले-आऊट मधील संपूर्ण जमीन, त्यामधील मोकळया जागा, ले-आऊट मधील रस्त्यासह ताब्यात घेवून काही जागेवर 8 ते 10 फूट खोदकाम सुरु केल्याचे आढळून आले आहे. या प्रकरणी सविस्तर चौकशी करुन, कंपनीविरुध्द नियामानुसार आवश्यक ती कारवाई करण्याबाबत जिल्हाधिकारी, वर्धा यांना कळविण्यात आले आहे." सभापती महोदय, जिल्हाधिका-यांना कळवून एक दीड वर्षे उलटून गेलेले आहे. त्यामुळे यासंदर्भात आपण पुढे काय कार्यवाही केलेली आलेली आहे याचीही माहिती माननीय मंत्रीमहोदयांना द्यावयाची आहे. तसेच या कंपनीच्या बेकायदेशीर कामाच्या संदर्भात जनतेने जी तक्रार केली त्याचीही दखल घेण्यात आली नाही. यासंदर्भात पोलीस स्टेशनमध्येही जी तक्रार करण्यात आली होती त्या तक्रारीच्या संदर्भात पोलिसांनी काय कारवाई केली आहे याचीही माहिती माननीय मंत्रीमहोदयांनी द्यावयाची आहे. मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, माझ्याकडे ग्रामपंचायत "बरवडी"च्या सरपंचाचे एक पत्र आहे. त्या पत्रात असे म्हटले आहे की, "मौजे बरवडी ता.जि. वर्धा येथे उत्तम गॅलवा मेटॅलिक्स लि. या कंपनीने निर्माण कार्य करण्यासाठी ग्रामपंचायत बरवडीची परवानगी घेतलेली नाही. कंपनीने परिसरातील भूखंड धारकांचे ना-हरकत प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे. तरी आपण भूखंडधारकांचे नाहरकत प्रमाणपत्र घेतले नसल्याचे निदर्शनास आले आहे. हे

....5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

पत्र मिळताच तीन दिवसांच्या आत कंपनीचे बांधकाम कार्य बंद करावे व परवानगी घेण्याबाबत ग्रामपंचायत बरवडी यांच्याकडे बांधकामाच्या संदर्भातील परवानगी मागावी." हे पत्र दिनांक 21.9.2009 चे असून ग्रामपंचायतीने परवानगी दिलेली नसतांना सुध्दा सदर कंपनी बांधकाम करीत होती, खोदकाम करीत होती हे सत्य आहे. याच लक्षवेधीच्या उत्तरात असे म्हटले आहे की, "न्यायालयीन प्रक्रिया सुरु असल्याने उत्तर देऊ शकत नाही". माझ्याकडे सीव्हील सूट नंबर 314/2008 च्या बाबत कोर्टाने जी ऑर्डर दिलेली आहे ती ऑर्डर वाचून दाखवतो. त्यात असे म्हटले आहे की, "(i) Temporary Injunction Application is allowed on following terms,

1) Defendants or any persons claiming through them are hereby restrained temporarily from escavating the soil from the suit plot or making further construction on it or from changing the nature of suit plot in any manner till the decision of suit."

याचा निर्णय झाला नाही असे उत्तरात म्हटले आहे. परंतु संबंधित कंपनीला कोर्टाने सर्व कामाला स्टे दिलेला आहे. उत्तरामध्ये खोदकाम करण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे त्यामुळे माझे तीन प्रश्न आहेत पहिला प्रश्न असा आहे की, ग्रामपंचायतीची परवानगी न घेता सदर कंपनीने काम सुरु केले आहे याची माहिती शासनाला आहे काय?

यानंतर श्री. गायकवाड...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखनासाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

सभापती महोदय, माझा दुसरा प्रश्न असा आहे की, या संदर्भात पोलीस स्टेशनमध्ये तक्रारी करण्यात आलेल्या आहेत तेव्हा त्यावर पोलिसांनी कारवाई केली आहे काय ? त्याचबरोबर मंत्रिमहोदयांनी सांगितल्याप्रमाणे जिल्हाधिका-यांचा अहवाल शासनाकडे आलेला आहे काय ? यानंतर माझा चौथा प्रश्न असा आहे की, या प्रकरणी स्टे असतांना त्या ठिकाणी जे बेकायदेशीर बांधकाम झालेले आहे त्याबाबत संबंधिताविरुध्द शासन कारवाई करणार आहे काय ?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी असे सांगितले आहे की ग्रामपंचायतीची परवानगी न घेंता सदरील काम झालेले आहे. माझ्याकडे बरबडी ग्रामपंचायतीच्या सचिवांचे पत्र आहे.त्यात त्यांनी असे म्हटले आहे की ," औद्योगिक कारखान्याचे बांधकाम असल्यामुळे ग्रामपंचायतीच्या परवानगीची गरज नाही म्हणजे एक प्रकारची एनओसी सचिवांनी त्या कंपनीला दिलेली आहे. बांधकाम करण्यासबंधी कंपनीने ग्रामपंचायतीकडे परवानगी मागितली असतांना ग्रामपंचायतीने स्वत: होऊन सचिवांनी असे सांगितले की, हा औद्योगिक प्रकल्प असल्यमुळे ग्रामपंचायतीच्या परवानगीची गरज नाही अशा प्रकारे त्यांनी एनओसी दिलेली आहे.

श्री.दिवाकर रावते : सरकारच्या म्हणण्याप्रमाणे तशा प्रकारची तरतूद कायद्यात आहे काय ?

श्री.प्रकाश सोळंके : कायद्यात तरतूद आहे किंवा नाही ही बाब मला तपासून पहावी लागेल. त्याबाबतीत मला आता उत्तर देता येणार नाही.

श्री.दिवाकर रावते : सचिवांचे काय म्हणणे आहे हे सांगण्या पेक्षा सरकारचे म्हणणे काय आहे हे सांगण्यात यावे. ग्रामपंचायतीच्या भागात बांधकाम करण्यासाठी परवानगी घ्यावी लागत नाही अशी कायद्यात तरतूद आहे काय ?

श्री.प्रकाश सोळंके : याबाबतीत मला आताच सांगता येणार नाही ही बाब मला तपासून पहावी लागेल. त्यामुळे ही बाब तपासून पाहून त्यासबंधीची माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.या संदर्भात भूखंडधारकाने. फोजदारी दंड सहिता कलम 145 खाली पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली होती. जमिनीच्या मालकीच्या हक्कासंबंधीचा हा प्रश्न असल्यामुळे सदरील दावा उप विभागीय अधिकारी, वर्धा यांच्या समोर सुरु आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

.श्री.दिवाकर रावते : कोर्टाने स्टे दिलेला असतांनासुध्दा कंपनीने बांधकाम केलेले आहे त्याच्या विरुध्द शासन कोणती कारवाई करणार आहे ?

श्री.प्रकाश सोळंके : ही बाब शासनाच्या निदर्शनास आल्यानंतर या बाबत सविस्तर चौकशी करुन कारवाई करण्याबाबत जिल्हाधिका-यांना आदेश देण्यात आलेले आहेत.

श्री.दिवाकर रावते : मी मघाशी कोर्टाचा सूट नंबर आणि कोर्टाचा आदेश वाचून दाखविला होता . त्यामुळे या ठिकाणी चोकशी करण्याचा प्रश्न येत नाही .कोर्टाने 2008 साली स्टे दिलेला आहे.तेव्हा याबाबतीत संबंधिताविरुध्द कारवाई करु अशा प्रकारचे ठोस उत्तर मंत्रिमहोदय देणार आहेत काय ?

श्री.प्रकाश सोळंके :सिव्हील नेचरचा प्रश्न न्यायालयामध्ये प्रलंबित आहे. त्यामध्ये शासन पक्षकार नाही तर दोन खाजगी पक्षकार आहेत.....

श्री.दिवाकर रावते : माननीय मंत्री महोदय जे उत्तर देत आहेत त्याचा मी आदर करतो परंतु मला त्यांना असे सांगावयाचे आहे की,आपल्या अधिका-यानी या सभागृहात आरोपीच्या पिज-यात आपल्याला उभे करणे हा अधिका-यांचा दोष आहे.निवेदनात असे लिहिलेले आहे की, "उप विभागीय अधिका-यांनी वेळोवेळी सुनावणी ठेवलेली आहे सदर प्रकरण त्यांच्या न्यायालयात प्रलंबित आहे." तेव्हा न्यायालयीन प्रक्रियेसंबंधीची माहिती अधिका-यांनी मंत्र्यांना दिलीच पाहिजे.

श्री.प्रकाश सोळके : उप विभागीय अधिका-यांना क्वासी ज्युडिशिअल अधिकार आहेत व. जमिनीच्या मालकी हक्का संबंधीचा वाद असल्यामुळे त्यांच्यासमोर हे प्रकरण चालू आहे.

श्री.दिवाकर रावते :. कोर्टाने दिलेला स्टे मी मघाशी वाचून दाखविला आहे व ते रेकॉर्डवर आणलेले आहे.

श्री. प्रकाश सोळके : या दाव्यमध्ये सरकार पक्षकार नाही तर दोन खाजगी व्यक्तीमधील हा सिव्हील सूट आहे.

श्री.दिवाकर रावते : एखाद्या व्यक्तीच्या भूखंडावर जर कोणी बेकायदेशीरपणे काम करीत असेल व त्याबाबतीत त्याने कोर्टाचा स्टे आणला असेल तर हे बेकायदेशीर बांधकाम थांबविण्यासबंधी सरकारची भूमिका काहीही राहणार नाही काय ? हे बेकायदेशीर काम थांबविले पाहिजे परंतु यामध्ये जिल्हाधिकारी गुतलेले आहेत त्याचबरोबर उप विभागीय अधिका-याच्या न्यायालयासमोर हे प्रकरण प्रलंबित आहे.तेव्हा याबाबतीत शासनाची काही जबाबदारी आहे किंवा नाही. ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश सोळंके : मी मघाशीच सांगितले आहे की, ही बाब शासनाच्या निदर्शनास आल्यानंतर सविस्तर चौकशी करुन योग्य ती कारवाई करण्यास जिल्हाधिकारी, वर्धा यांना सांगितलेले आहे.

नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षकांना युजीसीच्या वेतनश्रेण्या लागू करण्याबाबतच्या शासन निर्णयाच्या विरोधात सचिवांनी वृत्तपत्रात जाहिरात देणे.

मु.शी. : विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षकांना युजीसीच्या वेतनश्रेण्या लागू करण्याबाबतच्या शासन निर्णयाच्या विरोधात सचिवांनी वृत्तपत्रात जाहिरात देणे याबाबत प्रा.बी.टी.देशमुख, श्री.विक्रम काळे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

प्रा. बी.टी.देशमुख (अमरावती विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्यांनी याबाबत निवेदन करावे अशी विनंती करतो.

""मानव संसाधन विकास विभाग (एच.आर.डी.) मंत्रालय आणि विद्यापीठ अनुदान आयोग (यु.जी.सी.) जे आदेश काढील त्याचे महाराष्ट्र शासन पालन करील."विद्यापीठ अनुदान आयोगाकडून शिफारस आल्यानंतर, केंद्र सरकारकडून आदेश दिले जातील त्या आदेशांचे पालन केले जाईल." असे दिनांक 28 डिसेंबर, 2008 रोजी सभागृहात शासनातर्फे घोषित होणे, त्याप्रमाणे राज्य मंत्रिमंडळाने दिनांक 23 जुलै, 2009 च्या बैठकीत केंद्र शासनाच्या 31 डिसेंबर 2008 च्या आदेशान्वये लागू केलेल्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनश्रेण्या जशाच्या तशा विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षकांना लागू करणारा निर्णय घेण्यात येणे, त्याप्रमाणे शासन निर्णय दिनांक 12 ऑगस्ट 2009 रोजी निर्गमित होणे, असे असताना उच्च शिक्षण विभागाने मात्र महाराष्ट्र प्राध्यापक महासंघास (MFUCTO) दिनांक 24 जुलै, 2009 रोजी पत्र लिहून "राज्य शासकीय कर्मचाऱ्याप्रमाणे 1 जानेवारी 2006 पासून सहावा वेतन आयोग लागू करण्याबाबत निर्णय घेतला आहे." असे कळविणे, "राज्य शासकीय कर्मचारी व विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षकांना सध्या लागू असलेले अनुषंगिक लाभ यापैकी जे लाभदायक असेल ते सुरु ठेवण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतलेला" असतांना दिनांक 12 ऑगस्ट, 2009 च्या शासननिर्णयाच्या परिच्छेद 8 ब मध्ये स्पष्टपणे तरतूद असताना दिनांक 31 जुलै, 2009 रोजी उच्च शिक्षण विभागाने महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या अध्यक्षांना एक पत्र पाठवून "आनुषंगिक लाभ राज्य शासकीय कर्मचाऱ्याप्रमाणे लागू करण्याचा घेतलेले निर्णय" असे कळविणे, मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयाशी दिनांक 12 ऑगस्ट, 2009 च्या शासननिर्णयाशी विसंगत मजकूर आंदोलनकर्त्या संघटनेच्या अध्यक्षाला कळविण्याबरोबरच वृत्तपत्रांतून शासनाची भूमिका जाहिरातींच्या स्वरूपात प्रकाशित

..... 3एच 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. देशमुख ....

करण्यावर लक्षावधी रुपयांचा निधी खर्च होणे, दिनांक 28 फेब्रुवारी, 2009 रोजी विद्यापीठ अनुदान आयोगाने उच्च शिक्षण सचिवांना पत्र (No.F-1-161/2009/PRC) लिहून "केंद्र शासनाचे आदेश आम्हाला प्राप्त झाले असून दिनांक 31 मार्च, 2009 च्या आत 40 टक्के थकबाकीची रक्कम अदा करण्यात येईल, त्यासाठीची कारवाई राज्य शासनाने पूर्ण करावी व ती रक्कम घेऊन जावी" असे कळविणे, उर्वरित 40 टक्के थकबाकीची रक्कम (अशी एकूण 80 टक्के थकबाकीची रक्कम) दिनांक 31 मार्च, 2010 पर्यंत मिळण्याची केंद्राची तरतुद असतांना याबाबत राज्यस्तरावर कोणतीही कारवाई न होणे, परिणामी सदरहू शिक्षकांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया."

प्रा. श्रीमती वर्षा गायकवाड (उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्री) : महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती मानीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवते.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>निवेदन</u>

(प्रेस : कृपया सोबतचे निवेदन येथे छापावे.)

.... 3एच 3 ...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(लक्षवेधी सूचनेवरील माननीय उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्र्यांच्या निवेदनानंतर ...)

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, याठिकाणी जे निवेदन आलेले आहे त्यात अतिशय महत्त्वाचे प्रश्न गुंतलेले आहेत. सर्वात महत्त्वाची गोष्ट यामध्ये अशी आहे की, माननीय मंत्री महोदय सभागृहात काही आश्वासने देतात. मंत्रिमंडळ निर्णय घेते त्याप्रमाणे शासन निर्णय काढला जातो. एखाद्या अधिकाऱ्याला उद्धटपणे त्याच्याविरोधात पत्र लिहून आंदोलनकर्त्या संघटनेला कळविणे किंवा वृत्तपत्रात विरोधी जाहिरात देणे हा अधिकार आहे का ? हा या ठिकाणी महत्त्वाचा प्रश्न आहे. मी गेली 30 वर्षे या सभागृहात काम करीत आहे. मंत्री महोदयांनी आश्वासन दिले पण त्यानुसार अमलबजावणी झाली नाही, अशी अनेक आश्वासने आहेत. आश्वासन दिले पण त्यानुसार जी अमलबजावणी झाली ती उशीराने झाली अशीही अनेक आश्वासने आहेत. आश्वासन दिले पण अमलबजावणी झालीच नाही अशीही अनेक आश्वासने आहेत. पण या ठिकाणी जी आश्वासने दिली त्याच्या विरोधात एखादा अधिकारी लाखो रूपये खर्च करून जाहिराती देतो, असा प्रकार मी गेल्या तीस वर्षात कधीही पाहिलेला नाही. सभापती महोदय, या सभागृहात मंत्री महोदयांनी काय आश्वासन दिले होते ? येथे 29 डिसेंबर 2008 रोजी असे आश्वासन दिले होते की, "एचआरडी मंत्रालय आणि युजीसी जे आदेश काढील त्याचे महाराष्ट्र शासन पालन करील." "युजीसीकडून शिफारस आल्यानंतर केंद्र सरकारकडून आदेश दिले जातील त्या आदेशांचे पालन केले जाईल." आज या निवेदनात असे सांगितले आहे की, याबाबत मंत्रिमंडळाने 23 जुलैला निर्णय घेतला, त्याप्रमाणे 12 ऑगस्ट 2009ला शासन निर्णय निघाला. त्याबद्दल कोणाचीही काहीही तक्रार नाही, कारण आश्वासनाची पूर्ती पूर्णपणे झाली होती. बाहेर हे अधिकारी असे कळवित होते की, .. त्यांचे हे 24 जुलै 2009 चे लेखी पत्र आहे त्यात त्यांनी म्हटले आहे की, "राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे सहावा वेतन आयोग लागू करण्याचा निर्णय घेतला आहे." सभापती महोदय, आपण मला असे सांगा की, मंत्रिमंडळाच्या निर्णयाविरूद्ध, शासन निर्णयाविरूद्ध .. त्यानी येथे लिहिलेले नाही. सभापती महोदय, हा मुद्दा आम्ही या लक्षवेधी सूचनेतून येथे उपस्थित केलेला आहे त्याचे उत्तरच या निवेदनात आलेले नाही. मंत्रिमंडळाच्या निर्णयाविरूद्ध आणि शासकीय निर्णयाच्या विरूद्ध पत्र देण्याचा आणि वर्तमानपत्रांतून जाहिरात देण्याची त्या अधिकाऱ्याने ही हिंमत केलीच कशी ?

..... 3एच 4 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, यातील दुसरा मुद्दा असा आहे की, मंत्रिमंडळाने निर्णय घेतला,त्याप्रमाणे शासन निर्णय निर्गमित झाला. त्यातील परिच्छेद 8-बी असा आहे की, अनुषंगिक लाभ हे राज्य शासकीय कर्मचारी किंवा ...

उपसभापती : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा. ..

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेमध्ये विचारलेल्या ज्या मुद्यांना त्यांनी उत्तरे दिली नाहीत त्याबद्दल प्रथम माहिती सांगतो आणि नंतर मी प्रश्न विचारतो. शासनाने आमच्या मुद्यांना उत्तर दिलेले नाही ते मी आपल्या लक्षात आणून देऊ इच्छितो आहे. पहिल्या प्रश्नाला उत्तर दिले नाही. अनुषंगिक लाभाच्या बाबतीत मंत्रिमंडळाने निर्णय घेतला आणि त्यानुसार काढलेल्या 12 ऑगस्ट 2009 च्या शासन निर्णयातील परिच्छेद 8-ब असा आहे की, "अनुषंगिक लाभ आहेत, आज जे आहेत ते किंवा राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना लागू असतील ते, यातील जे फायदेशीर असतील ते राहतील." पण या अधिकाऱ्याने त्या विरोधात जाहिराती दिल्या. वर्तमानपत्रातून जाहिराती दिल्या की, "अनुषंगिक लाभ राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे राहील." त्यातला फरक त्यांना कळत नाही का ? एवढ्या उच्च पदस्थ अधिकाऱ्यांना "विच एव्हर इज बेटर" आणि "ते राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे राहील" यातील फरक कळत नाही काय ? मी हे मुद्दे आमच्या सूचनेमध्ये दिले असतानाही त्यावर खुलासा आलेला नाही. मी मुद्दाम आपल्या लक्षात आणून देऊ इच्छितो की, या अधिकाऱ्याचे वर्तन इतके उद्धट होते की, 26 ऑगस्ट या तारखेला माननीय उच्च शिक्षण मंत्री महोदयांनी आंदोलनकर्त्या संघटनेच्या शिष्टमंडळाला बोलावून एक बैठक घेतली त्यावेळी आम्ही तीन चार आमदार देखील होतो. पण मंत्री महोदयांनी बोलाविलेल्या बैठकीला सचिव पदस्थ अधिकारी एक मिनिटभरसुद्धा आले नाहीत. माननीय आमदार श्री.विक्रम काळे त्यावेळी त्यांना म्हणाले देखील की, का हो हे असेच चालू राहणार का ? ...

उपसभापती : सन्माननीय सदस्यांनी नेमका प्रश्न विचारावा. ..

प्रा. बी.टी. देशमुख : सभापती महोदय, मी प्रश्न विचारतोच आहे, पण पहिल्यांदा ज्या आमच्या प्रश्नांना त्यांनी उत्तरे दिली नाहीत ते मी आपल्या निदर्शनास आणून देऊन मग मी प्रश्न विचारतो. 20 ऑगस्टला माननीय मुख्यमंत्र्यांनी मंत्रालयात बैठक बोलाविली होती. त्या बैठकीला विधी सचिव हजर होते, वित्त सचिव हजर होते, माननीयउच्च शिक्षण मंत्री महोदय देखील हजर

3एच 5 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

होते. पण आपले सचिव हे 20 मिनिटे उशीरा आले. The Hon. Chief Minister scolded him. सभापती महोदय, मंत्री महोदय नेट-सेट बाबत रोज फोन करीत होते की, हायकोर्टाचा निर्णय आहे की, चार महिन्यात एक्झम्प्शनबाबत निर्णय घ्या पण तसे झाले नाही. याप्रमाणे मंत्री महोदयांनी फोन केल्यानंतर त्यांनी एकदम शे-पाचशे एक्झम्प्शन्स काढले. मंत्री महोदयाच्या निर्णयाच्या विरोधात जाऊन युजीसीमध्ये स्वत: जाऊन या सचिवांनी पत्र दिले की, यापुढे देऊ नका, बंद करा, थांबवा, दिले त्याचाही पुनर्विचार करा म्हणून. माझ्याजवळ ते लेखी पत्र आहे. तेव्हा त्यांच्या या 24 ऑगस्टच्या पत्राला मंत्री महोदयांची मान्यता आहे का ? सभापती महोदय, आंदोलनकर्त्या संघटनेला दिलेली एकंदर तीन पत्रे आहेत. 24 जुलै, 31 जुलै व 4 ऑगस्ट या तारखांची ही पत्रे आहेत. सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे, श्री.वसंतराव खोटरे आणि मी स्वत: तेथे हजर होतो आणि मंत्री महोदय त्यांना सांगत होते की, आम्ही त्या केसेस ताबडतोब निकालात काढू. स्वत: मंत्री महोदयांनी फोन केले. ...

उपसभापती : सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी मी त्यांचा आदर राखून सांगू इच्छितो की, आपण गेली पाच मिनिटे प्रश्न विचारता, माहिती देत आहात. आपण या लक्षवेधी सूचनेवर आपला काही उपप्रश्न असेल तर विचारावा.

(यानंतर श्री.सरफरे .... 3आय 1 ..

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, आपण माझे एक मिनिट ऐकून घ्या. ज्या मुद्यांची उत्तर देण्यात आलेली नाहीत, जी उत्तरे देण्याची टाळाटाळ होत आहे. हा त्यांना अधिकार आहे काय?. आम्ही फक्त मुद्दे उपस्थित करावयाचे काय? आम्ही सांगितलेल्या माहितीवर त्यांच्याकडून उत्तर आले पाहिजे ते आले नाही. मग राखून ठेवा. त्यांना लेखी उत्तरे देऊ धा. मग आम्ही एक दोन प्रश्न विचारु. माननीय सभापती महोदय, बाहेरच्या लोकांची "सुपारी" घेऊन जर कुणी अधिकारी मंत्रालयात काम करीत असेल तर ती चुकीची गोष्ट आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाला 24 ऑगस्ट, 2009 रोजी या अधिका-यांनी दोन पत्र देऊन त्यातील एका पत्रात अशी धमकी दिली की, "तुमच्याकडून कंटेम्ट ऑफ कोर्ट होत आहे." विद्यापीठ अनुदान आयोगाला दिलेल्या 24 ऑगस्टच्या पत्रात असे म्हटले आहे की, "This is a serious issue which is to be set right by the UGC. It is learned that some private organisations are planning to file Criminal cases against the UGC." मंत्रालयातील काम सोडून खाजगी संघटनांच्या वतीने धमक्या देण्याचे काम मंत्रालयातून केव्हापासून सुरु झालं? मी याठिकाणी एक गोष्ट सांगू इच्छितो की, 24 तारखेला मंत्रिमहोदयांच्या निर्णयाविरुध्द त्यांनी पत्र दिले. तो देण्याचा त्यांना अधिकार नाही. मंत्र्याच्या धोरणाविरुध्द त्यांनी हे पत्र कसे काय लिहीले? या तीनही मुद्यांचे खुलासे या निवेदनामध्ये झाले नाहीत. काही लाख रुपयांच्या जाहिराती त्यांनी दिल्या, त्याचाही खुलासा याठिकाणी झाला नाही. याठिकाणी तीनही गोष्टींचा खुलासा देण्याबाबत मुद्यांची नोटीस दिलेली असतांना तो खुलासा या निवेदनात झाला नाही, तो झाला पाहिजे. आणि तो याठिकाणी लेखी निवेदनामध्ये आला पाहिजे, तो कां आला नाही.? सभापती महोदय, याबाबत आणखी प्रश्न विचारण्याची मला आपण परवानगी दिली तर बरे होईल.

उपसभापती : आपण याठिकाणी प्रश्न विचारीत असतांना "सुपारी" असा शब्द वापरला...

प्रा. बी.टी.देशमुख : तो शब्द असंसदीय अर्थाने मी वापरलेला नाही. तरीसुध्दा आपण म्हणाल मी तो शब्द मागे घेतो.

श्री.कमलकिशोर कदम : सभापती महोदय, या सभागृहामध्ये लक्षवेधी सूचनेच्या रुपाने मला एक महत्वाचा मुद्दा उपस्थित करावयाचा आहे. मंत्रिमहोदयांचे उत्तर येण्यापूर्वी हा मुद्दा उपस्थित करावयाचा आहे. या सदनामध्ये शासनाने उत्तर दिलें, निर्णय घोषित केला आहे. त्यावर शासनाने

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अंमलबजावणी केली आहे. या सर्व गोष्टींच्या विरुध्द जाऊन जर कुणी कर्मचारी वेगळे काही करीत असेल तर तो या सदनाचा हक्कभंग होत आहे, हे कागदोपत्री सिध्द झाले आहे. आणि म्हणून जो कुणी संबंधित अधिकारी असेल त्याच्या विरुध्द नियम 240 अन्वये आपल्या परवानगीने मी हक्कभंगाचा प्रस्ताव सादर करीत आहे. त्यासाठी आपण मला परवानगी द्यावी. मी आपणाकडे परवानगी मागितली आहे. हा हक्कभंग सादर केल्यानंतर हे अधिवेशन संपण्यापूर्वी तात्काळ संबंधित अधिकाऱ्याला या सभागृहापुढे बोलाविले पाहिजे आणि त्याला ताकिद दिली पाहिजे.

उपसभापती : माननीय सदस्यांना हक्कभंगाचा प्रस्ताव मांडता येईल.परंतु हे अधिवेशन उद्या संपत आहे...

श्री.कमलकिशोर कदम : सभापती महोदय, या सभागृहामध्ये शासनाचा निर्णय घोषित झाल्यानंतर जर कुणी अधिकारी असे वागायला लागला तर या सदनाचे पावित्र्य राहणार नाही. आणि म्हणून आपली किंमत आपल्याला ठरवून घ्यावी लागेल. म्हणून आपण परवानगी द्यावी अशी मी आपणास विनंती करतो. आणि संबंधित अधिकाऱ्याला उद्याच्या उद्या ताकिद देण्यात यावी.

प्रा. बी. टी.देशमुख : सभापती महोदय, माननीय सदस्य म्हणतात ते बरोबर आहे. आम्ही ज्यावेळी याठिकाणी काम करतो आणि मंत्रिमहोदयांना प्रश्न विचारतो त्यावेळी आमच्या मनामध्ये जर अशी भावना निर्माण होणार असेल की, मंत्रिमहोदय "हो" म्हणतात पण पुढे त्यांचा सेक्रेटरी त्यांचे खरोखरच ऐकणार आहे की नाही? तर मग अशा परिस्थितीत आम्ही काम कसे काय करु शकतो? माननीय नामदार श्री. राजेश टोपे यांनी व माननीय मुख्यमंत्र्यांनी लक्ष घालून या सभागृहात दिलेल्या आश्वासनाची पूर्ती केली. त्या अधिकाऱ्याचे वर्तन अतिशय लज्जास्पद होते. एवढेच मला याठिकाणी सांगावयाचे आहे. त्याबाबत कारवाई काय करणार एवढाच प्रश्न आहे?

प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महोदय, केंद्र सरकारच्या 31.12.2008 च्या आदेशान्वये केंद्रीय विद्यापीठाशी संलग्न असलेल्या सर्व महाविद्यालयांना सहावा वेतन आयोग लागू केला. त्याच धर्तीवर राज्य शासनाने सुध्दा सहावा वेतन आयोग लागू करण्याचा निर्णय घेतला. माननीय सदस्यांनी सांगितलेली माहिती पूर्णपणे बरोबर आहे. याबाबत 23 जुलै रोजी मंत्रिमंडळाची बैठक झाली. त्या बैठकीमध्ये केंद्र शासनाप्रमाणे सहावा वेतन आयोग लागू करण्याचा निर्णय घेतला.

...3/-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/ SBT/ MMP/ KGS/

प्रा. वर्षा गायकवाड...

त्यामध्ये केंद्र शासनाच्या धर्तीवर महागाई भत्ता देण्यात आला आहे. त्याशिवाय राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे इतर भत्ते देण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यासाठी 12 ऑगस्ट 2009 रोजी जी.आर. काढण्यात आला. त्यानंतर माननीय सदस्य वारंवार ज्या पत्राचा उल्लेख करीत आहेत ते 24 जुलैचे एक पत्र त्यांना पाठविण्यात आले. त्याचप्रमाणे 31 जुलै रोजी एक पत्र पाठविण्यात आले. सभापती महोदय, 24 जुलैच्या पत्राची प्रत मी आणलेली आहे. त्यामध्ये त्यांनी राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे 1 जानेवारी 2006 पासून सहावा वेतन आयोग लागू केल्याच्या उल्लेख आहे. परंतु आपण 20 जुलै रोजी पत्र पाठविले त्यामध्ये असे म्हटले आहे की, राज्यातील विद्यापीठे व महाविद्यालये यामधील शिक्षकांना केंद्र शासनाच्या समकक्ष पदाप्रमाणे सहावा वेतन आयोग व यु.जी.सी. च्या योजनेप्रमाणे ....

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

वेतनश्रेणी व महागाई भत्ता दि.01-01-2006 पासून लागू करण्याचा व इतर भत्ते व अनुषंगिक लाभ राज्य शासनाच्या कर्मचाऱ्यांप्रमाणे लागू करण्याचा निर्णय घेतलेला आहे हे आम्ही संघटनेला पत्राव्दारे कळविले. हे कळविल्यानंतर सुध्दा 14 जुलै पासून 26 ऑगस्टपर्यंत संप सुरु राहिला. त्या वेळी अशी परिस्थिती होती की, विद्यार्थी आणि पालक होते, त्यांच्यामध्ये संभ्रमाची आणि घबराटीची परिस्थिती निर्माण झाली होती. अशा प्रकारे घबराट पसरलेली असल्यामुळे या विषयाच्या संबंधात लोकजागृती व्हावयास पाहिजे, लोकांचे प्रबोधन व्हावयास पाहिजे म्हणून आम्ही जाहिराती व्दारे लोकांना मार्गदर्शन केले की, आम्ही या-या सुविधा देत आहोत आणि असे असताना सुध्दा संप मागे घ्यावा . . . . (अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, मी केलेला आरोप त्यांनी मान्य केलेला आहे त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. माझे असे म्हणणे आहे की, 23 जुलैला मंत्रिमंडळाने निर्णय घेतला आणि सभागृहामध्ये जे सांगितले त्याप्रमाणे निर्णय झाला. ते झाल्यानंतर 24 जुलैला पत्र लिहून दिले आणि त्याची प्रत तुमच्याकडे आहे असे आपले म्हणणे आहे योग्य आहे. मग मी त्यातील मुळ शब्द वाचून दाखवितो. त्या मध्ये एका अक्षराची चूक झाली तर आपण मला सांगा.. हे शब्द असे आहेत की, "राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे दिनांक 1 जानेवारी 2006 पासून सहावा वेतन आयोग लागू करण्याबाबत निर्णय घेतला आहे." राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतचा सहावा वेतन आयोग वेगळा आहे आणि यु.जी.सी.चा सहावा वेतन आयोग वेगळा आहे. राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना ग्रेड पे आहे आणि यु.जी.सी.मध्ये ॲकॅडमिक ग्रेड पे आहे. ग्रेड पे आणि ॲकॅडमिक ग्रेड पे सर्व ठिकाणी वेगवेगळे आहेत. वेतन बॅण्डमध्ये सुध्दा काही ठिकाणी फरक आहे. तुम्ही 31 तारखेला जे लिहीले ते सुध्दा चुकीचे आहे आणि तुम्ही त्याबाबत पुन्हा उल्लेख करीत असाल तर मी पुन्हा विचारु इच्छितो की, 24 जुलैला पत्रकामध्ये अधिकाऱ्यांनी असत्य का लिहिले ? सचिव हे लोकांना भडकावण्यासाठी आहेत काय ? सभागृहामध्ये माननीय मंत्री महोदयांनी आश्वासन द्यावयाचे, त्यानुसार मंत्रिमंडळाने निर्णय घ्यावयाचा आणि त्याप्रमाणे जी.आर.देखील बरोबर निघाला. माझे म्हणणे असे आहे की,. मी अजून 31 तारखेच्या पत्राचा उल्लेख केलेला नाही. त्यांनी तुमच्या विरोधामध्ये 31 तारखेच्या पत्रामध्ये तर किती चुका केलेल्या आहेत हे मी सांगू इच्छितो. मात्र त्यांनी 24 तारखेच्या पत्रामध्ये ते असत्य व चुकीचे वाक्य का लिहिले ? याचे उत्तर आपण दिले पाहिजे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदय, त्यांनी 24 तारखेला पत्र लिहिले आणि मग आम्ही पुन्हा दि.31 जुलै रोजी पत्र लिहिले आणि त्या पत्रामध्ये आम्ही स्पष्टपणे लिहिले होते की,"राज्यातील विद्यापीठे आणि महाविद्यालये या सगळया संस्थांना केंद्र शासनाप्रमाणे यु.जी.सी. अंतर्गत जी वेतनश्रेणी आहे आणि जेवढा महागाई भत्ता आहे, तो दिनांक 01-01-2006 पासून लागू करण्याचा व इतर जे भत्ते आहेत ते राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे लागू करण्याबाबतचा निर्णय आम्ही त्यांना दि.31 जुलै रोजी कळविला होता. पण तरी देखील त्यांनी संप मागे न घेतल्यामुळे विद्यार्थ्यांचा विचार करुन आणि त्यावेळची परिस्थिती पाहता आम्ही जाहिरात देण्याचा निर्णय घेतला.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, याठिकाणी माननीय मंत्री महोदयांनी 31 जुलैच्या पत्राचा उल्लेख केला आहे. पण याबाबतीत मंत्रिमंडळाने घेतलेले निर्णय कळविण्यात आणखी चुका या पत्रामध्ये करण्यात आलेल्या आहेत. त्या मी सांगू इच्छितो. त्यांनी 31 तारखेच्या पत्रामध्ये यु.जी.सी.वेतनश्रेणी एवढाच शब्द वापरलेला आहे."इन्क्ल्युडींग एलीमेंट ऑफ प्रमोशन" असा शब्द वापरला नाही, आश्वासित प्रगती योजना असा शब्द वापरलेला नाही आणि त्यानंतर त्या वाक्यामुळे महाराष्ट्राच्या उच्च शिक्षण क्षेत्रावर रॉकेल ओतावे असे वाक्य पुढे टाकण्यात आलेले आहे. त्यांनी सर्वत्र घासलेट ओतले गेले. ते वाक्य असे आहे की, "अनुषंगिक लाभ हे राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या प्रमाणे रहातील." माननीय मंत्री महोदया, हे पुढील वाक्य बरोबर आहे काय ? या वाक्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रातील उच्च शिक्षण क्षेत्र पेटून उठले. मात्र तुमच्यामुळे जी.आर.मध्ये तसे नाही. मंत्रिमंडळानेही तसा निर्णय घेतलेला नाही. मग हा कोण अधिकारी आहे ? का लिहिले तसे वाक्य त्यांनी?

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

तसे लिहिण्याचा त्या अधिकाऱ्याला काय अधिकार आहे ?

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, अधिकारी मोठे आहेत की शासन मोठे आहे याचा सभागृहामध्ये निर्णय व्हावयास पाहिजे. हे अधिकारी कोण आहेत ? त्यांना शासन केले पाहिजे.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

श्री.राजेश टोपे : सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी दोन मिनिटे खाली बसावे.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

22-12-2009 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) 3J-3

APR/KTG/ MMP/ 16:00

श्री.कमलकिशोर कदम : सभापती महोदय, संबंधित अधिकाऱ्यांना सदनासमोर बोलाविण्यात यावे आणि शासन करावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी दोन प्रश्न उपस्थित केले आहेत. ज्यासंदर्भात प्रामुख्याने असे सांगण्यात आले की,यासंबंधातील जी.आर.मधील जे शब्द आहेत, त्याच्या अनुषंगाने, ठीक आहे मग ते लोक प्रबोधनासाठी असो किंवा विद्यार्थ्यांच्या माहितीसाठी असो जाहिराती देण्यात आल्या.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे ..

सभापती महोदय, मी जाहिरातींचे समर्थन करतो. मी जाहिरातीचा विरोध करणार नाही. परंतु प्राप्त परिस्थितीमध्ये सन्माननीय प्रा. बी.टी. देशमुख यांना मी सांगेन की, 45 दिवस संप चालला त्यामुळे लोकांना शासनाची भूमिका कळावी यादृष्टिकोनातून जाहिराती देण्यात आल्या. सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी. देशमुख यांचे म्हणणे असे आहे की, अस्तित्वात असलेले अलाऊन्सेस आहेत आणि सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे मिळणारे जे अलाऊन्सेस आहेत त्यापेकी जे जास्तीचे आहेत ते मंत्रिमंडळाने मान्य केलेले आहेत परंतु जाहिरातीमध्ये तो मजकूर आलेला नाही.

प्रा. बी. टी. देशमुख : 12 तारखेला जी.आर. निघाला आणि 15 तारखेला त्या विरोधात जाहिरात देण्यात आलेली आहे.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, ही जी चूक झालेली आहे, त्यामुळे अधिव्याख्यात्यांमध्ये किंवा शिक्षकांमध्ये एक चुकीचा संदेश जाण्याची शक्यता निर्माण झाली असेल. सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी.देशमुख म्हणतात ती कदाचित निश्चित प्रकारे वस्तुस्थिती असू शकेल. सभापती महोदय, निश्चितप्रकारे ही चूक झालेली आहे, हे मी मान्य करतो. जी.आर. आणि जाहिरातीमध्ये काही फरक निर्माण झाला त्यामुळे काही चुकीचा संदेश जाण्याची शक्यता निर्माण झाली. त्यामुळे संपकऱ्यांच्या भावना सुध्दा दुखावल्या हा एक विषय मी मान्य करतो पण याच बरोबर नेट-सेटच्या संदर्भात एक्झ ाम्शन देण्याच्या विषय यु.जी.सी.मध्ये चालू आहे. साधारणत: आठ हजार अधिव्याख्याते आहेत. त्यामुळे याबातचा निर्णय लवकर व्हावेत यादृष्टिकोनातून एक समिती नेमून लवकरात लवकर ते करुन घेण्याच्या दृष्टिकोनातून शासनाने संपकऱ्यांबरोबर चर्चा करुन त्या गोष्टी ठरविल्या होत्या. परंतु सन्माननीय ज्येष्ठ सदस्य प्रा. बी. टी. देशमुख यांनी सांगितले की, सचिवांनी तेथे जाऊन हे करु नका असे म्हटले आहे. सभापती महोदय, यासंदर्भात ज्या काही लेखी किंवा तोंडी सूचना केल्या असतील या दोन्ही मुद्याच्या संदर्भात सभागृहाची भावना लक्षात घेऊन शासन निश्चित प्रकारे चौकशी करील. आणि त्यांच्याकडून कळत न कळत किंवा जाणीवपूर्व चूका झाल्या असतील तर त्या संदर्भात निश्चितप्रकारे जाब विचारण्यात येईल.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, माझ्याकडे 24 ऑगस्ट 2009 चे त्यांचे लेखी पत्र आहे. यु.जी.सी.कडे जे तीन अधिकारी गेले त्या तीन अधिकाऱ्यांची नावे यामध्ये दिलेली आहेत. त्या पत्रामध्ये असे म्हंटले आहे की, " With Reference to your above referred letter, following Officers of this State Government attended the University Grants Commission on 18th August, 2009- 1. Shri J.C. Saharia, Principal Secretary. 2. Smt. Seema Dhamdhere, Joint Secretary. 3. Smt. S. A. Ghorpade, Under Secretary." सभापती महोदय, 18 तारखेला हे जाऊन आले आहेत. नुसतेच जाऊन थांबले नाहीत तर 24 तारखेला मंत्रिमहोदय म्हणतात त्या प्रमाणे हे करु नका असे लेखी पत्र त्यांनी युजीसीला दिलेले आहे. सभापती महोदय, दि. 24 ऑगस्ट रोजी हे पत्र पाठविलेले आहे. मा. मंत्रिमहोदयांनी फोन करुन विनंती केली अगोदर शे-पाचशे केसेस यु.जी,सी. न निकाली काढल्या होत्या त्यानंतर मंत्रिमहोदय बोलल्यावर पुढच्या आठ दहा दिवसात शे-पाचशे केसेस त्यांनी निकाली काढलेल्या होत्या. कोर्टाची सुद्धा तशी ऑर्डर आहे या सभागृहात मी गेल्या तीस वर्षात एकदाही असे पाहिलेले नाही. मंत्री आश्वासन देतात. मंत्रिमंडळ निर्णय घेते आणि शासननिर्णय निर्गमित होतो. सभापती महोदय, जी.आर. 12 तारखेला इश्यू झाला आणि वर्तमानपत्रात 15 तारखेला जाहिरात देण्यात आलेली आहे.किती तरी वर्तमानपत्रात ही जाहिरात देण्यात आलेली आहे आणि असत्य माहिती देणारी ही जाहिरात आहे. 30 हजार लोक वर्गाच्या बाहेर असताना त्यांना असत्य माहिती देऊन भडकविणारी ही जाहिरात आहे. या जी.आर.मधील शब्दांचे अर्थ अधिकाऱ्यांना कळत नसतील, तर मग त्यांची लायकी काय? माननीय मंत्रिमहोदयांनी या ठिकाणी कबूल केले की, ती त्यांची चूक झालेली आहे, आपण कबुल केले त्याबद्दल मी आपला आभारी आहे. त्या जागेवर त्या अधिकाऱ्यांना राहण्याची काय शोभा आहे?. सभापती महोदय, जाहिरातीमध्ये काय वाक्य लिहिलेले आहे? "अनुषंगिक लाभ राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे राहतील". हे वाक्य मंत्रिमंडळाच्या निर्णयाच्या व शासननिर्णयाच्या विरोधात आहे. सभापती महोदय, मी माननीय मुख्यमंत्र्यांना सांगू इच्छितो की, विद्यापीठ अनुदान आयोगातर्फे काही पाच-सात गोष्टी दिल्या जातात. अनअसाईन्ड ग्रँट दिली जाते. रिसर्च पब्लीकेशनसाठी ही ग्रँट देशभर दिली जाते. यामध्ये कोणी रिसर्च करत असेल तर त्यांना मदत देण्यात येते. त्यासंबंधीचे पैसे शासनाकडे येतात आणि

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी.टी.देशमुख....

शासनामार्फत ते त्यांना देण्यात येतात. फॅकल्टी इम्प्रुव्हमेंट प्रोग्रॅममध्ये एक-एक वर्ष, दोन-दोन वर्षाचा पूर्ण पगार यु.जी.सी. देते. सभापती महोदय, माझे असे म्हणणे आहे की, जी.आर.मध्ये नमूद केलेले आहे. 12 तारखेला तो जी.आर.निघालेला आहे. जी.आर. या अधिकाऱ्यांना माहीत होत नाही काय? एखादवेळी आमच्याकडे त्याची प्रत येत नाही. सचिवांनाही जी.आर.माहीत होत नाही काय? 12 तारखेला जी.आर.निघाला की, दोन पैकी जे बेटर असेल ते देऊ. आणि हा सज्जनगृहस्थ 15 तारखेला जाहिरात देतो की, "अनुषंगिक लाभ राज्य शासकीय कर्मचाऱ्या प्रमाणेच राहतील. It is humiliating to the Cabinet; it is humiliating to the Minister. सभापती माहेदय, ही काय पध्दत आहे?

यानंतर श्री. बरवड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

प्रा. बी. टी. देशमुख : माझा प्रश्न असा आहे की, जाहिरातीत असत्य वाक्य छापणाऱ्या आपण या अधिकाऱ्यांवर काय कारवाई करणार ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, यामध्ये जे दोन विषय आहेत त्याबाबत मी सांगितले की, यु.जी.सी.कडे त्यांनी शासनाच्या विरोधात किंवा शासनाची जी भूमिका आहे त्यापेक्षा वेगळी भूमिका यु.जी.सी.मध्ये स्वत: मनाने घेतली असेल आणि जाहिरातीमध्ये शासन निर्णयाचा जो मजकूर आणि माहिती आहे त्याच्या विरुध्द किंवा त्यामध्ये थोडाफार फरक करुन काही गोष्ट झाली असेल तर या दोन्ही गोष्टींची सखोल चौकशी करुन माननीय मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास या सगळ्या गोष्टी आणल्या जातील आणि माननीय मुख्यमंत्री त्यांच्या स्तरावर निश्चित प्रकारे योग्य ती कारवाई करतील.

उपसभापती : यानंतर लक्षवेधी सूचना क्रमांक 4 घेण्यात येईल.

श्री. कमलकिशोर कदम : सभापती महोदय, या सभागृहात जी घोषणा केली त्याच्या विपरित दुसरी कारवाई केली यामध्ये या सभागृहाचा हक्कभंग झालेला आहे. हा हक्कभंग प्रस्ताव आपण स्वीकारावा आणि संबंधित अधिकाऱ्याला नोटीस देऊन या सभागृहाची क्षमा मागावयास लावली पाहिजे. आम्ही या सभागृहाचा अवमान होऊ देणार नाही.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, आपल्याला असा हक्कभंग प्रस्ताव स्वीकारता येतो. हा प्रस्ताव हक्कभंग आपण स्वीकारावा आणि तो विशेष हक्क समितीकडे पाठवावा.

उपसभापती : पहिली गोष्ट अशी की, या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी आपल्या भवना व्यक्त केलेल्या आहेत. माननीय मंत्रिमहोदयांनी त्यासंदर्भात उत्तर दिले. माननीय मंत्री श्री. टोपे यांनी असेही सांगितले की, यासंदर्भात जर त्या अधिकाऱ्याकडून जाणीवपूर्वक अथवा कळत नकळत काही चूक झाली असेल त्यासंबंधी ताबडतोब चौकशी करुन त्या चौकशीचा अहवाल ते माननीय मुख्यमंत्र्यांना सादर करतील आणि मग माननीय मुख्यमंत्री तो अहवाल तपासल्यानंतर जी योग्य कारवाई असेल ती करतील.

(दोन्ही पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, आपण एक मिनिट माझे म्हणणे ऐकून घ्यावे. हा गंभीर प्रश्न आहे.

उपसभापती : मी अर्धा तास सन्माननीय सदस्यांचे म्हणणे ऐकत आहे. आता आपण माझे म्हणणे ऐकून घ्यावे. या प्रश्नाचे गांभीर्य ओळखूनच मी बोलण्यासाठी उभा आहे. माननीय मुख्यमंत्री यासंदर्भात योग्य ती कारवाई करतील असे माननीय मंत्रिमहोदयांनी स्पष्टपणे सांगितले आहे. सन्माननीय सदस्य डॉ. कमलकिशोर कदम यांचे असे म्हणणे आहे की, यामध्ये सभागृहाचा हक्कभंग झालेला आहे. मी त्यांना सांगेन की, आपल्याला हक्कभंगाचा प्रस्ताव द्यावयाचा असेल (अडथळा) हक्कभंग झालेला आहे असे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे काय ?

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, आपण आमचे म्हणणे एक मिनिट ऐकून घ्यावे. सन्माननीय सदस्य डॉ. कमलकिशोर कदम यांनी जो मुद्दा मांडला तो असा की, या सभागृहात आश्वासन देण्यात आले. त्याप्रमाणे मंत्रिमंडळाने निर्णय घेतला. मंत्रिमंडळाने निर्णय घेतल्यानंतर जी.आर. निघाला. त्याच्या विरोधात या अधिकाऱ्याने कळविले हे माननीय मंत्रिमहोदयांनी मान्य केले. माझे असे म्हणणे आहे की, प्रथमदर्शनी ही विशेष हक्कभंगाची केस होते. आपण हे प्रकरण विशेष हक्क समितीकडे पाठवावे. या सभागृहाला तो अधिकार आहे. त्या ठिकाणी जो काही निर्णय होईल तो आपल्यापुढे येईल. त्यामुळे त्या एका विषयापुरते आपण हे प्रकरण विशेष हक्क समितीकडे पाठवावे.

श्री. कमलकिशोर कदम : सभापती महोदय, नियमाप्रमाणे हक्कभंगाची नोटीस पाठविणे हा एक भाग आहे आणि सभागृहाच्या समक्ष एखादी हक्कभंगाची घटना कागदोपत्री घडलेली असली तर सभागृहाने त्याला मान्यता देऊन प्रोसेस करणे हा दुसरा भाग आहे. ही घटना घडलेली आहे. आपल्याला माहीत आहे की, सन्माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख जे प्रश्न मांडतात, अनेक वेळा आमचे मतभेद असतात परंतु ते मतभेद बाजूला सारुन ही घटना अतिशय गंभीर आहे आणि जर सर्व ब्युराक्रसी अशी मस्तवाल झाली तर या सभागृहात दिलेल्या आश्वासनांना काहीही किंमत राहणार नाही. यामध्ये वैयक्तिक सदस्याचा नाही तर या संपूर्ण सदनाचा हक्कभंग झालेला आहे. म्हणून त्यांच्यावर आपण नोटीस बजावावी. माननीय मुख्यमंत्री स्वत: जाणून घेऊन एखादी गोष्ट

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कमलकिशोर कदम ....

करणे ही प्रशासकीय कारवाई झाली परंतु या सदनाचा हक्कभंग झालेला आहे त्यावर सदनाला कारवाई करावी लागेल.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, हक्कभंग झाल्याची कागदपत्रे उघड झालेली आहेत. माननीय मंत्रिमहोदयांनी ते मान्य केलेले आहे की, ती चूक झालेली आहे. माझ्याकडे या ठिकाणी मूळ कागदपत्रे आहेत. मंत्रिमंडळाचा निर्णय झालेला आहे. शासन निर्णयाच्या पॅरा ४ ब च्या विरोधात त्यांनी जाहिरात दिली. एवढा विषय विशेष हक्क समितीकडेजाऊ द्या आणि बाकी चौकशी आपण करा. हा विषय मी पुन्हा सांगतो. ज्याचे माझ्याजवळ या ठिकाणी पूर्ण पुरावे आहेत,

यानंतर श्री. खंदारे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख....

30 वर्षामध्ये असा प्रकार मी पाहिलेला नाही. या सभागृहाची एवढी अप्रतिष्ठा करणारा असा जो अधिकारी आहे, Let him face the Privileges Committee of the House. नियमाप्रमाणे त्यांना हे प्रकरण हक्कभंग समितीकडे देता येते कारण फॅक्ट्स समोर आलेले आहेत. दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी फॅक्ट्स मान्य केलेल्या आहेत. शासनाने मान्य केलेल्या आहेत सभागृहात देण्यात आलेले आश्वासन मी पुन्हा वाचून दाखविणार नाही. दिनांक 23 जुलैला मंत्रिमंडळाने निर्णय घेतला हे निवेदनात मान्य केले आहे. त्याप्रमाणे जी.आर.इश्यू झाला याबद्दल दुमत नाही. परंतु सा-या महाराष्ट्रावर घासलेट ओतणा-या या अधिका-याने त्या संघटनेला जे पत्राने कळविले आहे ते 24 जुलैचे मूळ पत्र माझ्याजवळ आहे. मी स्वत: हक्कभंग समितीसमोर ते मांडण्यास तयार आहे. यासंबंधी निर्णय घेण्याचा सभागृहाला अधिकार आहे. या सभागृहाची प्रतिष्ठा या सभागृहाने ठेवली पाहिजे. मी 30 वर्षात असा प्रकार पाहिलेला नाही. मला ही गोष्ट अत्यंत लाजीरवाणी वाटते. आपण प्रत्येकांने आपल्या शक्तीनुसार या सभागृहाची प्रतिष्ठा रहावी म्हणून कार्यवाही करावयाची आहे. पण सभागृहासमोर ही गोष्ट आल्यानंतर ही बाब हक्कभंग समितीसमोर निश्चितपणे पाठवावी असे सन्माननीय सदस्य श्री.कमलकिशोर कदम यांनी जे मत मांडले आहे त्या विचारांशी मी सहमती व्यक्त करतो, आपण सभागृहाला विचारावे आणि 25 सन्माननीय सदस्यांनी हो म्हटले तर तो विषय हक्कभंग समितीकडे पाठवावा.

(सभागृहातील दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य "होय" असे म्हणतात.)

श्री.कमलकिशोर कदम : सभापती महोदय, ही घटना जाणीवपूर्वक केलेली आहे, त्यामुळे संबंधितांना शिक्षा देणे आवश्यक आहे.

(सभागृहामध्ये अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलत असतात.)

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, याबाबत...

उपसभापती : यासंबंधी मी माझा निर्णय देतो. आता सन्माननीय सदस्यांनी आपल्या भावना लक्षात आणून दिलेल्या आहेत. हे निवेदन अपूर्ण आहे असे मला देखील वाटते. सन्माननीय मंत्री महोदयांनी पूर्ण तयारी करुन सभागृहासमोर आले पाहिजे. मी ही लक्षवेधी सूचना उद्यापर्यंत स्थगित ठेवत आहे.

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य "नाही" असे म्हणतात.)

उपसभापती : सन्माननीय सदस्यांनी मंत्रिमहोदयांना एक दिवसाची संधी द्यावी.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, आपण असा निर्णय घेऊ नये.

(सभागृहामध्ये अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलत असतात.)

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, हा सकृतदर्शनी हक्कभंग झालेला आहे.

उपसभापती : मी आता मंत्रिमहोदयांना सांगितले आहे की, त्यांनी तयारी करुन यावे.

श्री.अशोक चव्हाण : सभापती महोदय, सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन या विषयावर शासनाने मंत्रिमंडळामध्ये निर्णय घेतला आणि त्यासंबंधी शासनाचा जी.आर. निघालेला आहे. जी.आर.मधील निर्णय आणि अधिका-यांनी प्रत्यक्ष केलेली कार्यवाही याबाबत विसंगती आहे असे दिसत आहे. मी एकदम सांगू शकणार नाही, मला बारकाईने पहावे लागेल. पण मला एवढेच सांगावयाचे आहे की, संबंधित अधिका-यांना कारणे दाखवा नोटीस दिली जाईल. कारणे दाखवा नोटीसअंती काही तथ्य असल्याचे दिसून आल्यावर व सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन निश्चितच निर्णय घेतला जाईल. त्यामध्ये असे दिसले की, शासनाने घेतलेल्या निर्णयाचे उल्लंघन करुन दुस-याच निर्णयाची अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न केला तर निश्चित कारवाई केली जाईल.

श्री.कमलकिशोर कदम : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी प्रशासकीय कारवाई करण्यासंबंधीचे उत्तर दिलेले आहे. या सभागृहाचा जो अवमान झालेला आहे त्यासंबंधी सभागृहालाच निर्णय घ्यावा लागेल.

(सत्ताधारी व विरोधी पक्षाचे अनेक सदस्य एकाच वेळी बोलत असतात.)

यानंतर श्री.शिगम

अशुद्धीत प्रत / अशुद्धीसाठी नाही

पृ. शी. : सुर्योदय सोसायटी, अंबरनाथ, जि.ठाणे मधील सभासदांना फ्लॅटचे हस्तांतरण करण्यास जिल्हाधि-यांनी केलेली मनाई

मु. शी. : सुर्योदय सोसायटी, अंबरनाथ, जि.ठाणे मधील सभासदांना फ्लॅटचे हस्तांतरण करण्यास जिल्हाधि-यांनी केलेली मनाई यासंबंधी सर्वश्री रामनाथ मोते, संजय दत्त व श्रीमती मंदा म्हात्रे, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.रामनाथ माते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"सूर्योदय सोसायटी, अंबरनाथ, जि.ठाणे येथील भूखंड/फ्लॅटचे हस्तांतरण करतांना येणाऱ्या अडचणी, सन १९४७ साली स्थापन झालेली सर्वात जुनी सहकारी सोसायटी असणे, ६२७ सभासदांना सरासरी ५०० मी.चौ ६२७ भूखंड देणे, भूखंडाचे /फ्लॅटचे हस्तांतरण करण्यास जिल्हाधिकारी यांनी मनाई करणे, हस्तांतरणासाठी बाजारभावाच्या ५० टक्के रक्कम अनर्जित रक्कम वसुल करणे, भूखंड हस्तांतर व सदनिकांच्या खरेदी विक्रीवर निर्बंध लागू करणे, मा.न्यायालयाने याचिका क्र.१९५५/०७ मध्ये असे निर्बंध नियमबाह्य ठरविणे, भूखंड/फ्टॅटधारकांवर कारवाई करण्याच्या नोटीस देण्यात येणे, प्रचंड प्रमाणात दंड वसूल करणे, सभासदांची पिळवणूक व शोषण होणे, याप्रकरणी कायम स्वरुपी तोडगा निघण्याची नितांत आवश्यकता, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष तसेच सूर्योदय सोसायटीच्या सभासदांमध्ये निर्माण झालेली तीव्र असंतोषाची व संतापाची भावना, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.प्रकाश सोळंके (महसूल राज्य मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, लक्षवेधीच्या वितरीत केलेल्या निवेदनामध्ये मला थोडीशी सुधारणा करावयाची आहे.

उपसभापती : ठीक आहे.

श्री. प्रकाश सोळंके : निवेदनातील दुस-या ओळीतील "दिनांक 5.9.1947" या ऐवजी "दिनांक 5.11.1947" असे वाचावे. बाकी वितरित केल्या प्रमाणे.

श्री. रामनाथ मोते : ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ शहरातील सोसाट्यांच्या संदर्भातील हा अतिशय महत्वाचा विषय आहे. सुर्योदय सोसायटी या संस्थेला 1947 साली जमिनीचे वाटप करण्यात आले. ही सुमारे 102 एकर जमीन आहे. हौसिंग सोसायट्यांचे 627 भूखंड याठिकाणी आहेत. जवळ जवळ 25 हजार रहिवाशी या इमारतींमधून राहात आहेत. शासनाने निवेदनामध्ये हे मान्य केलेले आहे की, या इमारतींमधील रहिवाशांकडून नगरपालिकेकडून सर्व प्रकारचे टॅक्सेस घेतले जात आहेत. सर्व प्रकारचे टॅक्सेस देऊन या रहिवाशांनी बांधकाम केलेले आहे. असे असताना खरेदी विक्री करताना शासनाकडून अत्यंत चुकीच्या पध्दतीने दंड वसूल केला जातोय. 50 टक्क्यापेक्षा जास्त रक्कम शासनाला द्यावी लागेल असे निवेदनामध्येच म्हटलेले आहे. एवढेच नाही तर भूखंडाची विक्री करताना 62.5 ते 75 टक्के इतकी रक्कम दंड म्हणून वसूल करण्याचे मान्य केलेले आहे. या निर्णयामुळे तेथील रहिवाशी अडचणीत आलेले आहेत. माझे नेमके दोन प्रश्न आहेत. या रहिवाशांना दिलासा देण्याची आवश्यकता आहे. त्यांचा कोणत्याही प्रकारे दोष नसताना त्यांना नोटीसा देणे, त्यांचे गाळे सिल करणे, दंड वसूल करणे इत्यादी प्रकारची कारवाई केली जात आहे. या कारवाईला तातडीने स्थगिती देण्याची आवश्यकता आहे. खरेदी विक्रीचे व्यवहार बंद झालेले आहेत. जिल्हाधिका-यांनी दिलेली स्थगिती उठविण्याच्या संदर्भात आणि दंडात्मक कारवाई स्थगित करण्याच्या संदर्भात शासन लवकरात निर्णय घेणार आहे असे निवेदनामध्ये म्हटलेले आहे. तेव्हा या रहिवाशांवर कोणत्याही प्रकारची कारवाई न करण्याबाबत शासन संबंधितांना निदेश देईल काय ?

श्री. प्रकाश सोळंके : ही अंबरनाथ येथील जमीन डी.डी.स्किम नं.15 अंतर्गत जिल्हाधिकारी ठाणे यांच्या दिनांकित 5.11.1947च्या आदेशान्वये सुर्योदय को-ऑप. हौसिंग सोसायटी, अंबरनाथ यांना काही अटी व शर्तीवर दिलेली आहे. त्यामध्ये शासनाच्या परवानगी शिवाय जमिनीच्या कोण्त्याही भागाची विक्री अन्य व्यक्तीस करता येणार नाही आणि सरकारी आकारणीपेक्षा जास्त

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. प्रकाश सोळंके....)

दराने जमिनीची विक्री करण्याची परवानगी देण्यात आल्यास अतिरिक्त रकमेच्या 50 टक्के रक्कम शासनाला द्यावी लागेल अशी अट आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, ही जमीन देऊन बराच कालावधी उलटून गेलेला आहे, अनेक खरेदी विक्रीचे व्यवहार झालेले आहेत. रहिवाशी मोठ्या संख्येने आहेत. महसूल यंत्रणे मार्फत काही कारवाई झालेली आहे, इत्यादी गोष्टींचा सन्माननीय सदस्यांनी थोडक्यात आढावा घेतला. मी याबाबतीत सांगू इच्छितो की, शासनाची किंवा जिल्हाधिकारी यांची पूर्व परवानगी न घेता काही प्रकरणामध्ये शासनाने मंजूर केलेल्या भूखंडावर सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या सदस्यांनी मूळ बांधकामे काढून टाकून त्या भूखंडावर बहुमजली इमारतीचे बांधकाम करुन सदनिकांची विक्री संस्थेचे सदस्य नसलेल्या अन्य व्यक्तींना केली आहे. या गोटी नियमानुकूल करण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे. त्यासंदर्भात काही माहिती मागविलेली आहे. ती माहिती प्राप्त व्हायची आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे दंडात्मक कारवाईला स्थगिती देऊन लवकरच संबंधित व्यक्तींची बैठक मंत्रालयामध्ये बोलावून लवकरात लवकर निर्णय घेण्यात येईल.

उपसभापती : या संदर्भात स्थगिती देण्यासंबंधी जिल्हाधिका-यांना कळवावे आणि तात्काळ बैठक घ्यावी असे माननीय मंत्री महोदयांना मी सांगू इच्छितो.

...नंतर श्री. पां. खर्चे...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखापाठ नाही

पृ शी : सिंधुदुर्ग जिल्ह्यात मंदिरातील चोऱ्यांचे व दरोड्यांचे वाढत असलेले प्रकार

मु. शी. : सिंधुदुर्ग जिल्ह्यात मंदिरातील चोऱ्यांचे व दरोड्यांचे वाढत असलेले प्रकार यासंबंधी डॉ. नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने माननीय गृह मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"विजयदुर्ग (जि.सिंधुदुर्ग) मध्ये चोऱ्या व दरोड्याच्या प्रमाणात वाढ झाली असून गिर्ये रामेश्वर मंदिरातील चोरीनंतर अवघ्या आठ दिवसांत विजयदुर्ग दशकोशातील पडेल गावातील रवळनाथ, भावकादेवी, श्री देव शंकेश्वर तसेच पुरळ येथील रवळनाथ पावणाई, तसेच वाडा येथील रवळनाथ, महालक्ष्मी ही मंदिरे दिनांक 21 नोव्हेंबर, 2009 रोजी वा त्यासुमारास दरवाजे तोडून देवाच्या मूर्ती , सोनेरी नेत्र, तरंग मुखवटे, दान पेट्यातील रोख रक्कम , 350 वर्षापूर्वीच्या नवग्रहांच्या मूर्ती आणि हजारो रुपयांच्या मौल्यवान वस्तू चोरीला जाणे, श्री, देव शंकेश्वर मंदिरातील शंकराची 25 किलो वजनाची पंचधातूची लाखो रुपये किंमतीची मूर्तीची चोरी होणे, याप्रकरणी अद्यापही तपास न लागणे, तपास कामासाठी पोलिसांची निष्क्रियता, या प्रकरणी कार्यवाही करण्यास पोलिसांना आलेले अपयश, परिणामी तेथील ग्रामस्थांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष व संतापाची भावना, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही"

श्री.रमेश बागवे (गृह राज्यमंत्री) : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मंदिरातील देव सुध्दा आता सुरक्षित नाहीत. दि. 26 मार्च रोजी एकूण 7 मंदिरांमध्ये दरोडे पडलेले आहेत. चोरी करण्याचा प्रकार पाहिला तर छतावरील मूर्ती उचकडून नेलेल्या आहेत. अशा प्रकारे अत्यंत योजनाबध्द रितीने हे दरोडे घातलेले आहेत याचा अर्थ या दरोडेखोरांना मंदिराच्या रचनेची चांगलीच कल्पना असावी. या घटनेला 10 महिन्यांचा काळ लोटून सुध्दा यातील एकही आरोप सापडलेला नाही. अशाच पध्दतीचे दरोडे राजापूर तालुक्यातील धूतपापेश्वर मंदिर, कोल्हापूरचे जैन मंदिर, पुण्यातील जुन्नर येथील शिवाई मंदिरामध्ये असे दरोडे पडलेले आहेत. आपल्याला कल्पना आहेच की यासंबंधी राजन कोचर समितीची नियुक्ती केली होती आणि त्या समितीने आपल्या अहवालात एक आराखडा सुध्दा सादर केला होता व त्यानुसार तपास चालू आहे, त्या अनुषंगाने शासनाने कोणती पावले उचलली हे समजत नाही. म्हणून माझा या अनुषंगाने असा प्रश्न आहे की, या दरोड्यांच्या बाबतीत शासन फक्त तपास चालू आहे असेच सांगते. गुन्हेगारांना पकडण्याच्या संदर्भात शासनाने कोणती पावले उचलली ? तसेच असे गुन्हेगारी कृत्य करणाऱ्यांना मोक्का लावून हे आरोपी पकडून त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात येणार आहेत काय ?

श्री. रमेश बागवे : सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, सिंधुदुर्ग जिल्ह्यात अशा प्रकारच्या चार दरोड्याच्या घडना घडल्या आहेत. त्यापैकी तीन घटना विजयदुर्ग पोलीस स्टेशनच्या हद्दीत तर एक घटना देवगड पोलिसांच्या हद्दीत घडलेली आहे. देवस्थानात चोरी करणे हा गंभीर गुन्हा आहे. देवाची मूर्ती, देवाचे अलंकार मंदिरातून चोरीस गेल्यामुळे समाजाचे ते श्रध्दास्थान असल्याने समाजाच्या भावना भडकण्याची शकयता असते, याबाबतही लोकांच्या भावना अत्यंत तीव्र आहेत. शासनाने यासंदर्भात योग्य ती पावले उचलली असून वेळोवेळी जे गुन्गार घडलेले आहेत त्यांच्या बाबतीत कारवाई केली आहे. तसेच स्थानिक अधिकाऱ्यांच्या माध्यमातून याबाबतची तपासणी केली आहे, फिंगर प्रिंट घेतल्या आहेत तसेच संशयित गुन्हेगारांची प्रभावीपणे तपासणी सुध्दा केली आहे. पोलीस तपासणी नाक्यावर वेगवेगळया वाहनांना अडवून त्यांचीही तपासणी केली आहे. याव्यतिरिक्त संबंधित सथानिक देवस्थानच्या समितीबरोबर बैठका घेऊन समन्वय साधला व त्यांना मंदिरामध्ये रखवालदाराची व्यवस्था करण्याच्याही सूचना दिल्या आहेत. चेक पोस्ट नाक्यांवर संशयित व्यक्तिची तपासणी केली असून रात्रीच्या वेळी गस्तीचे प्रमाणही

अशोधित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. रमेश बागवे .....

वाढविलेले आहे. त्यानंतर आय.जी. कोकण विभागाच्या अधिकाऱ्यांना तशा सूचना देऊन घटना स्थळ चेक करण्याची व्यवस्था केली आहे. त्याचबरोबर ज्याप्रमाणे शहरात मोहल्ला समित्या असतात त्याच धर्तीवर ग्रामीण भागात सुध्दा स्थानिक ग्रामस्थ, देवस्थान समिती आणि स्थानिक पोलीस अधिकाऱ्यांची एक समिती गठित करुन अशा गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवण्याची योजना शासनाने तयार केली आहे. या घटनेपैकी एका ठिकाणी 53 टक्के गुन्हेगारांची तर देवगड येथे 69 गुन्हेगारांना तपासले आहे. अशा प्रकारे या गुन्ह्यांच्या बाबतीत प्रभावीपणे अंकुश ठेवण्याच्या सूचना तर दिलेल्याच आहेत त्याचबरोबर सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी सुचविल्यानुसार धोकेदायक व्यक्ती म्हणून एमपीडीए लावून कडक कारवाई करण्याचाही शासनाचा विचार आहे.

श्री. किरण पावसकर : मला शासनाच्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी ज्या तारखा सांगितल्या त्यानुसार 7 ते 8 महिन्यांच्या कालावधीत इतके दरोडे पडले असताना शासनाला मंदिरांच्या संदर्भात भावना काय आहेत हेच समजत नाही. एकाच भागात इतक्या प्रमाणात दरोडे पडत असतील तर केवळ तपास चालू आहे अशा प्रकारचे उत्तर दिले जाते. माननीय मंत्री महोदयांनी तपासाची यंत्रणा येथे सांगितली आहे. पण कोकणविषयी शासनाचे वेगळे धोरण आहे की काय हेच मला समजत नाही. कारण इतक्या मोठ्या प्रमाणात चोऱ्या होतात, चोर सापडत नाही. बेपत्ता झालेल्या व्यक्तिचा कुठेही तपास लागत नाही. याचे कारण श्री. रमेश गोवेकर बेपत्ता होऊन पाच वर्षे झाली परंतु तो सापडला नाही किंवा गुन्हेगारांचाही तपास लागला नाही. अंकुश राणेची हत्त्या झाली परंतु हत्येकरी अजूनही मिळाले नाहीत.....

यानंतर श्री जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

श्री. किरण पावसकर ...

मंदिरामध्ये चो-या झाल्या तरी त्याची रिकव्हरी होत नाही. कोकणामध्ये घडत असलेल्या वेगवेगळया गुन्हयांबाबत शासनाचे काही वेगळे धोरण आहे काय ? गृहविभागाकडून केवळ यंत्रणा राबविली जाते परंतु तपासाचे कोणतेही काम होत नाही त्यामुळे यासंदर्भात कोणती कार्यवाही केली जाणार आहे ?

श्री. रमेश बागवे : सन्माननीय सभापती महोदय, या ठिकाणी पोलिसांनी वारंवार तपासून करुन देखील आजतागायत गुन्हेगार सापडले नाही ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे या तपासाचे काम सीआयडी क्राईमकडे देण्यात आलेले आहे. या गुन्हयांचा तपास सीआयडी क्राईमकडून लवकरात लवकर तपास केला जाईल एवढे या निमित्ताने मी सांगू इच्छितो.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, या ठिकाणी माननीय मंत्रीमहोदयांनी सांगितले आहे की, "या ठिकाणी खास गस्ती सुरु आहेत." या ठिकाणी गस्ती सुरु असतांना देखील गेल्या आठ दिवसापूर्वी आरोस येथील पोलीस मुख्यालयाजवळ एका बंगल्यात चोरी झाली आहे. कणकवली येथे काल चार घरफोडया झाल्या. कोकणामध्ये सातत्याने चो-या होत आहेत परंतु एकही चोर सापडत नाही त्यामुळे यासंदर्भात कोणती ठोस उपाययोजना करण्यात येणार आहे त्याची माननीय मंत्रीमहोदयांनी माहिती द्यावी.

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय, मी आताच सांगितले आहे की, गस्तीचे प्रमाण वाढविले असून गस्त प्रभावीपणे करण्यात आलेली असून हा सर्व तपास सीआयडी क्राईमकडे देण्यात आलेला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : जालना जिल्हा परिषद सिंचन विभागात झालेला भ्रष्टाचार

मु. शी. : जालना जिल्हा परिषद सिंचन विभागात झालेला भ्रष्टाचार

यासंबंधी सर्वश्री सतीश चव्हाण, विक्रम काळे,रमेश शेंडगे, संजय पाटील वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.सतीश चव्हाण (औरंगाबाद विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय जलसंधारण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"जालना जिल्हा परिषद सिंचन विभागात हाती घेतलेल्या पाझर तलाव, गाव तलाव, के.टी.बंधारे इत्यादी कामांमध्ये सुमारे २३ कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याची बाब उघडकीस येणे, यामध्ये लेखाशीर्षाखालील निधी सिंचन विभागाकडे दुसऱ्या विभागाच्या मंजूरी विना हस्तांतरीत करणे, कामाचे वाटप मनमानीपणाने पध्दतीने करणे, त्यामुळे जिल्हा परिषदेमधील कर्मचाऱ्यांना त्यांचे वेतन पाच महिन्यांपासून न मिळणे, व सदर गैरव्यवहाराचा अहवाल विभागीय आयुक्ताकडे कार्यवाहीसाठी प्रलंबित असणे, त्यामुळे त्यांच्यात पसरलेला असंतोष व निराशेचे वातावरण, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.बाळासाहेब थोरात (जलसंधारण मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सतीश चव्हाण : सभापती महोदय, जालना जिल्हा परिषदेतील सिंचन विभागाच्या कामांना प्रशासकीय मान्यता कोणत्या स्तरावर देण्यात आली आहे? अधिकारी, पदाधिकारी आणि कंत्राटदार यांनी कामे न करता बिले उचलली आहेत त्यासंदर्भात लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात काहीच म्हटलेले नाही. त्यामुळे अधिकारी, पदाधिकारी आणि कंत्राटदारांवर कोणती कारवाई केली जाणार आहे ?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, जालना जिल्हा परिषदेतील सिंचन विभागाच्या कामाच्या संदर्भात डीपीडीसीचा फंड 2702 आणि मराठवाडा विकास कार्यक्रमातून कामे जिल्हा परिषदेने करुन घ्यावयाची होती. यामध्ये एकंदर 37 कोटी रुपयांची कामे करण्यात आली. परंतु कामाची जी किंमत आहे त्याला विविध स्तरावरुन प्रशासकीय मंजूरी देण्यात आलेली आहे. यामध्ये ब-याच अधिका-यांना निलंबित करण्यात आले असून काहींची विभागीय चौकशी देखील सुरु करण्यात आलेली आहे. या ठिकाणच्या गैरव्यवहारामध्ये पदाधिकारी सहभागी आहेत असे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे त्यामुळे पदाधिका-यांच्या बाबत देखील चौकशी करुन त्यांच्यावर कारवाई केली जाईल.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, उत्तरातच मान्य केले आहे की, 18.64 कोटीचे प्रदान निधी उपलब्ध नसतांना जालना जिल्हापरिषदेने नियम न पाळता चुकीच्या पध्दतीने कामे केलेली आहेत. प्रत्यक्षात ज्या कामासाठी निधी नाही ती कामे करण्यासाठी दुस-या कामाचा निधी या कामावर खर्च करण्यात आलेला आहे. पाणी टंचाई असतांना लोकांना पिण्याचे पाणी उपलब्ध करुन दिले असते तर ते एक वेळ आपण समजू शकलो असतो. परंतु या ठिकाणी 906 शेत तळयांची कामे करण्यात आल्याचे सांगण्यात आलेले आहे. परंतु प्रत्यक्षात 906 शेत तळी करण्यात आलेली नाहीत. या प्रकरणात बोगस बिले तयार करुन कोटयावधी रुपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे. प्रशासकीय मान्यता देण्याच्या संदर्भात जसे अधिकारी जबाबदार आहेत तसेच पदाधिकारी सुध्दा या प्रकरणात जबाबदार आहेत. बांधकाम सभापती हा जिल्हा परिषदेचा अध्यक्ष असतो म्हणून यासंदर्भात माझा प्रश्न असा आहे की, प्रशासकीय मान्यता देणारे जे अधिकारी-पदाधिकारी आहेत यांची चौकशी आपण करणार आहात काय? या प्रकरणाचा चौकशी अहवाल आलेला आहे असे आपण म्हणता परंतु काम कशा पध्दतीने कामे करण्यात आलेली आहेत याचीच चौकशी झालेली आहे परंतु प्रत्यक्षात कामे कोठे कोठे झालेली आहेत याची चौकशी केली नाही

....4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

श्री. विक्रम काळे ....

त्यामुळे प्रत्यक्ष सगळया कामावर जाऊन या प्रकरणाची चौकशी केली जाणार आहे काय ? यामध्ये जे अधिकारी-पदाधिकारी दोषी असतील त्यांच्यावर नियमानुसार कारवाई केली जाणार आहे काय ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, या ठिकाणच्या 37 कोटींच्या कामामध्ये एकंदर जी देयके आहेत त्यामध्ये 18.64 कोटी रुपये हे जिल्हा परिषदेच्या राखीव फंडातून दिले गेले आहेत. परंतु हे पैसे राखीव फंडातून द्यावयास नको होते. काम सुरु करीत असतांना निधी असेल तरच कामे सुरु करावीत अशा प्रकारचे शासनाचे आदेश असतांना सुध्दा या ठिकाणी कामे सुरु केली गेली ही वस्तुस्थिती आहे.

यानंतर श्री. गायकवाड.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात....

यामध्ये अनिमितता झालेली आहे तेव्हा कामाच्या बाबतीत सुध्दा कशा प्रकारचे काम झालेले आहे, कामामध्ये काही भ्रष्टाचार झाला आहे काय या संदर्भात काही तपासणी झालेली आहे परंतु काही तपासणी अजून व्हावयाची आहे. तेव्हा औरंगाबादच्या विभागीय आयुक्तांवर` यासंबंधीची जबाबदारी टाकून यामध्ये अधिकारी वा पदाधिकारी जे कोणी गुंतलेले असतील त्या सर्वांची चौकशी केली जाईल आणि त्यांच्यावर पुढील कारवाई केली जाईल.

डॉ.वसंत पवार :सभापती महोदय, सहकार क्षेत्रातील कारखाना असो, बॅन्क असो वा पतपेढी असो त्या ठिकाणी जे पदाधिकारी निवडून येत असतात त्यांच्याकडून एक बंधपत्र घेतले जाते आणि त्यांचे सात बाराचे उतारे ॲटॅच केले जातात. आता या ठिकाणी भ्रष्टाचाराचे एक प्रकरण उघडकीस आलेले आहे. 2 कोटी 89 लाख रुपयांची प्रशासकीय मान्यता असतांना 23 कोटी 21 लाख रुपयांच्या कामाची वर्क ऑर्डर दिलेली आहे. तेव्हा जिल्हा परिषदेच्या पदाधिका-यांकडून सुध्दा या पुढे बंध पत्र घेण्यात येणार आहे काय ?

श्री.बाळासाहेब थोरात :सभापती महोदय, यामध्ये काही अधिकारी आणि काही पदाधिका-यांनीसुध्दा आग्रह करुन काम मंजूर करुन घेतलेले आहेत असे या प्रकरणाच्या निमित्ताने स्पष्टपणे दिसून येत आहे. . कामांना मंजुरी देत असतांना त्यांचासुध्दा सहभाग असल्याचे दिसून येत आहे तेव्हा या बाबतीत नेमकी कोणती कारवाई करावयाची स्पष्ट तरतूद नाही. सन्माननीय सदस्य डॉ वसंत पवार यांनी सांगितल्याप्रमाणे पदाधिकारी काही चुकीने कृती करणार असेल तर त्याबाबतीत सुध्दा कशा प्रकारची कारवाई व्हावी यासंबंधी पुढच्या काळात काही नियम तयार केले जातील.

श्री.विक्रम काळे :सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी चांगले उत्तर दिलेले आहे.या संपूर्ण कामावर मोठया प्रमाणावर खर्च झालेला असल्यमुळे प्रत्येक कामाची चौकशी करण्यात येणार आहे काय ? त्यामध्ये अधिकारी आणि पदाधिकारी जे कोणी दोषी असतील त्यांच्या विरुध्द नियमानुसार योग्य ती कारवाई करणार आहात काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, मी मघाशीच उत्तर दिलेले आहे.औरगाबादच्या विभागीय आयुक्तांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण चौकशी केली जाईल. याकरता ते काही टीम्स तयार करतील आणि या टीम्सच्या मार्फत चौकशी केल्या नंतर आयुक्त एकत्रितपणे चौकशीचा अहवाल देतील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : पिंपरी चिंचवड , पुणे येथील स्टार इंजिनिअरींग इंडिया प्रा. लि. मधील कामगारांना कामावरुन कमी करणे

मु.शी. : पिपरी चिंचवड, पुणे येथील स्टार इंजिनिअरींग इंडिया प्रा.लि. मधील कामगारांना कामावरुन कमी करण्यासंबंधी सर्वश्री उल्हास पवार, जयप्रकाश छाजेड, मोहन जोशी, सय्यद जमा,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.जयप्रकाश छाजेड (विधान सभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय कामगार मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

"मे. स्टार इंजिनिअरींग (इं.) प्रा..लि.54/2, डी - 2 ब्लॉक, एमआयडीसी,चिंचवड, पुणे या कंपनीत गेली 8 ते 10 वर्षे काम करणा-या जवळपास 100 महिला व पुरुष कामगारांना नियमबाहयरित्या कामावरुन कमी करण्यात येणे, कामगारांना बोनस व ओव्हरटाईम दिला न जाणें, हिंद कामगार संघटनेला मानणा-या कामगारांनी दिनांक 11 एप्रिल 2009 रोजी शांतता मार्गाने आंदोलनात भाग घेतल्यानंतर मालकांनी आंदोलन यशस्वी होऊ नये म्हणून गुंडामार्फत संघटनेतील कामगारांना मारहाण करण्यात येणे, कामगारांच्या तक्रारी नोंदवून घ्यायलाही संबधित पोलीस ठाणे यांच्याकडून होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष व टाळाटाळ, परिणामी कंपनी व्यवस्थापनाबद्दल कामगार वर्गात पसरलेली तीव्र चिडीची भावना, स्टार इंजिनिअरिंग कंपनीच्या मालकाने ज्या कामगारांना नियमबाहयरित्या कामावरुन कमी केले आहे. त्यांना तातडीने कामावर हजर करुन घेण्याची गरज व ज्या गुंडाकडून कामगारावर हल्ले केले व जे दवाखान्यात दाखल केले गेले त्यांच्या फिर्यादी नोंदवून तात्काळ संबंधित मालक व गुंडाविरुध्द कारवाई करुन कामगारांना न्याय मिळवून देण्याची नितांत गरज, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही "

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पद्माकर वळवी (कामगार राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(प्रेस : सोबत जोडलेले निवेदन येथे छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयप्रकाश छाजेड : सभापती महोदय, पिंपरी चिंचवड येथील एका कारखान्याच्या संदर्भातील ही लक्षवेधी सूचना आहे.या कारखान्याची ही प्रातिनिधीक लक्षवेधी सूचना आहे.राज्यामध्ये जेथे जेथे औद्योगिक वसाहती आहेत त्या ठिकाणच्या कारखान्यातील कंत्राटी कामगारांना काढून टाकण्यात येत आहे अशा कामगारांनी जर संघर्ष केला वा आंदोलन केले तर पोलिसांची मदत घेऊन हे आंदोलन चिरडून टाकले जाते.कामगारांमध्ये दहशत निर्माण केली जाते या सर्व प्रकारामध्ये कामगार विभाग हतबल होऊन बघत राहतो.एका कंपनीमध्ये कामगार, पोलीस, मालक, कामगार विभाग यांची हातमिळवणी झाल्यानंतर काय प्रकार घडतात याचे स्टार लाईट कंपनी हे एक उदाहरण आहे असे म्हटल्यास वावगे होणार नाही.या लक्षवेधी सूचनेच्या निवदनामध्ये देखील विसंगत उत्तर देण्यात आलेले आहे.मालकाला खरचटले तर कामगाराला सहा सहा महिने जामीन मिळत नाही.परंतु कामगारांना गंभीर स्वरुपाच्या जखमा झाल्यानंतरसुध्दा किरकोळ स्वरुपाच्या जखमा झाल्या आहेत असे निवेदनात म्हटलेले आहे. त्यामुळे पोलीस मालकाविरुध्द कारवाई करीत नाही. जखम गंभीर स्वरुपाची आहे किंवा नाही हे ठरविण्याचा अधिकार कामगार विभागाला व पोलिसांना दिलेला नाही. दुसरी एक गोष्ट मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. या निवेदनामध्ये असे म्हटलेले आहे की, " हळूहळू कंत्राटी कामगारांना कमी करुन कायम कामगारांना घेण्यात येणार आहे." ज्या कंत्राटी कामगारांना कमी केले आहे त्याच कामगारांना कायम कामगार म्हणून परत कामावर घेण्यात येणार आहे काय ? ज्या कामगारांवर मालक आणि त्यांच्या गुंडाने हल्ला केला असल्यामुळे जखमा झालेल्या आहेत त्या मालकावर आणि गुंडावर कारवाई करण्यात येणार आहे किंवा नाही ?सभापती महोदय, आपल्या मार्फत माझ्याकडील फोटो मी माननीय मंत्रिमहोदयांकडे देत आहे.ज्या कामगारांवर हल्ला झालेंला आहे त्या कामगारावरील जखमा किरकोळ स्वरुपाच्या आहेत काय हे गांभीर्याने पाहणे आवश्यक आहे.. त्यावेळचे गृह राज्यमंत्री श्री नितीन राऊत यांनी एक बैठक बोलावली होती आणि श्री. पाटील नावाचे जे डीसीपी तेथे काम करीत होते त्यांना असा आदेश दिला होता की, मालकावर गुन्हे दाखल करण्यात यावेत पंरतु अजूनही त्यांच्याविरुध्द गुन्हे दाखल करण्यात आलेले नाही ही गंभीर बाब आहे . तेव्हा मालकावर गुन्हे दाखल करण्यात येणार आहे किंवा नाही ? नियमाप्रमाणें किमान

6.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

वेतन जर दिले जात नसेल आणि पी.एफ.ची रक्कम जर भरली जात नसेल तर मालकाविरुध्द कोणती कारवाई करण्यात येणार आहे आणि ज्या कामगार विभागाने , कामगार आयुक्तांनी काम केलेले नाही व कामगाराच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष केलेले आहे त्याच्याविरुध्द कोणती कारवाई करणार आहे ?

नतर श्री.सुंबरे

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पद्माकर वळवी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी या लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून जे प्रश्न उपस्थित केले आहेत त्याबाबत मी आपल्याला सांगू इच्छितो की, कामगारांनी तेथे जे आंदोलन केले त्यात ज्या कामगार संघटना सहभागी होत्या त्यांनीच खऱ्या अर्थाने तेथे हिंसाचारात भाग घेतला होता तसेच त्या कामगारांना एवढी काही मारहाण झालेली नाही. कारण जे आंदोलन करणारे कमगार होते त्यांनीच इतर कामगारांना मारहाण केलेली आहे. ...

श्री.अरविंद सावंत (बसून) : मग सन्माननीय सदस्य जे सांगतात ते असत्य आहे का ?

श्री. पद्माकर वळवी : सभापती महोदय, यामध्ये कोणाला किती जखमा झाल्या हे कामगार विभाग काही ठरवित नाही वा सांगत नाही तर डॉक्टर सांगतात. आणि ज्या डॉक्टरांनी त्याबाबतचा रिपोर्ट केला आहे, तपासणी करून रिपोर्ट केला आहे त्यांनी सांगितले आहे की, त्या मारहाणीमध्ये आंदोलन करणाऱ्या पदाधिकाऱ्यांना किरकोळ स्वरूपाच्या जखमा झालेल्या आहेत, खरचटले आहे..

श्री. जयप्रकाश छाजेड : सभापती महोदय, त्यांना जखमा झालेल्या आहेत हे खरे आहे ना? ते खरे असेल तर त्या विरोधात गुन्हा दाखल होतो की नाही ? होत असेल तर गुन्हा दाखल करण्यात आला आहे का ?

श्री. पद्माकर वळवी : सभापती महोदय, त्या कामगारांना तशा जखमा झाल्या असतील तर त्यात जे दोषी आहेत ... सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी येथे जी माहिती दिली आहे त्याची दखल घेऊन कामगारांना तेथे जखमा झाल्या असतील तर तसा गुन्हा दाखल करून घेण्यात येईल आणि कामगार विभागामार्फत त्याबाबत योग्य ती कारवाई केली जाईल.

सभापती : मी माननीय कामगार राज्यमंत्री यांना सांगू इच्छितो की, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.छाजेड यांनी सांगितले आहे की, तेथील कामगारांना जखमा झाल्या आहेत. आता त्या बाबत आपले म्हणणे आहे की, त्या जखमा किरकोळ आहेत. पण मेडिकल रिपोर्टमध्ये हार्ड वा ब्लंट इंज्युरी असा उल्लेख असेल तर त्याबाबत नॉन कॉग्निजिबल गुन्हा दाखल होऊ शकतो आणि शार्प व पॉईंटेड वेपनने केलेल्या जखमा असतील तर त्याबाबत कॉग्निजिबल गुन्हा दाखल होऊ शकतो. तेव्हा त्यांचा मेडिकल रिपोर्ट वा मेडिकल सर्टिफिकेट काय आहे ते आपण पहावे. दुसरे असे की, त्यांना जखमा झाल्या असतील तर त्याबद्दलचा गुन्हा हा नोंदविलाच पाहिजे. तर त्या दृष्टीने आपण कारवाई करावी.

..... 3आर 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पद्माकर वळवी : होय सभापती महोदय. आपण मार्गदर्शन केले त्याप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात येईल. सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचा दुसरा जो मुद्दा कंत्राटी कामगारांसंबंधीचा आहे की, त्यांचे काय होईल ? तर त्याबाबत मी आपल्याला सांगू इच्छितो की, त्या कंपनीमध्ये उत्पादन कमी झाल्यामुळे तेथील कंत्राटी कामगारांच्या कंत्राटदाराने तेथील 16 कामगारांची बदली इतर ठिकाणी केली होती. परंतु ते 16 कामगार त्या बदलीच्या ठिकाणी रूजू झाले नाहीत. पण ते कारखान्याच्या बाहेर राहिले होते. सभापती महोदय, कामगार संघटना आणि कंत्राटदार यांच्यात जो समझोता झाला होता त्यानुसार कंत्राटदाराने सांगितल्या ठिकाणी कामगारांनी जायला पाहिजे होते. पण तसे झाले नाही म्हणून संबंधित कामगारांनी औद्योगिक विवाद अधिनियम 1947 च्या कलम 2 अ नुसार व्यक्तिगतरित्या कंपनी व्यवस्थापनाविरूद्ध कामगार विभाग, पुणे येथे अर्ज केलेला आहे आणि निश्चितपणे कामगार विभाग या कामगारांना न्याय देईल. तसेच अन्य कंत्राटी कामगारांना देखील न्याय देण्याचा कामगार विभाग जरूर प्रयत्न करील.

श्री. जयप्रकाश छाजेड : सभापती महोदय, ज्यावेळेस त्या कामगारांना काम नाही म्हणून कामावरून कमी केले गेले पण त्याचवेळी कंपनीने दुसऱ्या कामगारांना घेऊन, बाहेरून कामगार आणून त्यांच्याकडून काम करून घेतले आहे. म्हणजे कंपनीमध्ये काम होते. तर मग त्यासाठी याच कामगारांना का घेतले गेले नाही ? म्हणून त्या काढून टाकलेल्या कामगारांना पुन्हा कामावर घेऊन त्यांना न्याय हे शासन देईल काय ?

श्री. पद्माकर वळवी : सभापती महोदय, होय, कामगारांना न्याय देण्याबाबत कामगार विभागामार्फत बैठक घेऊन त्यांना जरूर न्याय देण्यात येईल.

श्री. सय्यद ज़मा :मे. स्टार इंजीनियरिंग प्रा.लि., चिंचवड़, पुणे में कामगारों के साथ हुआ अन्याय यह तो एक उदाहरण है. महाराष्ट्र में पिछले कई सालों में कंत्राटी कामगारों की संख्या बढ़ी है. इसलिए मैं यह जानना चाहता हूं कि कंत्राटी कामगारों की संख्या कितनी है और कितने कंत्राटी कामगार रजिस्टर्ड है ? दूसरा मेरा प्रश्न यह है कि, इस मामले में कंपनी व्यवस्थापन, संगठन तथा कंत्राटदार के बीच त्रिपक्षीय समझौता तीन साल के लिए हुआ था. यह बात अधिकारी एवं कंपनी के मालिक कह रहे हैं. यह कंपनी इलेक्ट्रॉनिक वस्तु का उत्पादन करती है जिसकी बाजार में अच्छी मांग है. इसलिए यह जानना जरुरी है कि क्या इस कंपनी ने विद्यमान कामगारों को हटाकर दूसरे कामगार लिए है, अगर दूसरे कामगार लिए गए हैं तो कंपनी के मालिक के विरुध्द लेबर विभाग क्या कार्रवाई करेगा ? (यानंतर श्री. सरफरे 3एस 1

अशुद्धीत मत / शुद्धीसाठी नाही

श्री. पद्माकर वळवी : सभापती महोदय, कॉंट्रॅक्ट लेबर कायद्याप्रमाणे प्रत्येक कंत्राटदराने कामगार विभागाची परवानगी घेणे आवश्यक आहे. म्हणून माननीय सदस्यांनी किती कंत्राटदारांनी शासनाकडून लायसन्स घेतले आहे, असा प्रश्न विचारला आहे? त्याबाबत सविस्तर माहिती असल्यामुळे माननीय सदस्यांनी त्यासाठी वेगळा प्रश्न विचारला पाहिजे. जर त्यांनी मागणी केली तर त्यांना त्याबाबत संपूर्ण माहिती पुरविण्यात येईल. परंतु सद्यातरी विनापरवाना कोणत्याही कंत्राटदाराला अशाप्रकारे कंपनीमध्ये काम करता येत नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: निवृत्त होणाऱ्या सदस्यांना निरोप

सभापती :सन्माननीय सदस्यांना कल्पना आहे की, या सभागृहाचे सहा सन्माननीय सदस्य येत्या 1 जानेवारी 2010रोजी निवृत्त होणार आहेत. निवृत्त होणाऱ्या सन्माननीय सदस्यांना नेहमीच्या प्रथेप्रमाणे भावपूर्ण निरोप देण्याच्या दृष्टीने आज विधानभवनाच्या मुख्य प्रवेशव्दारावर एकत्रित छायाचित्र काढण्याचा कार्यक्रम आयोजित केला आहे. त्यानंतर विधानभवनाच्या प्रांगणात चहापानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. सबब, खालील सन्माननीय सदस्यांना निरोप देण्यासंबधीची बाब आता घेण्यात येत आहे. माननीय सदस्य सर्वश्री मधुकर गणपत चव्हाण, अरविंद गणपत सावंत, अशोक महादेव मानकर, गोपीकिसन राधाकिसन बाजोरिया, चंद्रकांत बटेसिंह रघुवंशी व महादेवराव रामचंद्र महाडिक या माननीय सदस्यांना आता निरोप देण्यात येईल. त्यानंतर नियम 260 अन्वये प्रस्तावावरील चर्चा घेण्यात येईल .

श्री. अशोक चव्हाण (मुख्यमंत्री) : सभापती महोदय, विधानपरिषद सभागृहामधून आज सहा सन्माननीय सदस्य निवृत्त होत आहेत. त्यांना निरोप देण्यासाठी आपण सर्वजण याठिकाणी उपस्थित आहोत. आज जे सन्माननीय सदस्य निवृत्त होत आहेत त्यामध्ये सर्वश्री मधुकर गणपत चव्हाण, अरविंद गणपत सावंत, अशोक महादेव मानकर, गोपीकिसन राधाकिसन बाजोरिया, चंद्रकांत बटेसिंह रघुवंशी व महादेवराव रामचंद्र महाडिक या सहा सन्माननीय सदस्यांपैकी सर्वश्री महादेवराव महाडीक व गोपीकिसन बाजोरिया हे या सभागृहामध्ये दुसऱ्यांदा निवडून आले आहेत. त्याबद्दल मी त्यांचे आपणा सर्वांच्या वतीने मन:पूर्वक अभिनंदन करतो. आणि निवृत्त होणाऱ्या माझ्या सहकारी मित्रांना याठिकाणी भावी आयुष्यासाठी व उत्तम आरोग्यासाठी आपणा सर्वांच्या वतीने शुभेच्छा व्यक्त करतो.

सभापती महोदय, आपल्या या सर्व सहकाऱ्यांनी या सभागृहाचे सदस्य असतांना आपापल्या परीने राज्याच्या विविध प्रश्नांची सोडवणूक करण्याकरिता या सभागृहाच्या माध्यमातून त्यांनी नेहमीच प्रयत्न केलेला आहे. जागरुक लोकप्रतिनिधी या नात्याने त्यांनी आपली कारकीर्द अतिशय प्रभावीपणे पार पाडली आहे. लोकप्रतिनिधी या नात्याने त्यांनी नावलौकिक कमाविला आहे. आणि म्हणून आजच्या क्षणी निवृत्त होणाऱ्या या सभासदांना निरोप देत असतांना मनामध्ये दुखद भावना निर्माण होत आहे असे म्हटले तर ते चुकीचे होणार नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/ SBT/

श्री. अशोक चव्हाण...

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांच्या बाबतीत बोलावयाचे झाले तर त्यांनी अतिशय चांगल्या पध्दतीने आपल्या करीअरला सुंरुवात केली आहे. या राजकीय व सामाजिक क्षेत्रामध्ये काम करीत असतांना त्यांनी चांगले चित्रपट सुध्दा काढल्याची माहिती माझ्याकडे आली आहे. ती माहिती मला नंतर मिळाली. कदाचित माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांना माहीत नसावे. त्यांनी "हमाल दे धमाल" व "शेंम टू शेम" हे दोन चित्रपट काढल्याची माहिती मी घेतली आहे. तसेच हे दोन्ही चित्रपट चांगले चालल्याची माहिती आहे. त्यांना शासनाच्या कोणत्याही अनुदानाची गरज आहे असे वाटत नाही. त्यांची एकंदर कार्यशैली आणि त्यांनी केलेले काम पहाता एक चांगला निर्माता या नात्याने त्यांनी सार्वजनिक क्षेत्रामध्ये उत्तम कामगिरी पार पाडली आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्यांनी विविध आंदोलनामध्ये भाग घेतला. त्यांनी भारतीय जनता पक्षाचे एक अतिशय प्रभावी सदस्य म्हणून काम केलेले आहे. भ्रष्टाचार विरोधी आंदोलनामध्ये सहभागी होऊन त्यावेळेस त्यांनी आपली कारकीर्द गाजविलेली आहे. तसेच त्यांनी 1995 पासून 1999 पर्यंत मुंबई येथील म्हाडाचे अध्यक्ष म्हणून काम केलेले आहे. मुंबईतील घरांच्या प्रश्नाबाबतीत आणि सर्वसामान्य माणसांना म्हाडाच्या माध्यमातून लोकांना न्याय देण्याच्या बाबतीतील भूमिका सर्वश्रुत आहे. त्यांनी भारतीय जनता पक्षाचे प्रदेश चिटणीस आणि पक्षाचा प्रवक्ता म्हणूनही काम केलेले आहे. मी त्यांना मनापासून शुभेच्छा देतो.

सभापती महोदय, याठिकाणी आमचे दुसरे सहकारी सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत हे सुध्दा निवृत्त होत आहेत. त्यांनी आपल्या करिअरला सिंधुदूर्ग जिल्ह्यातून सुरुवात केली, ते आमचे मित्र आणि सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंतजी या सदनातून निवृत्त होत असताना, आपण जर त्यांच्या कारकिर्दीचा आढावा घेतला तर असे दिसून येईल की, महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्नाबाबत शिवसेनेचे आंदोलन असो किंवा एस.टी.कामगारांचा प्रश्न असो,त्याबाबत त्यांनी अतिशय प्रभावी काम केले आहे.मी स्वत: राज्याचा मुख्यमंत्री या नात्याने या प्रश्नांच्या बाबतीत वेळोवेळी ज्या बैठका झालेल्या आहेत, त्यावेळी त्यांना निमंत्रित केले होते. त्यावेळी त्यांनी कामगारांचे जे प्रश्न मांडले आणि ते सोडविण्याच्या दृष्टीने जो पाठपुरावा केला आहे, ते पाहता कामगार क्षेत्रामध्ये क्रेडीटीबिलीटी, असलेला, विश्वासार्हता असलेला जर कोणी नेता असेल तर सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांचे नाव उच्च पातळीवरील आहे असे म्हटले तर ते वावगे होणार नाही. त्यांनी अतिशय अडचणीच्या काळात सुध्दा हे सर्व काम हाती घेतले आणि एक कामगार नेता म्हणून त्यांची कामगिरी अतिशय प्रभावी राहिलेली आहे. त्याचबरोबर आदिवासी, दलित, पददलित यांच्याही प्रश्नाच्या संदर्भात विशेषत: आपण आदिवासींच्या बाबतीत सांगावयाचे तर त्यांच्यासाठी दिवाळी साजरी करण्याचा उपक्रम सुध्दा हाती घेतला होता याची मला माहिती आहे. असे वाटते की, या सगळ्या कामांमुळे सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांची कारकीर्द हे सभागृह विसरु शकणार नाही. या सभागृहाच्या माध्यमातून अनेक प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी निश्चितपणे केलेले आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.गोपीकिशन बाजोरिया हे पुन्हा एकदा या सदनात

. . . .3 टी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निवडून आलेले आहेत. त्यांनी सहकारी क्षेत्रामध्ये देखील चांगली कामगिरी केली आहे. त्यांनी राजस्थानी समाजाचे प्रतिनिधी या नात्याने त्यांनी त्यांच्या क्षेत्रामध्ये चांगल्या प्रकारचे काम केलेच आहे. परंतु सहकारी बँकेच्या माध्यमातून सहकारी क्षेत्रामधील जी महत्वाची कामे आहेत, ती चांगल्या प्रकारे पार पाडलेली आहेत. ते नगरपालिकेचे सदस्य होते. तसेच महानगरपालिकेचे सदस्य होते. या सगळया कामांकडे अतिशय चांगल्या प्रकारे लक्ष देऊन, त्यांनी सहकारी क्षेत्राला अतिशय भरीव असा फायदा कसा होईल याकडे लक्ष देत असताना, त्यातील भागधारकांचे हित लक्षात घेऊन या संस्था वेळोवेळी चालविलेल्या आहेत.

सभापती महोदय, श्री.महादेवरावजी महाडिक हे सुध्दा आज निवृत्त होत आहेत. परंतु ते कोल्हापूर स्थानिक प्राधिकारी संस्था या मतदार संघातून पुन्हा एकदा निवडून आलेले आहेत. त्यांची कारकीर्द पाहिली तर छत्रपती राजाराम सहकारी साखर कारखान्याचा चेअरमन या नात्याने कोल्हापूर आणि तेथील परिसरात असलेल्या साखर कारखानदारीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना न्याय देण्याची भूमिका ही नेहमीच चांगल्या प्रकारे वठविलेली आहे. त्याचबरोबर युथ डेव्हल्पमेंट को-ऑपरेटीव्ह बँक तसेच कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक म्हणून त्यांनी अतिशय प्रभावीपणे या सर्व क्षेत्रामध्ये काम केलेले आहे. शैक्षणिक, सामाजिक आणि व्यवसायिक या सर्व संस्थांशी त्यांचा निकटचा संबंध राहिलेला आहे. आज ते अतिशय चांगल्या मताधिक्क्याने श्री.महाडिक हे पुन्हा विधान परिषदेमध्ये निवडून आलेले आहेत.

सभापती महोदय, आमचे मित्र आणि सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत रघुवंशी हे अगोदर सुध्दा 1997 ते 31 डिसेंबर 1997 पर्यंत आणि दि.1 जानेवारी 1998 ते दि.31 डिसेंबर 2003 पर्यंत आणि त्यानंतर जानेवारी 2004 मध्ये महाराष्ट्र विधान परिषदेवर बिन विरोध निवडून आलेले आहेत. त्यांनी सुध्दा जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष या नात्याने, काँग्रेस पक्षाचा प्रामाणिक कार्यकर्ता या नात्याने नंदूरबार परिसरामध्ये चांगल्या प्रकारे काम केले. या सगळया क्षेत्रामध्ये काम करीत असताना, आदिवासींच्या समस्याविषयी विशेषत: ज्यावेळेस आदिवासींच्या योजनेच्या संदर्भातील तक्रारी आल्या, त्यावेळेस सामान्य आदिवासींना न्याय देण्याच्या बाबतीत शासनाकडून ज्या-ज्या गोष्टी करणे आवश्यक होते, त्या गोष्टी होण्याच्या बाबतीत सन्माननीय सदस्यांनी वेळोवेळी लक्ष देऊन या योजना आदिवासींना कशा उपयुक्त होतील यादृष्टीने प्रयत्न केलेला आहे.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुद्धीत मत / शोधनीसाठी नाही

श्री. अशोक चव्हाण...

श्री. अशोक मानकरजी सुध्दा निवृत्त होत आहेत.त्यांचे सुध्दा शैक्षणिक, साहित्यिक व पुस्तक प्रकाशन या क्षेत्रामध्ये कार्य राहिलेले आहे. त्यांना फार कमी कालावधी मिळालेला आहे. सभापती महोदय, आपल्याला कल्पना आहे की, मागच्या पोट निवडणुकीमध्ये ते निवडून आले होते. त्यांना अल्प कालावधी मिळाला पण याही अल्प कालावधीमध्ये त्यांनी या सभागृहाचे महत्वाच्या प्रश्नांकडे लक्ष वेधलेले आहे. पूर्ती ॲग्रो टेक लिमिटेड असो किंवा महिंद्र ऑफसेट वर्क्स, मेडिकल सर्व जिम्मेदारी त्यांनी अतिशय चांगल्या पध्दतीने पार पाडलेली आहे. फार अल्प कालावधीकरिता त्यांना ही संधी जरी मिळाली असली तरी या संधीचा पूर्ण फायदा त्यांनी जनसामान्यांचे प्रश्न सोडविण्याकरिता केलेला आहे. म्हणून या सर्व सन्माननीय सदस्यांना या ठिकाणी मी आज भावपूर्ण निरोप देत असताना मनापासून त्यांना शुभेच्छा देतो आणि त्यांची भावी कारकीर्द उत्तम रहावी आणि त्यांना दीर्घ आयुष्य परमेश्वराने द्यावे ही प्राथना करुन मी आपली रजा घेतो. जय हिंद. जय महाराष्ट्र.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्ष नेता) : सभापती महोदय, या राज्याचे मुख्यमंत्री माननीय श्री. अशोकरावजी चव्हाण यांनी विधानपरिषदेच्या निवृत्त होणाऱ्या सदस्यांना शुभेच्छा देण्याचा प्रस्ताव या ठिकाणी ठेवला आहे. आपल्या सभागृहातील सहा सदस्य आता निवृत्त होत आहेत. या सहा पैकी दोन सदस्य पुन्हा निवडून आलेले आहेत. श्री. महाडिक आणि श्री. गोपीकिसन बाजोरिया या दोन सदस्यांची फेर निवड झालेली आहे. निवृत्त सदस्यांना निरोप ही एक चांगली प्रथा, खरे म्हणजे विधानपरिषद याच सभागृहात असेल असे मला वाटते. याचे कारण असे की, विधानसभेतील सदस्यांना ही संधी नाही. पंचायतीराजमध्ये सुध्दा ही संधी नाही. फक्त विधानपरिषद हे सभागृह असे सभागृह आहे की, या सभागृहामध्ये निवृत्त होणाऱ्या सदस्यांना निरोप दिला जात असतो. म्हणून ही अतिशय चांगली परंपरा या सभागृहाने पाडलेली आहे.श्री. मधुकर गणपत चव्हाण, श्री. अरविंद गणपत सावंत,श्री. अशोक महादेवराव मानकर,श्री. चंद्रकांतजी रघुवंशी हे चार सदस्य आता 31 तारखेपासून या सभागगृहातून निवृत्त होत आहेत. यापैकी काही सदस्यांच्या दोन टर्म झालेल्या आहेत तर काही सदस्यांची एक टर्म झालेली आहे. श्री. अशोक मानकर यांना एकच वर्ष मिळाले. परंतु जितके दिवस ते या सभागृहात होते तितके दिवस या राज्यातील सर्वसामान्य माणसाचे मग तो दीन आहे, दलित आहे, रंजलेला आहे, गांजलेला आहे अशा सर्वांच्या प्रश्नाची तड लावण्याचे काम या सभागृहाच्या माध्यमातून निश्चिपतणाने या सर्वांनी केलेले आहे. आमचे मित्र श्री. मधुकर गणपत चव्हाण हे मधू चव्हाण या नावानेच ओळखले जातात. गेली 30, 40 वर्षे जनसंघापासून त्यांनी कामाला सुरुवात केली. जनसंघापासून ते आजपर्यंत त्यांचा प्रवास चालू आहे, एक निश्चित ध्येय समोर ठेवून त्यांनी कामाला सुरुवात केली. या प्रवासामध्ये त्यांनी अनेक चढ-उतार पाहिले. एक चळवळीतील कार्यकर्ता म्हणून श्री. मधु चव्हाण यांच्याकडे पाहिले जाते. खरे म्हणजे त्यांनी जनसंघामध्ये जेव्हा काम करायला सुरुवात केली त्यावेळी त्यांना कधीही असे वाटले नसेल की, कधी काळी आपण आमदार होऊ.

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ....

भारतीय जनता पक्षाचे राज्य या देशात येईल, महाराष्ट्रात कधी तरी युतीचे सरकार येईल असे त्यांना वाटले नाही. ज्यावेळी त्यांनी कामाला सुरुवात केली त्यावेळेला वाटेत सर्व अंधारच होता परंतु समजून उमजून, जाणीवपूर्वक एक विचार घेऊन, एक धेय्य घेऊन त्यांनी काम सुरु केले. घरची परिस्थिती अत्यंत गरिबीची होती. त्यांचा जन्म गिरणी कामगाराच्या घरात झाला. अशाही परिस्थितीमध्ये एक विचार घेऊन त्यांनी सामाजिक कार्यास सुरुवात केली आणि समाजकारणातून राजकारणात आणि राजकीय चळवळीमध्ये ते आले. राजकीय चळवळीमध्ये काम करीत असताना वेगवेगळ्या आंदोलनामध्ये सहभागी झाले. ज्यावेळेला देशामध्ये जयप्रकाश नारायण यांचे आंदोलन पेटले त्या आंदोलनामध्ये त्यांनी उडी घेतली. आणीबाणी विरुध्दच्या आंदोलनामध्ये त्यांनी सहभाग घेतला आणि त्यावेळी त्यांनी कारावास पत्करला आणि अशा धेय्यवादी चळवळीतील नेतृत्व आपल्या सभागृहामध्ये आले. या सभागृहात सहा वर्षे त्यांनी अत्यंत चांगल्या पध्दतीने काम केले. म्हाडाचा प्रश्न असो, मुंबईतील घरांचा प्रश्न असो, मुंबईतील घर आणि म्हाडा हा त्यांचा आवडता विषय होता. त्याचबरोबर महाराष्ट्रातील अनेक प्रश्न या सभागृहाच्या माध्यमातून मांडून ते सोडविण्याच्या कामात ते निश्चितपणे यशस्वी झाले. यावेळच्या निवडणुकीमध्ये त्यांनी अर्ज भरला त्यावेळी निवडून येण्याची स्थिती नव्हती. पण पक्षाचा आदेश मानून ते निवडणुकीला उभे राहिले. समोर खड्डा आहे हे त्यांना माहीत होते. परंतु पक्षाचा आदेश त्यांनी मानला. त्यांना जिंकून येता आले नाही. परंतु श्री. मधुकर चव्हाण हा हरणारा कार्यकर्ता नाही. अपयशाची चिंता करणारे ते कार्यकर्ते नाहीत. असा चांगला सदस्य पुढच्या अधिवेशनामध्ये या सभागृहात राहणार नाही याचे निश्चितपणे दु:ख आहे. ते आमच्या विधिमंडळ पक्षाचे प्रतोद होते. ते प्रतोद असेपर्यंत सभागृहाच्या उपस्थितीची मला काही चिंता नव्हती. कोणीही नसले तरी सन्माननीय सदस्य श्री. मधु चव्हाण हे सभागृहात बसलेले असावयाचे. अशा पध्दतीने जे काम येईल ते मन लावून करणारे सन्माननीय सदस्य या सभागृहातून निवृत्त होत आहेत.

सभापती महोदय, श्री. मधुकर चव्हाण यांच्याप्रमाणेच सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत हे सुध्दा चळवळीतील कार्यकर्ते आहेत. विशेष म्हणजे त्यांनी कामगार चळवळीमध्ये कामाला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ....

सुरुवात केली. लहानपणापासून सामाजिक कार्याची त्यांना आवड होती. कामगारांचे प्रश्न या सभागृहात हिरिरीने ते मांडत असत. कामगार चळवळीमध्ये काम करीत असताना शिवसेनेसारख्या संघटनेमध्ये त्यांनी काम केले. राज्यामध्ये शिवसेनेचा विस्तार झाला पाहिजे यासाठी ग्रामीण भागापर्यंत त्यांनी जबाबदारीने काम केले. दुसऱ्या बाजूला आपल्या सभागृहात एक जागरुक लोकप्रतिनिधी म्हणून त्यांनी आपला ठसा उमटविला. तेही आपल्या सभागृहातून निवृत्त होत आहेत. खरे म्हणजे त्यांचे काम, त्यांचे वक्तृत्व आणि या ठिकाणी काम करण्याची त्यांची पध्दत या ठिकाणी पुन्हा पहावयास मिळणार नाही.

सभापती महोदय, निवृत्त होणारे तिसरे सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत रघुवंशी हे आदिवासी जिल्ह्यामध्ये जन्माला आले. ज्यांच्यामध्ये उपजत समाजकार्याचा गुण असतो अशी माणसे मग आदिवासी क्षेत्रात असो किंवा कोणत्याही क्षेत्रामध्ये असो, समाजाची सेवा करण्याच्या उद्देशाने काम करीत असतात. सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत रघुवंशी यांनी अत्यंत दुर्गम भागात, आदिवासी भागात शिक्षणासारख्या क्षेत्रामध्ये काम करण्याचे ठरविले आणि आदिवासी मुलांना प्रशिक्षित करण्यासाठी त्यांनी विविध शाळांच्या माध्यमातून, कॉलेजेसच्या माध्यमातून, आश्रमशाळांच्या माध्यमातून त्या भागामध्ये शिक्षणाचे जाळे उभे केले. सामाजिक बांधिलकी ठेऊन काम करणारा कार्यकर्ता या सभागृहामध्ये आल्यानंतर निश्चितपणे या सभागृहाचे सर्व नियम, अटी लक्षात घेऊन प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करतो याचे प्रतिबिंब आम्हाला त्यांच्यामध्ये पहावयास मिळाले. असे माननीय सदस्य श्री. चंद्रकांत रघुवंशी या सभागृहातून निवृत्त होत आहेत.

यानंतर श्री. खंदारे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर....

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अशोक मानकर यांना अत्यंत अल्प काळ मिळाला आहे. ते पोट निवडणुकीत विजयी झाले होते. त्यांना एक वर्षाचा कालावधी मिळाला आहे. एखादा दुसरा उमेदवार असता तर त्यांनी उमेदवारी घेतली नसती. पण पक्षाने आदेश दिल्यामुळे ते निवडणुकीला उभे राहिले. ते कधी कोणत्याही निवडणुकीला सामोरे गेले नव्हते, महानगरपालिकेची त्यांनी निवडणूक लढविली नव्हती. कारण त्यांनी सामाजिक संस्थांमध्ये काम केले आहे. परंतु त्यावेळी पक्षाने संधी दिल्यामुळे, पक्षाचा आदेश मान्य करुन ते या सभागृहात निवडून आले. वर्षभरात जेवढे शिकता येईल तेवढे शिकण्याचा त्यांनी प्रयत्न केला. वर्षभरामध्ये जेवढे प्रश्न मांडता येतील तेवढे प्रश्न मांडण्याचा त्यांनी प्रयत्न केला. परंतु पुन्हा ते निवडून येऊ शकले नाही. तेही या सभागृहामध्ये येऊ शकणार नाहीत. त्यांच्या पुढील जीवनाच्या वाटचालीकरिता मी शुभेच्छा देतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.गोपीकिशन बाजोरिया व सन्माननीय सदस्य श्री.महादेव महाडिक हे पुन्हा या सभागृहात येणार आहेत. ते पुढील अधिवेशनात येणार असल्यामुळे त्यांच्या कामाचा लाभ घेता येईल. परंतु निवृत्त होणारे चारही सदस्य येथून बाहेर गेल्यावरही त्यांची चळवळ थांबणार नाही. ते जरी या सभागृहात नसले तरी समाजामध्ये त्यांचे कार्य अविरतपणे चालू राहील आणि सामाजिक बांधिलकी घेऊन ते समाजात काम करतील, त्यांच्या या कार्याला मी शुभेच्छा देतो आणि माझे बोलणे संपवितो.

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, निवृत्त होणाऱ्या सन्माननीय सदस्यांना शुभेच्छा देण्यासाठी व पुन्हा निवडून आलेल्या सन्माननीय सदस्यांचे अभिनंदन करणाऱ्या सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी मांडलेल्या प्रस्तावाला अनुमोदन देण्यासाठी, समर्थन करण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अशोक मानकर हे मागील बाकावर बसत असत. सभागृहात विशिष्ट प्रश्न उपस्थित झाल्यावर ते आपली मते मांडत असत. पक्षाच्या आदेशाप्रमाणे सदनामध्ये ते कार्य करावयाचे आणि सभागृहाच्या कामकाजात सहभागी होत असत. श्री.अशोक मानकर हे नागपूरचे असल्यामुळे राजकीय पक्षापेक्षा सामाजिक कार्यात त्यांनी हिरिरीने काम केल्याचे दिसून येते. त्यांच्या रुपाने माळी समाजाला प्रतिनिधित्व मिळाले होते. त्या समाजाला अभिमान वाटावा असे त्यांनी या सभागृहात काम केले. महाराष्ट्र माळी संघाचे ते अध्यक्ष होते. विविध शैक्षणिक संस्था व शैक्षणिक कार्याशी निगडित असलेले व्यक्तिमत्व या सदनात होते त्याचा आम्हाला अभिमान होता. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी हे राष्ट्रीय राजकारणात जात होते. ते त्या पक्षाच्या सर्वोच्चपदी विराजमान होत असताना ही निवडणूक झाली. त्यांना या निवडणुकीकडे लक्ष देता आले असते तर कदाचित श्री.अशोक मानकर यांचा अल्प मतांनी पराभव झाला नसता आणि ते पुन्हा निवडून आले असते. त्यामुळे आता ते सभागृहातून निवृत्त होत आहेत. मी त्यांना शुभेच्छा देतो.

सभापती महोदय, आमच्यासमोर बसलेले आणि आमचेच वाटणारे सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत रघुवंशी हे सत्ताधारी पक्षाचे आहेत की आमचे आहेत ते समजत नसे. कारण अनेक प्रश्न मांडणे त्यांना जमले नाही की ते आम्हाला मांडण्यास सांगत होते. प्रश्न मांडण्यासाठी ते विरोधी पक्षाची मदत घेत होते. ते नेहमी आदिवासी भागातील प्रश्न मांडत असत. त्या भागातील प्रश्नांची आम्हाला जाण नसताना कळत न कळत त्यांच्या माध्यमातून आम्हाला आदिवासी भागातील विविध प्रश्नांची जाण होत असे.

यानंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते....

परंतु ते आज अनेक संस्था चालवितात हे आज कळले. तुमच्या निवडीमुळे तुमच्या संस्था जास्तीत जास्त बलवान होतील असे वाटायला लागले. तुमच्या भागामध्ये तुंबळ राजकीय लढाई चालते. महाराष्ट्रामध्ये दोन पक्ष किती लढतात यापेक्षा आघाडीतील दोन पक्ष आपले अस्तित्व कसे निर्माण करुन ठेवतात हे देखील आपल्याला दिसत आहे. सन्माननीय सदस्य चंद्रकांत रघुवंशी यांची मी येथे वाट पहात आहे. त्यांना येथे यावे लागेल. ज्या कायकर्त्याच्या जीवनामध्ये संघर्ष असतो तो नेहमी जनसामान्यांकरिता काम करीत असतो. म्हणून सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत रघुवंशी यांची मी वाट पहात आहे. या सभागृहामध्ये पुनश्च येण्याकरिता मी त्यांना शुभेच्छा देतो.

सन्माननीय सदस्य श्री. महादेवराव महाडिक आणि सन्माननीय सदस्य श्री. गोपीकिसन बाजोरिया यांना निरोप देण्याचा प्रश्न येत नाही, कारण ते पुन्हा निवडून आलेले आहेत. सन्माननीय सदस्य श्री.गोपीकिसन बाजोरिया हे या सदनामध्ये फार कमी असतात. परंतु ते तडफेने काम करतात. माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिले नाही तर ते त्यांच्या केबिनमध्ये जाऊन प्रश्नाला उत्तर पाहिजे असे सांगतात. प्रश्न मार्गी लावण्याची ही त्यांची पध्दत आहे. ते किती तळमळीने प्रश्न मांडतात याची आपल्याला कल्पना आहे. असा हा कार्यकर्ता आमच्या शिवसेना पक्षाचा आहे याचा मला नेहमीच अभिमान वाटतो. आपण त्यांचे स्वागत करु या.

सन्माननीय सदस्य श्री.महादेवराव महाडिक हे या सदनाचे सदस्य युतीच्या काळामध्ये आमच्या बरोबर होते. आता ते सत्ताधारी पक्षाबरोबर आहेत. ते कायम या सदनाचे सदस्य असतात. ते या सदनामध्ये कधी दिसत नाहीत. ते जेव्हा सदनामध्ये दिसतात त्यावेळी मी सदनामध्ये कोण नवीन व्यक्ती येऊन बसली आहे अशी विचारणा करतो त्यावेळी ते महाडिक आहेत असे समजते. सदनातील त्यांचे कर्तृत्व माहीत नसले तरी कोल्हापूरमध्ये श्री. महादेवराव महाडिक यांच्या शिवाय पान हालत नाही. कोल्हापूरमध्ये श्री. महाडिक हे ज्या पक्षाच्या बाजूला असतील त्या पक्षाचा विजय निश्चित असतो. पक्षसंघटनेच्या दृष्टीने कोल्हापूर माझ्याकडे असल्यामुळे मला सन्माननीय सदस्य श्री. महाडिक यांचा अनुभव आहे. सभापती महोदय, कोल्हापूरातील गाजलेल्या चमत्काराची गिनीज बुकामध्ये नोंद करायला पाहिजे असे वाटते. आपल्या राज्यामध्ये कोणत्याही नेत्याला जमले नाही किंबहुना माननीय श्री शरद पवार साहेबांना देखील जे जमले नाही ते सन्माननीय सदस्य श्री. महादेवराव महाडिक यांनी कोल्हापूरमध्ये करुन दाखविले. कोल्हापूर महानगरपालिकेमध्ये

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते....

त्यांचे एवढे वर्चस्व आहे की, सगळे नगरसेवक त्यांचेच. मग सर्वांना राजी ठेवण्यासाठी सहा-सहा महिन्यांनी त्यांनी सर्वांना महापौर केले. प्रत्येक जण महापौर झाला. प्रत्येकाला त्यांनी महापौर पदाचा अंगरखा घातला, प्रत्येकाचा सन्मान केला. त्यामुळे कोल्हापुरात प्रचंड प्रमाणावर माजी महापौर झालेले आहेत. आपल्या कार्यकर्त्याला मोठे करणारे असे हे श्री. महादेवराव महाडिक पुनश्च निवडून आलेले आहेत. मार्च मधील अधिवेशनामध्ये त्यांच्या स्वागताचे वेगळे भाषण आम्ही करु.

सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण हे निवृत्त होत आहेत. आम्ही त्यांना मधू चव्हाण असे म्हणतो. ते माननीय उपमुख्यमंत्री श्री. छगन भुजबळ यांच्या बरोबर महानगरपालिकेत होते. महानगरपालिकेमध्ये असताना सर्वसामान्यांच्या प्रश्नांवर, बकाल मुंबईच्या प्रश्नावर प्रशासनाला धारेवर धरण्यामध्ये त्यांची हातोटी होती. तुमच्या आमच्या नशिबी बरीच आंदोलने आहेत. परंतु जास्तीत जास्त तुरुंगामध्ये जाण्याचा अनुभव सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांना आहे.

...नंतर श्री. पांडुरंग खर्चे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

ज्याला लकब जमत नाही ते जास्त वेळा तुरुंगात जातात. नाही तर सन्माननीय उपमुख्यमंत्री श्री. भुजबळ साहेब आणि माझ्यासारखे कमी वेळा तुरुंगात जातात. असा हा सर्वसामान्य वळवळ उरी-पोटी बाळगून काम करणारा कार्यकर्ता आहे. ते कुठल्या पक्षाचे आहेत हे जाणवतच नाही. या सभागृहात अत्यंत पोटतिडिकीने प्रश्न मांडणारे श्री. मधु चव्हाण हे सरकारवर तुटून पडतात ते प्रामुख्याने मुंबईतील घरदुरुस्ती मंडळे आणि म्हाडा या दोन विषयांच्या बाबतीत. मुंबईच्या प्रश्नावर बोलण्याचे कारण ते महापालिकेच्या वतीने निवडून आलेले आहेत एवढेच नाही तर महापालिकेत त्यांनी काम सुध्दा केलेले आहे म्हणून ते एवढ्या तळमळीने आपले प्रश्न मांडत होते मला आठवते की, सहकारी गृहनिर्माण सोसायटयांच्या बाबतीत, त्यांच्या मालकांनी त्यांच्या नावावर न केल्यामुळे त्यांचे हस्तांतरण करावे यासंबंधीचे एक विधेयक सभागृहात चर्चेसाठी आले होते. त्या विधेयकावर मी एकटाच बोलत उभा होतो. त्यावेळेस श्री. मधु चव्हाण हे इतके उतावीळ झाले होते की, हातात कागद घेऊन फडकावून सांगत होते की, काय करताय, तिकडे गरीब लोक मरताहेत आणि झटकन त्यांनी चुकून असा आरोप केला की, बिल्डरला सहकार्य करणाऱ्यांना 25-25 लाखाच्या पिशव्या सभागृहात ते बिल्डर घेऊन आले होते. त्यावेळेस ते हेही विसरले होते की, सभागृहात माननीय सभापतींच्या परवानगीशिवाय कोणालाही येता येत नाही त्या विधेयकावर बोलण्यासाठी मी एकटाच उभा होतो. अर्थात मी जो विरोध करीत होतो तो माझा केवळ तात्विक विरोध होता. तेव्हा मी त्यांना विचारले की, तुला कसे माहीत की लोक 25-25 लाख रुपये घेऊन आले. तेव्हा तो म्हणाला की माझा आपल्याला दुखावण्याचा किंवा आपल्यावर आरोप करण्याचा कोणताही हेतू नव्हता, मी आपल्या बाबतीत असा आक्षेप कधीही घेणार नाही. परंतु हे विधेयक पास झाल्यानंतर मुंबईतील गरीब लोकांना न्याय मिळेल म्हणून माझी तडफड होती. असे सांगून चक्क डोळ्यात अश्रू आणत त्यांनी सांगितले होते. त्या विधेयकाला सन्माननीय सदस्य श्री. उल्हास पवार यांनी एक सुधारणा आणली होती आणि ती सुधारणा शासनाने मान्य केली होती. ती सुधारणा अत्यंत अयोग्य अशी होती. त्यांची त्यामागील तळमळ अशी होती की हे शासन किती बेजबाबदारपणे काम करते. त्यावेळेस आसनावर माननीय उपसभापती होते तसेच माननीय मुख्यमंत्री सुध्दा उपस्थित होते. सन्माननीय सदस्य श्री. उल्हास पवार यांची सुधारणा मान्य करुन घेतली होती, त्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

सुधारणेलाच माझा विरोध होता. आजही तो कायदा बासनात बांधला गेला आहे आणि सन्माननीय सदस्यांनी ती व्यथा मात्र आज ते जात असतानाही कायम आहे. हा कायदा मंजूर झाल्यानंतर देखील मुंबईत कोणाला त्याचा फायदा होत नाही. कारण त्या कायद्याचे नियमच अधिकाऱ्यांना बनविता येत नाहीत. सन्माननीय सदस्यांच्या मनात मात्र निवृत्त होत असतांनाही ती सल कायम राहील की, ज्या तळमळीने त्यांनी या प्रश्नाचा पाठपुरावा केला होता त्याचा फायदा मुंबईतील मध्यमवर्गीयांना, सोसायट्यांमध्ये राहणाऱ्या लोकांना, जे 40 वर्षांपासून राहत आहेत त्यांना कायदा पास करुन सुध्दा फायदा देऊ शकलो नाही. यासंदर्भात मी स्वत: महसूल विभाग, गृहनिर्माण विभागाच्या सचिवांना भेटलो, त्यांना पटवून देण्याचा प्रयत्न केला परंतु त्याचे नियम कसे बसवावयाचे हेच त्यांच्या लखात येत नाही. त्यात ट्रान्सफर ऑफ प्रॉपर्टी कोणी करायची, स्टॅम्प डयुटी कोणी भरावी हे त्यांना समजत नाही, म्हणून त्याचे नियम अजूनही बनत नाही. म्हणून कोणतेही विधेयक मंजूर करीत असताना त्याची काय गरज आहे हे प्रथम लक्षात घेतले पाहिजे. मघाशी मी सभागृहात अग्निशमन कायद्याच्या बाबतीत उल्लेख केला की त्या कायद्याची कशी गरज आहे हे आज आपल्याला जसे जाणवले त्याप्रमाणेच घरदुरुस्ती मंडळाच्या संदर्भात, मोडकळीस आलेल्या इमारतींच्या बाबतीत मधु चव्हाण, मी आणि मुंबईतील सर्वच आमदार ज्या तळमळीने बोलतो तो 17 हजार मोडकळीस आलेल्या इमारतींचा प्रश्न आजही लोंबकळतच पडलेला आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

माननीय मुख्यमंत्रीमहोदय, आपण टॉवरला पाणी देणार नाही अशी जी घोषणा केली होती ती आम्ही वाचली आहे. परंतु आता मुंबईमध्ये टॉवरच उभे राहणार आहेत. मुंबईतील 16000 गृहनिर्माण इमारतीमध्ये राहणारे मध्यमवर्गीय हे मूळ मुंबईकर आहेत, ते सर्व मराठी आहेत. आता टॉवरच उभे राहतात आणि त्यातही पार्किंगसाठी चार मजले ठेवलेले जातात. त्यामुळे जुन्या इमारतीच्या भाडेकरुना टॉवर बांधल्याशिवाय आता पर्याय नाही. त्यामुळे 33/7 खाली मुंबईतील गोरगरीब, मध्यमवर्गीय, सामान्य माणसासाठी माननीय मधुकर चव्हाण यांनी सतत आवाज उठवलेला आहे. माननीय मधुकर चव्हाण यांची सामान्य लोकांसाठी काम करण्याची तळमळ जी आहे ती तळमळ ते येथून घेऊन जाणार आहेत. (अडथळा) जे आज आपल्याला सोडून जाणार आहेत त्यांच्या संदर्भात थोडावेळ आम्हाला बोलू द्या. मधाशी माननीय बी.टी.देशमुख यांची एक लक्षवधी सूचना एक तास चालली परंतु एवढे करुन त्यातून काही निष्पन्न झाले नाही. प्रश्न सुटत नाही तेथे जिव्हाळयाची माणसे आपल्यातून जात आहेत त्यामुळे त्यांच्या विषयी दोन शब्द आम्हाला बोलू द्या.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत हे शिवसेनेचे उपनेते, माझे सहकारी आहेत. शिवसेनेचे संघटनात्मक काम करतांना महाराष्ट्रामध्ये सोलापूर, जळगाव, धुळे, नंदूरबार, नाशिक तसेच नगर-पणे येथे ते संघटनेच्या पातळीवर कार्यरत आहेत. मागच्यावेळेस ते जसे पुन्हा या ठिकाणी आले तसेच ते पुन्हा या ठिकाणी येतील. या ठिकाणी आपण कामगार चळवळीचा जो उल्लेख केलेला आहे त्यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, मुंबई टेलीफोन निगम मध्ये गेल्या 25 वर्षापासून ते कामगारांचे प्रतिनिधीत्व करतात. ते सतत पाच वर्षे बहुमताने निवंडून आलेले आहेत. त्यांना टक्कर देण्यासाठी सर्वसामार्थ्यानिशी श्री. अरुण गवळी, भाई जगताप हे देखील उतरले होते. सिधुदुर्गच्या कोकणच्या राजा बरोबर पक्षातून फुटून गेलेले, बलदंड असलेले श्री. सरमळकर हे सुध्दा श्री. अरविंद सावंत यांना टक्कर देण्यासाठी उतरले होते. परंतु सर्वांना पुरुन ऊरुन ते काम करीत आहेत. त्यांनी जीवावर बेतून सिंधुदुर्गची निवडणूक-पोटनिवडणूक लढवली आहे. या ठिकाणी उपस्थित असलेली आमची कोकणातील सर्व मंडळी त्या वेळी उपस्थित होती. जीवावर उदार होऊन कसे काम करावयाचे हे त्यांच्याकडून शिकले पाहिजे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

निवडणूकीमध्ये कार्यकत्याला जीवाच्या भितीने धावावे लागते हे आम्ही अनुभवलेले आहे. माननीय अरविंद सावंत यांना निरोप देतांना, निरोप देण्याऐवजी त्यांनी या ठिकाणी पुन्हा यावे अशी शुभेच्छा देतो. आज ज्यांना आपण निरोप देतो आहेत ते सर्व कार्यकर्ते येनकेन प्रकारेन या सदनात किंवा विधानसभेत निवडून यावेत अशी सदिच्छा व्यक्त करतो.

जय हिंद, जय महाराष्ट्र....

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख (अमरावती विभाग पदवीधर) : सभापती महोदय, या सभागृहातील जे सहा सहकारी निवृत्त होत आहेत त्यांना निरोप देण्यासाठी मी उभा आहे. खरे म्हणजे सहा सहका-यांपैकी दोन सहकारी पुन्हा या सभागृहात परत आलेले आहेत. सन्माननीय सदस्य सर्वश्री महाडीक आणि बाजोरिया हे पुन्हा या ठिकाणी निवडून आलेले आहेत. या दोन सहका-यांचा निरोप तांत्रिक आहे. या दोघांचे पुनर्रागमनाबद्दल अभिनंदन करतो. ब्रिटनच्या संसदीय पध्दतीमध्ये एक प्रसिध्द वचन आहे."King is dead, long live the King." राजा मर्त्य आहे, राजा चिरायू होवो. "Henry, George, Edward may die but King survives them all" हेन्री, जॉर्ज, एडवर्ड मरु शकतो, हेन्री मरु शकतो, जॉर्ज मरु शकतो परंतु राजपण सर्वांना पुरुन ऊरु शकते. तसे आपल्याही कॉन्स्टीटयूशनल स्ट्रक्चर्समध्ये आहे. हे सभागृह त्या अर्थाने कायम स्वरुपाचे सभागृह आहे. घटनेने केलेली ही व्यवस्था आहे. हे सभागृह पूर्णच्या पूर्ण गेले आणि पूर्णच्या पूर्ण आले असा प्रकार या सभागृहाच्या बाबतीत होत नाही. चक्रानुक्रमाने 1/3,1/3 सदस्य जातात आणि सभागृह कायम राहते. आपण बोलतांना बोलत असतो की, दोन्ही सभागृहाच्या सदस्यांना सारखे वागवले पाहिजे.

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख .....

खालच्या सभागृहातील सन्माननीय सदस्यांनी मनात असा विचार केला की , वरच्या सभागृहाप्रमाणे सदस्यांना निरोप देण्याचा समारंभ आपल्याला करता येणार नाही काय ? तर त्याना अशा प्रकारचा समारंभ करता येणार नाही. कारण खालच्या सभागृहातील सन्माननीय सदस्य एकाच वेळी येतात आणि एकाच वेळी जातात. त्यांचे कॉन्स्टीटयुशनल स्ट्रक्चर तशा प्रकारचे असल्यामुळे दोन्ही सभागृहामध्ये एक सारखेपणा राहू शकत नाही. राज्य सभेसारखा .वरच्या सभागृहाच्या बाबतीत एक विशेषाधिकार आहे. हे वैशिष्टय घटनेने निर्माण केलेले आहे.आज या सभागृहातील चार सन्माननीय सदस्य निवृत्त होत आहेत त्यांच्या बाबतीत मला एक गोष्ट सांगावयाची असून ती चौघानाही लागू होत आहे. आचाराच्या सोयीसाठी विचारांचा झेंडा आदलबदल करण्याच्या कालखंडामध्ये हे चारही सन्माननीय सदस्यानी आपल्या सामाजिक आणि राजकीय जीवनाची सुरुवात ज्या विचारांनी केली होती तो विचार ठामपणे घेऊन चालणारे ते आहेत.या चारही सन्माननीय सदस्यांच्या बाबतीत हीच बाब लागू होत आहे. 1971 साली बांग्ला देशाला मान्यता द्यावी म्हणून त्यांच्या पक्षाने दिल्लीला जो मोर्चा काढला होता त्या मोर्चामध्ये सन्माननीय सदस्य श्री मधुकर चव्हाण सहभागी झाले होते. आपला हा विचार घेऊन ते सभागृहामध्ये आले आहेत. सभागृहाच्या बाहेर आपण जे काही काम करतो त्या कामाचे फळ म्हणून आपण कधी तरी सभागृहात येतो परंतु सभागृहात आल्यानंतर सभागृहात आलेला अनुभव घेऊन सभागृहाच्या बाहेर जाणे ही एक आणखी मोठी उपलब्धी असते. ही बाजू सांभाळत असतांना सन्माननीय सदस्य श्री मधुकर चव्हाण यांनी सभागृहात जे काम केलेले आहे व ज्या त-हेने त्यांनी अवधान ठेवले होते त्यामुळे त्यांच्या कामाची ओळख आपणा सर्वाना झाली आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री अरविंद सावंत निवृत्त होत आहेत.त्यांनी अनेक कामगार संघटनांमध्ये काम केले आहे कामगार संघटनेमध्ये काम करीत असतांना त्यांना अनेक अवधाने सांभाळावी लागतात. या ठिकाणी मला एका गोष्टीचा उल्लेख करावयाचा आहे सहाव्या वेतन आयोगाच्या संदर्भात न्यायमुर्ती श्रीकृष्ण यांचा अहवाल जाहीर झाला होता. त्यानंतर एक दोन तासाच्या आत त्या अहवालाची सीडी सन्माननीय सदस्य श्री अरविंद सावंत यांच्याकडे मी सभागृहाच्या बाहेर लॉबीमध्ये पाहिली होती .तेव्हा मी त्यांना असे विचारले की ही सीडी तुमच्याकडे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कशी आली?" तेव्हा त्यांनी मला असे सागितले की, "अनेक कामगार संघटनांमध्ये मी काम करीत असल्यामुळे त्याचा संदर्भ मला लवकर मिळतो व त्याचा मला नेहमीच उपयोग होत असतो".सहाव्या वेतन आयोगाच्या अहवालासंबंधीचे पुस्तक आणि सीडी अनेक जणांकडे उशिरा आले होते परंतु सन्माननीय सदस्य श्री अरविंद सावंत यांच्याकडे मात्र काही तासामध्ये त्या अहवालाची सीडी आली होती ती मला सभागृहाच्या लॉबीत त्यांच्याकडे पहावयास मिळाली होती.या संदर्भातील विषयाची चळवळ हे त्यांचे अतिशय महत्वाचे मर्मस्थान आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री चंद्रकांत रघुवंशी हे आता निवृत्त होत आहेत ते सुध्दा आपला झेंडा ठामपणे् मजबूत करुन ठेवणारे आहेत. राजी आणि नाराजी हा विषय त्यांनी कधीही आपल्या मनामध्ये येऊ दिला नाही.आपल्या विचारांवर ठाम राहून त्यांनी आपले काम केलेले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थाच्या बाबतीत मला असे वाटते की, स्थानिक स्वराज्य संस्थेचे अनेक प्रश्न असतांना आणि स्थानिक स्वराज्य संस्थेतील अनेक प्रतिनिधी या ठिकाणी येत असतांना त्या प्रश्नाला बरोबर न्याय मिळत नाही. अर्थात त्याची कारणे वेगळी असून त्या कारणांची याठिकाणी चर्चा करता येणार नाही.परंतु त्यातही अवधान ठेवून स्थानिक स्वराज्य संस्थांमधील अनेक प्रश्न सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत रघुवंशी यांनी सभागृहात मांडलेले आहेत. हे प्रश्न मांडत असतांना त्या प्रश्नाची त्यांनी संपूर्ण माहिती घेऊनच मांडले होते. अर्थात ही बाब त्यांनी त्या कामपुरतीच मर्यादित ठेवलेली असली तरी सुध्दा स्थानिक स्वराज्य संस्थेमधून प्रतिनिधी म्हणून या ठिकाणी आलेल्या पैकी किती जणांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रश्नांना न्याय दिला याची यादी केली तर त्यामध्ये सन्माननीय सदस्य श्री चंद्रकांत रघुवंशी यांचा वरचा क्रमांक राहील.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री अशोक मानकर निवृत्त होत आहेत. ते सुध्दा आपल्याविचारांचा झेंडा ठामपणे घेऊन आपल्या राजकीय जीवनाचा प्रवास करणारे आहेत. या चारही सन्माननीय सदस्य या सभागृहातून निवृत्त होत असतांना त्यांना या सभागृहाचा अनुभव आला आहे. आपल्या राजकीय आणि सामाजिक जीवनामध्ये काम केल्यानंतर आपण सभागृहात येत असतो.सभागृहाच्या बाहेर केलेल्या कामाच्या बळावरच आपण येथे येत असतो आणि या सभागृहात आपल्याला जो काही अनुभव येत असतो तो अनुभव घेऊन एका समृध्द अनुभवानिशी आपण पुन्हा

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

समाजामध्ये जात असतो तो अनुभव सुध्दा आपल्याला पुन्हा समाजात वावरतांना आनंद देणारा असतो हा आनंद चारही सन्माननीय सदस्यांना मिळेल आणि या कामाच्या भरवशांवर तुम्ही पुन्हा या सभागृहात येऊ शकाल. एखादा सांधा ओढल्यानंतर खडखड आवाज करीत ती गाडी पुन्हा प्लॅटफॉर्मलासुध्दा लागू शकते. सामाजिक आणि राजकीय जीवनामध्ये काम करीत असतांना सांधा आहे आणि या सांध्यावरुन जात असतांना कधी खडखडाटसुध्दा होत असतो परंतु तो सांधा आपल्या बाबतीत साधला जावा तसेच आपले उर्वरित जीवन आणि समाजाबाहेरील काम अत्यंत यशस्वी व्हावे अशी मी आपल्याला मनापासून शुभेच्छा देतो आणि माझे भाषण संपवितो.,धन्यवाद.

नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, राजकारणामध्ये त्यागाला फार मोठी किंमत असते असे म्हणतात. हर्षकाळामध्ये रामाने आपल्या वडिलांसाठी त्याग केला, भरताने आपल्या भावासाठी त्याग केला. पण अलिकडच्या काळात राजकारणामध्ये स्वत:हून कोणी त्याग करीत नाही. पण सन्माननीय मधु चव्हाणांचे उदाहरण असेल, अरविंद सावंतांचे उदाहरण असेल किंवा चंद्रकांतभय्यांचे उदाहरण असेल, या तिघांनाही पक्षाच्या विचारांसाठी, आपल्या सहकाऱ्यांसाठी, आपल्या नेत्यांसाठी त्याग करावा लागला आहे. हा त्याग करीत असताना त्यांच्या मनात त्याबद्दल कोठेही खंत नाही वा वैषम्य नाही हेच या तिघांचेही मोठेपण आहे. सभापती महोदय, कधी कधी मला प्रश्न पडत असेल की, मधु चव्हाण हा आपला माणूस तिकडे कसा काय? पण त्यांच्या विचारांची निष्ठा इतकी पक्की आहे की, सभागृहामध्ये कधी कधी माझ्याशी देखील त्यांचे अनेकदा भांडण झालेले आहे. पण लॉबीमध्ये गेल्यानंतर ते लगेच माझ्याजवळ येऊन मला सांगायचे की, अरे कपिल, रागावू नकोस, मी तेवढ्यापुरतेच तसे बोललो आहे आणि मग ते मला मिठी मारायचे. एक वेगळा माणूस, प्रेमळ माणूस मला त्यांच्यामध्ये सातत्याने दिसला आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत हे कामगारांचे नेते आहेत. विशेषत: मुंबईतील मध्यमवर्गीय नोकरदार कामगार वर्गाचे प्रतिनिधीत्व करणारा त्याच पठडीतील हा नेता आहे. मुंबईला आजवर अनेक पद्धतीचे अनेक कामगार नेते मिळाले आहेत. पण त्या कोठल्याही पठडीत ते बसत नाहीत. या सभागृहामध्ये जेव्हा ते पहिल्यांदा सदस्य म्हणून आले आणि त्या वर्षी त्यांना पहिल्यांदा भाषणाचे पहिले पारितोषिक मिळाले तेव्हा पासून मी त्यांना पाहत आलो आहे. म्हणूनच मला नेहमीच त्यांच्यापासून प्रेरणा घ्यावीशी वाटली. मी जेव्हा जेव्हा त्यांना पहावयाचो, एमटीएनएल वरून जात असताना ते भाषण करीत असत, तेथे भाषण करणे आणि या सभागृहात भाषण करणे या दोन्ही ठिकाणी त्यांची तीच तळमळ कायम दिसते.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांतभय्या रघुवंशी यांनी आदिवासी भागात आदिवासी जीवनाशी समरस होताना दाखविले आणि ज्यावेळेस अडचण आली, पक्षाचा आदेश आला तेव्हा आपल्या नेत्यांसाठी आणि समाजासाठी, आपल्या जिल्ह्याच्या विकासासाठी त्यांनी खूप मोठा त्याग केला. खरोखरी चंद्रकांतभय्या तुम्हाला सलाम करावासा वाटतो.

..... 4बी 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील .....

सभपती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अशोक मानकर यांना अवघे एक वर्ष मिळाले. पण ही सगळी मंडळी आपल्या पक्षाशी एकनिष्ठ असलेली मंडळी आहेत. त्यांनी पक्षाशी बंडखोरी कधीही केली नाही. केवळ सत्ता मिळते म्हणून दुसरीकडे कोठे तरी पळणारी वृत्ती त्यांच्यात सापडणार नाही. हीच सर्वात मोठी आणि आज सर्वत्र दुर्लभ झालेली गोष्ट आहे, ती त्यांच्यात दिसते आहे म्हणूनच त्यांना या ठिकाणी भावपूर्ण निरोप देताना मी त्यांच्या या सगळ्या कारकीर्दीला सलाम करतो आणि तुम्ही पुन्हा एकदा येथे भेटावे अशी प्रार्थना करतो. धन्यवाद.

***

..... 4बी 3 ...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरूनाथ कुलकर्णी (नामनियुक्त) : सभापती महोदय, राज्याचे मुख्यमंत्री माननीय श्री.अशोकजी चव्हाण यांनी या सभागृहातून या वर्षअखेर आपले जे सहकारी मित्र सदस्य निवृत्त होत आहेत त्यांना शुभेच्छा देण्यासाठी जो प्रस्ताव येथे आणलेला आहे त्याचे समर्थन करण्यासाठी आणि या सर्व सहकाऱ्यांना शुभेच्छा देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.महादेवराव महाडिक हे आपल्यातून निवृत्त होत आहेत तसेच सन्माननीय सदस्य श्री.गोपीकिसन बाजोरिया हेही इतर सर्व सहकारी सदस्यांबरोबर निवृत्त होत आहेत परंतु नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकांमधून हे दोन्ही सदस्य पुन्हा या सभागृहात निवडून आले आहेत. म्हणून मी त्यांचे या ठिकाणी स्वागत करतो, अभिनंदन करतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण, जे 'मधू चव्हाण' या नावाने सर्वत्र परिचित आहेत, हे अत्यंत कर्मठ कार्यकर्ते असून चळवळीतील कार्यकर्ते आहेत. विद्यार्थी दशेपासून, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद,जनसंघ असेल, भारतीय जनता पक्ष असेल या सर्व निरनिराळ्या चळवळीतून त्यांच्या पक्षीय राजकारणातून उभा राहिलेला अनुभव आहे. मुंबई महापालिकेमध्ये त्यांनी नगरसेवक म्हणून काम केले आहे. तेथेही एक अत्यंत प्रभावी, कार्यक्षम आणि उत्कृष्ट वक्ता म्हणून आणि जे मनाला पटेल ते स्पष्टपणे मांडण्याची हातोटी असलेला हा कार्यकर्ता माणूस मुंबई महापालिकेच्या राजकारणातून प्रत्यक्ष लोकांपर्यंत पोहोचलेला आणि गेल्या सहा वर्षे त्यांना या सभागृहात काम करण्याची संधी मिळाली. अत्यंत प्रभावीपणे काम करणारा लोकप्रतिनिधी म्हणून त्यांनी येथे काम केलेले आहे. त्यांनी या सभागृहात मांडलेले, खास करून गिरणी कामगारांचे प्रश्न, गिरणी कामगारांच्या घरांचे प्रश्न आणि सरकारने या संदर्भात वेळोवेळी दिलेल्या आश्वासनांची आठवण सरकारला करून देण्याची भूमिका त्यांनी सातत्याने येथे मांडली आहे. ...

(यानंतर श्री. सरफरे ...4सी 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी ...

म्हाडाच्या संदर्भात त्यांचा अत्यंत चांगला अभ्यास आहे. म्हाडाच्या वसाहतीमध्ये राहणाऱ्या मध्यमवर्गीय मुंबईकरांचे प्रश्न अत्यंत पोटतिडिकीने ते सभागृहामध्ये मांडत असतात. आणि आम्हाला अपेक्षा होती की, मागील वेळेसारखी किमया आज सुध्दा कामी येईल आणि ते पुन्हा या सभागृहामध्ये सदस्य म्हणून येतील. त्यांना त्यांच्या पक्षाने या सभागृहामध्ये पुन्हा येण्याची संधी दिली होती, परंतु ते येऊ शकले नाहीत. तरीसुध्दा आपले भावी आयुष्य, राजकीय कारकीर्दीमध्ये आपण पुन्हा यशस्वी होऊन या सभगृहामध्ये सदस्य म्हणून याल अशी अपेक्षा व्यक्त करतो.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. अशोक मानकर यांना या सभागृहामध्ये काम करण्याची फक्त एकच वर्षाची संधी मिळाली. एक वर्षाच्या कालावधीत त्यांच्याशी माझा चांगला परिचय झाला. आपण एक प्रभावी उत्कृष्ट कार्यकर्ते आहात. आपण गरीब जनतेचे खासकरुन नागपूर शहरातील विदर्भाचे प्रश्न पोटतिडिकीनें मांडण्याचा प्रयत्न केला आहे. ते सुध्दा आज निवृत्त होत आहेत, त्यांना मी शुभेच्छा देतो.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत हे कामगार चळवळीतील एक कर्मठ कार्यकर्ते आहेत. माननीय मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या बाबतीत उल्लेख केला की, कामगार चळवळीत काम करणारे हाताच्या बोटावर मोजण्याइतके कामगार नेते आहेत. त्यामध्ये श्री. अरविंद सावंत हे एक चांगले कामगार चळवळीतील नेते, कामगार पुढारी आहेत. ते आज या सभागृहामध्ये निवृत्त होत असले तरी यापूर्वी सुध्दा या सभागृहामध्ये त्यांची सहा वर्षाची एक टर्म पूर्ण झाल्यानंतर त्यांची दुसरी टर्म आज पूर्ण होत आहे. मला आशा आहे की, त्यांचा पक्ष त्यांना पुन्हा या सभागृहामध्ये आणल्याशिवाय राहणार नाही.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.चंद्रकांत रघुवंशी यांचा व माझा कित्येक वर्षाचा परिचय आहे. त्यांचे वडिल श्री. बटेसिंग रघुवंशी हे या सभागृहाचे 10 वर्षे सदस्य होते. ते निवृत्त झाल्यानंतर सातत्याने 12 वर्षे माननीय सदस्य श्री. रघुवंशी हे या सभागृहाचे सदस्य राहिले आहेत. त्यांचा व माझा परिचय हा कॉग्रेसच्या चळवळीतील कार्यकर्ता म्हणून झालेला आहे. इतकेच नव्हेतर धुळे व नंदूरबार हे दोन जिल्हे स्वतंत्र झाल्यानंतर नंदूरबार जिल्हयाचे कॉग्रेस पक्षाचे अध्यक्ष म्हणून ते काम करीत होते. माननीय मंत्री नामदार श्री. सुरुपसिंग नाईक व माननीय सदस्य श्री. चंद्रकांत रघुवंशी ही जोडी धुळे व नंदूरबार या भागामध्ये विशेष करुन दलित आणि आदिवासी भागामध्ये प्रभावीपणे काम करीत आहे. सभापती महोदय, आपणास आश्चर्य वाटेल की, 1998 च्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. गुरुनाथ कुलकर्णी ...

जानेवारी महिन्यामध्ये नंदूरबार जिल्हयात "न भूतो न भविष्यति" अशी एक सभा झाली. त्यावेळी मी कॉग्रेस पक्षाचा जनरल सेक्रेटरी होतो, माननीय श्री.रणजित देशमुख हे कॉग्रेस पक्षाचे अध्यक्ष होते आणि माननीय श्री. शरद पवार हे मुख्यमंत्री होते. त्यावेळी माननीय श्री.चंद्रकांत रघुवंशी यांनी राजकीय जीवनामध्ये पदार्पण केल्यानंतर माननीय श्रीमती सोनिया गांधी यांची पहिली सभा झाली. त्या सभेला नंदूरबार जिल्हयातील लक्षावधी माणसे उपस्थित होती. माननीय श्री. चंद्रकांत रघुवंशी यांनी अतिशय उत्कृष्ट नियोजन आणि संघटनात्मक काम केले होते. अशाप्रकारे हा माझा एक मित्र,कार्यकर्ता या सभागृहातून निवृत्त होत आहे म्हणून मी त्यांना शुभेच्छा देतो.

सभापती महोदय, माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख व माननीय विरोधी पक्षनेते श्री. भाऊसाहेब फुंडकर यांनी सांगितले की, हे एक विचित्र असे सभागृह आहे. ते म्हणाले की, हे "हाऊस ऑफ लॉर्ड" सभागृह आहे. संविधानातील तरतुदीनुसार राज्यसभा आणि विधानपरिषद ही दोन सभागृहे गठीत करण्यात आली आहेत. यामध्ये राज्यसभा ही केंद्रीय स्थानी आहे, तर राज्यस्थानी विधानपरिषद आहे. या सभागृहातील सदस्यत्वाची मुदत सहा वर्षाची असली तरी सुध्दा दर दोन वर्षांनी एक तृतियांश सदस्य निवृत्त होत असतांत. त्यांना निरोप देण्याचे काम या सभागृहाचे सदस्य या नात्याने आपण सातत्याने करीत असतो. ही परंपरा व पध्दत विधानपरिषदेमध्ये चालत आली आहे. आणि म्हणून सर्व मंडळी निवृत्त होत आहेत. त्यांच्या पुढील राजकीय जीवनामध्ये त्यांना यश प्राप्त व्हावे अशी मी शुभेच्छा देतो व माझे भाषण संपवितो. धन्यवाद, जय हिंद, जय महाराष्ट्र.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुधारित प्रत / शीघ्रलेखापाठी नाही

श्री.उल्हास पवार (विधानसभेव्दारा निर्वाचित) : माननीय सभापती महोदय, आज आपण ज्या सन्माननीय सदस्यांना याठिकाणी निरोप आणि त्यांच्या भावी आयुष्यातील त्यांच्या कार्याला व जीवनाला हार्दीक शुभेच्छा देणारा प्रस्ताव माननीय मुख्यमंत्री श्री.अशोक चव्हाण साहेब यांनी मांडलेला आहे, त्याला अनुमोदन देण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, आता सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी सांगितले आणि सर्वांनी देखील याचा उल्लेख केला आहे की, आपल्याकडे जी ड्युएल राज्य पध्दती म्हणजे लोकसभेमध्ये राज्यसभा आणि आपल्याकडे विधान परिषद आहे. येथे ही एक वेगळी आणि भावपूर्ण पध्दत आहे. दुसऱ्या सभागृहाला ही संधी नाही. दुसरे जे सभागृह आहे, तेथील सन्माननीय सदस्यांना सामुदायिक निरोप आणि सामुदायिक शुभेच्छा दिल्या जातात असे त्या सभागृहाचे वैशिष्ट्य आहे आणि आपल्या सभागृहाचेही वेगळे वैशिष्ट्य आहे. म्हणून याठिकाणी निवृत्त होणाऱ्या सन्माननीय सदस्यांना निरोप देत असताना समोरच्या बाकावर बसलेले माझे मित्र भारतीय जनता पक्षाचे श्री.मधुकरराव चव्हाण यांच्या संबंधातील माहिती वाचल्यानंतर समजते की, त्यांचा जन्म एका गिरणी कामगाराच्या घरामध्ये झाला. त्यांच्या जीवन कार्यामधील ज्या निरनिराळया संस्था आहेत, त्यामधील एक संस्था मोठी गमतीशीर आहे. ते रंगारी बदक गणेशोत्सव मंडळाचे ते अध्यक्ष आहेत. रंगारी बदक या नावावरुन मुंबईतील या चाळीतील आणि गरीब वस्तीतील विदारक चित्र कसे असेल हे आपल्याला नावावरुनच त्या संस्थेचे वैशिष्ट्य समजते. रंगारी बदक या गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष, त्यांचा गिरणी कामगाराच्या घरामध्ये झालेला जन्म या सर्व वाटचालींमधून धडपड करीत असताना, रत्नागिरी जिल्ह्यातील त्यांच्या गावाशी असलेले नाते जवळचे आहे. आजपर्यंत त्यांनी विविध म्हणजे शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक संस्थांच्या माध्यमातून हे नाते जपलेले आहे. आपल्या दुर्गम भागातील गरीब विद्यार्थ्यांकरता शैक्षणिक संस्था सुरु केलेल्या आहेत. भारतीय जनसंघापासून सध्याच्या भारतीय जनता पक्षाशी एकनिष्ठ राहून, मनापासून पक्षाचे काम करणारे आणि मनापासून बोलणारे म्हणजे ज्यांचे शब्द अंत:करणापासून येतात असे सन्माननीय सदस्यांचे बोलणे आहे. आता माझ्या अनेक सहकारी मित्रांनी उल्लेख केला की, गिरणी कामगारांचे प्रश्न असतील किंवा फुगणारी मुंबई असेल, तुंबणारी मुंबई असेल, आरोग्याने बिघडलेली मुंबई असेल, या मुंबईतील सगळया गरीब, दीनदुबळया लोकांचे प्रश्न,शाळेचे प्रश्न असतील, गिरणी कामगारांच्या घरांचे प्रश्न असतील, सन्माननीय सदस्या हे सर्व प्रश्न ज्या तडफेने सदनामध्ये मांडत होते, ती

. . . .4 डी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार . . . .

गोष्ट हे सभागृह कधीच विसरु शकणार नाही. सन्माननीय सदस्य श्री.मधुकरराव चव्हाण यांचे आणखी एक वैशिष्ट्य आहे. त्यांची बोलण्याची भाषा ऐकल्यानंतर लक्षात येते की, एका शब्दाला अनेक पर्यायी शब्द देऊन, लयबध्द करुन असे काव्यात्मक परंतु विदारक चित्र सर्वांच्या डोळयासमोर मांडण्याचे त्यांच्या शब्दामध्ये जे सामर्थ्य आहे, ते फार वैशिष्ट्यपूर्ण आहे. मुंबई महानगरपालिकेमध्ये नगरसेवक म्हणून केलेले कामकाज, विधान परिषदेमध्ये सदस्य म्हणून सहा वर्षे केलेले कामकाज किंवा विविध समित्यांमध्ये केलेले कामकाज आहे ते देखील बाखाणण्याजोगे आहे. येथे सांस्कृतिक, सामाजिक चळवळीचा उल्लेख झाला. तसेच सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी जो उल्लेख केला, तो फार महत्वाचा आहे आणि ती गोष्ट बऱ्याच लोकांना माहिती नव्हती. त्यांनी "सेम टू सेम" आणि "हमाल दे धमाल" हे दोन चित्रपट काढले. या चित्रपटांच्या शिर्षकावरुन सुध्दा एक गोष्ट लक्षात येते की, या दोन्ही चित्रपटांच्या माध्यमातून सामान्य, गरीब माणसाच्या जीवनावरील चित्र यामध्ये दिसते आणि हे दोन्ही चित्रपट उत्तम चालले आहेत. अशा या दोन्ही चित्रपटाचे निर्माते आणि सांस्कृतिक चळवळीमध्ये मनापासून सहभागी होणारे ते एक सन्माननीय सदस्य आहेत. तसेच सदनामध्ये ते अत्यंत पोटतिडकीने बोलत असत. सभापती महोदय, आपल्यामुळे आम्हाला राष्ट्रकूल संसदीय मंडळाच्या वतीने चीन, हाँगकाँग, मलेशिया, थायलंड येथे दौरा करण्याची संधी मिळाली. हा दौरा करीत असताना मी कॅमेरा नेला नव्हता. पण सन्माननीय सदस्य श्री.मधुकरराव चव्हाण आणि सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांच्याकडे उत्तम कॅमेरे होते आणि त्या दोघांनी माझे फोटो काढून मला दिले आणि ते चांगले निघाले हे मला येथे सांगितले पाहिजे.

यानंतर कु.थोरात. . . .

अशुध्दीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. उल्हास पवार....

परंतु आवडीने, मनापासून वेगवेगळया ठिकाणी टिपलेले आणि त्याखाली हे फोटो कोणत्या ठिकाणी काढलेली आहेत याविषचीची टिप्पणे लिहिलेले फोटो त्यांनी मला दिले.

सभापती महोदय, मी श्री. मधुकर चव्हाण हे कसे कुटुंबवत्सल होते यासंसबंधीची एक आठवण सांगणार आहे. आम्ही हाँगकाँगमध्ये गप्पामारत फिरत असताना काही वस्तू खरेदी करण्याच्या निमित्ताने आम्ही वेगवेगळया स्टोअर्समध्ये गेलो. ते त्याठिकाणी छोटया-छोटया वस्तू घेत होते. मी श्री. मधुकर चव्हाणांना विचारले की, तुम्ही काय काय खरेदी करीत आहात? तेव्हा ते म्हणाले, उल्हासराव आपण सामान्य कुटुंबातील माणसे आहोत. आपण कुटुंब वत्सल माणसे आहोत. माझी बहीण सामान्य कुटुंबात आहे. तिच्याकरिता एक स्वेटर घेत आहे. माझ्या भाचीकरिता अमुक घेत आहे. नातेवाईकाकरिता तमुक हे घेत आहे. म्हणजे माणसामध्ये जो कुटुंबवत्सलपणा लागतो तो मला हाँगकाँगमध्ये वस्तू खरेदी करीत असताना त्यांच्यामध्ये दिसला श्री. मधुकर चव्हाण यांच्या एकूण व्यक्तिमत्वाचे वर्णन करीत असतांना मला त्यांच्याबद्दलची आठवण सांगणे आवश्यक वाटले. एक तडफदार असा नेता, निष्टेने काम करणारा, आपल्या पक्षाच्या भूमिकेशी एकनिष्ट राहणारा आणि उत्तम वक्तृत्वाच्या माध्यमातून, शब्दांच्या माध्यमातून सामान्य दीनदुबळया मुंबईकरांची बाजू मांडणारा असा हा सदस्य माननीय मधुकरराव चव्हाण, आमच्या सगळयांचे मित्र निवृत्त होत आहेत. सन्माननीय सदस्य गरुनाथ कुलकर्णी यांनी सांगितल्याप्रमाणे त्यांना मी त्यांच्या भावी राजकीय, सामाजिक या सर्व कार्यासाठी शुभेच्छा देतो आणि त्यांनी पुन्हा या सभागृहात यावे अशी मी शुभेच्छा या ठिकाणी व्यक्त करतो.

आमचे दुसरे मित्र माननीय अरविंद सावंत निवृत्त होत आहेत. या दोघांच्या उल्लेख मी एवढयाचकरिता करतो की, ते दोघेही सामान्य कुटुंबातून येथे आलेले आहेत. दोघेही पदवीधर आहेत. विशेषत: लोकाधिकर समिती असेल किंवा टेलिफोन कर्मचारी किंवा अन्य कर्मचाऱ्यामध्ये सन्माननीय गुरुनाथ कुलकर्णी यांनी सांगितले की, सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी वार्णन केले की, ते एक आदर्श कामगार नेते आहेत. 2000 साली वेतनवाढीचा जो करार झाला तो ऐतिहासिक आणि अभूतपूर्व करार करण्यामध्ये सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांचा सिंहाचा वाटा होता. ते उत्तम आणि मनापासून भाषण करणारे आहेत. त्यांच्या चेहऱ्याकडे आणि व्यक्तिमत्वाकडे बघितल्यानंतर असे वाटते की, अजूनही जणू काही ते महाविद्यालयीन जीवनातील विद्यार्थ्यांसमोर

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार...

भाषण करीत आहेत असे मला त्यांचे भाषण ऐकताना नेहमी वाटायचे. आपले कोणाचेही भाषण याठिकाणी उत्तम झाले, एखादा उत्तम विचार कोणी याठिकाणी मांडला तर लगेच सुवाच्च अक्षरात त्यांची चिठ्ठी येत असे. त्यांचे हस्ताक्षर अत्यंत उत्तम आहे. काल याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरीसाहेबांनी दोन-तीनवेळा उल्लेख केला की, माझे हस्ताक्षर बरोबर नव्हते. यानिमित्ताने मला सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांच्या हस्ताक्षराची आठवण झाली. ते उत्तम हस्ताक्षरात एखादी आठ ओळीची कविता करुन पाठविणार हे सन्माननीय सदस्य अरविंद सावंत यांचे वैशिष्ट आहे. आता अशा चिठ्ठया आम्ही येथे सदस्य असेपर्यंत कोणाच्या येतील याबद्दल सांगता येणार नाही.(अडथळा) या सभागृहात परत त्यांच्याच चिठ्ठया याव्यात असे माननीय भास्करराव जाधवांनी आपल्याला शुभेच्छा दिलेल्या आहेत. तशाच आम्हा सर्वांच्या आपल्याला शुभेच्छा आहेत.

सन्माननीय सदस्य श्री. बाजोरिया हे पुन्हा याठिकाणी निवडून आलेले आहेत.स्थानिक स्वराज्य संस्थेमधून परत याठिकाणी निवडून येणे किती अवघड आहे. सर्व सन्माननीय सदस्यांच्या वतीने मी या ठिकाणी विनंती करतो की, हातवर करुन जर मतदानाची पध्दत सुरु झाली तर निवडणुकीसाठी लोकांना जे काबाडकस्ट करावे लागतात ते बरेच कमी होतील असे मला यानिमित्ताने बोलतांना सांगावयाचे आहे. आपणही नगरपालिकेचे जकातीचे प्रश्न मांडलेले आहेत. घरांचे प्रश्न मांडलेले आहेत. मोजकेच बोललात परंतु नेमके बोललेले आहात. आपण पुन्हा याठिकाणी निवडून आलात त्याबद्दल आपले याठिकाणी स्वागत करतो.

सन्माननीय सदस्य महादेवराव महाडिक यांच्याबद्दल याठिकाणी थोडयावेळापूर्वीच संगण्यात आले की, कोल्हापूर जिल्हयातील ते एक चांगले उद्योपती आहेत. राजाराम सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून त्यांनी आपल्या कामाला सुरुवात केली आणि तिसऱ्यावेळी ते या विधानपरिषदेवर पुन्हा निवडून आलेले आहेत. कोल्हापूर महापालिकेवर त्यांचे मोठे वर्चस्व आहे. आमच्या पक्षाच्यावतीने ते पुन्हा या सभागृहामध्ये आलेले आहेत. त्यांचे या ठिकाणी स्वागत करतो.

सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत रघुवंशी हे माझे फार जुने मित्र आहेत. सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी याठिकाणी उल्लेख केलेला आहे. मी आणि श्री. गुरुनाथ कुलकर्णी आम्ही दोघेही प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस होतो. श्रीमती सोनिया गांधी यांच्या सभेचे आयोजन

श्री. उल्हास पवार.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

करण्याकरिता आमचा नंदुरबारला सहा दिवस मुक्काम होता. चंद्रकांत रघुवंशी आणि त्यांची सगळी टीम अतिशय जोरदारपणे त्याठिकाणी काम करीत होती. श्रीमती सोनिया गांधीची राजकीय जीवनातील ती पहिलीच सभा होती. बटेसिंह रघुवंशी यांचा आणि माझा ते नगराध्यक्ष असल्यापासून परिचय होता. त्यांचे मोठ बंधू श्री. राजेंद्र रघुवंशी हे आज ॲडिशनल सॉलिसिटर जनरल आहेत. मी महाराष्ट्राचा अध्यक्ष असताना ते त्यावेळच्या धुळे जिल्हा युवक काँग्रेसचे सरचिटणीस होते. आता दोन जिल्हे झालेले आहेत. आणि मला आजही आठवते की, श्री. रघुवंशी हे त्यावेळी सोळा वर्षाचे असतील आणि राजेंद्र रघवंशी म्हणजे त्यांच्या मोठया बंधूनी माझा कार्यक्रम त्याठिकाणी आयोजित केला होता. आम्ही कवडेपाडयामध्ये गेलो. आदिवासी पट्टयामध्ये गेलो त्याठिकाणच्या आश्रमशाळेचे उद्घाटन माझ्या हस्ते करण्यात आले. नंदूरबारला आल्यानंतर शिरीषकुमार यांच्यावर लिहिलेल्या पुस्तकाचे प्रकाशन माझ्या हस्ते करण्यात आले होते. या पुस्तकाचे प्रकाशन करण्याच्यावेळी मी कोणाच्या शेजारी बसलो होतो तर शिरीषकुमार यांच्या मातोश्री त्या व्यासपीठावर उपस्थित होत्या. त्यांच्या पायाला मी हात लावला आणि त्या पुस्तकाचे मी प्रकाशन केले.

यानंतर श्री. बरवड....

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार .....

लहान असताना देखील त्या कार्यक्रमामध्ये श्री. चंद्रकांत रघुवंशी यांचा सिंहाचा वाटा होता. आदिवासी जिल्ह्यामध्ये काम करीत असताना, प्रामुख्याने त्या भागात सगळ्या राखीव जागा असताना ते या सभागृहामध्ये आले आणि दोन टर्म सदस्य राहिले. त्या काळात त्यांची काम करण्याची तडफ ते या सभागृहातून निवृत्त होत असल्यामुळे जाणवणार नाही. सन्माननीय सदस्य श्री. रावते साहेब म्हणाले की, आम्हाला ते आमच्यातीलच एक वाटतात. मला प्रश्न पडला होता. कदाचित रघुवंशी आडनावाचा आपल्यावर परिणाम झालेला असावा. सर्वसामान्य माणसांचे प्रश्न उत्तम प्रकारे माडणारे सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत रघुवंशी या सभागृहातून निवृत्त होत आहेत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अशोक मानकर यांना कमी कालावधीसाठी संधी मिळाली. त्यांना समाजकारणाची, राजकारणाची परंपरा आहे. त्यांनी या अवधीमध्ये काही प्रश्नांच्या माध्यमातून आपली चुणूक दाखवली.

सभापती महोदय, या सर्व सन्माननीय सदस्यांना निरोप देत असताना एक छोटीशी गोष्ट आपल्या लक्षात आणून देऊ इच्छितो. आणखी काही सन्माननीय सदस्य स्थलांतरीत पक्ष्यांप्रमाणे या सभागृहातून दुसऱ्या सभागृहात गेलेले आहेत. श्री. भास्कर जाधव हे या सभागृहातून विधानसभेत गेलेले आहेत. श्री. जितेंद्र आव्हाड हे या सभागृहातून विधानसभेत गेलेले आहेत. श्री. सुरेश जेथलिया हे या सभागृहातून विधानसभेत गेलेले आहेत. श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील हे या सभागृहातून राज्यसभेवर गेलेले आहेत. श्री. प्रकाश शेंडगे हे या सभागृहातून विधानसभेत गेलेले आहेत. त्यांना आपल्याला निरोप देता आला नाही. दोन्ही सभागृहे आपलीच आहेत. आपले सभागृह ज्येष्ठ आहे. विधानसभा सभागृह कनिष्ठ आहे. ज्येष्ठाकडून कनिष्ठाकडे ते गेलेले आहेत. काही सन्माननीय सदस्य राज्यसभेत गेलेले आहेत. त्यांना निरोप देण्याचे आपण विसरुन गेलो. विधान परिषदेची निवड चांगली होती असे सन्माननीय संसदीय कार्य मंत्री श्री. हर्षवर्धन पाटील सांगत आहेत. या सर्वांना मी मनापासून शुभेच्छा देतो. या सर्वांना मी भावपूर्ण निरोप देतो आणि त्यांना भावी जीवनासाठी हार्दिक शुभेच्छा देतो. भावी आयुष्यातील त्यांनी सामाजिक, राजकीय कारकीर्द यशस्वी आणि कीर्तीमान होवो अशी प्रार्थना करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. हर्षवर्धन पाटील (संसदीय कार्य मंत्री) : सभापती महोदय, आपल्या सदनातील निवृत्त होणाऱ्या सहा सन्माननीय सदस्यांना आपण निरोप देत आहोत. यातील दोन सन्माननीय सदस्य पुन्हा निर्वाचित होऊन या सभागृहामध्ये येणार आहेत. या सदनाचे सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांचा आणि माझा व्यक्तिगत परिचय गेल्या अनेक वर्षापासून आहे. या सभागृहामध्ये ज्या ज्या वेळेला काही तणावाचे विषय निर्माण झाले आणि संसदीय कार्य मंत्री म्हणून ज्यावेळी सभागृहाचे वातावरण एकोप्याचे ठेवण्यामध्ये मला मदत घ्यावी लागली त्यामध्ये मला अनेकदा सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांची मदत घ्यावी लागली असे म्हटले तर चुकीचे होणार नाही. अतिशय चांगल्या पध्दतीने आणि समन्वयाने ते काम करीत होते. माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांना विनंती आहे की, त्यांची जागा भरुन काढणारे नवीन नेतृत्व या ठिकाणी निर्माण करणे आवश्यक आहे. कारण सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांची त्याच्या पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून निवड झाली आणि आता सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण हे सुध्दा या सभागृहातून निवृत्त होत आहेत. दुर्दैवाने कालच्या निवडणुकीत त्यांना पराभूत व्हावे लागले. त्यांचा पराभव कसा झाला, काय झाला हा वेगळा भाग आहे. या सभागृहामध्ये नेहमीच सर्वसामान्य माणसांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी सातत्याने पुढाकार घेऊन काम करण्याची भूमिका त्यांनी नेहमी घेतली. सन्माननीय सदस्य श्री. उल्हास पवार यांनी उल्लेख केल्याप्रमाणे या सभागृहामध्ये नेहमी त्यांची उपस्थिती जाणवेल अशा पध्दतीने आपल्या आमदारकीच्या काळात काम करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. अनेक समित्यांमध्ये काम करीत असताना वेळोवेळी त्यांनी सहकार्याची भूमिका घेतली. आज या सभागृहातून ते निवृत्त होत आहेत याबद्दल एका बाजूला निश्चितपणे आम्हा सर्वांना दु:ख आहे कारण एक चांगला सहकारी पुढच्या काळामध्ये या सभागृहात चर्चेमध्ये पहावयास मिळणार नाही. कदाचित आपण दुसऱ्या माध्यमातून पुन्हा या सभागृहामध्ये येऊ शकता. आपण पुन्हा या सभागृहात यावे अशी आमची अपेक्षा आहे. ते निवृत्त होत असल्यामुळे त्यांची पोकळी या सदनामध्ये आम्हाला सातत्याने भासेल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत हे आमचे जुने मित्र आहेत. 1995 ला मी पहिल्यांदा आमदार म्हणून निवडून आलो तेव्हापासून त्यांच्याशी माझा संबंध आला. एक अभ्यासू आणि नेहमी सभागृहात अनेक विषयामध्ये हिरिरीने भाग घेऊन, चर्चा करुन

यानंतर श्री. खंदारे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील...

विधायक स्वरुपाच्या सूचना सरकारला देण्यामध्ये, प्रसंगी आक्रमक भूमिका घेऊन सरकारला अडचणीत आणण्याची भूमिका त्यांनी पार पाडलेली आहे. ते सुध्दा सदनातून निवृत्त होत आहेत. त्यांच्या पुढील वाटचालीसाठी मी शुभेच्छा देतो. आता विधानपरिषदेच्या सदस्यांना बरे दिवस आले आहेत. कारण या विधानपरिषदेचे सदस्य आता विधानसभेत जात आहेत. परंतु खालच्या सदनातील दोन भाई म्हणजे श्री.भाई जगताप व श्री.रामदास कदम हे या सदनात निवडून आले आहेत. सन्माननीय सदस्य श्री.गोपीकिशन बाजोरिया हे देखील पुन्हा निवडून आले आहेत. ते पुन्हा या सदनात काम करतील. सन्माननीय सदस्य श्री.महादेव महाडिक यांनी तर हॅट्रिक साधली आहे. त्यांचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, यानंतर मी सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत रघुवंशी यांच्याबद्दल दोन शब्द बोलणार आहे. सभागृहात आक्रमकपणे काम करणारे सदस्य म्हणून मी त्यांना जवळून पाहिले आहे. आमची अशी अपेक्षा होती की ते पुन्हा या सदनामध्ये यावेत. परंतु आघाडीचे सरकार म्हटले की, अडचणी असतात. नाही म्हटले तरी त्यांच्यावर अन्याय झाला आहे असे मी म्हणेन. त्यांनी या सदनात चांगले काम केले होते. तरी देखील त्यांना पक्षाकडून तिकिट मिळाले नाही. श्री.चंद्रकांत रघुवंशी यांनी धुळे व नंदुरबार या आदिवासी जिल्हयातील अनेक प्रश्न मांडले, आदिवासी लोकांसाठी, सामान्य लोकांचे प्रश्न मांडण्यासाठी त्यांनी आक्रमक भूमिका घेतल्याचे आम्ही जवळून पाहिले आहे. मी त्यांनाही शुभेच्छा देतो. त्यांचे जीवन सुखी व समृध्द होईल अशी भावना व्यक्त करतो. निवृत्त होणा-या सर्व सन्माननीय सदस्यांना शुभेच्छा देतो, त्यांचे आरोग्य उत्तम रहावे अशी परमेश्वराजवळ प्रार्थना करतो आणि येथेच थांबतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.छगन भुजबळ (उपमुख्यमंत्री) : सभापती महोदय, आज या सभागृहामधून सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण, सन्माननीय सदस्य श्री.अरविंत सावंत, सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत रघुवंशी, सन्माननीय सदस्य श्री.अशोक मानकर, सन्माननीय सदस्य श्री.गोपीकिशन बाजोरिया आणि सन्माननीय सदस्य श्री.महादेव महाडिक हे निवृत्त होत आहेत. या सदस्यांपैकी सन्माननीय सदस्य श्री.गोपीकिशन बाजोरिया व सन्माननीय सदस्य श्री.महादेव महाडिक हे पुन्हा निवडून आलेले आहेत, त्यांचे मी अभिनंदन करतो. परंतु अन्य जे 4 मित्र आहेत ते मात्र या सभागृहात पुन्हा येऊ शकले नाहीत, त्यांना निरोप देण्याचा हा जो कार्यक्रम आहे त्यावर दोन शब्द बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, निवृत्त होणा-या चार सन्माननीय सदस्यांपैकी सर्वश्री मधुकर चव्हाण, अरविंद सावंत आणि चंद्रकांत रघुवंशी यांच्याबरोबर मी जवळून काम केलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण हे तर मी ज्या मतदार संघातून महानगरपालिकेत किंवा विधानसभेत निवडून येत होतो त्या मतदार संघातील रंगारी बदक चाळीतले रहिवासी आहेत. त्या भागात दरवर्षी गणोशोत्सव साजरा केला जातो. त्या भागातील रंगारी बदक चाळीतील गणोशोत्सव म्हणजे मानांकित मानला जातो. गणेशोत्सव आला म्हणजे श्री.मधुकर चव्हाण हे 10-10 दिवस 15-15 दिवस घरी जात नाहीत इतके त्या कार्याला ते वाहून घेतात. त्यांच्या पक्षाचे नेते श्री.लालकृष्ण अडवाणी असतील किंवा श्री.अटलबिहारी वाजपेयी असतील यांना सुध्दा रंगारी बदक चाळीत आणून गणेशोत्सवाचे दृश्य दाखवावयाचे मग ते सामाजिक प्रश्नाचे असो किंवा पौराणिक दृश्य असो आणि ही मान्यवर मंडळी सुध्दा ते दृश्य बघण्यासाठी अर्धा-अर्धा तास बसत असत. 120 फुटांचे घर असलेली व असंख्ये घरे असलेली चाळ आणि त्या चाळीची छोटीशी गल्ली आणि तेथे काम करणारे आमचे श्री.मधुकर चव्हाण यांना मी जवळून ओळखतो, ते आमचे मित्र आहेत. मी महानगरपालिकेमध्ये असताना ते निवडून आले होते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री.शिगम

(श्री. छगन भुजबळ...)

मला वाटते चिंचपोकळी या मतदारसंघातून ते मुंबई महानगरपालिकेमध्ये निवडून गेले होते. महानगरपालिकेमध्ये त्यांनी फार चांगले काम केले. शासनाच्यावतीने आम्ही घरदुरुस्ती मंडळ, जुन्या इमारती, झोपडपट्या या संदर्भात तीन मंडळे निर्माण केली होती. त्या मंडळामध्येही त्यांनी चांगले काम केले. अतिशय पोटतीडिकेने आणि सतत सर्वसामान्य कायकर्त्याच्या बरोबर राहाणारे असे श्री. मधुकर चव्हाण हे आमदार झाल्यानंतर देखील कार्यकर्ता म्हणूनच राहिले आणि कार्यकर्ता म्हणूनच त्यांचा वावर विविध क्षेत्रामध्ये आम्ही पाहिलेला आहे. त्यांच्या कर्तृत्वाबद्दल या ठिकाणी अनेक सन्मानीय सदस्यांनी सांगितलेले आहे. त्याचा मी पुनरुच्चार करणार नाही. पण सन्माननीय सदस्य श्री. उल्हास पवार यांनी असा एक ओझरता उल्लेख केला की, हे निवृत्त होणारे चार सदस्य आपापल्यापरीने अतिशय उपयुक्त काम करणारे आहेत. खालच्या स्तरापर्यन्त पक्षाचे काम करणारे असे हे सदस्य आहेत. हे सदस्य ज्या विविध पक्षामध्ये आहेत त्या पक्षांनी त्यांनी केलेल्या कामाचा विचार करुन सहज निवडून येण्यासारखी जागा देऊन त्यांना या ठिकाणी पुनश्च निवडून आणण्याचा प्रयत्न केला पाहिजे. मघाशी निवडणुकीच्या संदर्भात काही सदस्यांनी या ठिकाणी उल्लेख केला. आता सर्वसामान्य कुटुंबातील लोकांना निवडणुकीमध्ये निवडून येणे कठीण झालेले आहे. या संदर्भात आपणाला कोणते नियम वा कायदे करता येतील ते आपण पाहू. परंतु तोपर्यन्त संबंधित पक्षांनी त्यांचे काम पाहून त्यांना पुन्हा निवडून आणण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांना मी शिवसेनेमध्ये जेव्हा होतो तेव्हा पासून ओळखतो. बेळगाव-कारवार सीमाप्रश्नी शिवसेनेने जे आंदोलन छेडले होते त्यामध्ये त्याचा फार मोठा सहभाग होता. मराठी माणसांना विविध कंपन्यांमध्ये, बँकामध्ये नोक-या मिळण्याच्या संदर्भात त्यांनी स्थानिय लोकाधिकार समितीच्या माध्यमातून फार चांगले काम केलेले आहे. सन्माननीय श्री.सुधीर जोशी, श्री. गजानन किर्तीकर ही नेते मंडळी स्थानिय लोकाधिकार समितीच्या कामामध्ये जास्त लक्ष देत होती आणि त्यांच्या बरोबरीने सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सांवत हे होते. महानगर टेलिफान निगम, इंडियन ऑईल अशा कंपन्या आणि विविध बँकामध्ये स्थानिय लोकाधिकार समितीची स्थापना करुन स्थानिक लोकांना नोक-या मिळाव्यात म्हणून त्यांनी सतत प्रयत्न केलेले आहेत. त्यासंदर्भात त्यांनी आंदोलने देखील केलेली आहेत. बँकामध्ये आणि अन्य मोठ मोठ्या कंपन्यामधील भरतीच्या वेळी अभ्यासवर्ग घेऊन इंटरव्ह्यू कसा द्यायचा याबाबतची

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. छगन भुजबळ ...)

माहिती देऊन उमेदवार तयार करण्याचे काम त्यांनी केले. विविध खाजगी संस्था, बँका, टेलिफोन कंपन्या यामध्ये मराठी माणसाची वर्णी लावण्याचे जे बेसिक काम शिवसेनेच्या नेत्यांनी सुरु केले त्यामध्ये सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांचा सिंहाचा वाटा आहे. आपण सर्वांनी त्यांची भाषणे ऐकलेली आहेत. ते शिवसेनेचे उपनेते आहेत. नाशिकची जबाबदारी त्यांच्याकडे सोपविलेली आहे.नाशिकमध्ये ते कधी कधी मला त्रास देत असतात. पण ते चांगले काम करीत असतात.

सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत रघुवंशी हे देखील निवृत्त होत आहेत. शिवसेना-भाजप युतीचे शासन असताना मी विरोधी पक्षनेता होतो. त्या वेळी सभापती महोदय आपण तसेच विष्णूपंत पाटील, रामकृष्ण मोरे अशी ज्येष्ठ मंडळी सभागृहामध्ये होती.

...नंतर श्री. पांडुरंग खचे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. छगन भुजबळ .....

आणखीही काही लहान वयाचे सन्माननीय सदस्य त्यात होते. ही सर्व मंडळी या लढाईमध्ये सहभागी होत होती. खरे म्हणजे ती लढाई काही काँग्रेस पक्षाची नव्हती, कारण तशी लढाई लढाणे त्यावेळेस त्यांना माहीत नव्हते कारण तोपर्यंत तसा प्रसंग आला नव्हता. परंतु सभागृहात घोषणा देणे, ज्याप्रमाणे समोरच्या बाकावरुन आमचे सहकारी सन्माननीय सदस्य देत असतात. त्याप्रमाणे घोषणा देणे यामध्ये मात्र सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत रघुवंशी यांचा सिंहाचा वाटप असायचा. ते पूर्ण शक्तीनिशी त्या प्रश्नाला लावून धरायचे, जोपर्यंत त्याचे उत्तर मिळत नाही तोपर्यंत लावून धरत होते. किंबहुना जनतेपर्यंत पोहचत नाही तोपर्यंत या सभागृहात त्या प्रश्नावर मग त्यात सभा तहकुबी असेल, चर्चा असेल अथवा इतर सांसदीय आयुधे जी असतील त्यांचा वापर करण्यासाठी सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत रघुवंशी यांचा उपयोग फार मोठ्या प्रमाणात झाला. त्याचबरोबर सन्माननीय सदस्य श्री. अशोकराव मानकर हे देखील यासभागृहात अजूनही चांगले काम करु शकतील. अशा प्रकारे हे सर्व सन्माननीय सदस्य पुन्हा येथे यावेत अशी मी इच्छा व्यक्त करतो. मघाशी मी म्हणालो की, निवृत्त होणाऱ्या सभासदांची अनुपस्थिती या सभागृहात आपल्याला नक्कीच जाणवेल परंतु एक लखात ठेवले पाहिजे की, राजकीय क्षेत्रात काम करताना जय-पराजय हे होतच असतात, त्याला घाबरुन जाण्याचे कारण नसते. आपण काम केले तर त्याचे फळ निश्चितपणे मिळते. ती धमक, तो अभ्यास, ती काम करण्याची शक्ती आणि युक्ती तसेच गोरगरिबांच्या कामाची जी तडफ आपल्यात अजूनही आहे, ती सर्वांनाच उपलब्ध झालेली आहे. आपण येथे डायरेक्ट आलात असेही नाही तर संघर्ष करुन आणि लढून लढून आला आहात तीच लढाई भावी आयुष्यात सुध्दा आपल्या उपयोगी पडेलच. त्याचा उपयोग कदाचित विधानसभेत जाण्यासाठी आपल्याला होऊ शकतो, कदाचित लोकसभेत जाण्यासाठीही होऊ शकतो. पण या लढाईमुळे आपल्याला भावी आयुष्यात यश मिळेल अशा शुभेच्छा व्यक्त करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, खरे म्हणजे मघासपासून मी अतिशय भारावून गेलेलो आहे. ज्याप्रमाणे माझे वर्णन केले त्या योग्यतेचा मी आहे की नाही हे मला माहीत नाही. परंतु एका सामान्य आणि गिरणीत काम करणाऱ्या स्त्रीचा मी मुलगा आहे. सर्वांची भाषणे ऐकत असताना असे वाटत होते की, माझी 87 वर्षांची आई आहे तिला सभागृहाच्या प्रेक्षक गॅलरीत आणून बसवायला हवे होते. मी भावनाविवश झालो नाही तर अतिशय गरिबीतून आलेला मुलगा या सभागृहात येऊ शकला याचा मला फार अभिमान वाटतो. हे या महाराष्ट्राचे सभागृह आहे आणि या सभागृहात अशी मंडळी आहे की, जेथे त्याग या शब्दाला ज्यांनी आपल्या कर्तृत्वाने अर्थ प्राप्त करुन दिला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी रक्ताचा एकही थेंब न सांडता सामाजिक चळवळीच्या माध्यमातून देशातील लाखो करोडो लोकांना न्याय मिळवून दिला अशा थोर लोकांचे हे सभागृह आहे. तसेच महात्मा ज्योतिबा फुले अशा लोकांचे हे सभागृह आहे. अशा लोकांनी आपल्या त्यागाने या शब्दाला अर्थ प्राप्त करुन दिला. ज्यांनी निसर्गाकडून आदर्श घेतला अशी महान माणसे या राज्यात आहेत. ज्यांच्या स्वप्नातील महाराष्ट्र साकार करण्यासाठी आपण येथे बसलो आहोत त्यांनी कोणाचा आदर्श ठेवला आहे तर त्या महान माणसांनी झाडाचा आदर्श ठेवला आहे. जे झाड स्वत: कधीच फळे खात नाही. त्यांनी नदीचा आदर्श ठेवला, जी नदी स्वत: कधीच तिचे पाणी पीत नाही. त्यांनी वाऱ्याचा आदर्श ठेवला, जो वारा कधीच स्वत:ला सुगंधाचा स्पर्श होऊ देत नाही. त्यांनी सुर्याचा आदर्श ठेवला की ज्याने स्वत:साठी कधीच उर्जा घेतली नाही. अशा महान माणसांनी जन्म घेतलेल्या महाराष्ट्राचे हे सभागृह आहे. राज्याच्या निर्मितीनंतर हे सभागृह झाले असून त्यात .....

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण ....

माझ्या सारख्या एका सामान्य माणसाला या ठिकाणी येण्याचे भाग्य मिळाले आहे. माझे वडील कमिशनर पिंपुटकर यांचे शिपाई होते. ते आपल्या नावासमारे देशमुख-चव्हाण असे नाव लावत असत. ते म्हणत असत की, मी शिपाई असलो तरी मी देशमुख-चव्हाण आहे, 96 कुळी मराठा आहे. परंतु मी माझ्या नावासमोर देशमुख-चव्हाण असे कधीही लावले नाही. या ठिकाणी मी सहा वर्षापूर्वी ज्यांच्यामुळे आलो त्या व्यक्तींचा उल्लेख केला नाही तर ते कृतघ्नपणाचे होईल. मी या ठिकाणी दोन व्यक्तीमुळे आलेलो आहे. दुर्दैवाने त्यातील एक महान व्यक्तीचा मृत्यू झालेला आहे. आदरणीय बाळासाहेब ठाकरे या व्यक्तीमुळे मी या ठिकाणी आलेलो आहे. त्यावेळच्या निवडणुकीत दोन जागा होत्या. त्यावेळेस माननीय बाळासाहेब ठाकरे यांनी सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत तसेच श्री. साटम यांना उमेदवारी दिली होती. त्यावेळेस भारतीय जनता पार्टीचे 38 नगरसेवक होते व शिवसेनेचे 104 नगरसेवक होते. शिवसेनेला वाटत होते की, आमचे 28 नगरसेवक आहेत असा त्यांचा गैरसमज झाला होता. माणसे किती मोठी असतात ते जर मी येथे व्यक्त केले नाही तर मी कृतघ्न ठरेल. आईच्या उदरातून मी आमदारकी घेऊन आलेलो नाही किंवा कोणीही येत नाही. अनेक माणसांमुळे मला आमदारकी मिळाली आहे, त्यामुळे त्यांची कृतज्ञता व्यक्त केली पाहिजे असे मला वाटते. असे म्हणतात की, माणूस ज्यावेळी जन्माला येतो त्यावेळी त्याला नाव नसते. नंतर नाव मिळत असते. माणूस जेव्हा मरतो तेव्हा शरीर मरते आणि नाव रहाते. त्यामुळे नाव अमर करण्यासाठी अनेकांचा सहभाग असतो. माणूस जन्माला येतांना अमृत घेऊन येत नाही. माझ्या निवडणूकीच्या वेळेस माननीय बाळासाहेब बंगल्यावर होते, फॉर्म भरावयाचा होता म्हणून मी स्वत: खूप अस्वस्थ होतो. त्यावेळी स्वर्गीय प्रमोद महाजन हे जयपूर येथे निवडणुकीसाठी गेले होते. त्यावेळेस मला वाटत होते की, आपल्या आमदारकीचा आता मुहुर्त टळणार. त्यावेळी माननीय बाळासाहेब मला म्हणाले की, "तुझ्या एकटयासाठी मला युती तोडायची नाही". माननीय बाळासाहेबांनी माननीय नारायणराव यांना फोन केला. त्यानंतर कै. शरद कुलकर्णी, श्री. विनोद तावडे यांनी माननीय बाळासाहेबांना फोन करुन माननीय विनोद तावडे माननीय बाळासाहेबांकडे गेले आणि त्यांना सांगितले की, "आमच्या मधुकर चव्हाणला आतापर्यंत

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण ....

कोणतीही संधी मिळाली नाही, सगळया जागा युतीला गेल्या, वार्ड युतीला गेला, विधानसभा युतीला गेली, लोकसभा युतीला गेली". माननीय बाळासाहेब हे खूप मोठया मनाचे आहेत. त्यांचे नाव मी आज घेतले नाही तर ते कृतघ्नपणाचे ठरेल, येथून गेल्यानंतर माझे मन मला खाईल. मला आठवते त्यावेळच्या विधान परिषदेच्या निवडणुकीसाठी माननीय नंदू साटम हे फॉर्म भरत होते. त्यावेळेस माननीय बाळासाहेबांनी निरोप पाठवला की, "मी मधूला पाठिंबा देत आहे, मला त्याला निवडून आणावयाचे आहे. तो कमळातील शिवसैनिक आहे, त्याला विधान परिषदेत जाऊ दे."

सभापती महोदय, मला आमदार करण्यासाठी अनेकांनी मदत केलेली आहे. मी त्या सर्वांचा या ठिकाणी उल्लेख करीत नाही. मी सर्व पक्षीय आमदार आहे. बीजेपीचे त्यावेळेस 38 नगर सेवक होते, माननीय बाळासाहेबांच्या आदेशाप्रमाणे मला 15 नगरसेवकांनी मत दिल्यामुळे मला 53 नगरसेवकांचा पाठिंबा मिळाला. मला त्यावेळेस 87 मते मिळाली होती. ज्यांची ज्यांची मला मदत झाली त्यांचे ऋण मी आयुष्यभर मनात ठेवणार आहे. माझ्या सारखे अनेक कार्यकर्ते आहेत जे कधी आपल्या आयुष्यात नगरसेवकही झाले नाहीत, जे साधे एसीओ सुध्दा कधी झाले नाही, आमदारकी वगैरे बाजूला राहू दे. मला पक्षाने जे दिले ते फार दिलेले आहे. राजकीय अभिनिवेशामुळे काही वेळा बोलावे लागते. एकदा तर मी असे म्हणालो की, " तुम्हाला सत्तेचा माज आलेला आहे काय"? त्यावेळी मला माननीय मंदाताई आणि माननीय उल्हास दादा म्हणाले, "मधू तू असा उल्लेख केला"? मी दुस-याच दिवशी दोघांची माफी मागितली. मला रात्रभर चैन पडली नाही. माझी चूक लक्षात यावी म्हणून त्यांनी मला सांगितले होते. त्यांना मला मस्का लावावयाचा नव्हता. परंतु या सभागृहाचे महत्त्व आपल्या वर्तनाने आणि व्यवहाराने शाबूत ठेवले नाही तर पुढच्या पिढी समोर आपण काहीही ठेवू शकणार नाही. कळत न कळत मी आपल्याला दुखावले असेल तर मी नतमस्तक होऊन आपली क्षमा मागतो. तो राजकीय अभिनिवेश होता त्यावेळी वाटत असे की, अरे, राजकारण इतक्या टोकाला न्यायचे असते का ? या सभागृहाचे एक वैशिष्ट्ये आहे. या सभागृहात अनेक मोठी माणसे येऊन गेलेली आहेत, ज्यांनी आपल्या कर्तुत्वाने महाराष्ट्राच्या जनजीवनामध्ये आपल्या कामाचा ठसा उमठवलेला आहे. बाहेर भाषण करणे वेगळे असते आणि

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण ....

सभागृहात नियमांचा आधार घेऊन बोलणे वेगळे असते. या सभागृहात प्रश्नाला न्याय देता येतो. "वयंम् पंचाधिकम् शतम्" या भावनेने या ठिकाणी काम केले जाते. असे जर नसते तर विरोधी पक्षाच्या माणसाची एवढी कोण स्तुती करणार आहे. ज्यावेळी अभिहस्तांतरणाचे बिल या ठिकाणी मंजूर झाले त्यावेळेस माननीय मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख उभे राहिले आणि त्यांनी सांगितले की, सर्व बिलं पास होण्याचे श्रेय मधू चव्हाणांना जाते. मी विरोधी पक्षातला असतांना, माझी स्तुती करुन त्यांचे राजकीय भवितव्य उज्वल होणार नव्हते. परंतु मनाचा उमेदपणा राजकीय जीवनामध्ये पहावयास मिळतो .

यानंतर श्री. गायकवाड...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण ...

दुर्दैवाने त्या ठिकाणी राजकारणाचा विषारी स्पर्श जीवनाच्या सर्व क्षेत्राला झालेला आहे. त्याबाबत आपण सर्वांनी काळजी घेणे आवश्यक आहे असे मला सांगावयाच आहे.

सभापती महोदय, या सभागृहात अनेक चांगल्या चांगल्या गोष्टी आम्हाला पहावयास मिळाल्या आहेत. या ठिकाणी चर्चा होत असतांना मी एक विविधता पाहिली आहे. सन्माननीय सदय्य प्रा बी.टी.देशमुख वा अन्य सन्माननीय सदस्य जर बोलावयास उभे राहिले तर या माणसांच्या विचारांना महासागराची खोली आहे असे वाटावयास लागते. वेगवेगळया विचारांची माणसे ज्यावेळी एकत्रितपणे बोलावयास लागतात त्यावेळी असे वाटावयास लागते की, या देशामध्ये ज्याप्रमाणे ऋतुंची विविधता आहे तशी माणसांच्या विचारांचीसुध्दा विविधता आहे.एखादे विधेयक जर सभागृहात चर्चेसाठी आले तर सन्माननीय सदस्य श्री कपिल पाटील बोलण्यासाठी उभे राहतात .अंधश्रध्देच्या संदर्भातील एक विधेयक असून त्यावर बोलत असतांना असे वाटते की, महाराष्ट्रातील विचारधारेला गंगेच्या पाण्याची गतीमानता आहे. ती या ठिकाणी प्रकट होते आणि काही वेळेला असे वाटते की, सन्माननीय सदस्य बोलावयास लागल्यानंतर हिमालयाची उंचीसुध्दा पहावयास मिळते.याठिकाणी चर्चेच्या वेळी मला ऋतुंची विविधता पहावयास मिळाली आहे त्याचबरोबर गंगेच्या पाण्याची गतीमानता पहावयास मिळाली , त्याचबरोबर एखाद्या सन्माननीय सदस्यांच्या बोलण्यातून मला हिमालयाची उंची देखील पहावयास मिळाली , इतकेच नव्हे तर एखादा सन्माननीय सदस्य बोलत असतांना त्यात मला महासागराची खोली देखील पहावयास मिळाली आहे हे सर्व पाहिल्यानंतर आपण किती लहान आहोत असे वाटावयास लागते.या सभागृहामध्ये माझ्या पक्षाने मला सहा वर्षापूर्वी आणले होते. स्वर्गीय प्रमोद महाजन यांनी त्यासाठी प्रयत्न केले होते त्याचबरोबर श्री. गोपीनाथ मुंडे यांनी व सन्माननीय सदस्य श्री विनोद तावडे यांनीसुध्दा प्रयत्न केले होते. इतकेच नव्हे तर विरोधी पक्ष नेते माननीय श्री पांडुरंग फुंडकर यांनीसुध्दा प्रयत्न केले होते.सभापती महोदय, यावेळी मात्र मी निवडून आलो नाही अर्थात त्याचे मला दु:ख झालेले नाही सन्माननीय सदस्य श्री. उल्हास पवार यांनी जे सागितले होते ते मी आपल्याला सांगतो. काही गोष्टी आपण सावरल्या पाहिजेत. विधान परिषदेची निवडणूक इतकी भयानक आहे की, सामान्य

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण ..

माणूस या निवडणुकीसाठी उभाच राहू शकत नाही. या ठिकाणी माननीय उपमुख्यमंत्री उपस्थित आहेत माननीय सभापतींच्या मार्फत मला त्यांना एक विनंती करावयाची आहे . निवडणुंकीच्या वेळी परस्परांच्या बद्दल शंका घेतल्या जातात. एखाद्या माणसाने आपल्याला मत दिले असेल किंवा नाही यासबंधी आपल्याच माणसाबद्दल अशी हुरहूर निर्माण होते. त्या पेक्षा स्फटीकाप्रमाणे सरळ लोकशाही आणावी आणि शो ऑफ हॅन्डसने निवड करण्याची पध्दत स्वीकारण्यात यावी त्यामुळे आपले इमान विकण्याची कोणाचीही इच्छा होणार नाही आणि दुस-याचे इमान विकत घेण्याची अपप्रवृत्ती निर्माण होणार नाही. आपल्या डोक्यावर सत्तेचा मुकुट यावा म्हणून दुस-याच्या मनातील पापी वृत्ती जागृत करण्याची भावनासुध्दा निर्माण होणार नाही .आपण सर्व मंडळी राजकारणात काम करतो त्यामुळे आपल्या माध्यमातून आपल्याला पक्षाला विजय प्राप्त करुन द्यावयाचा असतो . पॉयझ ान किल्स द पॉयझन म्हणजेंच विष विषाला मारते या भावनेतून मग आम्हीसुध्दा तसेच करावयास लागतो. दुसरा करतो म्हणून आपणही तसेच केले पाहिजे असे आम्हाला वाटू लागते तेव्हा निवडणुकीची सध्याची पध्दत बदलावी असे मला वाटते.

सभापती महोदय, लहान मुलगा ज्याप्रमाणे दुडदुड धावत येते त्याप्रमाणे सुख धावत येते आणि दु:ख मात्र हळूवार पावलाने जात असते त्याप्रमाणे या सभागृहात प्रवेश करीत असतांना हुरहूर लागली होती परंतु सभागृहाच्या बाहेर जात असतांना मात्र पावले जड होत जात आहे.या सभागृहामध्ये मी उपस्थित राहू शकणार नाही म्हणून पावले जड होत नाही तर या सभागृहात जी मोठी माणसे आहेत त्यांचा साहवासला मी मुकणार असल्यामुळे त्याची मला खंत वाटत आहे.मी या ठिकाणी उपस्थित राहू शकणार नाही याची मला खंत वाटत नाही परंतु चांगल्या माणसांचा सहवास मला मिळणार नाही याचे वाईट वाटते. चांगल्या माणसाचा सहभाग लाभण्याचेसुध्दा भाग्य असावे लागते, अमृताचा स्पर्श लाभण्यासाठीसुध्दा भाग्य असावे लागते. गेली सहा वर्षे कशी निघून गेली हे मला कळले देखील नाही. या सहा वर्षाच्या काळात मला अमृतअनुभव आला आहे. आम्ही एकमेकांना वैचारिक गोळया मारत होतो परतु फार तडफेने भाषण केल्यानंतर हळूच सगळयांना

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण ..

चॉकलेट काढून देत होतो. जीवनामध्ये किती आनंद आहे हे त्यावेळी मला जाणवत होते. सुख आणि दु:ख हे एकाच वेळेला बधण्याचे भाग्य मला मिळाले होते .या महान सभागृहामध्ये मला येण्याचे भाग्य मिळालें होते. परमेश्वराची माझ्यावर असलेली असीम कृपा, माझ्या आई वडिलांचा आशीर्वाद,माझ्या पक्षाची माझ्यावर असलेली निष्ठा आणि माझ्या मित्रांच्या प्रेमामुळे मी या ठिकाणी आलो आहे. मला हे माहीत आहे की, मी एका पक्षाच्या मदतीने येथे आलेलो नाही आणि ही गोष्ट मी प्रामाणिकपणे कबूल करतो.याबाबतीत मी जर काही कबूल केले नाही तर ती माझी आत्मवंचना ठरेल. यावेळेससुध्दा मला दहा मते जास्त मिळाली आहेत. परंतु त्याबाबतीत मी येथे जास्त बोलणार नाही.ज्यांनी मला मते दिली त्यांचा मी अत्यंत आभारी आहे संध्याकाळी सूर्य जरी अस्ताला गेला असला तरी दुस-या दिवशी सकाळी पहाट होत असते. जीवनाच्या निरंतर प्रवासावर माझा पूर्ण विश्वास आहे.माणूस कधीही अमरत्वाचा ठेका घेऊन आलेला नाही. असे म्हणतात की ज्याने हे विश्व निर्माण केलेले आहे तो परमेश्वरसुध्दा निघून गेल्यानंतर वा आपले अवतार कार्य संपल्यानंतर हे जग चालतच राहिले आहे त्याप्रमाणें हे सभागृहसुध्दा चालत राहणार आहे.या ठिकाणी नवीन सदस्य येतील वा येथून निघून जातील परंतु सभागृह चालत राहील.या ठिकाणी आल्यानंतर सभागृहाचे चांगले वैशिष्ट मला पहावयास मिळाले आहे. आपण सर्वानी मला प्रेम दिलेले आहे. तुकारामाचा एक अभग सांगून मी माझे भाषंण संपविणार आहे. तुकाराम महाराज हे मोठे संत होते परंतु मी माझ्या पुरता मर्यादित आहे.तो अभंग असा आहे :

" शेवटची विनवणी संतजनि परिसावी
विसर तो न पडावा माझा देवा तुम्हाशी
आता फार बोलू काय अवघे माझे पाय विदीत
तुका म्हणे पडतो पाया करा छाया कृपेची "

एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / शीघ्रलेखी नोंद

श्री. अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, माझे मित्र सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण माझ्या सोबतच या सभागृहात सदस्य म्हणून आले आणि आता आम्ही दोघेही सोबतच बाहेर निघणार आहोत. ते खूप भाव-विवश झाले. मी आज निवृत्त होताना 14 वर्षे कधी आणि कशी गेली ते कळलेच नाही. मी पहिल्यावेळी जेव्हा या सदनामध्ये सदस्य म्हणून आलो त्यानंतर सहा वर्षांची कारकीर्द संपली. मध्ये दोन वर्षांचा कालखंड गेला आणि मी पुन्हा येथे निवडून आलो. तेव्हा मी मागे वळून पाहू लागलो आणि सहज मला आठवले की, मी कोण होतो ? माझी काय ओळख होती ? माझे नाव होते अरविंद गणपत सावंत. माझी ओळख होती .. गणपतरावांचा मुलगा. ही ओळख केव्हा पुसली गेली ते कळलेच नाही. आणि हा हा म्हणता अरविंद गणपत सावंत हा शिवसेना प्रमुखांचा निष्ठावंत शिवसैनिक ही जगन्मान्य ओळख झाली. आम्हाला 'जय महाराष्ट्र' घडायला लागले. आम्हाला नमस्कार घडायला लागले. हे सारे नमस्कार त्यांच्याचमुळे घडायला लागले म्हणून सुरूवातीलाच मी वंदनीय हिंदूहृदयसम्राट शिवसेना प्रमुख श्री.बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रति मनापासून कृतज्ञता व्यक्त करतो तसेच आदरणीय उद्धवजी ठाकरे यांच्याही प्रति तितकीच कृतज्ञता व्यक्त करतो. ज्यांनी या क्षुल्लक माणसाला, ज्याचा जन्म एका सामान्य कुटुंबात झाला, ना माझे आई-वडील कुणी आमदार होते वा नगरसेवक होते वा नामदार होते, मंत्री होते, ना ग्रामपंचायत सदस्य होते ना कोठे नगरपालिकेत होते. एक चळवळ्या, धडपड्या शिवसैनिक मी होतो, पण त्यांनी आम्हाला येथे पाठविले, या महासागरात पाठविले आणि येथे आम्हाला उत्तुंग माणसे पहावयास मिळाली.

सभापती महोदय, सुरूवातीलाच त्यांचा अभंग म्हणताना .. " फोडिले भांडार, धन्याचा तो माल, आम्ही तो हमाल - भारवाही " या भावनेने मी येथे आलो. त्यांनी भांडार फोडले. त्यांचाच माल, आम्ही तो हमाल. होय आम्ही त्यांच्या विचारांचे हमाल आहोत. शिवसेना प्रमुखांचे विचार घेऊन आम्ही या सभागृहात आलो. आलो तेव्हा या सभागृहात सभापती महोदय, जयंतराव टिळकांना पाहण्याचा योग आला. माझे भाग्य होते ते. आम्ही तेव्हा सत्तेमध्ये होतो. जयंतराव टिळक तेव्हा सभापती होते. समोर मला तेव्हा माननीय श्री.शरद पवार पहावयास मिळाले. त्यानंतर माननीय श्री.छगन भुजबळ साहेब विरोधी पक्षनेते झाले. मी या सभागृहात आलो तेव्हा माननीय श्री.शरद पवार साहेब हे विरोधी पक्षनेता होते. त्यांची विषयावरची मांडणी पहावयास मला मिळाली. मी सभागृहात सदस्य म्हणून आलो तेव्हा ठरविले होते की, सुरूवातीस सभागृहात आपण काही बोलायचे नाही. मी याबाबत उद्धवजींना म्हणालोही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत ....

की, पाहतो, अनुभव घेतो. त्यावर ते मला म्हणाले की, थांबायचे नाही, पहायचे नाही, ताबडतोब खेळायला सुरूवात करायची. त्यावेळेस नेमकी कायदा व सुव्यवस्थेवरील चर्चा सभागृहात होती. त्याच काळात माननीय श्री.शरद पवार साहेबांच्या विमानातून दोन माणसे जी आली होती, पैकी एक शर्मा म्हणून कोणी होते. त्यांच्यावरून विषय आला आणि मी त्यावर सभागृहामध्ये बोललो. धाडसाने बोललो. आपण कोणाबद्दल एवढे मोठ्ठे बोलतो आहोत हे लक्षात घेतले नाही. पवार साहेबांची काखेत पुस्तक घेण्याची लकब आहे त्याप्रमाणे ते लॉबीमध्ये आले आणि विचारले की, हा मुलगा कोण आहे ? माझी ओळख करून घेऊन मला म्हणाले, तू छान बोलतोस आणि त्यांनी कौतुकाने माझी पाठ थोपटली. मला परत भीतीही वाटली. नक्की त्यांना काय म्हणायचे आहे कुणास ठाऊक. पण ती मनापासून दाद होती. नंतरही ते तसे मला बोलून गेले. सभापती महोदय, येथेही या सभागृहामध्ये आमची ओळख विचारून घेतल्यानंतर येथे जयंतराव टिळक होतेच, त्यानंतर त्या आसनावर ना.स.फरांदे साहेब आले, त्यानंतर आपण स्वत:ही आलात. आपण आणि विष्णू पाटील या दोघांची जोडी मी कधीही विसरू शकणार नाही. आपण दोघेही सभागृहात मागील बाकावर बसायचे तेव्हाही माझे आपल्याकडे लक्ष असायचे आणि आता आपण सभापतीपदी आहात. सभापती महोदय, माननीय श्री.शरद पवार साहेबांना या सभागृहात पाहण्याचा योग आला, त्यावेळी आमचे मुख्यमंत्री श्री.मनोहर जोशी हे होते, श्री.सुधीर जोशी हे मंत्री होते. अनेक असे प्रसंग यायचे आणि वाटायचे की, याची उत्तरे आपण कशी देणार ? पण येथे धाडसाने उत्तर दिले जायची. त्यातून शिकता यायला लागले. आम्ही पाहत होतो, ऐकत होतो, बघत होतो, पाहता पाहता शिकत होतो. मला तर कसलाही अनुभव नव्हता. महापालिकेचा नव्हता वा जिल्हा परिषदेचाही नव्हता. सभापती महोदय, माझे पहिले भाषण हे एका अशासकीय ठरावावर या सभागृहात झाले होते. बेरोजगारांच्या संदर्भातील तो ठराव मी मांडला होता. मराठी माणसाला, स्थानिक भूमिपुत्राला नोकरभरतीमध्ये प्राधान्य द्यावे यावर हे भाषण केले. राष्ट्रकूल संसदीय मंडळाने तेव्हाच कोठे तरी पारितोषिके देण्याची सुरूवात केली होती. मी 1996 साली या सभागृहात आलो आणि माझ्या त्या पहिल्याच भाषणाला उत्कष्ट भाषणाचा पुरस्कार मिळाला. पुरस्कार घेताना माननीय श्री.अलेक्झांडर साहेब राज्याचे राज्यपाल होते, त्यांनी मला विचारले, यू आर ए न्यू वन ? हार्डली वन इयर पासड्. मी म्हटले 'येस सर.' ...

(यानंतर श्री. सरफरे .... 4एम 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत...

मला आश्चर्य वाटले,आनंद वाटला की, पहिल्या वर्षी आपण चांगला प्रभाव पाडू शकलो. माननीय शिवसेनाप्रमुखांना आनंद देऊ शकलो याचा आनंद होता. ज्या मूलतत्वासाठी शिवसेना उभी राहिली. तो विचार या सभागृहामध्ये प्रभावीपणे मांडता आला. त्यानंतर माननीय प्रमोद नवलकर साहेब, मधुकर सरपोतदार साहेब, दिवाकर रावते साहेब, सुभाष देसाई साहेब होते. त्यानंतर आमचे सरकार गेले. पुन्हा कॉग्रेसचे सरकार आले. त्यावेळी विलासराव देशमुख साहेब, छगन भुजबळ साहेब, आर.आर.पाटील साहेब आणि खास करुन बी.टी. भाऊ देशमुख सर या सर्वांची भाषणे ऐकतांना एक वेगळा प्रभाव मनावर पडला. माननीय सदस्य श्री. कपिल पाटील हे नव्याने आले आहेत. मी पहिल्या वेळी सभागृहात निवडून आलो त्यावेळी माननीय सदस्य श्री.कपिल पाटील हे पत्रकार होते. आज दिनांक या नावाचे त्यांचे एक सायंदैनिक प्रसिध्द व्हायचे. सभागृहातील उत्तम वक्ता कोण ? या संबंधी आज दिंनांकच्या अंकामध्ये माझ्यासंबंधी उभ्या कॉलममध्ये बातमी प्रसिध्द करण्यात आली होती. त्या पत्रकाराला चहा न पाजता माझ्या आयुष्यात आलेली पहिली बातमी होती. ती बातमी प्रसिध्द झाली, म्हणून माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांना मी खास धन्यवाद देतो. त्या बातमीने सुध्दा मला खूप चैतन्य दिले.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी याठिकाणी भाषण करीत असतांना एका महत्वाच्या विषयाला हात घातला. यापुढे निवडणुका कशा होतील? माननीय नामदार श्री. आर.आर. पाटील साहेबांचे सुध्दा या संदर्भातील भाषण मला आठवते. सभापती महोदय, लोकशाही या शब्दाचा अर्थच कुठेतरी हरवत आहे की काय असे वाटायला लागले आहे? चर्चेवरील आधारीत शासन पध्दती म्हणजे लोकशाही असे वॉल्टर बेनहोट म्हणाले. तर लोकशाहीबद्दल ऑफ दी पीपल फॉर दी पीपल, बाय दी पीपल असे अब्राहम लिंकन म्हणाले. पण त्याहीपलिकडे जाऊन घटना करतांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी म्हटले आहे की, "लोकांच्या आर्थिक व सामाजिक जीवनात क्रांतिकारक बदल, रक्तविरहीत मार्गानी घडवून आणणारी शासन पध्दती म्हणजे लोकशाही" या वाक्याच्या अर्थाबाबत मी पुन्हा पुन्हा विचार करतो की, खरेच ती लोकशाही शिल्लक आहे काय? आता मी लोकांच्या खाजगी चर्चेमध्ये संवाद ऐकतो, त्यावेळी ते बॉक्स अशी भाषा वापरतात. 15 बॉक्स झाले, 25 बॉक्स झाले. विधानपरिषदेच्या एका निवडणुकीसाठी कोटयवधी रुपयांचा खर्च त्या उमेदवारासाठी करावा लागणे ही लोकशाहीच्या मुळावर येणारी बाब आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत...

सभापती महोदय, वर्गा - वर्गामध्ये संघर्ष आणि अंतर्गत संघर्षामुळे लोकशाहीच्या मार्गामध्ये अडथळे निर्माण होत आहेत. म्हणूनच माननीय शिवसेना प्रमुखांनी जो विचार दिला तो इतका उदात्त होता, "ब्राम्हण-ब्राम्हणेत्तर, मराठा-मराठेतर, शहाण्णव कुळी-ब्याण्णव कुळी, उच्च-नीच, दलित-दलितेतर सारे भेद गाडून मराठी माणसांनी एकत्र व्हा, तरच तुम्हाला न्याय मिळेल" ही भूमिका माननीय शिवसेनाप्रमुखांनी मांडली. जात-पात-पंथ विरहीत मांडली. दुर्दैवाने तो एक राजकीय भाग असेल. त्यानंतर आलेला मंडल आयोग असेल किंवा अन्य विषय असतील, परंतु त्यांनी त्यावेळी सामाजिक जी व्यवस्था पाहिजे होती ती आपण आणू शकलो काय? याचा विचार आपण करावयास पाहिजे काय? त्यामुळे राजकीय लोकशाही की सामाजिक लोकशाही. आम्ही राजकीय लोकशाहीचे प्रतिनिधी बसलो आहोत, सामाजिक लोकशाही आज तरी अस्तित्वात आहे काय? असा विचार यानिमित्ताने करावयास पाहिजे. सभापती महोदय, म्हणून मला बहिणाबाई एवढी भावायची, ती सहज म्हणायची की, "अरे संसार, संसार जसा तवा चुल्हयावर, आधी हाताले चटके तेव्हा मिळते भाकर" आम्ही आमच्या जीवनामध्ये, अनेक चळवळीमध्ये चटके सहन केले म्हणून भाकर मिळाली. त्याहीपुढे जाऊन बहिणाबाई म्हणतात की, "अरे माणसा, माणसा कधी होशील माणूस, लोभापाई माणसा तुझा झाला रे कानूस" हे अलिकडच्या निवडणुकीमध्ये आपण पहात आहोत. बहिणाबाईंनी पुढे असे म्हटले आहे की, "मतलबासाठी मान, माणूस डोलाई, इमानासाठी कुत्रा शेपूट हलाई". कुत्रा इमानासाठी शेपूट हलवितो, आणि मतलबासाठी माणूस मान डोलवितो. "अरे माणसा, माणसा तुझी नियत बेकार, तुझ्या परीस बरं गोठयातलं जनावर" आज गोठयातील जनावर तुझ्यापेक्षा बरे आहे,कारण आमची नियत बिघडली आहे. आणि मग आम्ही याठिकाणी निवडून येतो व प्रभावी विचार मांडतो. त्याप्रमाणे आम्ही आमच्या जीवनामध्ये वागतो काय? आमची सामाजिक लोकशाही खरेच तशी आहे काय? याचा विचार आपण केला पाहिजे. मूल्यांचा, विचारांचा ऱ्हास होतांना आपण पहातो. मूल्याधिष्टित राजकारण गेले, विचाराधिष्टित राजकारण दूर झाले, मुळापेक्षा बांडगूळे प्रभावी व्हावयास लागली, ती आज प्रत्येक पक्षामध्ये आपल्याला दिसत आहेत. आणि म्हणून या सभागृहामध्ये एक तप काम केले आहे. ते करीत असतांना या सभागृहामध्ये खूप आनंद घेतला, परंतु समाधान झाले नाही.

(यानंतर सौ.रणदिवे)

अशुद्धीरहित प्रत / अशुद्धीरहित नाही

म्हणजे येथे आणखी काही कालावधी असावयास पाहिजे असे नाही. पण मी येथे ज्या कामासाठी आलो, ते सर्व काम पूर्ण झाले आहे काय ? आज ती कामे मनासमोर येतात. त्यांचा फक्त एका मिनिटामध्ये पाढा वाचतो. मुंबई शहराची दूरावस्था, परप्रांतीयांचे लोंढे तो प्रश्न तसाच आहे. राजकीय लाभापोटी अनधिकृत झोपडपट्टयांना, बांधकामांना मिळणारे संरक्षण तसेच सुरु आहे. आरे कॉलनीसारख्या हिरव्यागार वनराईमध्ये उभी रहात असलेली पंचतारांकित संस्कृती तशीच सुरु आहे. पिण्याच्या पाण्यासाठी, सिंचनाच्या पाण्यासाठी करावयाची उपाययोजना आजही पूर्ण झालेली नाही. भूगर्भातील पाण्याची पातळी अधिक खोल जात आहे. लोकांना पिण्यासाठी पाणी मिळत नाही. कोकणामध्ये भरपूर पाऊस पडून सुध्दा पाणी वाया जात आहे. कोकणातील वशिष्ठी आणि सावित्री नदीचे पाणी 365 दिवस वाया जात आहे. यावर कोणतीही दूरगामी योजना करण्यात आली नाही. वाळूचा उपसा आणि त्यातून निर्माण होणारे गँगवॉर सुरु आहे. बेरोजगारीचा प्रश्न आहे आणि रिजनल एम्प्लॉयमेंट एक्ससेंज नोटीफीकेशन ॲक्टची आजही अंमलबजावणी होत नाही. भूमीपूत्रावरील अन्याय तसाच आहे, उद्ध्वस्त गिरणी कामगार त्या उद्ध्वस्त धर्मशाळेत तसाच रहात आहे. रोजगार हमी योजना ही जे अकुशल आहेत, त्यांच्यासाठी आहे. कुशल आणि सुशिक्षित यांच्यासाठी नाही. शिक्षणातील विषमता तशीच आहे. आश्रमशाळा, वसतीगृहे मग ती मागासवर्गीयांची असोत किंवा अन्य कोणाचीही असोत परंतु त्यामधील परिस्थिती तशीच आहे.ग्रामीण भागातील आरोग्याची दूरावस्था तशीच आहे. शेतकऱ्यांचे हाल आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत आणि याबाबतची खंत आजही मनामध्ये आहे. म्हणून येथून जाता-जाता हे सर्व विषय अस्वस्थ करतात.

सभापती महोदय, मी आणखी एक गोष्ट सांगू इच्छितो आणि ते म्हणजे कार्यालय. कधी-कधी भिंतीवरही प्रेम जडते. मातीवरही प्रेम जडते. आपले निर्जिव वस्तूवर अधिक प्रेम जडते आणि आपण कधी यांच्या प्रेमामध्ये पडलो हे कळत देखील नाही. आता याठिकाणी यावयाचे थांबणार आहे. पण या विधीमंडळाचे प्रधान सचिव श्री.अनंत कळसे असतील, सचिव श्री.अ.मा.शिंदेकर असतील, माननीय सभापतींचे कार्यालय, उप सभापतींचे कार्यालय, माननीय मुख्यमंत्र्यांचे कार्यालय, अनेक माननीय मंत्री महोदयांचे कार्यालय, विविध समित्यांचे सचिव, मी अनेक समित्यांमध्ये काम केले. मी युरोपमध्ये, चीन, मलेशियामध्येही जाऊन आलो.त्या दौऱ्यातील अनुभव सन्माननीय सदस्य

. . . .4 एन-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत . . . .

श्री.उल्हास पवार यांनी सांगितले आहेत. खूप मजा आली आणि त्यावेळी माननीय उप सभापती यांची साथ मिळाली. अनेक मित्र लाभले, चिरंतन लाभले ही मोठी जमेची बाब आहे. या सगळयांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करताना ग्रंथालय शाखेला विसरता येणार नाही. पूर्वी ग्रंथालयामध्ये श्री.दि.श्री.चव्हाण काम करीत होते. आणि सध्या तेथे कार्यरत असलेले श्री.बा.बा. वाघमारे हे काम करीत आहेत. पहिले अगदी मितभाषी आणि तरी देखील खूप माहिती देत असत आणि दुसरे भडभडून बोलणारे, काय सांगू आणि काय सांगू नको असे सारखे वाटणारे श्री.वाघमारे अशा या ग्रंथालयावर आमचा फार मोठा जीव आहे. या ग्रंथालयाचे सर्व कर्मचारी, आमचा सर्व स्टाफ, "ह" शाखा असो, प्रश्न शाखा असो, प्रतिवेदक असो, लिफ्टमन असो, शिपाई असो,यांच्याशी कुठे ना कुठे सहज नाते जुळून गेले आहे. या सर्वांप्रती कृतज्ञता व्यक्त करतो. पत्रकार, मिडिया ही प्रभावी माध्यमे आहेत, त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करतो आणि जाता-जाता कै.आचार्य अत्रे यांचे एकच वाक्य सांगू इच्छितो. कै.आचार्य अत्रे यांनी त्यांच्या पुस्तकामध्ये असे लिहीले की, "तुम्ही कदाचित माझ्या मृत्यूनंतर माझी समाधी उभाराल, पण विसरु नका. त्या समाधीखाली दोन महत्वाची वाक्ये लिहिण्यात यावीत की "हा माणूस मूर्ख होता. याने अनंत चुका केल्या. पण हा माणूस कृतघ्न नव्हता." बस, मला एवढेच म्हणावयाचे आहे. साहेब, माणूस म्हणून आम्ही कृतघ्न नव्हतो, कधी चुकून-माकून आमच्याकडून एखादा उणादूणा शब्द गेला असेल आणि त्यामुळे आपल्या, या सदनाच्या भावना दुखावल्या गेल्या असतील तर मी खरेच या सदनापुढे नतमस्तक होतो आणि मी मनापासून या सदनाला अगदी वाकून नमस्कार करतो.होय, हे खरे महामंदिर आहे. पण सर्वांनी या महामंदिरातून काहीतरी चांगले अमृत जनतेला देऊ या. यासाठी तसेच रहा. याठिकाणी परत आलो किंवा नाही आलो तर फरक पडत नाही. त्यासाठी जन्मलो नाही. त्यासाठी उभा राहिलो नाही. माझ या कधी स्वप्नात देखील नव्हते की, मी कधीतरी आमदार होईन. पण माननीय शिवसेना प्रमुखांनी, माननीय श्री.उद्धवजी ठाकरे यांनी मला आमदार केले. त्यांना आयुष्यभर विसरणार नाही, कधी कृतघ्न होणार नाही. एवढीच शपथ घेतो आणि पुन्हा एकदा आपणा सर्वांना अगदी लवून नमस्कार करतो. जय हिंद जय महाराष्ट्र.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखापी नाही

श्री. चंद्रकांत रघुवंशी (धुळे तथा नंदुरबार स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, गेल्या दोन टर्मपासून मी या सभागृहाचा सदस्य म्हणून वावरत आलो आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या माध्यमातून माझ्या राजकीय जीवनाला सुरुवात केली. मला एका गोष्टीचा आनंद आहे की, जेव्हा मी 1992 मध्ये पहिल्यांदा जिल्हा परिषदेची निवडणूक लढलो त्यावेळी आपण महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस समितीचे अध्यक्ष होतात आणि आपल्या आदेशावरुनच जिल्हापरिषदेचा अध्यक्ष व्हायची संधी मला मिळाली होती. आज ज्यावेळी या विधानपरिषदेचा माझा कालखंड संपत आहे त्यावेळीसुध्दा या सभागृहामध्ये आम्हाला आपल्या अध्यक्षतेखाली निरोप दिला जात आहे, ही सुध्दा माझ्यासाठी आनंदाची बाब आहे. खरे म्हणजे मी एका आदिवासी जिल्हयातून आलो आहे. पूर्वी लोक म्हणायचे की, विधानपरिषदेत जाणारा विधानसभेमध्ये जात नाही. कारण जो विधानसभेत जाऊ शकत नाही तो विधानपरिषदेत येतो अशी काही तरी व्याख्या होती. परंतु दुर्दैवाने नंदूरबार जिल्हयातील सर्वच मतदारसंघ राखीव झाले. विधानसभेचे सर्वच मतदारसंघ राखीव झाले. लोकसभेचे मतदारसंघ राखीव झाले, जिल्हा परिषदेचा मतदारसंघ राखीव झाला. या सर्व राखीव मतदारसघामधूनच, धुळे आणि नंदूरबार स्थानिक स्वराज्य संस्थेसारख्या मतदारसंघातून धुळे आणि नंदूरबार जिल्हयातील जनतेने खऱ्या अर्थाने आमच्या कुटुंबाला या ठिकाणी पाठविलेले आहे. श्री. अरविंद सावंतानी सांगितले की, त्यांना राजकीय वारसा नव्हता. पण मला राजकीय वारसा होता. माझे वडीलसुध्दा या सभागृहाचे दोन वेळा सदस्य राहिले आहेत आणि माझ्यामुळे माझ्या वडिलांना कंम्प्लसरी सेवानिवृत्ती घ्यावी लागली. कारण शेवटी मी ज्यावेळी 1992 मध्ये जिल्हापरिषदेचा अध्यक्ष झालो त्यावेळी पाच वर्षाची अध्यक्षपदाची कालमर्यादा होती त्यानंतर युतीच्या राजवटीत ती एक-एक वर्षाची झाली. मी दुसऱ्यांदासुध्दा जिल्हापरिषदेचा अध्यक्ष झालो परंतु जिल्हापरिषदेचा अध्यक्ष असतानाच विधानपरिषदेची निवडणूक लागली आणि सगळया नेत्यांच्या आशीर्वादानेच मी माझ्या वडिलांना स्वत: होऊन सांगितले की, विधानपरिषदेची निवडणूक लढविण्याची माझीच इच्छा होत आहे. राजकीय जीवनामध्ये कोणीही कोणासाठी सेवानिवृत्ती घेत नाही. परंतु माझ्या वडिलांना कम्प्लसरी सेवानिवृत्ती घ्यावी लागली आणि मी याठिकाणी निवडून आलो. मी ज्यावेळी जिल्हापरिषदेचा अध्यक्ष झालो त्यावेळी ती जिल्हापरिषद धर्मभास्करांच्या नावाने गाजलेली जिल्हापरिषद होती. मला आठवते की, मी आणि श्री. सुनील तटकरेसुध्दा त्यावेळी अध्यक्ष होते.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KTG/ SBT/

श्री. चंद्रकांत रघुवंशी...

माझ्या बरोबर खूप लोकांच्या लॉटऱ्या लागल्या होत्या. श्री. सुधाकरराव नाईक यांनी विकास परिषद घेतली आणि मी स्वत:होऊन उभा राहून त्या सभागृहात माझी ओळख करुन दिली की, मी चंद्रकांत रघुवंशी, अध्यक्ष, धुळे जिल्हापरिषद त्यावेळी त्या सभागृहातील सगळे लोक मोठया आतुरतेने माझ्याकडे मागे वळून बघत होते की, हा धर्मभास्करचा उत्तराधिकारी आहे तरी कसा? परंतु एक नक्की की, ती जिल्हापरिषद चालवत असताना त्या जिल्हापरिषदेला लागलेला कलंक पुसण्याचे काम गेली सहा वर्षे मी त्या जिल्हापरिषदेच्या माध्यमातून केले आणि आज या गोष्टीचा आनंद आहे की, त्या जिल्हापरिषदेमध्ये ज्या ज्यावेळी चर्चा होते त्या त्यावेळी माझे नाव निघाल्याशिवाय रहात नाही, या गोष्टीचा आनंद माझ्या मनामध्ये आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या माध्यमातून ज्यावेळी आपण कम करतो त्यावेळी खरोखरच धुळे आणि नंदूरबार जिल्हयातील मतदारांचे सुध्दा आभार मानले पाहिजेत. कारण मला आठवते की, ज्यावेळी माझे वडील दोन वेळा विधानपरिषदेच्या याच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मतदारसंघातून निवडून आले त्यावेळी शंभर टक्के मते मिळून निवडून येणारे ते एकमेव उमेदवार होते. त्यावेळी जेवढे मतदान झाले त्यापैकी शंभर टक्के मते त्यांना मिळाली. एकही मत विरोधी पक्षाच्या उमेदवाराला मिळालेले नव्हते. दुसऱ्यांदा जेव्हा मी या स्थानिक स्वराज्य संस्थेमधून निवडणूक लढविली त्यावेळीही निवडणूक जोरात झाली. उलटपक्षी असेही म्हटले तरी चालेल की,माझ्या वडिलांच्या निवडणुकीचा राहिलेला बॅकलॉग मी भरुन काढला, एवढया जोरात ती निवडणूक झाली. मागच्या निवडणुकीमध्ये मला सुध्दा धुळे आणि नंदूरबार जिल्हयातील सगळया मतदारांनी बिनविरोध या सभागृहामध्ये येण्याची संधी दिली. एकीकडे विधानसभेच्या निवडणुकीची व्याख्या बदलत असताना आज सुध्दा नंदूरबार आणि धुळे या मतदारसंघातून माझे ज्येष्ठ सहकारी आदरणीय अमरिशभाई पटेलसुध्दा बिनविरोध निवडून आलेले आहेत.

यानंतर श्री. बरवड...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखापाठ नाही

श्री. चंद्रकांत रघुवंशी ...

या सभागृहामध्ये काम करीत असताना मला एका गोष्टीचा आनंद आहे. माननीय श्री. भुजबळ साहेबांनी सांगितले ते खरे आहे की, विरोधी पक्षात असताना सदस्य म्हणून काम करताना या सभागृहात जास्त आनंद मिळावयाचा. सत्ताधारी पक्षामध्ये काही बंधने येतात. ज्यावेळी सत्ताधारी म्हणून बंधने येतात त्यावेळी सभागृहातील इतर सदस्यांची मदत घेणे हे सुध्दा आमचे कर्तव्य आहे आणि ज्या ज्या वेळी काही अन्याय होत असेल तो अन्याय थांबविण्यासाठी सत्ताधारी पक्षाचा सदस्य म्हणून माझ्या ज्या मर्यादा असतील त्या मर्यादेमध्ये राहूनच मी इतर सन्माननीय सदस्यांची सुध्दा मदत घेतली. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांनी वेळोवेळी मदत केली हे मान्य करावे लागेल. नंदुरबार नगरपालिकेच्या 144 रोजंदारी कर्मचाऱ्यांना कायम करण्यासाठी मी वेगवेगळ्या माध्यमातून प्रयत्न केले. श्री. सुनील तटकरे हे नगरविकास राज्यमंत्री असताना त्यांनी घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी अधिकारी करीत नव्हते. त्यावेळी मी या सभागृहाचा आधार घेतला. सन्माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख यांच्यासारख्या ज्येष्ठ सन्माननीय सदस्यांनी मला मदत केली. सभापती महोदय, आपल्याला आठवत असेल की, आपल्या दालनामध्ये एक बैठक आयोजित केली होती आणि त्यातून नंदुरबार नगरपालिकेच्या 144 रोजंदारी कर्मचाऱ्यांना मी कायम करु शकलो, याचा मला आनंद आहे. वेळोवेळी सभागृहाच्या माध्यमातून खानदेशचे प्रश्न असतील, खानदेश पॅकेजच्या संदर्भातील विषय असेल, सहकारी माध्यमातून निर्माण झालेल्या उपसा सिंचन योजनेच्या कर्जमाफीचा विषय असेल, त्या त्या प्रश्नाच्या वेळी मी माझ्यापरीने माझी भूमिका सभागृहात मांडण्याचा प्रयत्न केला. मी आदिवासी जिल्ह्याचा असलो तरी आणि बिगर आदिवासी असलो तरी आदिवासी समाजासाठी वेळोवेळी भांडण्याचे काम किंवा माझ्या पक्षाचा प्रमुख म्हणून त्यांच्यावर अन्याय होत असेल तर त्याला वाचा फोडण्याचे काम वेळोवेळी केले. माझी स्वत:ची पूर्वीपासून एकच इच्छा होती आणि ती इच्छा या निवडणुकीमध्ये पूर्ण झाली. मी सुरुवातीला गमतीने पक्षामध्ये सांगत होतो आणि आदिवासी किंवा समाजकल्याणच्या माध्यमातून एक चित्र जनतेसमोर आले की, आदिवासी आमदार निवडून आला की त्यालाच आदिवासी विभागाचे मंत्री करावयाचे किंवा दलित समाजातून निवडून आला की त्यालाच समाजकल्याण खात्याचे मंत्री करावयाचे हे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत रघुवंशी ...

योग्य नाही. खऱ्या अर्थाने जर आदिवासींचा विकास करावयाचा असेल तर बिगर आदिवासी माणसाकडेच ते खाते दिले पाहिजे. ही भूमिका मी वेळोवेळी मांडली आणि आज मला या गोष्टीचा आनंद आहे की आता बिगर आदिवासी माणसाच्या हातामध्ये ते खाते आले आणि पर्यायाने आदिवासी माणसाच्या सर्वांगीण विकासाच्या असलेल्या सर्व योजना सर्व पात्र माणसांपर्यंत पोहोचविण्याचे काम सरकारच्या माध्यमातून आपण सगळे मिळून करू. काही सन्माननीय सदस्य हिशेब चुकता केला असे म्हणत आहे. मी सांगू इच्छितो की, हिशेब माझाही झाला. एकूण राजकीय जीवनामध्ये वाटचाल करताना नफा-तोट्याचा विचार न करता राजकीय जीवनामध्ये किती दिवस राहिलो आणि समाजासाठी काय करु शकलो याचाच विचार मी आजपर्यंत करीत राहिलो. मी माझ्या राजकीय जीवनपामध्ये पक्ष ज्या ज्या वेळी जी जी जबाबदारी देईल ती इमानदारीने पार पडण्याचे काम केले. मला आठवते की, 4 जानेवारी, 1998 ला मी आमदार म्हणून शपथ घेतल्यानंतर माझ्या पक्षाचे आदरणीय नेते श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी सांगितल्याप्रमाणे त्यावेळी अखिल भारतीय काँग्रेसचे अध्यक्षपद आमच्या नेत्या सोनियाजी गांधी यांनी स्वीकारल्यानंतर या महाराष्ट्रामध्ये त्या पहिल्यांदा येणार होत्या आणि त्यांची पहिली सभा कोठे घ्यावयाची असा प्रश्न होता. गांधी परिवाराशी निगडित असेलेले नाते असलेला कोणता जिल्हा असेल तर तो नंदुरबार जिल्हा होता. स्व. इंदिराजी गांधी यांची सुध्दा विराट सभा त्याच जिल्ह्यात झाली. स्व. राजीवजी गांधी यांच्या सुध्दा सभा त्याच जिल्हयात झाल्या. म्हणून आमच्या नेत्यांनी श्रीमती सोनियाजी गांधी यांची पहिली सभा महाराष्ट्रामध्ये कोठे घ्यावयाची यासाठी मला टिळक भवन येथे बोलावले आणि सांगितले की, त्यांची सभा नंदुरबारमध्येच घेणार आहोत. मला एका गोष्टीचा आनंद आहे की, 23 जानेवारी, 1998 ला देशामधील सर्वात मोठी सभा जर कोठे झाली असेल तर ती नंदुरबारमध्ये झाली. त्या सभेचे आयोजन करण्याची संधी आपल्या आशीर्वादाने मला मिळाली. आदिवासी भागामध्ये जन्माला येऊन चांगले काम करण्याचा मी माझ्यापरीने प्रयत्न केला. त्या ठिकाणी बिगर आदिवासी समाजाचे सुध्दा 35 टक्के लोक आहेत. भविष्यामध्ये सुध्दा वेगवेगळ्या माध्यमातून काम करण्याचा प्रयत्न करणार आहे. कारण मी आजही स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये आहे. माझ्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत रघुवंशी ....

शहराची सेवा नगरपालिकेच्या माध्यमातून करणार आहे. त्या जिल्ह्यातील सर्व नगरपालिका किंवा जिल्हा परिषदेच्या निवडणुकीतून मी माझ्यापरीने त्या जिल्ह्यामध्ये माझी वेगळी ओळख निर्माण केली आहे. माझा भविष्यावर विश्वास नाही परंतु एका गोष्टीची जाणीव मी करुन देऊ इच्छितो. जेव्हा माझ्यावर विधान परिषदेच्या प्रतोद पदाची जबाबदारी श्री. हर्षवर्धन पाटील यांनी टाकली त्यावेळी मी सांगितले की, हे हुशार विद्यार्थ्याचे काम आहे.

यानंतर श्री. खंदारे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत रघुवंशी....

हे काम अन्य कोणाला तरी द्यावे. परंतु त्यांनी त्यास नकार दिला. हे काम तुम्हालाच करावे लागेल असे म्हणाले. सन्माननीय श्री.विलासराव देशमुख यांनी थोडा काळ हे काम सांभाळण्यास सांगितले आहे. त्यानुसार मला विधानपरिषदेचा कॉंग्रेस पक्षाचा प्रतोद केले. परंतु ज्यांनी ज्यांनी प्रतोद म्हणून काम केले आहे ते पुन्हा निवडून आलेले नाहीत. मी त्याठिकाणी पक्ष कार्यालयातील श्री.चव्हाण यांना बोलवून सांगितले की, मला येथे खत-याची घंटी दिसत आहे. परंतु मला आत्मविश्वास आहे की, मी पुन्हा या सभागृहात येईन. कधी कधी मनामध्ये शंका असतात, त्यामुळे मी सन्माननीय मंत्री महोदय श्री.हर्षवर्धन पाटील यांना कळविले की, मला या पदातून मुक्त करावे, असे लिहून मी त्या पदाचा राजीनामा दिला. कारण माझी येथे परत येण्याची इच्छा होती. मी राजीनामा दिल्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.जयप्रकाश छाजेड यांना त्या जागी नेमले गेले. त्यांनीही त्या पदावर काम करण्याची इच्छा दर्शविली नाही. त्यामुळे माझा उत्तराधिकारी कोण आहे याचा मी तपास केला. त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांचे नाव ऐकण्यास मिळाले. आपल्या मनामध्ये जी शंका येते ती कधी कधी घर करुन जाते, ती शंका सत्य होते. यावेळी मी 100 टक्के निवडून येण्याची शक्यता असताना माझ्या पक्षाचे माझे सहकारी श्री.अमरीश पटेल यांना संधी मिळाली आहे. श्री.अमरीश पटेल यांनी लोकसभेची निवडणूक लढली, ते त्या निवडणुकीत विजयी झाले असते तर माझा 26/11 झाला नसता. परंतु दुर्दैवाने लोकसभेचा निकाल विचित्र लागला आणि त्यांना आता विधानपरिषदेवर निवडून येण्याची संधी मिळाली. आज मी निवृत्त होत असताना आपले कामच आपले कर्तव्य आहे असे मी मानत आलो आहे. मी ज्या जिल्हयातून येतो त्या जिल्हयात मी माझी वेगळी ओळख निर्माण केली आहे. मी रघुवंशी असल्यामुळे जे बोलतो ते करीत आलो आहे, कधी कधी माणसे बोलतात ते करतील की नाही अशी शंका असते. पण नंदुरबार जिल्हयात कोणत्याही माणसाला विचारावे, मला त्या जिल्हयात नंदुभैय्या असे संबोधले जाते. नंदुभैय्याने करतो असे म्हटले तर ते काम होणार अशी ओळख माझ्या जिल्हयामध्ये निर्माण केली आहे आणि म्हणूनच मी म्हणतो की, "रघुकुल रीत सदा चली आई प्राण जाय पर वचन न जाई" एकदा जे सांगितले ते करणे हे माझे कर्तव्य आहे असे समजणा-यांपैकी मी आहे. मला आठवते की, मी त्यावेळी जानेवारी महिन्यात झालेल्या निवडणुकीनंतर प्रथम सभागृहात आलो

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.चंद्रकांत रघुवंशी....

होतो. मार्च महिन्यातील अर्थसंकल्पीय अधिवेशनातील अर्थसंकल्पावर मी भाषण केले. माझे भाषण संपल्यानंतर तत्कालीन सन्माननीय सभापती श्री.जयंतराव टिळक यांनी मला चिट्ठी पाठविली, त्यात त्यांनी असे लिहिले होते की, आपण पहिल्यांदा सभागृहात बोललात त्याबद्दल मी तुमचे अभिनंदन करतो. ती चिट्ठी मी सांभाळून ठेवली आहे. या सभागृहामध्ये काम करीत असताना मला अनेकांनी संधी दिली. मग तत्कालीन माननीय सभापती प्रा.ना.स.फरांदे असतील, विद्यमान माननीय उपसभापती श्री.वसंतराव डावखरे असतील यांनी मला मदत केली आहे. त्याचप्रमाणे या राज्यामध्ये जेवढे मुख्यमंत्री होऊन त्यांनी देखील मला सहकार्य केले आहे. सभापती महोदय, मी त्यावेळी जिल्हा परिषदेचा अध्यक्ष होतो. विकास परिषद काँग्रेस राजवटीमध्ये होत होती, परंतु युतीच्या काळामध्ये तशी परिषद झाली नव्हती. त्यामुळे मी तत्कालीन मुख्यमंत्री श्री.मनोहर जोशीसरांना भेटून विनंती केली की, आपण जिल्हा परिषदांचे अध्यक्ष काँग्रेसचे आहेत हे मनातून काढून टाकावे आणि स्थानिक स्वराज्य संस्थांची विकास परिषद घ्यावी. त्यानुसार त्यांनी ती विकास परिषद घेतली. त्या विकास परिषदेमध्ये सर्व जिल्हा परिषदेच्यावतीने एक प्रेझेंटेशन सादर करण्याची मला संधी मिळाली. सर्व जिल्हा परिषदांच्या अध्यक्षांची विकास परिषद श्री.मनोहर जोशीसरांसमोर झाली. त्यावेळी मला त्यांनी मला ग्रामीण भागातील लोकप्रतिनिधी किती हुशार असतात आणि तुमच्याबद्दल माझा गैरसमज होता तो सुध्दा आता दूर झाला आहे असे सांगितले. एकूणच राजकीय जीवनामध्ये वावरत असताना विरोधी पक्षाचा सदस्य म्हणून मी काम करीत होतो, त्यामुळे जे गैरसमज होतात ते या माध्यमातून दूर होत असतात. त्यामुळे भविष्यामध्ये राजकीय जीवनामध्ये मला सर्वजण मदत करतील, सहकार्य करतील अशी अपेक्षा आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेचा प्रतिनिधी म्हणून मी वेळोवेळी काम करीत आलो आहे. आजही माझी धर्मपत्नी नंदुरबार शहराची नगराध्यक्षा म्हणून कार्यरत आहे. त्या माध्यमातून तेथील जनतेची सेवा करण्याचा मी माझ्या परीने प्रयत्न करीत आहे. मी पुन्हा एकदा सर्वांचे मन:पूर्वक आभार मानतो आणि वेळोवेळी असेच सहकार्य व प्रेम पुढील काळात मिळावे आणि माझ्या नेतृत्वाने ठरविले तर भविष्यामध्ये मी आपल्यामध्ये पुन्हा येण्याची संधी मला मिळेल अशा अपेक्षांसह सर्वांचा निरोप घेतो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

यानंतर श्री.शिगम

अशुद्धीत पत्र / शोधनेसाठी नाही

श्री. वसंत डावखरे (उपसभापती) : सभापती महोदय, आज आपण या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण, सन्माननीय सदस्य श्री. अशोक मानकर, सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत, सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत रघुवंशी यांना आपण निरोप देत आहोत. मी तर त्यांना निरोप म्हणण्यापेक्षा त्यांना शुभेच्छा देत आहोत असे म्हणेन. आता आपण सर्व सन्माननीय सदस्यांचे विचार या ठिकाणी ऐकले आहेत. प्रत्येक सन्माननीय सदस्यांनी व्यक्त केलेल्या भवना ऐकल्या आहेत. त्यामुळे त्याची पुनरावृत्ती मी करु इच्छित नाही. पण सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी केलेले वक्तव्य, सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी केलेले वक्तव्य आणि शेवटी श्री. चंद्रकांत रघुवंशी यांनी केलेले भाष्य आपण ऐकलेले आहे. या तिघांनीही या सदनाच्या मनामध्ये घर करुन राहातील अशा प्रकारच्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. राजकारणामध्ये असणा-या माणसाचा आशावाद किती दुर्दम्य असतो हे सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत रघुवंशी याचे भाषण ऐकल्यानंतर जाणवले. ते या सभागृहाच्या संदर्भात असे म्हणत असतील की, "तेरी जुल्फों से जुदाई तो नहीं मांगी थी, कैद मांगी थी, रिहाई तो नहीं मांगी थी." सन्माननीय मुख्यमंत्री श्री. अशोक चव्हाण यांनी त्यांच्या भावना समजून घ्याव्यात अशी मी त्यांना विनंती करतो. या ठिकाणी काव्यमय भाषेमध्ये मी खूप बोलू शकेन. परंतु निरोपाचा समारंभ हा फार हृद्य असतो. त्यामुळे मी सन्माननीय सदस्यांना पुनरागमनाच्या सदिच्छा देतो. सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत रघुवंशी यांचा भविष्यावर विश्वास नव्हता. पण आपण भविष्य अनुभवल्याचे येथे कथन केले. मी ज्या शुभेच्छा देतो त्या ख-या होतात कारण माझे नाव डावखरे आहे. मी डावीकडे बसलो असलो तरी आपल्याला उजवा आहे. या सभागृहामध्ये पुनश्च येण्याची संधी आपणास प्राप्त व्होवो आपले पुनरागमन व्होवो अशा प्रकारच्या आपणास शुभेच्छा देतो. धन्यवाद.

..2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : या सदनातील सहा सन्माननीय सहका-यांना निरोप देण्याचा प्रस्ताव सन्माननीय मुख्यमंत्री श्री. अशोक चव्हाण यांनी या सदनामध्ये मांडलेला असून सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी या प्रस्तावाला अनुमोदन दिलेले आहे. या प्रस्तावाच्या अनुषंगाने सदनाच्या दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी निवृत्त होणाऱ्या सन्माननीय सदस्यांच्या कामाबद्दल अत्यंत आपुलकीने आणि आदराने उल्लेख केलेला आहे. या सन्माननीय सदस्यांनी आता पर्यन्त जीवनामध्ये ज्या पध्दतीने काम केलेले आहे त्या कामाचा उल्लेख सर्व सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी केलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण, सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत, सन्माननीय सदस्य श्री. गोपीकिसन बाजोरिया, सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत रघुवंशी, सन्माननीय सदस्य श्री. महादेवराव महाडिक आणि सन्माननीय सदस्य श्री. अशोक मानकर हे निवृत्त होत आहेत. सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांच्या अनुषंगाने मी एवढेच म्हणेन की, शून्यातून जीवनाची सुरुवात करुन, जबरदस्त इच्छाशक्ती असेल तर प्रतिकूल परिस्थितीवर,अनेक संकटावर मात करता येते आणि आपली इच्छा पूर्ण करण्याकरिता, लोकांचे प्रतिनिधित्व करण्याकरिता अनेक ठिकाणी आपण यश खेचून आणू शकतो याचे आगळे वेगळे उदाहरण म्हणजे सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण हे होय. ते मुंबईतील चाळीमध्ये जन्मलेले, सातत्याने प्रतिकूल परिस्थितीवर मात करणारे, ज्यांची वाणी अत्यंत सुसंस्कृत अशी आहे, सुसंस्कृत असे विचार आहेत, सुसंस्कृत असे शिक्षण आहे अशा सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांना गेली सहा वर्षे मी पाहिलेले आहे. सन्माननीय उपमुख्यमंत्री श्री. छगन भुजबळ यांनी सांगितल्या प्रमाणे ते एका चाळीमध्ये वाढले. त्यानंतरच्या काळामध्ये ते मुंबई महानगरपालिकेमध्ये नगरसेवक झाले.

...नंतर श्री. पांडुरंग खर्चे....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखनी नोंद

सभापती .....

मुंबई महानगरपालिकेच्या एका समितीचे ते चेअरमन सुध्दा होते. एक दिवस त्यांची आणि माझी माझ्याच दालनात भेट झाली. मी सहज त्यांना विचारले की, मधुकर चव्हाण साहेब, आपली आई काय करते ? त्यावेळेस त्यांनी सांगितले की, माझी आई एका गिरणीत सफाई कामगार म्हणून काम करते. एका गिरणीत सफाई कामगार म्हणून काम करणाऱ्या मातोश्रीच्या पोटी एवढे तेजपुंज व्यक्तिमत्व घडू शकते ही अभिमानाची बाब असून ते उदाहरण आज या सभागृहात आपण पाहत आहेत. गेल्या सहा वर्शात त्यांनी विशेषत: गृहनिर्माण विभाग म्हणजे म्हाडा या अनुषंगाने अनेक प्रश्न मार्गी लावण्याचे प्रयत्न केले. माझ्या दालनात किमान त्यांनी 50 वेळा बैठका घेतल्या असतील आणि त्याच्या माध्यमातून मुंबईत राहणाऱ्या, मोडकळीस आलेल्या इमारतीत राहणाऱ्या लोकांचे अनेक प्रश्न मार्गी लावण्याचे प्रयत्न केले अशी चिकाटी असणारा हा सदस्य आहे. तसेच एक कसलेला विद्यार्थी नेता, कसलेला जनसंघाचा एक धीरोदात्त कार्यकर्ता नंतरच्या काळात भारतीय जनता पक्षामध्ये गेलेला, एक जबरदस्त इच्छाशक्ती असणारा कर्तृत्वसंपन्न असा कार्यकर्ता अशा विविध भूमिकांमध्ये त्यांनी आपल्या जीवनात यशस्वीपणे वाटचाल केली आहे. मला खात्री आहे की, यापुढील काळात सुध्दा ते त्याच उमेदीने समाजसेवा करतील. त्यांना परमेश्वर उदंड आयुष्य देवो. तसेच यानंतरच्या काळात जरुर ते या सभागृहातही येवोत त्याचबरोबर अत्यंत यशस्वी कार्यकर्ता, सामाजिक कार्यकर्ता, बांधिलकी असणारा कार्यकर्ता म्हणून त्यांना उदंड आयुष्य लाभो अशी अपेक्षा मी व्यक्त करतो.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत, कोकणातील हा कार्यकर्ता, कोकणात जसे फणस आहे, वरुन पाहिले तर भरपूर काटे असतात आणि गोडी पाहिली तर अत्यंत मधूर असे अरविंद सावंत यांचे आचार, विचार व आक्रमकता सुध्दा त्यांच्याकडे आहे. सर्वसामानय माणूस केंद्रबिंदू मानणारा, सर्वासामान्य माणसासाठी राबणारा विशेषकरुन कामगार क्षेत्रात 18-18 तास काम करणारा कार्यकर्ता म्हणजे अरविंद सावंत हे आहेत. तसेच कामगार क्षेत्रातील अनेक बारकावे माहीत असणारा आणि त्यांची मांडणी अत्यंत प्रभावीपणे करणारा हे मांडत असताना ते सोडवून घेणारा हा नेता आहे. हे सर्व करीत असताना कोणाचाही मुलाहिजा न ठेवणारा असे त्यांच्या बाबतीतील माझे समीकरण आहे. या अनुषंगाने शिवसेनेत जवळपास 25 वर्षांपासून

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती .....

ते काम करीत आहेत. सामान्य कुटुंबात जन्मल्यानंतर अनेक दु:खाचे चटके त्यांना सहन करावे लागले म्हणूनच खऱ्या अर्थाने गोरगरीब माणसाचे चटके समजून घेण्याचा आणि त्यांच्या अडचणी सोडविण्याचा ते प्रयत्न करतात. विशेष करुन कामगार क्षेत्रात त्यांनी अत्यंत उल्लेखनीक काम केलेले आहे. या सदनातील उदाहरण देताना प्रामुख्याने ज्या ज्या वेळी सभागृहात प्रश्नोत्तराचा तास सुरु असतो त्या वेळेत हमखास किमान 10 लोकांचे तरी हात वर असतात. अशा प्रकारे अत्यंत अटीतटीचे प्रयत्न करुन उभा राहणारे आणि आपल्या प्रश्नाचा पाठपुरावा शेवटपर्यंत करणारे जेवढे सदस्य या सभागृहात आहेत त्यामध्ये सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांचा समावेश आहे हे मान्य करावे लागेल. यापुढील काळात सुध्दा त्यांना अत्यंत यशस्वी जीवन जगता यावे आणि उदंड यश मिळावे अशी मी प्रार्थना करतो. मला खात्री आहे की, आपण सर्व वेगवेगळ्या पक्षाचे काम करणारे कार्यकर्ते आहोत आणि नकळत आपल्या प्रवासात काही वेळा आणि काही काळ तरी थांबावे लागते. यादृष्टीने काही काळाकरिता आपणाला थांबावे लागेल पण तुमचे जीवन हे अखंड राहील, ते यशस्वी व्हावे अशीच ईश्वराकडे प्रार्थना करतो.

यानंतर श्री जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती ....

माझे तरुण मित्र श्री. चंद्रकांत रघुवंशी यांनाही आपण निरोप देत आहोत. 20 वर्षापूर्वी मी जेव्हा प्रदेश काँग्रेसचा अध्यक्ष होतो त्यावेळी कै. सुधाकरराव नाईक हे मुख्यमंत्री होते. त्या दरम्यानच्या काळात महाराष्ट्रातील संपूर्ण जिल्हा परिषदेच्या निवडणुका झाल्या होत्या. त्यावेळी कमीत कमी चार तरुण मुलांना जिल्हा परिषदेचे अध्यक्ष करण्याचा प्रयत्न करण्याचे ठरवले होते. त्यावेळी महाराष्ट्रात काम करीत असतांना आम्हाला जी काही टवटवीत मुले दिसली, त्यामध्ये श्री. सुनील तटकरे साहेब होते तसेच श्री. चंद्रकांत रघुवंशी हे सुध्दा होते. या व्यतिरिक्त अन्य काही तरण मुलेही आम्हाला दिसली होती. माननीय श्री. सुनील तटकरे यांची तडफ मी गेल्या 25 वर्षापासून पहात आहे. सामान्यातल्या सामान्य कुटुंबात जन्म घेतलेला असतांना रायगड सारख्या जिल्हयाच्या जिल्हापरिषदेचा अध्यक्ष होण्याची संधी त्यांना मिळाली हे फार मोठे भाग्य आहे. रायगड जिल्हयाच्या जिल्हा परिषदेचा अध्यक्ष होणे हे अतिशय अवघड काम होते. मी एवढेच सांगतो की, त्यावेळेस मी जो काही निर्णय घेतला, त्यामुळे माननीय चंद्रकांत रघुवंशी यांना जिल्हा परिषदेचे अध्यक्ष म्हणून काम करण्याची संधी मिळाली. नंतर त्यांना या सभागृहात येण्याची देखील संधी मिळाली. सन्माननीय श्री. सुनील तटकरे जिल्हापरिषदेचे अध्यक्ष असतांना त्यांना कामाची संधी मिळाल्यामुळे ते नेत्यांच्या नजरेत आले. आज ते या राज्याचे अर्थमंत्री झाले.

सन्माननीय सदस्य श्री. गोपीकिशन बाजोरिया हे मितभाषी आहेत. परंतु त्यांची कामाच्या संदर्भात चिकाटी बघितली तर त्यांनी हातात जे काही काम घेतलेले असते ते काम पूर्ण झाल्याशिवाय ते कधीही काम सोडत नाहीत. त्यांचे आणि माझे फार जवळचे वैयक्तिक संबंध आहेत. आज ते या ठिकाणी पुन्हा निवडून आलेले असल्यामुळे त्यांचे आपण येथे अभिनंदन करु या.

सन्माननीय सदस्य श्री. महादेवराव महाडीक हे पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूरचे असून ते महाराष्ट्रातील एक कर्तबगार कार्यकर्ते आहेत. त्यांना तिस-या वेळेस या ठिकाणी येण्याची पुन्हा संधी मिळालेली असल्यामुळे त्यांचेही मी या निमित्ताने अभिनंदन करतो.

सन्माननीय सदस्य श्री. अशोक मानकर यांना एक वर्षाकरिताच संधी मिळाली होती. पुढच्या काळात सुध्दा त्यांना या ठिकाणी येण्याची संधी मिळो, असे शुभ आशीर्वाद मी देतो.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती ....

या सदनात या निमित्ताने एक चर्चा झाली आहे. मी सन्माननीय मुख्यमंत्रीमहोदयांना तसेच सन्माननीय उपमुख्य मंत्री महोदयांना विनंती करतो की, राज्य सभेच्या मतदानामध्ये ज्या पध्दतीने राजकीय पक्षाच्या प्रतिनिधीला मतदान दाखवण्याची जी तरतूद केली आहे तशीच तरतूद विधान परिषदेच्या निवडणुकीमध्ये राजकीय प्रतिनिधींना मतदान दाखवण्याबाबत करणे गरजेचे आहे असे मला वाटते. सन 2005 मध्ये निरोप समारंभाच्या वेळी माननीय श्री. आर.आर.पाटील हे उपमुख्यमंत्री होते त्यावेळेला त्यांनीही अशी विनंती केली होती. विधी मंडळाच्या माध्यमातून देशाच्या गृहमंत्र्यांना राज्यसभेच्या निवडणुकीमध्ये जसे मतदान होते तसेच मतदान विधान परिषदेच्या निवडणुकीत राजकीय पक्षाच्या प्रतिनिधींना दाखवावे, अशी सूचना केली होती. यासंदर्भात आम्ही पाठपुरावा करीत आहोत. सन्माननीय मुख्यमंत्र्यांना तसेच सन्माननीय उपमुख्य मंत्री महोदयांना माझी विनंती आहे की, आपणही याबाबतीत पाठपुरावा करावा.

जर एखादे इलेक्शन काही कोटीं रुपयांचे असेल तर मग सर्वसामान्यांची लोकशाही या देशामध्ये आणि या महाराष्ट्रामध्ये अस्तित्वात राहील की, नाही अशी शंका येण्याची शक्यता आहे. त्यामुळे याबाबतीत आपण प्रयत्न करावा असे मला वाटते.

आज निवृत्त होणा-या सर्व सहकार्यांना सर्वांनी मिळून भावपूर्ण निरोप देऊ या, आणि येणा-या काळात त्यांना जीवनात यश मिळो अशी प्रार्थना करु या.

जय हिंद.

निवृत्त होणा-या सन्माननीय सदस्यांना निरोप देण्याच्या निमित्ताने आता विधानभवनाच्या मुख्य द्वाराच्या पोर्चमध्ये एकत्रित छायाचित्र काढण्याचा व त्या नंतर विधान भवनाच्या प्रांगणात चहापानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला आहे. कृपया सर्वांनी उपस्थित रहावे.

यानंतर श्री. गायकवाड.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती ....

आता 7 वाजून 5 मिनिटे झालेली आहेत. तेव्हा सभागृहाची बैठक आता स्थगित होईल आणि 7 वाजून 30 मिनिटांनी पुन्हा भरेल.

(7.05 ते 7.30 पर्यंत मध्यंतर)

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभागृह स्थगितीनंतर)

सभापतीस्थानी - माननीय उपसभापती

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आता आपण शासकीय विधेयके चर्चेला घेणार होतो. परंतु कामकाज पत्रिकेवर दाखविलेली विधानसभेची विधेयके अजून आपल्याकडे विधानसभेकडून मंजूर होऊन आलेली नाहीत. तेव्हा ती येईपर्यंत आपण 'विशेष उल्लेख' घ्यावेत अशी आमची आपणास विनंती आहे.

उपसभापती : ठीक आहे. आता विशेष उल्लेख घेण्यात येतील.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझी आपणास आणखी एक विनंती राहील की, आपल्याकडे विधानसभेकडून अजून विधेयके आलेली नाहीत. त्यामुळे आता आपण विशेष उल्लेख घेत आहोत. त्यासाठी आपण परवानगी दिली त्याबद्दल आपणास धन्यवाद. तसेच उद्या प्रश्नोत्तरे नसल्याने उद्याचा आमचा कार्यक्रम काय असावा हे आम्ही दिलेले आहे. त्यानंतर नियम 260 चे प्रस्ताव झाल्यानंतर विधेयके घ्यावयाची आहेत. पण आजच्या कार्यक्रम पत्रिकेमध्ये 'अर्धा तास चर्चा' 15 दाखविल्या आहेत. तेव्हा आपण आता विशेष उल्लेख नंतर वेळ असल्यास त्यातील काही किंवा सगळ्या चर्चेला घेतल्यास सभागृहापुढील कामकाज संपू शकेल. पण या अर्धा तास चर्चा घ्यावयाचे म्हटले तर त्यासाठी संबंधित मंत्री महोदय येथे उपस्थित असणे आवश्यक आहे. तरी त्यासाठी आपण संबंधित मंत्र्यांना येथे बोलावून घेतल्यास तेही काम होऊन जाईल.

उपसभापती : ठीक आहे.

.... 4व्ही 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विशेष उल्लेख

पृ.शी. : अवकाळी पाऊस व गारपिटीने बीड जिल्ह्यात 16 व 17 डिसेंबर 2009 या दिवशी ज्वारी,कापूस व तूर या पिकांचे केलेले नुकसान.

मु.शी. : अवकाळी पाऊस व गारपिटीने बीड जिल्ह्यात 16 व 17 डिसेंबर 2009 या दिवशी ज्वारी,कापूस व तूर या पिकांचे केलेले नुकसान याबाबत ॲड.उषा दराडे, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : माननीय सदस्या ॲड.उषा दराडे यांनी विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे, त्यांनी ती मांडावी.

ॲड.उषा दराडे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते. ..

" महाराष्ट्रात दिनांक 16 व 17 डिसेंबर 2009 च्या मध्यरात्री अवकाळी पाऊस आणि गारपीट झाली. बीड मधील अकरा पैकी दहा तालुक्यांत या पावसाची नोंद झाली. बीड जिल्ह्यात दोन लाख सात हजार हेक्टर ज्वारीचा पेरा झालेला आहे. त्यापैकी बरीच ज्वारी जमिनीवर आडवी पडून उद्ध्वस्त झाली आहे. तुरीच्या सगळ्या फुलांचा फुलोरा गळून पडलेला आहे, तसेच कापसाचे देखील फार मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. त्या कापसाला देखील आता भाव मिळू शकत नाही. तेव्हा माझी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून शासनाला अशी विनंती आहे की, ताबडतोबीने सगळे नियम बाजूला ठेवून शेतकऱ्यांना या झालेल्या नुकसानीची भरपाई देण्याच्या दृष्टीने या नुकसानीचे पंचनामे करावेत व अन्य तातडीची कारवाई करावी."

**

... 4व्ही 3 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : राज्य शासनाच्या वतीने दरवर्षी दिल्या जाणाऱ्या शिवछत्रपती पुरस्कारामधून जिमनॅस्टिक क्रीडा प्रकार व क्रीडापटूंना वगळणे.

मु.शी. : राज्य शासनाच्या वतीने दरवर्षी दिल्या जाणाऱ्या शिवछत्रपती पुरस्कारामधून जिमनॅस्टिक क्रीडा प्रकार व क्रीडापटूंना वगळणे. याबाबत श्री.रामनाथ मोते, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे, त्यांनी ती मांडावी.

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो. ..

" राज्य शासनाच्या वतीने दरवर्षी विविध खेळांमधून कौतुकास्पद कामगिरी करणाऱ्या खेळाडूंचा शिवछत्रपती पुरस्कार देऊन गौरव केला जातो. जिमनॅस्टिक हा क्रीडा प्रकार या वर्षी शिवछत्रपती पुरस्काराच्या यादीतून वगळण्यात आलेला आहे. ऑलिंपिक दर्जा नसलेल्या ॲक्रोबॅटिक्स आणि ॲरोबिक्स या खेळांचा या यादीत समावेश करून जिमनॅस्टिकमधील क्रीडापटूंवर अन्याय केला असल्या कारणाने क्रीडा क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी तीव्र नापसंती व्यक्त केली आहे. सभापती महोदय, कलात्मक अशा जिमनॅस्टिक क्रीडा प्रकाराला या पुरस्कारातून वगळल्याबद्दल अनेक जिमखाना प्रतिनिधींनी शासनाचा निषेध केला आहे. जिमनॅस्टिक हा सर्व खेळांचा पाया असून या क्रीडा प्रकाराचा गौरव जगभर केला जातो. जिमनॅस्टिक क्रीडा प्रकाराने राज्य तसेच राष्ट्रीय पातळीवर अनेक गुणी खेळाडू दिले असून या खेळाला शिवछत्रपती पुरस्काराच्या यादीतून वगळणे अन्यायकारक आहे. म्हणून मी आपल्या माध्यमातून या विशेष उल्लेखाद्वारे शासनाला विनंती करतो की, या पूर्वी या क्रीडा प्रकारातील क्रीडा पटूंना ज्याप्रमाणे शिवछत्रपती पुरस्कार दिला जात होता त्याच पद्धतीने जिमनॅस्टिक क्रीडा प्रकाराला या पुरस्काराच्या यादीत स्थान देऊन या प्रकारातील खेळाडूंना पुरस्कार देणे पुन्हा चालू करावे. "

***

.... 4व्ही 4 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : नाशिक जिल्ह्यातील 20-22 गावांमध्ये अचानक गारपीट होऊन शेतकऱ्यांचे 1100 कोटी रूपयांचे झालेले नुकसान.

मु.शी. : नाशिक जिल्ह्यातील 20-22 गावांमध्ये अचानक गारपीट होऊन शेतकऱ्यांचे 1100 कोटी रूपयांचे झालेले नुकसान याबाबत डॉ.वसंत पवार, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : माननीय सदस्य डॉ.वसंत पवार यांनी विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे, त्यांनी ती मांडावी.

डॉ.वसंत पवार (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो. ..

" नाशिक जिल्ह्यातील 20-22 गावांमध्ये अचानक मोठ्या प्रमाणावर गारपीट झाली. एक तर अवकाळी पाऊस झाला आणि दुष्काळात तेरावा महिना यावा अशी परिस्थिती या गारपिटीमुळे शेतकऱ्यांची झालेली आहे. ही गारपीट इतकी जबरदस्त झाली आहे की, त्यात 16 डिसेंबर ते 17 डिसेंबर 2009 या दोन दिवसात निफाड तालुका, नांदूर-मधमेश्वर, दिंडोरी-तास, खेडले-मुंडे, तामसवाडी या गावांमध्ये तसेच वैजापूर तालुका, सिन्नर तालुका आणि सगळा परिसर येथील सगळ्या द्राक्ष बागा उद्ध्वस्त झालेल्या आहेत. बाराशे हेक्टरवरील द्राक्ष बागा, कांदे, डाळिंब, टोमॅटो आणि जो कोवळा ऊस आहे यांचे देखील फार मोठे नुकसान झालेले आहे. त्या नुकसानीचे पंचनामे करण्याचे काम चालू आहे. त्यात सुमारे 1100 कोटी रूपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. तरी सरकारने त्वरित पंचनामे करून सर्व शेतकऱ्यांना, या द्राक्षबागा, कांदे, डाळिंब, टोमॅटो आणि ऊस या पिकांसाठी 25 हजार रूपये एकरी इतकी नुकसान भरपाई द्यावी अशी विनंती मी या विशेष उल्लेखाद्वारा करतो."

***

(यानंतर श्री.सरफरे .... 4डब्ल्यू 1 ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: जळगाव, धुळे जिल्हयात वादळी पाऊस व गारपिटीमुळे शेतीचे झालेले नुकसान

मु.शी.: जळगाव, धुळे जिल्हयात वादळी पाऊस व गारपिटीमुळे शेतीचे झालेले नुकसान याबाबत श्री. दिलीपराव सोनावणे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

उपसभापती : माननीय सदस्य श्री. दिलीपराव सोनावणे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे.त्यांनी ती मांडावी.

श्री. दिलीपराव सोनावणे (नाशिक विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"खानदेशातील जळगाव,, धुळे जिल्हयात दिनांक 17 डिसेंबर 2009 रोजी अचानक इ ालेल्या वादळी पावसामुळे व गारपिटीमुळे शेतकऱ्यांच्या तसेच फलोत्पादकांच्या कांदा, कापूस, दादर, मका, बाजरी, पपई, लिंबू, डाळींब, द्राक्ष, केळी इत्यादी पिकांचे अतोनात नुकसान झाले. शेतकऱ्यांची संपूर्ण पिके भुईसपाट होऊन पूर्णपणे नष्ट झाली. यापूर्वी खरीप हंगामाचे अत्यल्प पावसामुळे तसेच अवेळी वादळी पावसामुळे कोटयवधी रुपयांचे नुकसान झाले आहे. नोव्हेंबरच्या मध्यान्हात झालेल्या अवेळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या हातातील संपूर्ण पिके नष्ट झाली आहेत. त्यातून बाहेर येत नाही, तोपर्यंत रब्बी हंगामातील सर्वच पिके गारपिटीमुळे तसेच वादळी पावसामुळे नष्ट इ ाली. शेतकऱ्यांच्या हाती उत्पादन खर्चही लागणार नाही. अशी भयावह स्थिती निर्माण झाली आहे. वर्षभरातून आलेल्या या नैसर्गिक आपत्तींमुळे शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे व भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या शेतकऱ्यांवर ओढवलेल्या आपत्तीबाबत मी विशेष उल्लेखाच्या सूचनेव्दारे शासनाचे लक्ष वेधत आहे."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: भिवंडी येथील दंगलीमध्ये मृत पावलेल्या पोलिसांच्या वारसांना आर्थिक मदत करणे

मु.शी.: भिवंडी येथील दंगलीमध्ये मृत पावलेल्या पोलिसांच्या वारसांना आर्थिक मदत करणे याबाबत श्री. अरविंद सावंत, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

उपसभापती : माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे.त्यांनी ती मांडावी.

श्री. अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, 26/11 च्या हल्ल्यातील क्रूरकर्मा अतिरेकी अजमल कसाबच्या सुरक्षिततेसाठी राज्य शासनाने 31 कोटी रुपये खर्च केले. भिवंडी येथे पोलीस ठाणे बांधण्यासाठी आपण आपला स्थानिक विकास निधी दिला होता. दुर्दैवाने ते पोलीस ठाणे अजून उभे राहिले नाही.

(सभापतीस्थानी तालिका सभापती डॉ.वसंत पवार)

परंतु त्याचबरोबर त्याठिकाणी हवालदार श्री. गांगुर्डे आणि श्री. जगताप या दोन पोलिसांची हत्या दंगलखोरांनी केली. त्या दोन्ही पोलिसांच्या वारसांना आजतागायत कोणतीही आर्थिक मदत मिळाली नाही. म्हणून आपल्या मार्फत माझी माननीय मंत्रिमहोदयांना विनंती आहे की, श्री. गांगुर्डे व श्री. जगताप या दोन हवालदारांच्या कुटुंबियांना शासनाने मदत करावी. त्याचप्रमाणे ज्या दंगलखोरांनी त्यांच्यावर हल्ला केला त्यांच्यावर शासनाने अजूनपर्यंत कोणतीही कारवाई केली नाही. म्हणून त्या दंगलखोरांवर शासनाकडे कारवाई करावी अशी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून विनंती करतो. त्याचबरोबर श्री. गांगुर्डे व श्री.जगताप यांच्या कुटुंबियांना लवकरात लवकर आर्थिक मदत करावी.

श्री.आर.आर.पाटील (गृहमंत्री) : सभापती महोदय, मी या प्रकरणी स्वत: परवाच्या दिवशी लक्ष घालून याबाबतीत मदत द्यावयाची राहिली असेल तर ती तातडीने दिली जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा केंद्रावर अखंडीत विद्युत पुरवठा सुरु करणे

मु.शी.: उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा केंद्रावर अखंडीत विद्युत पुरवठा सुरु करणे याबाबत श्री. केशवराव मानकर,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

तालिका सभापती : माननीय सदस्य श्री.केशवराव मानकर यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे.त्यांनी ती मांडावी.

श्री. केशवराव मानकर (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"सभापती महोदय, माननीय उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार मार्च 2010 पासून माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेच्या कालावधीत परीक्षा केंद्रावर अखंडीत विद्युत पुरवठा सुरु राहण्यासाठी परीक्षा केंद्राच्या सर्व वर्ग खोल्यांमध्ये विद्युत जोडणी, पंखे, दिवे यांची सुविधा आवश्यक असून पुरेशा क्षमतेचे जनरेटर संच सर्व परीक्षा केंद्रावर उपलब्ध असणे अनिवार्य केले असल्याचे माननीय विभागीय सचिव, नागपूर विभागीय मंडळ, नागपूर यांच्या पत्र क्र.नाविम/गोसंकेंद्र/1793, दि.25.09.2009 अन्वये सर्व परीक्षा केंद्रांना सूचित करणे, त्याचप्रमाणे सदर पत्रात जनरेटर संच उपलब्ध होत नसल्यास माननीय उच्च न्यायालयाच्या निर्णयाचा अवमान होत असल्याने परीक्षा केंद्र बंद करण्यात येईल आणि नजिकच्या सुविधायुक्त केंद्रावर जोडण्यात येईल असेही नमूद असणे, परंतु शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये जनरेटर संचाची सुविधा उपलब्ध केल्यास त्याला लागणारा खर्च जसे केरोसिन, पेट्रोल, आदींवर होणारा खर्च हा शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनाच सोसावा लागेल असे शासनाचे निर्देश असणे, परंतु सन 2004 पासून शाळा महाविद्यालयांना देण्यात येणारे अनुदान बंद केल्यामुळे सदर पर्यायी व्यवस्थेवर होणारा खर्च परवडण्यासारखा नसणे, त्यामुळे सर्वच परिक्षा केंद्रावरुन या संबंधी तक्रारी प्राप्त होणे,...

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर . . . .

काही परीक्षा केंद्रांनी जनरेटर संच खरेदी करु अशा प्रकारची संदिग्ध माहिती पाठविल्यामुळे त्या परीक्षा केंद्रावर जनरेटरच्या अभावी विद्यार्थ्यांना पेपर सोडविण्याकरिता अडचण निर्माण होऊन त्यांच्या गुणवत्तेवर विपरीत परिणाम झाले आहेत. परीक्षा केंद्रावर परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेता परीक्षा काळात जनरेटर संच आणि तो चालविण्यासाठी लागणारा खर्च शासनाने करावा तसेच लोडशेडींगच्या कालावधीमध्ये परीक्षा असते. तशी ती घेण्यात येऊ नये. जेणेकरुन पर्यायी व्यवस्था होऊ शकेल. तसेच जर शासन यासंबंधात खर्च करु शकत नसेल तर परीक्षेच्या फी मध्ये फक्त 5 रुपये वाढ करुन हा खर्च करावा अशी मी शासनाला या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून विनंती करतो.शासनाने यावर तातडीने करावयाची उपाययोजना, शासनाची कार्यवाही व प्रतिक्रिया."
धन्यवाद.

---

4 एक्स-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: म्हाडाच्या जुन्या निवृत्त कर्मचाऱ्यांना निवृत्ती वेतन योजना लागू नसणे.

मु.शी.: म्हाडाच्या जुन्या निवृत्त कर्मचाऱ्यांना निवृत्ती योजना लागू नसणे याबाबत श्री.दिवाकर रावते वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती (डॉ.वसंत पवार) : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.दिवाकर रावते (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"म्हाडाचे जुने निवृत्त कर्मचारी हे निवृत्ती वेतन योजना लागू नसल्याने त्यापासून वंचित आहे. त्या प्रश्नावर अनेक वर्षापासून शासन पातळीवर चर्चा सुरु असून सन 1999 मध्ये ता.प्र.क्र.78394 या प्रश्नावर सभागृहात तत्कालीन गृहनिर्माण मंत्री श्री.सुरेश जैन यांनी या सर्व जुन्या निवृत्त कर्मचाऱ्यांना (ज्यांचे आजमितीस वय 70-80 च्या घरात असेल) शासनाने निवृत्ती वेतन देण्यास तत्वत: मान्यता देण्यात आली आहे. येत्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय घेऊन त्यास मान्यता देण्यात येईल अशा प्रकारचे आश्वासन दिले होते. युती शासन गेल्यानंतर प्रचलित शासनाने याबाबत उदासिनता दाखविली. या प्रश्नाचा मी सतत आणि सातत्याने पाठपुरावा करीत आहे. मार्च 2008 मध्ये आश्वासन समितीचे तत्कालीन अध्यक्ष श्री.किसनराव कथोरे यांनी या संदर्भात साक्षी पुरावे घेऊन हा प्रश्न त्वरित मार्गी लावण्याचे निदेशही दिले होते. आश्वासन समिती पुढे प्रधान सचिव, गृहनिर्माण व उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी, प्राधिकरण यांनी शासनाकडे तसा ठराव करण्याचे ठरविले. तो ठराव करुन पाठविलाही. प्राधिकरणाने ठराव क्र.06290 दिनांक13-5-2008 अन्वये म्हाडा कर्मचाऱ्यांना निवृत्ती वेतन लागू करण्याचा ठराव केला. त्याव्दारे प्राधिकरणाने निवृत्ती योजना वर्धनक्षम करण्याकरिता येणाऱ्या अतिरिक्त रु.56.92 कोटीच्या खर्चाची तरतूद करण्यास मंजूरी दिली. तत्कालीन अर्थमंत्री श्री.जयंत पाटील आणि त्यानंतर आलेले तत्कालीन अर्थमंत्री श्री.दिलीप वळसे-पाटील यांच्याही दालनात मी स्वत: व त्यांचे संघटनेचे प्रतिनिधी संबंधित अर्थखाते आणि गृहनिर्माण विभागाचे अधिकारी यांची एकत्रित बैठक झाली. या

. . . .4 एक्स-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निवृत्ती वेतनाचा कोणताही भार हा शासनाच्या तिजोरीवर येणार नसून तो महाराष्ट्र गृहनिर्माणच सोसणार आहे. अशा प्रकारे निदर्शनास आणले होते. मृत्यूच्या छायेत शेवटची घटका मोजणारे हे निवृत्त कर्मचारी थकबाकीसहित निवृत्ती वेतनांच्या प्रतिक्षेत आहेत. मरेनात का एकदाचे ! या ढिंम्म भावनेने निवृत्ती वेतनाचा प्रश्न कायम निकालात काढण्याच्या प्रवृत्तीने सरकारी अधिकारी निर्णय ठप्प करीत आहेत. सर्वच आयुध वापरुन झाल्यानंतर पुन्हा एकदा विशेष उल्लेखांचे आयुध वापरण्याची माझ्यावर पाळी आली आहे. दगडाला पाझर फुटतो ! या अधिकाऱ्यांच्या काळजाला पाझर का फुटत नाही ! म्हणून आपल्या माध्यमातून नवीन शासनाने त्वरित निर्णय घ्यावा अशी मी विनंती करतो. धन्यवाद.

. . . .4 एक्स-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती : यानंतर सन्माननीय सदस्य श्री.शिवाजीराव पाटील यांची विशेष उल्लेखाची सूचना आहे. परंतु ते गैरहजर आहेत.

आता विशेष उल्लेख संपलेले असून, यानंतर नियम 260 अन्वये प्रस्तावावरील चर्चा सुरु होईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, याठिकाणी गृह विभागाशी संबंधित दोन अर्ध्या तासाच्या चर्चा आहेत. याठिकाणी सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी अर्धा तासाची चर्चा दिलेली असून त्या येथे उपस्थित आहेत आणि त्याला उत्तर देण्यासाठी माननीय गृह मंत्री श्री.आर.आर.पाटील देखील उपस्थित आहेत. त्यामुळे आपण या दोन अर्ध्या तासाच्या चर्चेसाठी परवानगी द्यावी.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील आणि इतर सन्माननीय सदस्यांनी नियम 260 अन्वये शिक्षणाच्या संदर्भात जो प्रस्ताव दिलेला आहे, त्यावरील चर्चा संपल्यानंतर लगेच अर्ध्या तासाची चर्चा घेऊ.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझे म्हणणे समजून घ्यावे. याठिकाणी माननीय गृह मंत्री श्री.आर.आर.पाटील उपस्थित आहेत. तसेच दोन्ही अर्ध्या तासाच्या संबंधातील चर्चा 10-15 मिनिटांमध्ये संपेल, यानंतर आपण शिक्षणाच्या विषयावरील चर्चा सुरु करु एवढीच विनंती आहे.

श्री.कपिल पाटील (खाली बसून) : सभापती महोदय, नियम 260 अन्वये जो प्रस्ताव दिलेला आहे, त्यावरील चर्चा अगोदर घेण्यात यावी. या विषयाशी संबंधित असलेले माननीय मंत्री महोदय कालपासून येथे उपस्थित आहेत.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, जर विधेयकावरील चर्चा घ्यावयाची असती तर त्यासाठी एक-दीड तास लागलाच असता.

तालिका सभापती : माननीय सभापती महोदयांनी जो निर्णय दिलेला आहे, त्यानुसार कामकाज होणार आहे. आता सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील आणि इतर सन्माननीय सदस्यांनी शिक्षणाच्या संदर्भात नियम 260 अन्वये जो प्रस्ताव दिला आहे, त्यावर सन्माननीय सदस्य पाच-पाच मिनिट भाषण करतील आणि ही चर्चा अर्ध्या तासामध्ये संपेल.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय,माझा देखील विशेष उल्लेख आहे.

. . . .4 एक्स-5

तालिका सभापती : माझ्याकडे सन्माननीय सदस्यांचा विशेष उल्लेख आलेला नाही. सन्माननीय सदस्य श्री.शिवाजीराव पाटील यांचा विशेष उल्लेख आलेला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, ते चुकून झाले असेल.

तालिका सभापती : ते चुकून झालेले नाही. सन्माननीय सदस्यांची विशेष उल्लेखाची सूचना उद्या सदनापुढे येईल.

यानंतर कु.थोरात . . .

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: शिक्षण संस्थांसाठी करण्यात आलेली अपुऱ्या निधीची तरतूद

मु.शी.: शिक्षण संस्थांसाठी करण्यात आलेली अपुऱ्या निधीची तरतूद या विषयावर श्री. कपिल पाटील, ॲड. गुरुनाथ कुलकर्णी सर्वश्री शिवाजीराव पाटील, दिलीपराव सोनवणे, जयंत प्र.पाटील,अरविंद सावंत, वसंतराव खोटरे, व्ही.यू. डायगव्हाणे, विक्रम काळे, उल्हास पवार, प्रा. बी.टी. देशमुख, डॉ.दीपक सावंत व इतर यांचा प्रस्ताव

(प्रस्ताव पुन्हा पुस्तुत झाला)

श्री. संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सन्माननीय कपिल पाटील आणि अन्य सदस्यांनी नियम 260 अन्वये शिक्षणावरील जो प्रस्ताव मांडलेला आहे त्याला पाठिंबा व्यक्त करण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, काल मी या प्रस्तावाच्या संदर्भात अनेक मुद्दे मांडलेले आहत. आज मी या निमित्ताने चार-पाच मुद्दे मांडणार आहे. सभापती महोदय, हे महाराष्ट्राचे सुवर्ण महोत्सवी वर्ष आहे आणि सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये शिक्षणाच्या संदर्भात एक श्वेतपत्रिका जाहीर करणे आवश्यक आहे. शासनाने शिक्षणाच्या बाबतीत एक श्वेतपत्रिका जाहीर करावी अशी मी या ठिकाणी मागणी करतो. जे शैक्षणिक धोरण या महाराष्ट्राला प्रगतीकडे नेईल अशा प्रकारचे शैक्षणिक धोरण शासनाने तातडीने जाहीर करावे, अशा प्रकारची मी या ठिकाणी मागणी करतो. तसेच या सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये शासन सांस्कृतिक धोरण जाहीर करणार आहे. क्रीडा धोरण जाहीर करणार आहे. त्याप्रमाणे शैक्षणिक धोरण देखील अत्यंत महत्वाचे आहे. म्हणून यासंबंधीची श्वेतपत्रिका जाहीर केली पाहिजे, अशा प्रकारची मी या निमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदय, या महाराष्ट्रामध्ये अनेक शिक्षण संस्था आहेत. एक काळ असा होता की, एक मिशन म्हणून शिक्षणसंस्था सुरु केल्या जात होत्या. ग्रामीण भागामध्ये देखील लोकांच्या माध्यमातून शिक्षण संस्था सुरु होत होत्या. आज या शिक्षण संस्थांचे वेतनेत्तर अनुदान बंद केल्यामुळे या शिक्षण संस्थांची परिस्थिती अत्यंत हलाखीची आहे. ग्रामीण भागातील मुलांना शिक्षण मिळाले पाहिजे अशा प्रकारच्या एका विशिष्ट प्रेरणेने आपले सोने-नाणे सगळे गहाण टाकून एक मिशन म्हणून या शिक्षण संस्था सुरु केल्या. परंतु या संस्था आता अत्यंत अडचणीत आलेल्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KGS/ MMP/

श्री. संजय केळकर...

आहेत तेव्हा या शिक्षण संस्थांच्या बाबतीत शासनाने ठोस अशा प्रकारचे काम करण्याची आवश्यकता आहे, असे मला वाटते. वेतनेत्तर अनुदान, त्यासंबंधीचे धोरण, त्यासंबंधीची बैठक हे ततडीने जाहीर केले पाहिजे, अशा प्रकारची मी याठिकाणी मागणी करतो.

सभापती महोदय, शिक्षणाच्या दर्जासंबंधी देखील याठिकाणी चिंता व्यक्त करण्याची गरज आहे. शिक्षणाच्या बाबतीत खूप मोठया प्रमाणात विषमता आहे. काही भागामध्ये, काही शाळांमध्ये शिक्षणाचा दर्जा अतिशय चांगला आहे. ज्या ठिकाणच्या शाळांमध्ये गरिबांची मुले जातात मग त्या महापालिकेच्या शाळा असतील, जिल्हापरिषदेच्या शाळा असतील, ग्रामीण भागातील शाळा असतील या शाळांचा शैक्षणिक दर्जा उंचावण्याची गरज आहे. अन्यथा या ठिकाणच्या शाळा ओस पडत आहेत. महापालिकांच्या शाळातील अनेक वर्ग बंद पडत आहेत. अनेक पालक त्या शाळांमधील आपल्या पाल्याचे नाव काढून घेत आहेत. याचे कारण असे की, त्या शाळामंधील शिक्षणाचा दर्जा अत्यंत खालावलेला आहे तो उंचावण्याची गरज आहे. त्यासंबंधात शासनाने ठोस अशा प्रकारची कार्यवाही करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, केंद्र सरकारने मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाच्या संदर्भातील विधेयक लोकसभेमध्ये आणि राज्यसभेमध्ये पारित केलेले आहे. राज्यशासन म्हणून या विधेयकाच्या बाबतीत या शासनाचे काय धोरण असणार आहे, काय भूमिका असणार आहे? सक्तीचे आणि मोफत शिक्षण प्रत्येक राज्याला लागू करण्यात आलेले आहे. या मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाची महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना अत्यावश्यकता आहे. तेव्हा शासनाने याबाबतची आपली भूमिका याठिकाणी स्पष्ट करावी, अशा प्रकारची मी या निमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदय, मराठी सक्तीची करण्यात यावी, अशा प्रकारची मागणी प्रत्येक अधिवेशनात करण्यात येते. परंतु प्रत्यक्षात सी.बी.एस.सी. आणि अन्य शाळांमध्ये मराठी हा विषय सक्तीचा करण्यात आलेला नाही. 'वंदेमातरम्' हे देखील सक्तीचे करण्यात आलेले नाही. या शाळांमध्ये 26 जानेवारी किंवा 15 ऑगस्ट हे सण देखील साजरे केले जात नाहीत. सभापती महोदय, 15 ऑगस्ट रोजी या देशाला स्वातंत्र्य मिळाले, त्यासाठी या देशातील अनेक लोकांनी आपले बलिदान केलेले आहे. म्हणून 15 ऑगस्ट, 26 जानेवारी हे राष्ट्रीय सण सक्तीचे केले पाहिजेत.

यानंतर श्री. बरवड...

अशुद्धीत प्रत / मुद्रणेपूर्वी नाही

श्री. संजय केळकर ....

मराठी सक्तीची केली पाहिजे. अशा प्रकारची भूमिका शासनाने या ठिकाणी मांडली पाहिजे. त्यादृष्टीने देखील मी या ठिकाणी मागणी करीत आहे.

सभापती महोदय, शिक्षकांच्या संबंधामध्ये अनेक प्रकारचे प्रश्न आहेत. सगळे प्रश्न मी मांडणार नाही पण निदान त्यांचे पगार तरी वेळेवर झाले पाहिजेत. त्याचे पगार कालबध्द वेळेमध्ये झाले नाहीत तर ते शिक्षक अतिशय अडचणीमध्ये येतात. मी शिक्षकाच्या कुटुंबातून आलेलो असल्यामुळे मला त्याची माहिती आहे. शिक्षकाचे पगार वेळेवर झाले नाहीत तर त्यांचे कुटुंब कशा प्रकारे अडचणीत येते हे मला माहीत आहे. अनेक वेळा शिक्षकांचे पगार वेळेवर होत नाहीत. ते वेळेवर होण्याच्या दृष्टीने धोरणात्मक निर्णय माननीय शिक्षण मंत्र्यांनी जाहीर करावयास पाहिजे. एक तर त्यांचे वेतन वेळेवर मिळत नाही आणि दुसरीकडे त्यांच्यावर निवडणुकीची कामे लादली जातात. शिक्षकांच्या डोक्यावर 18 प्रकारची कामे लादली जातात. त्याचा परिणाम विद्यार्थ्यांवर होतो, शिक्षणावर होतो आणि शिक्षकांवरही होतो. कोणत्या मर्यादेपर्यंत त्यांच्यावर कामे लादता येतील, त्यांनी नेमकी कोणती कामे करावयास पाहिजे हे देखील या ठिकाणी सांगितले पाहिजे. विद्यार्थ्यांना बाबतीत सुध्दा प्रश्न आहेत. त्यांना वेळेवर पाठ्य पुस्तके मिळत नाहीत. याबाबत अनेक वेळा अधिवेशनांमध्ये आवाज उठविला की, शैक्षणिक सत्र सुरु झाल्यानंतर देखील दोन ते चार महिने त्यांना पाठ्यपुस्तके मिळत नाहीत. ती पाठ्यपुस्तके त्यांना वेळेवर मिळाली पाहिजेत. विद्यार्थ्यांचे सिलॅबल सगळीकडे समान असले पाहिजे. इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचे सिलॅबस केंद्रीय विद्यार्थ्यांना वेगळे असते आणि राज्य सरकारच्या विद्यार्थ्यांना वेगळे असते. अशा प्रकारची जी विषमता आहे ती दूर करण्याची गरज आहे. या सगळ्या बाबतीत शासनाने उदासीनता दाखवलेली आहे. कोकणामध्ये शालांत परीक्षा मंडळ सुरु करण्याच्या बाबतीत गेली चार वर्षे केवळ घोषणा केली जाते. परंतु आजही त्या ठिकाणी शालांत परीक्ष मंडळ सुरु झालेले नाही. रत्नागिरी येथे जागा असल्याचे सांगितले जाते परंतु त्याबाबतीत जी.आर. काढलेला नाही. माझी अशी मागणी आहे की, आज या चर्चेच्या अनुषंगाने माननीय शिक्षण मंत्र्यांनी हे जाहीर करावे की, यावेळी तरी जी.आर. काढला जाईल आणि कोकणामध्ये शालांत परीक्षा मंडळाची सुरुवात होईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर .....

सभापती महोदय, या महाराष्ट्रामध्ये माननीय श्री. मधुकरराव चौधरी शिक्षण मंत्री असताना 1967 मध्ये महाराष्ट्रात 4 ठिकाणी शाळा सुरु केल्या होत्या. या चार शाळा अशा होत्या की, ग्रामीण भागातील जे गरीब विद्यार्थी असतील, हुशार असतील त्यांची प्रवेश परीक्षा घेऊन त्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास करण्याच्या दृष्टीने शासकीय विद्यानिकेतन नावाच्या, ज्याला आपण गव्हर्नमेंट पब्लिक स्कूल म्हणतो अशा 4 शाळा सुरु केल्या. या शाळेतील विद्यार्थी म्हणून मी सुध्दा बाहेर पडलेलो आहे. धुळे, चिखलदरा, औरंगाबाद, नाशिक, सातारा इत्यादी ठिकाणी या शाळा सुरु केल्या. या शाळांचा निकालही चांगला होता. त्या शाळेतील विद्यार्थ्यांचा गेल्या 25 वर्षाचा आलेख पाहिला तर हे विद्यार्थी महाराष्ट्रामध्ये आणि महाराष्ट्राच्या बाहेर निरनिराळ्या खात्यांमध्ये मोठ्या पदांवर काम करीत आहेत. आजही आम्ही विद्यार्थी जेव्हा एकत्र जमतो तेव्हा पिवळ्या दिव्याच्या गाडीतून, लाल दिव्याच्या गाडीतून आमचे विद्यार्थी येत असतात. अशा प्रकारे ग्रामीण भागातील हुशार विद्यार्थ्यांकरिता या शाळांची निर्मिती केली परंतु या शाळांची अवस्था अतिशय वाईट आहे. श्री. वसंत पुरके शिक्षण मंत्री असताना ज्यावेळी मी पहिल्यांदा या सभागृहात आमदार म्हणून आलो त्यावेळी मी मागणी केली होती की, या शाळा जर चांगल्या केल्या तर शेकडो विद्यार्थी उद्याचा महाराष्ट्र घडविण्याकरिता निश्चितपणे उपयोगी पडणार आहेत. मी या निमित्ताने मागणी करतो की, या शाळांचा दर्जा सुधारण्याकरिता ठोस अशा प्रकारची कार्यवाही करावयास पाहिजे. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MMP/

श्री. दिलीपराव सोनावणे (नाशिक विभाग शिक्षक) : सभापती महोदय, नियम 260 अन्वये सभागृहासमोर चर्चेला असलेल्या प्रस्तावाच्या निमित्ताने मी शिक्षणाच्या महत्वाच्या समस्या आणि स्थिती यावर माझे विचार मांडण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्राच्या शैक्षणिक कार्यामध्ये शैक्षणिक संस्था आणि त्यांचा सहभाग आहे आणि त्यांच्या सहभागातून आज ग्रामीण भागापर्यंत शिक्षणाची व्यवस्था पोहोचविण्याचे काम झालेले आहे. प्राथमिक शिक्षण, माध्यमिक शिक्षण, उच्च माध्यमिक शिक्षणापासून तर उच्च शिक्षणापर्यंत तसेच वैद्यकीय शिक्षणापर्यंत सुध्दा या संस्था काम करीत असतात. शैक्षणिक क्षेत्रामध्ये या शैक्षणिक संस्थाचा सहभाग अतिशय चांगल्या पध्दतीने आहे परंतु सन 2004 पासून त्या ठिकाणी वेतनेतर अनुदान नसल्यामुळे शैक्षणिक प्रगती थांबलेली आहे. शैक्षणिक सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी, शैक्षणिक साहित्य, प्रयोग साहित्य, क्रीडा साहित्य तसेच गुणवत्ता वाढीसाठी असलेल्या उपक्रमांसाठी लागणारे साहित्य असेल त्यासाठी अनुदानाची गरज असते.

यानंतर श्री. खंदारे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीपराव सोनवणे....

परंतु हे वेतनेतर अनुदान बंद झालेले आहे, माझी विनंती आहे की हे वेतनेतर अनुदान त्वरित सुरु झाले पाहिजे. शिक्षण संस्थांना संपूर्ण सवलती दिल्या पाहिजेत. या सवलती नसल्यामुळे आज ग्रामीण भागातील शिक्षणाची पूर्णपणे वाट लागलेली आहे. सध्या विना अनुदान, कायम विना अनुदान हे जे पीक आलेले आहे त्यामुळे वाईट परिणाम झालेला आहे. माझी शासनाला विनंती आहे की, अनुदानाशिवाय शाळा चालविण्याचे धोरणच बंद केले पाहिजे. अनुदान तत्वावर शाळा, विना अनुदान तत्वावर शाळा, कायम विना अनुदान तत्वावर खाजगी शाळा दिल्या पाहिजेत. शासनाने अनावश्यक असलेल्या शाळा बंद कराव्या आणि आवश्यक असलेल्या शाळा अनुदानितच तत्वावर दिल्या पाहिजे. त्यासाठी संपूर्ण राज्यातील मास्टर प्लॅन तयार केला गेला पाहिजे. ग्रामीण भागातील स्थिती अत्यंत दयनीय व गंभीर स्वरुपाची झाली आहे. कोठे तरी शिक्षण संस्थेच्या माध्यमातून काम करीत असताना शिक्षण सेवक नेमला जातो. त्याठिकाणी शिक्षण सेवक नाही तर शिक्षकच भरला गेला पाहिजे. आजच्या घडीला शिक्षण सेवकाचे जे मानधन आहे त्यात वाढ अपेक्षित आहे ती देखील दिली गेली नाही, ती वाढ करुन शिक्षकच भरले गेले पाहिजेत. मुख्याध्यापक व शिक्षकांच्या नेमणुका गुणवत्तेच्या आधारावर झाल्या पाहिजेत. आज सांगताना अतिशय वाईट वाटत आहे, संस्था चालकांकडून मुख्याध्यापकांची अडवणूक होत असते. वेतन निश्चितीसंबंधी अडवणूक होते, मुख्याध्यापकांवर दबाव असतो, सेवा पुस्तक संस्था चालकांच्या ताब्यात जात असतात. त्या संदर्भात शिक्षणाधिकाऱ्यांची सही पुरेशी असू शकेल आणि ते जर नाही केले तर त्याची मानसिकता बिघडते आणि गुणवत्ता वाढीवर त्याचा परिणाम होतो. म्हणून या अधिकाराच्या संदर्भात संस्था चालकांवर काही तरी बंधने आणणे आवश्यक आहे. संस्था चालकांकडे असलेल्या अमर्याद अधिकारांवर बंधन आणले पाहिजे. त्यासंबंधी विचार होणे आवश्यक आहे. शिक्षकांना पुरस्कार, पदोन्नती, संशोधन करण्यासाठी प्रोत्साहन दिले पाहिजे. याठिकाणी अतिशय खेदाने नमूद करावेसे वाटते की, या गोष्टींचा विचार न करता शिक्षकांना शिक्षणेतर कामे दिली जाते त्यामुळे निश्चितपणे गुणवत्ता वाढीवर परिणाम होतो. त्यांना दुस-याच कामासाठी वापरले जाते. त्यांना मूळ कामापासून दूर नेले जाते. खऱ्या अर्थाने शिक्षण क्षेत्रात बदल केला

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ KGS/

श्री.दिलीपराव सोनवणे....

पाहिजे. शिक्षण निरीक्षकासंबंधी आज जे चालले आहे ते पाहता कोणत्याही प्रकारचे निरीक्षण होत नाही असे दिसते. वर्षभरामध्ये, पाच वर्षे कोणत्याही प्रकारच्या नोंदी नसतात. ज्या पध्दतीने ते वार्षिक तपासणी करण्यासाठी येतात ते पाहता हे अधिकारी वसुली अधिकारी म्हणून येतात. त्यांच्यावर देखील अंकुश असला पाहिजे. त्यांची डयूटी काय आहे, त्यांनी नियमितपणे किती तपासणी केली पाहिजे यावर देखील बंधन आवश्यक आहे. शिक्षण व प्रशिक्षणाची गरज आहे. सर्व शिक्षा अभियान म्हणजे कागदी घोडे आहेत. हे अभियान ज्याप्रमाणे प्राथमिक क्षेत्रासाठी राबविले गेले त्याप्रमाणे ते माध्यमिक क्षेत्रासाठी राबविणे आहे. माध्यमिक क्षेत्रासाठी राबवित असताना सर्व शिक्षा अभियान काटेकोरपणे राबविला पाहिजे. मूलभूत शैक्षणिक धोरण बदलणे आवश्यक आहे, परीक्षा पध्दती बदलणे आवश्यक आहे. श्रेणी नको, गुणानुक्रमच असले पाहिजे आणि खऱ्या अर्थाने शिक्षण पध्दती व परीक्षा पध्दती बदलण्यासाठी निश्चितपणे समिती नेमून त्यासाठी निश्चित धोरण ठरविणे आवश्यक आहे. ज्याप्रमाणे महाविद्यायीन शिक्षणामध्ये नॅकप्रमाणे सेकंडरी स्तरावर देखील सॅक नामांकन असावे. त्याची अंमलबजावणी झाली तर पुढील काळामध्ये प्रयोगशाळा, वाचनालये, आरोग्य सुविधा, शाळांमध्ये मिळाल्या तर शाळांमध्ये चांगले वातावरण निर्माण होईल. मराठी टिकविण्याबरोबरच इंग्रजीही टिकविणे आवश्यक आहे. म्हणून इंग्रजी शाळेत मराठीची सक्ती आणि मराठी शाळेत इंग्रजीही आवश्यक अशापध्दतीचे धोरण आखणे आवश्यक आहे. संगणकाचे शिक्षण असेल, तांत्रिक शिक्षण असेल त्याचबरोबर शेती अभ्यासक्रमाचा देखील अंतर्भाव होणे आवश्यक आहे. शिक्षकेतर कर्मचा-यांसंबंधी नवीन आकृतीबंध रद्द करुन एस.एस.कोड ऐवजी चिपळूणकर समितीच्या शिफारशीनुसार शिक्षकेतर पदांची भरती गेली पाहिजे आणि त्यांना पदोन्नती सुध्दा दिली गेली पाहिजे. याठिकाणी दुर्दैवाने सांगावेसे वाटते की, अनेक वर्षांपासून अनेक संस्थांमध्ये अनेक पदे रिक्त असताना शिक्षकांना दुसरी कामे दिली जातात पर्यायाने शिक्षक अध्यापनापासून लांब जात आहे. म्हणून अशी पदे पदोन्नतीने भरणे आवश्यक आहे.

यानंतर श्री.शिगम

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

शासनाने काढलेल्या जी.आर.चा अर्थ अधिकारी चुकीच्या पध्दतीने लावतात आणि चुकीचे आदेश देत असतात. शिक्षकांच्या वेतन निश्चितीच्या संदर्भात शासनाने काढलेल्या जी.आर.चा अधिका-यांनी चुकीचा अर्थ लावल्यामुळे शिक्षकांवर अन्याय झाल्याबद्दलचा प्रश्न या सभागृहामध्ये मघाशी उपस्थित झालेला होता. जी.आर.चा चुकीचा अर्थ लावून त्याचा कसा व्यवसाय होईल यापध्दतीने अधिकारी काम करतात. अशा अधिका-यांवर कोठे तरी निर्बंध लादणे आवश्यक आहे. शिक्षकाच्या पदाला चुकीच्या पध्दतीने मान्यता दिलेली असेल तर ते पद काढून टाकले जाते. परंतु जे चुकीच्या पध्दतीने मान्यता देतात त्यांच्यावर मात्र कोणतीही कारवाई होत नाही. तेव्हा जे चुकीची मान्यता देतात त्यांच्यावर देखील दंडात्मक कारवाई केली पाहिजे.

सभापती महोदय, सर्वशिक्षा अभियानांतर्गत पुस्तक खरेदीमध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार होत आहे. पुस्तकाची मक्तेदारी एकाच प्रकाशकाला देण्यात आलेली आहे. सर्व प्रकाशकांकडून पुस्तके खरेदी केली पाहिजेत. पुस्तक खरेदीसाठी एक समिती नेमून त्या समितीच्या माध्यमातून चांगली चागली पुस्तके निवडण्याचे काम केले पाहिजे. आपल्याला शैक्षणिक समस्या ख-या अर्थाने दूर करुन दर्जेदार आणि गुणात्मक शिक्षण द्यावयाचे असेल तर आपल्या शैक्षणिक धोरणामध्ये बदल करणे गरजेचे आहे एवढे बोलून या विषयावर मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल सभापती महोदय, आपले आभार मानून मी माझे भाषण संपवितो.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, या सदनाचे सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील आणि अन्य सहका-यांनी या ठिकाणी शिक्षणाच्या संदर्भात नियम 260 अन्वये जो प्रस्ताव मांडलेला आहे त्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, शिक्षण हा अतिशय जिव्हाळयाचा विषय आहे. मी स्वत: महानगरपालिकेच्या शाळेमध्ये शिकलो. महानगरपालिकेच्या शाळेचा दर्जा खाजगी शाळांनी धसका घ्यावा इतका उत्तम होता. आता जसे के.जी. नर्सरी आहे तसे प्रकार त्यावेळी नव्हते. आम्ही इयत्ता सातवी नंतर आठवीला हायस्कूलमध्ये जात होतो. आज शिक्षण क्षेत्रात उभी राहिलेली विषमता पाहिली की मन हेलावून जाते. आता शिक्षणामध्ये अ, आ, इ, ई आणि क, ख, ग, घ ही बाराखडी राहिलेली नाही. आता A फॉर ॲसिडिटी B फॉर ब्लडप्रेशर, असे नवनवीन शब्द यायला सुरुवात झालेली आहे. हा विषय जेव्हा मांडला जातो त्यावेळी जिव्हारी लागते. याचे कारण असे की, ग्लोबलायझेशनमुळे जशी खाजगी विद्यापीठे आली तशा खाजगी शाळा आल्या. या खाजगी शाळांचे फार मोठे पेव फुटलेले आहे. मुंबई शहरामध्ये मोठी होर्डिंग लागायला सुरुवात झाली की, प्रायमरी शाळांचे क्लासरुम एअरकंडिशन आहेत. सभापती महोदय, या एअर कंडिशन क्लासरुममध्ये कोण जाईल ? समाजामध्ये उच्चवर्णीय लोकांचा एक वेगळा वर्ग तयार झालेला आहे. हे जे शिक्षणाच्या संदर्भातील प्रश्न निर्माण होत आहेत ते वर्गसंघर्षातून, शिक्षणातून निर्माण होत आहेत. मोलकरणीला देखील आपले मूल इंग्रजी शिकले पाहिजे, इंग्रजी माध्यमाच्या नव्हे तर कान्व्हेण्ट शाळेमध्ये गेले पाहिजे अशी जी अहमहमिका लागलेली आहे ती याला कारणीभूत आहे. कुसुमाग्रजांनी इंग्रजी हे वाघीणीचे दूध आहे, असे म्हटलेले आहे. इंग्रजी ही जगाच्या ज्ञानाची खिडकी आहे, दरवाजा नाही. जगाच्या ज्ञानाचे इंग्रजी हे घर देखील नाही, ती खिडकी आहे. इंग्रजी आले पाहिजे याबद्दल दुमत नाही. पण मूळ मराठीला विसरुन शिकले पाहिजे आणि संस्कार विरहित झाले पाहिजे अशा प्रकारची मानसिकता आता तयार होऊ लागली आहे. मराठी माध्यमाच्या एस.एस.सी. बोर्डाशी संलग्न असलेल्या अनेक मराठी शाळा आता सी.बी.एस.ई. आणि आय.सी.एस.ई.कडे जाण्यासाठी माननीय शिक्षण मंत्री महोदयांकडे मागणी करीत आहेत. ही एक नवीन इंडस्ट्री तयार झालेली आहे. शिक्षण नावाचा एक नवा उद्योग सुरु झालेला आहे. माननीय तालिका सभापती महोदय, आपणही मोठ्या तळमळीने शिक्षण संस्था चालविता. सर्वसामान्य मुले तेथे शिक्षण घेण्यासाठी येतात हेही आम्ही पहातोय. पण त्यातील मेडिकल आणि इंजिनिअरिंगसाठी

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. अरविंद सावंत...)

किती जातात हा प्रश्न आहे. पाया मजबूत नसेल तर कळस उभा राहाणार नाही. आता मराठी माध्यमाच्या शाळा, सेमी माध्यमाच्या शाळा आणि खाजगी शाळा असे शाळांचे तीन वर्ग सुरु आहेत. मुंबईतील मराठी माध्यमांच्या शाळांमध्ये कन्नड, गुजराथी, ऊर्दू इत्यादी विषय आहेतच.

...नंतर श्री. पां.फ.खर्चे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत.....

मी राजकारणात जाणार नाही परंतु तेलंगणा आणि कर्नाटक राज्यांमध्ये आज आपल्यावर किती अन्याय होत आहे तो तर भयानकच आहे. म्हणून ग्रामीण भागातील शिक्षणाकडे लक्ष देण्याची गरज आहे. आज ग्रामीण भागाकडे आपण सरकतो तेव्हा जिल्हापरिषदेच्या शाळा, खाजगी शाळा आणि नंतर आश्रमशाळा. या आश्रमशाळांमध्ये सुध्दा वर्गवारी आहे. त्यात समाजकल्याण विभगाच्या आश्रमशाळा, आदिवासी विभागाच्या आश्रमशाळा अशा प्रकारची वर्गवारी आमच्याकडे आहे. त्याचप्रमाणे शिक्षणाच्या दर्जाची सुध्दा वर्गवारी आहे. शिक्षकांचे प्रश्न असतात, ते नेहमी मांडत असतात, त्यांना वेतनश्रेणी पाहिजे, वेतन आयोग पाहिजे हे सगळे त्यात अंतर्भुत आहे. परंतु शिक्षणाचा दर्जा प्राप्त होण्यासाठी लागणारे वातावरण हा भाग महत्वाचा आहे. आज पंचतारांकित हॉटेलमध्ये गेल्यानंतर तेथे थुंकताही येत नाही, ती गिळावी लागते आणि आमच्या जिल्हा परिषदेच्या शाळेत गेल्यानंतर काय अवस्था असते, आमच्या आरोग्य केंद्रावर काय अवसथा असते याचे आपल्या सर्वांना पूर्ण ज्ञान आहे. म्हणून शाळांची अवस्था काय आहे हे शासनाने पाहिले पाहिजे. या अधिवेशनात दोन तीन आश्रमशाळा दाखविल्या गेल्या. त्या आश्रमशाळांमध्ये मुलींसाठी असलेल्या स्वच्छता गृहाची दुर्दशा काय आहे तसेच इतर सुविधांबाबतचे चित्र पाहून मला वाटते शिक्षण खात्याचे किती दुर्लक्ष केलेले आहे. मला वाटते यासंदर्भात आदिवासी विभाग, समाजकल्याण विभाग तसेच शालेय शिक्षण विभाग या सर्व विभागांनी एकत्रितपणे विचार करण्याची आवश्यकता आहे. आपल्यासमोर राज्याचा एक सिलॅबस आहे परंतु या इंग्रजी माध्यमांच्या शाळांचा सिलॅबस एक नाही. त्यात एसएससी बोर्ड, सीबीएसई बोर्ड तसेच आणखी केंब्रिज युनिव्हर्सिटी वगैरे सगळा आनंदी आनंद आहे. मराठीची सक्ती आपण शाळांमध्ये केली आहे पण त्याचे अनुपालन मात्र होते की नाही हेही पाहिले जात नाही. म्हणून माझा प्रश्न आहे की, सामाजिक व्यवस्था जी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत होती ज्याचा उल्लेख घटनेत सुध्दा केलेला आहे ती सामाजिक लोकशाही, सामाजिक समता, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता हे फक्त बोलण्यासाठी सोपे आहे परंतु ती समता शिक्षणात कुठे आहे ? मागासवर्गीय माणसाचा एक पोरगा कुठल्या तरी शाळेत जातो, तो शाळेत गेला काय आणि राहिला काय. दुसरीकडे मात्र मोठ्या घरातील मुलाला शाळेत जाण्यासाठी रिक्षापर्यंत सोडायला त्याची आई आलेली असते. सोबत त्याचा टिफीन आणि पुन्हा शाळेतून परत आल्यानंतर त्याला घेण्यासाठी कोणी तरी येते. इकडे मात्र या गरिबाचा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत .....

मुलगा शाळेत जातो आणि अभ्यास करतो की नाही याची देखील भ्रांत त्याच्या आईवडिलांना नसते अशी मुले शेवटी बालमजूर म्हणून काम करणार. शिक्षणापासून वंचित असणाऱ्यांचा एक वर्ग फार मोठा आहे. त्यांची संख्या किती आहे याची माहिती शासनाला तरी आहे काय ? तसेच हॉटेलमध्ये गेल्यानंतर पाणी आणून देणारा मुलगा असतो, ज्याचे बालपण हिरावून घेतलेले असते. शासनाने शिक्षण सक्तीचे केले असे आपण म्हणतो पण हॉटेलमध्ये चहा आणून देणारा, कपबशा धुणारा जो वर्ग आहे, जी मुले आहेत ती पाहून आमच्या संवेदना जागृत होत नाहीत, त्या हीन झाल्या आहेत. इकडे मात्र मुलांनी शाळेत यावे म्हणून पालकांना त्याचा उपस्थिती भत्ता देण्याची योजना तयार केली. जेणेकरुन पालकांना पैसे मिळतील आणि तो आपल्या मुलाला दररोज शाळेत पाठविण्याचा प्रयत्न करीन आणि त्या माध्यमातून तो मुलगा शिकणार. या विषमतेवर शासन कधी गांभीर्याने विचार करणार काय ? हा महत्वाचा प्रश्न आहे. शासन आदिवासींच्या मुलांना बूट पुरविते, त्यांना खाण्याच्या वस्तू पुरविते परंतु त्या त्यांना मिळत नाही. त्यांना तेल मिळत नाही. हे सर्व विषय आदिवासी विभागाशीच निगडित असतील असे नाही तर शिक्षण खात्याशी तरी निगडीत आहेत. कारण प्रायव्हेट बसमधून युनिफॉर्म घालून शाळेत जाणाऱ्या मुलाला त्याची आई सोडवायला येते दुसरीकडे मात्र दोन वेळच्या जेवणाची भ्रांत असलेल्या आईवडिलांना आपला मुलगा शाळेत जातो की नाही, अभ्यास करतो की नाही हे देखील माहीत नसते. आपल्या खात्याचे अधिकारी सोडा परंतु ज्यांनी अशी पिढी घडवावयाची असते ते तरी प्रामाणिकपणे काम करतात काय ? येथे मात्र मी शिक्षकांच्या बाजूने बोलणार आहे. त्यांच्या ज्या मागण्या आहेत त्यात वेतनश्रेणी किंवा नवीन पगार तसेच शिक्षण सेवक अशा ज्या अडचणी आहेत त्या एकदा शासनाने सोडविल्या पाहिजेत. पुन्हा या सभागृहात त्यांचे विषय येऊ नयेत. कारण या शिक्षकाच्याच हातात उद्याची पिढी घडविण्याचे काम असते. हे काम करीत असताना ज्याला पोटाची भ्रांत असेल तो अशी पिढी घडवू शकणार नाही. लहान मुलांना घडविणे म्हणजे कच्ची माती आणि त्या कच्च्या मातीचे मडके बनवायचे की मुर्ती हे त्याच्याच हातात असते. अशा परिस्थितीत तोच अडचणीत असेल तर तो अशा कच्च्या मातीपासून मूर्ती कशा घडविणार याचाही विचार केला पाहिजे. म्हणून हा विषय अत्यंत गंभीर असून त्यामध्ये मोठमोठ्या गोष्टी आपण करतो आणि अशा वेळेस मग शिक्षणाचे धोरण शासन तयार करते आजपर्यंत प्राथमिक शिक्षणाचे धोरण मात्र शासन तयार करीत नाही. दुसरीकडे मात्र दोन तीन वर्षाची मुले खाजगी नर्सरीमध्ये पाठवितात..... (जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत....

नर्सरी काय, के.जी. काय, ज्युनिअर के.जी. काय या मोठयालोकांच्या मुलांचे लाडच लाड चाललेले असतात. आणि दुसरीकडे गरीब विद्यार्थ्यांना दुषित पाणी प्यावे लागते, खाण्यासाठी अन्न नाही, जेवणात अळया, शिक्षण नाही, पाटी नाही, पेन नाही, पेन्सिल नाही, लाईट नाही, टॉयलेट नाही, गणवेश नाही, साबण नाही, तेल नाही अशा परिस्थितीत शिक्षण घ्यावे लागत आहे. एक वर्ग अशा सुविधांपासून संपूर्णपणे वंचित आहे तर दुसरा वर्ग सर्व सुविधांनी उपलब्ध असलेला आहे. त्यामुळे शिक्षणाची विषमता संपविण्यासाठी शासन कोणते धोरण अवलंबणार आहे ते एकण्यासाठी माझे कान टवकारले आहेत. शिक्षणाचा दर्जा वाढवावयाचा असेल तर संपूर्ण महाराष्ट्रात पहिली पासून सेमी इंग्रजी सुरु करावे लागेल. सेमी इंग्रजी शाळेमध्ये मराठी भाषेला विसरता येणार नाही. ज्ञानोबारायांची मराठी इतकी हलकी नाही की, कोणीही बोलावे आणि आम्ही ती विसरुन जावी. मराठी भाषा कधीही विसरता येणार नाही. ज्ञानोबा माऊलींची मराठी आम्हाला कधीही विसरता येणार नाही तर ती संस्कारीत करण्याचे काम शिक्षकांच्या माध्यमातून आपल्याला करता येईल. संपूर्ण महाराष्ट्रात सेमी इंग्रजी शाळा सुरु कराव्यात अशी माझी पहिली मागणी असून दुसरी मागणी अशी आहे की, सर्व शिक्षा अभियानाअंतर्गत आपण पुस्तके खरेदी केली आहेत. परंतु पुस्तक खरेदी करणारे जे काणी अधिकारी आहेत ते अमराठी आहेत. पुस्तक खरेदी व्यवहारात प्रचंड भ्रष्टाचार झालेला आहे. चढया भावाने पुस्तकांची खरेदी झालेली आहे. एकाच प्रकाशकाडून सर्व पुस्तके खरेदी करण्याचे काम सुरु आहे. हा सर्व व्यवहार मंत्रीमहोदयांना आणि सचिवांना अंधारात ठेवून केला जातो. म्हणून पुस्तक खरेदीला जमले तर स्टे देण्याचा प्रयत्न करावा. शिक्षणाच्या ठरावाच्या माध्यमातून एवढीच विनंती करतो की, शिक्षणामधील ही विषमता जितक्या लवकर संपवता येईल तितक्या लवकर संपवावी. आपण मला बोलण्याची जी संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानून माझे दोन शब्द संपवितो.

जय हिंद, जय महाराष्ट्र.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, एका अत्यंत महत्वाच्या विषयावर कालपासून या सभागृहात चर्चा सुरु आहे. राज्याच्या अंदाजपत्रकात शिक्षणासाठी 19 टक्क्यांची आर्थिक तरतूद करण्यात आलेली आहे. या चर्चेमधून असे निष्पन्न होते की, शिक्षणासाठी अंदाजपत्रकात 19 टक्क्यांची तरतूद केलेली असली तरी तो बॅकलॉग वाढतच चालला आहे. हा बॅकलॉग आर्थिक नसून फिजिकल आहे असे मला वाटते. अनुशेषाच्या संदर्भात माननीय प्रा.टी.देशमुख आपले विचार मांडत असतात तीच बाब आता शिक्षणाच्या बाबतीत होते की काय अशी शंका आता वाटावयास लागली आहे. अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानितच्या संदर्भात प्रचंड गोंधळ निर्माण झालेला आहे. अनुदान म्हणजे ग्रँट परंतु हा विषय सुध्दा एज्यूकेशन टेकन फॉर ग्रँटेड पर्यंत जाऊन पोहचतो की काय अशी शंका माझ्या मनात यावयास लागली आहे. सरकारी खात्याचा कारभार चालवतांना आपण म्हणतो की, संगणकीय शिक्षण प्राथमिक स्तरापासून देण्याचा आपण प्रयत्न करीत आहोत. मला वाटते संगणकीय शिक्षण, आय.टी.शिक्षण इतरांना देण्यापेक्षा हे शिक्षण स्वत: शिक्षण खात्याने आपल्याकडे घेण्याची आवश्यकता अधिक वाटते. आता व्हीडीओ कॉन्फरंसिंग सारखी अनेक माध्यमे आहेत. ज्या ठिकाणी प्रश्न आहेत ते प्रश्न संबंधित खात्याकडे कळवितांना जर आपण व्हीडीओ कॉन्फरंसिंगचा उपयोग केला तर त्यावर निणर्य होण्याची प्रक्रिया तसेच आदेश निघण्याची प्रक्रिया लवकर होऊन निश्चितपणे सुधारणा करता येतील. शिक्षणाचे मुल्यांकन आणि त्यामध्ये आवश्यक ते बदल हा जो महत्वाचा भाग आहे यामध्ये खूप वेळ जात असतो. अनेक तज्ञांची वेगवेगळया समित्यांवर नियुक्ती होत असते. त्यांनी जो अहवाल तयार केलेला असतो तो अहवाल प्रत्यक्ष पोहचे पर्यंत आणि तो पाठयपुस्तकात येईपर्यंत फार वेळ निघून जात असतो त्यामुळे शिक्षकाने तरी काय शिकवायचे हा नवीनच प्रश्न उभा राहतो. त्यामुळे शिक्षणाच्या संदर्भात धोरण ठरवितांना या प्रश्नाकडेही लक्ष द्यावे व यामध्ये आवश्यक ते बदल केले पाहिजेत असे मला वाटते. आपल्याकडे शिक्षकांचा गौरव करण्याच्या अनेक पध्दती आहेत. महापालिका, राज्य, केंद्र सरकार यांच्याकडून आदर्श शिक्षकांचे पुरस्कार मिळत असतात. शिक्षक दिनाच्या पलिकडे जाऊन प्रोत्साहनाच्या नवीन संकल्पना शिक्षण खात्याच्या माध्यमातून जर राबविता आल्या तर त्याचा चांगला उपयोग होऊ शकेल. जे शिक्षक मनापासून शिक्षणाच्या क्षेत्रात आलेले आहेत त्यांना पुरस्काराच्या पलिकडे कोणते प्रोत्साहन मिळू शकते याचाही विचार आपण करावयास पाहिजे असे मला या निमित्ताने सांगावेसे वाटते.

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. अरविंद सावंत) 5 ई-1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सगळा अभ्यासक्रम आणि तो शिकविण्याची पध्दत तसेच घेण्यात येणा-या परीक्षा यामुळे परीक्षासाठी अभ्यासक्रम पूर्ण करणे आणि परीक्षांचे निकाल लावणें् म्हणजे ख-या अर्थाने " निकाल लावणे " अशा प्रकारची पध्दत आता रुढ झालेली आहे.त्यामुळे एखादी व्यक्ती परीक्षेत जरी उत्तीर्ण झालेली असली तरी ती व्यक्ती किती शिक्षित झाली आहे याबाबतीत तपासणी करण्याची वेळ आता आलेली आहे असे मला वाटते.

सभापती महोदय, प्रत्येक समाज घटकासाठी वेगवेगळया शाळा असतात अशा प्रकारच्या प्रत्येक घटकासाठी वेगवेगळया शाळा असाव्यात काय याबाबतीत देखील विचारवंताचा विचार घेऊन त्यामध्ये बदल करता येतो काय यासंबंधी प्रयत्न करावयास पाहिजे आज सगळीकडे असे दिसून येते की, सरकारचे एक एस.एस.सी.बोर्ड असून त्याच्या विरुध्द आय.सी.एस.सी. सारखे तत्सम अभ्यासक्रम चालविणारे तगडे प्रतिस्पर्धी आहेत त्यामुळे ही दोन विजोड पहिलवानांची कुस्ती आहे असे मला वाटते. तगडया पहिलवानाशी् लढण्यासाठी एस.एस.सी. बोर्ड सक्षम करण्यासाठी त्यांना जो काही खुराक आवश्यक आहे तो देण्याची व्यवस्था शासनामार्फत केली जाणार आहे काय असे मला माननीय मंत्रिमहोदयांना विचारावयाचे आहे.

सभापती महोदय यानंतर मला दुसरा एक मुद्दा या ठिकाणी मांडावयाचा आहे वजनदार मंडळीच्या भरपूर शाळा निघाल्या आहेत त्याच्या विरुध्द सरकारी गरीब शाळा आहेत अशा प्रकारे या दोन शाळातील सामना रंगलेला दिसून येतो. सभापती महोदय, आपण आपल्या भाषणात मघाशी असा उल्लेख् केला होता की ,शिक्षणाच्या पध्दतीमुळे आणि वर्गीकरणामुळे क्लास लेस सोसायटीकडे जाण्याचा प्रयत्न होत असतो मला असे वाटते की शैक्षणिक धोरण जर योग्य नसेल तर समाजाची एक दुर्देवी वाटणी होण्याचीच शक्यता आहे त्यामुळे हा भविष्य काळासाठी अत्यंत चिंताजनक बनणारा विषय आहे.त्या दृष्टीने या विषयाकडे शासनाने पहावे असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, पूर्वी समाजामध्ये शिक्षकाला मानाचे स्थान होते.ते पुन्हा प्राप्त होण्यासाठी परिस्थिती निर्माण करणे हा राज्याच्या शैक्षणिक धोरणाचा उद्देश असला पाहिजे व त्यासाठी शिक्षण क्षेत्राशी संबंधित अशा प्रत्येक घटकाप्रती सरकारची बांधिलकी प्रचित होऊ लागली तरच सामाजिक परिवर्तन आणि प्रगती होऊ शकेल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले....

सभापती महोदय, आपण मघाशी असा उल्लेख केला की, शिक्षण एका उद्योगाच्या दिशेने वाटचाल करीत आहे. भविष्यात शिक्षणाला उद्योगाचा दर्जा देण्याची मागणी सुध्दा येण्याची शक्यता मला दिसत आहे.

श्री.कपिल पाटील : केन्द्र सरकारने शिक्षणाला उद्योगाचा दर्जा दिलेला आहे.

श्री.हेमंत टकले : ठीक आहे. मला असे वाटते की आज सगळयाच पध्दतीमध्ये वा विज्ञान पध्दतीमध्ये आणि आधुनिकतेमध्ये बदल होत आहे . शिक्षक होण्यासाठी त्याला जे काही शिक्षण आवश्यक आहे ते शिक्षण घेतल्यानंतर व पाच दहा वर्षे या क्षेत्रात सेवा झाल्यानंतर त्याने शिकलेल्या गोष्टी आणि प्रचलित गोष्टीमध्ये जे काही बदल झालेले आहेत ते स्वीकाण्यासाठी त्या शिक्षकांचे शिक्षण कशा प्रकारे होऊ शकेल आणि त्याकरता कोणती व्यवस्था करता येईल हासुध्दा एक महत्वाचा भाग असून शासनाने आपल्या शैक्षणिक धोरणामध्ये त्याचा समावेश करावा असे मला वाटते.

सभापती महोदय, आजच्या शिक्षण पध्दतीमध्ये व अभ्यासक्रमामध्ये मूल्य शिक्षणाची व्यवस्था कोठे आहे काय हे पाहणे गरजेचे आहे. त्याबाबतीत एक तास वाचनाचा वा एक तास अन्य विषयाचा असे केवळ कागदोपत्री दाखवण्यापेक्षा मूल्य शिक्षणासाठी आपण वेगळे काही करु शकतो काय याचा देखील विचार शैक्षणिक धोरण ठरवतांना करावा अशी माझी मंत्रिमहोदयांना विनंती आरहे.

सभापती महोदय, यानंतर मला शेवटचा एक मुद्दा मांडावयाचा आहे. ज्याप्रमाणे आश्रमशाळा आदिवासी विभागाकडे असतात त्याप्रमाणे अपंगाच्या शाळा समाजकल्याण विभागाकडे असतात. अशा संस्थामध्ये मी गेल्या काही वर्षापासून काम करीत आहे.मी स्वत: नाशिक येथे अंध मुलीसाठी एक शाळा चालवत आहे.त्या शाळेचे प्रश्न मांडत असतांना अंध मुला मुलीच्या शिक्षणाचा आणि राज्याच्या शिक्षण खात्याचा कोठेही संबंध आल्याचे मला जाणवत नाही.एकूण लोकसंख्येच्या मानाने अपंग व्यक्तीची जी संख्या आहे त्यांचा देखील विचार शिक्षण पध्दतीमध्ये होण्याची आज गरज आहे. आपल्याकडे इंटीग्रेटेड एज्युकेशन इनक्ल्युजीव्ह एज्युकेशन अशा प्रकारच्या संकल्पना आलेल्या आहेत अपंग व्यक्तीसाठी मी जी शाळा चालवतो त्या शाळेमध्ये मी जर चौथीपर्यंत एखाद्या

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले....

अंध मुलीला शिक्षण देत असेल तर पाचवी पासून तिला पुन्हा अंध शाळेत पाठविण्या ऐवजी नॉर्मल शाळेत पाठविण्यासाठी किती खटपट करावी लागते आणि अशा मुलांचा स्वीकार होण्यासाठी त्या शाळांमध्ये किती अडचणी निर्माण होतात याचासुध्दा शिक्षण धोरण ठरवितांना विचार केला पाहिजे. राज्याच्या प्राथमिक जबाबदा-यांपैकी शिक्षण देणे ही अग्रक्रमाची जबाबदारी असून त्यासाठी शैक्षणिक धोरणामध्ये आमुलाग्र बदल करावा आणि त्याचे पुर्नमुल्यांकन करावे अशी विनती करुन मी माझे भाषण संपवितो.

नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, या सदनाचे सन्माननीय सदस्य आणि आमचे मित्र श्री.कपिल पाटील यांची शिक्षणासंबंधात जो पस्ताव येथे आणला आहे त्याबद्दल माझे मनोगत थोडक्यात मांडण्यासाठी मी उभा आहे. या विषयासंबंधात अनेक सन्माननीय सदस्यांनी आपली मते येथे व्यक्त केली आहेत आणि ती करताना त्यांनी अनेक मुद्दे येथे मांडले आहेत. सभापती महोदय, मागील महिन्यात या देशाचे पंतप्रधान माननीय श्री.मनमोहनसिंग यांनी एक अत्यंत मार्मिक असे विधान केले आहे. ते असे म्हणतात की, मी एक सर्वसामान्य व्यक्ती होतो आणि सर्वसामान्य मध्यमवर्गीय कुटुंबातून मी आलो आहे. आज मी जो आपल्यासमोर आहे तो शिक्षणामुळे आलो आहे. शिक्षणामुळेच मी अनेक महत्त्वपूर्ण जबाबदाऱ्या पार पाडल्या आहेत. देशाचे पंतप्रधान असे म्हणतात म्हणूनच शिक्षण हा विषय किती महत्त्वाचा आहे हे आपल्याही लक्षात येईल आणि त्यासाठीच राज्य शासनाने देखील गांभीर्याने याकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे. सभापती महोदय, शिक्षणाच्या बाबतीत शासनाच्या विविध योजना जाहीर होतात परंतु त्यांची योग्य त्या पद्धतीने अमलबजावणी होत नाही म्हणून हे सगळे प्रश्न निर्माण होत आहेत, झाले आहेत. मग शाळांना अनुदान देण्याचा विषय असेल किंवा त्यासाठीच्या बजेटचा विषय असेल, दिवसेंदिवस गळतीचे वाढणारे प्रमाण असेल वा विद्यार्थ्यांची, शाळाबाह्य मुलींचे जे प्रमाण जास्त असण्याची वस्तुस्थिती असेल या सगळ्या गोष्टींचा विचार केला तर एकूणच शासनाने ज्या पद्धतीने शिक्षण क्षेत्रातील धोरणाची अमलबजावणी करायला पाहिजे त्यासाठी एक तर सक्षम अशी यंत्रणा शासनाकडे उपलब्ध नाही आणि त्या धोरणाची अमलबजावणी करण्यासाठी कोणतेही प्रयत्न केले जात नाहीत.

सभापती महोदय, या राज्यामध्ये सरकारने एक धोरणात्मक निर्णय घेतला. आपल्याला कल्पना आहे की, अन्य राज्यांबरोबर आपण आपल्याकडील शिक्षणाची तुलना करतो. परंतु अन्य राज्यांमध्ये शासनाकडून चालविल्या जाणाऱ्या शाळा मोठ्या प्रमाणात आहेत आणि खाजगी शाळा फार कमी प्रमाणात आहेत. आपल्याकडे मात्र याच्या उलट परिस्थिती आहे. आपल्याकडे जास्तीत जास्त शाळा या खाजगी संस्थांच्या आहेत आणि अगदी 10 ते 11 टक्के शाळा या शासकीय आहेत. त्यामुळे या राज्यातील संपूर्ण शिक्षणाची जबाबदारी मग ते प्राथमिक शिक्षण असो, माध्यमिक असो, उच्च माध्यमिक असो वा वैद्यकीय, तंत्रशिक्षण असेल, ही सर्व जबाबदारी खाजगी शिक्षण

.... 5एफ 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मोते .....

संस्थांनी घेतलेली आहे. म्हणून या खाजगी संस्थांना शासनाने आर्थिकदृष्ट्या सक्षम केले नाही तर या राज्यातील या संस्था मोडकळीस येतील आणि शिक्षण क्षेत्रात गंभीर प्रश्न निर्माण होतील. तसे ते ऑलरेडी निर्माण झालेलेच आहेत. कायम विनाअनुदानाचा प्रश्न त्यातीलच एक आहे. सभापती महोदय, या राज्यात शाळा सुरू झाली की साधारणत: 20 टक्के पासून सुरू होत असे आणिमग 9 ते 10 वर्षामध्ये ती शाळा 100 टक्के अनुदानावर येते. पण 24 नोव्हेंबर 2001 पासून राज्य सरकारने धोरणात्मक निर्णय घेतला आणि यापुढे राज्यात येणाऱ्या सर्व शाळा या कायम विना अनुदान तत्त्वावर राहतील असे सांगितले. अशा शाळांना शासनाकडून कोणत्याही प्रकारचे अनुदान मिळणार नाही. पण यातून विषमता निर्माण झालेली आहे. सभापती महोदय, हा निर्णय घेतल्यानंतर देखील मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, या राज्यामध्ये हा धोरणात्मक निर्णय इ ाल्यानंतरही राज्य सरकारने विनाअनुदान तत्त्वावर शाळा दिल्या आणि आज त्या शाळा 100 टक्के अनुदान घेत आहेत. मात्र त्यांच्या अगोदरच्या शाळा अजूनही कायम विनाअनुदान तत्त्वावरच आहेत. ..

(यानंतर श्री.सरफरे .... 5जी 1 ..

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते...

त्या कशा आल्या ? याबाबत मग आम्हाला बोलायला संधी मिळते. कुणाचा तरी वशिला लावून त्या शाळा मिळविल्या काय? टेबलाखालून काही व्यवहार झाल्यामुळे त्या शाळा मिळाल्या काय? अशाप्रकारचे अनेक मुद्दे आमच्यासमोर येऊ शकतात. आणि म्हणून आम्हाला बोलावे लागते की, तुम्हाला त्या शाळा विना अनुदान तत्वावर दिल्या, त्यांना अनुदान मिळाले. आणि त्यापूर्वीच्या शाळा आजही कायम विना अनुदानित आहेत. त्याबाबत काही संस्था कोर्टामध्ये गेल्यानंतर कोर्टाने त्यासंबंधी 24 नोव्हेंबर 2001 ला निर्णय दिला की, "त्यापूर्वीची ही शाळा असल्यामुळे कायम विना अनुदानित देण्यासंबंधी आपण पुनर्विचार करा". त्या शाळांना सुध्दा राज्य सरकारने अनुदान दिले. याचा अर्थ जो कोर्टामध्ये जातो त्यांना शासन अनुदान देते. जो वशिला लावतो त्याला विना अनुदान तत्वावर शाळा मिळते. पर्यायाने टप्पानिहाय त्यांना अनुदान मिळते. ज्यांचा वशिला नाही किंवा ओळख नाही त्या शाळा मात्र कायम विना अनुदानित रहातात. मी हे याठिकाणी रेकॉर्डच्या आधारे बोलत आहे. मध्यंतरी शिक्षकांनी प्रचंड संघर्ष केल्यानंतर शासनाने "कायम" हा शब्द काढून टाकला. परंतु तो कुणाचा? प्राथमिक शाळांचा, माध्यमिक शाळांचा. त्यामधून उच्च माध्यमिक शाळा वगळण्यात आल्या. त्यांनाही या निर्णयामधून वगळण्याची आवश्यकता आहे. केवळ "कायम" हा शब्द काढून टाकून हा विषय संपणार नाही. तर या शाळा जेव्हापासून सुरु झाल्या तेव्हापासून या शाळा विना अनुदानित समजून त्यांना अनुदानावर आणण्याच्या बाबतीत, त्यांचे मूल्यांकन करण्याच्या बाबतीत शासनाला धोरणात्मक निर्णय घ्यावा लागेल. सहानुभूतीपूर्वक विचार करावा लागेल. अन्यथा, हे 65 हजार शिक्षक काम करीत आहेत त्यांच्यामध्ये प्रचंड असंतोष निर्माण होईल. अशाप्रकारे या शिक्षण व्यवस्थेमध्ये काहीही अप्रिय घटना घडू शकते. नवीन शाळांना मान्यता देण्याच्या संदर्भात मी याठिकाणी जाणीवपूर्वक उल्लेख करीत आहे. काल नियम 93 च्या सूचनेवरील चर्चेच्या माध्यमातून मला उत्तर मिळाले. या राज्यामध्ये हिंदी माध्यमांच्या शाळांना आपण परवानगी देता, उर्दू माध्यमाच्या शाळांना आपण परवानगी देता. मला मिळालेल्या माहितीनुसार यावर्षी राज्य शासनाने 1600 पेक्षा अधिक इंग्रजी माध्यमांच्या शाळांना आपण परवानगी दिली आहे. या राज्यामध्ये एकही मराठी माध्यमाच्या शाळेला शासनाने परवानगी दिलेली नाही. त्यामुळे हा सामाजिक प्रश्न होऊ शकतो. उद्या या विषयाच्या संदर्भात वातावरण बिघडू शकते. लोकांमध्ये याबाबत प्रचंड असंतोष निर्माण झालेला आहे. फक्त अनुदान द्यावे लागणार नाही म्हणून तुम्ही इंग्रजी माध्यमांच्या शाळांना परवानगी देत आहात. आज महाराष्ट्रामध्ये मराठी माध्यमाच्या शाळांना

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/ SBT/

श्री. रामनाथ मोते...

परवानगी मिळण्याची आवश्यकता आहे. इंग्रजी माध्यमाच्या हजारो शाळा आपल्याला मिळत आहेत. म्हणून मराठी माध्यमाच्या शाळांना सुध्दा अनुदान मिळण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, या राज्यातील शाळांना 1981 चा कायदा लागू आहे. त्या कायद्यांतर्गत सीबीएसईच्या शाळा येत नाहीत. आयसीएसईच्या किंवा आयबीच्या शाळा येत नाहीत. या शाळांना सुध्दा या कायद्याच्या कक्षेमध्ये आणण्याची भूमिका शासनाने घेण्याची आवश्यकता आहे. परसेंटाईलचा विषय असेल किंवा 90:10 चा कोटा ठरविण्याचा विषय असेल, असे आपल्याला कां करावे लागत आहे? या शाळांवर नियंत्रण नाही. त्यांची परीक्षा पध्दत वेगळी आहे, त्यांची मूल्यांकन पध्दत वेगळी आहे, त्यांची विषयांची रचना वेगळी आहे. हे सर्व आपल्याला बदलावे लागेल. त्या पध्दतीने आपल्या शिक्षण व्यवस्थेमध्ये, परीक्षा पध्दतीमध्ये, मूल्यांकन पध्दतीमध्ये बदल करावा लागेल.

सभापती महोदय, कॉपी प्रकरणाच्या संदर्भात, कॉपी करण्याचे गैरप्रकार कसे रोखता येतील यासाठी या राज्यातील एसएससी मंडळाने चांगले प्रयत्न केले. गैरप्रकार होण्यासाठी जी कारणे आहेत ती शोधून आपण मूळावरच घाव घातला पाहिजे. शाळेला अनुदान देण्यासाठी शाळेची गुणांची टक्केवारी बघितली जाते. त्या शाळेमध्ये किती टक्के रिझल्ट लागतो हे पाहिले जाते. अशावेळी संस्थाचालक आपल्या शाळेला अनुदान मिळविण्यासाठी त्या शाळेचा जास्तीत जास्त निकाल कसा लागेल यादृष्टीने प्रयत्न करीत असतात. शाळेचा निकाल कमी लागला तर त्या शिक्षकांच्या पगारामध्ये कपात केली जाईल अशाप्रकारे त्या शाळेच्या शिक्षकांसाठी सुध्दा एक अन्यायकारक जी.आर. आपण काढला आहे. हे दोन्ही निर्णय जाचक असल्यामुळे अशाप्रकारच्या गैरप्रकाराच्या विषयाला चालना मिळते. म्हणून हे दोन्ही निर्णय बदलण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, ऑनलाईनच्या विषयामध्ये शासनाला यश मिळाले. त्यामध्ये अनेक अडचणी आल्यामुळे सुरुवातीला आम्हाला साशंकता वाटत होती. परंतु या अडचणी एमकेसीएलने निर्माण केल्या होत्या. त्यामुळे यावर्षी ऑनलाईनचे काम एमकेसीएलला द्यावयाचे की नाही याबाबत आपल्याला पुनर्विचार करावा लागेल. सभापती महोदय, रिक्त पदे भरण्यासंदर्भात सुध्दा शासनाने निश्चित धोरण स्वीकारण्याची आवश्यकता आहे. आमच्या ठाणे जिल्हयात 15 तालुके आहेत.

अशुद्धीत मत / शोधनीसाठी नाही

DGS/ KTG/ SBT/

श्री. रामनाथ मोते...

त्यापैकी 11 तालुक्यांमध्ये गट शिक्षणाधिकारी नेमले नाहीत. तरमग त्याठिकाणी कसा कारभार चालेल? त्यामुळे आपल्याकडे शासनाचे निर्णय राबविणारी यंत्रणा नसल्यामुळे आपल्या निर्णयाची अंमलबजावणी योग्य पध्दतीने होत नाही.

(यांनतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

म्हणून या सर्व समस्या निर्माण होत आहेत. शिक्षण क्षेत्रातील भ्रष्टाचार हा सुध्दा चिंतेचा विषय आहे. या बाबत शासनाने विचार करण्याची आवश्यकता आहे. पायाभूत पदे म्हणजे एका बाजूला आपण त्याचे विकेंद्रीकरण करावयाचे असे म्हणतो पण पदे वाढत आहेत. शिक्षण क्षेत्राला फक्त कोणत्याही बाबीसाठी वित्त विभागाकडे जावे लागते. मग शिक्षकांच्या पदांना, त्यांच्या नेमणुकीला मंजुरी मिळते. मग त्यांना पगार मिळतो.परंतु केवळ त्या पदांना मंजुरी नाही म्हणून अजूनही चार-चार वर्षे झाली तरी आमच्या हजारो शिक्षकांना वेतन मिळालेले नाही. शिक्षण संचालकांच्या अहवालाच्या आधारे पदे मंजूर केली जातात. त्यांना आपण सूचना द्यावयास पाहिजे. तसेच त्यांना अधिकार द्यावयास पाहिजे. सत्तेचे विकेंद्रीकरण करावे. तसे झाले तरच हे प्रश्न तातडीने सुटू शकतील. परंतु आम्हाला प्रत्येक बाबतीत शासनाकडे का जावे लागते ? हा मुद्दा आहे.

सभापती महोदय, शिक्षण सेवक योजनेच्या संदर्भात समितीचा अहवाल आलेला आहे. शिक्षण सेवकांच्या बाबतीत शासनाने चुकीचा निर्णय घेतलेला आहे. या राज्यामध्ये वेठबिगारी सुरु झाली आहे. त्यांच्या मानधनामध्ये वाढ करण्याचा विषय, त्यांच्या प्रशिक्षणाची सोय करण्याचा विषय महत्वाचा असून, याबाबतीत पवार समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी करण्याची आवश्यकता आहे. वेतनेतर अनुदान देण्याच्या संदर्भात, शाळांमध्ये तुकडया देण्याच्या संदर्भात आणि शिक्षण शुल्काबाबत कोणीच बोलले नाहीत. शिक्षण शुल्क समितीचा अहवाल नेटवर उपलब्ध झालेला आहे. या राज्यात 19,900 शाळा आहेत आणि याबाबतीत फक्त45 लोकांनी सूचना दिलेल्या आहेत. हा अत्यंत गंभीर विषय आहे. त्यामुळे याबाबतीत सुध्दा फेरविचार करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, शेवटचा मुद्दा असा आहे की, रात्र शाळांच्या संदर्भात शासनाने दिरंगाईचे धोरण अवलंबिले आहे. त्याबाबतीत शासनाने विचार करावा अशी विनंती करतो. धन्यवाद.

तालिका सभापती (श्री.अरविंद सावंत) : मी सन्माननीय सदस्यांच्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, माझ्याकडे माननीय सभापतींकडून पुन्हा-पुन्हा पत्र येत आहे की, सदरहू चर्चा लवकर संपविण्यात यावी. कारण त्यानंतर माननीय मंत्री महोदयांचे उत्तराचे भाषण होणार आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी मुद्दा रिपीट न करता, नवीन मुद्दा मांडावा.

. . . .5 एच-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, आद्य शिक्षिका सावित्रीबाई फुले, आद्य शिक्षक श्री. जोतिबा फुले आणि शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे, जे घेतल्यानंतर माणूस गुरगुरल्याशिवाय रहाणार नाही असे म्हणणारे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करुन मी अत्यंत थोडक्यात, या सभागृहाचा अधिक वेळ न घेता माझे विचार व्यक्त करणार आहे.

सभापती महोदय, एक गोष्ट निश्चित आहे की, आज शिक्षणाचे व्यापारीकरण आणि बाजारीकरण झाले आहे. त्याचा परिणाम असा झाला आहे की, लोकांमधील दरी वाढत आहे. असंघटित कामगाराचा मुलगा असेल, शेतमजुराचा मुलगा असेल, झोपडपट्टीमध्ये रहाणारा मुलगा असेल, हॉटेल कामगाराचा मुलगा असेल, बेघर ऊस तोड कामगारांचा मुलगा असेल, शाळाबाह्य मुले असतील, या सर्वांची शिक्षण विकत घेण्याची कपॅसिटी राहिलेली नाही. शिक्षण विकत घेण्याची त्यांची क्रयशक्ती राहिलेली नाही आणि आज दुर्दैवाने आपल्याला शिक्षण विकत मिळत असून, शिक्षण अत्यंत महाग झालेले आहे. आज शाळांची काय अवस्था आहे त्याबाबत मी फार बोलणार नाही. पण आजच्या स्पर्धेमुळे जिल्हा परिषदेच्या शाळा जवळपास मोडकळीस आलेल्या आहेत. याबाबतीत मला शासनाला एकच विनंती करावयाची आहे की, याबाबत कठोर निर्णय घेण्यात यावा. तसेच सध्याची जी शिक्षण व्यवस्था आहे, त्यातील परीक्षा पध्दती प्रथम बदलली पाहिजे. आज आपण स्मरणशक्तीची परीक्षा घेतो. एका मुलाच्या डोक्यावर दहा विषय लादावयाचे. मग एका विषयामध्ये त्याला 90 टक्के मार्क मिळतात आणि दुसऱ्या विषयामध्ये 25 मार्क मिळाल्याने तो नापास होतो, म्हणजेच त्याचा जो ब्रेन आहे, जी शक्ती आहे, ती देशाच्या विकास कामासाठी वापरावयाची असेल तर त्याला त्याच्या इच्छेप्रमाणे शिक्षण मिळाले पाहिजे.म्हणून अभ्यासक्रम आणि परीक्षा पध्दती पूर्णत: बदलण्याची गरज आहे. जॉब ओरिऐंटेड अभ्यासक्रम निर्माण करण्याची गरज आहे. आज शाळा या कारकून निर्माण करणारे कारखाने झालेले आहेत. दुसरे म्हणजे शिक्षणाच्या बाजारीकरणामुळे श्रीमंतांच्या हातात शाळा गेल्या आहेत. त्यातून जे निर्माण होत आहे, त्यामध्ये सर्व ब्रेन आज ड्रेन होऊ लागला आहे.त्यामुळे ब्रेन फक्त पैसे कमाविण्यासाठी आहे किंवा मग ती मुले देशाच्या बाहेर जाऊन तेथे काम करीत आहेत. हा जो प्रकार आहे, तो या शिक्षण पध्दतीचा दुष्परिणाम आहे. म्हणून मला असे म्हणावयाचे आहे की, याठिकाणी श्वेतपत्रिका काढली पाहिजे. तसेच शिक्षणाचे सार्वत्रिकरण करणे, शिक्षण सक्तीचे करणे, जॉब ओरिऐंटेड शिक्षण करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे सर्वांना शिक्षण मिळाले पाहिजे आणि मोफत शिक्षण मिळाले पाहिजे ..

. . . .5 एच-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशी पंचसूत्री घेऊन जर आपण पॉलिसी तयार केली आणि महाराष्ट्र शासनाने आहे त्या बजेटमध्ये पंचसूत्री कार्यक्रम हातामध्ये घेऊन काम करण्याचा प्रयत्न केला तर शिक्षणाच्या बाबतीत आपण निश्चितपणे सावित्रीबाई फुले, ज्योतिबा फुले यांचे स्वप्न साकार केल्याशिवाय रहाणार नाही. म्हणून मुलभूत जन्मत: सोन्याचा चमचा तोंडात घेऊन जन्मलेल्या लेकरालाच शिक्षण पाहिजे काय ? फुफट्यामध्ये, नाल्याच्या काठावर आणि गुडघ्याएवढया चिखलामध्ये जन्मलेल्या लेकराला शिक्षण नको काय ? शेवटी तेही या देशाचे नागरिक आहेत आणि हे मूल देखीलया देशाचे नागरिक आहे. त्यामुळे "बाय बर्थ" शिक्षणाचा अधिकार असला पाहिजे असा आपण विचार का करीत नाही ? असा विचार केला पाहिजे. तसेच शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण,जॉब ओरिऐंटेड शिक्षण,सक्तीचे शिक्षण, एज्युकेशन फॉर ऑल आणि फ्री एज्युकेशन ही पंचसूत्री घेऊन महाराष्ट्र शासनाने पुढे जावे अशा प्रकारची मी याठिकाणी विनंती करते आणि मला दोन शब्द बोलण्यासाठी संधी दिली त्याबद्दल आभार मानते. धन्यवाद.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवान साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, मी थेट या विषयावरच बोलायला सुरुवात करणार आहे. दि.20 जुलै, 2009 च्या कायम विनाअनुदानित शाळांचा कायम शब्द काढण्याचा शासनाने जो निर्णय केलेला आहे त्यामध्ये इयत्ता अकरावी, इयत्ता बारावीच्या तुकडयांचा आणि वर्गांचा समावेश करण्याची आवश्यकता आहे.त्याचबरोबर या शाळांना ताबडतोब अनुदान देण्याची गरज आहे. पाहिजे तर या शाळांकडून शंभर रुपयाच्या स्टँम्पपेपरवर मुल्यांकनाला आम्ही सामोरे जाऊ असे लिहून घ्यावे. कारण या शाळांमधील शिक्षक हे आत्महत्या करण्याच्या मनस्थितीत आहेत. गेली दहा वर्षे ते विनावेतन काम करीत आहेत.

सभापती महोदय. दि.15 जुलै,2009 रोजी शाळांना आणि तुकडयांना अनुदान दिलेले आहे परंतु या राज्यातील अनेक जिल्हयातील शिक्षणाधिकाऱ्यांनी त्या अनुदानाचे वितरण केलेले नाही ही गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. दि.15 जुलै, 2009 रोजी निधी उपलब्ध होऊन सुध्दा नोकरशाही हललेली नाही. तेव्हा हे अनुदान लवकरात लवकर त्या शाळांना आणि तुकडयांना देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, दिनांक 22/9/2009 ला शासनाने 38 शाळा निकषपात्र म्हणून घोषित केल्या आणि 80 शाळा अजून शिल्लक आहेत. या 80 शाळा पाच-सहा वेळा मुल्यांकनाला सामोरे गेल्या आहेत पण त्या अपात्र ठरलेल्या आहेत. या शाळा अत्यंत दुर्गम क्षेत्रात आहेत तेव्हा त्यांना विशेष सवलत देऊन या शाळांना अनुदान देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, मराठी माध्यमाच्या शाळा झपाटयाने बंद पडत आहेत. त्याबाबतीत तातडीने उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. पहिली उपाययोजना अशी की, निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर 3200 ते 3300 इंग्रजी माध्यमाच्या शाळांना मान्यता देण्यात आलेली आहे. त्या शाळा जूनमध्ये चालू झाल्या तर तेवढयाच मराठी माध्यमाच्या शाळा बंद पडतील म्हणून या इंग्रजी माध्यमाच्या शाळांना मान्यता देण्याचा जो निर्णय घेतला आहे त्याचा फेर विचार करण्याची गरज आहे. त्यासाठी प्रथम एक ब्रहत आराखडा तयार करावा. तो केवळ मराठी माध्यमांच्या शाळांसाठी ,

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवान साळुंखे.....

असू नये तर तो सर्व प्रकारच्या अगदी इंटरनॅशनल शाळांसाठीसुध्दा असावा अशी माझी सूचना आहे. तसेच ज्या वाडी, वस्तीत शाळांची आवश्यकता आहे तेथेच नवीन शाळांना मान्यता दिली जावी. शाळांचे सॅच्युरेशन झाल्यामुळे मराठी माध्यमांच्या शाळांवर त्याचा दुष्परिणाम होत आहे, त्याकडे सुध्दा लक्ष देण्याची गरज आहे.

सभापती महोदय, दि 25 नोव्हेंबर,2005 ला जो आकृतीबंध लावण्यात आलेला आहे याबाबतीत या सदनामध्ये अनेकवेळा अनेक सन्माननीय सदस्यांनी हा विषय मांडलेला आहे परंतु तो आकृतीबंध रद्द झाला नाही आणि शिक्षकेत्तर कर्मचारी जर शाळेत आले नाहीत तर शाळेच्या गुणवत्तेवर आणि एकूणच व्यवस्थापनावर त्याचे अतिशय अनिष्ट परिणाम होतील. आताच त्याचे परिणाम जाणवत आहेत. म्हणून माझी अशी सूचना आहे की, शासनाने विषाची परीक्षा जास्त वेळ बघू नये तो आकृतीबंध तातडीने रद्द करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, दि. 1 नोव्हेंबर, 2005 पासून लागू केलेली अंशदायी पेन्शन योजना आणयाचा खटाटोप चालला आहे तो बंद करावा आणि जुनीच पेन्शन योजना चालू ठेवावी याकडे मी शासनाचे लक्ष वेधू इच्छितो.

सभापती महोदय, शालेय पोषण आहाराच्या कामामुळे शाळागृहांची आणि शिक्षकांची अवस्था आचाऱ्यासारखी झालेली आहे. म्हणून मी शासनाला कळकळीची विनंती करतो की, हा शालेय पोषण आहार कंत्राटी पध्दतीने देण्याची व्यवस्था करण्यात यावी आणि त्या शाळेचे जे खानावळीत रुपांतर होत आहे, हॉटेलमध्ये रुपांतर होत आहे यातून त्यांची सुटका करण्ययात यावी. मी त्या व्यवस्थेबद्दल शासनाला धन्यवाद देतो पण यामध्ये शिक्षक आणि शाळा यामध्ये गुरफटल्या जात असल्यामुळे त्याचा विद्यार्थ्यांच्या अद्यापनावर परिणाम होत आहे.

सभापती महोदय, सर्वशिक्षा अभियानामध्ये शाळांची बांधकामे चालू आहेत. आतपर्यंत सुमारे 65 शिक्षकांनी आत्महत्या केल्या आहेत याचे कारण असे की, सरपंच आणि मुख्याध्यापक यांच्या सहीने बांधकामावर रक्कम खर्च होते. सरपंचाच्या दबावतंत्रामुळे शिक्षक बळी पडत आहे. म्हणून हे बांधकाचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाकडे देण्यात यावे आणि शाळेच्या मुख्याध्यापकाची त्या बांधकामातून सुटका करण्यात यावी, अशा प्रकारची मी याठिकाणी मागणी करतो.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवान साळुंखे.. . .

सभापती महोदय, आणखी एका गंभीर विषयाकडे मला याठिकाणी लक्ष वेधावयाचे आहे. महाराष्ट्रातील सर्व क्षेत्रिय अधिकारी, शिक्षणाधिकारी प्राथमिक, शिक्षणाधिकारी माध्यमिक वगैरे या सर्व ठिकाणी प्रचंड भ्रष्टाचार बोकाळला आहे. यावर तातडीने उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. आदरणीय श्री. शरद पवार यांनी एका ठिकाणी असे म्हटले होते की, राजकीय पुढाऱ्यांनी 'नाही' म्हणायला शिकले पाहिजे आणि सरकारी अधिकाऱ्यांनी 'होय' म्हणायला शिकले पाहिजे. सरकारी अधिकारी निगेटिव्ह ॲप्रोच घेत असतात म्हणून भ्रष्टाचार प्रचंडप्रमाणात वाढत आहे. म्हणून एखादा प्रस्ताव शिक्षण खात्यामध्ये कशा प्रकारे सादर करावा याबाबत प्रत्येक प्रस्तावच्या नमुन्याची एक प्रत तयार करण्यात यावी,त्या प्रस्तावासोबत कोणकोणती कागदपत्रे जोडण्यात यावीत हे निश्चित करावे आणि तो प्रस्ताव एकदा सादर केला की, एका महिन्यात त्याचा निपटारा केला जावा, तो पारदर्शी पध्दतीने केला जावा अशा प्रकारची पध्दती स्वीकारण्यात यावी. जो कोणी अधिकारी अशा पध्दतीने प्रस्तावांचा निपटारा करणार नाही त्याला अकार्यक्षम समजून त्याच्यावर कारवाई करण्याची पध्दती रुढ करावी. म्हणजे भ्रष्टाचार नष्ट होईल आणि प्रशासनाला गती सुध्दा येईल.

सभापती महोदय, मध्यंतरी माध्यमिक शाळांमधील बंद पडणाऱ्या तुकडयांमुळे विद्यार्थ्यांची संख्या कमी केली. तीच अट प्राथमिक शाळांना सुध्दा लावण्याची आवश्यकता आहे कारण मराठी माध्यमाच्या प्राथमिक शाळा मोठया प्रमाणात बंद पडत आहेत.

सभापती महोदय, सुप्रिम कोर्टाच्या आदेशान्वये माध्यमिक शाळामध्ये, उच्च माध्यमिक शाळांमध्ये आणि सीनिअर कॉलेजमध्ये सुध्दा पर्यावरण हा विषय आलेला आहे. पण पर्यावरण शिकविणारा जो प्रध्यापक आहे किंवा शिक्षक आहे त्याला पाचशे रुपये सुध्दा पगार मिळत नाही.

यानंतर श्री. बरवड...

अशुद्धारित प्रत / शीघ्रलेखाची नाही

श्री. भगवान साळुंखे.....

एम.सी.एम.झालेला, पर्यावरणशास्त्र शिकलेला शिक्षक आहे पण त्याला मात्र 500 रुपयांमध्ये राबावे लागते. त्यासाठी आर्थिक तरतूद करण्याची आवश्यकता आहे. त्यांनाही ताबडतोब वेतन दिले पाहिजे. उच्च माध्यमिकमध्ये आणि सिनियर कॉलेजेसमध्ये सुध्दा माहिती व तंत्रज्ञान हा विषय शिकविला जातो. त्याही प्राध्यापकांना आपण योग्य वेतन देत नाही. त्यांच्या हाताखाली शिकलेले विद्यार्थी पॅकेज सिस्टिममध्ये 1 लाख रुपये घेतात आणि तो प्राध्यापक मात्र 1 हजार रुपयांमध्ये, 2 हजार रुपयांमध्ये काम करीत असतो. तो एम.सी.एम. झालेला असतो त्यालाही वेतन देण्याची गरज आहे. आपल्या राज्यामध्ये केंद्र शासनाच्या आदेशानुसार 288 केंद्रीय शाळा चालू आहेत पण तेथील शिक्षकांच्या बाबतीत आमचे सरकार असे सांगते की, हे केंद्र सरकारचे बाळ आहे, आम्ही काही दत्तक घेणार नाही. राज्य सरकारने ताबडतोब या 288 शाळांना अनुदान देण्याची गरज आहे. कारण तेथील शिक्षक कमालीच्या दुरावस्थेमध्ये जीवन जगत आहे. याबाबत शासनाने विचार करावा अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. एम. एम. शेख (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी नियम 260 अन्वये जो प्रस्ताव मांडलेला आहे त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

शिक्षण हा शब्दच असा आहे की ज्या शिक्षणामुळे तुम्ही आम्ही सर्व या पदापर्यंत आज पोहोचलेलो आहोत. त्याची गोडी म्हणजे अमृताहुनी गोड असे हे शिक्षण आहे आणि त्या शिक्षणावर जी चर्चा चालू आहे तो शैक्षणिक दर्जा सुधारण्यासाठी मी एवढेच सांगेन की, जिल्हा परिषदांमध्ये आणि महानगरपालिकांमध्ये शैक्षणिक दर्जा सुधारणे आवश्यक आहे. मी शासनाचे अभिनंदनही करीन. कारण मागील अधिवेशनामध्ये आम्ही कायम हा शब्द काढून टाकण्यासाठी वारंवार या सभागृहातील सदस्यांनी मागणी केली आणि 65 हजार शिक्षकांना त्यावेळी दिलासा मिळाला. थोडा दिया है, और भी थोडा देना बाकी है. शिक्षा मंत्री महोदय बहुत बडे दिल वाले है. म्हणून आम्ही आज ज्या मागण्या करतो त्याचा आपण विचार करावा. आताच आमच्या बऱ्याच सन्माननीय सदस्यांनी काही गोष्टींचा या ठिकाणी उल्लेख केलेला आहे. 65 हजार शिक्षकांना दिलासा दिला परंतु ज्या शाळांच्या बाबतीत आपण कायम हा शब्द काढला आणि विनाअनुदानित हे तत्व पत्करले त्या शाळांचे मूल्यांकन लवकरात लवकर होणे आवश्यक आहे. कारण ज्या शाळा 10 वर्षापासून आजपर्यंत चालत आहेत त्यांना कमीत कमी 100 टक्क्यावर आणण्याची गरज आहे. ज्या शाळांना चार वर्षे, पाच वर्षे झालेली आहेत त्यांना 20 टक्के अनुदान देण्याची गरज आहे.

सभापती महोदय, मी दुसरा महत्वाचा विषय सांगेन की, प्राथमिक शिक्षण हे जर शासन सक्तीचे करीत आहे आणि घटनेप्रमाणे आपल्याला जर शिक्षण मिळाले पाहिजे तर प्राथमिक शिक्षण देत असताना ज्या प्राथमिक शाळा आहेत, ज्या शाळेमध्ये 500 विद्यार्थी संख्या आहे, पूर्वी आपले असे निकष होते की, चिपळूणकर पॅटर्नप्रमाणे त्या ठिकाणी 1 शिपाई आणि 1 क्लर्कची मान्यता देत होतो परंतु मध्यंतरी शासनाने चिपळूणकर पॅटन रद्द केला आणि नंतर एस.एस. कोड प्रमाणे कार्यवाही सुरु केलेली आहे. परंतु एस. एस. कोड प्रमाणे कार्यवाही करीत असताना मध्यंतरी 25.11.2006 ला एक जी.आर. निघाला. त्यामध्ये ज्या अटी घालण्यात आल्या त्या अटी आणि एस.एस. कोडमध्ये असलेल्या अटी या दोन्हीमध्ये जे अनुज्ञेय असतील त्या नियमाप्रमाणे शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात यावी. बरेच शिक्षकेतर कर्मचारी पाच वर्षापासून काम करीत आहेत,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. एम. एम. शेख ...

सहा वर्षापासून काम करीत आहेत परंतु त्यांना मान्यता मिळत नाही, वेतन मिळत नाही. आज त्यांच्यावर उपासमारीची वेळ आलेली आहे. दुसरी एक बाब मी सांगेन की, उर्दू शाळांना मान्यता दिली, इंग्रजी शाळांना मान्यता दिली त्याप्रमाणे मराठी शाळांना सुध्दा मान्यता द्यावयास पाहिजे. कारण ज्या गावामध्ये 10 हजारपेक्षा जास्त लोकसंख्या आहे त्या ठिकाणी जर एक माध्यमिक विद्यालय असेल तर त्या ठिकाणी दुसरे माध्यमिक विद्यालय देण्याची आवश्यकता आहे. दुसरी 5 किलोमीटरची जी अट आहे ती सुध्दा शासनाने रद्द करावयास पाहिजे. बऱ्याचशा खेड्यांमध्ये इयत्ता सातवीपर्यंत शाळा आहे. माझ्याकडे आकडेवारी आहे. ग्रामीण भागामध्ये उर्दूच्या 500 शाळा अशा आहेत की त्या ठिकाणी सातवीपर्यंत शिक्षणाची सोय आहे परंतु त्या ठिकाणी हायस्कुलची व्यवस्था नाही. ज्या ठिकाणी सातवी पर्यंत शाळा आहे मग त्या मराठी माध्यमाच्या असो किंवा उर्दू माध्यमाच्या असो त्या ठिकाणी आपण माध्यमिक विद्यालयाची मान्यता द्यावयास पाहिजे आणि ज्या ठिकाणी माध्यमिक विद्यालय आहे त्या ठिकाणी इयत्ता अकरावी आणि बारावी असलेल्या ज्युनियर कॉलेजची मान्यता द्यावयास पाहिजे. कारण आमच्या मुली दहावीपर्यंत शिक्षण घेतात आणि 5 किलोमीटर, 10 किलोमीटरवर ज्युनिअर कॉलेज असले तर अकरावीच्या शिक्षणासाठी त्या ठिकाणी जात नाहीत. त्याच ठिकाणी त्यांचे शिक्षण बंद पडते आणि त्या बिचाऱ्या घरकामाला लागतात. माझी माननीय शिक्षण मंत्रिमहोदयांना विनंती आहे की, ज्या ठिकाणी माध्यमिक विद्यालये असतील त्या सर्व ठिकाणी ज्युनियर कॉलेजेस देण्यात यावीत. गळतीचे प्रमाण सुधारण्यासाठी सुध्दा शासन स्तरावर प्रयत्न व्हावयास पाहिजे. वेतनेतर अनुदानाचा प्रश्न बऱ्याचशा सन्माननीय सदस्यांनी मांडला. बऱ्याच ठिकाणी 2004 पासून वेतजनेतर अनुदान दिले नसल्यामुळे ग्रामीण भागात बऱ्याचशा शाळा झाडाखाली भरण्यास सुरुवात झालेली आहे. कारण त्या इमारतीचे भाडे देण्यासाठी त्यांच्याकडे पैसे नाहीत. बऱ्याचशा शाळा चावडीवर भरत आहेत. कारण त्यांच्याकडे पैसे नाहीत.

यानंतर श्री. खंदारे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एम.एम.शेख....

वेतनेतर अनुदानाचा गहन प्रश्न निर्माण झाला आहे त्याचाही मंत्रिमहोदयांनी विचार करावा. आम्हाला क्वांटिटी एज्यूकेशन नको तर क्वालिटी एज्यूकेशन पाहिजे. तसेच गेल्या 35 वर्षांपासून अकरावीचा व बारावीचा अभ्यासक्रम चालू आहे तो बदलणे आवश्यक आहे. व्यावसायभिमुख नवीन अभ्यासक्रम लागू केला पाहिजे. मानवतेच्या आधारावर व सामाजिक बांधिलकीच्या आधारावर शासनाने समिती नेमावी आणि तिच्या अहवालावर विचार करुन शिक्षण दिले पाहिजे असे नमूद करतो. शेवटी मी एक शेर सांगून मी माझे भाषण संपविणार आहे.

"हयात लेकर चलो
कायनात लेकर चलो
चलो तो सारे जमाने को
साथ लेकर चलो"

धन्यवाद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, शिक्षणाचा एका अर्थाने पाया म्हणजे बालवाडी आहे. त्याठिकाणी शिक्षणाचे सार्वत्रिक धोरण असल्यामुळे एखाद्या गल्लीमध्ये एखाद्या महिलेला वाटते की, आपण बालवाडी सुरु करावी. परंतु त्या बालवाडीचा अभ्यासक्रम काय असावा, फी किती असावी याच्यावर निर्बंध नसल्यामुळे एक संस्कार केंद्र म्हणून ज्याच्याकडे पाहिले पाहिजे ते केंद्र आता पैसा कमाविण्याचे साधन झाले आहे. म्हणून कोणीही उठावे आणि बालवाडी काढावी इतके स्वातंत्र्य असता कामा नये. त्यावर शासनाचा अंकुश असला पाहिजे. तसेच समाजामध्ये वेगवेगळया प्रकारच्या शाळा आहेत. पूर्वीच्या जाती संपल्या आता नवीन जात निर्माण झाली आहे. निवासी शाळा आहेत त्यांची वार्षिक फी 35 हजार रुपये, 40 हजार रुपये असते. एका बाजूला महानगरपालिका, नगरपालिकेच्या शाळेत शिकणा-या विद्यार्थ्यांकडे फी देण्यासाठी पैसे नाहीत. दुस-या बाजूला निवासी शाळांचा नवीन उद्योग सुरु झाला आहे. त्या शाळांच्या फीवर नियंत्रण असणे आवश्यक आहे. आज नगरपालिकेच्या, महानगरपालिकेच्या शाळा ओस पडत चालल्या आहेत. या शाळा चांगल्या शिक्षण संस्थांना दिल्या पाहिजेत. त्यामुळे नगरपालिका व महानगरपालिकांच्या शाळांमध्ये ऊर्जितावस्था निर्माण होईल. कोल्हापूर महानगरपालिकेने हा प्रयोग सुरु केला असून तो यशस्वी झालेला आहे. या शाळा अतिशय उत्तम इमारतीमध्ये असतात. त्यामुळे काही शाळा अशा संस्थांना देण्याचा विचार केला पाहिजे.

सभापती महोदय, 1975 साली 10 + 3 + 2 असा पॅटर्न सुरु झाला. गेल्या 34 वर्षापासून त्याचा पुनर्विचार केलेला नाही. 34 वर्षे एकच शिक्षण पध्दती चालू ठेवणे हे न्यायात बसत नाही. त्यामुळे त्या शिक्षण पध्दतीची समिक्षा केली पाहिजे. तसेच 10 + 2 पॅटर्नप्रमाणे व्यावसायभिमुख शिक्षण देऊ शकलो काय ? विद्यार्थी कॉलेजमध्ये जातो पण तो विद्यार्थी कालांतराने उद्योगाकडे गेला आहे काय हे पाहिले पाहिजे.

सभापती महोदय, मुलींच्या शिक्षणाचे प्रमाण वाढविले पाहिजे परंतु त्यासाठी पासिंगची मर्यादा आहे. त्यांना अधिकाधिक पुढे सरकविले पाहिजे. जोपर्यंत मुलींच्या शिक्षणासाठी वेगळा विचार करणार नाही तोपर्यंत यात सुधारणा होणार नाही. एका बाजुला मुली मुलांपेक्षा पुढे आहेत असे म्हटले जाते, आज मेरिटमध्ये मुली येत आहेत. पण मुलींच्या शिक्षणांचा कालावधी जास्त

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ SBT/

श्री.चंद्रकांत पाटील....

आहे. त्यांच्यासाठी वेगळा पॅटर्न अंमलात आणता येईल काय याचा विचार केला पाहिजे. या चर्चेला माननीय शिक्षण मंत्री उत्तर देणार आहेत आणि शिक्षणासंबंधी अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले मते व्यक्त केलेली आहेत. त्यामुळे मी त्याची पुनरावृत्ती न करता मी ज्या काही सूचना केल्या आहेत त्यावर मंत्रिमहोदयांनी विचार करावा आणि त्याचा अंतर्भाव त्यांनी आपल्या उत्तराच्या भाषणात करावा अशी विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो.

यानंतर श्री.शिगम

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाळासाहेब थोरात (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी शिक्षणाच्या संदर्भात नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर या सदनामध्ये काल आणि आज विस्तृत अशी चर्चा झाली. सर्व सन्माननीय सदस्यांनी अत्यंत चांगल्या पध्दतीने या ठिकाणी विविध मुद्दे मांडलेले आहेत. गेली 10 वर्षे मी मंत्री म्हणून काम केले. पाटबंधारे आणि कृषी खात्याचा कार्यभार मी सांभाळला. आता शिक्षण विभागाचा भार माझ्यावर आलेला आहे. मी पहातोय की या शिक्षण क्षेत्राचे दालन खूप मोठे आहे. या क्षेत्रामध्ये खूप विविधता पहायला मिळत आहे. शिक्षण क्षेत्रातील विविध अशा प्रश्नांवर या विधान परिषदेमध्ये खूप चर्चा होत असल्याचे मी पाहिलेले आहे. एक गोष्ट मी मान्य करतो की, या विधानपरिषदेमध्ये अतिशय उपयुक्त असे निर्णय झालेले मी पाहिलेले आहेत. मराठवाडा आणि विदर्भातील अनुशेष दूर करण्याचा मुद्दा या विधानपरिषदेच्या माध्यमातून उपस्थित करण्यात आला. नियम 260 अन्वये शिक्षणाच्या संदर्भात झालेल्या चर्चेमध्ये सन्माननीय सदस्यांनी अत्यंत चांगले मुद्दे मांडलेले आहेत. या चर्चेला सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी सुरुवात केली आणि सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत पाटील यांनी शेवटी भाषण केले. या चर्चेमध्ये शिक्षण क्षेत्रातील अनेक दिग्गज अशा सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला. या विधानपरिषदेमध्ये शिक्षकांचे प्रतिनिधी निवडून येतात. त्यामुळे शिक्षण क्षेत्रातील क्रीम असणारी ही माणसे आहेत. या मान्यवरांनी शिक्षण क्षेत्रामध्ये आयुष्यभर काम केलेले आहे. अशी माणसे जेव्हा चर्चेमध्ये सहभागी होतात त्यावेळी ती ख-याअर्थाने सांगोपांग चर्चा होते आणि तशी चर्चा या ठिकाणी झालेली आहे. या चर्चेमध्ये भाग घेतलेल्या सदस्यांनी आपापल्या भाषणातून याठिकाणी 87 मुद्दे मांडलेले आहेत. त्या मुद्यांची नोंद आम्ही घेतलेली आहे. या मुद्याद्वारे शिक्षण क्षेत्रातील अनेक प्रश्न मला समजलेले आहेत आणि ते सन्माननीय सदस्यांकडून आणखीन समजून घेण्याचा प्रयत्न करीन अशी मी ग्वाही देतो.

सभापती महोदय, समाजाच्या, राज्याच्या आणि देशाच्या विकासाचे मुख्य क्षेत्र कोणते असेल तर ते शिक्षण क्षेत्र होय. विधानसभेचे माजी अध्यक्ष आणि या सदनाचे सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी यांनी असा उल्लेख केला की, अमर्त्य सेन यांनी असे सांगितले आहे की, त्यांना इतर कोणत्याही क्षेत्रापेक्षा शिक्षण क्षेत्रात काम करायला आवडेल. त्यांचे म्हणणे योग्य आहे. जो देश शिक्षणामध्ये पुढे जातो तोच देश सामर्थ्यवान बनतो. आपल्या देशातील महात्मा फुले, सावित्रिबाई

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. बाळासाहेब थोरात...

फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यासारख्या समाजसुधारकांनी आणि संत गाडगेबाबा सारख्या संतांनी हीच शिकवण दिलेली आहे. प्रत्येक माणसाने शिकले पाहिजे हा विचार त्यांनी दिला. त्याच विचाराने या शिक्षण क्षेत्रामध्ये राज्य शासनाच्या माध्यमातून मोठे काम केले जात आहे. स्वातंत्र्यानंतर आणि संयुक्त महाराष्ट्र झाल्यानंतर आपण शिक्षण क्षेत्रात भरीव काम केलेले आहे. एक कि.मी.च्या आत प्राथमिक शाळा आणि 5 कि.मी.च्या आत महाविद्यालय करण्याचा निर्णय आपण घेतला. शिक्षणाचे जास्तीत जास्त सार्वत्रिकीकरण झाले पाहिजे असा आपला प्रयत्न राहिला. प्रत्येक मुलाला आणि मुलीला शिक्षणाची संधी कशी मिळेल यादृष्टी आपण प्रयत्न केले. प्राथमिक शाळांतून विद्यार्थ्यांना कसे दर्जेदार आणि गुणात्मक शिक्षण मिळेल या भावनेतून पुढच्या कालखंडात आपणा सर्वांना काम करावे लागेल हे मी नाकारत नाही. राज्याचे 90 हजार कोटीचे बजेट आहे आणि त्यातील 18 हजार कोटी रुपये आपण शिक्षणावर खर्च करीत आहोत.

...नंतर श्री.पी. खर्चे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाळासाहेब थोरात ....

हे या निमित्ताने मी सांगू इच्छितो. साधारणपणे 20 टक्के तरतूद आपण शिक्षणावर करीत असतो हे नाकारता येणार नाही. ही जास्त आहे असे मी म्हणणार नाही. पण सहावा वेतन आयोग राज्यातील कर्मचाऱ्यांना लागू केला व त्यानुसार पगार सुरु झाले त्यापोटी द्यावयाची जी रक्कम आहे ती देखील कमी नाही. ती रक्कम जवळपास 3000 कोटी रुपयाची असून ही पुरवणी मागणी याच अधिवेशनामध्ये आपण मंजूर करुन घेतली आहे. पुढील वर्षात देखील शिक्षणावरील खर्च पाहिला तर फार मोठा खर्च होणार आहे याची शासनाला जाणीव आहे. यामध्ये काही प्रश्न निश्चितपणे निर्माण होतात ज्यांचा उल्लेख सभागृहात सदस्यांनी केला. विशेषत: यामध्ये वेतनेत्तर अनुदानाचाही उल्लेख झालेला आहे. सन 2001 पर्यंत हे वेतनेत्तर अनुदान राज्यात सुरु होते परंतु सन 2001 ला शासनाने निर्णय घेतला आणि टप्प्याटप्प्याने वेतनेत्तर अनुदान बंद करण्यात आले ते सन 2004 नंतर पूर्णपणे बंद करण्यात आले. परंतु ज्यावेळी शाळा चालविल्या जातात त्याबरोबरच इतर खर्च सुध्दा असतात तो खर्च भागविण्यासाठी वेतनेत्तर अनुदान अत्यंत आवश्यक आहे, ही मी नाकारत नाही. सन्माननीय सदस्य श्री. शेख यांनी सांगितले की, आपले शिक्षण मंत्री मोठ्या दिलाचे आहेत. पण मी त्यांना सांगणार आहे की, केवळ मी मोठ्या दिलाचा असून चालणार नाही तर वित्त विभागाचे दिल सुध्दा मोठेच असावे लागते. अशा प्रकारे वेतनेत्तर अनुदानाचा आग्रह सर्वच सन्माननीय सदस्यांचा दिसत आहे. यासंदर्भात शासनाने एक समिती गठित केली होती. त्या मंत्रिमंडळाच्या उप समितीने निर्णय दिला की, पाचव्या वेतन आयोगाच्या अनुदानानुसार 5 टक्के इतके वेतनेत्तर अनुदान द्यावे. त्यात 4 टक्के वेतनेत्तर अनुदान आणि 1 टक्का इमारत भाडे असे देण्यात यावे. यामुळे साधारणपणे 260 कोटीची भर शासनावर पडणार आहे. तसेच सर्व शिक्षा अभियान योजनेतून केंद्रशासनाचे जवळपास 140 कोटीचे वेतनेत्तर अनुदान उपलब्ध होते. त्या व्यतिरिक्त आणखी 500 प्रमाणे प्रत्येक विद्यार्थ्यामागे अशा प्रकारे 21 कोटी एवढे अनुदान राज्याला केंद्राकडून मिळते. याशिवाय वेतनेत्तर अनुदान हा महत्वाचा भाग असून त्यासंबंधी मंत्रिमंडळासमोर विषय मांडला जाईल आणि लवकरच ते कसे मिळेल असाही आमचा प्रयत्न राहील. शिक्षण सेवक ही योजना शासनाने या राज्यात सुरु केलेली आहे, त्यासंबंधीची चर्चाही येथे करण्यात आली. ज्याप्रमाणे शिक्षण सेवक भरण्यात येतात त्यप्रमाणेच

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाळासाहेब थोरात .....

कृषी सेवक आणि कंत्राटी ग्रामसेवकांची सुध्दा आपण भरती करतो. हे करीत असताना तीन वर्षासाठी मर्यादित स्वरुपात रक्कम देऊन अशा मर्यादित पगारावर त्यांना आपण घेतो. नंतर तीन वर्षांनी शिक्षकाचा दर्जा देण्यात येतो असा निर्णय आपण घेतला आहे. माध्यमिक शाळांतील शिक्षकांसाठी 4 हजार रुपये आणि उच्च माध्यमिक शाळातील शिक्षकांना 5 हजार रुपये आपण देतो. हे खरे आहे की, ही रक्कम अत्यंत कमी आहे. परंतु यासंदर्भात सुध्दा एक समिती गठित करण्यात आली असून त्या समितीने हे अनुदान वाढ करण्याची शिफारस केली आहे. त्याबाबतही मंत्रिमंडळासमोर हा विषय नेण्यात येईल व या रकमेत वाढ करण्याचा निर्णय घेतला जाईल. अडचणी येत असतात हे सर्वांनाच माहीत आहे. मंत्रिमंडळाची स्थापना झाल्या झाल्याच या सर्वात महत्वाच्या विषयाबाबत मला निर्णय घ्यावयाचा होता परंतु कोकणात तसेच राज्यात फयान वादळाचा तडाखा बसल्यामुळे काही काळ आपल्याला पुढे जावे लागले. तरी देखील यातून लवकरच मार्ग काढण्यात येईल. शेवटी राज्यात एकत्रित बजेटमध्ये काही अडचणी येत असतात परंतु प्राधान्याने हा प्रश्न सुटावा अशा प्रयत्नात मी आहे. याशिवाय दुसरा प्रश्न असा निर्माण झाला तसेच अनेक सदस्यांनीही त्याचा उल्लेख केला. तो म्हणजे मध्यंतरीच्या काळात शासनाने कायमस्वरुपी विनाअनुदानित हा शब्द शाळांना मंजुरी देताना टाकला आणि मंजुरी दिल्या. पूर्वी विना अनुदानित असा शब्द होता. त्याचा अर्थ असा की, ठराविक काळात टप्प्याटप्प्याने या शाळांना अनुदान मिळत होते. पण कायम विना अनुदानित हा शब्द आला.....

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाळासाहेब थोरात....

सन्माननीय सदस्यांच्या मताशी मी सहमत आहे परंतु तुमच्या मतापेक्षा मी थोडे वेगळे सांगतो की, कायम स्वरुपी विनाअनुदानितचा प्रश्न हा केवळ शिक्षकांपुरता मर्यादित आहे असे मी मानत नाही. उलट मी असे म्हणतो की, कायम स्वरुपी विनाअनुदानितच्या निमित्ताने ज्या शाळा सुरु झाल्या त्यामुळे ग्रामीण भागातील मुलींचे शिक्षण सुरु झाले ही महत्वाची गोष्ट आपल्याला नाकरता येणार नाही. कायमस्वरुपी विनाअनुदानितच्या शाळेतील शिक्षकांमध्ये अडचणी निर्माण झाल्या असतील परंतु या शाळा उघडल्या गेल्या नसत्या तर ग्रामीण भागातील मुली शिक्षण घेऊ शकल्या नसत्या. एक वेळेस मुलगा बाहेरगावी जाऊन शिक्षण घेऊ शकतो परंतु मुली बाहेरगावी जाऊन शिक्षण घेऊ शकत नाही. आज सर्व विद्यालयांमधून मुलींना शिक्षण मिळू लागले ते कायमस्वरुपी विनाअनुदानितच्या मुळेच शक्य झालेले आहे. आपण पहिला टप्पा विनाअनुदानितचा केलेला आहे. आपल्याला यासाठी 1912 पासून अनुदान द्यावयाचे आहे. या ठिकाणी माननीय गृहमंत्री उपस्थित आहेत, खरे म्हणजे त्यांनी शिक्षणाच्या मुद्यावर ख-या अर्थाने सपोर्ट द्यावयास पाहिजे. शाळेतील शिक्षकांसाठी काही निर्णय करण्याची आवश्यकता आता निर्माण झालेली आहे. ग्रामीण भागात कायम स्वरुपी विनाअनुदानितच्या शाळा सुरु झाल्या नसत्या तर त्या ठिकाणच्या मुलींना सातवीपर्यंतच शिक्षण घेता आले असते आणि पुढे शिक्षणाची काही संधी मिळत नाही म्हणून त्यांचे लग्नही झाले असते. या शाळांमुळे ग्रामीण भागातील मुली कमितकमी दहावी पर्यंत शिक्षण घ्यावयास लागल्या, बारावी पर्यंतचे शिक्षण घेऊ लागल्या त्यानंतर या मुली अजून धाडसी झाल्या व सायकलवरुन कॉलेजमध्येही जाऊ लागल्या. ग्रामीण भागातील मुलींच्या शिक्षणाचे प्रमाण खूप मोठे आहे हे मी या ठिकाणी आत्मविश्वासने सांगू शकतो. उच्च माध्यमिकच्या बाबतीत सुध्दा "कायम" असा शब्द आहे. ग्रामीण भागातील ज्या उच्च माध्यमिकच्या शाळा आहे त्या ठिकाणी सायन्सचे शिक्षण मिळू शकेल यासाठी मी प्रयत्न करणार आहे. मी जिल्हा परिषदेच्या शाळेतून शिक्षण घेऊन येथपर्यंत आलेलो आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना चांगल्या प्रकारचे शिक्षण द्यावयाचे असेल तर ग्रामीण भागात सायन्सच्या अकरावी आणि बारावीच्या शाखा जास्तीत जास्त काढण्याची आवश्यकता आहे असे मला वाटते. सगळया परिस्थितीचा विचार करुन आपण आता "कायम" हा शब्द काढून त्यांना

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाळासाहेब थोरात....

विनाअनुदान तत्वावर शाळा देत आहोत. या ठिकाणी काही सन्माननीय सदस्यांनी मुल्यांकन लवकरात लवकर सुरु करण्यात यावे यासंदर्भात प्रश्न उपस्थित केलेला आहे. मुल्यांकन सुरु करण्यासाठी प्रधान सचिव यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत केली असून जानेवारी महिन्यापासून मुल्यांकन सुरु करण्याचा आमचा प्रयत्न आहे हे मी या निमित्ताने येथे सांगू इच्छितो.

शिक्षणाचा दर्जा सुधारण्याच्या संदर्भात या ठिकाणी खूप चांगली चर्चा झालेली आहे. सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील साहेबांनी शिक्षणाचा दर्जा कसा उच्च करता येईल यासंदर्भात विचार व्यक्त केलेले आहेत. एनसीईआरटीचा जो आराखडा आहे त्यामध्ये अभ्यास करुन आपला शैक्षणिक दर्जा राष्ट्रीय दर्जाचा करण्याचा आपल्याला प्रयत्न करावा लागेल. या ठिकाणी अजून एक महत्वाचा प्रश्न उपस्थित करण्यात आलेला आहे आणि तो म्हणजे सीबीएसई, आयसीएसई. आपल्या महाराष्ट्रात सीबीएसई, आयसीएसई सारखे बोर्ड आहेत. या शाळांचा आपल्याला सामना करावा लागणार आहे. एका बाजूला सीबीएसई, आयसीएसई बोर्ड आहे तर दुस-या बाजूला एसएससी बोर्ड आहे. यामुळे पूर्ण समाजात दोन वर्ग तयार होत आहेत हे आपल्याला नाकरता येत नाही. सीबीएसई, आयसीएसईच्या बोर्डचा विद्यार्थी हा विशिष्ट समाजातील, विशिष्ट वर्गाचा आहे. या बोर्डचे लक्ष ठरलेले असून त्या दृष्टीने विद्यार्थ्यांना ते शिकवण्याचा प्रयत्न करीत आहेत. सीबीएसई, आयसीएसई यांच्या बरोबर स्पर्धा करीत असतांना आपल्याला हा विचार करावा लागणार आहे की, आपला विद्यार्थी मुंबईत, पुण्यात, जिल्हयाच्या ठिकाणी किंवा गडचिरोली सारख्या जिल्हयातील एका खेडयात शिकतो आहे. हा विद्यार्थी आपल्या बोर्डाच्या अभ्यासक्रमातून जातो आहे याचा विचार आपल्याला करावा लागणार आहे. जो ग्रामीण भागात शिक्षण घेतो त्याला सुध्दा आपल्याला शहरी भागाच्या विद्यार्थ्यांबरोबर घेऊन जावयाचे आहे. सीबीएसई, आयसीएसई बरोबर स्पर्धा करीत असतांना काही अडचणी निर्माण होऊ नये यासाठी सुध्दा आपल्याला काळजी घ्यावी लागत असते.

तालिका सभापती : एसएससी बोर्डची तसेच सीबीएसई, आयसीएसईच्या बोर्डाची परीक्षा पध्दती वेगवेगळी आहे त्यामुळे यासंदर्भात काही प्रयत्न करता आला तर तो आपण करावा.

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, सीबीएसई, आयसीएसई बोर्डचे टारगेट वेगळे आहे, त्यांच्या मर्यादा कमी आहेत परंतु आपल्या एसएससी बोर्डचा विस्तार खूप मोठया प्रमाणात आहे. आपल्या बोर्डाचा दर्जा उंचावत असतांना ग्रामीण भागाती विद्यार्थ्यांवर सुध्दा आपल्याला लक्ष केंद्रित करावे लागत असते.

यानंतर श्री. गायकवाड.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील :सभापती महोदय, आपण अभ्यासक्रमामध्ये बदल करीत नाही व जुनाच अभ्यासक्रम शिकवत आहोत. बिहार आणि केरळ ही दोन राज्ये आपल्या पेक्षा पुढे गेलेली आहेत तेव्हा ही दोन राज्ये आपल्यापेक्षा का पुढे गेलेली आहेत यासबंधी खुलासा करावा.

तालिका सभापती : राईट ऑफ रिप्लायच्या वेळी सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी मिळणार आहे त्यावेळी त्यांनी बोलावे.

श्री.बाळासाहेब थोरात :सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना मी स्पष्टपणे सांगू इच्छितो की, केरळची शिक्षणाची जी संस्कृती आहे ती एखाद्या चळवळीमध्ये रुपांतरित झालेली आहे.केरळ मधील सगळया शाळा जरी बंद केल्या तरी तेथील शिक्षण चालूच राहील असे म्हटले जाते. केरळ राज्यात शिक्षणाच्या बाबतीत इतके चांगले वातावरण आहे हे मी नाकारत नाही. आपल्याकडे मात्र वेगळी परिस्थिती आहे. काहीही झाले तरी सर्वांना बरोबर घेण्याचा आपला प्रयत्न राहणार आहे.परंतु हा प्रयत्न करीत असतांना शिक्षणाच्या बाबतीत जे राष्ट्रीय धोरण ठरविण्यात आलेले आहे त्याप्रमाणे आपण कार्यवाही करणार आहोत. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार जो राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा तयार केलेला आहे त्याप्रमाणे आपण अभ्यासक्रम तयार करणार आहोत. मी या ठिकाणी सी.बी.एस.ई.संबंधी बोलत नाही तर आपला जो राष्ट्रीय आराखडा ठरविण्यात आलेला आहे तो पुढे नेण्याचा शासनाचा प्रयत्न आहे.सभापती महोदय, आपल्या अभ्यासक्रमातील दर्जा कसा वाढवता येईल यासबंधी शासनाने वेळोवेळी विचार केलेला आहे. तसेच त्यामध्ये आवश्यक ते बदल शासनाने केलेले आहे. या चर्चेच्या निमित्ताने मी सन्माननीय सदस्याना सांगू इच्छितो की,राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा 2005 च्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे नववी ते बारावी पर्यतच्या अभ्यासक्रमाचे अपग्रेडेशन करण्याची कार्यवाही सुरु आहे.त्यानुसार अकरावी आणि बारावीच्या अभ्यासक्रमाच्या अपग्रेडेशनला मान्यता देण्यात आलेली आहे. नववी आणि दहावीच्या अभ्यासक्रमाच्या अपग्रेडेशंनसंबंधी शासन निर्णय घेत असून पुढच्या वर्षी त्या अभ्यासक्रमाचे अपग्रेडेशन होईल म्हणजेच नववी ते बारावी पर्यतचा अभ्यासक्रमाचे अपग्रेडेशन आपण करीत आहोत.राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडयाच्या पध्दतीने आपण हे अपग्रेडेशन करीत आहोत. परंतु आपला विद्यार्थीसुध्दा त्यांच्या पेक्षा अधिक सरस कसा राहील आणि आपला अभ्यासक्रमसुध्दा चांगला कसा राहील यासाठी देखील शासनाचे प्रयत्न आपल्या पध्दतीने सुरु आहे हे मी या चर्चेच्या निमित्ताने आपल्याला सांगू इच्छितो.

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात...

सभापती महोदय, नववी आणि दहावीच्या अभ्यासक्रमात बदल करण्यात यावा असे आपल्याला अपेक्षित आहे त्याप्रमाणे नववी आणि दहावीच्या अभ्यासक्रमाचे अपग्रेडेशन करण्यात येत आहेत. या वर्षापासून ते अपग्रेडेशन करण्यात येत असून त्यासबंधीचा निर्णय आपण आज घोषित करीत आहोत हे देखील मी आपल्याला सांगू इच्छितो.

सभापती महोदय, यानंतर मी दुसरा एक मुद्दा या ठिकाणी मांडणार आहे कृषी हा विषय शालेय शिक्षणात यावा अशी चर्चा अनेक दिवसापासून समाजात होत असून अनेक तज्ज्ञ तो विषय मांडत होते. राज्यामध्ये विज्ञान आणि तंत्रज्ञान हे विषय आपल्याकडे असून त्या विषयाला पर्याय म्हणून कृषी विज्ञान आणि तंत्रज्ञान हे विषय सुध्दा 2010 - 2011 पासून नववी आणि दहावी वर्गासाठी सुरु करण्याचा निर्णय घेतलेला आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञान या विषयाला कृषी आणि तंत्रज्ञान हे दोन विषय पर्याय राहतील.ज्या विद्यार्थ्यांना हा विषय घेण्याची इच्छा असेल ते विद्यार्थी हा विषय घेऊन परीक्षेला बसू शकतात हा निर्णय सुध्दा राज्य शासन घेत आहे.

तालिका सभापती : माननीय मंत्रिमहोदयांना अजून किती वेळ लागणार आहे.?

श्री.बाळासाहेब थोरात : या चर्चेच्या निमित्ताने माझ्यापुढे जवळजवळ 87 मुद्दे आलेले आहेत त्यातील महत्वाच्या मुद्यांचा मी खुलासा करणार आहे

तालिका सभापती : अजून अर्धा तास चर्चा व्हावयाच्या आहेत .

श्री.बाळासाहेब थोरात : या प्रस्तावावर पाच तास चर्चा झाल्यानंतर मी फक्त पाच मिनिटात उत्तर दिले असते तर ते योग्य झाले नसते.

तालिका सभापती : यानंतर जवळजवळ 15 अर्धा तासाच्या चर्चा आहेत आणि त्या चर्चेला उत्तर देण्यासाठी माननीय मंत्रीमहोदय आता सभागृहात उपस्थित आहेत.

श्री.बाळासाहेब थोरात : सभागृहातील अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले विचार मांडलेले आहेत त्यावर जर मी सविस्तर उत्तर दिले नाही तर माझ्या मुद्याला उत्तर दिले नाही असे सन्माननीय सदस्य म्हणतील. त्यामुळे सन्माननीय सादस्यानी जे मुद्दे मांडलेले आहेत त्यातील महत्वाच्या मुद्यांचा मी खुलासा करणार आहे. सर्व शिक्षा अभियानावर सुध्दा बरीच चर्चा झालेली आहे त्यात काही दोष असतील तर ते दूर करण्याची माझी तयारी आहे त्यात कोणंतीही अडचण नाही.

नंतर श्री.सुंबरे

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपी नाही

श्री.बाळासाहेब थोरात ...

सर्वशिक्षा अभियानामुळे आपल्याकडील हजारो विद्यार्थ्यांच्या राहणीमध्ये बदल घडत गेलेला आहे. तो परिसर बदलल्याचे दिसते. मुलांमध्ये शाळची आवड निर्माण होत असल्याचे दिसते. गळतीचे प्रमाण 2003 साली प्राथमिक मध्ये 15 टक्के होते ते आता 10 टक्क्यावर आले आहे. उच्च प्राथमिक मध्ये 34 टक्के होते ते 18 टक्क्यांवर आलेले आहे. सभापती महोदय, असे अनेक प्रश्न आहेत की ज्याची चर्चा करायची असेल तर ती मी करू शकतो. परंतु तरीही सगळ्यात मूलभूत असे जे प्रश्न आहे त्याचीच केवळ मी येथे चर्चा करतो.

सभापती महोदय, मराठीची सक्ती करण्याचा निर्णय आपण घेतलेला आहे आणि त्रिभाषा सूत्रानुसार आपण हा निर्णय घेतलेला आहे तो आपण ठामपणे राबविणार आहोत. इतकेच नाही तर राज्याने केंद्र सरकारला देखील आग्रह केला आहे की, सर्वच राज्यांना त्रिभाषा सूत्र लागू करावे आणि आपला तसा आग्रह राहणार आहे. सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी घटक चाचण्या कमी कराव्यात अशी आग्रही मागणी केली आहे. चार घटक चाचण्या घेतल्या जातात त्याऐवजी त्या दोनच घ्याव्यात असे त्यांनी सांगितले, तसा त्यांचा आग्रह आहे. पण त्यावर मी आजच निर्णय देत नाही. त्याबाबत मी अभ्यास करून त्यातील बारकावे समजावून घेऊन नंतरच त्याबाबत निर्णय घेतला जाईल एवढेच मी या प्रसंगी सांगतो. तसेच सभापती महोदय, शिक्षकांचे पगार 1 तारखेला व्हावेत, त्यांना सन्मानपूर्वक वागणूक मिळावी हे प्रश्न तर माहितीच आहेत. केवळ ऑन लाईन बद्दलचा जो आपला मुद्दा आहे त्याबद्दल मी इतकेच सांगेन की, आपल्यालाही आता बदलत्या काळानुसार पद्धती स्वीकाराव्या लागणार आहेत आणि त्याप्रमाणे आपण प्रयत्न करीत आहोत. ते करताना त्यात काही दोष सुरूवातीस येणारच, पण आलेले दोष पूर्णपणे दूर केले जातील आणि त्याच्या पद्धतीची माहिती विद्यार्थी तसेच पालकांना देखील समजावून सांगितली जाईल. तेव्हा पुढील वर्षापासून आपणही पद्धतच राबविणार आहोत हे मला येथे आपल्याला सांगितले पाहिजे. सभापती महोदय, मराठी शाळांच्या मान्यतेसंबंधीचा मुद्दा येथे उपस्थित करण्यात आला. याबाबत आपल्याला पुन्हा कॅबिनेटपुढे जावे लागणार आहे. यापूर्वी त्याबाबत कॅबिनेटमध्ये निर्णय झालेला आहे. त्यानुसार इंग्रजी, ऊर्दू भाषांच्या शाळांना मान्यता दिली आहे. तेव्हा मराठी माध्यमाच्या शाळांना मान्यता देण्यासाठी मी हा विषय पुन्हा कॅबिनेटपुढे नेईन इतकेच मी येथे सांगू इच्छितो. सभापती महोदय, या क्षेत्रामध्ये तसे खूप प्रश्न आहेत याची मला जाणीव आहे आणि

.... 5पी 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. थोरात ....

माझ्याकडे दररोज खूप निवेदने येत असतात. तेव्हा हा विषय समजून घेण्याचा मी प्रयत्न करीत आहे आणि जास्तीत जास्त चांगल्या पद्धतीचे काम राज्यात या शिक्षण क्षेत्रात होईल एवढीच ग्वाही मी या निमित्ताने आपल्याला देतो आणि माझे भाषण संपवितो.

***

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, नवीन शिक्षण मंत्री किती कसलेले आहेत याचे दर्शन येथे आम्हाला घडले. म्हणजे त्यांनी सगळ्या प्रश्नांना उत्तरे देतो म्हणून सांगितले पण एकाही प्रश्नाला उत्तर दिलेले नाही त्यामुळे आमच्या हाती काहीच लागले नाही. त्यांनी या विषयावर भरपूर बोलावे आणि आमच्या हाती काही लागेल असे वाटले होते. सभापती महोदय, मी स्वत: म्युनिसिपालिटीच्या शाळेत शिकलेलो आहे आणि मी मुंबईचा आमदार आहे त्यामुळे मला ग्रामीण भागातील शिक्षण व्यवस्थेची काही कल्पना नाही असा समज आपण करून घेतला असेल तर मी आपल्याला सांगेन की, माझा जन्म आदिवासी भागात झालेला असून माझी नाळ सुईणीने कापलेली आहे. त्यामुळे आमदार झाल्यावर मी जो पहिला मोर्चा काढला तो वस्तीशाळांसंबंधातील मोर्चा होता.

सभापती महोदय, मी या ठिकाणी चर्चेतून तीन प्रश्न विचारले होते. एक म्हणजे आपल्या प्राथमिक शाळांतील मुले माध्यमिक शाळांमध्ये जाताना त्यातील 57 टक्के मुलेच माध्यमिक शाळेत जातात आणि तेथून कॉलेजमध्ये जाताना केवळ 15 मुले उरतात. हा मुख्य प्रश्न आहे, त्याची सोडवणूक आपण कशी करणार आहात ? त्यानंतर दुसरा प्रश्न असा आहे की, आपले एस.एस.सी.बोर्ड मागे का ? म्हणजे स्पर्धा परीक्षा असतील वा प्रवेश परीक्षा असतील त्यात आपण मागे का पडतो ? गेल्या 10 वर्षात आपण किती आयएएस, आयपीएस अधिकारी निर्माण करू शकलो आहोत ? थोडक्यात या शिक्षणामध्ये आपण मागे का आहोत ? आणि तिसरा व सगळ्यात महत्त्वाचा प्रश्न, जो येथील जवळपास प्रत्येक सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केला आहे, तो प्रश्न म्हणजे सध्या राज्यात शिक्षण क्षेत्रामध्ये जी प्रचंड विषमता निर्माण झालेली आहे त्याचे काय ? ती आपण कशी कमी करणार आहात ? शिक्षण क्षेत्रात आज आपण चार वर्ग निर्माण केले आहेत. एक कायम विनाअनुदानित शाळा म्हणजे त्यांना अनुदान द्यायचेच नाही अशा शाळांचा वर्ग, त्यानंतर वस्तीशाळा, आदिवासी शाळा, अनुदानित शाळा आणि अन्य बोर्डांच्या शाळा. यातील दरी आपण कशी मिटविणार आहात याबाबत आपण कोणतेही उत्तर दिलेले नाही. केवळ आम्ही आमच्या पद्धतीने यासंबंधात काम करीत आहोत एवढेच आपण सांगितले.

(यानंतर श्री. सरफरे ... 5क्यू 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील...

पहिल्या आठवडयामध्ये विचारण्यात आलेल्या प्रश्नाला लेखी उत्तर देतांना आपण म्हटले आहे की, आम्ही स्तर उंचाविण्याचा प्रयत्न करीत आहोत. महाराष्ट्रातील विद्यापीठीय शिक्षण अप्रतिम आहे. त्याबाबतीत स्पर्धेमध्ये अन्य कोणत्याही राज्यांच्या तुलनेत आपण वरच्या स्तरावर आहोत. आणि म्हणून अशी अडचण आहे की, आपण प्राथमिक शिक्षण व माध्यमिक शिक्षणामध्ये दोन इयत्तांनी अन्य राज्यांच्या मागे आहोत, तेराव्या क्रमांकावनर आहोत. आणि म्हणून शासनकर्ते म्हणून आपण हे दुरुस्त करण्याची तयारी दाखविणार नसाल तर तुम्हाला यापुढील काळात अंधार झालेला दिसेल? आणि मग आंदोलने होत रहातील, ईकडील मुले शाळेत कां लागत नाहीत? म्हणून दगडे मारत रहातील. ज्यांच्याकडे पैसे आहेत त्यांना तुम्ही मोठया शाळेमध्ये घालणार. सभापती महोदय, मी माझ्या मुलाला सकाळी एका मोठया शाळेमध्ये सोडावयास जातो. त्या शाळेच्या समोरच्या फूटपाथवर एक स्ट्रीट स्कूल भरते. त्याच्या बाजूला असलेल्या समोरच्या फूटपाथवर अशी पालें आहेत ती त्या स्ट्रीट स्कूलमध्ये जात नाहीत. एकाच रस्त्यावर तीन पध्दतीच्या शाळा आहेत. आणि कोपऱ्यावर महानगरपालिकेची शाळा आहे. मी जेव्हा माझ्या मुलाला चांगल्या शाळेमध्ये सोडावयास जातो त्यावेळी मी खूप अस्वस्थ होतो . त्या स्ट्रीट स्कूलमधील मुले शाळेत जातात आणि पुन्हा रस्त्यावर अभ्यास करतात. दुसऱ्या बाजूच्या कोपऱ्यावर पालांमधील मुले आहेत, मराठी बोलणारी मुले आहेत, ती शाळेचे तोंडसुध्दा पहात नाहीत. दुसऱ्या बाजूला महानगरपालिका आहे. सभापती महोदय, महानगरपालिकेची शाळा आणि जिल्हा परिषदेची शाळा यामध्ये फार फरक नाही. जिल्हा परिषदेमधील, महानगरपालिकेतील शिक्षक मुलांना शिकवीत नाहीत अशी मंत्री महोदयांना भीती वाटते. तुम्ही त्यांना शिक्षणबाह्य कामे दिली आहेत तरमग ती कशी शिकविणार? त्यामुळे त्यांची आबाळ होते. माननीय मंत्र्यांनी याठिकाणी अप्रामाणिक असल्याचे सांगितल्यावर माननीय नामदार श्री. आर.आर.पाटील उभे राहिले व म्हणाले की, हे सरकारचे मत नाही. शिक्षकांना शिकविण्यासाठी तुम्ही वेळ शिल्लक ठेवलेला नाही. यासाठी आपण काहीतरी सांगाल अशी अपेक्षा होती. एका बाजूला शिक्षकांवर कामे लादायची आणि दुसऱ्या बाजूला त्यांच्या परीक्षा घेत रहावयाच्या. फळयावर एका बाजूला युनिट टेस्ट लावल्या जातात आणि दुसऱ्या बाजूला उत्तरेही लिहिली जातात. यामधून आपण करप्ट प्रॅक्टिसेस सुरु केली आहे. सर्व राज्यांमध्ये आता लेखी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील...

परीक्षा कमी होत चालल्या आहेत. मी केंद्रीय मंत्री नामदार श्री. कपिल सिब्बल यांच्या मताचा नाही. परीक्षा बंद करा असे ते म्हणतात. परंतु मी त्यांच्या मताचा नाही. त्या बंद केल्यातर चौथीच्या मुलाला पुन्हा साक्षर करण्याची मोहिम सुरु करावी लागेल. सद्या आपल्या राज्यामध्ये ते सुरु आहे.

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, याठिक्राणी पक्षाचा उल्लेख करण्याची गरज नाही....

श्री. कपिल पाटील : मी फक्त ते केंद्रामध्ये मंत्री आहेत एवढेच सांगितले. मी पक्षाचा उल्लेख केला नाही. याठिकाणी आपण सर्वजण एक आहोत. परंतु मुद्दा असा आहे की, जिल्हा परिषदेचे शिक्षक शिकवीत नाहीत अशी भीती आपणास वाटते, आणि आपण तसा दृष्टीकोन बाळगत आहात. याचे कारण आपण ज्या पध्दतीचे अभ्यासक्रम आणि ज्या पध्दतीची परीक्षा पध्दती तयार केली आहे, त्यामुळे आपल्या मुलांना कोणतेही भविष्य राहणार नाही. ते भविष्य बदलण्यासाठी ही चर्चा ठेवली होती. मी दोन वर्षापूर्वी उपस्थित केलेल्या चर्चेमध्ये वेगळे प्रश्न होते. यावेळी चर्चा उपस्थित करण्याचे कारण म्हणजे गेल्या वर्षी पर्सेटाईलमुळे जे वाद निर्माण झाले, त्यामुळे गेल्या दोन वर्षापासून महाराष्ट्रातील मुलांना त्या वादांला सामोरे जावे आहे. त्यासाठी ग्रामीण भागातील, खेडयातील व झोपडपट्टीतील मुले आहेत त्यांना चांगले दर्जेदार शिक्षण देणार आहात की नाही? त्यांना चांगल्या शिक्षणाची संधी देणार की नाही? या मुद्याला आपण स्पर्श करण्यास तयार नाही. त्या प्रश्नावर आपण उत्तर देत नाही याचा मला खेद वाटतो. आपण जर त्या प्रश्नाला उत्तर दिले तर आमच्या हाती काहीतरी लागले असे होईल. सभापती महोदय, ही वेठबिगारी आहे. नामदार श्री. आर.आर. पाटील यांनी ग्लोबल वॉर्मिगचा उल्लेख केला. ग्लोबल वॉर्मिगमुळे महागाई वाढल्याचे केंद्रीय नेत्यांनी आम्हाला सांगितले. महागाई वाढल्यानंतर दरमहा तीन हजार रुपये, बाराशे रुपयांमध्ये शिक्षकांनी कसे काय शिकवायचे? वस्ती शाळा शिक्षकाला, नीम शिक्षकाला बाराशे रुपये दरमहा देता, शहरातील जिल्हा परिषदेच्या शिक्षकाला तीन हजार रुपाये देता. तो या कमी पगारामध्ये कसे शिकविणार आहे? ग्लोबल वॉर्मिग आणि फयान वादळाचे कारण सांगून आपण आम्हाला कायम फयानच्या वादळामध्ये ठेवीत आहात. म्हणजे शिक्षकांना खायला मिळाले नाही, प्यायला मिळाले नाही तरी मुलांना शिकवा म्हणता? या कमी पगारामध्ये

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ MMP/

श्री. कपिल पाटील...

चांगली माणसे कशी मिळणार? शैक्षणिक नोकरीमध्ये चांगली माणसे आली पाहिजेत असे जर वाटत असेल तर शिक्षण ही गुंतवणूक समजून आपण शिक्षकांना पगार दिले पाहिजेत. हे जर करणार नसाल तर आमची अडचण होईल.

तालिका सभापती (श्री. अरविंद सावंत) : याच विषयावर मी सुध्दा बोललो होतो.शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी मी अशी सूचना केली होती की, आदिवासी विभागातर्फे चालविल्या जाणाऱ्या आश्रमशाळा असो किंवा समाज कल्याण विभागामार्फत चालविल्या जाणाऱ्या आश्रमशाळा या सर्वांमध्ये समन्वय साधणारी एक यंत्रणा आपण निर्माण केली पाहिजे. शिक्षणामध्ये असलेली दरी दूर करण्यासाठी मी सभागृहात सांगितले होते की, याबाबत आपण काहीतरी करणे आवश्यक आहे. त्यासाठी आपण काय करणार आहात ते सांगा?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, आपण महत्वाचा प्रश्न मांडला आहे, समाज कल्याण विभाग किंवा आदिवासी विकास विभागाच्या आश्रमशाळा असो. आज मूकबधिर, मतिमंद मुलांसाठी विद्यालय सुरु करण्यास कुणी तयार होत नाही. त्यामुळे शिक्षण विभाग, आदिवासी विकास विभाग, समाज कल्याण विभागामध्ये समन्वय असणे गरजेचे आहे. त्याबाबत काय करता येईल यादृष्टीने निश्चितपणे विचार केला जाईल. शिक्षणाचे अपग्रेडेशन करीत असतांना आपण सीबीएसईच्या बोर्डाप्रमाणे आपण आपले राष्ट्रीय अभ्यासक्रमाचे धोरण ठरवीत आहोत. त्यादृष्टीने मी याठिकाणी सांगत आहे...

(यानंतर सौ.रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात . . . .

मी एन.सी.ई.आर.टी.च्या बाबतीत बोलत आहे. सी.बी.एस.सी.ची बाब वेगळी आहे. आपणा सर्वांना बरोबर घेऊन जाण्यासाठी ... .

तालिका सभापती (श्री.अरविंद सावंत) : मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, यासंदर्भात एक वेगळी बैठक बोलविण्यात यावी. या खात्याच्या संदर्भात ज्यांचा अभ्यास आहे, अशा लोकांची यासंबंधातील धोरण ठरविण्यासाठी एक विशिष्ट बैठक बोलविण्यात यावी. त्याशिवाय ही बाब पूर्ण होणार नाही.

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, यासंबंधात मुंबई येथे सर्व सन्माननीय सदस्यांचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी त्यांच्याबरोबर बैठक घेण्याची तयारी आहे.

तालिका सभापती : माननीय मंत्री महोदय मी आपल्याला असे प्रपोज करतो की, या विषयाच्या संदर्भात आम्हाला अशा प्रकारचे धोरण निचित करावेसे वाटते अशा प्रकारचा आपल्या विभागाने एक ड्राफ्ट तयार करावा. यामध्ये काही दुरुस्त्या करावयाच्या आहेत काय ? यादृष्टीने चर्चा करण्यासाठी एक बैठक घेण्यात यावी म्हणजे त्यातून काहीतरी निष्पन्न होईल.

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, या सदनामध्ये शिक्षण क्षेत्रातील प्रमुख सन्माननीय सदस्य आहेत. याबाबतीत निश्चितपणे बैठक होईल. स्पर्धा परीक्षा हा स्वतंत्रपणे बोलण्याचा विषय आहे. कदाचित आपण आय.एस.आय.च्या स्पर्धा . . . .

तालिका सभापती : माझी अशी सूचना आहे की, या विषयाच्या संबंधात 15 मिनिटांची, 1 तासाची बैठक घेऊ नये, तर चांगली इलॅबोरेट बैठक घ्यावी.

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, जेवणासह ही बैठक घेऊ.

तालिका सभापती : आम्हाला जेवण नको. तर बैठकीपूर्वी या विषयाच्या संबंधातील ड्राफ्ट देण्यात यावा.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात सूचना करण्यात आलेल्या आहेत. तेव्हा शासनाने शिक्षणाच्या संदर्भातील विषयाबाबत श्वेतपत्रिका काढावी.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांच्या सुचनेचे मी स्वागत करतो. मी याच शब्दात सांगितले की, यासंबंधातील बैठक बोलविण्यापूर्वी शासन काही धोरण निश्चित करणार आहे काय ? असेल तर त्यासंबंधातील माहिती पत्रक सन्माननीय सदस्यांना ...

. . . .6आर-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती . . . .

अगोदर देण्यात यावे. मग त्यामध्ये सन्माननीय सदस्यांना काही सुधारणा सुचवावयाच्या असतील तर तसे करता येईल.

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, आपण जी सूचना केली, ती मान्य आहे. त्यामुळे यासंबंधात अधिक चांगल्या प्रकारे चर्चा होऊ शकेल आणि त्यासंबंधीच्या सूचना पुढील धोरणामध्ये निश्चितपणे येतील.

तालिका सभापती : सभागृहाने प्रस्तावावर विचार केला आहे.

. . . .6 आर-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>पॉईंट ऑफ इन्फर्मेशनबाबत</u>

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, मला पॉईंट ऑफ इन्फर्मेशन मांडावयाचा आहे. आजच्या कामकाजपत्रिकेवर गृह विभागाच्या संबंधात अंतिम आठवडा प्रस्ताव देण्यात आलेला आहे. परंतु आता बराच उशीर झालेला आहे. त्यामुळे सदरहू चर्चा पुढील अधिवेशनामध्ये घेण्यात यावी .

तालिका सभापती : सदरहू चर्चा उद्याच घेण्यात येईल. आजच्या कामकाज पत्रिकेवर अनु.क्र.13 वर दाखविण्यात आलेल्या अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चा आज होणार नाही. नंतर अर्ध्या तासाच्या चर्चा आहेत. त्या आपण घेऊ या.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझी अशी सूचना आहे की, आजच्या कार्यक्रम पत्रिकेवर विदर्भाच्या प्रश्नांबाबत नियम 260 अन्वये जो प्रस्ताव देण्यात आलेला आहे, तो उद्या सकाळी चर्चेसाठी घेण्यात यावा.

तालिका सभापती : ठीक आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आज गृह विभागाशी संबंधित असलेल्या अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा होणार होती. या प्रस्तावावरील चर्चा नंतर होणार असेल तर यानिमित्ताने मला एका अतिशय महत्वाचा विषय मांडावयाचा होता आणि या प्रस्तावावरील चर्चेच्या वेळेस मी तो मांडला असता. याठिकाणी सुदैवाने माननीय गृहमंत्री आणि माननीय गृह राज्यमंत्री उपस्थित आहेत. त्यामुळे या विषयाची तड लागू शकते. आपण जर मला यासाठी परवानगी दिली तर तो मुद्दा . . . .

तालिका सभापती : मी सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडेंना विचारु इच्छितो की, त्यांना हा मुद्दा मांडण्यासाठी किती वेळ लागेल ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी उद्या प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर मुद्दा मांडावा. मी त्याचे उत्तर देईन.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, हा मुद्दा मांडण्यासाठी मला केवळ पाच मिनिटे लागतील. परंतु उद्याच्या सगळया धावपळीमध्ये होईल की नाही ? हा प्रश्न आहे.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी आपला मुद्दा उद्या मांडावा.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, मी आपल्या परवानगीने एक विनंती करु इच्छितो की, काल औचित्याच्या मुद्याव्दारे मी एक महत्वाचा प्रश्न सदनामध्ये उपस्थित केला होता की, ...

. . . .6 आर-4

श्री.गुरुनाथ कुलकर्णी . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

दिनांक 26-11 च्या भयानक घटनेनंतर कसाबच्या विरोधात खटला सुरु आहे. त्या खटल्यातील सरकारी वकील ॲड.उज्वल निकम हे दरदिवशी संध्याकाळी कामकाज झाल्यानंतर मिडिया समोर येऊन सांगतात. त्यावेळी असे स्टेटमेंट केलेले आहे की, यासंदर्भात केंद्रीय माजी मंत्र्यांचा दबाव आला होता. याबाबतीत मी काल औचित्याच्या मुद्याव्दारे प्रश्न उपस्थित केला होता. त्याबाबत शासनाच्या वतीने सांगण्यात आले की, आज त्याबाबतीत निवेदन करण्यात येईल. तर यासंबंधातील निवेदन तयार आहे काय ?जर ते तयार असेल तर निवेदन करण्यात यावे अशी मी माननीय मंत्री महोदयांना विनंती करतो.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, विधानसभेमध्ये आम्ही यासंबंधी निवेदन केलेले आहे. परंतु आता माझ्याकडे ते निवेदन नाही, त्यामुळे मी उद्या निवेदन करतो.

तालिका सभापती : ठीक आहे.

. . . .6 आर-5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: ठाणे येथे मोठया प्रमाणावर दुधात होत असलेली भेसळ

मु.शी.: ठाणे येथे मोठया प्रमाणावर दुधात होत असलेली भेसळ यासंबंधी श्री.संजय केळकर वि.प.स.यांनी उपस्थित केलेली अर्धा तास चर्चा.

(चर्चा उपस्थित करण्यात आली नाही.)

पृ.शी.: कोल्हापूर महानगरपालिकेच्या अकार्यक्षमतेमुळे व अपुरी सांडपाणी प्रक्रियेमुळे पंचगंगा नदीच्या प्रदुषणात झालेली वाढ.

मु.शी.: कोल्हापूर महानगरपालिकेच्या अकार्यक्षमतेमुळे व अपुरी सांडपाणी प्रक्रियेमुळे पंचगंगा नदीच्या प्रदुषणात झालेली वाढ यासंबंधी श्री.चंद्रकांत पाटील, वि.प.स.यांनी उपस्थित केलेली अर्धा तास चर्चा.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत पाटील यांची माननीय मंत्री महोदयांच्या बरोबर दालनामध्ये चर्चा झालेली असून त्यांचे समाधान झालेले आहे.

(चर्चा उपस्थित करण्यात आली नाही.)

पृ.शी.: सिंधुदूर्ग जिल्ह्यातील विविध धबधब्यांच्या परिसराचा पर्यटन केंद्र म्हणून विकास करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता

मु.शी.: सिंधुदूर्ग जिल्ह्यातील विविध धबधब्यांच्या परिसराचा पर्यटन केंद्र म्हणून विकास करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता या संबंधी श्री.राजन तेली, वि.प.स.यांनी उपस्थित केलेली अर्धा तास चर्चा.

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : काठोडा, गेवराई (जि.बीड) तसेच इतर ठिकाणी अल्पवयीन मुली व महिलांवर झालेल्या अत्याचर प्रकरणी पुढील योग्य कार्यवाही न होणे.

मु. शी. : काठोडा, गेवराई (जि.बीड) तसेच इतर ठिकाणी अल्पवयीन मुली व महिलांवर झालेल्या अत्याचार प्रकरणी पुढील योग्य कार्यवाही न होणे यासंबंधी डॉ.नीलम गोऱ्हे वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

डॉ. नीलम गोऱ्हे (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करते :-

"दिनांक 16 नोव्हेंबर,2008 रोजी काठोडा, गेवराई (जि.बीड) येथील दरोडेखोरांनी अल्पवयीन मुलीवर व महिलांवर बलात्कार करुन एक वर्ष झाले तरी, आरोपीच्या भितीमुळे पिडीत अल्पवयीन मुलींच्या शिक्षणाची समस्या निर्माण होणे, तसेच जि. परभणी येथील दरोडेखोरांनी महिलांवर केलेल्या अत्याचर प्रकरणी पीडित कुटुंबाचे पुनर्वसन करण्यात आलेले नसणे, नातुवाडा विकण्यास तयार नसतानाही नातू कुटुंबियांना लँड माफिया दीपक मानक, बिल्डर सुधीर कर्नाटकी व नगरसेवक यांनी गुंडागर्दी करुन नातूवाडा बळकाविणे, सौ. अंकिता मोरे हिचा तिच्या सासरच्या माणसांनी खून करणे, तसेच प्रेताचे शवविच्छेदन तसेच पंचनामा न करता अंत्यसंस्कार करण्यास पोलिसांनी मदत करणे, तसेच वरील सर्व प्रकरणे गेल्या वर्षभरात घडली असून, याबाबतचे खटले द्रुतगती न्यायालयात चालविण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना

सभापती महोदय, या अर्धा-तास चर्चेच्या माध्यमातून तीन विविध ठिकाणच्या अत्याचाराच्या प्रकरणांकडे मी शासनाचे लक्ष वेधू इच्छिते. या अत्याचाराच्या घटनांच्या निमित्ताने पोलीस यंत्रणेमध्ये काही सुधारणा करणे आवश्यक आहे, त्याबाबतच्या मागण्या मी या ठिकाणी मांडणार आहे.

सभापती महोदय, या अर्धा-तास चर्चेमध्ये उल्लेख करण्यात आलेली पहिली घटना अशी आहे की, बीड जिल्हयामध्ये काठोडा या ठिकाणी दिनांक 16 नोव्हेंबर, 2008 रोजी दरोडा पडला

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे...

आणि अल्पवयीन मुलीवर व महिलांवर बलात्काराच्या घटना घडलेल्या आहेत. सध्या हे प्रकरण बीडच्या सेशन कोर्टात चालू आहे. या प्रकरणाच्या बाबतीत सरकारी वकीलाचे काम चांगल्याप्रकारे चालले आहे. या सर्व प्रकरणांच्याबाबतीत माझ्या चार मागण्या आहेत. खासकरुन मराठवाडयात असे चित्र दिसून आले आहे की, ज्या ज्या जिल्हयामध्ये दरोडे पडत आहेत तेथे महिला पोलीस नाहीत. याचा परिणाम असा झाला की, दरोडा पडल्यानंतर या महिलांवर जे अत्याचार झालेले आहेत ते त्यांना पोलीस स्टेशनमध्ये नोंदवावयाचे होते परंतु तेथे महिला पोलीस अधिकारी नसल्यामुळे या महिला आपली तक्रार नोंदवू शकल्या नाहीत. परिणामी हे गुन्हेच त्या ठिकाणी नोंदवले गेले नाहीत.

सभापती महोदय, मला याबाबतीत याठिकाणी पहिली मागणी अशी करावयाची आहे की, जेथे जेथे दरोडे पडत आहेत आणि महिलांना मारहाण केली जात आहे अशा ठिकाणी डी.वाय.एस.पी. लेव्हलच्या अधिकाऱ्यांकडून त्या गुन्हयांची चौकशी झाली पाहिजे. खासकरुन मराठवाडयामध्ये महिला सीनियर पी.आय. या प्रत्येक जिल्हयामध्ये उपलब्ध आहेत, त्यांच्याकडून याबाबतचा तपास झाला पाहिजे. तसेच दरोडे आणि महिलांवर बलात्कार अशा पध्दतीच्या घटना जेथे घडतात त्या ठिकाणी डी.वाय.एस.पी.च्या स्तरावरच्या अधिकाऱ्यावर तपासणीचे काम आणि महिला पोलीस निरीक्षकांवर त्या मुलींशी बोलण्याची जबाबदारी टाकली पाहिजे.

सभापती महोदय, माझी दुसरी मागणी अशी आहे की, इनकॅमेरा ट्रायल चालते पण इनकॅमेरा जबाब होत नाहीत. बऱ्याचशा वेळी गावामध्ये पोलीस स्टेशनच्या आसपास पाचशे ते हजार माणसे एकत्र जमतात त्यामुळे त्या मुलीवर दबाव निर्माण होतो म्हणून या मुलींचा जबाब देखील इनकॅमेरा नोंदविला गेला पाहिजे.

सभापती महोदय, माझी तिसरी मागणी अशी आहे की, ज्यावेळी ओळखपरेड होते त्यावेळी खासकरुन अल्पवयीन मुलींवर बलात्कार करणाऱ्या माणसाला ओळखण्याची वेळ येते. त्याबाबतीत सध्या अस्तित्वात असलेली ओळखपरेडची पध्दत बदलण्याची गरज आहे, जेणेकरुन त्या मुलींवर दबाव येणार नाही आणि कोर्टाला देखील ती पध्दत मान्य होईल, अशी पध्दत निवडण्यात यावी. उदाहरण सांगावयाचे झाले तर आरोपी त्या मुलीला बघणार नाही पण ती मुलगी आरोपीला बघू शकेल अशी व्यवस्था करण्यात यावी. अशा पध्दतीने काही पोलीस अधीक्षकांनी ओळखपरेडची

..2..

डॉ. नीलम गोऱ्हे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पध्दती बदललेली आहे. परंतु या पध्दतीला कायदेशीर मान्यता नाही. तसेच या पध्दती बद्दल सर्व पोलीस अधिकाऱ्यांना देखील कल्पना नसल्यामुळे ते आरोपी समोर उभे करतात, त्यामुळे त्या मुली घाबरुन जातात. म्हणून ओळखपरेडची कार्यपध्दती कायद्याच्या चौकटीमध्ये कशी बदलता येईल हे पाहिले गेले पाहिजे.

सभापती महोदय, माझी चौथी मागणी अशी आहे की, अल्पवयीन मुलींवर जेव्हा बलात्कार होतो किंवा लैंगिक अत्याचाराचा प्रयत्न होतो अशा प्रकरणांमध्ये डी.एन.ए.टेस्ट अनिवार्य केली पाहिजे. डी.एन.ए. टेस्ट झाली तर ती केस लवकर सिध्द होऊ शकते. प्रत्येक ठिकाणी घटना घडल्यानंतर डी.एन.ए. टेस्टसाठी पाठवा अशी आम्हाला पोलिसांकडे मागणी करावी लागते. तोपर्यंत उशीर झालेला असतो. त्यामुळे योग्य तो पुरावा मिळत नाही. म्हणून बलात्काराच्या खासकरुन अल्पवयीन मुलींच्या गटामध्ये डी.एन.ए. टेस्ट अनिवार्य करावी, अशी माझी मागणी आहे. ज्या घटना घडलेल्या आहेत त्या केसेस कोर्टात उभ्या रहात असताना ज्या जिल्हयामध्ये या घटना घडलेल्या आहेत तेथे त्या द्रुतगती न्यायालयातच नेल्या जातील अशा पध्दतीचा निर्णय एक प्रघात म्हणून घ्यावा. कारण अशा प्रकारच्या प्रत्येक घटनेच्या वेळी त्या प्रकरणांच्या बाबतीत द्रुतगती न्यायालयाची मागणी आणि त्याबाबातची प्रोसेस करण्यामध्ये त्या त्या ठिकाणच्या विभागीय पोलीस संचालकांचा वेळ जातो. म्हणून याबाबतीत धोरणात्मक निर्णय घेतला जावा, याकडे मी शासनाचे लक्ष वेधू इच्छिते.

सभापती महोदय, बीड जिल्हयाबरोबरच परभणी जिल्हयातील दरोडा आणि बलात्काराची केस कोर्टात उभी आहे. सरकारी वकिलांच्या पॅनेलने त्याठिकाणी जास्त लक्ष देण्याची गरज आहे.

सभापती महोदय, मानकर केसचा मी या अर्धा-तास चर्चेमध्ये उल्लेख केलेला आहे बहुचर्चीत अशी पुण्यातील मानकर केस आहे.उच्च न्यायालयात हा खटला पोहचलेला आहे. परंतु हे जे सिव्हिल दावे आहेत ते एका न्यायालयात वर्ग करावेत अशी आमची मागणी आहे.

यानंतर श्री. बरवड...

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे ....

जेणेकरुन दिवाणी न्यायालयातील खटल्याचा जर वेळेवर निकाल लागला तर क्रिमिनल केसेसना सुध्दा फायदा होऊ शकेल. आता या प्रकरणामध्ये चार्जशीट दाखल झालेले आहे. परंतु आरोपी कोणीही असला तरी पिडित लोकांना लवकर न्याय मिळण्याच्या दृष्टीकोनातून दिवाणी न्यायालयामध्ये दाव्याचा जर योग्य वेळेमध्ये निकाल लागला नाही तर क्रिमिनल केसेसचा निकाल लागेल परंतु दिवाणी दावे प्रलंबित राहतील. मानकर प्रकरणाच्या संदर्भात माननीय मंत्रिमहोदयांनी पुण्यामध्ये पोलीस आयुक्तांबरोबर एक बैठक घेंतली. पोलीस चौकशीमध्ये ज्या अधिकाऱ्यांनी हलगर्जीपणा केला आहे त्याबद्दल सुध्दा काहीही कारवाई झालेली नाही. आपल्याला ते प्रकरण पूर्णपणे माहीत आहे. फार मोठ्या प्रमाणामध्ये हे जे लोक आहेत ते आजही हायकोर्टाचे दरवाजे ठोठावत आहेत याकडे मला शासनाचे लक्ष वेधावेसे वाटते.

तिसऱ्या केसचा म्हणजे अंकिता मोरे यांच्या केसचा जो उल्लेख आहे त्यामध्ये बारामतीला या नवविवाहित मुलीचा विहिरीमध्ये पडून मृत्यू झालेला आहे. यासंदर्भात माझी अशी मागणी आहे की, विहिरीत पडून, खासकरुन ज्या ठिकाणी नवविवाहितांचे मृत्यू होतात त्या ठिकाणी पोस्टमार्टेम न करता अंत्यसंस्कार करण्यासाठी सासरचे लोक माहेरच्या लोकांवर दबाव आणतात. बारामतीच्या या स्पेसिफिक केसच्या बाबतीत तेथील सिनियर पोलीस इन्स्पेक्टरशी मी जेव्हा बोलले त्यावेळी त्यांनी सांगितले की, माहेरच्या लोकांची जर तक्रार नसली तर आम्ही पोस्टमार्टेम न करताच अशा वेळेला अंत्यसंस्कार करतो. ही अतिशय गंभीर बाब आहे. मला असे वाटते की, खासकरुन विहिरीत पडून किंवा ओढ्यामध्ये बुडून ज्यावेळी मृत्यू होतात त्या अनुषंगाने मी असे लक्षात आणून देईन की, नुकतीच पुण्याची केस घडली की, सरप्राईज गिफ्ट देतो म्हणून नवऱ्याने बायकोला डोळे मिटावयास सांगितले आणि तिला काळेवाडीच्या पुलावरुन ढकलून दिले. म्हणून अशा बुडून मेलेल्या ज्या दुर्दैवी महिला आहेत त्या ठिकाणी पोस्टमार्टेम झाल्याशिवाय अंत्यसंस्कार करता कामा नये हे बंधनकारक केले पाहिजे. याकडे मला या अर्धा-तास चर्चेच्या निमित्ताने लक्ष वेधावेसे वाटते.

शेवटचा मुद्दा असा की, या तीन चार केसेसचा जर आपण विचार केला तर प्रत्येक जिल्ह्यात महिला पोलीस अधिकारी कोण आहेत याची यादी लोकांकडे असेल तर किडनॅपिंग

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ KGS/

डॉ. नीलम गोऱ्हे ....

त्याचबरोबर लहान मुलींचा व्यापार या स्वरुपाचे जे गुन्हे होतात त्यावेळेला लोकांना त्या महिला अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचणे सोपे होईल, जेणेकरुन त्यांना सुध्दा त्या दबावाला बळी पडावे लागणार नाही. पहिल्या घटनेच्या अनुषंगाने माझ्या चार मागण्या आहेत तसेच मानकर केसमधील मागणी आणि नवविवाहित स्त्रियांचे बुडून मृत्यू झाले असतील तर पोस्टमार्टेम अनिवार्य करणे आणि ज्या ठिकाणी पोलीस पाटील यांच्या जागा रिक्त आहेत म्हणून पोलीस पाटील यांनी दखल घेतली नाही असे जे सांगितले जाते त्यामुळे त्या ठिकाणी पोलीस पाटील यांच्या रिक्त जागाही भरण्यात याव्यात आणि त्यांनाही योग्य तो न्याय मिळावा याकडे मी लक्ष वेधते आणि आपली रजा घेते.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ KGS/

श्री. रमेश बागवे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.नीलम गोऱ्हे यांनी महिलांवर होणाऱ्या अत्याचाराबद्दल काही मुद्दे उपस्थित केलेले आहेत. महिलांवर आणि मुलींवर जे बलात्कार होतात त्या बलात्काराच्या अनुषंगाने त्या पिडित महिलांना न्याय मिळण्यासाठी शासनाची काय काय उपाययोजना आहे याबाबत सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी विचारणा केलेली आहे.

सभापती महोदय, महिलांवरील अत्याचार रोखण्यासाठी राज्यात शासनाने एकूण 13 विशेष न्यायालयांची स्थापना केलेली आहे. अहमदनगर, अकोला, अमरावती, औरंगाबाद आणि बीडमध्ये देखील अशा न्यायालयांची स्थापना केलेली आहे. जळगाव, नागपूर, यवतमाळ या ठिकाणी 16.8.1996 साली या न्यायालयांची स्थापना केलेली आहे. ठाणे, पुणे, कोल्हापूर या ठिकाणी 6 मे, 1998 रोजी या न्यायालयांची स्थापना केलेली आहे. मुंबई येथे 3.11.1996 रोजी या न्यायालयाची स्थापना केलेली आहे. या विशेष न्यायालयाच्या अनुषंगाने तसेच विशेष पोलीस महानिरीक्षक महिला अत्याचार प्रतिबंधक विभाग देखील सुरु करण्यात आलेला आहे. त्या अनुषंगाने संपूर्ण घटक प्रमुखांना एक परिपत्रक काढलेले आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, महिलांसाठी डीएनए चाचणी करण्यात यावी. तसे आदेश आधीच काढलेले आहेत. या परिपत्रकामध्ये पहिली बाब अशी आहे की, अत्याचारित मुली किंवा महिला यांची डीएनए चाचणी करण्यात यावी. दुसरी बाब अशी आहे की, अत्याचारित मुली किंवा महिलेची ओळख परेड यामध्ये सुधारणा केली आणि ती देखील महिला अधिकाऱ्याच्या समोरच झाली पाहिजे. तिसरी बाब अशी आहे की, अत्याचारित मुली किंवा महिलांना हॉस्पिटलमध्ये पाठविताना त्यांच्या मानसिक आजारासाठी समपुदेशन करण्याची सूचना करण्यात आली आहे. अशा तऱ्हेने या ठिकाणी प्रत्येक जिल्ह्यामध्ये एक महिला दक्षता सेल देखील निर्माण करण्यात आलेला आहे. अशा तऱ्हेच्या सूचना शासनाने विशेष न्यायालयाच्या अनुषंगाने त्या ठिकाणी दिलेल्या आहेत. म्हणून ज्या पिडित महिला आहेत त्यांचे शासनाच्या वतीने पुनर्वसन करण्याचे देखील ठरलेले आहे.

सन्माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न पुण्यातील मानकर केसबद्दल विचारला.

यानंतर श्री. खंदारे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश बागवे...

मी त्यांना सांगू इच्छितो की, सदर केसमध्ये खडकवासला पोलीस स्टेशनला गुन्हा रजिस्टर झालेला आहे. खंडणी विरोधी पथकाने त्याच्यावर कार्यवाही केलेली आहे. त्याबाबतचे दोषारोप पत्र शिवाजीनगर न्यायालयात दाखल केले आहेत. त्यामुळे हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. या केसचा लवकर निकाल लागावा अशी मागणी केली आहे. परंतु या केसला एक वर्षाचाही कालावधी झालेला नाही. म्हणून मी सांगू इच्छितो की, हे प्रकरण शेवटच्या टप्प्यात असून त्याचा निकाल लवकरात लवकर लागण्याची व्यवस्था केलेली आहे. सभापती महोदय, त्यांनी असेही म्हटले की, पीडित महिलेची चौकशी इन कॅमेरा झाली पाहिजे. पण याबाबत यापूर्वीच सूचना दिलेल्या आहेत. म्हणून दरोडा असेल किंवा महिलांवरील अत्याचार असेल या अनुषंगाने शासन गंभीर आहे आणि अशाप्रकारचे गुन्हे होऊ नये यासाठी प्रत्येक ठिकाणी महिलांसाठी सेल उभा केलेला आहे. विशेष म्हणजे ज्या पीडित महिला आहेत त्या महिलांना प्रत्येकी 50 हजार रुपये व जखमी महिलांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून देण्यात आलेले आहेत. अशारितीने शासन पीडित महिलांसाठी गंभीरतेने कारवाई करीत असते.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, नवविवाहित स्त्रियांचा बुडून मृत्यू होतो, अशा केसमध्ये पोस्ट मार्टेम अनिवार्य केले पाहिजे. काही वेळा परस्पर अंत्यसंस्कार केले जातात. याकडे मी लक्ष वेधले होते, त्याचा खुलासा करण्यात यावा.

श्री.रमेश बागवे : सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी श्रीमती अंकिता मोरे यांच्या प्रकरणासंबंधीचा मुद्दा उपस्थित केला होता. त्या महिलेचा अंत्यवधी दिनांक 17 तारखेला झाला. अंत्यविधीच्या वेळी तिचे वडील व काही गावकरी हजर होते. त्यानंतर 20 तारखेला पोलीस ठाण्यामध्ये तक्रार केली आहे. तिच्या मृत्यूची खबर न देता व पंचनामा न करता वडिलांच्या समक्ष श्रीमती अंकिता मोरेचा अंत्यविधी झालेला आहे. म्हणून संबंधित आरोपीला दिनांक 20 नोव्हेंबर रोजी अटक करुन दिनांक 24 नोव्हेंबरपर्यंत न्यायालयीन कोठडी मिळाली असून तो एम.सी.मध्ये आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे महिलांच्या संदर्भात आणि मानकरच्या

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश बागवे...

केससंबंधी शासनाने कार्यवाही केलेली आहे. दरोडयाचे गुन्हे होऊ नये म्हणून रात्रीची गस्त देखील वाढविलेली आहे. बीट पध्दत वाढवून पोलीस कर्मचा-यांच्या माध्यमातून जास्तीत जास्त कुमक अशा जिल्हयांच्या व तालुक्यांच्या ठिकाणी ठेवून या गुन्हयांना आळा घालण्याचा प्रयत्न केलेला आहे.

पृ.शी.: माणगांव तालुक्यातील पन्हळघर येथील धरणाचे काम पूर्ण होऊनही कालव्यासाठी निधी उपलब्ध न करणे

मु.शी.: माणगांव तालुक्यातील पन्हळघर येथील धरणाचे काम पूर्ण होऊनही कालव्यासाठी निधी उपलब्ध न करणे यासंबंधी सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांच्या उपस्थित झालेली अर्धा-तास चर्चा.

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : पुणे शहरात हाजी मक्केशा मशिदीच्या नुतनीकरण व

बांधकामास देण्यात आलेली परवानगी

मु. शी. : पुणे शहरात हाजी मक्केशा मशिदीच्या नुतनीकरण व बांधकामास देण्यात आलेली परवानगी या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 46629 ला दिनांक 17 डिसेंबर, 2008 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सर्वश्री रामनाथ मोते, भगवान साळुंखे, विनोद तावडे वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री.चंद्रकांत पाटील (पुणे विभाग पदवीधर) सभापती महोदय, "पुणे शहरात हाजी मक्केशा मशिदीच्या नुतनीकरण व बांधकामास देण्यात आलेली परवानगी" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 46629 ला दिनांक 17 डिसेंबर, 2009 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये ही अर्धा-तास चर्चा उपस्थित करीत आहे.

सभापती महोदय, मी सुरुवातीलाच धन्यवाद देतो. जवळजवळ 4 अधिवेशनामध्ये ही अर्ध्या तासाची चर्चा वारंवार पुढे ढकलण्यात आली होती. पुण्यामध्ये संभाजी पुलाकडून कर्वे रोडकडे जाताना वळणावर एक पत्र्याचे बांधकाम सुरु झाले आणि आता तेथे मशीद बांधण्याचा प्रयत्न चालला आहे. त्यासंबंधीची ही अर्धा तास चर्चा आहे. संभाजी पुलावरील वाहतुकीचा विचार केला तर अनेक वेळा अनेक रिपोर्टमध्ये आलेले आहे की, तेथील गोलाई जास्त आहे. ही गोलाई जास्त असावी यासाठी पलिकडील विठ्ठल मंदिर 3 वेळा मागे ढकलले गेले. इकडे ज्ञानेश्वर पादुका रस्त्यावर होत्या त्या आत गल्लीत ढकलल्या गेल्या. परंतु येथे मात्र वाहतुकीची प्रचंड कोंडी होऊन सुध्दा अनेक रिपोर्टमध्ये आलेले आहे की, तेथे मशीद नव्हती, कब्रस्तान होते. असे असून सुध्दा तेथील मशिदीचे बांधकाम हटविले जात नाही. यासंबंधी 1929 साली आर्बिटेटरने त्यांच्या रिपोर्टमध्ये लिहिलेले आहे की तेथे कब्रस्तान होते. कोणतीही मशीद नव्हती. तसेच मुस्लिम समाजाची 3 कुटुंबे सोडली तर त्या संपूर्ण परिसरात मुस्लिम समाज नाही. तेथे कायदा व सुव्यवस्थेचाही प्रश्न निर्माण होऊ शकतो. 50 फुटावर जुने शंकराचे मंदिर आहे तेथे प्रचंड भाविकांची गर्दी असते. याच पूलावरुन गणपतीच्या विसर्जनाची मोठया प्रमाणावर मिरवणूक जात असते. ज्ञानेश्वर आणि तुकाराम यांच्या पालख्या या पूलावरुन जात असतात.

यानंतर श्री.शिगम

अशुद्ध मूल / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MMP/ KGS/ पूर्वी श्री. खंदारे 21:40

(श्री. चंद्रकांत पाटील...

या सर्व गोष्टींचा विचार करता कोणत्याही नियमाखाली हे मशिदीचे बांधकाम झालेले नाही. कारण रस्त्यापासून 20 फूट अंतर बांधकाम करताना सोडावे लागते. असे असताना केवळ 7 फूट अंतर सोडून हे बांधकाम झालेले आहे. या मशिदीच्या बांधकामाबाबत अनेक रिपोर्ट येऊनही ही मशिद का हटविली जात नाही याचा शासनाने खुलासा करावा, एवढे बोलून मी येथे थांबतो.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, या अर्धा-तास चर्चेच्या माध्यमातून जो विषय या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी मांडलेला आहे त्याबाबतीत मी सांगू इच्छितो की, त्याठिकाणी पूर्वी छोटे बांधकाम होते. त्यानंतरच्या काळामध्ये त्याठिकाणी बांधकाम करण्याचा प्रयत्न झाला. आपणाला हे माहीत आहे की, दिनांक 15.3.2008च्या पत्रानुसार संबंधित ट्रस्टीजना काम थंबविण्याच्या नोटीसा देण्यात आलेल्या आहेत. सुरुवातीला पुणे महानगरपालिकेने याच बांधकामाकरिता परवानगी दिली होती. परंतु ही गोष्ट उचित नाही असे विविध संस्थांनी महानगरपालिकेच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर महानगरपालिकेने बांधकामाची परवानगी रद्द केली. त्या ठिकाणाहून गणेश विसर्जनाची मिरवणूक जाते, पार्किंगसाठी गाड्या उभ्या करण्यात येतात, भविष्यात यामुळे कायदा आणि सुव्यवस्था बिघडण्याची स्थिती निर्माण होऊ शकते असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले. अशा प्रकारच्या गोष्टी तपासून पाहून आवश्यक ती उपाययोजना शासन करील. मात्र आजच्या घडीला कोणत्याही प्रकारच्या बांधकामाला परवानगी दिलेली नाही आणि तेथे बांधकाम सुरु नाही. या संदर्भात लवकरच योग्य तो निर्णय घेतला जाईल. भविष्यामध्ये या रस्त्यावर ट्राफिक वाढणार आहे, आजही ते वाढत आहे. लोकांना विश्वासात घेऊन त्याठिकाणी रस्तारुंदीकरणाचे काम झालेले आहे. तेव्हा त्याबाबत शासन योग्य प्रकारे काम करीत आहे.

तालिका सभापती (श्री. अरविंद सावंत) : मला विषय माहीत आहे म्हणून मी या संदर्भात सांगू इच्छितो की, आपण विकासाच्या दृष्टीकोनातून शहरातील अनेक छोटी छोटी मंदिरे पाडली. परंतु विशिष्ट समाजाचे अशा प्रकारचे बांधकाम आडवे आले तर ते पाडण्याचे थांबविले जाते हे योग्य नाही. मुंबईतील पामबिच येथे समुद्राकडील भागामध्ये पूर्वी एकही बांधकाम नव्हते. तेथे छोटेसे बांधकाम होऊन हिरवा झेंडा लागला. मी सभागृहामध्ये प्रश्न उपस्थित केल्यानंतर ते बांधकाम थांबले. पण ते बांधकाम तोडले गेले नाही. त्यामुळे कालांतराने असे प्रघात पडतात. कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर होण्यासारखी परिस्थिती निर्माण करण्यास आपणस कारणीभूत आहोत. अशा गोष्टींकडे आपण दुर्लक्ष करतो मग ती महानगरपालिका असेल अथवा पोलीस खाते असेल. अशा प्रश्नांच्या बाबतीत शासनाने गांभीर्याने लक्ष दिले पाहिजे.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, विकास कामाच्या संदर्भात कायदा सर्वांकरिता सारखा आहे हे मला मान्य आहे आणि त्यादृष्टीनें शासन निश्चितपणे गंभीर राहील.

--

...3.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: अंबाजोगाई (जि. बीड) येथील नर्सेस ट्रेनिंग सेंटरची इमारत पाडून नवीन इमारत बांधणे

मु.शी.: अंबाजोगाई (जि. बीड) येथील नर्सेस ट्रेनिंग सेंटरची इमारत पाडून नवीन इमारत बांधणे यासंबंधी ॲड. उषा दराडे,वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

(सन्माननीय सदस्या अनुपस्थित)

--

पृ.शी.: माणगाव (जि. रायगड) तालुक्यातील श्री. संत गजानन महाराज शिक्षण प्रसारक मंडळाने बेकायदा भूखंड विक्री करुन केलेला भ्रष्टाचार

मु.शी.: माणगाव (जि. रायगड) तालुक्यातील श्री. संत गजानन महाराज शिक्षण प्रसारक मंडळाने बेकायदा भूखंड विक्री करुन केलेला भ्रष्टाचार यासंबंधी श्री. जयंत प्र. पाटील, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

--

पृ.शी.: माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागातील पायाभूत पेक्षा वाढीव पदांच्या मंजुरीबाबत

मु.शी.: माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागातील पायाभूत पेक्षा वाढीव पदांच्या मंजुरीबाबत विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 82ला दिनांक 8 डिसेंबर 2009 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात श्री. विक्रम काळे, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: सन 2007-2008 व 2008-2009 या कालावधीत ठाणे शहरातील जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतीचे करावयाचे सर्वेक्षण

मु.शी.: सन 2007-2008 व 2008-2009 या कालावधीत ठाणे शहरातील जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतीचे करावयाचे सर्वेक्षण या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 691ला दिनांक 9 डिसेंबर 2009 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात श्री. संजय केळकर, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा

श्री. संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय "सन 2007-2008 व 2008-2009 या कालावधीत ठाणे शहरातील जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतीचे करावयाचे सर्वेक्षण" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 691ला दिनांक 9 डिसेंबर 2009 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये अर्धा-तास चर्चा उपस्थित करीत आहे.

सभापती महोदय, माननीय मंत्री महोदय या अर्धा-ताच चर्चेला उत्तर देण्यासाठी उपस्थित राहिले त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. या अतिशय महत्त्वाच्या आणि गंभीर अशा विषयाला माननीय मंत्री महोदय निश्चितपणे न्याय देतील असा मला विश्वास आहे. ठाणे शहरातील आणि जिल्ह्यातील मोडकळीस आलेल्या आणि धोकादायक स्थितीमध्ये असलेल्या इमारतीचा हा विषय आहे. ठाणे शहराचे आणि जिल्ह्याचे नागरिकरण प्रचंड प्रमाणावर वाढत आहे. ठाणे शहरातील 894 इमारती मोडकळीस आलेल्या आहेत. तसेच 44 इमारती धोकादायक स्थितीमध्ये आहेत. कल्याण आणि डोंबिवलीमध्ये अशा 450 धोकादायक इमारती आहेत. उल्हासनगरमध्येही धोकादायक इमारती मोठया प्रमाणावर असून त्यांची संख्या आपणाकडे आहे.या सर्व इमारती पावसाळयातच नाही तर त्या केव्हाही पत्त्याच्या बंगल्याप्रमाणे कोसळण्याच्या स्थितीमध्ये आहेत. या इमारतींच्या बाबतीत नेमके काय करायचे असा प्रश्न निर्माण झालेला आहे. महानगरपालिका याबाबतीत काही करु शकत नाही आणि शासनाने देखील या इमारतींच्या बाबतीत कोणते धोरण ठरविलेले नाही. या इमारती अनधिकृत असल्या तरी त्या गेल्या 30-40 वर्षापासून त्याठिकाणी उभ्या आहेत.

...नंतर श्री. पी. खर्चे...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. संजय केळकर ....

जर माणसे त्यात राहत असतील तर त्यांचा विचार करणे आवश्यक आहे. काही वर्षापूर्वी ठाण्यात एक "साईराज" नावाची इमारत कोसळली त्याची पुनर्बांधणी करावयाचे अजूनही बाकी आहे. या लोकांनी संक्रमण शिबीरात जाण्यास नकार दिला कारण तेथे कुठल्याच सुविधा नसतात असे त्यांचे म्हणणे आहे आणि महापालिकेकडे त्यांना देण्यासाठी कुठलीच जागा नाही अशी परिस्थिती आहे. त्यामुळे शहरातील लोकांच्या दृष्टीने अतिशय जिव्हाळ्याचा हा प्रश्न असल्याने यासंबधी शासनाने निश्चित असे धोरण ठरवावे परंतु त्यातही दिरंगाई चालू आहे. दुसरीकडे मात्र रोज नवनवीन इमारती पडत आहेत आणि हा प्रश्न आणखी बिकट होत आहे. यासंदर्भात मध्यंतरी शासनाने अग्रवाल समिती नियुक्त केली होती. त्याचप्रमाणे ठाण्यातील अनधिकृत इमारती आणि मोडकळीस आलेल्या इमारतींच्या बाबतीत अशा वेगवेगळ्या समित्या वेळोवेळी नेमल्या गेल्या. या अग्रवाल समीने आपला अहवाल शासनाला सादर केलेला आहे परंतु त्यात काय म्हटले ते सामान्य माणसाला मात्र अद्यापही समजले नाही. म्हणून शासनाने याबाबत ठोस असा निर्णय घेण्याची गरज आहे. कारण ठाण्यातील लाखो लोक शासनाच्या निर्णयाची वाट पाहत आहेत. त्यांच्या मनात शंका आहे की, शासन आमची व्यवस्था करणार की नाही, आमचे पुनर्वसन करणार की नाही, या इमारतीची पुनर्बांधणी करणार की एफएसआय वाढवून देणार अशा प्रकारचे अनेक प्रश्न निर्माण होत आहेत आणि या लोकांचा जीव टांगणीला लागला आहे. म्हणून या गरीब व मध्यमवर्गीयांच्यादृष्टीने अतिशय महत्वाचा प्रश्न बनला असून त्याबाबत शासनाने धोरण ठरवावे तसेच अग्रवाल समितीने ज्या शिफारशी केल्या आहेत त्याअनुषंगाने पुनर्बांधणी कशी केली जाईल यासंबंधीचे धोरणही ठरवावे अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी अत्यंत महत्वाच्या प्रश्नाला हात घातलेला आहे. पण आपल्या परवानगीने मी एक गोष्ट अशी सांगणार आहे की, जी शासकीय उत्तराच्या पलिकडची असणार आहे. साधारणपणे कोणताही विषय घेत असताना आम्ही मानवतेच्या दृष्टीने किंवा वर्षानुवर्षे त्यात राहणाऱ्या लोकांच्या जिविताच्या दृष्टीने तसेच इमारत कोसळल्यानंतर त्यांचे पुनर्वसन असे हे विषय असतात. मुळात ही शासन म्हणून माझी जबाबदारी आहे तरी देखील प्रत्येक गोष्ट आपण लोकांची ढाल करुन सातत्याने बोलतो आणि अशा पध्दतीने हा कम्युनिकेशन गॅप राहिला आहे काय अशी मला शंका येते. हा प्रश्न केवळ ठाणे शहरापुरताच मर्यादित स्वरुपाचा नाही तर संपूर्ण ठाणे जिल्ह्यात अनुधिकृत इमारतींची संख्या जास्त आहे, तसेच त्याबाबतची चर्चाही अनेक वर्षे आपण ऐकत आहोत. तरी देखील अशा इमारतीत लोक राहण्यास जातात. नंतर पुन्हा पुन्हा त्याच कायदेशीर बाबींची पुर्तता झाली की नाही, हे न पाहता लोक राहण्यासाठी जात असतात. मग भावनेचा प्रश्न उभा करुन पुन्हा असे प्रश्न वारंवार निर्माण होतात. आपण आताच सांगितले की, अग्रवाल समितीची नियुक्ती शासनाने केली होती. त्या समितीचा अहवाल दि. 18 जानेवारी, 2008 रोजी नियुक्त केली होती. ही समिती ठाणे जिल्ह्यातील अनधिकृत इमारतींचा शोध घेण्यासाठी नेमण्यात आली होती. त्यानंतर दि. 26.11.2008 रोजी या समितीचा अहवाल प्राप्त झाला असून त्यामध्ये वेगवेगळ्या शिफारशी करण्यात आल्या आहेत. त्यानंतर हा विषय जनहित याचिकेच्या माध्यमातून उच्च न्यायालयात गेला. उच्च न्यायालयाने यासंबंधी शासनाला विशेष निदेश दिले आणि त्यानुसार पुन्हा मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली अशी समिती नेमण्यात आली. या समितीने केवळ ठाणे शहरातील अनधिकृत इमारतींचीच पाहणी करायची नाही तर संपूर्ण ठाणे जिल्ह्यातील एकत्रितपणे किती इमारती अनधिकृत आहेत यांचाही आढावा घेतला पाहिजे यासाठी नेमली आहे. त्यानंतर आपण अनधिकृत इमारतींच्या संदर्भात शासन धोरण ठरविणार काय असा मुद्दा उपस्थित केला. त्यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, असे धोरण ठरविण्यापूर्वी सध्या चार मजली, पाच, सहा, सात मजली इमारती किती आहेत यांचा पूर्ण लेखाजोखा घेणे तितकेच आवश्यक आहे. अन्यथा शासनाने धोरण ठरविल्यानंतर देखील थोड्याच काळात ठराविक मजल्यापर्यंत परवानगी दिली आहे असे समजून पुन्हा इमारती उभ्या राहू शकतात आणि पुन्हा तोच प्रश्न निर्माण होईल. म्हणून

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव ....

यासंबंधीचे धोरण ठरविण्यापूर्वी शासनाला अशा इमारतींची माहिती घेणेही आवश्यक आहे. तसेच आपण हा प्रश्न उपस्थित केला असला तरी शासन यासंदर्भात जातीने लक्ष घालत आहे. माझ्या मर्यादांची मला कल्पना आहे तरी देखील मला जेवढे अधिकार मिळालेले आहेत ते आणि एक कार्यकर्ता या नात्याने मी यामध्ये नक्कीच लक्ष घालीन.....

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव....

मघाशी मी सांगितल्या प्रमाणे धोरण ठरवून त्या धोरणाचा फायदा चुकीच्या मार्गाने घेतला जाऊ नये यासाठी सर्व माहिती गोळा करण्याचे काम सुरु असून यामध्ये निश्चित प्रकारे चांगल्या प्रकारची माहिती गोळा केली जाईल. यामध्ये अधिकाधिक मानवतेच्या दृष्टिकोनाची ढाल तयार करुन या प्रश्नातून मार्ग काढतो त्यापेक्षा अशा प्रकारचे प्रश्न पुन्हा निर्माण होणार नाही यासाठी संबंधित अधिका-यावर जबाबदारी फिक्स करण्याची आवश्यकता आहे, असे माझे स्वत:चे मत आहे. त्यामुळे शासन यादृष्टीने निश्चित प्रकारे प्रयत्न करेन.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, माननीय मंत्रीमहोदयांनी अनाधिकृत बांधकामाच्या संदर्भात आपले विचार विस्तृतपणे मांडले आहेत. ठाणे जिल्हयामध्ये या प्रश्नाच्या संदर्भात अनेक अहवाल, अनेक गोष्टी झालेल्या आहेत. ज्या धोकादायक इमारती आहेत त्या पडल्या तर काय परिस्थिती ओढावेल असा माझा माझ्या अर्धा तास चर्चेचा विषय आहे. मोडकळीस आलेल्या इमारतींचे सर्व्हेक्षण सुध्दा झालेले आहे. ठाणे शहरामध्ये 968 इमारती मोडकळीस आलेल्या असून या इमारतींचे सर्व्हेक्षण सुध्दा झालेले आहे, 44 इमारती तर अतिधोकादायक आहेत. त्यामुळे या मोडकळीस आलेल्या इमारतींच्या संदर्भात शासनाने निर्देश दिले नाही तर मध्यंतरी जशी साईराज इमारत पडली, मागच्या महिन्यात उल्हासनगर येथे दोन इमारती पडल्या तसेच होईल. त्यामुळे ज्या इमारती मोडकळीस आलेल्या आहेत किंवा ज्या इमारती अतिधोकायक आहेत त्यांच्या बाबतीत निश्चित प्रकारे काही तरी निदेश देणे आवश्यक आहेत. अधिकृत आणि अनाधिकृत इमारतींच्या बाबतीत अनेक वर्षापासून चर्चा सुरु आहे. त्यामुळे मोडकळीस आलेल्या इमारतींच्या बाबतीत शासनाने निर्देश द्यावेत अशी माझी माननीय मंत्रीमहोदयांना विनंती आहे.

श्री. भास्कर जाधव : आपल्या मूळ प्रश्नाच्या अनुषंगाने ही अर्धा तास चर्चा उपस्थित करण्यात आलेली आहे. त्यामुळे आपल्या मूळ प्रश्नात काय आहे हे वाचल्यानंतर आपल्या लक्षात येईल. आपला मुद्दा मोडकळीस आलेल्या इमारतींच्या संदर्भातील आहे. त्यासंदर्भात नोटीसेस देण्याचे काम यापूर्वीच झालेले आहे. तसे झाले नसेल तर तात्काळ नोटीसेस देण्यात येतील. ज्या इमारती अतिशय धोकादायक आहेत त्या ठिकाणच्या लोकांचे पुनर्वसन होण्याच्या दृष्टीने जी काही

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव ....

कायदेशीर कार्यवाही करता येणे शक्य आहे ते केले जाईल तसेच मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली जी समिती नेमण्यात आलेली आहे त्या समितीचा अहवाल लवकरच प्राप्त होण्याची शक्यता आहे कारण या समितीला 31 डिसेंबर पर्यंतच मुदत देण्यात आलेली आहे त्यामुळे मुख्य सचिवांच्या समितीचा अहवाल आल्यानंतरच याबाबतीत निर्णय घेणे उचित होईल.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, उल्हासनगर येथे इमारती कोसळण्याचे प्रकार मोठया प्रमाणात होऊन अनेक दुर्घटना होत आहेत. मला माननीय मंत्रीमहोदयांकडून जाणून घ्यावयाचे आहे की, उल्हासनगरमधील कोसळलेल्या इमारतींच्या संदर्भात उल्हासनगरच्या महासभेने ठराव मंजूर केला असून कोसळलेल्या इमारतींचे रिडेव्हलपमेंट करुन त्यांना एफएसआय वाढवून देण्याच्या संदर्भात ठराव मंजूर करुन तो शासनाकडे पाठविला आहे त्यामुळे पडलेल्या इमारतींना वाढीव एफएसआय देण्याच्या बाबतीत शासन सहानुभूतिपूर्वक विचार करणार आहे काय ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, मी एवढेच सांगतो की, सहानुभूतीपूर्वक विचार करण्यापेक्षा जे कायदेशीर असेल त्याचाच विचार केला जाईल.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: कल्याण डोंबिवली महानगरपालिकेत सामावून घेण्यात आलेल्या शिक्षकांना वेतन न मिळणे.

मु.शी.: कल्याण डोंबिवली महानगरपालिकेत सामावून घेण्यात आलेल्या शिक्षकांना वेतन न मिळणे यासंबधी श्री. रामनाथ मोते,वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) :सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो.

"कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीतील २७ गावे वगळण्याचा निर्णय शासनाने जुलै, २००२ मध्ये घेतल्यानंतर या २७ गावांमध्ये काम करणाऱ्या शिक्षकांना जिल्हापरिषदेकडे वर्ग करण्यात आले. पुन्हा त्यांना कल्याण डोंबिवली महापालिकेत सामावून घेण्यात आले. दरम्यान काम करुनही ६-६ महिन्यांचे वेतन शिक्षकांना मिळाले नाही. तसेच शिक्षकांची रिक्त पदे असूनही जिल्हा परिषद ठाणे यांचेकडे कार्यरत असलेल्या १० शिक्षकांना अद्यापही सामावून घेण्यात आलेले नाही. प्रशासनाकडून थकीत पगार देण्याबाबत व १० शिक्षकांना सामावून घेण्याबाबत टाळाटाळ होत आहे. याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, कल्याण डोंबिवली महानगरपालिका शिक्षण मंडळातील शिक्षकांचा हा विषय आहे. कल्याण डोंबिवली महानगरपालिकेची स्थापना झाल्यानंतर कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या परिसरात ज्या काही शाळा होत्या त्या सर्व शाळा कल्याण डोंबिवली महानगरपालिका शिक्षण मंडळाच्या ताब्यात आल्या. 1994-95 मध्ये या महानगरपालिकेच्या क्षेत्रात आजूबाजूच्या गावांचा नव्याने समावेश करण्यात आला. परिणामत: या ग्रामीण भागातील गावांमध्ये जिल्हा परिषदेच्या ज्या प्राथमिक शाळा होत्या त्या सुध्दा कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या कार्यकक्षेत आल्यामुळे या सर्व शाळा शिक्षकांसह कल्याण डोंबिवली महानगरपालिकेकडे वर्ग झाल्या. या गावांचा समावेश कल्याण डोंबिवली महानगरपालिकेत झाल्यानंतर परत त्या ठिकाणी वाद सुरु झाला आणि काही गावानी एक संघर्ष समितीची निर्मिती केली. या संघर्ष समितीने त्यांची काही गावे कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातून वगळण्याच्या संदर्भात आंदोलन केले.

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते...

सभापती महोदय, 12 जुलै 2002 मध्ये ही 27 गावें कल्याण डोंबिवली महानगर क्षेत्रातून वगळण्याचा निर्णय झाला होता त्याचा परिणाम असा झाला की, 27 गावातील ज्या 28 शाळा होत्या आणि ज्या कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या होत्या,कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळाच्या होत्या त्या सगळया शाळा पुन्हा जिल्हा परिषदेकडे वर्ग
झाल्या होत्या आणि जवळजवळ 119 शिक्षक पुन्हा कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या आस्थापनेवरुन जिल्हा परिषदेच्या आस्थापनेवर गेले होते. त्यामध्ये काही घोटाळेसुध्दा झाले होते काही शिक्षकांची सेवा ज्येष्ठता डावलण्यात आली होती , काही शिक्षक तिकडे जावयाला पाहिजे होते आणि काही शिक्षक जावयास नको होते असा प्रकार सुध्दा झाला होता अर्थात या संबंधीचे प्रकरण न्यायालयात गेलेले आहे. न्यायालयाने पडताळणी करुन योग्य ते आदेशही दिले आहेत आणि कल्याण डोंबिवली महानगरपालिकेतून जिल्हा परिषदेकडे जे काही शिक्षक वर्ग केले होते त्यातील सर्व शिक्षक टप्याटप्याने म्हणंजेच जसजशा जागा रिक्त होतील तस तसे आपल्या मूळ आस्थापनेवर म्हणजेच कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या आस्थापनेकडे वर्ग करण्याचे आदेश देण्यात आले होते. त्यानुसार पहिल्या टप्यात 85 शिक्षक वर्ग करण्यात आले, दुस-या टप्यात दहा बारा शिक्षक वर्ग झाले आणि आता 119 पैकी फक्त 10 शिक्षक जे कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचे मूळ शिक्षक आहेत ते जिल्हा परिषदेकडे आहेत. 119 पैकी बरेसचे शिक्षक कल्याण डोंबिवली महानगरपालिकेकडे वर्ग झाल्यानंतर 10 शिक्षकांचा फक्त प्रश्न राहिला आहे. त्याचवबरोबर कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळाकडे सेवा निवृत्तीमुळे किंवा अन्य कारणामुळे 30 शिक्षकांच्या जागा रिक्त आहेत या जागावर 10 शिक्षकाना सहजपणे सामावून घेता येणे शक्य आहे. मी अनेक वेळा शिक्षण मंडळाच्या प्रशासन अधिका-यांना भेटलो त्याचबरोबर आयुक्तांनासुध्दा भेटलो होतो. त्या बाबतीत शांसनानेसुध्दा पत्र दिलेले आहे परंतु अजूनही या शिक्षकांना सामावून घेण्यात आलेले नाही. सान्माननीय मंत्री मला मदत करतील अशी मला आशा आहे.या दहा शिक्षकांना कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या आस्थापनेकडे वर्ग करण्याबाबत माननीय मंत्रिमहोदयांनी तातडीने आदेश दिले तर तो एक चांगला निर्णय होईल. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय,सन्माननीय सदस्य श्री रामनाथ मोते यांनी जी अर्धा तास चर्चा् उपस्थित केलेली आहे त्याबाबतीत उत्तर देण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला प्रश्न अत्यंत साधा आणि सोपा आहे.27 गावे महानगरपालिकेत गेली म्हणून 28 शाळेतील 119 शिक्षक देखील महानगरपालिकेमध्ये गेले होते आणि त्यातील काही गावे पुन्हा बाहेर आली. ज्या अर्थी हे शिक्षक महानगरपालिकेमध्ये गेले त्याअर्थी काही गावे बाहेर काढल्यानंतर हे शिक्षकसुध्दा पुन्हा जिल्हा परिषदेकडे यावयास पाहिजे होते.परंतु तसे होऊ शंकले नाही.हे शिक्षक ठाणे जिल्हा परिषदेमध्ये का गेले होते ? ती गावे त्या ठिकाणी समाविष्ट करण्यात आल्यामुळे हे शिक्षक तिकडे गेले होते.जर ही गावे समाविष्ट झाली नसती तर हे शिक्षक जिल्हा परिषदेकडेच राहिले असते. ही गावे महानगरपालिकेतून वगळली गेली असल्यामुळे शिक्षकांनी बाहेर यावयास पाहिजे होते आणि जिल्हा परिषदेकडे यावयास पाहिजे होते परंतु तसे झालेले नाही. परंतु तो वादाचा मुद्दा आता संपलेला आहे.

सभापती महोदय, त्यातील 85 शिक्षक पूर्वीच महानगरपालिकेमध्ये गेलेले आहेत. शिक्षकांना शहरातील शाळा लागतात म्हणून हे शिक्षक तिकडे गेलेले आहेत. कोर्टाच्या निर्णयामुळे 8 शिक्षक गेले असून एका शिक्षकाने रत्नागिरीला बदलीकरुन घेतली आहे शिक्षक ठाणे जिल्हा परिषदेमध्ये 2 शिक्षक गेले असून उरलेले 13शिक्षक सेवा निवृत्त झालेले आहेत आणि आता फकत दहा शिक्षकच जिल्हा परिषदेकडे आहेत. त्यांना पुन्हा महानगरपालिकेकडे सामावून घेणे हा खरा महत्वाचा गाभा आहे . या विषयापेक्षासुध्दा त्यांचा दुसरा आणखी एक विषय असून तो विषय असा आहे की, महानगरपालिकेकडे असतांना`जिल्हा परिषदेकडे जेव्हा ते वर्ग झाले तेव्हा तेथे दिलेल्या शाळांवर हे शिक्षक हजर होऊ शकले नाहीत त्यामुळे त्यांच्या मध्यंतरीच्या काळातील पगाराचा प्रश्न येणार आहे. यामुळे काम तसा दाम याचा विचार आपण करावयास पाहिजे.सन्माननीय सदस्यांच्या पहिल्या प्रश्नाचे मी उत्तर दिलेले आहे.

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर सन्माननीय सदस्य श्री रामनाथ मोते यांनी दुसरा जो प्रश्न उपस्थित केलेला आहे त्या बाबतीत मी त्यांना सांगू इच्छितो की,ते माझे चांगले मित्र आहेत, ते शिक्षकांमधून निव्डून आलेले आहेत.त्यांना शिक्षकाबद्दल आस्था आहे. मी त्याना हे सांगितले की ,27 गावे जशी गेली तशी ती बाहेर येऊ शकत होती परंतु तो विषय आता संपलेला आहे आणि 10 शिक्षकांना महानगरपालिकेकडे सामावून घेण्याकरता तात्काळ सांगण्यात येईल. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

वंचित राहिलेले आदिवासी

मु.शी. रायगड जिल्हयात आदिवासी योजनेच्या लाभापासून वंचित राहिलेले आदिवासी यासंबंधी श्री जयंत प्र.पाटील, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा -तास चर्चा

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

पृशी. : कांदिवली पश्चिम (मुंबई) येथील हेरीटेज पॅरोडीच्या 45 सदनिकाधारकांची बिल्डरने केलेली फसवणूक

मु.शी कांदिवली पश्चिम (मुंबई) येथील हेरीटेज पॅरोडीच्या 45 सदनिकाधारकांची बिल्डरने केलेल्या फसवणुकी सबंधी श्री परशुराम उपरकर वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा- तास चर्चा

(सन्माननीय सदस्य्य अनुपस्थित)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. राज्यातील मनोरुग्णांकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष

मु.शी.: राज्यातील मनोरुग्णांकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष यासंबंधी ॲड.अनिल परब,वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा -तास चर्चा

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

पृशी. कर्मचा-यांच्या नजरचुकीमुळे आय.टी.आय.निदेशकांची होत असलेली ससेहोलपट

मु.शी. : कर्मचा-यांच्या नजरचुकीमुळे आय.टी.आय. निदेशकांची होत असलेली ससेहोलपट या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 59 ला दिनांक 8 डिसेंबर 2009 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात श्री.विक्रम काळे,वि.प.स यांनी उपस्थित केलेली अर्धा- तास चर्चा.

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

नंतर श्री.सुंबरे

अशुद्धीरित प्रत / शुद्धीसाठी नाही

पृ.शी. : सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या पर्यटन नकाशात नोंद असलेल्या सैतवाडा, सावडाव, नाधवडे येथील धबधब्याची ठिकाणे पर्यटनाच्यादृष्टीने विकसित करणे.

मु.शी. : सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या पर्यटन नकाशात नोंद असलेल्या सैतवाडा, सावडाव, नाधवडे येथील धबधब्याची ठिकाणे पर्यटनाच्यादृष्टीने विकसित करणे यासंबंधी श्री.राजन तेली, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा तास चर्चा.

श्री. राजन तेली (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा तास चर्चा उपस्थित करतो.

" सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या पर्यटन नकाशामध्ये नोंद असलेल्या शिरगाव नजिकच्या पाडागार येथील सैतवाडा धबधबा, कणकवली नजिकच्या सावडाव येथील धबधबा, तसेच वैभववाडी तालुक्यातील नाधवडे धबधबा, आजही पर्यटनदृष्ट्या विकासापासून वंचित राहणे, निसर्गरम्य अशा परिसरांना हजारो पर्यटक नेहमी भेट देत असणे, सदर परिसर पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्याकरिता शासनाने निधी देण्याची आवश्यकता, तसेच सदर ठिकाणी मार्गदर्शक नेमण्याबाबत व पर्यटकांसाठी अन्य सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाय योजना."

सभापती महोदय, प्रथमतः मी आपल्याला धन्यवाद देतो की, आपण मला ही अर्धा तास चर्चा उपस्थित करण्याची संधी दिली. सभापती महोदय, 1998 मध्ये सिंधुदुर्ग जिल्हा पर्यटन जिल्हा म्हणून घोषित झाला पण दुर्दैवाने या विषयावर चर्चा करण्यास सरकारला वेळ नाही. कारण दोन तीन अधिवेशनांमध्ये हा विषय पुढे ढकलला गेला आहे. माझी या निमित्ताने आपल्याला विनंती आहे की, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील शिरगाव नजिकच्या पाडागार येथील सैतवाडा धबधबा, कणकवली नजिकचा सावडाव येथील धबधबा तसेच वैभववाडी तालुक्यातील नाधवडे धबधबा ही तिन्ही ठिकाणी निसर्गरम्य आहेत आणि ती चांगली पर्यटनस्थळे होऊ शकतात पण त्या दृष्टीने विकासापासून वंचित आहेत. सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्ह्यात असे बरेच धबधबे आणि पर्यटनाच्या दृष्टीने निसर्गरम्य ठिकाणे आहेत परंतु मी ही तिन्ही ठिकाणे मुद्दाम आपल्या नजरेस आणून दिली आहेत. या तिन्ही ठिकाणची परिस्थिती इतकी बिघडलेली आहे की, नापण्याला गेल्या वर्षी अपघात झाला

..... 5झेड 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आणि त्यात दोन तरूण मुले बुडून मरण पावली. इरफान अब्दुल बोबडे आणि आबिद अमीन बोबडे अशी त्यांची नावे होती. त्या ठिकाणी कोठल्याही प्रकारची व्यवस्था नाही. तेथे कपडे वगैरे बदलण्यासाठी चेंजिंग रूम देखील नाही. पण पर्यटनाच्या माध्यमातून त्या धबधब्यावर किती तरी लोक येतात. म्हणून ज्या ठिकाणी पायाभूत सुविधा आहेत .. केंद्राकडून आपल्याला पर्यटनाच्या माध्यमातून बरेच पैसे येतात पण ते कसे खर्च केले जातात हे मी येथे सांगायला नको. तेव्हा माझी या निमित्ताने विनंती अशी आहे की, हा धबधबा असेल वा शिरगावमधील सैतवडा धबधबा असेल, आंबोलीचा धबधबा असेल या सगळ्या धबधब्यांच्या ठिकाणी पायाभूत सुविधा आपण उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. उदा. तेथे कपडे बदलण्यासाठी चेंजिंगरूम असेल, रस्ता असेल, सुरक्षेच्या दृष्टीकोनातून काही सूचना असतील या आपण तेथे शासनाच्या माध्यमातून करणार आहात की नाही ? दुसरे म्हणजे सैतवड्यामध्ये देखील गेल्या दीड वर्षापूर्वी दयानंद सिद्धार्थ जाधव आणि रत्नकांत भिकाजी नाईक हे दोन 22 ते 24 वर्षांचे तरूण बुडून मृत्यू पावले. अशा प्रकारे त्या ठिकाणी वेळोवेळी अपघात होतात. तेव्हा शासन याची दखल घेणार आहे की नाही ? तसेच तेथे पर्यटक अधिक संख्येने यावेत यासाठी पायाभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात अशी मी विनंती करतो. सभापती महोदय, 1998 मध्ये युती सरकार असताना सिंधुदुर्ग जिल्हा हा देशातील असा एकमेव जिल्हा पर्यटन जिल्हा म्हणून घोषित केला गेला. आज गोवा असेल, केरळ असेल त्या राज्यांनी पर्यटनाच्या दृष्टीकोनातून खूप मोठी प्रगती केलेली आहे. म्हणून सिंधुदुर्ग जिल्ह्यात परमेश्वराने, निसर्गाने इतक्या मोठ्या प्रमाणात साधनसंपत्ती देऊनही शासन त्याकडे दुर्लक्ष करीत आहे म्हणून आपल्या माध्यमातून माझी शासनाला विनंती आहे की, पूर्वी तेथे विकास करण्याच्या दृष्टीने टाटा कंसल्टन्सी म्हणून एक एजन्सी नेमली होती. आज गेल्या 10 वर्षात त्या कंपनीचे तेथे काहीही काम नाही. म्हणून शासनाने एक अतिशय चांगली अशी एजन्सी नेमावी आणि त्या जिल्ह्यात पर्यटनाच्या दृष्टीने जे जे काही स्पॉटस् असतील त्यांचा सर्व्हे करावा आणि चांगल्या प्रतीचे नियोजन करून येणाऱ्या काही काळात तरी या जिल्ह्यातील पर्यटनाला एक वेगळी चालना देण्याचे दृष्टीने शासन काही प्रयत्न करणार आहे की नाही ? तसा प्रयत्न आपण करावा अशी मी या अर्धा तास चर्चेतून आपणाला विनंती करतो.

तालिका सभापती : माझा देखील आपल्या या विषयाला आणि विनंतीला पाठिंबा आहे.

*** ... 5झेड 3 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वर्षा गायकवाड (पर्यटन राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी अर्धा तास चर्चेद्वारे जो विषय येथे मांडला आहे त्याबाबत मी आपल्याला सांगू इच्छिते की, सिंधुदुर्ग जिल्ह्याला पर्यटन जिल्हा म्हणून 1998 मध्ये घोषित केलेले आहे हे खरे असले तरी आपल्याला हेही समजून घेतले पाहिजे की, त्यामध्ये देखील वर्गवारी करण्यात आलेली आहे. अ वर्ग, ब वर्ग आणि क वर्ग अशी या पर्यटन क्षेत्रांची वर्गवारी केलेली आहे, जिल्ह्यांची केलेली आहे. त्यापैकी अ वर्गामध्ये राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तराचे प्रकल्प असतात आणि त्यांना केंद्र शासनातर्फे निधी मिळत असतो तसेच राज्य स्तरावरील जे प्रकल्प असतात त्यांचे वर्गीकरण ब वर्गामध्ये केले जाते आणि त्यांना राज्य सरकारकडून निधी मिळत असतो आणि जे क वर्गातील प्रकल्प असतात वा पर्यटन स्थळे असतात, जिल्हा स्तरीय स्थळे असतात किंवा तीर्थक्षेत्रे असतात त्यांना डीपीडीसीच्या माध्यमातून पैसा दिला जात असतो. आता सन्माननीय सदस्यांनी ज्या ठिकाणांचा उल्लेख पर्यटन स्थळे म्हणून केला आहे ती सर्व धबधब्यांची ठिकाणे जिल्हास्तरावरील आहेत आणि ती क वर्गात येतात. त्यापैकी देवगड तालुक्यातील सैतवडा येथील धबधब्याचा सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केला आहे आणि त्या ठिकाणी अनेक पर्यटक सातत्याने येत असतात आणि तेथे पुष्कळ वर्दळ असते व वर्षाचे बाराही महिने तेथे पाणी असते. त्यांनी सांगितले ते बरोबर आहे, पण हे ठिकाण पर्यटन स्थळ म्हणून क वर्गामध्ये येते आणि ते जिल्हा स्तरावर विकसित केले जाऊ शकते. 2006-07 च्या आमदार स्थानिक विकास निधीतून तेथे पारडाघर ते सैतवडा धबधबा या रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरणाचे काम पूर्ण करण्यात आले आहे. तसेच कणकवली तालुक्यातील सावडा धबधबा हे ठिकाण कणकवली शहरापासून 12 कि.मी. अंतरावर असून त्यासाठी सन 2000-2005 मध्ये कोकण विकास कार्यक्रमांतर्गत या पर्यटनस्थळी पोहोचण्यासाठी पोहोच रस्त्याचे काम करण्यासाठी 10 लाखाचा निधी दिलेला आहे. त्याही पुढे जाऊन मी आपल्याला सांगेन की, 2008-09 मध्ये त्यासाठी पुन्हा 10 लाखाचा निधी उरलेला जो रस्ता आहे तो पूर्ण करण्यासाठी म्हणून आपण मंजूर केला आहे. त्यानंतर वैभववाडी तालुक्यातील नाधवडे धबधब्याचा जो उल्लेख सन्माननीय सदस्यांनी केला आहे त्याबाबत मी आपल्यामार्फत सांगू इच्छिते की, कोकण विकास कार्यक्रमांतर्गत 2004-05 मध्ये त्या हद्दीमध्ये पर्यटन सुविधा देण्यासाठी आपण 24.44 लाख इतका निधी दिला आहे. त्यातून आपण तेथे विश्रामगृह, शौचालय, कार्यालय, रेस्टॉरंट, कीचन व माहिती

.... 5झेड 4 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

केंद्र बांधण्याचा कार्यक्रम घेतला होता. पण या कामासाठी प्रस्तावित जागेला आणि त्या पूर्ण प्रकल्पालाच तेथील ग्रामस्थांनी विरोध केला व त्यामुळे तो सारा निधी अखर्चित राहिला आणि तो शासनाकडे समर्पित झाला. म्हणून मी आपल्यामार्फत माननीय श्री.तेली साहेबांना विनंती करते की, आम्ही शासनामार्फत 16.7.2009 ला एक पत्र पाठविले. ...

(यानंतर श्री. सरफरे .... 6ए 1 ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वर्षा गायकवाड...

नादवडे पर्यटन केंद्र घोषित करण्याच्या बाबतीत जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांना हे पत्र पाठविले आहे. त्यासाठी आपल्याला प्रारुप आराखडा तयार करावा लागेल. त्यासाठी आम्ही त्यांना पत्राव्दारे कळविले आहे की, पर्यटन क्षेत्राचा दर्जा देण्यासाठी शासनाला आपण लवकरात लवकर अभिप्राय कळवावा. त्यामुळे जोपर्यंत आपण अ,ब,क चा दर्जा देऊ शकणार नाही तोपर्यंत आपण त्यांना मदत करु शकणार नाही. त्याचप्रमाणे ठाणे, रायगड,रत्नागिरी व सिंधुदुर्ग येथील जिल्हाधिकाऱ्यांना दिनांक 15 जानेवारी 2007 रोजी पत्राव्दारे सांगितले आहे की, दिनांक 24.4.2006 च्या पत्राव्दारे पर्यटनाचा विकास करण्याचा प्रस्ताव सादर करण्यासाठी आवश्यक त्या सूचना आम्ही तुम्हाला दिल्या आहेत. त्यानुसार लवकरात लवकर प्रस्ताव आमच्याकडे पाठवावेत असे आम्ही त्यांना पत्राव्दारे कळविले आहे. तरीसुध्दा माननीय सदस्य श्री. राजन तेली यांना आश्वस्त करते की, हे आराखडा तयार करण्याचे काम लवकरात लवकर करण्याचा प्रयत्न करण्यात येईल. तेथील ग्रामस्थांचा त्या जागेला विरोध आहे. त्याकरिता माननीय सदस्यांनी व्यक्तिश: लक्ष घालावे. त्यादृष्टीने शासनातर्फे त्यांना आवश्यक ती मदत केली जाईल. आणि हे पर्यटन स्थळ विकसित करण्याबाबत शासनाचा सकारात्मक दृष्टीकोन राहील. परंतु जेव्हा हा प्रारुप आराखडा तयार होईल त्यावेळी आवश्यक तो निधी त्या कामासाठी मिळेल. आराखडा तयार झाल्यानंतर ते पर्यटन स्थळ कोणत्या कॅटॅगरीमध्ये येत आहे हे समजेल. त्यानंतर आपण पुढील कामाला सुरुवात करु.

तालिका सभापती (श्री. अरविंद सावंत) : सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्हा हा देशातील एकमेव पर्यटन जिल्हा घोषित करुन 10 वर्षे झाली. तरीसुध्दा या जिल्हयाला अ,ब,क, हा दर्जा निश्चित करण्यासाठी एवढा वेळ लागतो ही खेदजनक बाब आहे. तो जाहीर करण्यासाठी आपण प्रयत्न केले पाहिजेत. तो एकदा जाहीर झाल्यानंतर आपोआप निधी येईल. एका बाजूला आपण पर्यटन जिल्हा झाला पाहिजे असे सांगावयाचे आणि दुसऱ्या बाजूला दर्जा निश्चित केला जात नाही. म्हणून याबाबत लवकरात लवकर आपण दर्जा निश्चित करणार काय?

श्रीमती वर्षा गायकवाड : सभापती महोदय, दिनांक 24.4.2006 रोजी पत्राव्दारे पर्यटनाचा विकास करण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यासाठी आवश्यक त्या सूचना शासनातर्फे दिल्या आहेत. त्यानंतर आपण पुन्हा 15 जानेवारी 2007 रोजी पत्र पाठविले आहे...

तालिका सभापती : त्या अधिकाऱ्यांकडून जर आपल्याला उत्तर दिले जात नसेल तर आपण त्या अधिकाऱ्यांना धारेवर धरले पाहिजे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. राजन तेली : सभापती महोदय, युती शासनाच्या काळात 1998 मध्ये टाटा कन्सल्टंसी एजन्सी नेमली होती. त्याप्रमाणे् आता या कामासाठी पुन्हा एखादी कमिटी आपण नेमणार काय? पुन्हा त्याठिकाणी नव्याने सर्व्हे करुन नियोजनबध्द आराखडा तयार करणार काय? दुसरा प्रश्न असा की, केंद्र सरकारकडून या कामासाठी निधी येतो, त्याप्रमाणे् राज्य शासन आपल्या अर्थसंकल्पामधून काही निधी देते काय? पर्यटन विकासाच्या दृष्टीकोनातून हा निधी खर्च केला पाहिजे अशाप्रकारच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांमार्फत पर्यटन विभगाला दिल्या पाहिजेत. आज पर्यटन विकासासाठी येणारा निधी रस्त्याच्या कामावर खर्च केला जातो...

तालिका सभापती : कणकवलीजवळ एक पर्यटनस्थळ बांधून ठेवले आहे त्याठिकाणी कुत्रेही जात नाही....

श्री. राजन तेली : सभापती महोदय, खारेपाटणला बांधून ठेवले आहे, कणकवलीहून मोरया डोंगराकडे जातांना बांधून ठेवले आहे, त्याठिकाणी कुणीही जात नाही.म्हणून त्यासाठी आपण व्यवस्थितपणे नियोजन करणार काय? त्यासाठी आपण बाहेरील चांगली एजन्सी नेमणार काय? म्हणून त्यासंबंधी आराखडा तयार करुन केंद्र सरकारचे जे पैसे येतील ते पर्यटन विकासावर खर्च होतील यासाठी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत पर्यटन विभागाला सूचना देणार काय?

तालिका सभापती : मंत्रिमहोदय, माननीय सदस्यांच्या प्रश्नाचे उत्तर देण्यापूर्वी मला यानिमित्ताने एक सूचना करावयाची आहे की, आपण सिंधुदुर्ग जिल्हयाला व्यक्तिश: भेट द्यावी. सिंधुदुर्ग जिल्हा हा अतिशय सुंदर आहे. माननीय सदस्यांनी आता सांगितल्याप्रमाणे मोरया डोंगर व कणकवलीकडून कणेरीकडे जाणाऱ्या रस्त्यावर 2 हजार चौरस मीटरचे एक सुंदर रेस्ट हाऊस बांधले आहे. कणकवली स्टेशन, मुंबई-गोवा रस्त्यावर कोठेही पर्यटन स्थळ नाही. आपण आता म्हटल्याप्रमाणे त्याठिकाणी विश्रांतीच्या सुविधा निर्माण केल्या आहेत. परंतु निर्माण केलेल्या सुविधांच्या ठिकाणी कुत्रे देखील जात नाही. त्यावर केलेला खर्च वाया गेला आहे. याबाबत आम्ही आपणास दोष देत नाही. तेव्हा याबाबतीत आपण माननीय सदस्यांना बरोबर घेऊन दोन दिवसांचा सिंधुदुर्ग जिल्हयाचा दौरा करणार काय?

अशुद्धीसह प्रत / शुद्धीसाठी नाही

प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. राजन तेली व सिंधुदुर्ग जिल्हयातील सर्व माननीय सदस्यांना बरोबर घेऊन सिंधुदुर्ग जिल्हयाचा दौरा करण्यात येईल सागरी किनारा विकास निधी अंतर्गत 250 कोटी रुपयांचा निधी केंद्र सरकारकडून मिळतो. त्यापैकी आपल्याला 180 कोटींचा निधी मिळाला आहे. बाकीचा निधी मिळविण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण : सभापती महोदय, मी या चर्चेच्या निमित्ताने प्रश्न विचारण्याची संधी घेतो. या विषयाच्या संबंधात सिंधुदुर्गचे जिल्हाधिकारी आणि पर्यटन अधिकारी यांच्याबरोबर माझ्या बऱ्याच बैठका झालेल्या आहेत. कारण धामापूर तलावाचा जो परिसर आहे, तेथे जी जंगल सफारी आहे, त्यासाठी 24 कोटी रुपये मंजूर झालेले आहेत. मुख्य म्हणजे पर्यटन विभागाला मॅनेजिंग डायरेक्टर नाहीत. त्यामुळे तेथील अधिकाऱ्यांच्या अडचणी होत आहेत.

तालिका सभापती (श्री.अरविंद सावंत) : मघाशी सन्माननीय सदस्यांनी जो मुद्दा मांडलेला आहे. अ ब क हा दर्जा . . . .

श्री.सुभाष चव्हाण : सभापती महोदय, आम्हाला अ ब क हे वर्गीकरण माहिती आहे. "क" वर्गीकरण म्हणजे जिल्हा नियोजन मंडळातून ते ठिकाण घोषित झाले पाहिजे.

तालिका सभापती : मी सन्माननीय सदस्यांना विचारु इच्छितो की, तुम्हाला यासाठी डी.पी.डी.सी. कडून काय मिळणार आहे ?

श्री.सुभाष चव्हाण : सभापती महोदय, त्यांचे म्हणणे असे आहे की, ते ठिकाण "क" वर्गीकरणामध्ये आले तर निधी मिळेल. जोपर्यंत या कामाचा आराखडा तयार होत नाही, तोपर्यंत पैसे देणार नाहीत. हे काम पर्यटन अधिकाऱ्यांनी केले पाहिजे.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाणसाहेबांना मी सांगू इच्छितो. याबाबतीत असे दु:ख आहे की, यासंबंधात विभागाने 2006 मध्ये पत्र पाठविले आणि आज दिनांक 22 डिसेंबर 2009 रोजी या सदनामध्ये चर्चा होत आहे. तेव्हा 2006 ते 2009 या कालावधीमध्ये अधिकारी पत्राचे उत्तर देत नसतील तर त्यांचा जो बेजबाबदारपणा आहे, तो आपण अगोदर लक्षात घ्यावयास पाहिजे. वर्तमानपत्रामध्ये सिंधुदूर्ग जिल्हा हा पर्यटन जिल्हा म्हणून जाहीर केले जाते आणि त्या साठी पैसे उपलब्ध होत नाहीत.

श्री.राजन तेली : सभापती महोदय, आता याठिकाणी सांगितले की, केंद्र शासनाकडून निधी मिळतो. या निधीच्या संदर्भात आपण तेथील जिल्हाधिकाऱ्यांना, पर्यटन खात्याला सूचना देणार आहात काय ? पर्यटनाची जी केंद्रे आहेत, ती विकसित करण्यासाठी हा निधी वापरावयाचा आहे. पण प्रत्यक्षात अन्य कामासाठी, रस्त्याच्या कामासाठी निधी वापरला जातो. याबाबतीत काय करणार आहात ?

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदय, मी मघाशी सांगितले की, मी सन्माननीय सदस्यांना

. . . .6बी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बरोबर घेऊन सिंधुदूर्ग जिल्ह्याचा दौरा करीन आणि त्यानंतर याबाबतीत काय करता येईल याविषयी बैठक घेऊन चर्चा करु.

श्री.संजय केळकर : माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, चारही जिल्ह्यांना 2006,2007 मध्ये पत्रे पाठविली परंतु एकाही जिल्ह्याकडून उत्तर आलेले नाही.. ही गंभीर बाब आहे. पण याबाबत काहीतरी कारवाई व्हावयास पाहिजे. याबाबतीत माननीय मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे.

तालिका सभापती : मी याची नोंद घेतलेली आहे.

श्री सय्यद जमा : सभापति महोदय, मैं सिंधुदुर्ग जिला जो कि पर्यटन जिला घोषित किया गया है, उसके बारे में एक नई जानकारी देना चाहता हूं. डेढ़ साल पहले मेरे पास विदेश से एक प्रमोटर आए थे. उन्होंने मुझसे कहा था कि हिन्दुस्तान में सिंधुदुर्ग एक मात्र पर्यटन जिला है, वे इस पर्यटन क्षेत्र का बीओटी तत्व पर विकास करना चाहते हैं. मैंने उस समय माननीय मंत्री श्री राणे जी, वर्तमान मुख्यमंत्री और तत्कालीन उद्योग मंत्री श्री अशोक चव्हाण और तत्कालीन मुख्यमंत्री श्री विलासराव देशमुख के साथ उनकी एक बैठक करायी थी. मेरे पास उनके सारे पेपर्स हैं. अगर आप आदेश देंगे और माननीय मंत्री जी मुझे भी अपने साथ सिंधुदुर्ग के दौरे पर ले जाएंगे तो मैं वे पेपर्स उन्हें दे दूंगा.

तालिका सभापती : सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या बुधवार, दिनांक 23-12-2009 रोजी सकाळी 9.45 वाजता पुन्हा भरेल. सकाळी 9.45 ते 11.30 वाजेपर्यंत विशेष बैठक होईल. त्यावेळी सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर व इतर सन्माननीय सदस्य यांनी नियम 260 अन्वये दिलेला प्रस्ताव चर्चेसाठी घेण्यात येईल. त्यानंतर दुपारी 12.00 वाजता सभागृहाची नियमित बैठक भरेल.

(सभागृहाची बैठक रात्रौ 10 वाजून 13 मिनिटांनी, बुधवार, दिनांक 23-12-2009 रोजीच्या सकाळी 9 वाजून 45 मिनिटांपर्यंत स्थगित झाली.)

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही